भारतवर्षीय

अर्वाचीन चरित्र-कोश

920.03
Cit
32312

वि. वि. चिंतामण

भारतवर्षीय

अर्वाचीन चरित्रकोश

(इ. स. १८१८–१९४५ अखेर)

विद्यानिधि

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

32312
✓

920.03-CHI
0 32312

12

920.03
Cit

शके

[इ. स. १९४६

किंमत वीस रुपये

प्रकाशक—सिद्धेश्वरशास्त्री चिंचाव, मॅनेजिंग डायरेक्टर,
भारतवर्षीय चरित्रकोश मंडळ, लि.,
५८ शनवार पेठ, पुणें २.

या ग्रंथाचें पुनर्मुद्रण, भाषान्तर व रूपान्तर इत्यादींचे सर्व
हक्क वरील मंडळानें राखून ठेविले आहेत.

मुद्रक—सदाशिव रामचंद्र सरदे
नवीन समर्थ विद्यालय
छापखाना, ४०

प्रस्तावना

:—आज हा अर्वाचीन चरित्रकोश वाच-
ांना आम्हांला अतिशय आनंद होत
कोशाच्या योजनेंतील हा तिसरा म्हणजे
ोय. हा अर्वाचीन चरित्र-कोश लोकांना
ीड तप उराशीं बाळगलेली योजना पूर्ण
ान आम्हांस लाभत आहे. एक प्रचंड
विध दीर्घ कालानंतर अनेक संकटांना तोंड देत
याच पैल तीराला पोंचविल्यामुळें ऋणविमोचन
शा मधुर भावनांनीं मन व्याप्त झाल्यास

नियुगीन व अर्वाचीन अशा त्रिखंडात्मक
सृष्टीच्या आरंभापासून नेहरूंचें स्वतंत्र
र स्थापन होईपर्यंतच्या अवाढव्य
मुळें इतिहास चित्रपटाप्रमाणें पाहण्याची
वींत, हे. साधारणतः दोन अडीच हजार
उत्पा हास कोठल्याहि इतिहासग्रंथांत क्वचितच
पुरु पण त्याबाबत आपण हिंदुस्थानांतले
पुर्वीच्या ाग्यशाली आहोंत. आपणांकडे त्या-
विकृत गप्प ल अडीच हजार वर्षांचे वेदादि ग्रंथ
वगैरे ठि ांत उपलब्ध आहेत. मोहेंजोदडो
पूर्वीचा इ झालेल्या उत्खननांतून तर त्याहि
तर त्या उपलब्ध झाला आहे. आणि पुराणांनीं
नांवनिशी ींच्या अनेक मन्वन्तरांचा इतिहास
प्राणी नि ्याचा प्रयत्न केला आहे. मनुष्य
वाढहि ते ्यापूर्वीची सृष्टीची क्रमानें झालेली
इतिहासा त नमूद करतात. यावरून त्यांच्या
परिणाम नेची व्यापकता मनावर चांगलाच
चीन शा कालापासून मौर्य चंद्रगुप्तापर्यंत
ोराव श, मौर्य चंद्रगुप्तापासून शेवटल्या
त्यापुढील र्यंत मध्ययुगीन चरित्र-कोश आणि
कोशांत देाची माहिती अर्वाचीन चरित्र-
ने ी आहे. अशा या त्रिखंडात्मक
ये विशेषतः भारतवर्षाची सर्वांगीण
र्वाचे
पर्य

निर्णय—आम्हीं १८१८ ते
ाल धरला आहे. मराठ्यां-
कडून इंग्रजांनीं दिल्ली घेतली, १८१८ सालीं बाजीराव रघुनाथ पेशवे पुणें सोडून पळाला आणि येथें इंग्रजांचें राज्य स्थिर झालें. या मधल्या काळांत हिंदुस्थानच्या बाहेर जग आहे आणि त्यांपासूनहि आपणांस कांहीं शिकतां येईल, ही कल्पना येथील लोकांना नव्हती. इंग्रजांचें राज्य येथें स्थिर झाल्यावर जगाशीं आमचा संबंध आला, आमची दृष्टि जागतिक झाली आणि जगाशीं संबंध ठेवल्याशिवाय तरणोपाय नाहीं अशी खात्री पटत चालली. जुनी विचारसरणी व आत्मतृप्तता यांना जबरदस्त धक्का बसला, आम्ही जगाचा एक भाग म्हणून विचार करूं लागलों व प्रत्येक अघाडीच्या अग्रभागीं चमकण्याची व नवे विचार आत्मसात् करण्याची आमच्यांत धडपड सुरू झाली. सबब हा आमचा अर्वाचीन काळ होय. हा अर्वाचीन काल प्रत्येक देशाचा निराळा असतो.

युरोपच्या इतिहासांतसुद्धां कॉन्स्टांटिनोपलचा मुसलमानांनीं पाडाव केल्यानंतर ग्रीक व रोमन संस्कृतीचा सर्वत्र अभ्यास सुरू झाला. नवे विचार सुरू होऊन कूपमंडूक वृत्ति नष्ट झाली व अनेक शास्त्रीय विषयांच्या अभ्यासास सुरुवात झाली. तेव्हां दृष्टीला व्यापकपणा येऊन अनेक जुन्या कल्पनांना धक्का बसला आणि जागतिक दृष्टि प्राप्त होऊन अर्वाचीन काल सुरू झाला, असें मानतात.

याच धोरणानें हिंदुस्थानच्या भूतकालाकडे पाहिलें असतां, प्राचीन कालांत हिंदुस्थानांत जागतिक दृष्टि व व्यापक विचारसरणी होती, असें स्पष्ट दिसतें. मध्ययुगांत जागतिक दृष्टि नष्ट होत गेली आणि इंग्रजी राज्याबरोबर तिचा पुन्हा उदय झाला, नव्या विचारांनीं दिशा भरून गेल्या आणि आपण जगाचा एक घटक असल्याचा विचार पुनश्च प्रसृत झाला. म्हणूनच स. १८१८ नंतर हिंदुस्थानचा अर्वाचीन काळ सुरू झाला असें मानावें लागतें.

भारतवर्षीय स्वरूप—या कोशाला भारतवर्षीय स्वरूप कितपत प्राप्त झालें आहे हें पाहण्यासारखें स्थूल लक्षांना ब्रिटिशसरकारच्या राज्यव्यवस्थेंत हिंदुस्थान-

अकरा* प्रान्तांपैकीं सर्व प्रान्तांतील व्यक्तींचा समावेश या कोशांत झाला आहे. संस्थानांपैकीं प्रमुख संस्थानांतील व्यक्तींचा समावेश आहे. भाषावार विचार करितां सुमारें दोनशें बोली व कितीतरी भाषा हिंदुस्थानांत चालू आहेत. बोली या लिपिबद्ध नसल्यानें त्या कोणत्यातरी लिपिबद्ध भाषेच्या अंगभूत समजल्या जातात. अशा भाषांपैकीं भाषावार प्रान्तरचनेच्या दृष्टीनें व कार्याच्या सुलभतेच्या दृष्टीनें राष्ट्रसभेनें एकवीस प्रान्त कल्पिले आहेत.

राष्ट्रसभेचे भाषावार प्रान्त—

१ अजमीर मारवाड (१ हिन्दी), २ आंध्र (तेलगू), ३ आसाम (आसामी), ४ उत्कल (उरिया), ५ कर्नाटक (कानडी), ६ केरळ (मल्याळी), ७ गुजराथ (गुजराथी), ८ तामीळनाड (तामीळ), ९ दिल्ली (२ हिन्दी), १० पंजाब (उर्दू), ११ बंगाल (बंगाली), १२ बिहार (बिहारी), १३ ब्रह्मदेश (ब्रह्मी), १४ मध्यप्रान्त (मराठी), १५ महाकोशल (३ हिन्दी), १६ महाराष्ट्र (२ मराठी), १७ मुंबई (३ मराठी), १८ विदर्भ (४ मराठी), १९ सरहद्द (पुस्तु), २० संयुक्त (४ हिन्दी), २१ सिंध (सिंधी). यांत चार हिन्दीचे व चार मराठीचे प्रान्त एकत्र धरल्यास भाषावार प्रान्त फक्त पंधरा होतात व त्यांत तामीळ, तेलगू, कानडी आणि मल्याळी या द्राविड भाषांचा एक वर्ग व संस्कृतोद्भव भाषांचा दुसरा वर्ग असे विभाग पडतात. भाषावार दृष्टीनें या सर्व प्रान्तांतील लोकांचा समावेश या ग्रंथांत झाला आहे. या प्रत्येक भाषेंत अभिजात वाङ्मय पुरातन कालापासून होत आलेलें आहे व आजहि होत आहे. त्यांत त्या प्रान्तांतील लोकांच्या भावना व अन्तःकरण खुलेपणानें व्यक्त झालेलें असतें. मात्र मराठी, हिन्दी, गुजराथी, उर्दू, बंगाली व कानडीखेरीज इतर भाषांतील वाङ्मयसेवकांचा परिचय या ग्रंथांत फारच थोड्या प्रमाणांत घेतां आला. वास्तविक त्या त्या भाषेंतील राष्ट्रीय महाकवी सर्वांना परिचित असणें इष्ट आहे. पण आन्तरप्रान्तीय माध्यमाच्या अभावीं परक्या इंग्रजीच्या द्वारां आम्हाला परस्परांचा जेवढा परिचय होईल तेवढाच. सध्यां तरी त्याला उपाय नाहीं.

*१ मुंबई, २ मद्रास, ३ बंगाल, ४ बिहार, ५ ओरिसा, ६ मध्य, ७ संयुक्त, ८ पंजाब, ९ सिंध, १० सरहद्द, ११ आसाम, १२ संस्थानें.

अर्वाचीन इतिहासाचीं सा

पासून आजतागायत पर्यंतचा प्राचीन, म
चीन अशा क्रमानें होणारा प्रवास हा
हळुहळू उजेडांत येण्यासारखा आहे.
कोशाच्या कक्षेंतील माहिती अंधारांत
लागेल तें जमा करण्यासारखी होती
उपलब्ध होणारे सर्व पुसट, तुटक दुवे
तेथें आधारांसह संशोधकांच्या पुढें
करावें लागलें. कांहींहि सोडावय
त्यासंबंधीं भूमिका असल्यानें आणि
ग्रंथ प्रायः संस्कृतांत असल्यानें आधार
पाहून नमूद करितां येत असत. त्यास
व कांहीं ठिकाणीं इतर युरोपीय भाषांतील
नमूद करणें अवघड वाटलें नाहीं. त्या
युरोपीय ग्रंथांचीं भाषान्तरें करून घेणें
पण मध्ययुगीन कोशापासून आधार, त्यां
त्यांची विविधता यांमुळें मार्ग काढणें मुष्कील
अक्षरशः अडचणींतून मार्ग काढावा लागल
लागली, निवडींत हातीं येणाऱ्या
द्यावा लागला आणि अनेक गोष्टी अनिर्णित
स्थितींत नमूद कराव्या लागल्या. कित्येक
नव्या-जुन्या साधनांच्या अभ्यासानें
उत्पन्न झाला.

अर्वाचीन चरित्र-कोश
व अस्सल साधनांच्या
अडचणी उत्पन्न करणारा
प्रसिद्धीचीं साधनें, विद्वत्ता
मोठेपणाच्या तात्कालिक भडक
चरित्रें नमूद करावींत व कोणाचीं
व्यामोह उत्पन्न होण्याचा पदोपदीं
जगाच्या ज्ञानांत भर टाकणारे कोण
कोण यांचा उलगडा होईना.
क्रान्ति करणारे कोण आणि क्रान्तीच्या
कोण हें समजेना. राजाश्रयानें
तेजानें डोळे दिपूं लागले आणि निःस्पृह लोकसेवा-
रांचीं नांवेंगांवें शोधून काढावीं लागलीं अशी
करितांकरितां स्वतःचें नांवहि ज्यांचें सर्व
ज्यांनी काळजी घेतली नाहीं व ज्यांचा उल्लेख, एलएल.बी.
श्रेय लोकांना घेऊं दिलें त्या थोषा, प्राचीन भारत'
करणेंहि मुष्कीलीचें झालें. निवड भारतवर्ष, पुणें २.
व विषय हेहि लक्षांत ठेवावे न

स्वरूप, प्रत्येक क्षेत्रांत उत्पन्न झालेली विविधता आणि सूक्ष्मता, तसेंच व्यापकतेपेक्षां ज्ञानाच्या विशेषीकरणाकडे वाढती प्रवृत्ति वगैरे गोष्टी लक्ष्यांत घेऊन निवड करावी लागली. अशी निवड करतांना त्या त्या व्यक्तींच्या कर्तृत्वांतील विशेष दाखवितांना अनेक विषयांतील सूक्ष्मता प्रगट करणें ओघानेंच प्राप्त होई. ज्ञानाच्या किंवा कार्याच्या केन्द्रीकरणामुळें त्या विषयाशीं अपरिचित असलेल्या बाहेरच्या लोकांना विषय समजावून देणें कठीण पडतें; पण त्याशिवाय त्या त्या व्यक्तीचें चरित्रच पुरें होत नाहीं. एवढेंच नव्हे तर त्या त्या व्यक्तींचें चरित्र म्हणजे प्रामुख्यानें त्याच्या कार्याचा तोच भाग होय. सबब चरित्रपूर्णतेकरितां तो भाग स्पष्ट करण्याचें काम करावेंच लागलें व तसें करितांना त्या त्या विषयांतील तज्ज्ञांचें साहाय्य आवश्यक झाले.

चरित्रें कोणाचीं?—या कोशांत कोणत्याहि क्षेत्रांत विशेषपणानें चमकलेल्या माणसांचीं चरित्रें द्यावयाचीं असा पहिल्यापासून संकल्प होता, आणि त्याप्रमाणें अटल चोर मंगळदास गांधीपासून ते रामकृष्ण परमहंसांसारख्या थोर पुरुषापर्यंत समाजांतील सर्व थरांतील विशेषत्वानें चमकणाऱ्या व्यक्तींचीं निवडक चरित्रें दिलीं आहेत. त्यांत जात, धर्म, प्रान्त, देश, धंदा किंवा भाषा यांचा भेद बाळगला नाहीं. हिंदुस्थानासंबंधीं ज्यांनीं महत्त्वाची कामगिरी केली, ज्यांनीं ज्ञानाचें किंवा कलेचें एखादें दालन सुशोभित केलें, त्याला नवा उजळा दिला किंवा नवी दृष्टि उत्पन्न केली त्या सर्वांचा संग्रह करण्याची दृष्टि ठेविली आहे. ज्यांची माहिती लोकांना असणें जरूर आहे, ज्यांचें नांव नेहमीं कानावर येतें, पण ज्यांच्या कर्तृत्वाचा उमग होत नाहीं आणि ज्यांच्या कर्तृत्वाची व ज्ञानाची परंपरा पुढें चालविणें अवश्य आहे अशांची कटाक्षानें निवड करण्यांत आली आहे. वृत्तपत्रकार, राजकारणी, मैदानी वक्ते, संस्थांचे अधिकारी व प्रचलित व्यवहार हातीं असणारे लोक यांच्याहि चरित्रांचा संग्रह केला आहे.

विभूति कोण—पूर्वोक्त क्षेत्रांतील कांहींना कार्यापेक्षां अधिक प्रसिद्धि मिळते आणि त्यांना स्वतःची प्रसिद्धि करण्याची जरूरीहि असते. पण यापेक्षां अत्यंत संथपणें महत्त्वाची व कायम स्वरूपाची कामगिरी कर्तव्यबुद्धीनें करणारा पण प्रसिद्धिपराङ्मुख असा एक वर्ग राष्ट्रांत असतो. शरीरांतील आरोग्याप्रमाणें तोच राष्ट्राची खरी संपत्ति होय. तो वर्ग प्रसिद्धिपराङ्मुख असतो आणि फार्जाल प्रसिद्धीमुळें त्याच्या कार्यांत व्यत्ययहि येतो. पण त्यामुळें त्यांचें कार्य फारच थोड्या लोकांना ठाऊक असतें.

कालाच्या बदलत्या प्रवाहांत लोकांच्या आवडी-निवडींत टिकून राहणारें मोठेपण मिळविणें अतिशय कठीण आहे. समाजांत एक दिवस ज्याला आदर्श पुरुषाचें स्थान प्राप्त झालेलें असतें त्याला पाहतां पाहतां नामशेष होण्याचा प्रसंग येतो. शास्त्र किंवा वाङ्मय क्षेत्रांतील ही स्थिति. मग राजकारण, कला, उद्योग यांसारख्या केवळ जनमताच्या तालावर चालणाऱ्या बाबींत तर यापेक्षां अधिक अस्थिरता असणारच.

परंतु यामुळें त्या त्या काळीं प्रामाणिकपणें अविरत व प्रचंड कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या मोठेपणास बाध येऊं शकत नाहीं. आपआपल्या क्षेत्रांत आपल्या बुद्धीप्रमाणें ध्येयवादानें सतत काम करीत राहणारा मनुष्य हा समाजांतील खरा श्रेष्ठ पुरुष होय. त्याच्याच कर्तृत्वावर समाजाच्या इतिहासाची उभारणी होत असते. सत्यनाश करणारे राजे किंवा उत्पाती समाजकंटक यांच्या घडामोडींला इतिहासांत तितकें महत्त्व देतां येणार नाहीं. क्षणभर चमकून दिसेनाशा होणाऱ्या व्यक्तीपेक्षां कर्तव्यबुद्धीनें कार्य करणाऱ्या लोकांची निवड करण्याचेंच कार्य महत्त्वाचें होय.

हिंदुस्थानाच्या अति खालावलेल्या स्थितींत जन्माला येऊन ज्यांनीं निरलसपणें कार्य केलें, जन्मभर यातना व अवहेलना होत असतां जे आपल्या कर्तव्यापासून च्युत झाले नाहींत. पुष्कळ वेळां त्यांचें प्रतिपादन व सिद्धान्त बरोबर असूनहि देशांतील राजकीय व सामाजिक परिस्थितीमुळें त्या व्यक्ती प्रभावहीन व अपेशी दिसल्या तरी तींच माणसें आमच्या राष्ट्राची खरी संपत्ति होत. अशा व्यक्तींच्या कर्तृत्वानेंच हिन्दी राष्ट्राचें नांव जगांत उज्ज्वल झालें आहे आणि त्यांच्यामुळेंच हिंदुस्थानचा कायाकल्प होऊन तो आजच्या स्थितीला येऊन पोंचला आहे. अशा व्यक्तींच्या चरित्रांचा संग्रह करण्याचें काम आम्हीं या कोशांत यथामति केलें आहे.

त्यांतहि अंगीकृत कार्यांत परकीयांपेक्षां स्वकीयांचाच विरोध ज्यांना सहन करावा लागला अशा व्यक्ती विशेष महत्त्वाच्या होत. राजा राममोहन राय, स्वामी दयानंद सरस्वती, ज्योतिबा फुले, माधव गोविंद रानडे वगैरेंचीं नांवें या दृष्टीनें महत्त्वाचीं होत. या लोकांना

32312

समकालीन लोकांनी तर हेटाळलेंच, पण अगदीं अलीकडच्या काळापर्यंतसुद्धां त्यांच्यासंबंधीं अनादराचे उद्गार निघत असत. परंतु ती स्थिति अलीकडे पालटून नव्या सांस्कृतिक आक्रमणाला तोंड देणारे आणि हिन्दी संस्कृतीचें व्यापक स्वरूप प्रकाशांत आणणारे सत्पुरुष म्हणून त्यांचा आतां गौरव करण्यांत येत आहे. भविष्यकालीं तर 'स्वतंत्र भारताचे द्रष्टे' म्हणून त्यांचा गौरव अधिकच होत जाईल असेंहि दिसतें.

पण याप्रमाणें भविष्यकालाचे अग्रदूत म्हणून काम करणाऱ्या वरील थोर पुरुषांप्रमाणें प्रत्येक क्षेत्रांत कालानुरूप कार्य करणाऱ्या आणि समाजाला गतिशाली व आकलनशील ठेवून जगाच्या शर्यतींत मागें पडूं न देणाऱ्या व्यक्तिहि तशाच श्रेष्ठ दर्जाच्या होत, असें मानल्याशिवाय गत्यन्तर नाहीं.

अशाहि व्यक्तींचीं चरित्रें मात्र आम्हीं मुद्दाम मिळवून प्रसिद्ध केलीं आहेत आणि तीं प्रसिद्ध करतांना ढोबळ माहिती न देतां तपशीलवार माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. विषयांची विविधता साधण्याचा प्रयत्न कितपत यशस्वी झाला आहे हें शेवटची विषयसूचि चाळली असतां सहज ध्यानांत येईल.

पण हें निवडीचें कार्य अत्यंत कठीण वाटलें ही गोष्ट प्राञ्जलपणें कबूल केली पाहिजे.

परदेशी पंडित व स्वदेशी पंडित—जन्मानें परक्या पण कर्मानें येथील बनलेल्या परदेशी व्यक्तींचीं चरित्रें या ग्रंथांत कांहीं आलीं आहेत. त्यांत बहुतेक देशांतील लोक असून त्यांची गणना प्रायः पुरातत्त्व किंवा प्राच्यविद्यासंशोधकांत करावी लागेल. असें काम करणारांत प्रायः सरकारी नोकरांचा भरणा फार मोठा आहे. काम करण्याच्या तळमळीबरोबर त्यांचें राजकर्त्यांशीं असणारें नातें, हुद्दा, त्यांच्याभोंवतीं उभा असलेला हुकमी शिक्षित परिवार आणि प्रसिद्धीचीं साधनें यांमुळें त्यांचें काम उरक, योग्यता, मानमान्यता व परिणाम या दृष्टीनें अत्यंत यशस्वी झालेलें दिसतें. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन काम करावयास निघालेल्या देशी लोकांचें काम तितकें उठावदार झालेलें दिसत नाहीं.

पोटाचा उद्योग करावयाचा व फावल्या वेळीं संशोधन करावयाचें, तें प्रकाशित करण्याच्या खटाटोपापासून तें बाजारांत विकणें आणि संशोधकापुढें मान्यतेकरितां ठेवणें हीं सर्वच कामें एकट्यानें करण्याचें खडतर दैव देशी संशोधकाच्या मार्गांत सतत अडचणी उत्पन्न करीत आलें आहे. सर्वच दृष्टीनें अनुकूलता असणाऱ्या श्रीमंताच्या मुलानें व नगरपालिकेच्या कंदिलाखालीं अभ्यास करणाऱ्या गरीब विद्यार्थ्यानें केलेल्या अभ्यासाइतकी प्रचंड तफावत या दोन कार्यकर्त्यांत पडते. पण या परिस्थितीच्या भयानकतेंतून मार्ग काढून आन्तरराष्ट्रीय कीर्ति मिळविणाऱ्या हिंदी संशोधकांचें कोणासहि कौतुक वाटल्यावांचून राहणार नाहीं. उदाहरणार्थ, ज्यांचें शिलालेखांतील संख्येचें व अक्षरांचें वाचन व संशोधन इतक्या दीर्घ कालानंतर बरोबर ठरत आहे व इंग्रजी येत नसतांनाहि परदेशांत ज्यांच्या योग्यतेचा व ज्ञानाचा गौरव झाला, पण स्वतःच्या देशांत मात्र अन्नान्नदशेंत शेवटले दिवस गेले त्या डॉ. भगवानलाल इंद्रजींचें चरित्र या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. 'माझें हें संशोधन पाहा व जर तें तुम्हांला योग्य वाटलें तर मला पुढें संशोधन चालविण्यासाठीं वेळेवर पोटभर अन्न मिळण्याची व्यवस्था करा' हें जगविख्यात गणिती श्रीनिवासन् रामानुजन् यांचे उद्गार, किंवा 'पत्राचें उत्तर लिहिण्यापुरताहि माझेजवळ पैसा किंवा साधनें नाहींत' असें लिहिणारे इतिहासाचार्य राजवाडे यांच्या उद्गारांवरून आमच्या सर्वच संशोधकांच्या कष्टावर व स्थितीवर प्रकाश पडेल.

व्यक्तीच्या श्रेष्ठत्वाचें गमक—सध्यां जगांतील निरनिराळ्या भागांचा अलगपणा कमी होत असून त्याला झपाट्यानें एकता प्राप्त होत आहे. दळणवळणाच्या वेगवान् साधनानें चोवीस तासांत पृथ्वीप्रदक्षिणा करण्याची शक्यता निर्माण झाली आहे, दूरपणा लोपला आणि जगांतील कोठल्याहि आंदोलनापासून कोणत्याहि राष्ट्राला अलग राहणें अशक्य झालें आहे. लहान राष्ट्रांना मोठ्या राष्ट्रांत सामील झालेंच पाहिजे अशी स्थिति आली आहे. मग लहान जाती, थोड्या लोकसंख्येच्या भाषा वगैरेंना मोठ्या जाती, मोठ्या संख्येच्या भाषा वगैरेंच्याशीं एकरूप झाल्याशिवाय जगतां येणें अशक्य झालें असल्यास नवल नाहीं. जगाच्या बरोबर राहण्याकरितां नवे शोध, नवें ज्ञान आणि नवी व्यवस्था तत्परतेनें पत्करावी लागत आहे. त्याकरितां आन्तरराष्ट्रीय भाषा व तज्ज्ञ यांच्यामध्यें स्वतःकरितां स्थान निर्माण करण्याची व तें कायम टिकविण्याची दक्षता ध्यावी लागत आहे. या जागतिकसंबंधाच्या अत्यावश्यकतेमुळें आहार, पोषाख, शिक्षण

इंगरेतील वैचित्र्य नष्ट होऊन विलक्षण समानता निर्माण होत आहे. पूर्वी व्यापक ज्ञान व बहुश्रुतता यांना महत्त्व होतेंच, पण आतां त्या गुणांच्या मर्यादा जात, प्रान्त, देश आणि जग अशा क्रमानें वाढल्या आहेत आणि ज्ञानाचें वर्गीकरण, विशेषीकरण व केन्द्रीकरण यांच्या पद्धतीहि अधिक सूक्ष्म बनल्या आहेत. हें अचूक हेरून त्यांनीं कार्य केलें आणि जगाच्या शर्यतींत सामील होण्याची हिंदुस्थानला योग्यता प्राप्त करून दिली ते हिंदुस्थानच्या दृष्टीनें काळाच्या पाऊलांची चाहुल ओळखणारे महात्मे होत.

चरित्रें कशीं लिहिलीं?—चरित्र लिहिण्याच्या अनेक तऱ्हा आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या घटना कालक्रमानें नमूद करावयाच्या हा त्यांतील एक प्रकार व हाच कोशाला उपयुक्त अशी पुष्कळांची समजूत. पण ही पद्धत आम्हीं केव्हांच स्वीकारलेली नाहीं. आयुष्यांतील प्रकट घटनांप्रमाणेंच त्यांच्या अन्तर्गत प्रेरणांनाहि महत्त्व असतें. अन्तर्गत प्रेरणांचा उलगडा झाल्याशिवाय पुष्कळ वेळां प्रकट घटनांचाहि नीट उलगडा होत नाहीं. तसेंच प्रासंगिक प्रेरणांवरूनहि मनुष्याच्या चरित्रावर प्रकाश पडतो. कोणत्याहि स्थितींतील मनुष्य प्रसंगीं कसा वागतो यावरून त्याच्या अन्तःकरणाची परीक्षा होते. तें वर्तन त्याचें खरेखुरें चरित्र होय. पण त्याची नोंद घटनात्मक चरित्रांत क्वचितच सांपडते.

या दृष्टीनें ऐतिहासिक ग्रंथ व रामायणभारत या ग्रंथांची तुलना करतां येण्यासारखी आहे. कालक्रमानें घटनांची नोंद अशा समजुतीनें इतिहास लिहिल्यानें तो निर्जीव ठोकळ्यासारखा होतो. पण त्यांत अन्तःकरणाच्या प्रेरणेची आणि प्रसंगीं विशिष्ट व्यक्ति कशी वागली याची नोंद केल्याबरोबर रामायणमहाभारतांना अजरामर काव्याचें स्वरूप आलें. काल्पनिक नाटक-कादंबऱ्यांपेक्षां वास्तव वाङ्मय अन्तःकरणाची पकड घेतें, याचें कारणहि त्यांत आपणांस आपलें व आपल्या भोंवतालच्या समाजाचें हुबेहुब प्रतिबिंब दिसतें हें होय. चरित्रलेखन करितांना सुद्धां तन्मय होऊच चरित्रनायकाच्या अन्तःप्रवृत्तीशीं एकरूप होऊन त्याचें कार्य आपणांस वर्णन करितां आलें, तर तें चरित्र निःसंशय सरस, प्रेरक आणि यथार्थ चित्रण करणारें होईल याबद्दल संशय वाटत नाहीं. तसा प्रयत्न आम्हीं केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे हें वाचकांनीं ठरवावयाचें आहे.

वरीलप्रमाणें प्रत्येक चरित्र लिहितांना केवळ बाह्य घटना नमूद न करितां तुलना, चिकित्सा, परिणाम, योग्यता वगैरे दृष्टीनें आम्हीं थोडें तरी विवेचन केलें आहे. त्याशिवाय चरित्रलेखन अपुरें होतें, अशी आमची समजूत आहे. त्यामुळें जन्ममृत्यु व ठोकळ घटना अशा स्वरूपाचीं हजारों चरित्रें देण्यापेक्षां आम्हीं सुमारें हजार चरित्रेंच देऊं शकलों. सर्वत्र निवेदनपद्धतीच स्वीकारली आहे.

अर्वाचीन काळाचें समालोचन—पूर्वीच्या काळाप्रमाणेंच अर्वाचीन काळांतील आपल्या धार्मिक, सामाजिक, राजकीय व वाङ्मयीन इतिहासाचें सिंहावलोकन करणें अत्यंत मनोरंजक व उद्बोधक आहे. या प्रत्येक क्षेत्रांत उत्पन्न झालेल्या अनेक तात्त्विक प्रश्नांचा निर्णय कालानें तात्पुरता आपल्यासारखा लावून घेतला आणि पुढील मार्ग आक्रमण केला. सर्व ठिकाणीं तात्त्विकतेपेक्षां व्यवहार व उपयुक्तता यांचाच विजय झालेला असून हटातटानें वादविवाद करणाऱ्या दोन्ही पक्षांना कालाच्या उदरांत गडप व्हावें लागलें. पुढें पुढें तर त्या त्या पक्षाच्या त्या कालच्या तात्त्विक भूमिकासुद्धां लोकांना हास्यास्पद वाटूं लागल्या.

धार्मिक क्षेत्र हें आजवर नेहमींच अत्यंत महत्त्वाचें व जिव्हाळ्याचें मानण्यांत आलें आहे. तेथें राजसत्तेलाहि मोठ्या सावधगिरीनें हस्तक्षेप करावा लागतो. त्या क्षेत्रांतहि धर्माची आवश्यकता, प्रामाण्य, अपौरुषेयवाद, एकेश्वरवाद, मूर्तिपूजा, मंदिरप्रवेश, सती, पुनर्विवाह, मिश्रविवाह, विवाहवयोमर्यादा, नोंदणीविवाह, जातिभेद, शुद्धि, सहभोजन, अस्पृश्यता, समुद्रगमन वगैरे वाद अत्यंत हिरीरीनें लढविण्यांत आले, आणि ते वाद कालानें सुधारणानुकूल कौल देऊन निकालांत काढले. जरूर तेथें त्यावर कायद्याचेंहि शिक्कामोर्तब करून घेण्यांत आलें. यांपैकीं कांहीं वाद तर आज उभयपक्षांनाहि हास्यास्पद कोटींतले वाटतील.

आज सतीच्या चालीचा पुनरुद्धार करावा, आठ वर्षांच्या मुलीचें लग्न करावें, मूर्तिपूजा सर्वश्रेष्ठ आहे, शुद्धीला शास्त्रांत आधार नाहीं, समुद्रगमनाला प्रायश्चित्त नाहीं, सार्वजनिक ठिकाणीं जातिभेद व धर्मभेद पाळावा, असे विचार कोणीहि प्रदर्शित करणार नाहीं. सहभोजन व अस्पृश्यतानिवारण वगैरे बाबतींतील विरुद्ध असणारा शास्त्रार्थ अव्यवहार्य असल्याचा निर्णय लोकांनीं सहज स्फूर्तीनें घेतला. व्रतवैकल्यें संपुष्टांत आलीं, नित्यकर्म व संस्कार यांना संक्षेप देतांना तीं नाममात्र तरी कशीं शिल्लक राहतील याची चिन्ता उत्पन्न झाली. शेंडी-जानवें

पळालें. सगोत्र व मिश्र विवाहांना कायद्याचेंहि साहाय्य मिळविण्यांत आलें. आज जातीय संस्थांना सामाजिक प्रश्नांबाबत मौन पाळण्याचें धोरण स्वीकारून जीवित कंठावें लागतें आणि आपली संघटना यशस्वी होत असल्याचा देखावा करावा लागत आहे. धार्मिक व सामाजिक बाबतींत कांहीं क्रान्तिकारक निर्णय लोकांनीं कसे घेतले आणि ते केव्हां अमलांत आले, हें कळणेंहि मुष्किलीचें होऊन बसण्याइतके ते जलद व न कळत अमलांत येत आहेत.

राजकीय क्षेत्रांतहि अशीच आमूलाग्र क्रान्ति झाली. स्वतःचें राज्य गेल्याचा खेद लोकांत नव्हता, असें म्हणतां येणार नाहीं. पण इंग्रजी राज्याच्या आधुनिक तंत्रानें लोक गोंधळले आणि तें ईश्वरी प्रसाद मानण्यापासून सुरवात झाली. काठीला सोनें बांधून काशी-रामेश्वराच्या यात्रा करण्याइतकी सुरक्षितता एकदम निर्माण झाल्यानें लोकांना आश्चर्याचा धक्का बसला. आगगाडी-तारायंत्रानें लोक चकित झाले. इंग्लंडांतून नोकरांमार्फत राज्यकारभार चालविण्याच्या पद्धतीचें आकलन होण्यांत कांहीं दिवस गेले. परंतु दत्तक नाकारणें, संस्थानें खालसा करणें वगैरे प्रकारांना सत्तावन सालच्या बंडानें उतार मिळाला आणि कर्झनशाहीपर्यंत अर्जविनंत्यांच्या नेमस्त राजकारणाला भरती आली. पण राजकीय आश्वासनांना केराची टोपली दाखविली जाऊन "इंग्रजांची योग्यता देशी माणसाला केव्हांच येणार नाहीं" असें उघडपणें बोललें जातांच एकदम मध्ययुगीन दहशतवादानें डोकें वर काढलें. पहिल्या महायुद्धाच्या आरंभीं इतर वसाहतींचें अनुकरण करून साम्राज्यान्तर्गत स्वराज्य मागणारी होमरूलची चळवळ सुरू झाली. तेव्हांपासून लोकमताच्या पाठिंब्यावर चालणारें आधुनिक राजकारण सुरू झालें. त्याला महात्मा गांधींनीं अत्यंत प्रभावी स्वरूप दिलें.

स्वराज्य व स्वातंत्र्य या कोणीं देण्याघेण्याच्या गोष्टी नसून प्रत्येकाला त्या उपभोगण्याचा जन्मसिद्ध हक्कच आहे असा लो. टिळकांचा सिद्धान्त आतां सर्वमान्य झाला आहे. साम्राज्यान्तर्गत स्वराज्याची कल्पना चुकीची ठरली असून साम्राज्यांतून फुटून निघण्याची भाषा योग्य ठरली आहे. त्यांतूनहि सत्ताधारी हे भांडवलवाले असावेत कीं श्रमजीवी असावेत असा प्रश्न उत्पन्न होऊन दुसऱ्या महायुद्धानंतर मानवी हक्क निश्चित करण्यांत आले आणि ते पुरविण्याची हमी देणाऱ्या समाजसत्तावादी व विश्वकुटुंबवादी राजकारणांकडे ध्येय म्हणून जगाबरोबर हिंदुस्थानचाहि वाढता कल आहे. भांडवलवाले व्यक्तिशः नष्ट होत असून संघ केल्याशिवाय कोणाला कोणताच व्यवहार करितां येणें अशक्य झालें आहे. जुनी भांडवलशाही व नवा विश्वकुटुंबवाद यांचा संघर्ष चालू असून कोण विजयी होतो हें अद्याप ठरावयाचें आहे. मात्र जुनी भांडवलशाही व्यक्तिस्वरूपांतून संघस्वरूपांत गेली आहे. मध्यमवर्गाकडून तज्ज्ञांकडे आणि श्रम करणारांकडे सत्तासंक्रमणाचें काम वेगानें चालू आहे. आणि विश्वकुटुंबवाद कोठें एखाद्याच देशांत कधींच अवतरत नाहीं, म्हणून त्याच्या अवतरणाची फक्त पूर्वयोजना चालू आहे. पण समतेचें सत्ययुग सर्व जगांत एकदम सुरू होण्याचा मुहूर्त मात्र अजून सांपडलेला नाहीं.

सर्वच जग उपयुक्ततावादी व व्यवहारवादी बनत चालल्यानें वाङ्मयाच्या मांडणींतहि आमूलाग्र बदल झाला आहे. ज्यांत स्वतःचें प्रतिबिंब लोकांना दिसत नाहीं, ज्यांत प्रचलित प्रश्न सोडविण्याची दृष्टि नाहीं, ज्यांत नावीन्य, सुटसुटीतपणा आणि आकर्षकपणा नाहीं, असला कोणताहि वाङ्मयाचा प्रकार लोकप्रिय होण्याची शक्यता कमी होत चालली आहे. अद्‌भुताचें सत्ययुग नष्ट झालें असून, कल्पनारम्य आमोदप्रमोदांना जीवनांत क्षणिकपणा आला आहे, आणि वास्तवतेला बहर आला असून जीवनाशीं संलग्न असणाऱ्या गोष्टींकडे आस्थेनें पाहण्याची वृत्ति वाढत आहे.

महाकाव्यें करण्याची प्रथा मागें पडली असून छंदांनाहि स्वच्छंदानें वागविण्याकडे प्रवृत्ति वाढली आहे. काव्यांचा छोटेपणासुद्धां नकोसा झाला असून गद्यालाच काव्याचें माधुर्य आणण्याची प्रवृत्ति वाढली आहे. कादंबऱ्यांचा विस्तार खेपेनासा झाला असून एकसंधि लघुकथांचें युग चालू झालें आहे. त्यांतून लघुतम कथा निर्माण होत आहेत. अनेक घटनांचें संमिश्रण करण्यापेक्षां एकच घटना आकर्षकपणें आरंभ, मिरगांठ व उकल अशा पद्धतीनें मांडून रसोत्कर्ष साधण्याकडे प्रवृत्ति वाढत आहे. संगीत व गद्य नाटकांच्या मांडणींत फरक पडला असून सहज अभिनय, वास्तव घटना व प्रसंगानुरूप भावगीतें यांकडे विशेष लक्ष देण्यांत येत आहे; आणि तेथें कालमर्यादा कमी करण्यांत येऊन एकप्रसंगात्मकतेकडे लक्ष देण्यांत येत आहे. शास्त्रीय वाङ्मय लोकप्रिय व आकर्षक पद्धतींत मांडण्याची कला वाढली आहे आणि टीकेला चिकित्सेचें स्वरूप येत आहे. सर्वच वाङ्मयावर जागतिक आंदोलनाची छाप पडत

असून साधारण माणसांना प्रतिभेच्या जोरावर त्यांत विहार करणें अशक्य झालें आहे. थोडक्यांत पण स्पष्ट व रुचकर पद्धतीनें आपले विषय मांडण्याची औपनिषदिक पद्धतीची स्पष्ट छाप कलेवर दिसत आहे.

अर्वाचीन कालांत हिंदुस्थान व महाराष्ट्र यांचें स्थान—या कालांत हिंदुस्थाननें केलेली प्रगति निःसंशय वाखणण्यासारखी आहे. अभिमान बाळगण्यासारखा इतिहास मागें असलेल्या लोकांनाच उज्ज्वल भविष्यकाळ निर्माण करितां येतो. अफ्रिकेंतील निग्रो किंवा अमेरिकेंतील रेड इंडियन अजून जेथल्या तेथेंच रानटी अवस्थेंत आहेत. पण आशिया खंडांतील बहुतेक राष्ट्रांत कमालीची हालचाल झाली असून दोन्ही महायुद्धांतून ता राष्ट्रें व त्यांतहि विशेषतः हिंदुस्थान हा सोन्याप्रमाणें शंभरनंबरी ठरला आहे. जगांतील प्रत्येक स्पर्धाक्षेत्रांत सामील होण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्यांत जागृत झाली असून ज्ञानाच्या प्रत्येक शाखेंत भर घालण्याचें कामहि तो करीत आहे. आपली सर्व दृष्टीनें योग्यता वाढावी म्हणून समाजांत अन्तर्गत क्रान्ति करून, प्रत्येक व्यक्तीस संधि मिळण्याच्या कामांत कृत्रिम सामाजिक बंधनें झुगारून देण्याची आणि फार तर कांहीं आदर्श नैतिक बंधनें आपणांवर लादून घेण्याची वृत्ति वाढत आहे. त्या दृष्टीनें हा कोश सहज चाळला असतां आपल्या देशाची व्यक्तिसंपदा केवढी भव्य आणि आशादायक आहे हें सहज दिसून येईल.

या कोशाचें स्वरूप भारतवर्षीय असलें तरी त्यांत महाराष्ट्रीय व्यक्तींचीं चरित्रें इतर कोणत्याहि प्रान्तापेक्षां अधिक येणें अपरिहार्य आहे. जवळची वस्तु मोठी व लांबची लहान दिसणाऱ्या आपल्या दृष्टीचा तो परिणाम आहे.

तथापि अगदीं कांटेकोर दृष्टीनें पाहिलें तर महाराष्ट्रीय व्यक्तिसंपदेचा दर्जा कमी होत चाललेला दिसतो. इतर प्रान्तांच्या मानानें तो अगदींच निकृष्ट नसला, तरी तो पहिल्या दर्जाचा खास नाहीं. अखिल भारतीय कीर्तीच्या मर्यादा ओलांडून आन्तर्राष्ट्रीय प्रांगणांत प्रवेश केलेल्या कांहीं मोजक्या व्यक्ति सोडल्या तर बाकीच्या बहुतेक लोकांना स्वप्रान्तापलीकडे स्थान नाहीं.

मात्र याचें मूळ महाराष्ट्राच्या कुवतीमध्यें नसून त्यांना मिळालेल्या विकृत मार्गदर्शनांत आहे. लेखनसंशोधनादि सर्व व्यवहार मराठींतच करून मराठींचें वैभव वाढवा, असे ग्रंथ मराठींत लिहा कीं, त्यासाठीं मराठी भाषेचें अध्ययन इतरांना करावें लागलें पाहिजे, अशा प्रकारच्या चालू काळाशीं विसंगत व अभिनिवेशी विचारांनीं महाराष्ट्र व्यापला गेला. इतर प्रान्त जागतिक माध्यम झालेल्या इंग्रजीसारख्या भाषेंत लिहून आपल्या ज्ञानाला जागतिक मान्यतेचें शिक्कामोर्तब मिळवीत असतां, महाराष्ट्रांत मात्र मोठ्या हिरीरीनें मराठींतच लेखनादि चालू राहिलें. त्या त्या विषयांतील तज्ज्ञांशीं संबंध टाळण्याच्या या मध्ययुगीन मार्गानें स्वतःचें लेखन-संशोधन काय योग्यतेचें आहे हें कळेनासें होऊन जिकडे तिकडे उत्कर्षाला प्रतिकूल असणारी आत्मतृप्तीची भावना उत्पन्न झाली.

व्यापाराबद्दल महाराष्ट्र कधींच प्रसिद्ध नव्हता. तरी ज्ञानवृद्धीच्या बाबत तो इतर प्रान्तांच्या मागें राहण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण जागतिक माध्यम असणाऱ्या इंग्रजीसारख्या भाषेच्या अवहेलनेनें शास्त्रीय जगापासून तो अलिप्त राहिला. थोडें ललित लेखन आणि अगदीं अलीकडच्या काळांतील इतिहासाच्या साधनांचें संकलन यांपरता महत्त्वाचा उद्योग त्याच्या हातून घडला नाहीं. अर्थोत्पादन, भारतीय मान्यता किंवा जगन्मान्य शास्त्रज्ञांच्या पंक्तीला बसण्याचें साधन या तीनहि दृष्टींनीं महाराष्ट्राची दिशाभूल झाली आहे, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. बंगाल किंवा मद्रास प्रान्तांनीं याबाबत आघाडी मारली असून गुजराथ, सिंध, पंजाब वगैरे प्रान्तांनीं त्याला व्यापाराची जोड देऊन आपलें वैशिष्ट्य उत्पन्न केलें आहे. जगांत असा एकहि देश नाहीं कीं, जेथें वरील प्रान्तांतील व्यापारी नाहींत. महाराष्ट्र हा ज्ञान व व्यापार या दोन्ही क्षेत्रांत कमालीचा मागसलेला असून, त्याच्या सर्वांगीण मागसलेपणाचें मूळ गेल्या पिढींतील कांहीं समाजधुरीणांच्या एकारलेल्या विचारसरणींत आहे.

कोशाचें राष्ट्रीय महत्त्व—जगाच्या बरोबरीनें राहण्याकरितां आणि प्रसंगीं संधि साधून वैशिष्ट्यानें चमकण्याकरितां कोशासारख्या वाङ्मयाचें अत्यंत महत्त्व आहे, ही गोष्ट अद्यापि लोकांच्या लक्षांत येत नाहीं, असें मोठ्या खेदानें नमूद करावें लागतें. अभ्यासू लोकांचे ज्ञानांत भर टाकण्याचें आणि ज्ञानाचे वेगळाले पैलू स्पष्ट करण्याचें काम जगांत अव्याहत चालू आहे. तें संकलित करून लोकांना सुलभ रीतीनें हस्तगत करण्याची आणि

चलनी नाण्याप्रमाणें तें व्यवहारांत आणण्याची व्यवस्था कोशासारख्या ग्रंथांनीं होत असते. ताळेबंद पाहिला असतां आर्थिक स्थितीची स्पष्ट कल्पना येते त्याप्रमाणें कोश-वाङ्मयामुळें ज्ञानाच्या प्रगतीची यथार्थ कल्पना येते. जागतिक दृष्टीनें प्रत्येक विषयांतील कार्यपद्धति, प्रगति, शोध, ग्रंथ व त्यांतील नावीन्य प्रसिद्ध करण्याची व्यवस्था आहे. केवळ हिंदुस्थानच्या दृष्टीनें सुद्धां झालेल्या अशा कामाचा आढावा घेण्याचा प्रयत्न झाला आहे.* त्या त्या शाखेंतील तज्ज्ञांकडून लेख लिहवून घेण्याचा प्रयत्न त्या ग्रंथांत केला आहे. वेगळाल्या विषयांत झालेली प्रगति नमूद करून ती देशीभाषांच्या द्वारां लोकांना सुलभ करण्याची अत्यंत जरूरी आहे. मराठींत रसायनशास्त्रासंबंधी असें लेखन करून अद्ययावत् माहिती लोकांपुढें ठेवण्याचें काम डॉ. वा. वि. भागवत यांनीं सह्याद्रि मासिकांत लेख लिहून केलें (१९३८). असे प्रयत्न जर प्रत्येक विषयांत होतील तर अशा कोशांचें कार्य अधिक पूर्ण होऊन लोकांच्या ज्ञानाची पातळी वाढेल आणि सर्वच दृष्टीनें त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं.

आशादायक व्यक्तिसंपदा—या दृष्टीनें राजकारणांत टिळक, गांधी; तत्त्वज्ञानांत अरविंद, विवेकानंद, राधाकृष्णन; वास्तवशास्त्रांत रामन, मेघनाद साह; वनस्पतिशास्त्रांत जगदीशचंद्र बोस व डॉ. सहानी; व्यापारांत टाटा, बिर्ला; पार्लमेंटरी राजकारणांत पटेल; आन्तर्राष्ट्रीय राजकारणांत नेहरू; धाडसी क्रान्तिकारकांत सुभाषचंद्र बोस, सावरकर; कवींत रवीन्द्रनाथ टागोर, शरच्चन्द्र, इकबाल; अल्पसंख्याकांचे राजकारणांत जिना, आंबडेकर; गणितांत रामानुजम्, नारळीकर, शाहसुलेमान; रसायनांत प्रफुल्लचंद्र रे; नृत्यकलेंत उदयशंकर-मेनका; इंग्रजी वक्तृत्वांत सुरेंद्रनाथ बानर्जी, श्रीनिवासशास्त्री, ना. गोखले, सरोजिनी नायडू; संपन्नतेंत निजाम; घटनाशास्त्रांत सप्रू, जयकर; चित्रकलेंत नन्दलाल बोस, कनु देसाई, रविवर्मा; चित्रपटसृष्टींत शांताराम, सरकार; एंजिनियरिंगमध्यें विश्वेश्वरअय्या; दिवाणांत सर टी. माधवराव, मिर्झा इस्माइल; क्रीडाक्षेत्रांत ध्यानचंद, रणजी; वर्तमानपत्रकारांत चिंतामणि, मोतिलाल घोष; विचारप्रधान लेखनांत रामानंद चतर्जी-नटराजन्; सनातन धर्माच्या समर्थकांत पंडित राजेश्वरशास्त्री द्रविड; कुशल राज्यकर्त्यांत सयाजीराव गायकवाड, ही व्यक्तिसंपदा भारतवर्षाला अभिमानास्पद आहे, यांत संशय नाहीं.

याशिवाय आपल्या प्रान्तांत व भाषेंत महत्त्वाचें कार्य सतत चालू ठेवणारे कितीतरी लोक निघाले आहेत.

लेखकादिकांचे आभार—डॉ. अ. प. करमरकर (आळूर, व्यं.), प्रो. मो. ल. चंद्रात्रेय (नारळीकर व महाजनि), वा. ल. चिपळुणकर (अय्यर, एस्. सुब्रह्मण्य ॲरंडेल-पतिपत्नी, आल्काट, कझिन्स-पतिपत्नी), रा. ब. का. ना. दीक्षित (कनिंगहम व कीलहॉर्न), डॉ. मो. गं. दीक्षित (मार्शल, सर जॉन), आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे, (आचार्य, या. त्रि., ऐनापुरे वा., ओझा, सु., किशोरीदत्त, गोपाळाचार्लू, गंगाधर कविराज, जीवराम कालीदास), पी. एस्. दोंदे (भिसे, डॉ. शं. आ.), सु. त. पप्पु, (मास्ति, वे.), म. म. द. वा. पोतदार, (ॲबट, आयंगार कृष्णस्वामी, पिले स्वामीकन्नु), शंकरदेव विद्यालंकार, गुरुकुल कांगडी (गुरुदत्त विद्यार्थी, चमूपति, जयचंद्र विद्यालंकार, जयदेव शर्मा).

यांपैकीं चिपळुणकर, देशपांडे, शंकरदेव व पी. एस्. दोंदे यांनीं अनुक्रमें थिआसाफिस्ट, हिंदुस्थानांतील वैद्य, आर्यसमाजी व प्रभुज्ञातींतील गृहस्थ यांचीं कितीतरी चरित्रें पुरविलीं. पण आम्ही त्यांपैकीं वर नांवापुढें कंसांत नमूद केलेलीं थोडाफार फरक करून घेऊं शकलों. शिवाय वरीलपैकीं कांहीं गृहस्थांनीं व प्रा. कृ. खं. डोळे, (रसायन), प्रो. द. श्री. जोग, (विज्ञान) यांनीं आपल्या विषयांतील मजकूर जरूर तेथें वाचून दिला. भांडारकर ओ. रि. इन्स्टिटयूटचे असि. क्युरेटर श्री. य. र. जुन्नरकर यांनीं आम्हास कांहीं जन्ममृत्यूंचे सन पुरविले. यांपैकीं आमच्या कामाकडे आपुलकीनें लक्ष देणारे रा. ब. का. ना. दीक्षित हे या कोशाचें मुद्रण चालू असतांच कांहीं महिन्यांच्या आजारानें दिवंगत झाले हें नमूद करण्यास दुःख वाटतें. श्री. श्री. ग. भालेराव, डॉ. ग. रं. धडफळे व विनायक चिन्नाव हे तिघे तर कोणतेंहि साहाय्य करण्यास सतत तयार असत.

मंडळ स्थापन झाल्यापासून आयव्यय निरीक्षकाचें काम आमचे मित्र श्री. वि. के. खासनीस करीत आहेत. वेळोवेळीं हें काम पार पाडण्यास त्यांनीं आम्हांला उत्तेजन दिलें. तसेंच श्री. के. पां. जोशी वकील यांनीं आम्हांस वेळोवेळीं कायदेशीर सल्ला दिला.

*Progress of Science in India during the past twenty-five years.—Indian Science Congress Association Silver Jubilee 1938, Editor Dr. B. Prasad, 1938.

समर्थ भारत छापखान्याचे व्यवस्थापक श्री. सदाशिव रामचंद्र सरदेसाई यांनीं आपल्या कुशल सहकार्याचा आम्हाला फायदा दिला म्हणून आम्ही अनेक अडचणींतून हें कार्य पार पाडूं शकलों. शिवाय या कोशाच्या सुबक व व्यवस्थित मुद्रणांत त्यांचा फार मोठा वांटा आहे.

वरील सर्व व्यक्तींचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत.

चरित्रकोशमंडळाचें कार्य व विसर्जन— चरित्रकोशाच्या कामाची सुरवात १ जून १९२९ ला झाली. प्राचीन १९३२, मध्ययुगीन १९३७ व अर्वाचीन चरित्रकोश १९४६ सालीं प्रसिद्ध होऊन संकल्पित योजना पूर्ण होत आहे. तीनहि भाग मिळून बावीसशें पृष्ठें व (१२+६+१=) एकोणीस हजार चरित्रें देण्यांत येत आहेत. पहिला संकल्प दोन हजार पृष्ठांचा होता.

लढाईमुळें तिसऱ्या भागाचें काम सारखें लांबणीवर पडत चाललें. मध्यें तर तिसरा भाग प्रसिद्ध होत नाहीं, असें जाहीर करून आगाऊ घेतलेले पैसे परत करण्याची कल्पनाहि बळावली होती. पण आज हिंदुस्थान सरकारच्या विशेष परवानगीनें काम पूर्ण होत आहे, याबद्दल आमच्याप्रमाणें या कामाकडे लक्ष असलेल्या सर्वांना आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं.

विजयादशमी १८६८
५।१०।१९४६

चरित्रकोशमंडळाचें संकल्पित कार्य पुरें झालें असल्यानें आतां आम्ही त्याचें विसर्जन करण्याचें ठरविलें आहे. वर्गणीदारांना ग्रंथ देऊन आम्ही त्यांच्या ऋणांतून मुक्त होत आहोंत. विसर्जन करतांना सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, लक्ष्मण्या परशुराम्या जाजी, व डॉ. ग. रं. घडफळे हे मंडळाचे भागीदार आहेत. यांपैकीं श्री. लक्ष्मण्या परशुराम्या जाजी, अध्यक्ष वैश्यसमाज, गुलबर्गा यांनीं आपल्या भागाचे पांचशें रुपये मंडळाला देणगी म्हणून दिले असल्याचें कृपेनें कळविलें आहे. तसेंच आमच्या अगदीं आरंभीच्या भागीदारांपैकीं हैदराबादचे श्रीमन्त वामन रामचन्द्र नाईक हे दिवंगत आहेत. त्यांच्या भागाचे पांचशें रुपये त्यांचे चिरंजीव बॅ. श्रीधरपंत नाईक यांनीं मंडळाला देणगी म्हणून दिले असल्याचें प्रसिद्ध करण्यास आम्हाला कृपेनें परवानगी दिली आहे. याबद्दल आम्ही वरील दोघांचे अत्यंत आभारी आहोंत.

चरित्रकोशाच्या या कार्यामुळें जगांतील अद्वितीय अशा हजारों व्यक्तींच्या मानसिक सहवासाचा लाभ आम्हाला घडला आणि एक विशेष प्रकरच्या आनंदांत आमचा हा काल गेला. हें कार्य आज संपूर्ण होत असल्याच्या समाधानाबरोबरच अशा थोर पुरुषांच्या सहवासाला आपण आतां मुकणार ही जाणीवहि मनाला अस्वस्थ करीत आहे. अशा द्विधा मनःस्थितींत वाचकांना हा ग्रंथ आम्ही अर्पण करीत आहोंत.

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

कोश कसा पहावा ?

१. या कोशांत व्यक्तींचा निर्देश अकारादि क्रमानें केला आहे. अनुस्वार बाराखडीतील प्रत्येक वर्णाच्या शेवटीं घेतला आहे. म्हणजे अचा अनुस्वार अच्या शेवटीं, आचा अनुस्वार आच्या शेवटीं याप्रमाणें दिला आहे. तसेंच क्ष व ज्ञ हीं संयुक्त व्यंजनें क व ज मध्यें न देतां मराठीप्रमाणें सर्वत्र शेवटीं स्वतंत्र घेतलीं आहेत. तात्पर्य, अनुस्वार हा सोयीकरितां आम्ही स्वतंत्र दिला आहे आणि क्ष व ज्ञ हे मराठीप्रमाणें स्वतंत्र जोडले आहेत. मात्र एकाच वंशांतील व्यक्तींचीं चरित्रें वंशक्रमानें घेतलीं आहेत.

२. प्रारंभीं प्रत्येक व्यक्तीचें उपनांव घेऊन नंतर त्या व्यक्तीचें मुख्य नांव व त्यानंतर पित्याचें नांव घातलें आहे. पण पुष्कळ प्रान्तांत नांवें लिहिण्याची पद्धत वेगळाली आहे. तिला अनुसरून नांव प्रसिद्ध असेल त्या पद्धतीनें आम्ही तें स्वीकारून चरित्र दिलें आहे व नांवांसंबंधीं अधिक स्पष्टीकरण चरित्राच्या प्रारंभीं केलें आहे.

३. कांहीं व्यक्ती टोपण नांवानेंच विशेष प्रसिद्ध असून त्यांचें खासगी नांव अगदींच अप्रसिद्ध असतें. अशा वेळीं टोपण नांवाखालीं आम्ही तशा व्यक्तींचीं चरित्रें दिलीं आहेत. उदाहरणार्थ, अनंततनय, गुंगा.

४. पुष्कळ वेळां गौरवदर्शक पदव्यांनीं व्यक्ति विशेष प्रसिद्ध असतात तेथें पदवी प्रथम देऊन नंतर समग्र नांव दिलें आहे. अशा ठिकाणीं पदवीच्या वर्णक्रमाखालीं तें चरित्र आढळेल. उ. छत्रपति.

५. हैदराबाद, कोल्हापूर, ग्वाल्हेर, बडोदें व भोर येथील राजांचीं चरित्रें निजाम, छत्रपति, शिंदे, गायकवाड व पंतसचीव या नांवांवर दिलीं असून इतर राजांचीं चरित्रें त्यांच्या संस्थानांच्या नांवांवर दिलीं आहेत. उ. औंध, पतियाळा, बिकानेर, म्हैसूर.

६. व्यक्तीचें नांव जाड ठशांत दिल्यानंतर कंसांत जन्ममृत्यूचा इसवी सन दिला आहे. उपलब्ध झाली तेथें तारीखहि नमूद केली आहे. सन अंदाजी असल्यास पुढें सुमारें असा शब्द घातला आहे. माहितीच्या अभावीं अंदाजहि करितां आला नाहीं तेथें नुसतेंच प्रश्नचिन्ह घातलें आहे.

७. चरित्राला सुरवात करण्यापूर्वी चरित्रांतील मुख्य गोष्टींकडे लक्ष वेधेल अशा प्रकारची थोडक्यांत शब्दयोजना केली आहे. त्यामुळें व्यक्तीच्या चरित्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन उत्पन्न होतो.

८. नंतर जन्मस्थान, शिक्षण, धंदा, विशेष कार्य, संस्था, ग्रंथ, योग्यता वगैरेंची क्रमानें मांडणी केली आहे. महत्त्वाच्या भागाला स्वतंत्र परिच्छेद दिले आहेत. विवाह, संतति व जात यांचा निर्देश जरूर तेथें केला आहे.

९. सध्यांच्या काळांत इंग्रजी भाषेच्या माध्यमामुळें देशी शब्दांचे इंग्रजी पद्धतीचे उच्चार प्रचलित आहेत. ते टाळणें शक्य झालेलें नाहीं. सहज बोध होण्याकरितां पुष्कळ वेळां तशाच उच्चारांचा उपयोग करावा लागला. उ.ठाकूर-टागोर,वंद्योपाध्याय-बानर्जी, चट्टोपाध्याय-चतर्जी.

१०. जिवंत व्यक्तींचाहि कोशांत समावेश केला आहे. त्यामुळें तेथें वर्तमानकाळ वापरावा लागला आहे. त्या व्यक्तींपैकीं कांहीं कोशाचें मुद्रण चालू असतां दिवंगत झाल्या. त्यांचे मृत्युसन शेवटीं दिले आहेत. मृत्यूनंतर त्यांच्या चरित्रांतील वर्तमानस्थितीविषयींचे उल्लेख व वर्तमानकाळ विसंगत वाटतो. तसेंच वर्तमान स्थितीविषयीं केलेलें विधान कालानें विसंगत ठरतें. तें टाळण्याचा प्रयत्न करूनहि कांहीं ठिकाणीं राहून गेलें आहे.

११. जात, धर्म, पक्ष, मत, प्रान्त किंवा कोणत्याहि उच्चनीचतेच्या भावनेचा स्पर्श होऊं न देतां गुणग्राहक पद्धतीनें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. क्वचित् मतभेद किंवा दोषदिग्दर्शन तात्त्विक भूमिकेवरून केलें आहे.

१२. आधार ग्रंथांची यादी सोबत जोडली आहे. त्याशिवाय कांहीं आधार-ग्रंथांचा निर्देश जरूर तेथें स्पष्ट केला आहे. याशिवाय नियतकालिकांतून घेतलेल्या व व्यक्तिशः मिळविलेल्या माहितीच्या आधारांचा निर्देश करणें अशक्य आहे.

१३. क्वचित् माहिती अपुरी, विवेचन न पटणारें, मतप्रदर्शन बोचक किंवा नामोल्लेख रूढ पद्धतीला सोडून झालेला असल्यास त्याबद्दल ग्रंथकर्त्यांवर कोणत्याहि हेतूचा आरोप न करितां वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

१४. या ग्रंथांत हिंदुस्थानांतील अनेक नव्या-जुन्या भाषांचा संबंध आला. याशिवाय हिंदुस्थानच्या बाहेरील आशिया व युरोप खंडांतील अनेक भाषा, त्यांतील शब्द व व्यक्तींचीं नांवें यांचा निर्देश करण्याचा प्रसंग आला. इंग्रजी भाषेंतील शब्दांचा उपयोग केल्याशिवाय तर लिहिणेंच अशक्य झालें. त्याबाबत पूर्ण एकरूपता व शुद्धता राखणें मुष्कीलीचें झालें.

अनुक्रमणिका

प्रस्तावना	१–९
कोश कसा पहावा ?	१०
अनुक्रमणिका	११
शुद्धिपत्र	११
अधिक माहिती	११
संस्कृत श्लोक	१२
अर्वाचीन चरित्रकोश	१–५७८
व्यक्ति-सूचि	५७९–५८९
विषय-सूचि	५९०–५९८
आधार ग्रंथ	५९९–६००

शुद्धिपत्र

पान	स्तंभ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५८	१	५	मुंबईच्या एल्फिन्स्टन	सातारा हायस्कूल
		१५	१९१३–१६	१९१३–१९
		३२	कोल्हापूरच्या+++आश्रयानें	हा मजकूर नको
२२५	१	१८	अध्ययन	जन्म
		२०	कृष्णशास्त्री	सितारामशास्त्री
		२४	भोसले सरकारनें	खंडोपंत माणकेश्वरानें
		३०	पुत्र	पुतणे
२८३	२		१९४०	१९३०
२८८	२	परिच्छेद	एक्झिक्युटिव	हा शब्द नको
४००	२		विवाह १९४०	१९११

अधिक माहिती

अभ्यंकर, भास्करशास्त्री–(मृत्यु स. १८७०); वासुदेवशास्त्री–(जन्म स. १८६३–मृत्यु स. १९४२); शिष्यपरंपरेंत बालसरस्वती रानडे यांचे शिष्य गंगाधरशास्त्री तेलंग.

अय्यर, जी. सुब्रह्मण्य–(मृत्यु स. १९१६) 'हिंदु' पत्राचे संपादक १८७८-१८९८.

ॲरंडेल, डॉ. जॉर्ज सिडने–(मृत्यु स. १०४५).

अलादियाखाँ–(जन्म स. १८५७–मृत्यु स. १९४६ मार्च १६).

काळे, प्रो. वा. गो.–(मृत्यु स. १९४६ जाने. २७).

केडगांवकर, श्रीनारायणमहाराज–(मृत्यु स. १९४५ श्रावण).

देशपांडे, अबाजी श्रीपत–(मृत्यु स. १९४६ सप्टें.).

बाडोलाय, गोपीनाथ–(जन्म स. १८८९).

मेहेता, सर मनुभाई–(मृत्यु स. १९४६ आक्टो. १४).

अथैकदा महाराष्ट्रे कालेऽर्वाचीनसंज्ञिते ।
कोशकारम् उपागम्य कश्चित् जिज्ञासुरुक्तवान् ॥
प्राचीनमध्ययुगीनौ कोशौ हि पठितौ मया ।
अर्वाचीनचरित्राणां कोशं ज्ञातुं समुत्सहे ॥
को न्वस्मिन् भारते वर्षे गुणवान् कश्च वीर्यवान् ।
धर्माचारव्रतज्ञो हि को जागतिकदृष्टिकः ॥
नवराष्ट्रस्य निर्माणे संस्कृतिप्रसरे तथा ।
कः प्रभुः कः समर्थश्च को राष्ट्रमुद्धरिष्यति ॥
चारित्र्येण च को युक्तः सर्वभूतहिते रतः ।
एतदिच्छाम्यहं श्रोतुं परं कौतूहलं हि मे ॥
श्रुत्वा चैतत् चरित्रज्ञः कोशकारो विचक्षणः ।
श्रूयतामिति चामन्त्र्य प्रहृष्टो वाक्यमब्रवीत् ॥
एकत्र दुर्लभा मन्ये विना रामम् इमे गुणाः ।
तथापि च प्रवक्ष्यामि पार्थक्येन गुणान्वितान् ॥

अर्वाचीन चरित्रकोश

भारतवर्षीय

अर्वाचीन चरित्रकोश

अ

अक्कलकोटचे स्वामीमहाराज— (समाधि स. १८७८, एप्रिल ३०). सुप्रसिद्ध साधुपुरुष.

ह्यांच्या जन्माचा व जन्मस्थानाचा पत्ता लागत नाहीं. यांना लोक गाणगापुरच्या नरसिंहसरस्वतींचे अवतार मानीत. तसेंच हे वयानें पांचसहाशें वर्षांचे होते असें समजणारेहि पुष्कळ लोक होते. शेवटचे बाजीराव पेशवे गादी सोडण्यापूर्वी गुर्लहोसूर येथें गेले होते. तेथें चिदंबरदीक्षित यांनीं यज्ञ केला. त्या यज्ञांत हे तूप वाढीत असल्याचा निर्देश यांच्या बोलण्यांत पुष्कळ वेळां येई. पुढें हे मंगळवेढ्यास गोविंदबुवा या नांवानें कांहीं दिवस होते. तसेंच हे चंचलभारती या नांवानेंहि कांहीं काळ वावरत असावेत. पुढें अक्कलकोटास येऊन हे स्थायिक झाले (स. १८५७). तेथें हे दिगंबरबाबा म्हणून ओळखले जात. प्रथम हे वेडे समजले जात.

पण पुढें साक्षात्कारी सिद्ध पुरुष म्हणून यांचा लौकिक सर्वत्र पसरला. थोरथोर लोक यांच्या दर्शनास येऊं लागले. यांच्या भक्तांत सर्व जातींचे व सर्व धर्मांचे लोक असत. यांची राहणी चमत्कारिक होती तरी ती पूर्ण विरक्तपणाची असे. हे कोणाशींहि धड बोलत नसत. परंतु हे जें बोलत तें भाविकांच्या मूकप्रश्नांशीं तंतोतंत जुळे. यांची बरदास्त राजाला शोभेशी होती. तरी त्या विलासांत हे कधींहि गुरफटलेले नसत.

हे अनेक चमत्कार करीत. त्यांपैकीं एक म्हणजे तेथील कडुनिंबाचीं पानें यांनीं गोड करून दाखविलीं. तीं अद्यापिहि तशींच लागतात (पट्टणकर यांच्या ज्ञानप्रकाश-मधील चरित्रावरून).

' आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण, नांव नृसिंहभान, काश्यप गोत्र, मीन रास ' अशी माहिती यांनीं एकदां सहज दिल्याचें कै. ल. रा. पांगारकर हे संतचरित्रमालेंत लिहितात.

अखंडानंदभिक्षु— (जन्म स. १८७४–मृत्यु स. १९४२) गुजराथनें निर्माण केलेले थोर सत्पुरुष नि सस्तुसाहित्यमुद्रणालयाचे संचालक.

यांनीं ऋषिमुनींची वाणी आणि साधुसन्तांच्या विचारांचा प्रचार करून जनतेला जीवन दिलें आहे. यांनीं निवडक तीनशें पुस्तकांचें शुद्धीकरण करून त्यांच्या मोठ्या अक्षरांच्या लाखों प्रती छापविल्या व गरीबांतील गरीबहि विकत घेऊं शकेल इतक्या थोड्या किंमतींत ते ग्रंथ देण्याची व्यवस्था केली. अशा तऱ्हेनें गुजराथेंत घरोघर उत्कृष्ट ग्रंथ पोचतील अशी व्यवस्था केली.

हें कार्य चालविण्याकरितां ' सस्तुसाहित्यमुद्रणालय ' व ' सस्तुसाहित्यवर्धककार्यालय ' अहमदाबाद, या दोन संस्था यांनीं सुरू करून चालविल्या आहेत.

मात्र हिंदुस्थानांतील उत्कृष्ट वाङ्मय प्रसिद्ध करण्याचें माध्यम यांनीं गुजराथी भाषाच ठरविलें आहे.

यांनीं प्रसिद्ध केलेल्या कांहीं कांहीं ग्रंथांच्या वीसवीस आवृत्त्या निघाल्या आहेत व एकूण प्रती कोटीच्या वर झाल्या आहेत.

भागवत, रामायण, गीता, महाभारत, आर्यभिषक् हे ग्रंथ तर यांनीं इतके स्वस्त दिले आहेत कीं त्यांच्या कोऱ्या कागदाची किंमतसुद्धां अधिक होईल.

या ध्येयाची कल्पना यांना संन्यास घेतल्यानंतर आली. अनेक ग्रंथांचें यांनीं स्वतः संशोधन केलें आहे. जितका ग्रंथ मूळ व शुद्ध घेतां येईल तितका घेण्याचा यांनीं प्रयत्न केला आहे. अनेक प्रती मिळाल्या असतां त्यांची तुलनात्मक प्रत यांनीं घेतली आहे. कोणतेंहि पुस्तक दिखाऊ स्वस्ताईनें द्यावयाचें नाहीं, कागद वगैरे भिकार वापरा-

वयाचा नाहीं, व इतर प्रकाशकांच्या $\frac{1}{3}$ किंमत ध्यावयाची हें यांचें ध्येय आहे.

यांनीं संस्कृत, मराठी, गुजराथी, बंगाली, हिन्दी या सर्व भाषांतील ग्रंथ एक विशिष्ट ध्येय ठेवून अनुवादरूपानें गुजराथी जनतेस सादर केले आहेत.

अच्युतानन्दस्वामी—(जन्म स. १८३९; समाधि स. १८९९) मल्लविद्याप्रचारक. यांचे वडील रामकृष्णभट मोघे, आईचें नांव जानकी. हे ग्वाल्हेर येथें राहत. यांचें पूर्वाश्रमींचें नांव दामोदर रामकृष्ण मोघे.

हे काशींतील कै. बाळंभटदादा देवधरांच्या आखाड्यांतील प्रमुख कोंडभटनाना गोडबोले यांचे शिष्य. कुस्तींत यांनीं अनेक नामांकित मल्लांना चीत केलें व लौकिक मिळविला. हे अविवाहित होते. हे रोज ३३०० जोर व ३३०० बैठका मारीत. बैठका न मारल्या तर मल्लखांबाच्या उड्या व कुस्त्या करण्याचा यांचा प्रघात असे. हे आजारी असले तरी कर्मीतकर्मी अकरा जोर काढण्याचा यांचा प्रघात असे. यांनीं व्यायामशाळा स्थापन केल्या व वेताचा मल्लखांब प्रचारांत आणला. सातारचे विठोबा अण्णा वझे, पुण्याचे कै. गणेश सखाराम वझे, सितारामगुरु भट ही यांची शिष्यमंडळी होत. प्रथम यांचा आखाडा पुणें येथें खासगीवाल्यांच्या वाड्यांत सुरू झाला. नंतर तो भट गुरूंकडे होता. वझे मास्तरांच्या नेतृत्वाखालीं यांच्या नांवाची अच्युतानंदव्यायामशाळा पुणें येथें चालू आहे. वेतांचा मल्लखांब ही यांची खूणच समजली जाते.

ग्वाल्हेरचे रामचंद्रराव हरनाथ पेंटर हे यांचे एक कर्तबगार शिष्य होत. यांनीं व्यायामाचा खूपच प्रचार केला.

हे मोठे मंत्रशास्त्रज्ञ असून यांना अनेक सिद्धीहि प्राप्त झाल्या होत्या. त्यांची माहिती श्रीअच्युतानंदस्वामी चरित्र ले.-उमानाथ, प्रकाशक-वा. ना. मोहोळकर वकील, सोलापूर, या पुस्तकांत मिळेल.

अजमदअलीशाह—(कारकीर्द स. १८४२-१८४७) अयोध्येचा नबाब. मुहम्मदअलीशाहनंतर हा गादीवर आला. याचें वर्तन पाहून दिवाण शरफउद्दौलानें राजीनामा दिला. यानें आपल्या मर्जीतल्या इमादहुसेन यास दिवाण केलें. चारपांच महिन्यांतच त्याला कमी करण्याचा प्रसंग आला. शेवटीं जुना दिवाण मनोवरउद्दौला यास पुनः दिवाण केलें, पण त्यानेंहि राजीनामा दिला. यांच्याबद्दल वर पुष्कळ वाईट रिपोर्ट होऊनहि उपयोग झाला नाहीं. पंजाबांतील धामधूम, मध्यहिंदुस्थानांतील अस्वस्थता यांमुळें गव्हर्नर जनरलला लक्ष घालतां आलें नाहीं. पुढें लक्ष घालणार तों हा मृत्यु पावला. यानें गोमतीवरील लोखंडी पूल बांधला (श्री. पारसनीसकृत 'अयोध्येचे नबाब'वरून).

अझाद मौलाना अबुलकलम— (जन्म स. १८८८) सुप्रसिद्ध राजकारणी व थोर विद्वान्. यांचा जन्म मुसलमानांचें पवित्र क्षेत्र मक्का येथें झाला. यांचें घराणें मूळ हिंदुस्थानांतीलच. अकबर बादशहाच्या दरबारांत जमालुद्दीन नांवाचे थोर पंडित होते त्यांचे हे वंशज. यांचे वडील मौ. खैरुद्दीन हे स. १८५७ च्या बंडाच्या वेळीं देशान्तर करून यात्रेकरितां गेले व मक्केसच राहिले. त्यांची शिष्यपरंपरा सर्व देशांत विखुरली असून त्यांचे ग्रंथहि सर्व देशांतून धर्मग्रंथ म्हणून वाचले जातात. थोर धर्मपरंपरा व उच्च कोटीचें धर्मशिक्षण यांना वडिलांकडून लाभलें आहे. यांचें बालपण अरबस्तानांत गेलेलें आहे.

यांचें शिक्षण इजिप्तमधील कैरो येथील 'अल्अजहार' या विश्वविद्यालयांत झालें. वयाच्या चवदा-पंधराव्या वर्षी यांनीं आरबी व फारसी भाषांवर प्रभुत्व मिळविलें. वयाच्या विसाव्या वर्षापूर्वीच यांनीं इजिप्त, तुर्कस्थान, सयाम, इराण वगैरे देशांत प्रवास करून अनुभव मिळविला होता. प्रथम यांना इंग्रजी शिक्षणास विरोध झाला. पण पुढें यांनीं त्या भाषेचें ज्ञान संपादन केलें. अशा व्यापक व पायाशुद्ध ज्ञानामुळें यांचें कुरानेशरीफचें भाषान्तर प्रमाण मानण्यांत येतें.

यांचें मूळ नांव मोहियुद्दीन अहमद ऊर्फ पिरोज बख्त आहे. पण 'अबुल-कलम' हें वाचस्पति अशा अर्थाचें नांव यांना यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेमुळें आणि लेखनकौशल्यामुळें प्राप्त झालेलें आहे.

यांना लिहिण्याचा नादहि वयाच्या सोळाव्या वर्षापासून लागला. त्यापूर्वी यांनीं एक मासिक पत्र चालविलें होतें. लखनौच्या 'आलंदा' व अमृतसरच्या 'वकील' या वृत्तपत्रांत हे प्रभावी लेखक म्हणून चमकूं लागले होते.

हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या धोरणामुळें हिंदी मुसलमानांचा झगडा ब्रिटिशांशीं नसून हिंदूंशीं आहे व सत्ता हिंदूंपासूनच मिळवावयाची आहे, ही विचारसरणी सर सय्यद अहमद व त्यांनीं निर्माण केलेली अलीगडपरंपरा आणि मुस्लीम लीग यांचे प्रयत्नामुळें मूळ धरूं लागली होती. ही हिंदुविरोधी वृत्ति हिंदु-

स्थानच्याच नव्हे तर हिंदी मुसलमानांच्या संपूर्ण नाशास कारणीभूत होणारी आहे हें ठासून सांगण्याचें धैर्य ज्या थोड्या मुसलमान देशभक्तांनीं दाखविलें त्यांपैकीं हे एक होत. त्याकरितां यांनीं स्वतःचें 'अल्हिलाल' हें ऊर्दू साप्ताहिक काढलें (१९१२). त्यानें इतकें प्रभावी कार्य केलें कीं, पहिला जामीन जप्त करून नवा दहा हजारांचा जामीन मागितल्यामुळें तें बंद पडलें. क्रांतिकारकांशींहि यांचा संबंध जोडण्यांत आला. त्यामुळें दुसरें पत्र काढलें तेंहि टिकूं शकलें नाहीं. बॅ. जिना हेहि त्या वेळीं लीग-विरोधी होते. सरहद्दगांधी अबदुलगफारखान यांनाहि 'अल्हिलाल'मुळें राष्ट्रीय दृष्टि प्राप्त झाली.

स्वदेशबांधवांना राष्ट्रीय दृष्टि देण्याकरितां यांना कांहीं धर्मबांधवांशीं झगडावें लागलें. त्याप्रमाणें ब्रिटिश सरकारशींहि झगडण्यांत यांनीं कधीं माघार घेतली नाहीं. बाल्कन युद्धामुळें व पहिल्या महायुद्धामुळें तुर्कस्तानाकडे हिंदी मुसलमानांचें लक्ष वेधलें. तेव्हांहि यांनीं ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या राजकीय डावपेचांचा मुसलमानांना परिचय करून दिला. खिलापतीच्या चळवळींतील प्रभावी कार्यानें हे इंग्रजांचे कायमचे शत्रु बनले. स. १९१६ मध्यें डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टनें यांना बंगालमधून हद्दपार केलें व हे रांची येथें राहिले. तेथेंच यांना मध्यप्रान्ताच्या सरकारनें चार महिन्यांनंतर स्थानबद्ध केलें. स. १९२० सालीं यांची बंदी संपतांच यांनीं देशबंधु दासांबरोबर जोरानें कार्यास सुरवात केली. त्यांत दासांना सहा महिन्यांची व यांना एक वर्षाची शिक्षा झाली.

स. १९२३ च्या दिल्ली येथील कॉंग्रेसच्या जादा अधिवेशनांत अध्यक्ष असतां यांनीं 'पराजित व गुलाम राष्ट्रांच्या बाबतींत असहकार हें सार्वभौम सत्य आहे' हें ठासून सांगून गांधींच्या तत्त्वज्ञानाचें सुंदर विवेचन केलें.

फेरनाफेर वादाच्या वेळीं यांची भूमिका मध्यस्थाची म्हणूनच त्या विषयाचा निर्णय करण्याकरितां दिल्लीच्या जादा अधिवेशनाचें यांना अध्यक्ष निवडण्यांत आलें होतें. हे गांधीजींचे परमभक्त असले तरी नव्या उत्पन्न होणाऱ्या राजकीय प्रणालीकडे विशेष सहानुभूतीनें पाहण्याची यांची दृष्टि आहे. त्यामुळें यांचे व पं. जवाहिरलाल यांचे मतांमध्यें विशेष साम्य असल्याचें दृष्टीस पडतें.

स. १९०७-८ सालापासून लीगच्या प्रचारकांवर यांनीं चौफेर हल्ले केले. स. १९१४ सालीं मौ. मुहंमद-अली यांनीं 'कॉम्रेड' पत्रांतून लीगचा पाठपुरावा सुरू केला, तेव्हांहि यांनीं त्यांस जेरीस आणलें. कलकत्त्याच्या ईदची प्रार्थना पुष्कळ वर्षांपासून हेच चालवितात.

महात्मा गांधींच्या अत्यंत विश्वासांतील हे गृहस्थ होत. कांहीं राजकीय प्रश्नांबाबत डॉ. अन्सारी व नंतर हे यांच्या सल्ल्याशिवाय महात्माजी कधींहि वागत नाहींत. हे स. १९४० मध्यें रामगड येथें भरलेल्या कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. यांना व्हाइसरॉयनें चर्चेकरितां बोलावलें असतां यांनीं जाण्याचें नाकारलें. ८ ऑगष्ट १९४२ नंतर हे तुरुंगांत आहेत.

यांच्या 'तस्किरा' या नांवानें प्रसिद्ध असणाऱ्या ग्रंथास आत्मचरित्र म्हणणें धाडसाचें होईल. कारण त्यांत आपल्या पूर्वजांचीच माहिती यांनीं आपल्या भावना-प्रधान व काव्यमय भाषेंत दिली आहे. स्वतःचें चरित्र फक्त कठोर आक्रोश, उष्ण सुस्कारे अशा मोघम व थोडक्या शब्दांत दिलें आहे.

अणे, माधव श्रीहरि—(जन्म स. १८८० ऑगष्ट २९) चतुरस्र पुढारी.

यांचें घराणें मूळ तेलंगणांतील असून अज्ञात कालीं वऱ्हाडांत वणी येथें येऊन स्थायिक झालें. वडील नामांकित वैदिक असल्यानें प्रथम ऋग्वेदसंहिता व याज्ञिक यांचें शिक्षण यांना वडिलांकडूनच मिळालें. हे मूळ कृष्णयजुर्वेदापैकीं तैत्तिरीयशाखेचे आपस्तंब ब्राह्मण. पण दहाबारा पिढ्या यांच्या घरांत ऋग्वेदाचेंच अध्ययन चालू आहे. हे नेहमीं सांगतात कीं, 'आमच्या घरांत पोथीसुद्धां कृष्णयजुर्वेदाची निघणार नाहीं.' यांचें आजोळहि 'वेलंकीवार' हे तेलंगी ब्राह्मणच आहेत. यांचें जन्मस्थळ वणी (वऱ्हाड). यांची पत्नी बाळाघाटच्या शिवरामभट बुचरकुंडे यांची कन्या यमुनाबाई होय.

चांद्यास हायस्कूलशिक्षण व नागपूर येथें मॅट्रिक होण्यापासून बी. ए. पर्यंत शिक्षण घेतलें (१९०२), व पुढें एलएल. बी. होऊन वकिलीचा धंदा यवतमाळ येथें सुरू केला (१९०७). धंद्याबरोबरच सार्वजनिक कामांत लक्ष घालण्यास व तेथील 'हरिकिशोर' या साप्ताहिकांत लिहिण्यासहि यांनीं सुरुवात केली. राष्ट्रीय-शिक्षण वगैरे सार्वजनिक कार्यांत यांचा मोठा भाग असे. तेव्हांची यांची 'नवीन पंथ-निःशस्त्र ऊर्फ संरक्षक प्रतिकार' ही लेखमाला पूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय प्रतिपादणारी आहे. 'बिगार-निवारक मंडळ' स्थापन करून यांनीं तेंहि कार्य चालविलें होतें. होमरूल लीगच्या

चळवळींत यांनी अत्यंत तडफेनें भाग घेतला आणि सर्व जिल्ह्यांपेक्षां अधिक सभासद मिळविले (१९१६). टिळक-केळकर हे शिष्टमंडळ घेऊन इंग्लंडला गेले, तेव्हां केसरी व होमरूल लीगची जबाबदारी स्वीकारण्याविषयीं यांना विनंति करण्यांत आली होती. यावरून यांनीं लो. टिळकांचा केवढा विश्वास संपादन केला होता हें दिसून येतें.

'हरिकिशोर' बंद पडला तेव्हां यांनीं 'मुद्रणमंडळ' नांवाची संस्था स्थापून व स्वतः आर्थिक झीज सोसून यवतमाळ येथें 'लोकमत' नांवाचें साप्ताहिक पत्र सुरू केलें.

लो. टिळकांनीं स्थापलेल्या कॉंग्रेस डेमोक्रॅटिक-पार्टीनें मॉंटफर्ड सुधारणा राबवाव्यात असें ठरविलें व लढ्याची पूर्वतयारी म्हणून देशांत कामगार व मतदार यांचे संघ निर्माण करण्याचें आणि खेड्यांची संघटना करण्याचें ठरलें. परदेशांत सहानुभूति निर्माण करण्याची व्यवस्था करण्यांत आली. पण लो. टिळक दिवंगत झाले (१ ऑगष्ट १९२०) आणि कलकत्ता कॉंग्रेसच्या खास अधिवेशनांत टिळकपक्षाच्या विरोधास न जुमानतां असहकारितेचा ठराव बहुमतानें मान्य झाला. मुंबईस कॉंग्रेस डे. पार्टीनेंहि त्याला मान्यता दिली. हे असहकाराच्या विरुद्ध होते.

यांनीं असहकाराला विरोध प्रदर्शित केला तरी स्वतःला पटणाऱ्या खादीप्रचार, मद्यपानबंदी वगैरे विधायक कार्यक्रमांबद्दल अनुकूलता प्रदर्शित करून मित्र-मंडळींच्या साहाय्यानें त्यांच्या प्रसाराकरितां जोराची चळवळ केली. वकिली एक वर्ष सोडली.

कॉंग्रेसचे कौंसिल बहिष्काराच्या धोरणाविरुद्ध देशबंधु दास यांनीं उमरावती येथें घोषणा केली (६ नवं. १९२२) व कॉंग्रेसमध्यें राहून बंडाचें निशाण उभारलें. स्वराज्यपक्षाच्या नांवाखालीं यांनीं वऱ्हाडांत हें कार्य केलें आणि या पक्षातर्फे हे असेंब्लींत निवडून आले.

पुढें प्रतिसहकारपक्ष अकोला येथें बॅ. जयकरांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यांत आला (१५ फेब्रु. १९२६). हे वऱ्हाडांतील अध्यक्ष होते. हे असेंब्लींत अविरोध निवडून आले.

मध्यप्रान्तांत स्वराज्यपक्षाचा दिवाणगिरी स्थापण्यास विरोध असतांहि प्र. स. पक्ष व इंडिपेंडंट कॉंग्रेसपक्ष यांचें सहकार्य घडवून आणून ना. राव व रामराव देशमुख यांना दिवाणपद देण्यांत यांनीं खटपट केली.

स. १९२६ सालच्या निवडणुकीनंतर लाला लजपत-राय व पं. मालवीय यांनीं असेंब्लींत राष्ट्रीयपक्ष स्थापन केला. त्याचे यांना चिटणीस निवडण्यांत आलें. स्वराज्य-पक्षातर्फे असेंब्लींत असतां हे त्या पक्षाचे प्रतोद होते. रेल्वे फिनॅन्स कमिटीवर यांनीं बरेच दिवस काम केलें.

सायमन कमिशन हिंदुस्थानच्या राज्यघटनेचा फेर-विचार करण्याकरितां नेमलें होतें (१९२८). त्यावर देशानें बहिष्कार घातला होता. तें कार्य वऱ्हाडतर्फे यांनीं परिणामकारक रीतीनें केलें. पण सर्वमान्य राज्यघटना तयार करण्याकरितां पं. मोतीलाल नेहरूंच्या नेतृत्वा-खालीं कमेटी नेमली. तेव्हां नेहरू रिपोर्ट लिहिण्यांत यांनीं प्रमुख भाग घेतला होता. त्यामुळें घटनाशास्त्रज्ञ म्हणून यांचा सर्वत्र लौकिक झाला.

नवीन घटनेप्रमाणें वऱ्हाड प्रान्तास प्रा. कॉं. कमेटी मिळाल्यानंतर स. १९३० पर्यंत हे कमेटीचे अध्यक्ष होते. ऑल इंडिया कॉंग्रेस कमेटीचे पुष्कळ वर्षें सभासद होते.

कॉंग्रेसनें पूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय मान्य केल्यावर (१९२९) पं. जवाहिरलाल नेहरू यांनीं कॉंग्रेसच्या अधिकाऱ्यांस कळविलें कीं त्यांनीं अधिकाराचा किंवा कायदेमंडळाचा राजीनामा द्यावा. तेव्हां यांनीं विदर्भ प्रां. कॉं. कमेटीच्या अध्यक्षपदाचा व ऑल इंडिया कॉं. क. च्या सभासदत्वाचा राजीनामा दिला. म. गांधींनीं दांडीयात्रा आरंभिली तेव्हां यांनीं असेंब्लीच्या सभासद-पदाचा राजीनामा देऊन हे युद्धमंडळांत सामील झाले.

वऱ्हाडमध्यप्रान्ताला समुद्र जवळ नसल्यानें मीठ-सत्याग्रह करतां येईना, व जप्त वाङ्मय वाचूनहि सरकार बिथरेना म्हणून यांनीं जंगलसत्याग्रहाची कल्पना काढली, आणि तिचा सर्वत्र प्रचार करण्यांत आला. जंगलकमिटी नेमून जंगलविषयक तक्रारी मांडण्यांत आल्या आणि पुसद गांवापासून आठ मैलांवर सरकारी जंगलांत, नजर केलेल्या चांदीच्या विळ्यानें गवत कापून यांनीं कायदेभंग केला (१० जुलै १९३०). तेव्हां चोरीच्या गुन्ह्या-खालीं यांना सहा महिन्यांची शिक्षा देण्यांत आली. या नवीन तऱ्हेच्या कायदेभंगाबद्दल कॉंग्रेस वर्किंग कमिटी-कडून यांचें अभिनंदन करण्यांत आलें. तुरुंगांतून सुटून येतांच यांनीं आपल्या वृद्ध मातोश्रीचें दर्शन घेतलें. या सत्याग्रहाच्या कार्यपद्धतीमुळें हिंदुस्थानभर यांची वाहवा झाली व यांना कॉंग्रेस वर्किंग कमिटींत घेण्यांत आलें. बंगालमधील कॉंग्रेस निवडणुकीचा निर्णय देण्याकरितां उभयपक्षांनीं पंच म्हणून यांना मान्यता दिली. गांधी-अर्विन-कराराच्या वेळीं सल्लामसलतीकरितां यांना दिल्लीस

बोलावण्यांत आलें, व यांना काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष निवडण्यांत आलें (१९३३).

असहकारितेच्या काळांत काँग्रेसबरोबर विरोध करतांनाहि वैयक्तिक दृष्ट्या काँग्रेसच्या सर्व आज्ञांचें यांनीं चांगल्या रीतीनें पालन केलें. प्रथम आज्ञापालन व नंतर तक्रार अशी यांची नेहमीं भूमिका असे. जातिनिर्णयाबाबत मात्र यांनीं काँग्रेसच्या धोरणाला आरंभापासून विरोध केला आणि जातिनिर्णयाला व काँग्रेसच्या जातिनिर्णयविषयक धोरणाला विरोध करण्याकरितां यांना काँग्रेस नॅशनलिस्टपक्ष काढावा लागला. त्याबाबत पं. मदनमोहन मालवीय हे यांचे सहकारी होते. त्याकरितां काँग्रेसला प्रतिस्पर्धी उमेदवारहि यांनीं निवडणुकींत उभे केले. पुढें पं. जवाहिरलाल सुटून आल्यावर त्यांनीं निःसंदिग्ध शब्दांत जातिनिर्णयाचा निषेध केल्यावर हें प्रकरण संपलें.

मराठी साहित्यसंमेलन, ग्वाल्हेर (१९२८), बृहन्महाराष्ट्र-परिषद्, इंदूर (१९३५), आर्य-परिषद्, सोलापूर (१९३९), हिंदुलीग, लखनौ (१९४०), वऱ्हाड निजामाला मिळूं नये म्हणून स्थापन झालेली संस्था व सर्वपक्षीय परिषद् यांचे हे अध्यक्ष झाले होते.

पुढें 'परराष्ट्रीय हिंदी लोकांचें संरक्षण' या खात्याचें यांना व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळांतील स्थान देण्यांत आल (१९४१). पण तें स्थान यांनीं सरकार म. गांधींनीं वेचप्रसंग सोडविण्याकरितां आगाखान पॅलेसमध्यें केलेल्या वीस दिवसांच्या उपवासाचे वेळीं त्यांना बिनशर्त सोडीना, म्हणून त्यागपत्र देऊन सोडलें (१९४३).

पण पुनः यांना सिलोनचे एजंट नेमलें असतां तें स्थान यांनीं स्वीकारिलें (१९४३).

लोकमान्य टिळक दिवंगत झाल्यानंतर महाराष्ट्राचें नांव हिंदुस्थानच्या राष्ट्रीय राजकारणांत अव्याहत वीस वर्षे फडकत ठेवणारा अद्वितीय पुढारी या नात्यानें लोकनायक अणे यांचेंच नांव कोणासहि घ्यावें लागेल.

यांनीं म. गांधींशीं सहकार्य केलें, पण त्यांच्याशीं हे सहमत केव्हांच नव्हते. म. गांधींशीं असणारा आपला विरोध यांनीं कधीं गुप्त ठेवला नाहीं, तसेंच तो अप्रासंगिक आणि असभ्यपणें प्रगट करून त्याला कधीं द्वेषाचें रूप येऊं दिलें नाहीं. त्यामुळें म. गांधींनाहि यांच्याबद्दल आदरच बाळगावा लागला. राष्ट्रीय कार्यांत व्यक्तिनिष्ठा आड न येऊं देतां तत्त्वनिष्ठा व विधायकता इकडेच यांनी सर्वस्वीं नजर पुरविली. त्यामुळेंच काँग्रेसमध्यें राहूनहि जातिनिर्णयाबाबत स्पष्टपणें हे विरुद्ध मत नमूद करूं शकले; व काँग्रेसविरोधी नॅशनलिस्ट पक्ष काढून चालवूं शकले. यांचा विश्वास भाविकपणापेक्षां तर्ककर्कश विचारसरणीवर आहे. त्यामुळेंच प्रतिस्पर्ध्यांनासुद्धां यांचा युक्तिवाद ऐकावा लागतो.

यांचें वक्तृत्वहि पांडित्यपूर्ण असतें आणि त्यांत जुन्या संस्कृत भाषेंतील ग्रंथांतील समर्पक उतारे, दृष्टान्त आणि विचारसरणी यांची छाप पडलेली स्पष्ट दिसते. तथापि यांची स्वतंत्र विचार करणारी जागृत बुद्धि आपलें वर्चस्व वक्तृत्वांत स्पष्ट केल्याशिवाय राहत नाहीं. अभिनिवेश दिसला तरी त्यांत आग्रहीपणा नसतो. मतभेद दिसला तरी त्याला प्रतिपक्षाबद्दल अनादर किंवा द्वेषाचें स्वरूप नसतें.

अभ्यास व स्वतंत्र बुद्धि यांमुळें यांचीं असेंब्लींतील व बाहेरीलहि भाषणें लोकांचें लक्ष आपल्याकडे ओढून घेतात.

काँग्रेसचें राजकारण अगतिकतेच्या भोंवऱ्यांत गिरक्या खात आहे आणि दुसरें प्रभावी राजकारण लोकांपुढें नाहीं असें पाहून यांनीं सरकारी नोकरीचा खोडा मुद्दाम पत्करला असावा असें स्पष्ट दिसतें. प्रभावी राजकारण यांना हांक मारूं लागतांच यांच्या बिनीच्या जागेवर हे पुनः चमकल्याशिवाय राहणार नाहींत तोंपर्यंत अशक्य व अगम्य गोष्टींच्या नादीं लागून अलौकिक चमत्कारांवर विश्वास ठेवण्यासारखी यांच्या बुद्धीची ठेवण नाहीं.

अत्रे, प्रल्हाद केशव—(जन्म स. १८९८) शिक्षणशास्त्रज्ञ, पटकथालेखक, दिग्दर्शक, लघुकथालेखक, नाटककार, टीकाकार आणि कवि.

हे बी.ए., बी. टी., टी.डी. (लंडन) आहेत. बी. टी.च्या परीक्षेंत यांचा पहिला नंबर आला व टी. डी. होण्याकरितां हे इंग्लंडला रवाना झाले. तेथेंहि दुर्ग्यम शाळांत पाठ घेण्याची इतरांना दुष्प्राप्य असणारी संधि यांना मिळाली होती. फळ्यावर चटकन् चित्रें काढून दाखविण्याची कलाहि यांचेजवळ असल्यानें यांचें अध्यापन आकर्षक होतें.

पुणें येथील कँप एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलचे हे प्रिन्सिपल होते. तें हायस्कूल यांनीं चांगल्या स्थितीला आणून पोंचविलें. नंतर केवळ स्त्रियांच्याकरितां 'आगरकर हायस्कूल' यांनीं पुणें येथें रास्ता पेठेंत स्थापन केलें.

यांना कविता करण्याचा नाद विद्यार्थिदशेपासून आहे. यांच्या प्रारंभीच्या कविता 'केशवकुमार' या टोपण नांवानें प्रसिद्ध होत. यांच्यांत विनोदबुद्धि उपजत आहे. त्यामुळें थोर कवींच्या काव्याचा उपहास करणारीं विडंबनकाव्यें यांनीं बरींच लिहिलीं. त्यांतील सहजपणामुळें यांच्याकडे लोकांचें लक्ष वेधूं लागलें. यांचा उपरोध खेळकर, भाषा सफाईदार व साधी आणि विनोदविषय मार्मिक असल्यामुळें मनाचा ताबा घेणारा असतो.

शिवाय कोणताहि विषय हे अगदीं नव्या पण अत्यंत आकर्षक पद्धतीनें मांडतात.

यांनीं रंगभूमीच्या पडत्या काळांत नाटकें लिहिण्यास सुरुवात केली, आणि आपल्या विनोदी व चटकदार लेखनशैलीनें मराठी रंगभूमीचें आयुष्य एक तपानें वाढविलें.

नंतर आत्मविश्वास वाढून यांनीं पटकथा लिहिण्यास सुरुवात केली आणि त्यांतहि लोकांवर छाप पाडून नवें युग सुरू केलें. पटकथालेखक म्हणून यांचें नांव हिंदुस्थानांतील अग्रगण्य लोकांत गणलें जातें.

प्रथम हंस, नंतर नवयुग आणि आतां स्वतःच्या नांवानें हे आपल्या पटकथा लोकांपुढें आणीत असतात. लेखक, दिग्दर्शक व मालक अशा सर्वच भूमिका हे आतां स्वतःकडेच घेऊं लागले आहेत.

याशिवाय 'नवयुग' नांवाचें साप्ताहिक हे चालवीत असतात. 'समीक्षक' नांवाचें मासिकहि यांचें आहे. आतां तर 'अत्रे प्रिंटिंग प्रेस' यांनीं सुरू केला आहे.

यांचें वाङ्मय–(१) कवितासंग्रह–१ गीतगंगा, २ झेंडूचीं फुलें. (२) नाटकें–१ गुरुदक्षिणा, २ साष्टांग नमस्कार, ३ घराबाहेर, ४ उद्यांचा संसार, ५ पराचा कावळा, ६ मी उभा आहें, ७ भ्रमाचा भोपळा, ८ वंदे भारतम्, ९ लग्नाची बेडी, १० वीरवचन. (३) गोष्टी–१ ब्रँडीची बाटली व इतर गोष्टी, २ साखरपुडा. (४) पटकथा–१ धर्मवीर, २ प्रेमवीर, ३ ब्रह्मचारी, ४ ब्रँडीची बाटली, ५ अर्धांगी, ६ लपंडाव, ७ पायाची दासी, ८ राजाराणी, ९ वसंतसेना, १० तस्बीर (हिन्दी), ११ बाईल वेडा, १२ दिल की बात (हिन्दी). (५) इतर–१ अत्रे उवाच, २ ललितवाङ्मय, इत्यादि.

अधिकारी, गंगाधर मोरेश्वर—(जन्म स.१८९८ डिसें. ८) सुप्रसिद्ध समाजसत्तावादी. जन्म आजोळीं पनवेल येथें झाला. कांहीं वर्षे आपल्या हर्णै (जि. रत्नागिरी) येथें काढून हे मुंबईस आले. हुषार विद्यार्थी असल्यानें शिष्यवृत्त्या मिळवीत. हे बी.एससी. झाले (१९२०). सायन्स-इन्स्टिट्यूट बंगलोर येथें हे शिष्यवृत्ति घेऊन गेले. तेथें गंधक अलग करण्याचें संशोधन यांना करावयाचें होतें. त्या विषयाचीं बहुतेक पुस्तकें जर्मन भाषेंत होतीं. जर्मन भाषा शिकून यांनीं जर्मनींतील पुस्तकांचा चांगला उपयोग केला. संशोधनाचें तेथील काम पूर्ण होतांच यांच्या ध्यानांत आलें कीं अधिक ज्ञानाकरितां जर्मनींत जाणें आवश्यक आहे.

डॉ. भाजेकर व देवासचे दिवाण श्री. समर्थ (यांचे मामा) यांच्या साहाय्यानें यांनीं रु. ४५०० जमा केले. आणि हे कोलम्बोहून जर्मनीस रवाना झाले (१९२२). कोलम्बोहून पाठविलेल्या निबंधावरून मुंबई विश्वविद्यालयानें यांना एम.एससी. ही पदवी दिली. बर्लिनला पोंचतांच डॉ. फोलमेर यांच्या हाताखालीं यांनीं भौतिक, फोटो व धरातलरसायनसंबंधीं संशोधनास सुरुवात केली.

जर्मनींत असतां यांना अनेक राजकारणी लोक भेटले. पण रजनी पामदत्त यांनीं लिहिलेलें 'मॉडर्न इंडिया' हें पुस्तक यांच्या मनावर विशेष परिणाम करणारें झालें. मार्क्सवादाशींहि यांचा परिचय होऊन हे राजकारणाकडे आकर्षित झाले.

जर्मनींत असतां यांना द्रव्याची टंचाई भासूं लागली, तेव्हां यांचे गुरु प्रो. फोलमेर यांनीं यांना संशोधनाचें काम मिळवून देऊन यांची आर्थिक अडचण दूर केली. यांच्या हुषारीमुळें मिळणारी रक्कम वाढतच गेली व हे पीएच्. डी. झाले (१९२५).

यांच्या बुद्धीच्या सूक्ष्मतेची व ज्ञानाची एवढी छाप पडली होती कीं यांना तेथील एका रेडिओच्या कारखान्यांत मुख्य संशोधक म्हणून नेमण्यांत आलें आणि अनेक जर्मन व युरोपीय संशोधक यांच्या हाताखालीं काम करूं लागले. पण संशोधन कार्यापेक्षांहि स्वदेशाच्या कल्याणाकडे यांचें विशेष लक्ष होतें. म्हणून हे नोकरी सोडून हिंदुस्थानांत परत आले (१९२८ डिसें.).

मुंबईस येतांच यांची पोलिसांनीं झडती घेतली. तेव्हांपासून यांच्यामागें पोलीस लागले. मराठी 'क्रान्ति' पत्रांत हे लिहीत, तसेंच इंग्रजी 'स्पार्क' पत्रांतहि हे लिहीत. त्याच वेळीं कलकत्त्यास होणाऱ्या कॉंग्रेसबरोबर भरणाऱ्या मजूर व शेतकरी यांच्या सभेला हे गेले. शिवाय भाषणेंहि क्वचित् करीत. नंतर हे मिरतकेसमध्यें गोवले गेले. तेथें मात्र यांच्या ज्ञानाचा व विषय मांडण्याच्या पद्धतीचा चांगला उपयोग झाला. यांना पांच वर्षांची शिक्षा देण्यांत आली. पण हायकोर्टानें भोगलेली शिक्षा पुरेशी समजून यांना सोडून दिलें (ऑगष्ट १९३३).

मुंबईस येऊन मजुरांच्या संपांत भाग घेतला म्हणून यांना पुनः दोन महिन्यांची शिक्षा झाली. ती शिक्षा भोगून सुटल्यावर विजापुरास यांच्या जगन्नाथ नांवाच्या बंधूसह यांना नजर कैदेंत ठेवण्यांत आलें. तेथें यांनीं वार्निशच्या कारखान्यांत ३५ रु.ची नोकरी पत्करून कारखान्याला लाभदायक अनेक योजना तयार करून दिल्या. स. १९३७ च्या फेब्रुवारींत हे विजापूराहून गुप्तपणें कलकत्त्याला निघून गेले. तेथें यांना 'आनन्द-बझार-पत्रिका' पत्रांतून जगन्नाथाच्या मृत्यूची बातमी समजली. हरिपुरा काँग्रेसला हे गुप्तपणें गेले होते (१९३९). पुढें काँग्रेसप्रधानांनीं यांचेवरील वारंट रद्द केलें. तेव्हां पुनः उघडपणें काम करूं लागले. पण युद्ध सुरू होतांच यांना पुनः गुप्त व्हावें लागलें. पोलिसांना यांचा पत्ता लागला नाहीं. पण १९४२ सालीं हे पुनः प्रगट होऊन काम करूं लागले. यांचे युद्धविषयक लेख वाचले असतां यांच्या सूक्ष्म अवलोकनाची चांगली कल्पना येते. खरोखर हे एक मोठे अभ्यासक शास्त्रज्ञ आणि राजकारणी आहेत (नये भारतके नये नेता पा. ३२७).

अनंततनय—(जन्म स. १८७९, मृत्यु स. १९२९) कवि. यांचें पूर्ण नांव दत्तात्रय अनंत आपटे. जन्म बुलढाणे जिल्ह्यांत वडनेर भोलजी या गांवीं. प्राथमिक शिक्षण वऱ्हाडांत व इंग्रजी स्कूल फायनलपर्यंतचें शिक्षण पुणें भावे स्कूलांत.

यांची स्फुट कविता पुष्कळ असून ती दोन खंडांत 'हृदयतरंग' (१९१६) या नांवानें प्रसिद्ध झाली आहे. यांनीं पुढील काव्यें लिहिलीं आहेत.—१ महाराष्ट्रगीत, २ बालगीत, ३ झोपाळ्यावरची गीता, ४ श्रीशारदादूतिका १९१४, ५ अन्तर्विद्धकलिका, ६ श्रीस्वामी-चंडीरामचरित्र, ७ श्रीभक्तिकल्पलता, ८ महाराष्ट्रशृंगार-तिलक, ९ पुण्याची पर्वती, १० बंधविमोचन, ११ वर-विडंबन, १२ स्वर्गाचे द्वारांत, १३ श्रीमन्माधवकाव्य, १४ तिलकविजय.

बाखेरीज यांनीं सार्थ व सटीप ऋतुसंहार, भामिनी-विलासाचे गद्य भाषान्तर, कविचरित्र, सनातन धर्माचें स्वरूप वगैरे गद्यहि लिहिलें आहे. अन्य भाषेंतील काव्यान्तरें किंवा रूपान्तरें करण्याची कला यांना चांगली साधली होती. यांच्या कवितेवर जुन्या वळणाच्या कवींची छाप अधिक दिसते (अ. म. वा. से.).

अन्सारी, डॉ. मुख्तार अहमद—(जन्म १५ डिसें. १८८०, मृत्यु स. १९३६ मे) राष्ट्रीय वृत्तीचे मुसलमान पुढारी. यांचा जन्म संयुक्त प्रान्तांत गाझीपूर जिल्ह्यांत झाला. यांचे वडील हाजी अबदुल रहमान हे जमीनदार होते. प्रथम हे काशींत शिकत, नंतर अलाहाबाद येथें राहून हे मद्रास येथें बी. ए. झाले. द. हैद्राबाद संस्थानने यांना स्कॉलर्शिप देऊन इंग्लंडला धाडलें (स. १९००). तेथें यांनीं एम्. डी. व एल्. आर्. सी. पी. या पदव्या संपादन केल्या. व शिवाय लंडनमधील हॉस्पिटलमध्यें हाउससर्जनच्या कामाचा अनुभवहि संपादन केला. हा मान यापूर्वी कोणत्याहि हिन्दी माणसाला मिळाला नव्हता.

स. १९११ सालीं दिल्ली येथें राहून यांनीं प्रॅक्टिसला सुरुवात केली. आणि बघतां बघतां दिल्लींतील सर्वांत मोठे डॉक्टर बनले. कांहीं दिवसांनीं यांनीं तुर्कस्थानांत व बाल्कन राष्ट्रांत युद्ध सुरू झालें असतां 'ऑल इंडिया मेडिकल मिशन' वर काम केलें (१९१२-१३).

टिळकांनीं सुरू केलेल्या होमरूलच्या चळवळींत यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. स. १९२० सालीं हे ऑल इंडिया मुस्लीम लीगचे अध्यक्ष झाले. यांनीं अनेक वर्षे काँग्रेसचे सहचिटणीस व चिटणीस म्हणून काम केलें. दिल्लीच्या खास काँग्रेसचे हे स्वागताध्यक्ष होते (१९२२). मद्रासच्या काँग्रेसचे (१९२७) व सर्वपक्षीय परिषदेचे (१९२८) हे अध्यक्ष होते.

अॅबट, रे. जस्टिन् एडवर्ड (Rev. Justin E. Abbot)—(जन्म स. १८५३, मृत्यु स. १९ जून स. १९३२) अमेरिकन मराठी मिशनचे ख्रिस्ती मिशनरी, मराठी संतवाङ्मयाचे अभ्यासक व प्रचारक.

मृत्यूपूर्वी यांनीं जें दानपत्र केलें त्यावरून हे व यांच्या पत्नी उभयतां श्रीमंत कुलांतील असावेत असें स्पष्ट दिसतें. असें असून यांनीं आपलें सर्व आयुष्य ख्रिस्ती मिशनच्या सेवेला वाहिलें. हे अमेरिकन असून यांचा जन्म अमेरिकेंतील हॅम्पशायर परगण्यांतील पोर्टस्मथ या गांवीं झाला. व हे जेव्हां आपल्या मातापित्याबरोबर हिंदुस्थानांत राहूरी या गांवीं आले तेव्हां यांचें वय ४ वर्षांचें होतें. यांनीं (अमेरिकन मराठी मिशनच्या द्वारा) महाराष्ट्रांतच चाळीस वर्षे ख्रिस्ती धर्माच्या सेवेंत घालविलीं. त्यांपैकीं २५ वर्षे हे 'ज्ञानोदय' या ख्रिस्तधर्मप्रसारक इंग्रजी-मराठी साप्ताहिक पत्राच्या इंग्रजी विभागाचे संपादक होते. स. १९१० सालीं हे मिशनच्या सेवेंतून मुक्त झाले आणि अमेरिकेस परत गेले. तेथें न्यू जेरेसी, समिट येथें सुखवास करून मराठी संतवाङ्मयानंदांत कालक्रमणा करीत होते.

स. १९२० सालीं आपल्या पत्नीसह पुनः हे हिंदुस्थानांत आले. महाराष्ट्रसंतांचीं पवित्र स्थळें पाहण्याची आपल्या पत्नीची इच्छा तृप्त करणें हा इकडे येण्यांत यांचा एक हेतु होता. भा. इ. सं. मंडळांत येऊन सुमारें महिनाभर तेथील मराठी संतांचीं हस्तलिखितें हे तपाशीत होते. मग कांहीं काळ जालना, दौलताबादेकडे एकनाथ व जनार्दनस्वामी प्रभृति संतांचीं पूर्वपरिचित स्थळें पत्नीस दाखविण्यासाठीं हे गेले. दुर्दैवानें यांच्या पत्नी या प्रवासांत अजारी पडून मिरजेस ख्रिस्तवासी झाल्या (२६ जून १९२१). आणि हे ताबडतोब अमेरिकेस परत गेले. येथें असतांना 'अमेरिकन ओरिएन्टल सोसायटी 'साठीं हे थोडाबहुत प्रचार करीत असत. नंतर पत्नीवियोगानें किंचित् उदास स्थितींत यांनीं एकदोन वेळां यूरोपयात्रा केल्या.

रक्तपित्यांची सेवा हा एक यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. शिवाय मराठी संतांच्या ज्या मधुर आणि हृदयोन्नतिकारक वाङ्मयाची नवी प्रीति यांचे ठिकाणीं अंकुरली होती त्या वाङ्मयाचाहि तपास युरोपांतील अनेक विद्यापीठांच्या व इतर संग्रहांतून यांनीं केला. डच भाषेंतील 'डाग् रजिस्टर' नामक डच ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रचंड पत्रव्यवहार संग्रहांत शिवाजीविषयीं पुष्कळ माहिती असल्याचें यांनीं भा. इ. सं. मंडळाकडे कळविलें. यांचा शिवाजीच्या नाण्याविषयींचा एक निबंध एशियाटिक सोसायटीनें प्रसिद्ध केला होता. अशी महाराष्ट्र, महाराष्ट्र संत वाङ्मय आणि महाराष्ट्र इतिहास यांविषयीं यांना अखंड आस्था होती.

स. १९२० मध्यें हिंदुस्थानांत आल्या वेळीं यांनीं 'ज्ञानोदया'त मराठी वाङ्मयावर एक लेखमाला लिहिली. मिसेस् अॅबट यांनाहि मराठी संतांविषयीं प्रेम वाटत होतें. तेव्हांच यांनीं मराठी संतांचें वाङ्मय व त्यांतील उच्च भक्ति प्रेमाचे व नीतीचे बोल मराठी न समजणाऱ्यांसाठीं इंग्रजी भाषेंतून प्रसिद्ध करण्याचें निश्चित केलें. आणि 'पोएट सेन्ट्स् ऑफ महाराष्ट्र' या नांवाची ग्रंथमाला सुरू केली. प्रथम २।३ ग्रंथ होईपावेतों डॉ. मॅकनिकल यांनीं मुद्रितें तपासणें वगैरे साहाय्य केलें. पुढें साहाय्यक म्हणून कै. नरहर रघुनाथ गोडबोले यांची नेमणूक यांनीं केली. आणि तेच शेवटीं शेवटीं यांचे सहकारी संपादक झाले. या मालेचा सर्व खर्च अॅबट यांनीं केला.

या ग्रंथमालेच्या कामीं पुणें येथील युनायटेड थिऑलाजिकल कॉलेजचे प्रमुख रे. एड्वर्ड्स यांनीं प्रथमपासूनच लक्ष घातलें होतें. किंबहुना मि. अॅबट यांना वाटणारा संकोच मिसेस् अॅबट यांच्याकरवीं मोडून काढून ग्रंथमालेची योजना त्यांनींच अॅबट यांच्याकडून करवून घेतली. अॅबट व गोडबोले यांचे पश्चात् मालेची जबाबदारी रे. एड्वर्ड्स यांचेकडेच आली आहे.

या मालेंतून पुढील पुस्तकें आजपर्यंत प्रसिद्ध झालीं आहेत.

१ भानुदास, २ एकनाथ, ३ भिक्षुगीत, ४ दासोपंत दिगंबर, ५ बहिणाबाई, ६ स्तोत्रमाला, ७ तुकाराम, ८ रामदास, ९ भक्तविजय (खंड १ ला), १० भक्तविजय (खंड २ रा), ११ भक्तलीलामृत, १२ ज्ञानेश्वर.

या ग्रंथांतून स्थूलमानानें मराठी भक्तिवाङ्मयांतील भागांचें शब्दशः इंग्रजी भाषांतर देऊन कोठेंकोठें मूळ मराठी उतारेहि दिले आहेत. शब्दार्थ कोशाची जोड दिली आहे. टिपणें, त्रोटक चरित्रें व प्रस्तावनाहि जोडल्या आहेत.

मराठी संत वाङ्मयाशीं यांचा फार जुना परिचय होता. यांचीं चाळीस वर्षें महाराष्ट्रांतच गेलीं. यांना मराठी भाषा चांगली अवगत होती. तथापि हिंदुस्थानांत असेतोंपर्यंत आपणांस या वाङ्मयाचे खरेंखरें रहस्य आणि थोरवी तितकीशी कळून आली नाहीं, असें यांच्या अनुभवास पुढें आल्यावरूनच या वाङ्मयाचा यांनीं पुनरभ्यास केला. आणि त्यांत मानवी उन्नतीचीं थोर नैतिक बीजें सर्वत्र चमकत आहेत, तीं आपल्या मराठी न जाणणाऱ्या समस्त पाश्चिमात्य बांधवांस सादर करावीं या उदार बुद्धीनें यांनी खरोखरीच तन, मन आणि धनें करून आपला हेतु तडीस नेला.

यांचे एकंदर लेख व जीवन पाहतां एक गोष्ट अगदीं ठसठशीतपणें दिसते, ती ही कीं त्यांचें मन सकल मानवजातीसाठीं तळमळत होतें. सर्व मानवांची मनोन्नति व्हावी हाच खरा धर्म होय आणि ख्रिस्ती धर्माचेंहि खरें रहस्य हेंच होय असा यांचा दृढ निश्चय बनला होता. आणि तो निर्भीडपणानें आणि स्थितप्रज्ञ वृत्तीनें यांनीं प्रगट केला. ख्रिस्त आणि ख्रिस्ती धर्म यांवरील यांची श्रद्धा कधींच ढळली नव्हती; किंबहुना मराठी संत वाङ्मयाच्या पुनरभ्यासानें ती अधिकच दृढ परंतु विशुद्ध झाली होती.

आजपर्यंत पाश्चिमात्यांना महाराष्ट्रसन्तांच्या भक्तिमार्गाचें खरें मर्म समजलेंच नाहीं असा अभिप्राय यांनीं स्पष्ट शब्दांत नमूद केला आहे. मराठी सन्त हे सर्व वेद, स्मृति, शास्त्रें व पुराणें यांवर अढळ विश्वास ठेवणारे

होते. ते अनेक अवतार मानीत आणि मूर्तिपूजा त्यांना अत्यंत प्रिय होती. परंतु कांहींहि नांव घेतलें, कोणतेंहि रूप वर्णिलें, तरी हीं सर्व नावें व रूपें त्या एकाच परमेश्वराचीं होत याविषयीं क्षणमात्र संदेह त्यांच्या ठायीं नव्हता. मराठी सन्त प्रेमळ आणि एकनिष्ठ ईश्वर-भक्त होते, त्यांचीं अन्तःकरणें शुद्ध होतीं, तीं सर्व जीवांच्या कल्याणासाठीं तळमळत होतीं, त्यांच्या प्रेरणा नैतिक होत्या, आणि त्यांचीं चरित्रें नीतिप्रवर्तक आणि सन्मार्गदर्शक होतीं याविषयीं यांना काडीचीहि शंका वाटत नव्हती. जर आपलीं स्वतःचीं चरित्रें आणि त्यांचीं चरित्रें आपण तोलून पाहिलीं तर ते कितीतरी श्रेष्ठ प्रतीचे ठरतील असेंहि यांनीं निभ्रान्त म्हटलें आहे. मराठी सन्तांचीं चरित्रें आणि त्यांचें वाङ्मय ही महाराष्ट्राला आणि तद्द्वारा अखिल मानवी समाजाला बहुमोल देणगीच होय. हें वाङ्मय केवळ मराठींतच कोंडून न राहतां इतरांसहि उपलब्ध झाल्यानें त्यांचें कल्याणच होईल या उच्च भावनेनें प्रेरित होऊन यांनीं आपला अविरत उद्योग वयाची सत्तरी उलटल्यावरहि केला. मालेंतील एका ग्रंथाचा अखेरचा कांहीं भाग तर यांनीं अंथरुणावर पडल्यापडल्या सांगितला आणि तो यंत्र-साहाय्यानें लिहून घेतला अशी यांची निष्ठा जबर होती.

हिंदुधर्मांत अनेकदेवत्व आहे, पण तें एक देवाच्या अधिष्ठानावरच आहे. एकाचाच आविष्कार अनेकांत झाला आणि अनेकांचा लय एकांत होतो. यांतील रहस्य पुष्कळ युरोपियनांच्या लक्षांत न आल्यामुळें विपरीत व दूषित कल्पना प्रसृत झाल्या होत्या. त्याचें स्पष्ट निराकरण यांनीं केलें आहे. हिंदु एकाच देवाधिदेवाला मानतात, हें रहस्य पूर्वी चाळीस वर्षे महाराष्ट्रांत राहूनहि आपल्या ध्यानांत आलें नाहीं, परंतु ती आपली चूक झाली हें यांनीं प्रांजळपणें प्रसिद्ध केलें आहे.

महाराष्ट्रावर यांचें निस्सीम प्रेम होतें. मृत्युपत्रांत यांनीं आपली तीन लक्ष डॉलर (डॉलर = ३।।। रुपये) किंमतीची मालमत्ता दान केली, त्यांत १ लक्ष ४० हजार हिंदुस्थानांतील विशेषतः महाराष्ट्रांतील संस्थांस दिले. ख्रिस्तेतर संस्थांना दिलेल्या देणग्यांत भा. इ. सं. मंडळ पुणें या संस्थेस दिलेली देणगी सर्वांत मोठी होय. ३० हजार डालर्सची देणगी प्राचीन मराठी लेख व ग्रंथ यांच्या संग्रहमंदिरासाठीं यांनीं वरील मंडळास दिली. त्या वेळेपासून बाजार उतरतच गेल्यामुळें एक लक्षाऐवजीं ५० हजार रुपयेच मंडळाच्या वांट्यास आले. एका रकमेनें एवढी मोठी देणगी एका बिनसरकारी आणि देशी भाषेंत संशोधनकार्य करणाऱ्या संस्थेस एका अमेरिकन मिशनऱ्याकडून मिळणें ही गोष्ट अखिल भारत-वर्षांत अद्वितीयच म्हटली पाहिजे. या देणगीमुळें यांचें नांव महाराष्ट्रांत अमर होऊन राहील.

मरणोत्तर आपणास अग्निसंस्कार व्हावा असा आदेश यांनीं दिला होता. आपणाला थडगें, नांव वगैरे कांहीं नको, असेंहि यांनीं लिहून ठेवलें होतें. आपल्या मृत देहाची राख आपल्या प्रिय माळ्याकडून आपल्या बागेंतील झाडांवर यांनी पसरविण्याची योजना केली. जन्मानें आणि मनानें यांनीं आपणास महाराष्ट्राचेंच म्हणविलें. आणि महाराष्ट्र संतांच्या वाङ्मयाचा व्यासंग करीत यांनीं देह ठेवला. यांनीं आपल्या पत्नीसह महाराष्ट्रांतील संतांचीं स्थलें भाविक यात्रेकरूप्रमाणें पाहिलीं. पायीं प्रवास करून आणि व्रतस्थ राहून हे प्रत्येक ठिकाणीं गेले. वाङ्मयाप्रमाणें आचाराशींहि हे एकरूप होत.

भा. इ. सं. मंडळास दिलेल्या मोठ्या देणगीशिवाय पुढील संस्थांना यांनीं पुढें नमूद केल्याप्रमाणें देणग्या दिल्या आहेत:

१ सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, पुणें
(डॉलर्स एक हजार)
२ अमेरिकन मिशन हॉस्पिटल, वाई
(डॉलर्स पन्नास हजार)
३ अमेरिकन ओरिएंटल सोसायटी
(डॉलर्स पंधरा हजार)
४ लेपर्स सॅनिटोरिअम, फ्रान्स (डॉलर्स पंधरा हजार)
५ गोखले हॉल लायब्ररी, पुणें (डॉलर्स पांच हजार)
पूर्वी दिलेले पंधरा हजार रुपये (१९३०) शिवाय.
६ सोशल सर्व्हिस लीग, मुंबई (डॉलर्स एक हजार)
७ अनाथ बालिकाश्रम, हिंगणे (,, एक हजार)
८ डिप्रेस्ड क्लासेस मिशन, मंगलोर (डॉ. एक हजार)
९ अमेरिकन लेपर्स मिशन (डॉलर्स वीस हजार)
१० यंग वुइमेन्स ख्रिश्चन असोसिएशन, समिट
(डॉलर्स दहा हजार)
११ यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएशन, समिट, अमेरिका
(डॉलर्स दहा हजार)
१२ ओव्हरलुक हॉस्पिटल, समिट
(डॉलर्स पांच हजार)
१३ सेवासदन सोसायटी, पुणें
(डॉलर्स एक हजार)

१४ रे. एडवर्डस् यांस पोएट सेन्टस् मालेसाठीं (डॉलर्स दहा हजार)

१५ अमेरिकन मराठी मिशन–नागपाडा, मुंबई (डॉलर्स दहा हजार)

इत्यादि. (दत्तो वामन पोतदार).

अबदुल करीमखां—(जन्म स. १८८४—मृत्यु स. १९३८)

महाराष्ट्रांतील एक नामांकित गवई. यांचें घराणें मूळ कुरुक्षेत्राचें. तेथील गायक प्रतिस्पर्ध्याला हार जात नाहींत असा त्यांचा लौकिक आहे. या स्थानमाहात्म्यामुळें त्यांना 'किरण' ही संज्ञा प्राप्त झाली आहे. यांचे वडील कालेखां व चुलते अबदुल्लाखां यांच्यापाशीं हे गाणें शिकले. यांचें घराणें तंतकाराचें असल्यानें यांच्या सुरेलपणाविषयीं प्रश्नच नाहीं. हे सहा वर्षांचे असतांनाच गवयाच्या मैफलींत गायले व पंधरा वर्षांचे असतां बडोदें संस्थानांत गवई म्हणून वावरूं लागले. तेथें तीन वर्षे नोकरी केल्यावर प्रथमच हे मुंबईस आले (१९०२). स. १९१७–२० पर्यंत हे प्रकृतीच्या स्वास्थ्याकरितां मुंबईस राहिले होते. त्या वेळीं यांनीं बाळगलेलें एक कुत्रें कांहीं रागांतील स्वर काढण्यांत यांनीं तयार केलें होतें. तें जलशांत तसे स्वर काढून दाखवी.

हिंदुस्थानी संगीतांत प्रचलित असलल्या चार बानींपैकीं यांच्या घराण्याची गोहरण बानी आहे. ही बानी करुण व शोकरसात्मक आहे. या रसांतील यांचें गाणें चालू असतां श्रोतृसमाज अन्तःकरणाचा ठाव घेतल्याप्रमाणें तटस्थ होत असे. हेहि श्रोत्यांच्या अनुरोधानें रागाची निवड करीत.

हे अस्सल कलावंत असल्यानें जातिभेद पाळीत नसत. सवाईगंधर्व रामभाऊ कुंदगोळकर, अनंतराव गाडगीळ, बेहेरेबुवासारखे ब्राह्मण, सरनाईक, जाधवबुवा, कपिलेश्वरी, सुरेशबाबू, दशरथबुवा मुळे सारखे ब्राह्मणेतर शिकविले, एवढेंच नव्हे तर बाळु कैकाडी या नांवाचे एक सनग्येहि यांनीं शिकवून तयार केले.

पुणें, मुंबई व बेळगांव इत्यादि ठिकाणीं यांनीं संगीतविद्यालयें चालविलीं. शेवटीं मिरज येथें यांचें देहावसान झालें. मि. क्लेमंट यांनीं काढलेल्या फिलहारमॉनिक सोसायटीचे हे मेंबर होते. त्यानीं नोटेशन देऊन यांच्या कांहीं चिजा प्रसिद्ध केल्या आहेत. हिंदुस्थानी संगीत गुरुमुखांतून ऐकूनच शिकलें तर उत्तम येतें असें यांचें मत होतें. हे बीन, सतार, तबला, पेटी व जलतरंगहि उत्तम वाजवीत.

यांच्यामुळें उच्च संगीताची अभिरुचि व लालसा महाराष्ट्रांत इतर प्रान्तांच्या मानानें अधिक फैलावली. यांची स्वरसाधना सतत चालू असे. यांनीं अनेक तऱ्हेचे स्वर लावण्याचे प्रयत्न करून स्वतःची विशिष्ट पद्धत शोधून काढली होती. यांनीं स्वर लावला कीं तो तंबोराच जणूं बोलतो आहे असें वाटे. श्रोत्यांइतकेंच किंबहुना श्रोत्यांपेक्षांहि जास्त हे स्वतःच्या स्वरमाधुरींत स्वतःच गुंगून जात. यांच्या गायकींत स्वरोत्कर्ष अधिक प्रमाणांत दिसून येई. हे चिजेचे शब्द, त्यांचा उच्चार करून चीज बांधेसूद व लयबद्ध मांडीत. स्वरविस्तारांत रागाची प्रकृति कायम ठेवीत. तब्येत लागेल त्या स्वरावर मुक्काम करून त्याला निरनिराळ्या पद्धतींनीं नटविण्यापलीकडे यांना इतर गोष्टींचें महत्त्व वाटत नसे. कारण हेंच अंग अधिक रंजक असे. यामुळेंच कदाचित् यांच्या गाण्यावर शांत व करुण रसांचें आवरण पडलें असावें. यांनीं कोणताहि राग आळविल्यास तो करुणरसाची छाया उत्पन्न करी.

कसल्याहि कणखर प्रकृतीच्या रागरागिणीला नवनीताहून नरम व मेणापेक्षां मऊ करण्याची असामान्य सिद्धि यांनीं मिळविली होती. मुरक्या, गिटकडी व अनेकविध गमका हे हळुवार घेऊन गाणें फार रंगवीत. गमकेच्या जोरदार ताना हे मधूनमधून घेत तेव्हां असें वैविध्य वाटे कीं, एकाआड एक रचना केलेली ही जणूंकाय फरसबंदी दीपमाळच आहे. हे कर्नाटकी पद्धतीचें नोटेशन बहुरंगी व बहुढंगी करीत तें अति चटकदार लागे. नोटेशन करण्याची पद्धत प्रथम महाराष्ट्रांत यांनींच सुरू केली. मराठी नाटकांतील पदें मुसलमान असूनहि भावार्थ समजावून घेऊन अर्थानुकूल रसोद्भव व्हावा या पद्धतीनें हे म्हणत. ठुंबरी गाणारे म्हणून तर यांची फारच प्रसिद्धी होती. यांच्या 'पिया बीन नहि आवत चैन' या रेकॉर्डनें तर यांना फार मोठी प्रसिद्धि मिळाली. यांच्या मागें यांच्या बारा इंची चोवीस रेकॉर्डस् प्रसिद्ध आहेत.

अबदुल गफारखान—(जन्म स. १८९०) 'सरहद्द गांधी' या नांवानें प्रसिद्ध असणारे सुप्रसिद्ध पुढारी व 'खुदा-इ-खिदमतगार' या संघटनेचे जनक.

हे पठाण गृहस्थ मुहम्मदझाई नांवाच्या कुटुंबांत जन्मलेले आहेत. यांच्या वडिलांचें नांव बहेरामखान. ते पेशावर जिल्ह्यांतील चरसाडा तालुक्यांतील उतमानझाई गांवाचे खान आहेत. उतमानझाई गांव स्वात नदीच्या तीरावर आहे. हिंदुस्थानच्या सरहद्दीचा हा

प्रदेश आहे. तेथून पुढें वीस मैलांचा मुहम्मदटोळ्यांचा प्रदेश ओलंडला कीं अफगाणिस्थान सुरू होतें.

यांच्या वेळीं मौलवींच्या धार्मिक शाळा सोडून इंग्रजी शाळांत जाण्यास लोकांचा विरोध होता. तो पत्करूनहि यांना पेशावर येथील मिशनरी शाळेंत घालण्यांत आलें. तेथें हे मॅट्रिकपर्यंत शिकले. तिकडील रिवाजाप्रमाणें हे लष्करांत शिरावयाचे पण तो मार्ग यांना पटला नाहीं. हे अलीगढला गेले आणि तेथें एक वर्ष अभ्यास करून प्रथमच यांनीं उर्दू भाषेशीं परिचय करून घेतला. यांची जन्मभाषा पुस्तु.

मौ. झफरअलीखानांचें 'जमीनदार' आणि मौ. अबुल-कलम अझादचें 'अलहिलाल' या त्या वेळीं अत्यंत लोकप्रिय पत्रांच्या वाचनानें यांचे राजकीय शिक्षणास सुरुवात झाली. राष्ट्रीय शाळा काढण्याच्या कामांतहि यांनीं स. १९११ पासून भाग घेतलेला होता. पण पहिलें महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटिश सरकारचें धोरण बदललें व रौलट ॲक्टसारखे कायदे होऊं लागले. त्याला सर्वांनीं विरोध दर्शविला. म. गांधींनीं या विरोधाला सत्याग्रहाचें रूप दिलें तेव्हां देशांत भयंकर खळबळ उत्पन्न होऊन प्रचंड सभा भरूं लागल्या. तेव्हां उतमान-झाई गांवीं भरलेल्या प्रचंड सभेमुळें यांना तुरुंगांत जावें लागलें (१९१९). पुनः स. १९२१ मध्यें यांना तुरुंगांत जावें लागलें. पुढें पठाणांच्या मुलांना राष्ट्रीय शिक्षण-शाळा काढून दिल्याबद्दल यांना तीन वर्षांची शिक्षा झाली (१९२२).

तुरुंगांत यांचे अत्यंत हाल करण्यांत आले. माफी मागावी असे प्रयत्न झाले, पण हे कशानेंहि नमले नाहींत. कोणतींहि सवलत यांनीं मागितली नाहीं व कोणी दिलेली स्वीकारली नाहीं. सत्य आणि अंगीकृत कार्य यांपासून यांना कोणींहि ढळवूं शकलें नाहीं. उलट या खडतर तपश्चर्येनें यांचा निग्रह आणि तेज वाढतच गेलें. गीता व ग्रंथसाहेब यांचा आस्वाद यांना सहवासानें घेतां आला. यांचा नमाज कधींहि चुकत नाहीं. हिंदु-मुसलमानांच्या कलहांतहि यांनीं आपली समतोल वृत्ति ढळूं दिली नाहीं. म्हणूनच यांना 'सरहद्द-गांधी' या बहुमानाच्या उपपदाचा लाभ झाला आहे.

स. १९१९ सालापासून आतांपर्यंत हे सुमारें चवदा वर्षें तुरुंगांतच आहेत. ८ ऑगष्ट १९४२ च्या चळवळींत हे तुरुंगांत गेले. यांचे थोरले बंधु डॉ. खान यांच्या नेतृत्वाखालीं सरहद्दप्रांतांत मंत्रिमंडळ स्थापन झालें तेव्हां त्यांनीं यांना सोडण्याच्या हुकमावरच प्रथम सही केली (मार्च १९४५).

आतां यांच्या 'खुदा-ई-खिदमतगार' या संघटने-संबंधीं थोडी माहिती देऊं.

यांनीं स. १९२१ मध्यें 'आझाद शाळा' म्हणून राष्ट्रीय शिक्षणाची शाळा काढली. त्यांतील यांच्या सहकाऱ्यांनीं ती शाळा यांच्या तीन वर्षांच्या तुरुंग-वासाच्या मुदतींतहि राखली. पण पुढें स. १९३२ च्या चळवळींत ती बंद करणें भाग पडलें. या दहा वर्षांच्या मुदतींत शिक्षक व विद्यार्थी यांचें एक मंडळ यांचेभोंवतीं तयार झालें होतें. त्यालाच 'ईश्वराचे सेवक' अशा अर्थाचें 'खुदा-इ खिदमतगार' असें नांव देण्यांत आलें (१९२९). प्रारंभीं हें मंडळ फक्त समाजसुधारणा करणारें म्हणजे पठाणांना चोरी, दारू, लग्नखर्च वगैरें-पासून निवृत्त करणारें होतें. पण पुढें त्याचें स्वरूप अधिक व्यापक होत गेलें. हे तांबडे डगले अंगांत घालीत म्हणून त्यांना 'लाल डगलेवाले' असेंहि उपरोधानें म्हणत. रशियांतील बोल्शेव्हिक चळवळीशीं यांचा संबंध जोडला जाई. तथापि यांची शपथ अगदीं साधी असून ईश्वरनिष्ठा, अहिंसा, सेवा, निर्भयता व शुद्ध जीवन या पांच गोष्टींना तीमध्यें महत्त्व दिलें आहे. हे लष्करी कवाईती करतात; पण लाठीसुद्धां हातांत घेत नाहींत. पण ही चळवळ सरकारला मात्र अत्यंत अप्रिय आहे हें अनेक वेळां सिद्ध झालें आहे. सरकारनें यांच्यावर अनेक आरोप केलेले आहेत. त्याला उत्तर देण्याची संधि यांना सरकारनें दिली नाहीं. राष्ट्रीयसभेनें नेमलेल्या चौकशी-कमिटीला पंजाबच्या सरहद्दींत जाऊं दिलें नाहीं, कमेटीचा रिपोर्ट व फादर एल्विन यांचें पत्रक सरकारनें जप्त केलें. विलायतेंतून आलेल्या शिष्टमंडळाचा वृत्तांतहि हिंदुस्थानांत प्रसिद्ध होऊं दिला नाहीं. अशी ही यांची संघटना प्रभावी म्हणूनच सरकारला अत्यंत अप्रिय आहे.

म. गांधींवर मात्र यांची अलोट श्रद्धा आहे. राष्ट्रीय-सभेचें व आपलें ध्येय एकच आहे असें हे वारंवार सांगतात. काँग्रेसचे अध्यक्षपदाकरितां यांचें नांव सुचविलें असतां यांनीं शिपायाला सेनापतिपद योग्य नाहीं असें म्हणून तें नाकारलें (खान बंधू-प्रेमा कंटक).

अबदुल रहिमान—(ज. स.१८४४-मृ. स.१९०१) अफगाणिस्थानचे अमीर. अफगाणिस्थानचा अमीर जो दोस्त मुहंमद त्याच्या अफजुलखान नांवाच्या मुलाचा हा मुलगा. दोस्तमुहंमद हा अफगाणिस्थानचा अमीर

झाल्यावर अफजुलखान बल्कचा सुभेदार होता. तेथेंच याचें बालपण व शिक्षण झालें. बापाच्या अनुपस्थितींत हा बापाचें काम पाहूं लागला. पुढें याची ताशकरघान या प्रांतावर सुभेदार म्हणून नेमणूक झाली. तेथें यानें बक्षिसें व सूट देण्याचा तडाखा सुरू केला. पण बापानें त्याला मान्यता न देतां त्याची वसुली सुरू केली, तेव्हां हा अपमानानें राजिनामा देऊन परत आला. तेथें हा शिक्षण घेत असतां यास तुरुंगवासहि भोगावा लागला. पण नंतर गैरसमज दूर होऊन याला सेनापतीची जागा मिळाली.

दोस्तमुहंमद मेल्यावर त्याच्या जागीं त्याचा तिसरा मुलगा शेरअली गादीवर आला, व त्यानें आपला बंधु अफजुलखानास कैद केलें. तेव्हां हा आक्सस नदी ओलांडून बुखाऱ्याकडे पळून गेला. मध्यें एकदां काबूल घेऊन तेथें आपला चुलता अजीमखान यास यानें गादीवर बसविलें; पण तो स्थिर न होतां याला पुनः वनवास पत्करावा लागला. पुढें शेरअली रशियनांबद्दल पक्षपात दाखवूं लागला तेव्हां इंग्रजानें त्यावर स्वारी केली. तेव्हां तो पळून जात असतां मृत्यु पावला व त्याचा मुलगा याकूबखान गादीवर आला. पण त्याचें वजन नाहींसें होऊन काबूलच्या इंग्रज रेसिडेंट कावाग्नरी याचा खून झाला. तेव्हां इंग्रजानें स्वारी करून काबूल घेतलें. हें कळतांच रशियन हद्दींतून हे गृहस्थ काबूलला आले व इंग्रजांच्या व लोकांच्या अनुकूलतेनें पुनः गादीवर आले (स. १८८० जुलै २२).

सिंहासनारूढ झाल्यावर यास राज्यांतील पुष्कळ बखेडे मोडावे लागले, गेलेले मुलूख परत ध्यावे लागले, त्यांत याचें शौर्य व चातुर्य प्रगट झालें. तसेंच देशांतील मुल्लामौलवी यांचें प्रस्थ कमी करून त्यांच्या क्रूर वर्तनांनाहि यांनीं आळा घातला.

यांना पुस्तु, फारशी, तुर्की, रशियन, आरबी आणि हिंदुस्थानी इतक्या भाषा येत. यांना अनेक विषयांत गम्य असे. यांचे किती एक ग्रंथ काबूलच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध झाले आहेत.

मालिक, खान व मुल्ला यांपैकीं पहिले दोन लोकांनीं निवडलेले व शेवटले कायदा व धर्मशास्त्र यांच्या परीक्षा दिलेले असत. या तीन प्रकारच्या लोकांतल्या बहुमतानें हे आपला सगळा कारभार चालवीत. सैन्य, हत्यारें, हत्यारांचे कारखाने, दारूगोळा या बाबतींत यांनीं चांगली व्यवस्था केली, पण तो सर्व व्यवस्था यांना अपुरी वाटे. जगांतील 'बळी तो कान पिळी' ही स्थिति पाहून देशांत आगगाडी सुरू करूं नये असें यांनीं आपलें म्हणणें स्पष्टपणें मांडलें आहे व तसा पुढील वंशजांनाहि सल्ला दिला आहे.

यांचें सैन्य नेहमीं जय्यत तयार असे. 'संकट सोसण्यास सिद्ध व्हा व मग देवावर भरंवसा ठेवा' ही यांना शिकवण होती. इंग्लंड अफगाणिस्थानशीं केलेले करार कधीं मोडणार नाहीं, कारण त्यांना रशिया व हिंदुस्थान यांच्यामध्यें आपल्यासारखा स्वतंत्र राष्ट्राची जरूरी आहे, असें यांचें मत होतें. स्त्रीधन, विवाह-नोंदणी, हुंडा, सडका, वाटसरूंची सुरक्षितता यांबद्दल यांनीं चांगले नियम करून लोकांची सोय केली आहे. जमिनींत सांपडणाऱ्या विविध द्रव्यांच्या खाणींचे मक्ते परक्यांना न देण्याविषयीं यांचा कडक नियम असे. आगगाडी, मक्ते व व्यापार या द्वारा परक्यांचा देशांत प्रवेश होऊन आपला देश कमकुवत होईल असें यांचें प्रांजळ मत होतें.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं धर्मप्रसाराची परवानगी मागितली असतां यांनीं त्यांना स्वच्छ कळविलें कीं 'आम्हास धर्म शिकविण्यास दुसरे लोक नको आहेत. ते मोठे धार्मिक आहेत. आणखी ते ख्रिस्ती धर्मोपदेशक व युरोपियन व्यापारी यांच्या वाऱ्यास देखील उभे राहत नाहींत. कारण हे लोक जेथें जातात तेथें कज्जे उत्पन्न करतात. आपसांत भांडणें उत्पन्न करतात व आपला अंमल सुरू करतात. ज्ञान व व्यापार हें केवळ थोतांड आहे. तुम्ही धर्म व व्यापार यांचें मिष करून आर्मिनियांत दंगे, क्रीट येथील बंड, इजिप्तचा घोटाळा व सध्यांची चिनांतली लढाई उत्पन्न केलीत. तथापि तुम्हांला आमच्या लोकांची विशेषच कळकळ असेल तर तुम्ही आपले जीव धोक्यांत न घालतां तुमचे फंड आमच्या मौलवींच्या स्वाधीन करा म्हणजे तुमचें कार्य थोडक्यांत उत्तम होईल.'

पुढेंपुढें यांनीं अनेक प्रकारचीं यंत्रें आणून कारखाने आपल्या राज्यांत सुरू केले व परदेशी कारागीर आणून त्यांच्या हाताखालीं अफगाण लोक शिकवून कारखाने स्वावलंबी करण्याचें धोरण स्वीकारलें.

अभेदानन्द—(जन्म स. १८६६–मृत्यु स. १९३९) वेदान्त व हिन्दू तत्त्वज्ञानविषयक ग्रंथांचे कर्ते आणि कलकत्त्याच्या रामकृष्ण वेदान्त सोसायटीचे उत्पादक व अध्यक्ष. यांचे वडील कलकत्त्याच्या 'ओरिएन्टल सेमिनरी' मध्यें इंग्रजीचे शिक्षक होते. यांनीं प्रथम संस्कृत शाळेंतील

व नंतर शाळेंतील शिक्षण घेतल्यावर ओरिएन्टल सेमिनरी-मध्यें शिक्षण सुरू केलें. ते तेथूनच वयाच्या १६ व्या वर्षी प्रवेशपरीक्षा पास झाले.

लहानपणापासूनच प्रत्येक गोष्टीचें कारण समजावून घेण्यासाठीं हे नेहमीं ती गोष्ट अशी "कां व कशी" झाली ह्याबद्दल प्रश्न विचारीत. यांनीं हिंदुस्थानच्या इतिहासांत जेव्हां प्रथमच शंकराचार्य हे मोठे तत्त्वज्ञानी असल्याबद्दल वाचलें, तेव्हां आपणहि असेच तत्त्वज्ञानी व्हावयाचें असा यांनीं निश्चय केला. ह्या वेळीं हे चित्रकलेचें शिक्षण घेत होते. परंतु हा विचार मनांत येतांच यांनीं तो अभ्यास सोडून दिला. आपल्या घरगुती अभ्यासांत यांनीं 'मुग्धबोध' ह्या संस्कृत व्याकरणाचा अभ्यास करून संस्कृतभाषेवर इतकें प्रभुत्व मिळविलें कीं हे संस्कृत कविता सहज करूं लागले. ह्याच वेळीं एकदां हे भगवद्गीता वाचीत आहेत असें पाहून 'गीता ही मुलांच्याकरितां नाहीं, ती तुला वेडा बनवील' असें यांच्या वडिलांनीं यांना सांगितलें. परंतु यांच्या मतें हें अयोग्य वाटल्यामुळें यांनीं गीता वाचण्याचा क्रम तसाच चालू ठेवला. हिंदू तत्त्वज्ञानावरील व त्याचप्रमाणें निरनिराळ्या धर्मांच्या अनेकविध स्वरूपावरील भाषणें ऐकण्याची यांना फार आवड असे. यांनीं रेव्हरन्ड डॉ. मॅकडोनाल्ड, रेव्ह. कालीचरण बानर्जी वगैरेंचीं 'ख्रिस्त व ख्रिश्चन धर्म' या विषयावरील बरींचशीं भाषणें ऐकलीं. त्याचप्रमाणें- ख्रिस्तीधर्मविरोधीहि पुष्कळशा भाषणांना ते हजर असत. स. १८८३त प्रसिद्ध हिंदू तत्त्ववेत्ता पंडित 'शेषाधर तारकासुरमणि' यांचीं 'हिंदू तत्त्वज्ञानाचे सहा क्रम' या विषयावरील पुष्कळशीं व्याख्यानें यांनीं श्रवण केलीं होतीं. ह्या सर्व व्याख्यानांचा यांच्यावर असा परिणाम झाला कीं प्राचीन व अर्वाचीन युरोपीय तत्त्वज्ञानांचा अभ्यास करण्याची यांची आवड अधिकच वाढली. पुढें पुढें तर यांनीं पंडित शेषाधरांचीं 'पातंजलयोगविज्ञाना'वरील व्याख्यानें ऐकल्यामुळें हिंदू अध्यात्मशास्त्र (योगशास्त्र) व त्याचप्रमाणें योगशास्त्राची प्रत्यक्ष पद्धती यांबद्दल यांना विशेष आवड उत्पन्न झाली. हा अभ्यास यांनीं पंडितजींच्या पद्धतीनुरूप पुढें प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कै. कलिबर वेदान्त वगीश यांच्या नेतृत्वाखालीं केला. त्यानंतर यांनीं आत्मनियंत्रण करून निर्विकल्प समाधीप्रत जाण्याचा अभ्यास केला. तदनंतर 'राजयोगा'वरील प्रत्यक्ष पद्धति सांगणारी जी 'शिवसंहिता' तिचा अभ्यास यांनीं दक्षिणेश्वरीं राहणाऱ्या 'रामकृष्ण परमहंस' यांच्या जवळ राहून केला.

स्वामी रामकृष्णाच्या जवळ हा अभ्यास दोन वर्षेपर्यंत चालू होता. तेथें असतांना रामकृष्णांच्या अनेक अनुयायांशीं व विशेषतः स्वामी विवेकानंदांशीं त्यांचा निकट संबंध आला. स. १८८६ त रामकृष्णांच्या मृत्यूनंतर यांनीं स्वामी विवेकानंद व इतर गुरुबंधु यांच्यासह संन्यासआश्रमांत पदार्पण केलें व तेव्हांपासूनच हे स्वामी अभेदानंद या नांवानें ओळखले जाऊं लागले. त्यानंतर यांनीं ठिकठिकाणीं पायीं प्रवास केला व त्यांत येणाऱ्या सर्व हालअपेष्टा सहन केल्या. गंगा व यमुना यांच्या उगमस्थानच्या हिमालयाच्या १४००० फुटांवरील गुहेंत सतत ३ महिने राहून यांनीं सत्याबद्दल विचार केला. अशाच प्रकारें सर्व हिंदुस्थानांतील तीर्थयात्रा करीत व अनेक साधुसंतांच्या गांठी घेत हे त्या वेळचे प्रसिद्ध अद्वैत वेदांतवादी श्री. धनराजगिरी यांच्या जवळ अद्वैत–वेदांत तत्त्वज्ञानाचें शिक्षण घेऊं लागले.

स. १८९६ मध्यें स्वामी विवेकानंद अमेरिका व इंग्लंड येथें 'वेदांत', 'राजयोग', 'ज्ञानयोग' वगैरेवर व्याख्यानें देऊन तेथें त्यांनीं त्याद्वारें जो हिंदू धर्म मतांचा अत्यंत यशस्वी प्रचार सुरू केला त्यांत विवेकानंदांच्या आमंत्रणावरून यांनीं त्यांना पुष्कळच मदत केली. यासाठीं हे कलकत्त्याहून लंडनला स. १८९६ च्या आगस्ट महिन्यांत रवाना झाले. लंडनच्या ख्रिस्तो थिऑसॉफिकल सोसायटीपुढें यांचें 'अद्वैत फिलॉसाफी' या विषयावर प्रथम व्याख्यान झालें. पुढें स्वामींनीं यांना लंडन येथें 'वेदांत' व 'राजयोग' वगैरेंचे वर्ग चालविण्यास सांगून ते स. १८९७त हिंदुस्थानांत आले. यांनीं हे वर्ग चालवून शिवाय तेथील धार्मिक तत्त्वज्ञानविषयक संस्थांतून व इतर सार्वजनिक सभांतून वरील विषयांवर व्याख्यानें देऊन एक वर्षपर्यंत प्रचार केला. या अवधींत यांनीं प्रो. मॅक्समुल्लर व प्रो. पॉल वगैरे विद्वानांशीं रामकृष्णांच्या शिकवणीबद्दल विचारविनिमय केला. यांपैकीं प्रो. पॉल डायसन हे उपनिषदांतील तत्त्वज्ञान मांडणारे ग्रंथकर्ते असून त्यांनीं ५० उपनिषदांचें जर्मनभाषेंत भाषांतर केलें आहे.

स. १८९७ त हे विवेकानंदांच्या विनंतीवरून त्यांच्या न्यूयॉर्कमधील 'वेदांत सोसायटी'चें नेतृत्व पत्करण्यासाठीं तेथें गेले. त्या ठिकाणीं यांनीं सहा महिन्यांत वेदांत व पातंजलयोग विज्ञानावर ९० व्याख्यानें देऊन व भगवद्गीता, कठोपनिषद् व मृत्यु, आत्मज्ञान वगैरेंचा उलगडा करणारीं इतर उपनिषदें यांचे वर्ग काढून

'वेदांत सोसायटी'चा बराच प्रचार केला. पुढें हे सोसायटीचे मंत्री झाले व यांनीं तें काम २० वर्षपर्यंत अव्याहत केलें. यांनीं सबंध संयुक्त संस्थानें, कॅनडा, अलास्का आणि मेक्सिको वगैरे देशांतील मुख्य मुख्य शहरीं जाऊन वेदान्त तत्त्वज्ञानाच्या अनेकविध स्वरूपावर व्याख्यानें दिलीं. त्याचप्रमाणें 'कृष्ण व त्याची शिकवण', 'रामकृष्ण व त्यांची शिकवण', 'झेरोस्तर व त्याची शिकवण' वगैरेवरहि अनेक सार्वजनिक भाषणें यांनीं केलीं. स. १९२१ सालीं होनोलुलू येथील 'पॅन-पॅसिफिक एज्युकेशनल कॉन्फरन्स' करतां हे हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून गेले होते. त्यानंतर शांघाय, हाँगकाँग, कॅन्टन, सिंगापूर वगैरे शहरीं आपल्या नेहमींच्या विषयांवर व्याख्यानें देऊन त्याबरोबरच यांनीं जपानी संस्कृती, तेथील धर्म व तत्त्वज्ञान वगैरेंचा अभ्यास केला. त्यानंतर यांनीं मलाया संस्थानांतील लोकांच्या आग्रहावरून तेथेंहि 'बुद्धिझम' वगैरे विषयांवर हिंदू व चिनी श्रोत्यांचे पुढें व्याख्यानें दिलीं. शेवटीं रंगून येथेंहि 'हिंदूधर्म' आणि 'बुद्धाचा संदेश' वगैरे विषयांवर व्याख्यानें दिल्यानंतर ते कलकत्त्यास आले.

पुन्हां स. १९२२ सालीं हे काश्मीरहून हिमालय पर्वत पायीं ओलांडून तिबेटांत बुद्ध तत्त्वज्ञान, तेथील चालीरीती व लामाइझम यांच्या अभ्यासासाठीं गेले. नंतर स. १९२३ त रामकृष्णांच्या हिंदू अनुययांच्या आग्रहावरून हे हिंदुस्थानांत आले व यांनीं कलकत्त्यास रामकृष्ण परमहंसांचा संदेश अखंड सर्वश्रुत करण्यासाठीं सध्यां प्रसिद्ध असलेली 'रामकृष्ण वेदांत सोसायटी' व मठ यांची स्थापना केली. प्रथम ह्या संस्थेची एका भाड्याच्या घरांतच स्थापना झाली. परंतु यांच्या परिश्रमांनीं सन १९३१-३२ सालांत ह्या संस्थेनें आपल्या मालकीचें एक देऊळ व एक मठ बांधला. व अशा तऱ्हेनें स्वामी विवेकानंदांची राहिलेली ही अंतिम इच्छा यांनीं पुरी केली. पुढें १९३४ त यांनीं ह्याच मठ व संस्थेची एक शाखा दार्जिलिंग येथें सुरू केली.

स्वामी विवेकानंदांच्या शतवार्षिकोत्सवप्रसंगीं कलकत्त्यास स. १९३७ च्या मार्च महिन्यांत धर्म परिषदेच्या झालेल्या दोन्ही बैठकींत यांनीं अध्यक्षीय भाषण केलें. वेदान्त व हिंदू तत्त्वज्ञान यांवर यांनीं पुष्कळशीं पुस्तकेंहि लिहिलेलीं आहेत.

अभ्यंकर भास्करशास्त्री—(मृत्यु स. १८६८ सुमार) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध पंडित. हे सातारचे राहणारे. यांचे गुरु नीळकंठशास्त्री थत्ते. प्रसिद्ध पंडित वासुदेवशास्त्री अभ्यंकर हे यांचे नातू होत. यांचे शिष्य रामशास्त्री गोडबोले यांनीं यांचे नातू वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांना व्याकरणशास्त्रांत तयार करून गुरूचें ऋण फेडलें. भास्करशास्त्री अभ्यंकर व रामशास्त्री गोडबोले यांची शिष्यपरंपरा मोठी आहे. यांचा 'संस्कारपद्धतिः' नांवाचा ग्रंथ आनंदाश्रमसंस्थेनें प्रसिद्ध केला आहे. तो सत्याषाढसूत्राप्रमाणें संस्कारांचे प्रयोग सांगणारा ग्रंथ आहे.

अभ्यंकर, वासुदेवशास्त्री महादेव—(जन्म स. १८६२-मृत्यु स. १९४३) सुप्रसिद्ध वैयाकरण व अनेक शास्त्रांतील निष्णात पंडित. यांना हिंदुस्थानसरकारनें 'महामहोपाध्याय' (१९२१) व श्रीशंकराचार्य संकेश्वर यांचेकडून 'विद्वद्रत्न' अशा पदव्या मिळाल्या होत्या.

यांचें शिक्षण सातारचे सुप्रसिद्ध पंडित रामशास्त्री गोडबोले यांचेपाशीं झालें होतें. रामशास्त्री गोडबोले यांचे गुरु भास्करशास्त्री अभ्यंकर हे वासुदेवशास्त्री अभ्यंकरांचे पितामह होत. बाप व आजे लहानपणींच वारल्यानें वासुदेवशास्त्री यांचा सर्व भार रामशास्त्री यांनीं आपल्याकडे घेणें स्वाभाविक आहे.

यांचें सातारा येथें अध्ययन संपल्यावर पुण्याच्या संस्कृतपाठशाळेवर व न्या. म. गो. रानडे यांच्या द्वारां फर्ग्युसन कॉलेजमध्यें शास्त्री म्हणून यांची नेमणूक झाली. व्याकरणाप्रमाणेंच वेदान्त, मीमांसा, साहित्य, न्याय, तर्क, ज्योतिष, धर्म वगैरे शास्त्रांतहि यांनीं प्रावीण्य संपादन केलें होतें. या सर्व विषयांत अध्ययन, अध्यापन, वाचन व लेखन हें यांचें सतत चालू असे. त्यामुळें यांचे ग्रंथहि विपुल आहेत, आणि लेखनशैली मार्मिक, मूलग्राही व सुबोध असल्यानें ग्रंथांचा दर्जाहि उच्च आहे. यांचे ग्रंथ आनंदाश्रम, पुणें किंवा बॉंबे ओ. सीरीजमध्यें प्रसिद्ध झालेलें आहेत.

यांचे संस्कृत भाषतील टीका ग्रंथः—

१ सर्वदर्शनसंग्रहटीका, २ मीमांसान्यायप्रकाशटीका, ३ सिद्धान्तबिन्दुटीका, ४ श्रीभाष्यचतुःसूत्रीटीका, ५ कुण्डार्कटीका, ६ यतीन्द्रमतदीपिकाटीका. ७ गीताध्यायद्वयटीका.

यांचे स्वतंत्र संस्कृत ग्रंथः—

१ अद्वैतामोदः, २ कायशुद्धिः, ३ धर्मतत्त्वनिर्णयः, ४ धर्मतत्त्वनिर्णयपरिशिष्टम्, ५ सूत्रान्तरपरिग्रहविचारः,

मराठी भाषान्तरें:—

१ ब्रह्मसूत्रशांकरभाष्याचें मराठी भाषान्तर.

२ पातंजलमहाभाष्याचें मराठी भाषान्तर.

याशिवाय पं. वामनाचार्य झळकीकर यांनीं केलेला 'न्यायकोश' हा ग्रंथ वाढवून यांनीं संपादला.

भाषान्तरांपैकीं पहिलें गायकवाड सरकारकडून प्रसिद्ध झालेलें आहे आणि दुसरें डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडून प्रसिद्ध होत आहे. लेखनाप्रमाणें संशोधनाचीं कलाहि यांना चांगली अवगत होती.

याशिवाय यांचे अनेक हस्तलिखित ग्रंथ अमुद्रित स्थितींत पडून आहेत. त्यावरुन नागोजीभट्टाप्रमाणें यांनीं बहुतेक शास्त्रांत ग्रंथ केले आहेत हें दिसून येईल.

मुंबई विद्यापीठाच्या एम्.ए.चे हे अनेक वेळां परीक्षक होते. तसेंच पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजकसभेंतहि हे पुष्कळ वर्षे प्रामुख्यानें लक्ष घालीत.

यांचा विद्यावंश

१ नागोजीभट्ट काळे (स.१७५०सुमार)
|
२ रामचंद्रभट्ट तारे
|
३ वैद्यनाथ पायगुंडे (स.१७७५सुमार)
|
४ नीळकंठशास्त्री थत्ते (स.१८१८सुमार)
|
५ भास्करशास्त्री अभ्यंकर | ६ मोरशास्त्री साठे | ७ खुपाशास्त्री (मृत्यु स.१८६८) | कृष्णशास्त्री चिपळूणकर
८ काशीनाथशास्त्री | ९ रामशास्त्री गोडबोले (मृ.स.१९१२) | १० अनंतशास्त्री पेंढारकर
अष्टपुत्रे
११ राजारामशास्त्री कालेंकर | १२ वासुदेवशास्त्री अभ्यंकर (मृत्यु स.१९४३) | १३ प्रो.कीलहॉर्न
१४ दादाभट्ट सरस्वती रानडे | १५ गंगाधरशास्त्री तेलंग (मृत्युस.१९१३)

त्यांच्या शिष्यमंडळींपैकीं कै. रंगाचार्य रड्डी, शंकरशास्त्री भडकर, दिगंबरशास्त्री काशीकर, गणेशशास्त्री गोडबोले, [illegible]शास्त्री धाडरकर, लक्ष्मणशास्त्री सुरगुडकर, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव हे प्रमुख होत.

अमरसिंग लाला—(जन्म स. १९१०–मृत्यु स. १९३२) सुप्रसिद्ध क्रिकेटपटु व गोलंदाज.

पतियाळासंघांत होतकरू गोलंदाज म्हणून यांचें नांव प्रथम लोकांच्या कानीं आलें (१९३०). तेव्हां पतियाळाच्या महाराजांनीं यांना आश्रय दिला. हे गोलंदाज म्हणून प्रसिद्ध झाले तरी लवकरच चांगला टोलेबाज बॅट्समन म्हणूनहि यांनीं नांव कमावलें. तसेंच क्षेत्ररक्षणांतहि यांचें विशेष चापल्य कौतुकास्पद होतें. अशा बहुगुणत्वामुळें पंजाब संघांतून यांचा लवकरच भारतीय संघांत समावेश झाला. विलायतेमध्यें गेलेल्या क्रिकेटसंघांतहि यांचा समावेश सहज झाला (१९३२). तिकडे १०० इंग्रज गडी बाद करण्याचें श्रेय यांनीं घेतलें. तिकडच्या अनेक संस्थांनीं यांचा मोठा गौरव केला. लँकेशायर क्रिकेट टीमनें यांचा समावेश आपल्या टीममध्यें केला.

पुढें नवानगरच्या महाराजांनीं यांना आपल्या संस्थानांत आश्रय दिला, व यांच्या नेतृत्वाखालीं पहिल्याच सामन्यांत नवानगरसंघानें रणजी ट्रॉफी संपादन केली. गोलंदाज म्हणून अग्रमान अवघ्या पंचवीशीच्या आंत यांनीं निर्विवादपणें पटकाविला होता.

महाराष्ट्रांतील श्री. पी. बालू व श्री. एस्. एम्. जोशी यांची गोलंदाजी हातखंडा म्हणून समजली जाई. पण यांनीं आपल्या गोलंदाजीला तडफदार टोलेबाजीची जोड दिल्यामुळें हे कोणत्याहि हिंदी क्रिकेटसंघाचा विश्वासार्ह आधार मानला जात.

अमृतलाल दलपतरामशेठ—(जन्म स. १८८५) सुप्रसिद्ध गुजराथी वर्तमानपत्रकार. काठेवाडांतील एका लहानशा खेड्यांत यांचा जन्म झाला. यांच्या वडील बंधूंनीं यांचें पालनपोषण केलें. मॅट्रिक पास झाल्यावर नोकरी करून हे हायकोर्ट वकील झाले व १९१५ ते १९१८ पर्यंत यांनीं वकिली केली. १९१८ ते १९२१ पर्यंत हे लिंबडी येथें फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट होते. १९२१ च्या असहकारितेच्या लाटेंत यांनीं आपली नोकरी सोडून देऊन "सौराष्ट्र" हें गुजराथी साप्ताहिक सुरू केलें आणि याच पत्रानें हे सुप्रसिद्ध झाले. याच वेळेपासून यांनीं स्थानिक-स्वराज्य व त्याचबरोबर सार्वजनिक कार्यांत लक्ष घालण्यास सुरुवात केली. १९२३ ते १९३३ अहमदाबाद जिल्हा लोकलबोर्डाचे हे अध्यक्ष होते. त्याचबरोबर हे १९२६ ते १९३० पर्यंत अहमदाबाद जिल्ह्यातर्फे मुंबई कायदेमंडळांत सभासदहि होते. १९२३ ते १९३३पर्यंत सतत हे अ. भा. कॉं. क.चे व गुजराथ-प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे सभासद होते. याचबरोबर समाजसेवेचें कार्य करणारी 'काठेवाडसेवासमिति' ही संस्था

यांनीं १९२४-१९३६ पर्यंत चालविली होती व बरेच दिवस हे तिचे अध्यक्षहि होते.

परंतु यांचें नांव विशेष निगडित आहे तें संस्थानी प्रजेच्या स्वराज्याच्या चळवळीशीं. यांच्या अविश्रांत प्रयत्नाचें फळ म्हणजेच १९२७ त स्थापन झालेल्या 'अखिल भारतीय संस्थानी प्रजा परिषदे'चें उत्पादन हे होय. जवाहिरलाल नेहरू, सी. वाय्. चिंतामणी, डॉ. पट्टाभिसीतारामय्या वगैरेंना या परिषदेचे अध्यक्ष करून यांनीं या लोकांची संस्थानचे कार्यास सहानुभूति मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. चिंतामणी यांनीं पतियाळा संस्थानांतील अत्याचारांची चौकशी या सभेमार्फत केली, या गोष्टीचें श्रेयसुद्धां आपणांस यांनाच द्यावें लागेल (१९२८). राजपुतान्यांत भरलेल्या दोन संस्थानी परिषदांचे हे अध्यक्ष होते. १९२९ सालीं भरलेल्या गोलमेज परिषदेला हे संस्थानांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून गेले नसले तरी यांचे जाण्यानें संस्थानांचे अधिकृत प्रतिनिधी श्री. गणपतराव अभ्यंकर यांना अत्यंत मदत झाली होती. " इंडियन स्टेटस् पीपल " हें डॉ. पट्टाभिसीतारामय्या संपादित पत्र यांनीं कित्येक दिवस झीज सोसून चालवलें होतें व ते तुरुंगांत जाईपर्यंत हें पत्र चालवण्याची जबाबदारी यांनीं घेतली होती. " काँग्रेस सोशॅलिस्ट " हें काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षाचें पत्रसुद्धां यांनीं शेवटपर्यंत अशाच चिकाटीनें चालवलें होतें. फ्री प्रेस जर्नलच्या के. श्रीनिवासन् यांना संपादक म्हणून नेमून " दि डेली सन् " या नांवाचें इंग्रजी दैनिकहि यांनीं कांहीं दिवस चालवलें होतें. श्री. मिनु मसानी हे त्यांचे साहाय्यकारी संपादक होते.

१९३१ त यांची ईस्ट आफ्रिकन इंडियन नॅशनल काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. नैरोबी येथें झालेल्या अधिवेशनाला हजर राहून त्याबरोबरच यांनीं केनिया व युगांडा येथें दौरा काढला. १९२९ च्या चळवळींत यांना तुरुंगवास घडला होता. त्याबरोबरच १९३१ च्या देशाच्या चळवळीच्या वेळीं तर आफ्रिकेहून परत येत असतांना बोटीवरच यांना अटक झाली होती. त्यानंतर तुरुंगांतून सुटल्याबरोबर यांनीं 'जन्मभूमि' पत्राची स्थापना केली. १९३६ त त्या पत्राची सर्व व्यवस्था शांतिलाल शहा वगैरे लोकांवर सोपवून जपानी व सयामी गृहस्थांबरोबरच्या भागीनें यांनीं जहाजांचा व्यापार सुरू केला. त्या निमित्तानें हे मलाया, इंडोचायना, जपान, फिलिपाइन्स इत्यादि देशांत हिंडून आले. यांचा मुख्यतः मुक्काम हाँगकाँग व शांघाय येथें असे. यांचीं कांहीं जहाजें जपान्यांनीं घेतलीं. तेव्हां त्यांच्या चौकशीला यांना टोकिओ व कोबे येथें जावें लागलें. तेथें असतांनाचे आपले अनुभव त्यांनीं 'ॲम्रिकल्चर इन जपान' या आपल्या ग्रंथांत नमूद करून ठेवलेले आहेत. १९४० त नवीन युद्धामुळें चीनच्या किनाऱ्यावर आगबोट फिरविण्याचे मनोरथ तसेच टाकून यांना परत हिंदुस्थानांत यावें लागलें. १९४० त परत हे जन्मभूमीचे संपादक बनले व १९४२ त यांनीं 'नूतन गुजराथी' हें आपलें नवें गुजराथी दैनिक सुरू केलें. वृत्तपत्रव्यवसाय हाच यांचा धंदा असून इंडियन लँग्वेजेस न्यूजपेपर असोसिएशनचे अध्यक्ष, ऑल इंडिया एडिटर्स कॉन्फरन्स व प्रॉव्हिन्शिअल प्रेस ॲडव्हायसरी कमिटीचे सभासद, या दृष्टीनें वृत्तपत्रव्यवसायांतच यांचे सर्व संबंध निगडित आहेत. 'जन्मभूमि', 'प्रवासी', 'लोकमान्य' हीं पत्रें चालविणाऱ्या 'स्टेट्स् पीपल लिमिटेड' या संस्थेचे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. आतां हे सान्फ्रान्सिस्को येथें भरणाऱ्या जागतिक राजकीय परिषदेला वृत्तपत्रकार म्हणून जात आहेत.

अय्यर, सर निरुवरूर मुथुस्वामी—(जन्म स. १८३२-मृत्यु स. १८९५) मद्रास हायकोर्टातील न्यायमूर्ति.

ह्यांचा जन्म वुचुवाडी (तंजावरजवळ) येथें झाला. अल्पवयांतच वडिलांच्या मृत्यूमुळें हे निरुवरूर येथें तालुक्याच्या शिकून गांवच्या हिशेबनिसाजवळ दरमहा १ रु. वर नोकरीस राहिले. पुढें तेथील तहशिलदार नायकेन साहेब यांच्यावर यांच्या हुशारी व मेहनती वृत्तीचा पगडा बसून त्यांनीं यांना मद्रासच्या शाळेंत पाठविलें. तेथें हे प्रतिवर्षी बक्षिसें व शिष्यवृत्त्या मिळवीत असत. स. १८५४ त मद्रास इलाख्यांतील विद्यार्थ्यांच्या सर्वोत्कृष्ट निबंधाबद्दल ठेवलेलें ५०० रु. चें बक्षिस यांना मिळालें. त्यामुळें आय. सी. एस. करितां परदेशीं जाण्याची संधि आली असतांहि ब्राह्मणत्वाच्या आड येणारें परदेशगमन करण्याचें यांनीं नाकारून हे तंजावरच्या दप्तरदार, दुय्यम शाळा तपासणीस वगैरे जागांवर कामें करू लागले. स. १८५६ मध्यें नुकत्याच सुरू केलेल्या वकिलीच्या परिक्षेस बसून सर टी. माधवराव-सारख्या जुन्या इसमास मागें टाकून यांनीं तींत पहिला नंबर पटकाविला. पुढें हळूहळू त्रांकेबारचे मुन्सफ, तंजावर येथें डे. कलेक्टर, कानडाचे सबजज्ज व मद्रासचे पोलीस मॅजिस्ट्रेट वगैरे हुद्यांवर हे गेले. स. १८७८ त यांना हायकोर्टाचे बेंचमध्यें घेण्यांत आलें व नंतर कधीं

कधीं हायकोर्टचे मुख्य न्यायाधीश म्हणूनहि यांनीं बराच लौकिक मिळविला. व्हाइसरॉयांच्या निमंत्रणावरून स. १८७७ त हे दिल्लीस दरबारालाहि गेले होते. स. १८७८ त यांना सी. आय. इ. व स. १८९३त के. सी. आय. इ. ह्या पदव्या मिळाल्या होत्या.

अय्यर रामस्वामी—(जन्म स. १८७९) सुप्रसिद्ध राजकारणी पुरुष.

यांचा ब्रिटिश सरकार, संस्थानी राजकारण, काँग्रेसची चळवळ इत्यादि गोष्टींशीं वेळोवेळीं संबंध आला असून हे एक नाणावलेले अर्थशास्त्रज्ञ व प्रसिद्ध वकील म्हणून चमकले आहेत. एक मनुष्य अशा निरनिराळ्या क्षेत्रांत ज्याअर्थी प्रसिद्धी मिळवूं शकला याअर्थी यांची बुद्धि असामान्य असली पाहिजे यांत तिळमात्रहि शंका नाहीं. यांचें शिक्षण मद्रास येथें झालें.

१९०३ सालीं यांनीं मद्रास येथें वकिली सुरू केली व लवकरच दिवाणी बाजूंत यांनीं आपला चांगलाच जम बसविला. १९१२ सालीं हे मद्रास युनिव्हर्सिटीचे फेलो झाले. १९११ सालीं मद्रास कॉर्पोरेशनचे हे सभासद झाले व यांनीं पुष्कळशा कमेट्यांवर महत्त्वाचीं कामें बजाविलीं. १९१७-१८ सालीं हे ई. नॅ. काँग्रेसचे चिटणीस होते. दिल्लीच्या युद्धसमितीवर हे मद्रासचे प्रतिनिधी म्हणून हजर होते. पाचयप्पाच्या कॉलेज-ट्रस्टचे ते विश्वस्त होते. हिंदुस्थानच्या सुधारणांबाबत साउथबरो कमिशनसमोर, आर्थिक कारणाकरितां नेमलेल्या मेस्टन कमेटीसमोर व मि. मॉंटेग्यु व चेम्सफर्ड समोर हिंदुस्थानच्या वतीनें यांनीं साक्षी दिल्या. १९१९ सालीं हिंदुस्थानांत सुधारणा घडवून आणण्याकरितां नेमलेल्या जॉइंट पार्लमेंटरी कमेटीसमोर यांनीं पुरावा सादर केला. १९१९ सालीं हे मद्रास विश्वविद्यालयाच्या कौन्सिलचे सभासद होते. १९२० सालीं सुधारणा कायद्यान्वयें बनविलेल्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे हे सभासद होते. त्याच सालीं मद्रासचे हे ॲडव्होकेट जनरल होते. १९२६ व १९२७ सालीं हे लीग् ऑफ् नेशन्सच्या असेंब्लीला हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून जिनेव्हाला गेले होते. १९२३-२९ पर्यंत मद्रास सरकारचे हे लॉ-मेंबर होते व १९२४ सालीं हे व्हाइसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे व्हाइस-प्रेसिडेंट होते; पण लवकरच यांनीं सरकारी नोकरीचा राजीनामा दिला व पुनः वकिली सुरू केली. बटलर इन्क्वायरी कमिटीवर कोचीन संस्थानचे प्रतिनिधि म्हणून हे हजर होते. ब्रिटिश हिंदुस्तान व संस्थानी हिंदुस्तान यांचें फेडरेशनमध्यें एक स्वरूप होण्याकरतां जी राज्यपद्धति आखावयाची होती त्यांत यांनीं सभासद या नात्यानें भाग घेतला होता. १९३३ सालीं नरेन्द्र मंडळानें 'व्हाइट पेपर'चा विचार करण्याकरतां जी कमेटी नेमली होती त्याचे हे चेअरमन होते. १९३३ वर्ल्ड इकॉनॉमिक् कॉन्फरन्सचे सभासद झाले. १९३४ सालीं यांनीं काश्मीरच्या संस्थानची नवी राज्यघटना तयार करून दिली.

१९३६ सालीं हे त्रावणकोर संस्थानचे दिवाण झाले. महाराजांनीं यांना 'सचिवोत्तम' अशी पदवी बहाल केली. १९३६ सालीं अस्पृश्यांना सर्व संस्थानांतील देवळें खुलीं करण्यांत आलीं त्याच्या बुडाशीं यांचा हात होताच. १९३७ सालीं हे त्रावणकोरच्या बॉयस्काउट असोसिएशनचे चीफ कमिशनर झाले व त्रावणकोर विश्वविद्यालयाचे कुलगुरु झाले. १९३७ सालीं लंडनमधील रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ आर्टसचे फेलो म्हणून हे निवडून आले. यांचे लेखहि मासिक व वर्तमानपत्रांतून येत असतात. यांच्यासारखीं चौफेर बुद्धीचीं माणसें हिंदुस्थानांत फार थोडीं आहेत व यांच्या कर्तबगारीमुळें आज त्रावणकोर संस्थानांत सुधारणा दिसून येत आहेत.

स. १९४२ सालीं व्हाइसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलमधील जागा यांनीं राष्ट्रीयसभा व सरकार यांच्यांत तडजोड करण्याच्या दृष्टीनें पत्करली होती; पण म. गांधींना पकडतांच यांनीं त्या जागेचा राजीनामा दिला.

अय्यर, सर पी. एस्. शिवस्वामी—(जन्म १८६४) सुप्रसिद्ध प्रागतिक. यांनीं आपल्या कारकीर्दीत निरनिराळ्या विश्वविद्यालयांची व सरकारची महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. यांचें शिक्षण तंजावर, कुंभकोणम्, मद्रास येथील निरनिराळ्या संस्थांतून झालें आहे. १८८५ सालीं हे हायकोर्ट वकील झाले. १८९३ ते १९०७ सालापर्यंत हे 'मद्रास लॉ जर्नल'चे सहसंपादक होते. १९०७ सालीं मद्रास प्रांताचे हे ॲडव्होकेट जनरल होते. १९१२ ते १७ पर्यंत ते मद्रास सरकारच्या कार्यकारी मंडळाचे सभासद होते. १९१६-१८ पर्यंत मद्रास विश्वविद्यालयाचे, व १९१८-१९ मध्यें बनारस विश्वविद्यालयाचे व्हाइस चॅन्सेलर होते. हे १९२० सालीं तंजावर व त्रिचनापल्ली या जिल्ह्यांतर्फे हिंदी विधिमंडळांत निवडून आले. हे राष्ट्रीय प्रागतिक परिषदेच्या कलकत्ता व अकोला येथें भरलेल्या दुसऱ्या व नवव्या अधिवेशनाला अनुक्रमें १९१९ व १९२६ सालीं अध्यक्ष होते. १९२२ सालीं हे राष्ट्रसंघाच्या जिनेव्हा येथील अधिवेशनामध्यें हिंदी शिष्टमंडळाचे सभासद म्हणून

हजर होते. १९२४ सालीं हिंदी विधिमंडळाचे सरकारनें नेमलेले ते सभासद होते. सध्यां हे मद्रास येथें वास्तव्य करून आहेत.

कोणत्याहि प्रश्नाचा खोल विचार करणारे म्हणून यांची प्रसिद्धी आहे.

अय्यर, सर शेषाद्री—(जन्म स. १८४५–मृत्यु स. १९०१) म्हैसूरराज्याचे दिवाण.

हे मलबारमधील पालघाट गांवचे एक ब्राह्मण असून यांचें शिक्षण कालिकत व मद्रास ह्या ठिकाणीं झालें. स. १८६८ सालीं हे म्हैसूरच्या दिवाणांच्या हाताखालीं होते. स. १८८१ त संस्थान राजाच्या ताब्यांत गेल्यावर हे दिवाणांचे दुय्यम झाले. पुढें स. १८८५ हे खुद्द दिवाण झाले. या जागीं सतत १७ वर्षांच्या स्वतःच्या परिश्रमानें संस्थानची आर्थिक व औद्योगिक प्रगति करून हे महाराज चामराजेन्द्र यांचे कर्ते सहकारी बनले. स. १८९३ सालीं ब्रिटिश सरकारकडून यांना सी. आय. इ. ही पदवी मिळाली. म्हैसूर येथें यांचें स्मारक असून तेथें यांचें नांव अत्यादरानें उच्चारलें जातें.

अय्यर, जी. सुब्रह्मण्य—(मृत्यु स. १९०८) सुप्रसिद्ध संपादक व कार्यकर्ते.

मद्रास येथें यांनीं 'हिंदू' नांवाचें इंग्रजी पत्र सुरू केलें आणि तें अत्यंत यशस्वीपणें पुष्कळ वर्षे चालविलें. या पत्रांतून हे बाहेर पडल्यानंतर यांनीं हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिणेकडील भागांत तामीळ भाषेंतील सुप्रसिद्ध दैनिक 'स्वदेशमित्रम्' हें सुद्धां बरेच दिवस चालविलें. संपादक सुब्रह्मण्य अय्यर असें यांचें लोकप्रिय नांव होतें.

सुरेन्द्रनाथ बानर्जी किंवा मोतीलाल घोष यांनीं बंगालकरितां किंवा वाच्छा, टिळक, गोखले यांनीं मुंबई प्रांताकरितां जी कामगिरी केली तीच कामगिरी यांनीं 'हिंदु' पत्र, महाजनसभा व काँग्रेस यांच्या द्वारां मद्रास प्रांताकरितां केली. यांच्या लेखाचे अतिशय भोक्ते मि. ह्यूम यांनीं यांना लिहिलें होतें कीं "तुमचीं स्फुटें 'लंडन टाइम्स'मधील लेखांपेक्षांहि वरचढ असतात." त्याचप्रमाणें, इंग्लंडांत पार्लमेंटमध्यें हिंदुस्थानला सहानुभूति दाखविणारांचा एक वर्ग आहे. त्यांच्या माहितीकरितां 'हिंदू'च्या पन्नास प्रती खरेदी करून ते पाठवीत असत. त्या वेळीं हिंदुस्तानच्या सार्वजनिक प्रश्नांची चर्चा करून अधिकारवाणीनें मत प्रदर्शित करणारे हेच एक संपादक होते. आर्थिक बाबींचा विचार करणाऱ्या रॉयल कमिशनपुढें यांची साक्ष झाली. 'सम् एकॉनॉमिक आस्पेक्टस् ऑफ ब्रिटिश रूल इन् इंडिया'–हा यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. (सी वाय. चिंतामणि–इंडियन पॉलिटिक्ट सिन्स म्युटिनी–पा. ४९).

हे 'हिंदु' या इंग्रजी दैनिकाचे संपादक असतांना यांच्या तालमींत तयार झालेले श्री. करूणाकर मेनन (हिंदु व इंडियन पेट्रियट यांचे संपादक), श्री. के. नटराजन् (इंडियन सोशल रिफॉर्मर, मुंबईचे सुप्रसिद्ध संपादक) व श्री. सी. वाय. चिंतामणि (लीडर, अलाहाबाद) हे प्रमुख होत. हिंदी गृहस्थांनीं संपादन केलेलें पहिलें इंग्रजी भाषेंतील यशस्वी दैनिक या दृष्टीनें हिंदू पत्राचें महत्त्व केव्हांहि मोठेंच राहील.

पहिल्या काँग्रेसमधील पहिला ठराव मांडणारे हे गृहस्थ होत. हिंदुस्थानच्या राज्यकारभारासंबंधीं जी चौकशी करण्याचें अभिवचन मिळालें आहे, ती चौकशी रॉयल कमिशनद्वारां व्हावी व तींत हिंदी प्रतिनिधींचें योग्य तें प्रमाण असावें असा हा ठराव होता. पुढें स.१८९४ सालीं मद्रास येथें काँग्रेसचें जें अधिवेशन झालें, त्या वेळीं हे पुनः चमकले. तेथें हिंदुस्थानच्या तिजोरीच्या प्रश्नाची पाहणी करावी या ठरावावर हे बोलले. कलकत्त्यास समकालीन परीक्षांचा ठराव (स. १८९६), अमरावती काँग्रेसमध्यें सरकारच्या सरहद्द-विषयक धोरणाचा निषेध व मद्रासच्या अधिवेशनांत (१८९८) चलनाचा प्रश्न यांसंबंधीं हे बोलले. 'हिंदुस्थानांत इंग्रजांचें भांडवल वाढत राहणें हिताचें नाहीं, त्यामुळें हिंदुस्थानचें अधिकच द्रव्यशोषण होतें' असें त्या वेळीं हे म्हणाले. 'हिंदुस्थानची परिस्थिति' हा यांचा आवडता विषय होता. हिंदुस्थानांत वारंवार पडणाऱ्या दुष्काळांपासून लोकांचें संरक्षण व्हावें म्हणून 'चौकशी कमिटी' नेमावी असें यांनीं सोळाव्या अधिवेशनांत (लाहोर १९००) बोलून दाखविलें. स. १९०१ सालीं हिंदी रयतांच्या दुःख व दारिद्र्यासंबंधानें बोलतांना 'हिंदी लोक या जगांत जन्माला आले म्हणून जगतात आणि जास्त काल शरीरांत प्राण राहणें शक्य नाहीं म्हणूनच ते मरतात,' असे यांनीं उद्गार काढले. देशांत औद्योगिक शिक्षणसंस्था काढाव्यात, परदेशांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या द्याव्यात व देशी उद्योगधंद्यांची बारकाईनें पाहणी करावी, अशा यांच्या विधायक सूचना होत्या. यांची दृष्टि विशाल होती तशीच ती खोल होती. स. १९०२ च्या (अहमदाबाद) अठराव्या अधिवेशनांत 'ईस्ट इंडिया कंपनीनें इंग्लंडच्या फायद्याकरितां हिंदुस्थानचे उद्योगधंदे कसे बुडविले, इंग्लंडांतील कार-

खाऱ्यांना कच्चा माल पुरविण्याकरितां शेतीला कसें उत्तेजन दिलें' याचें यांनीं वर्णन केलें. 'ब्रिटिश सरकारनें राज्यसूत्रें हातीं घेतल्यामुळें वरील स्थिति आतां पालटली पाहिजे. आज काय चाललें आहे? कोलारमधील सोन्याच्या खाणी युरोपियन भांडवलवाल्यांच्या हातांत आहेत. दरसाल २० कोटि रुपयांचें सोनें या खाणींतून निघतें तें सर्व परदेशांत नेण्यांत येतें. २०-३० वर्षांत हें सर्व सोनें खणून काढून इंग्लंडांत नेल्यावर म्हैसूरच्या वांट्याला दगडांशिवाय काय राहणार? सरकारनें हिंदुस्थानच्या संपत्तीचें रक्षण केलें पाहिजे. ती देशांतून बाहेर जाऊं देतां कामा नये.' ही यांचीच उक्ति होय.

आक्षेपार्ह लेख लिहिल्याबद्दल यांना शेवटीं कारागृहांतहि जावें लागलें. पण यांना झालेल्या शारीरिक रोगामुळें यांची मुक्तता करण्यांत आली. हे अत्यंत निधडे व दूरदृष्टीचे राजकीय पुढारी होते (राष्ट्रीय सभेचा इतिहास, पा. ९४).

अय्यर, डॉ, सर. एस्. सुब्रह्मण्य— (जन्म स. १८४२-मृत्यु स. १९२४) दक्षिण हिंदुस्थानांतील विद्वान्, स्वाभिमानी देशभक्त व मद्रास हायकोर्टचे मुख्य न्यायाधीश.

जन्मस्थान मदुरा जिल्हा. हे वकिलीची परीक्षा पास झाल्यावर यांनीं मदुरेच्या डि. जज्जांना सलाम करण्याचें नाकारल्यानें यांना सनद देण्याचें नाकारण्यांत आलें. म्हणून यांनीं बी. एल्. ची परीक्षा देऊन मदुरा येथें वकिलीच्या धंद्यास सुरुवात केली, व या धंद्यामध्यें आपल्या हुशारीमुळें उत्तम यश संपादन करून हे नांवलौकिकास चढले. स. १८७० सालीं मदुरेच्या म्युनिसिपालिटींत हे प्रविष्ट झाले. राष्ट्राचा उत्कर्ष होण्याकरितां लोकसेवेचें व्रत घेऊन याच वृत्तीनें प्रत्येक सार्वजनिक कार्यांत हे मन घालूं लागले. स. १८७५ मध्यें त्या वेळचे प्रिन्स ऑफ वेल्स (७ वे एडवर्ड) हिंदुस्थानांत आल्या वेळीं मदुरा शहरातर्फे यांचा सत्कार करण्याचा मान यांना मिळाला. स. १८८७ सालीं यांची सरकारी वकील म्हणून नेमणूक झाली. स. १८७७ पासून स. १८९५ पर्यंत यांनीं वकिलीचा धंदा केला. पुढें स. १८९५ सालीं मद्रासचे हायकोर्ट जज्ज म्हणून यांची नेमणूक झाली. याच अधिकारावर हे स. १९०७ सालापर्यंत होते. या अवधींत तीन वेळां चीफ जस्टिस म्हणून यांची नेमणूक झाली. हें न्यायाधीशाचें काम यांनीं अत्यंत विद्वत्तेनें, न्यायबुद्धीनें व स्वतंत्र बुद्धीनें केल्याबद्दल यांची तिकडे फार प्रसिद्धी झाली.

मद्रास युनिव्हर्सिटीचे हे कित्येक वर्षेपर्यंत फेलो असून स. १९०४ पासून स. १९०८ पर्यंत त्या विद्यापीठाचे हे उपकुलगुरु होते. स. १९०७ सालीं हे सेवानिवृत्त झाल्या वेळीं सरकारनें यांना नाइट करून 'सर' ही पदवी दिली. स. १९०८ सालीं मद्रास विद्यापीठानें यांना यांच्या विद्वत्तेबद्दल आदरदर्शक एल्एल्. डी. ही पदवी दिली. जनतेनेंहि यांच्या लोकसेवेचें स्मारक म्हणून यांचे नांवानें 'मणि हॉल' या नांवानें सार्वजनिक सभागृह बांधलें.

स. १८८२ सालीं हे थिऑसॉफिकल सोसायटीचे सभासद झाले. स. १८८५ सालापासून स. १९०७ पर्यंत कर्नल आल्कॉट यांचे व स. १९०७ पासून स. १९२४ पर्यंत बेझंटबाईंचे हे कायद्याचे सल्लागार होते. स. १९०५-६ सालीं हे सोसायटीचे चिटणीस नेमिले गेले, व या अवधींतच थिऑसाफिकल सोसायटीचें घटनापत्रक यांनीं तयार केल्यावर कायद्याप्रमाणें सोसायटी नोंदली गेली. सोसायटीचे उपाध्यक्ष मि. सिनेट यांनीं बेझंटबाईंच्या धोरणाशी मतभेद झाल्यामुळें आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा १९०७ मध्यें दिला. म्हणून त्या उपाध्यक्षाच्या जागीं बाईंनीं यांची नेमणूक केली. पुनः स. १९११ सालीं फिरून समजूत पटून मि. सिनेट सोसायटींत परत आले. त्यासरशीं बाईंचे विनंतीस मान देऊन यांनीं उपाध्यक्षपदाची जागा स्वखुषीनें खालीं करून मि. सिनेट यांचे स्वाधीन केली. यावरूनच यांच्यामधील बुद्धीची तेजस्विता व स्वतंत्रतेचा बाणेदारपणा जसा दिसून येतो तशीच असामान्य सेवावृत्ति व विनयशीलताहि दिसून येते.

स. १८८४ सालीं मि. ह्यूम यांनीं अखिल हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांच्या सहकार्यानें जेव्हां राष्ट्रीय सभेची मद्रासला स्थापना केली, त्या वेळीं तेथें जमलेल्या सतरा संस्थापकांपैकीं हे एक होते. स. १९१४ सालीं मद्रासच्या बैठकींत हे स्वागताध्यक्ष होते. स. १९१७ सालीं बेझंटबाईंनीं जेव्हां 'होमरूललीग' काढली तेव्हां तिचे हे सन्मान्य अध्यक्ष होते व त्या चळवळींत यांनीं मोठ्या धडाडीनें भाग घेतला. बेझंटबाई, डॉ. अरंडेल व वाडिया हे उटकमंडला स्थानबद्ध केले गेले त्या वेळीं यांनीं निषेधार्थ सरकारनें दिलेल्या सर या पदवीचा त्याग केला. यांनीं हिंदुस्थानांतील प्रसिद्ध-प्रसिद्ध पुढाऱ्यांच्या आपल्या-समवेत सह्या घेऊन प्रे. विल्सन, अमेरिका, यांना त्या वेळच्या युद्धपरिस्थितीचा उल्लेख करून हिंदी स्वातंत्र्याच्या बाबतींत लक्ष घालण्याविषयीं पत्र लिहिलें. त्या वेळचीं सरकारी मनःस्थिति लक्षांत घेऊन तें पत्र खासगी

रीतीनें प्रे. विल्सन यांचेकडे रवाना केलें. प्रे. विल्सन यांनीं तें एक महत्त्वाचा प्रश्न म्हणून सिनेटपुढें ठेवण्यास सांगितलें. तें तिकडील अनेक दैनिकांत प्रसिद्ध झालें, व लाखों लोकांच्या वाचनांत येऊन त्याच्या प्रती जेव्हां इंग्लंडांत पोंचल्या त्या वेळीं तिकडे फार खळबळ उडाली. त्यामुळें ब्रिटिश व हिंदी सरकारला फार घुस्सा आला. पुढें बेझंटबाई व त्यांचे सहकारी यांची लवकरच मुक्तता झाली, व भारतमंत्री मि. मॉंटेग्यु हे हिंदी प्रश्नाबाबत प्रत्यक्ष चौकशी करण्याकरितां हिंदुस्थानांत आले. त्यांनीं अनेक संस्थांच्या शिष्टमंडळांच्या गांठीं घेतल्या व देशभर प्रवास करून अनेक सरकारी व लोक-पुढारी यांशीं विचारविनिमय केला. अशा प्रसंगानें भारतमंत्री व व्हाइसरॉय लार्ड चेम्सफर्ड हे मद्रासला आले. त्या वेळीं एक प्रमुख नागरिक म्हणून यांना बोलावणें आलें. त्या वेळच्या भेटींत यांना त्या पत्राबद्दल व्हाइसरॉयनीं खुलासा विचारला व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचे अध्यक्ष, अशासारख्या परकीय अधिकाऱ्यांना पत्र कां व कसें लिहिलें याचा जबाब विचारून यांना फार दोष दिला व गरम झाले. यांनीं 'अमेरिकेसारख्या आपल्या दोस्त राष्ट्राच्या अधिपतींना पत्र लिहिण्यांत कांहींएक बेकायदा नाहीं; व प्रसंग आल्यास अशीं पत्रें मी फिरूनहि लिहीन' असें धिटाईनें उत्तर दिलें. व्हाइसरॉय लष्करी बाण्याचे असल्यामुळें संतापले, व प्रसंग विकोपास जाण्यापर्यंत पाळी आली, पण भारतमंत्र्यांनीं मध्यें पडून स्थिरस्थावर केलें व भेट संपली. याप्रमाणें हिंदी स्वातंत्र्याच्या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्रथमच आणण्यास हे थोर देशभक्त कारणीभूत झाले.

हे दिवंगत झाल्यावर मद्रास विद्यापीठानें यांच्या बहुमानार्थ स. १९३५ सालीं एक पुतळा उभारला व तसाच बेझंटबाईनींहि अड्यार येथें थिऑसॉफिकल सोसायटीचे एक थोर सभासद, सल्लागार व उपाध्यक्ष म्हणून यांचा स. १९२५ मध्यें पुतळा उभारला.

यांनीं योगाभ्यासांतील ध्यानमार्गाचा अनेक दृष्टींनीं अभ्यास केला होता. यांचा दक्षिण हिंदुस्थानांत 'शुद्ध धर्म-मंडल' या नांवाच्या कांहीं योगी लोकांच्या संप्रदायाशीं निकट संबंध होता. या संप्रदायाच्या मतानें हल्लीं प्रचलित असलेले श्रुति, स्मृति, पुराणें इत्यादि ग्रंथ मूळ स्वरूपांत नाहींत. म्हणून सदरहू संप्रदायाच्या तर्फे कांहीं मूळ शुद्ध ग्रंथ यांचे विद्यमानें प्रकाशित केले गेले. त्यांना यांनीं प्रस्तावना लिहिलेल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं ग्रंथ येणेंप्रमाणें—

१ भगवद्गीता (२६ अध्यायांची व ७४५ श्लोकांची ऋषि गार्ग्यायणप्रणीत गोभिलकारिकेसह).

२ प्रणववाद (७ हजार श्लोकांचा, महर्षि गार्ग्यायण-प्रणीत स्वामी योगानंदकारिकेसहित).

३ योगदीपिका (भगवान् नारायणप्रणीत, हंसयोगी-भाष्यासह).

४ सनातनधर्मदीपिका अथवा अनुष्ठानचंद्रिका (१-३ भाग. भगवान् हंसयोगीकृत).

५ इसोटेरिक ऑर्ग्यानिझेशन इन इंडिया.

पहिले चारहि ग्रंथ मूळ संस्कृत भाषेंत असून यांनीं इंग्रजी भाषांतरासह प्रसिद्ध केले आहेत. पांचवा ग्रंथ इंग्रजींत स्वतंत्रपणें लिहिलेला आहे (वा. ल. चिपळूणकर).

अॅरंडेल, डॉ. जॉर्ज सिड्ने—(जन्म स. १८७८).

'बेझंटबाईंच्या स्फूर्तीनें भारतभूमीची माझ्या आयुष्यांतील गेल्या चाळीस वर्षें सेवा करण्याची मला जी संधि मिळाली ती माझ्या गतजन्मांतील अपूर्वाईची कमाई आहे असें मी समजतों. माझ्या मनावर सोंपविलें तर हिंदुस्थानांतच फिरून जन्म मिळावा अशी मी परमेश्वराची प्रार्थना करीन.' असे अन्तःकरणापासून उद्गार काढलेले हे सज्जन गृहस्थ आहेत.

यांच्या वडिलांचें नांव रे. जॉन के (कॉंग्रिगेशनल पंथाचे उपाध्याय) होय. यांच्या जन्मकाळींच यांच्या आईस मृत्यु आला. त्यामुळें यांचें बाळपणचें संगोपन, संवर्धन व अखेरपर्यंतचें शिक्षण, हें यांच्या मावशी मिस् फ्रॅंसेस्का अॅरंडेल यांजकडे आलें व तें त्यांनीं फार प्रेमपूर्वक पार पाडलें. त्यांनींच पुढें यांना आपले दत्तकपुत्र म्हणून मानलें. याप्रमाणें पितृकुलांतील उपनांव 'के' हें जाऊन यांना यांच्या आजोळचें उपनांव 'अॅरंडेल' हें प्राप्त झालें. हे लहान असतांना यांचे आजोळीं, आजीकडे ब्लॅव्हॅट्स्कीबाईंचा पुष्कळ वेळां मुक्काम असे. अशा वेळीं ब्लॅव्हॅट्स्कीबाईंना संधिवात असल्यानें, त्यांना ढकलत्या खुर्चीवर बसवून लंडनमधील प्राणिसंग्रह-उद्यानांत हवा खाण्यास नेत असत. त्या वेळीं लहान वयांत हेहि त्यांच्याबरोबर करमणुकीकरितां असत. त्या वेळीं 'प्राणिमात्रांशीं आपण भूतदयेनें वागावें' असा प्रेमाचा उपदेश यांना त्या देत असत. या उपदेशाचा यांच्या कोवळ्या मनावर कायमचा ठसा उमटून, आज हे जरी विश्वविद्यालयीन उच्च शिक्षण घेतलेले पदवीधर आहेत, तरी अन्तःकरणाची कोमलता

आणि सहृदयवृत्ति यांचे त्यांच्या स्वभावांत प्राधान्य स्पष्टपणें दिसून येतें. यांच्या बाल-शरीराकडे पाहून ब्लॅव्हॅट्स्कीबाई यांना 'माझा छोटा चेला' या नांवानें संबोधीत असत.

यांचें शिक्षण इटली, जर्मनी व इंग्लंड येथें झालें. हे केम्ब्रिज विश्वविद्यालयाचे नीतिशास्त्र, कायदा व फ्रेंच-राज्यक्रांति या विषयांत विशेष सन्माननीय प्रावीण्य संपादन करून एम्. ए. एलएल. बी. झालेले आहेत. केंब्रिज विद्यापीठांतील यांचे त्या वेळचे बरेच सहाध्यायी पुढें हिंदी जनतेंत प्रसिद्धीस आले. त्यांपैकीं रॅलर सर रघुनाथराव परांजपे, बॅरिस्टर बॅप्टिस्टा, हिंदुस्थानचे माजी स्टेट सेक्रेटरी मॉंटेग्यू व मि. जिनराजदास हे प्रमुख होत. ऐतिहासिक संशोधनावरून फेलो ऑफ दि रॉयल हिस्टॉ. सो. हीहि पदवी यांना मिळाली.

यांच्या मावशी मिस् अरंडेल व त्यांच्या आजी, या आधींच थिऑसाफिकल सोसायटीच्या सभासद होत्या. बेझंटबाईंनीं बनारसला सेंट्रल हिंदु कॉलेजच्या (१८९८) स्थापनेबरोबरच हिंदी मुलींच्या शिक्षणाकरितां निराळी शाळा व कॉलेजहि काढलें व त्यांत मिस् अॅरंडेल या अध्यापिकेचें काम करीत असत. वरीलप्रमाणें डॉ. अॅरंडेल यांचें शिक्षण पुरें झाल्यावर मावशीचे सल्ल्यावरून हे हिंदुस्थानांत सें. हिं. कॉलेज बनारस येथें इतिहासाचे प्रोफेसर म्हणून काम करण्यास आले (१९०३). याच कामासंबंधानें यांनी स्वतः लिहिलें आहे कीं, "एके प्रसंगीं लंडनमध्यें बेझंटबाईंचें Queen's Hall मध्यें एक वक्तृत्व-पूर्ण व्याख्यान ऐकून 'हेंच माझें कार्य' व 'हीच माझी देवता' अशी माझ्या हृदयांत ओळख पटली." "मी हिंदुस्थानांत येण्यास तयार आहें," असें बेझंटबाईंना यांनीं सांगितलें, तेव्हां त्या गंभीर चर्येनें यांना म्हणाल्या, "पण हिंदी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हाताखालीं काम करण्यास तुम्ही तयार आहांत काय?" त्यालाहि यांनीं एकदम संमति दिली. यांत बेझंट-बाईंच्या हिंदुस्थानांतील कार्याच्या धोरणावरहि चांगला प्रकाश पडतो. येथें आल्यावर इतिहासाचे प्रोफेसर, हायस्कूलचे हेडमास्तर व अखेरीस कॉलेजचे प्रिन्सिपल याप्रमाणें उत्तरोत्तर १९०३ पासून १९१३ पर्यंत यांनीं निर्वेतन काम केलें. यानंतर सें. हिं. कॉलेज हें पं. मदन-मोहन मालवीय यांचे हिंदुविश्वविद्यालयांत सामील होण्याकरितां त्यांचे स्वाधीन करण्यांत आलें. अध्यापन-कार्य हें यांच्या मोठ्या आवडीचें कार्य आहे. कॉलेजांतील प्रत्येक विद्यार्थ्याशीं अध्यापनाच्या वेळीं व क्रीडांगणावर यांचें वर्तन अगदीं खेळीमेळीचें असे. 'माझा भाचा कोठें गेला हें शोधावयाचें असल्यास, जेथें खूप धुमाकूळ व विद्यार्थ्यांचा गलबला असेल तेथें तो मला हटकून सांपडतो' असें यांच्या मावशी नेहमीं म्हणत असत. कॉलेजांतील प्रत्येक विद्यार्थ्याला हे त्याच्या घरच्या नांवानें हांक मारीत असत, व विद्यार्थीहि यांना तशाच प्रेमानें संबोधीत. हे त्या वेळीं अविवाहित असल्यानें, यांच्या बंगल्यांत विद्यार्थ्यांची दिवसभर ये जा चालत असे. विशेष होतकरू, तसेंच अभ्यासांत मागासलेल्या अशा विद्यार्थ्यांची नोंद हे आपल्या रोजनिशींत ठेवीत व त्यांकडे विशेष लक्ष ठेवीत. यामुळे तत्कालीन विद्यार्थ्यांच्या मनावर यांच्या स्वभावाची छाप पडून उत्तर हिंदुस्थानांत ते विद्यार्थी आपआपल्या परिसरांत 'अॅरंडेलस् मेन्' म्हणजे 'अॅरंडेल-शिष्य' या नांवानें ओळखले जात व हेंच संबोधन यांच्याशीं सहकार्य करीत असलेले इतर प्राध्यापक यांनाहि मिळालें होतें. यांमध्यें हल्लींच्या कौन्सिल ऑफ स्टेटमधील सभासद प्रकाशनारायण सप्रू (सर तेजबहादूर यांचे चिरंजीव), श्रीप्रकाश (डॉ. भगवानदास यांचे चिरंजीव) हे विद्यार्थी व प्रो. पंढरीनाथपंत तेलंग, चिंतामणि त्रिलोकेकर, संजीव-राव हे प्राध्यापक, यांचा उल्लेख करतां येईल. 'माझ्या सहवासानें जर एकाहि हिंदी विद्यार्थ्याचें अंतःकरण मातृभूमीच्या सेवावृत्तीनें भरून जाईल तर मी आपणास धन्य समजेन' असे यांचे तत्कालीन उद्गार आहेत. यांनीं अध्यापन विषयाचा विशेष गाढ अभ्यास, अनेक देशांत वास करून व तत्संबंधीं आर्यांचे स्मृतिग्रन्थ वाचून केला आहे. यांनीं शिक्षणशास्त्रावर अनेक ग्रंथ व लेख लिहिले आहेत. या विषयावरील यांचा मुख्य ग्रंथ "गॉडज् इन दि बिकमिंग" हा आहे. यावरून प्रत्येक विद्यार्थी हा देवाचें अपूर्ण स्वरूप आहे ही यांची दृष्टि स्पष्ट होते; व म्हणूनच अध्यापनाचें कार्य इतकें पवित्र आहे असें यांस वाटतें. यांना कांहीं दिवस होळकर सरकारनें आपले शिक्षणमंत्री नेमिले होते. श्रीकृष्णमूर्तींना इतिहास शिकविण्याचें कार्य यांचेकडे सोंपविलें होतें. हें कार्य झाल्यावर मद्रासला बेझंटबाईंनीं जेव्हां नॅशनल युनिव्हर्सिटी काढली तेव्हां तिचे रजिस्ट्रार व कॉलेज-अध्यापक म्हणून यांनीं काम केलें. या कार्याबद्दल यांना डॉक्टर पदवी मिळाली.

बेझंटबाईंनीं होमरूलची चळवळ चालविल्यावर लीगचे सेक्रेटरी म्हणून व न्यू इंडिया दैनिकाचे सहसंपादक म्हणून, यांनीं व्याख्यान व लेखनद्वारा प्रचंड चळवळ उभी केली,

त्यामुळें मद्रास सरकारनें यांना, बेझंटबाई व मि. वाडिया यांच्यासह उटकमंड येथें स्थानबद्ध केलें. त्यानंतर बेझंटबाईंनीं स्थापना केलेल्या मद्रास पार्लमेंटमध्यें 'कॉमनवेल्थ ऑफ इंडिया' बिलाबाबत यांनीं त्यांच्याशीं सहकार्य केलें. त्याचप्रमाणें हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, अमेरिका या देशांत थिऑसॉफीच्या प्रचाराचें कार्य करून पहिल्या तीन देशांत, तेथील सोसायटीच्या चिटणिसाचें कामहि यांनीं कांहीं वर्षे केलें. याप्रमाणें बेझंटबाईंनीं यांना आपल्या पाठीमागें अध्यक्षपदावर चढण्याची योग्यता आणून दिली.

स. १९३३ च्या सप्टें. २० ला बेझंटबाई वारल्या. त्या वेळीं सोसायटीच्या घटनेप्रमाणें त्या वेळचे उपाध्यक्ष, अमेरिकेंतील कार्यकर्ते मि. ए. पी. वॉरिंग्टन् यांनीं अध्यक्षपदाचीं सूत्रें हातीं घेतलीं व कायमचे अध्यक्षाच्या निवडणुकीकरितां मतपत्रिका धाडल्या. जगांतील सर्व सभासदांचीं व्यक्तिगत मतें घेऊन, जागेच्या कायमच्या अध्यक्षपदाकरितां उभे राहिलेल्यांमध्यें यांची मताधिक्यानें निवडणूक झाली, आणि तेव्हांपासून हे अध्यक्षाचें काम करीत आहेत. घटनेप्रमाणें दर सात वर्षांनीं अध्यक्षाची निवडणूक फिरून व्हावी लागते, त्याप्रमाणें स.१९४१ सालीं फिरून निवडणूक होऊन यांच्या अध्यक्षपदाचें दुसरें सप्तक चालू आहे. या अकरा वर्षांचे अवधींत सोसायटीच्या पूर्वपरंपरागत धोरणानुरूप सर्व सभासद व संस्था यांशीं आत्यंतिक स्नेहभाव ठेवून व त्यांचे त्यांचे मतस्वातंत्र्यास धक्का न पोंचेल अशा तऱ्हेनें हे कार्य करीत आहेत. या अवधींत यांनीं दरसाल सोसायटीचे प्रादेशिक शाखांना व सभासदांना मार्गदर्शन होईल अशा तऱ्हेच्या त्या त्या कालाला अनुरूप निरनिराळ्या कार्याची शिफारसहि केली आहे. त्यांपैकीं कांहीं म्हणजे 'कँपेन् ऑफ् स्ट्रेट् थिऑसफी', 'सहज सुलभ आत्मविद्येचें जागृतिकार्य', 'कँपेन् ऑफ् अंडरस्टँडिंग्' 'अंतःकरणाचें जागृतिकार्य'; 'कुरुक्षेत्रयुद्ध' 'कुरुक्षेत्रयुद्धाचें स्मृति-जागृतिकार्य', 'कँपेन् ऑफ् ग्रेटनेस्' 'देशांदेशांतील विभूतिमत्त्वाचें जागृतिकार्य' अशीं होत. हीं कार्यें चालविण्यास जरूर असें दरमहाचें वाङ्मय म्हणून अनेक लघुपुस्तकें लिहिलीं. याशिवाय यांनीं अध्यात्म, योगशास्त्र, शिक्षण व सामान्य वाचकांकरितां लौकिक भाषेंत थिऑसफी यावर अनेक ग्रंथ लिहिले. निरनिराळ्या देशांतील सभासदांना व संस्थांना जे वार्षिक परिषदांचे प्रसंगानें संदेश धाडले ते तर असंख्य आहेत.

सन १९२० सालीं यांच्या वयाचे बेचाळिसावे वर्षी कु. रुक्मिणीदेवी यांशीं यांचा वैदिकपद्धतीनें विवाह झाला. इंग्रज गृहस्थांबरोबर एका हिंदु कुमारीचा हा विवाह असल्यामुळें या विवाहानें दक्षिण हिंदुस्थानांत हिंदुसमाजांत फार खळबळ उत्पन्न झाली. पण बेझंटबाई व डॉ. ॲरंडेल या उभयतांच्या हातून हिंदुस्थानची झालेली सेवा व त्यांची सुजनता यांमुळें ही खळबळ लवकरच शांत झाली.

'आजचे तरुण उद्यांच्या जगांतील नागरिक होत' याकरितां, अध्यात्माचे बैठकीवर जर देशोंदेशांतील तरुणांचीं अंतःकरणें ध्येयनिष्ठा, स्वदेशप्रीति पण त्याबरोबरच एकंदर मानवांबद्दल बंधुप्रेम या सत्प्रवृत्तीनें भरून टाकिलीं तर उद्यांचे जगांत खरी शांति व सुख नांदतील या भावनेनें यांनीं सोसायटींत 'थिऑसफीय युवक-संघ' ही संस्था देशोदेशीं काढली व त्यांची एक आंतरराष्ट्रीय संघसंस्था स्थापन केली. या संस्थेचे हे सन्माननीय अध्यक्ष असून सौ. रुक्मिणीदेवी कार्याध्यक्ष आहेत.

यांनीं १९१२-१३ च्या सुमारास बेझंटबाईंनीं जेव्हां निष्कामकर्म मठासारखी 'आर्डर ऑफ ब्रदरहुड' या नांवाची संस्था काढली, तेव्हां संप्रदायनिधींत यांनीं आपलें धनसर्वस्व इतर सभासदांप्रमाणें अर्पण केलें. व त्याच वृत्तीनें अजूनहि हे राहत आहेत. याप्रमाणें यांचें जीवनस्वरूप प्राचीन आर्यांच्या संन्यास-धर्मानुरूप आहे. यांना योगदीक्षा मिळालेली आहे.

यांचे ग्रंथ

१ निर्वाण (Nirvāṇa) } योगशास्त्रीय
२ कुंडलिनी (Kuṇḍalinī) } योगशास्त्रीय
३ लोटस् फायर (Lotus Fire) } योगशास्त्रीय
४ फ्रीडम् अँड् फ्रेंडशिप (Freedom & Friendship) (स्नेह व स्वतंत्रता) } आध्यात्मिक (लौकिक भाषेंत)
५ यू (You) (तुम्ही व तुमचें जीवन) } आध्यात्मिक (लौकिक भाषेंत)
६ गॉडज् इन् दि बिकमिंग् (Gods in the Becoming) (घडत असलेले देव) } शिक्षण-शास्त्रावर
७ बेडरॉक् ऑफ एज्युकेशन (Bed-rock of Education) (शिक्षणाचा कूटस्थ पाया) } शिक्षण-शास्त्रावर
८ एज्युकेशन फॉर हॅपिनेस (Education for Happiness) (सुखप्रद शिक्षण) } शिक्षण-शास्त्रावर
९ थिऑसॉफिस्ट (Theosophist) (मासिक संपादन १९३३ पासून आजतागायत).
१० कॉन्शन्स (Conscience) (सदसद्विवेक, साप्ताहिक १९३९ पासून आजतागायत).

यांशिवाय इतर ४०-४५ लहानमोठे ग्रंथ व पुस्तकें.

अॅरंडेल, श्री. रुक्मिणीदेवी—(जन्म स.१९०४) 'श्री. नटराज हे शंकराचें आनंदस्वरूप होत; ते महान् योगी, सर्व कलांचे पिता आहेत. त्यांच्या दैवी स्वरूपाशीं जो तन्मय होईल त्यालाच कलेचें हृदय हस्तगत होईल.'—हेंच यांच्या जीवनरहस्याचें ब्रीदवाक्य होय.

यांचे वडील श्री. नीळकंठशास्त्री हे एका दक्षिणेकडील हिंदी संस्थानांत एंजिनिअर होते. हे संस्कृतभाषा व हिंदी तत्त्वज्ञान यांतील त्यांच्या गाढ विद्वत्तेबद्दल त्या बाजूला सुप्रसिद्ध होते. सोसायटीचे हल्लींचे उपाध्यक्ष एन्. श्रीराम हे यांचे बंधु होत. यांच्या वडील भगिनी डॉ. शिवकामू यांनीं एके वेळीं होमरूलच्या चळवळींत विशेष भाग घेतल्यानें त्यांना मुंबईसरकारनें मुंबईच्या मेडिकल कॉलेजांतून काढून दिलें होतें. ब्राह्मणें या दक्षिण हिंदुस्थानांतील ब्राह्मण कुटुंबांतील सर्व माणसें विद्वान् व सार्वजनिक कार्यांत पडलेलीं अशीं आहेत. यांचे कुटुंबाशीं डॉ. अॅरंडेल यांचा पूर्वपरिचय चांगला होता. स. १९२० सालीं डॉ. अॅरंडेल यांच्याशीं यांचा विवाह झाला. यांचें शिक्षण विवाहाच्या पूर्वी व नंतर मद्रासमध्येंच झालें. यांचा थिऑसाफीतील पुढारी कै. लेडबीटर यांचेशीं वयाचे ७ वे वर्षींच परिचय होऊन, उभयतांच्या दृढ परिचयास सुरुवात झाली. शिक्षणाचीं तत्त्वें व तरुणांच्या अन्तःकरणाचें हृद्गत हीं यांना त्यांच्यापासून प्राप्त झालीं अशी यांची समजूत आहे. बेझंट-बाई यांना, यांनीं जरी अनेक वेळां पाहिलें होतें व त्यांची व्याख्यानें ऐकिलीं होतीं, तरी यांची व त्यांची प्रत्यक्ष भेट १९२० सालीं झाली. १९२५ सालीं या डॉ. अॅरंडेल यांचेसह युरोपांत गेल्या व तेथील समाजाची रचना व तेथील लोकांची कलोपासना यांचें सूक्ष्म निरीक्षण यांनीं केलें. यांना लहानपणापासूनच आर्यांची प्राचीन, साधी व उच्च राहणी याबद्दलचें प्रेम व आदर होता; व त्यांच्या ललितकलांचें पुनरुज्जीवन व्हावें अशी यांची महत्त्वाकांक्षा होती. फिरून १९३१-३४ या सालीं या डॉ. अॅरंडेल यांचेबरोबर युरोप व अमेरिका या देशांत प्रवासास गेल्या. त्या वेळीं यांनीं 'आर्यांची प्राचीन राहणी' व 'ललितकलांचें व्यक्तिगत, राष्ट्रीय व जागतिक जीवनांतील स्थान' यांबद्दल व्याख्यानें दिलीं व तीं तिकडील लोकांना अतिशय आवडलीं. स. १९२६-२८ सालीं डॉ. अॅरंडेल हे ऑस्ट्रेलिया देशांत तेथील थिऑसाफीचे जनरल सेक्रेटरीचें काम करीत असतांना, तिकडे या शहरीं यांचा व साभिनय नृत्यकलेंतील (Ballet) प्रावीण्याबद्दल जगद्विख्यात असलेल्या मॅडम पाव्हलोव्हा यांचा परिचय झाला व त्यांचेकडून यांनीं तद्विषयक शास्त्रीय माहिती संपादन करून अभ्यासहि केला. त्यानंतर १९३५ मध्यें हिंदुस्थानांत आल्यावर यांनीं दक्षिण हिंदुस्थानांत 'भारतनाट्य' या संज्ञेनें प्रसिद्ध असलेल्या नृत्यकलेच्या अभ्यासास सुरुवात केली; व त्याकरितां त्या बाजूचे सुप्रसिद्ध भारत-नाट्य-विद्वान् व कलाविशारद श्री. मीनाक्षीसुंदरम् पिल्ले व ब्रह्मश्री पापनाशम् शिवन् यांचे हाताखालीं सशास्त्र अध्ययन व अभ्यास केला. त्याच सालीं डिसें. १९३५ मध्यें अड्यार येथें थिऑसाफिकल सोसा.च्या हीरक-महोत्सवानिमित्त भरलेल्या राष्ट्रीय परिषदेंत यांनीं नृत्यकलेचा पहिला प्रयोग केला. तो लोकांना, कलाभिज्ञांना व सुशिक्षित मंडळींना फारच आवडला. त्या प्रसंगीं मद्रास शहरांतीलहि बरीच कलाभिज्ञ मंडळी हजर होती. वर्तमानपत्रांतूनहि यासंबंधीं उत्तम अभिप्राय आले. संगीत व नृत्य या कला खरोखर दैवी स्फूर्तीच्या असून, हीनवृत्तीच्या लोकांचे हातांत पडल्यामुळें त्यांचा अपकर्ष झाला आहे, त्यांना अध्यात्माच्या भूमिकेवर उभें करून पूर्वीच्या थोरवीच्या स्थानावर नेणें हें हिंदवासीयांचें आणि विशेषतः कुलीन स्त्रियांचें आद्यकर्तव्य आहे, अशा पवित्र भावनेनें त्यानंतर चिदंबरम् येथील नटराजांचे देवालयांत जाऊन यांनीं तेथें त्या कलेचा प्रयोग केला व आपली कला नटराजांचे चरणीं अर्पण केली. या वेळीं चिदंबरम् गांवांतील लोकांचा खूप समुदाय जमला होता. तेव्हांपासून या आपल्या प्रयोगाचे प्रसंगीं समोर नटराजांची मूर्ति ठेवून प्रयोग करतात. या नृत्यकलेचे प्रयोग यानंतर यांनीं हिंदुस्थानांत मुंबई, हैदराबाद (द.), कराची, इंदूर, बिकानेर, दिल्ली व बनारस वगैरे शहरीं अनेक वेळां केले आहेत. या कलेच्या अध्ययन व अध्यापनाकरितां यांनीं मद्रास, अड्यार, येथें 'कलाक्षेत्र' या नांवाची आंतरराष्ट्रीय संस्था काढली आहे; व चारपांच विद्यार्थिनींहि तयार केल्या आहेत. याच संस्थेंत चित्रकला, वीणकाम वगैरेहि कलांच्या अभ्यासाची सोय केली आहे. यांचे मतानें कलेचा अभ्यास हा मनुष्याचे शिक्षणास व शीलसंवर्धनास अत्यंत साहाय्यक आहे. यामुळें हल्लींच्या जगांतील सुप्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ मॅडम मॉंटसुरी (ज्यांचा हल्ली मुक्काम अड्यार मद्रासला आहे,) या बाईशीं या सहकार्य करीत असतात.

थिऑसाफिकल सोसायटीचे विद्यमानें ब्लॅव्हॅट्स्की

बाईनीं १८७५ सालीं अध्यात्माची मांडणी सुरू केली. त्यांनीं प्रथम धर्म, भौतिकशास्त्रें व तत्त्वज्ञान या तिहींचे समन्वयाची दिशा दाखविली. बेझंबाईनीं त्याच अध्यात्माचे भूमिकेवरून अनेक धर्मांचा समन्वय दाखवून पुनः व्यवहारांतील राजकारण व समाजरचना यांची पुनर्घटना कशी करतां येईल याची दिशा दाखविली. मि. लेडबीटर यांनीं त्याच भूमिकेवरून भौतिकशास्त्रांचें व विशेषतः मानसशास्त्राचें संशोधन केलें. श्रीकृष्णमूर्ति हे अध्यात्मांतील व विशेषतः मानवजीवनांतील नित्य सत्तत्त्वांच्यावर भर देत आहेत. याप्रमाणें सोसायटीचे इतिहासांत अध्यात्माची चार तऱ्हांनीं मांडणी झाल्यावर यांची ही पांचवी मांडणी आहे. सौंदर्य व ललितकला यांचें दैवी उगमस्थान ओळखून व्यक्तिगत व सामाजिक जीवनांत, आध्यात्मिक दृष्टीनें, यांचें काय स्थान आहे हें दाखविणें हें यांचें जीवनकार्य होय. यांनाहि योगदीक्षा प्राप्त झालेली आहे (वा. ल. चिपळूणकर).

ॲर्नाल्ड, सर एडविन—(जन्म स. १८३२–मृत्यु स. १९०४) सुप्रसिद्ध इंग्रजी लेखक, कवि व पौर्वात्य लोकांचे मित्र असणारे युरोपियन गृहस्थ.

हे एम्. ए. झाल्यानंतर पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून यांची नेमणूक झाली (१८५६–६१). या वेळीं बाह्य व अंतर्गत अशा दोन्ही दृष्टींनीं हिंदुस्थानचें परिशीलन करण्याची यांना संधि मिळाली.

याच वेळीं यांना बॉंबे युनिव्हर्सिटीनें आपले फेलो नेमिलें. तेव्हां यांनीं फार्शी–तुर्की वगैरे पौर्वात्य भाषांच्या अध्ययनास सुरुवात केली.

याच वेळीं यांनीं हितोपदेशाचें इंग्रजी भाषान्तर प्रसिद्ध केलें. तसेंच हिंदुस्थानांतील शिक्षणावरील–पूर्वेकडील ज्ञानाला पाश्चिमात्य ज्ञानाचे पैलू पाडण्याची आवश्यकता प्रतिपादणारी–एक पुस्तिका यांनीं प्रसिद्ध केली (१८६०). डलहौसीच्या कारकीर्दीचा एक सुसंबद्ध इतिहास यांनीं याच वेळीं लिहिला.

स. १८६१ मध्यें हे इंग्लंडला परतल्यावर 'डेली टेलिग्राफ'मध्यें लिहूं लागले. व पुढें त्या पत्राचे प्रमुख संपादक झाले (१८७३).

या सर्व काळांत पौर्वात्य लोकांचें आयुष्य व विचारसरणी यांतील रसग्रहण हा आपल्या आयुष्याचा ध्रुवतारा मात्र यांनीं कधींहि दृष्टिआड होऊं दिला नाहीं.

नंतर यांनीं आपलें 'दि लाइट ऑफ एशिया' हें बुद्धाविषयींचें जगप्रसिद्ध पुस्तक प्रसिद्ध केलें (१८७९). त्याच्या इंग्लंडांत साठ व अमेरिकेंत ऐंशी आवृत्त्या निघाल्या. त्याप्रमाणेंच यांचें 'दि लाइट ऑफ दि वर्ल्ड' हें ख्रिस्ताबद्दलचें पुस्तकसुद्धां फार प्रसिद्ध आहे (१८९१).

पुढें हे आपल्या मुलीसह पॅसिफिक किनारा व जपान वगैरेच्या प्रवासास निघाले. जपानी जीवनक्रम व कलादृष्टि यांमुळें हे फारच आकृष्ट झाले आणि हे पुनः एकदां जपानची सफर करून आले. जपानी आयुष्यासंबंधीं यांनीं लिहिलेला ग्रंथ सहिष्णु आणि आशावादी आहे. यांची तिसरी बायको जपानी होती.

हे 'डेली टेलिग्राफ' पत्राचे संपादक असतांना 'न्यूयॉर्क हेरल्ड'च्या सहकार्यानें यांनीं एच्. एफ्. स्टॅन्ले यांना कांगो प्रदेशाचें संशोधन करण्याकरितां आफ्रिकेंत पाठविलें होतें.

सबंध आफ्रिकेचा प्रवास करण्याकरितां एक अखंड मार्ग शोधून काढण्याच्या कल्पनेचें जनकत्वसुद्धां यांनाच दिलें पाहिजे.

सर्व जगांतील मोठमोठ्या कलात्मक व धार्मिक संस्कृतीच्या आकांक्षांचा समतोल अभ्यास करण्याचें यांचें सामर्थ्य केवळ अतुलनीय आहे. मुहम्मद, बुद्ध व ख्रिस्त या सर्वांच्या तत्त्वज्ञानाचा यांनीं अत्यंत तन्मयतेनें व हृदयाला जाऊन भिडणाऱ्या सहानुभूतीनें विचार केला आहे. त्यामुळें पश्चिम व पूर्व यांचा वैरभाव नष्ट करण्याच्या दृष्टीनें यांचें कार्य महत्त्वाचें आहे. पौर्वात्य लोकांनीं आपले जुने आचारविचार न सोडतां पाश्चिमात्य ज्ञानाचें स्वागत करावें असा यांच्या विचाराचा कटाक्ष असे.

यांचे ग्रंथः—(1) Pearls of the Faith, (2) With Sádi in the Garden, (3) The Secret of Death and other Poems, (4) The Song Celestial or Bhagawad Gita, (5) Poets of Greece, (6) Indian Idyls, (7) Lotus and Jewel, (8) Tenth Muse and other Poems, (9) Adzuma or the Japanese Wife, (10) Potephar's Wife and other Poems, (11) In My Lady's Praise, (12) Indian Poetry, (13) The Voyage of Ithobal, (14) Wandering Words, (15) Japonica, (16) Seas and Lands, (17) East and West, (18) India Revisited, (19) In Tent and Bangalow, (20) The Queen's Justice, etc.

अलादियाखाँ—(जन्म स. १८६० सुमार).

सुप्रसिद्ध गायक. यांचे अडीचशें वर्षांपूर्वीचे पूर्वज शांडिल्यगोत्री ब्राह्मण होते. परंतु अन्नदात्याबरील संकट टाळण्याचे कारवाईंत जबरीनें त्यांचें धर्मान्तर झालें. यांच्या गायकीप्रमाणेंच यांच्या आचारविचारांतसुद्धां मुसलमान गवयांत सहसा दिसून न येणारा असा गंभीर प्रतिष्ठितपणा आहे.

ओतप्रोत विद्या असूनहि वल्गना नाहीं, असामान्य कर्तबगारी असूनहि इतरांच्या अल्प कर्तबगारीला उत्तेजन देण्याची वृत्ति, कोणाची स्तुति नाहीं, निंदा तर नाहींच नाहीं. घराण्याच्या विद्येची यत्किंचित्हि अप्रतिष्ठा होऊं न देण्याचा पराकाष्ठेचा कटाक्ष, पूर्णपणें निर्व्यसनीपणा इत्यादि गुणांमुळें आज अर्धशतकभर गायकसम्राट् व चारित्र्यसम्राट् अशी यांनीं कीर्ति संपादन केली आहे.

यांच्या गायनाचें बाह्यांगवर्णन करावयाचें म्हणजे गायनाच्या वेळची यांची आसन ब मुद्रा सांगावयाची. गातांना यांची मुद्रा कधींहि विकृत होत नाहीं. यांच्या गायकींतील विलक्षण बिकट प्रकार पाहिले म्हणजे यांच्या अडळ व शुद्ध मुद्रेचें नवल वाटतें. तसेंच यांचे हातवारे, तानेची किंवा आलापांची मोडणी व लयीबरोबर होणाऱ्या बोलांच्या लीला श्रोत्यांना अधिक स्पष्टपणें बेशद व्हाव्यात याकरितां असतात. बहुतेक गवयांचे हातवारे प्रयासाचे द्योतक असतात, तर यांचे हातवारे कलेची मांडणी दाखविणारे असतात.

यांचा आवाज रुंद व बसकट म्हणजे सर्वसामान्य नादलुब्धांना झुलविण्याची शक्ति नसलेला आहे. इतकें असूनहि मुष्कील रागांत, मुष्कील फिरत करणारा, अत्यंत कमी लयींत दोन दोन आवर्तनें फिरून यत्किंचित्हि मुद्रा किंवा आसनभंग न करितां अत्यंत सहजपणें समेचा व चिजेच्या तोंडाचा सुंदर संगम साधणारा गायक महाराष्ट्रांत यांच्याशिवाय दुसरा कोणीहि नाहीं.

यांच्या गायकीचें स्थूल स्वरूप असें दिसतें कीं, बहुत करून हे अप्रसिद्ध व मुष्कील राग गातात. कोणतीहि चीज हे इतक्या संथपणें सुरू करतात कीं कोणत्या सुरावरून हे कोणत्या सुरावर गेले हें तज्ज्ञांच्या सहज लक्षांत येतें. पण एकदां पुढें कामगत सुरू झाली कीं, तानेंतील कौशल्याकडे लक्ष वेधतें आणि पूर्वीचें अवधान सर्व उडून जातें आणि जागरूक श्रोताहि कोरडाच राहतो. एक रागिणी संपून नवी सुरू झाली म्हणजे जुन्या चीजेची रूपरेषा पार पुसून जाते. श्रोत्यांना हे आपल्या गायकीच्या झोतांत ओढून नेतात. विचार किंवा संग्रह याला श्रोता पारखा होतो; आणि हें सर्व फिरत कामांत व्हावयाचें. कोणी वढत व कोणी फिरत करून राग वर्तवणारे असे गवयांत दोन प्रकार असतात, त्यांत बिकट फिरतींत सफाईनें राग वर्तवणें हें यांचें वैशिष्ट्य आहे.

तसेंच यांचें गायन सतत-प्रवाही आहे. स्वर, ताल किंवा अलंकार साधण्याकरितां यांना मुद्दाम मुक्काम करण्याचें किंवा रेंगाळण्याचें कामच पडत नाहीं. कुशल मोडी लेखकाचा टाक एकदां कागदाला लागला म्हणजे हात न उचलतां तो वाक्य संपवितो, तीच गोष्ट यांच्या विस्तारकौशल्याची आहे. कल्पनेंत येईल तें कंठांत उमटविण्याची शक्ति यांच्यांत आहे. यांची कल्पकताहि अचाट असल्यानें यांचें गायन अश्रुतपूर्व होतें.

तसेंच यांचें गायन एकजात भरदार असतें. त्यांत कृत्रिमपणा बिलकुल नसतो. तार-सप्तकांतील स्वरसुद्धां तितक्याच खुल्या आवाजानें लावावयाचे. आक्रोश, किंचाळणें वगैरे प्रकार कोठेंहि आढळत नाहींत. तानेंत आघात दिसतात ते तानेची विशिष्ट आकृति श्रोत्यांना नीट आकलन व्हावी म्हणून असतात. तसेंच रागाचें स्वरूप तयारीच्या बिकट फिरतींतहि अत्यंत कसोशीनें संभाळणारा गायक यांच्याशिवाय जवळजवळ नाहींच. कोणताहि मुष्कील राग हे सहज गातात. त्याची मांडणी स्पष्ट करतात. दीर्घकाल शिक्षणावांचून यांची गायकी हस्तगत होणें अशक्य आहे.

हे मुंबई, पुणें वगैरे ठिकाणीं हिंडून शेवटीं कै. शाहू-महाराजांच्या वेळेपासून कोल्हापूर सरकारचे आश्रित आहेत.

यांच्या शिष्यांत कै. भास्करबुवा बखले, यांचे पुत्र मरहूम मंजीखा, मल्लिकार्जुन, मन्सूर, नथ्थनखा, श्री. शंकरराव सरनाईक, निवृत्तिबुवा सरनाईक, गोविंदराव टेंबे व बुर्जीखां (पुत्र) हे असून श्रेष्ठ गायिका केसरबाई केरकर व मोगूबाई कुरडीकर ही मंडळी नांव गाजवीत आहेत. श्री. शंकरराव सरनाईक यांनीं यांचा गंडा दहा हजार रुपये देऊन बांधला. पण निवृत्तिबुवा मात्र यांचें गाणें गातात.

कोल्हापूरच्या महाराणीसाहेबांचे अध्यक्षतेखालीं यांचा सत्कार होऊन कोल्हापुरास यांना मोठ्या समारंभानें एक हजार रुपयांची थैली अर्पण करण्यांत आली.

अलीनगरचा फकीर—(जन्म स. १८८० सुमार) वायव्य सरहद्दीवरील रॉबिनहुड म्हणून याची प्रसिद्धि आहे. हा काळा कां गोरा हें अद्यापि ब्रिटिश हेरांना माहित झालें नाहीं. पण गेलीं तीस वर्षें याचा उपद्रव ब्रिटिशांना होत आहे. हा सहा फुटांहून अधिक उंच असून याचा वेष म्हणजे उंटाच्या केसाचा एक सॅश, टोगा व बकऱ्याच्या कातड्याचें जीन हा असतो. याच्या सैनिकांचा हाच गणवेष आहे.

खैबर खिंडीतील एका उंटहाक्याचा हा पोरगा आहे. हा पेशावरच्या बाजारांत प्रथम हमालाचें काम करीत असे. नंतर पर्वतावर जाऊन धनगर बनण्याचें यानें ठरविलें व सुलेमान पर्वतावर जाऊन तेथें एका गुहेंत हा राहूं लागला. आणि यानें बुवाबाजीस आरंभ केला. केवळ याच्या हस्तस्पर्शानें रोग बरे होतात अशी याची ख्याति झाली. धर्मभोळे टोळीवाले याचे परमभक्त बनले. मेंढ्याचीं कातडीं पांघरावींत व ब्लँकेटाऐवजीं गवताचा उपयोग करावा असा तेथील खाक्या होता.

शिष्यशाखा भरपूर व लांबपर्यंत वाढली. प्रवचनांचें धार्मिक स्वरूप राजकारणांत रूपांतरित झालें आणि महत्त्वाकांक्षाहि जागृत झाली.

शिष्यांना बंदूक चालविण्यास शिकवून डोंगराळ प्रदेशांतील युद्धतंत्रांत यांनीं तरबेज केलें. यांनीं आपल्या अनुयायांस बंदुका पुरविल्या. त्यांपैकीं कांहीं रशियन होत्या व कांहीं काबूलच्या कारखान्यांत तयार झालेल्या होत्या.

पेशावरला असतां ब्रिटिश लष्कराशीं संबंध आला असतां जेवढें लष्करी शिक्षण यांना मिळालें तेवढेंच. पण तेवढ्या जोरावर यांनीं इतर टोळीवाल्यांतहि प्रमुखत्व मिळविलें. एवढेंच नव्हे, तर ब्रिटिश लष्कराशीं कटकटी करून त्यांनाहि हैराण केलें. जाळपोळ, रक्तपात याला तर सीमा राहिली नाहीं.

हा ब्रिटिशांच्या मुलखांत कहर करीत असला तरी व्यक्तिशः मोठा दयाळु आहे. दारू नाहीं, धूम्रपान व जुव्वा खेळणारेहि याला सहन होत नाहींत (केसरी १३ फेब्रु. ४०).

अली हाजी—(जन्म स. १८९७ सुमार) एक साधु म्हणून मानला जाणारा बंडखोर पठाण. हाच 'इप्पीचा फकीर' या नांवानें प्रसिद्ध आहे. याच्या पित्याचें नांव मुल्ला अर्सलाखान. हा मूळचा बन्नू जिल्ह्यांतील खजूरी गांवचा होय. हा आपल्या शेर झमान नामक भावाबरोबर इप्पी (मिराली तहशील, उत्तर वझिरीस्तान) या गांवीं मुल्ला अलमखान याकडे धार्मिक शिक्षण घेण्याकरितां गेला (१९२०). तेथें शिक्षण घेतल्यावर याची धार्मिक म्हणून प्रसिद्धि झाली. आणि तेथील 'दवार' व 'तोरी खेल' जमातींकडून याला विशेष आदर दाखविला जाऊं लागला. 'शुकराना' नांवाची यानें एक मोठी धार्मिक देणगी नाकारली, तेव्हांपासून तर याची मान्यता फारच वाढत चालली. विरक्तपणा, सेवा आणि लढाऊ बाणा यांमुळें याची योग्यता वाढत जाऊन 'लढवय्या साधु' व 'इप्पीचा फकीर' अशा नांवानें आज याला लोक ओळखतात.

स. १९३६ पर्यंत हा कोणत्याहि राजकारणांत पडला नव्हता. पण 'इस्लाम बिबी' नांवानें प्रसिद्ध असलेल्या बन्नू येथील खटल्यामुळें याचें पित्त भडकलें. हिंदूची पळवून नेलेली व निक्का लावलेली स्त्री परत हिंदु होते किंवा नाहीं, आणि आपल्या घरीं जाऊन राहूं शकते किंवा नाहीं, असा या खटल्यांत मुद्दा होता. मुसलमान धर्माप्रमाणें ती परत जाऊं शकत नाहीं, असें या लोकांचें म्हणणें होतें. यामुळें तिकडच्या सर्व जिल्ह्यांत तीव्र जातीय असंतोष माजला. यानें त्या चळवळींत पुढाकार घेतला आणि शेवटीं ब्रिटिशांचें शत्रुत्व पत्करण्याचेंहि यानें ठरविलें. आणि सैन्य घेऊन हा जवळच्या दरींत येऊन राहिला.

तेथील अधिकाऱ्यानें या खटल्याबाबत समजुतीचें बोलणें केलें व कांहीं मुल्लांना खटल्याचे वेळीं कोर्टात हजर राहण्याची सवलत दिली. पण यानें लाहोरची शहीदगंज मशीद मुसलमानांना परत देणें, वरील खटल्याचा निकाल मुसलमानांच्या बाजूनें देणें आणि धार्मिक प्रश्नांत सरकारनें हात न घालणें अशा तीन अटी घातल्या व या अटी पुऱ्या होत नाहींत तोंपर्यंत सैन्य मागें घेतलें जाणार नाहीं असें यानें ठरविलें.

तेव्हां सरकारनेंहि सूचना देऊन याचें व याच्या दोन सहकाऱ्यांचीं घरें उध्वस्त केलीं. आणि सैन्याची हालचाल सुरू केली. तेव्हां याचें सैन्य निघून गेलें. पण 'इस्लाम बिबी' खटल्यांतील मुलगी तिच्या पालकाच्या ताब्यांत देण्याच्या वेळीं यानें पुनः उठाव केला. तेव्हां लष्कर व विमानें यांच्या जोरावर याच्या तुकडीला शरण आणावें लागलें. पुनः स. १९३७

सालींहि यानें ब्रि. सरकारला हात दाखविण्याचें ठरवून सर्व टोळ्यांना उठावणी दिली आणि दंगल सुरू केली. हल्ले, तारा तोडणें वगैरे प्रकार सुरू झाले. पण ब्रिटिशांच्या प्रचंड सामर्थ्यापुढें याला व याच्या अनुयायांना डोंगरांत अदृश्य व्हावें लागलें. विमानांनीं केलेल्या बाँब-वर्षावामुळें याची दाणादाण उडाली.

हा खंदा घोडेस्वार व पट्टीचा निशाणबाज आहे. वाचाप्रमाणें याच्या भराऱ्या चालू असतात. रंगलेले लाल केस, फुगीर अंगरखा व पोत्यासारखी पायघोळ विजार अशा वर्णनाची ही व्यक्ति आहे, असें कांहीं म्हणतात. कांहींच्या मतें हा एक रोगी मनुष्य आहे. ब्रिटिशांच्या हेरखात्याला याचा अद्याप नीट पत्ता नाहीं असें कांहीं म्हणतात. हा अदृश्य होतो, आकाशांत उडतो वगैरे पठाणांच्या याच्याबद्दल कल्पना आहेत (अमृतबझारपत्रिका १$\frac{3}{5}$$\frac{0}{6}$, केसरी १३$\frac{2}{8}$).

अल्लाबक्ष—(जन्म स. १९००–खून स. १९४३). राष्ट्रीय सभेच्या अनुयायांपैकीं सिंध प्रांताचे पुढारी व मुख्य प्रधान.

जिनांच्या पाकिस्तानी कल्पनेचा प्रचार व प्रसार जारीनें सुरू झाल्यापासून खुद्द मुसलमानांतच ज्या कांहीं व्यक्ति त्या कल्पनेला विरोध करीत असत त्यांपैकीं सिंध प्रांताचे कांहीं काळाचे मुख्य प्रधान असणारे हे एक होते.

हे सिंधमधील शिकारपूर या गांवाचे एक मोठे जमीनदार असून यांचें आपल्या भागांत अतिशय वजन असे. सिंधु नदीच्या पुरामुळें झालेल्या नुकसानीच्या काळात पैशाचे व श्रमाचेबद्दल फिकीर न करतां आपल्या देशबांधवांची सेवा यांनीं अनेक वेळां केली होती. म्हणूनें लोकांचा यांचेवर अतोनात विश्वास असे. येवढेच नव्हे तर साऱ्या सिंध प्रांताच्या आर्थिक परिस्थितीचा यांचा अभ्यास अतिशय सखोल असल्यामुळें सिंध स्वतंत्र झाल्यावर त्या प्रांताच्या राजकारणांत यांना फार महत्त्व प्राप्त झालें होतें. आपल्या प्रांताची आर्थिक परिस्थिति, ती सुधारण्याचे उपाय यांवरील एक अधिकारी व्यक्ति म्हणून यांचा नेहमीं उल्लेख होत असे. कांचो शहराच्या पाणी पुरवठ्याबाबत यांनीं केलेली योजना मध्यवर्ती सरकारला इतकी पटली होती कीं, सदर ती योजना हातीं घेण्यासाठीं सरकारनें बरीच मोठी रक्कम यांचे हवालीं केली होती. यावरून हें सिद्ध होतें कीं केवळ एक मुसलमान धनाढ्य जमीनदार म्हणून हे मुख्य प्रधानपदावर आले नव्हते तर केवळ आपल्या लायकीच्या जोरावर आले होते.

मुख्य प्रधान होतांच यांचेपुढें एक कटु कर्तव्य उभें राहिलें होतें. तें कर्तव्य म्हणजे हूरांच्या बंडाचा निःपात होय. तें पार पाडतांना प्रसंगीं यांनीं जी न्यायनिष्ठुरता दाखवली होती तिच्यामुळें यांना आपल्या अनेक ज्ञाति-बांधवांचा कोप आपणावर ओढवून घ्यावा लागला होता.

युद्ध सुरू झाल्यावर सात प्रांतांतील काँग्रेस मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिल्यामुळें त्या त्या प्रांताचा कारभार गव्हर्नरांनीं आपल्या ताब्यांत घेतलाच होता. पण जेथें प्रत्यक्ष लोकनियुक्त मंत्री काम करीत होते त्यांच्या अधिकारावरहि बरीच कात्री लावण्यांत येऊं लागल्याची ते ते मंत्री तक्रार करूं लागले. गव्हर्नरांच्या या वागणुकीमुळें चिडून जाऊन यांनीं आपल्या पदव्या सरकारला परत केल्या व सरकारचा निषेध केला. या यांच्या कृत्यामुळें आपल्या मंत्र्यावर आपला यापुढें विश्वास नाहीं, या सबबीवर सिंधच्या गव्हर्नरांनीं यांना मुख्य प्रधानकीचा राजीनामा देणें भाग पाडलें.

राजीनाम्यानंतर हे शिकारपूर या गांवीं येऊन राहूं लागले. तेथेंच यांचा ता. १४ मे १९४३ रोजी खून करण्यांत आला.

यांच्या खुनाच्या मुळाशीं खासगी स्पर्धा होती किंवा इतर कांहीं कारण होते त्याचा अद्यापि निर्णय लागला नाहीं.

अल्लामा मश्रीकी—(जन्म स. १८८८) मुसलमानांचे पुढारी व खाकसार चळवळीचे जनक. यांचें नांव इनायतुल्ला. पण 'प्राच्य-पंडित' अशा अर्थाच्या 'अल्लामा मश्रीकी' या नांवानें हे प्रसिद्ध आहेत.

हे पंजाबचे एम्. ए., केम्ब्रिजचे बी. एससी., रँग्लर, सन्मान्य ट्रॉयपास मिळविलेले व मास्टर ऑफ ओरिएंटल लार्निंग ही केंब्रिजची परीक्षाहि उत्तीर्ण झालेले आहेत. गणिती व भाषाशास्त्री असे दुहेरी पंडित म्हणून यांची ख्याति आहे. म्हणूनच पेशावरच्या इस्लामिया कॉलेजचे प्रिन्सिपल व हिंदुस्थान सरकारच्या शिक्षणखात्याचे दुय्यम सेक्रेटरीच्या जागेपर्यंत हे चढले. पण यांची तळमळ वेगळीच असल्यानें यांना हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागेवर लोटण्यांत आलें. तेव्हां यांनीं सरकारी नोकरी सोडून सरहद्द प्रांत सोडला आणि पंजाबांत वास्तव्य केलें आणि १९३१ त आपली खाक-

सार चळवळ सुरू केली. खाकसारांचे हे आद्यसंस्थापक म्हणून यांना 'बानी' असें म्हणतात.

यांनीं 'तज्करा' या ग्रंथांत कुराणावर टीका लिहिली असून कुराणाचें तत्त्वज्ञान अगदीं नव्या दृष्टिकोनानें यांत परीक्षिलें आहे. इजिप्त, इराक, इराण, तुर्कस्थान व मोरक्को इत्यादि सर्व ठिकाणीं या ग्रंथाची स्तुति झाली आहे. १९२५ मध्यें सर अफ्-ताब मुहम्मद यांनीं हा ग्रंथ 'नोबल प्राइझ' कमेटीला सादर केला. परंतु उर्दू ही मान्यता पावलेली भाषा नसल्यानें एखाद्या युरोपीय भाषेंत भाषांतर करण्याची यांना विनंती करण्यांत आली. यांनीं ही गोष्ट नाकारल्यानें केंब्रिजचे प्रो. निकोल्सन यांनीं भाषांतराचें काम केलें; परंतु शेवटीं "मला काय म्हणावयाचें तें यांत आलें नाहीं" अशी तक्रार यांनीं केल्यानें यांचें हें काम तसेंच राहिलें. या ग्रंथानें यांची विद्वत्ता लोकांचे निदर्शनास आली व धार्मिक मुसलमानांतील यांची प्रतिष्ठा तर फारच वाढली.

'तज्करात' या ग्रंथाला मिळालेल्या अपूर्व यशानें उत्तेजित होऊन १९३१ त यांनीं 'इष्करात' हा आपला दुसरा ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथांतसुद्धां कुराणाकडे आपल्या एका विशिष्ट दृष्टिकोनांतून यांनीं बघितलें आहे. या पुस्तकांत हिटलरच्या 'माझ्या लढ्यां'तील कांहीं भागांचा अनुवाद देण्यांत आलेला आहे. 'माझ्या लढ्यां'त हिटलरनें प्रस्तुत केलेल्या कल्पना त्याचे आधीं आपण आपल्या 'तज्करात'मध्यें मांडल्या होत्या असें यांत यांनीं दाखविलें आहे. यांच्या मताप्रमाणें 'तज्करात' व 'इष्करात' या दोन ग्रंथांत यांनीं मांडलेल्या कल्पनांत नवीन असें कांहींच नाहीं. यांनीं फक्त कुराणांतील कल्पनांना नवीन काळाचा नवीन साज चढविला आहे इतकेंच.

खाकसार चळवळीकरितां यांनीं निवडलेला काळ व सुरवातीला योजलेलें धोरण हें नाझी चळवळीच्या तत्सम धोरणाशीं जुळणारें आहे.

खाकसार चळवळीचे सुरवातीला यांनीं काँग्रेसवर हल्ला सुरू केला. मात्र मुस्लीम लीगप्रमाणें 'हिंदूंचें हित संरक्षण करणारी संस्था' हा यांचा काँग्रेसवर आरोप नव्हता, तर काँग्रेसनें उपयोजिलेलें तत्त्वज्ञान हें हिंदु तत्त्वज्ञान आहे अशी यांनीं ओरड चालवली आणि अपेक्षेप्रमाणें हजारों मुसलमान तरुण यांचे छत्राखालीं जमूं लागले. कारण मुसलमान तरुण धर्माचे बाबतींत फारच भावनाप्रधान असतात, हें यांना अनुभवावरून माहीत होतें.

याचेच पुढें जाऊन आपल्या चळवळींत येणाऱ्या लोकांना यांनीं दर्जा, मिलटरी परेड, देवावरील श्रद्धा, जमावांतील प्रार्थना, या गोष्टी आवश्यक ठरविल्या. त्यामुळें मुसलमान तरुणांच्या तर यांचेवर नुसत्या उड्या पडल्या.

यांतच यांनीं केलेल्या 'सर्वसंगपरित्यागा'ची भर पडली. एवढा विद्वान् मनुष्य आपली सर्व मिळकत दूर फेंकून एखाद्या फकीराप्रमाणें राहतो ही एकच गोष्ट लोकांचे गळ्यांतील हे लाल होऊन राहण्यास पुरेशी होती.

खाकसार चळवळ ही एकचालकानुवर्तित्व मानणारी संस्था आहे. परंतु हा बंधुभाव, प्रेम व स्वातंत्र्य या भावनांनी प्रत्येकानें आपणहून आपणावर लादून घेतलेलें आहे.

या चळवळींत 'जनबाझ' या नांवाचें वाटेल त्या वेळीं आपला प्राण अर्पण करण्यास तयार असणाऱ्या लोकांचें एक स्वतंत्र दल असतें. यांची संख्या १३००० असून खाकसार व सरकार यांचे लढ्यांत यांनीं अत्यंत महत्त्वाचा भाग घेतलेला आहे. हे लोक पाहून आपणांस 'आयर्न गार्डस्'चीच आठवण व्हावी इतकें यांच्या कार्याचें महत्त्व आहे.

एकंदरींत पाहतां खाकसार-चळवळीची मांडणी अशाच पद्धतीनें करण्यांत आली आहे कीं, मुख्य मनुष्याच्या हुकुमाच्या उच्चाराबरोबर तें कार्य व्हावें.

खाकसारांचें स्वतःचें कोर्ट आहे आणि चाबूक हें या कोर्टाचें हत्यार आहे. या कोर्टाच्या हुकुमाप्रमाणें चाबकाची शिक्षा आरोपीला भरचौकांत दिल्याचीं उदाहरणें घडलेलीं आहेत.

शारीरिकदृष्ट्या असजारा कमकुवतपणा नाहींसा करण्याचा 'मिलटरी-परेड' हाच एक मार्ग यांनीं सुचविला आहे. या कवाइती, लोकांच्या उद्योगधंद्यांत येऊं नयेत म्हणून रात्रीच्या वेळीं घेण्यांत येतात.

'फावडें' (बेलचा) हें खाकसारांचें बोधचिन्ह आहे. कष्ट करणाऱ्या खालच्या वर्गाशीं आपले असणारे संबंध या बोधचिन्हानें दाखवले जातात, असें यांचें म्हणणें आहे. स्वतः पैगंबर मुहम्मदानें या फावड्याचा पुरस्कार केला आहे, असें यांचें म्हणणें आहे. त्याचप्रमाणें सर्व खाकसारांत बंधुभाव राहण्यास या फावड्याची मदत होते, असा यांचा दावा आहे.

मुहंमद पैगंबर व देव यांचे सैनिक होणें हें खाकसारांचें प्रधान ध्येय आहे. लष्करी शक्तीची उभारणी, खोट्या लढाया, या सगळ्या गोष्टी आपल्या भूतकाळाशीं शक्य तितकें जवळ जाण्याच्या आंतरिक इच्छेंतून उत्पन्न झालेल्या आहेत. लष्करी शिक्षण हें प्रत्येक खाकसाराचे मनावर बिंबविण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यांत येतो. यांचीं प्रत्येक हालचाल व धोरण हीं लढाऊ धोरणांतून उत्पन्न झालेलीं असतात. युद्धाचे नियम, लढाईकरतां लागणारी शक्ति व शिस्तीचे कठोर धडे ह्या गोष्टी प्रत्येक खाकसाराचे रोमांरोमांतून भिनलेल्या असाव्यात असा यांचा कटाक्ष आहे. हडेलहप्पी करणारा शिपाई हें खाकसाराचें खरें वर्णन नसून प्रसंग आला असतां राज्य चालवूं शकणारा मुत्सद्दी शिपाई हे शब्द खाकसाराला अधिक शोभून दिसतात.

लखनौच्या शिया-सुनी पंथीयांत 'मघे साहेबा' व 'तबारा' या प्रार्थनाप्रकारांबाबत खळबळ चालू होती. तेव्हां गोडीगुलाबींत ते आपलें मांडण थांबवींत नाहींत असें दिसतांच हे आपलें सैन्य घेऊन तेथें शिरले. परंतु यू. पी. गव्हर्नमेंटनें यांना अटक केली. तेव्हां 'सोडलें असतां परत लखनौमध्यें मी येणार नाहीं' अशा अटीवर यांना सोडून देण्यांत आलें. परंतु बाहेर आल्यावर 'आपण अशा कोणत्याहि प्रकारच्या माफीवर सुटलों नसून आपणास सरकारनें बिनशर्त सोडलें आहे' असें हे सांगूं लागले. व तसें 'अल् इस्लाह्' या आपल्या पक्षाच्या मुखपत्रांत यांनीं प्रसिद्ध केलें.

परंतु अशा वागण्यानें यांचें वजन जें कमी झालें तें भरून काढण्याकरतां १९३९ सालीं हे परत ससैन्य लखनौला गेले. परंतु परत यांना अटक करण्यांत आली. त्याबरोबर हजारों खाकसार निरनिराळ्या प्रांतांतून येऊं लागले. बऱ्याच खटक्यानंतर यांस अटक करण्यांत आली. अशा खटक्यांत हिंदान नदीवर झालेली चकमक विशेष गंभीर स्वरूपाची होती.

बॅ. जिनांनीं सरकार व हे यांमध्यें तडजोड करण्याचे प्रयत्न केले. परंतु जिनांची केवळ भेट घेण्याचेंहि यांनीं नाकारिलें.

कॉंग्रेस मंत्रीमंडळानें राजीनामा दिल्यावर नवीन झालेल्या मंत्रीमंडळानें यांना सोडून दिलें. परंतु नवीन झालेल्या सर सिकंदर हयातखानांच्या मंत्रीमंडळाशींहि यांचें विशेषसें सख्य नव्हतें. कारण सरकारची तळी तनमनधनानें उचलून धरणें ही गोष्ट सर सिकंदरांप्रमाणें यांना जमण्यासारखी नव्हती. याच कारणाकरितां पंजाब सरकारनें मिलटरी धर्तीवर चालणाऱ्या चळवळींवर निर्बंध घालतांच यांनीं आपल्या 'अल्-इस्लाह्' पत्रांतून जोराचा हल्ला केला व पंजाब सरकारशीं तंटा करण्याची आपल्या ३०००० अनुयायांना आज्ञा दिली.

थोड्याच दिवसांत हा प्रसंग येऊन ठेपला. आपल्या मिलटरी वेषांत ३१७ खाकसार पुढारी आपल्या सैन्यासह परेड करूं लागले. ही गोष्ट सरकारी हुकुमाचे विरुद्ध असल्यानें त्यांवर गोळीबार करण्यांत आला. त्यांत ३२ खाकसार ठार व १४ जखमी झाले.

ताबडतोब हे व ह्यांचे अनेक सहकारी यांना अटक करण्यांत आली. यांना वेलोर सेन्ट्रल जेलमध्यें नेण्यांत आलें. १९४४ च्या सुरुवातीपर्यंत हे या तुरुंगांतच होते. त्यानंतर मात्र यांना मद्रास प्रांतांत स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें.

या कृत्यानें सर सिकंदर यांचें मंत्रीमंडळ मात्र डगमगूं लागलें. मुस्लीम लीन व खाकसार यांमध्यें काडीइतकेंहि प्रेम नसतां बॅ. जिनांनीं मोठ्या हुषारीनें यांच्यावर करण्यांत आलेल्या अत्याचाराबाबत दुःख प्रदर्शित करून चौकशी कमेटी नेमण्याची विनंती केली. पण यांचा बाणा स्वतंत्र असल्यानें कोणापुढेंहि हे मान वाकविणारे नाहींत. यांच्या विचाराची दिशा स्वतंत्र असून कोणतीहि गोष्ट आपल्या संघटनेच्या जोरावर घडवून आणण्याची यांना हिंमत आहे. त्यामुळें यांचे बोलणें हुकमी चाललेलें असतें (अल्लामा मश्रीकी–लेखक हिरालाल शेठ).

अॅन्ड्रूज, दीनबंधु, चार्लस् फ्रीअर—(जन्म स. १८७१–मृत्यु स. १९४० एप्रिल ५).

हिंदुस्थानाशीं संबंध असलेले सुप्रसिद्ध ख्रिश्चन मिशनरी व रवीन्द्रनाथ टागोर यांनीं स्थापन केलेल्या विश्वभारती-विद्यालयांतील प्राध्यापक.

यांचें शिक्षण बर्मिंगहॅम व केम्ब्रिज येथें झालें, व तेथेंच हे फेलो व लेक्चरर होते (स. १८९९). त्यानंतर हे हिंदुस्थानांत येऊन दिल्लीच्या सेंट स्टिफन्स कॉलेजमध्यें प्रोफेसर झाले.

केम्ब्रिज युनिव्हर्सिटीच्या ब्रदरहूडचे सभासद, पंजाब युनिव्हर्सिटीतील फेलो व नंतर युनिव्हर्सिटी सिंडिकेटचे सभासद म्हणून यांनीं केलेली कामगिरी महत्त्वाची आहे (स. १९०४–१३). यानंतर मृत्यूपर्यंत हे विश्वभारती-मध्यें प्राध्यापक होते.

महात्मा गांधींशीं यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. आफ्रिका व चंपारण्य येथील चळवळींत (१९१७) यांनीं त्यांना सर्व प्रकारें मदत केली होती. आफ्रिकेंत म. गांधी वगैरे लोक पकडले तेव्हां ना. गोखले यांनीं यांना आफ्रिकेंत पाठविलें. त्यापूर्वी लाहोरच्या सभेंत यांनीं आपलें सर्व द्रव्य आफ्रिकेच्या लढ्यास दिलें होतें (१९१३). पंजाब प्रकरणाच्या वेळीं यांना हद्दपार करण्यांत आलें होतें (१९१९).

यांच्या रंजले-गांजलेल्यांना तत्परतेनें मदत करण्याच्या स्वभावामुळें यांना 'दीनबंधु' अशी पदवी लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें दिली होती.

यांनीं आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे. त्याचें नांव 'व्हॉट आय ओ टु ख्राइस्ट'. त्यांत यांनीं आपणास झालेला साक्षात्कार व आपला व हिंदुस्थानचा आलेला संबंध यांसंबंधी सविस्तर विवेचन केलेलें आहे.

वयाच्या तेहेतिसाव्या वर्षी यांच्या मनांत असाध्य रोग, मरणोन्मुखाचे अखेरचे शब्द व मरण यांसंबंधींचे विचार घोळत असत. तेव्हां यांना एकदां साक्षात्कार झाला व लिटल सेंट मेरी चर्चच्या उपाध्यायाच्या आकृतीचें दर्शन घडलें.

येशू ख्रिस्ताची इहलोकची यात्रा तेहेतिसाव्या वर्षीच संपली. ती गेल्यानंतर राहिलेलें पुढील कार्य आपणास करावयाचें आहे अशी यांची भावना केम्ब्रिज येथील डॉ. रायले यांच्या उपदेशानें झाली. तें कार्य आपण हिंदुस्थानांत करावें अशी प्रेरणा यांना झाली. त्याप्रमाणें हे हिंदुस्थानांत आले. हिंदुस्थानांत येतांच यांना आपला पुनर्जन्म झाल्याची खात्री पटली.

येशू ख्रिस्त हा देवाचा मुलगा आहे, स्वर्गाचें साम्राज्य त्याच्या हृदयांत असतें. तो जगावर सत्ता चालवितो, मनुष्यप्राणी हा त्याच्यापेक्षां अगदीं वेगळा आहे, आणि तो हीनदीन पापी आहे अशी एकंदर सर्वत्र समजूत असते. ईश्वराचा व मनुष्यप्राण्याचा कांहींहि संबंध नाहीं. ईश्वर म्हणजे एक अद्भुत किमया आहे अशी ईश्वरविषयक अगदीं परकेपणाची पाश्चिमात्य कल्पना यांना माहीत होती.

पण हिंदुस्थानांत यांना अगदीं उलट अनुभव आला. येथें प्रत्येकाची ईश्वर बाहेर दुसरीकडे नसून तो माझ्या हृदयांतच आहे अशी खात्री असल्याचा यांना प्रत्यय आला. 'दि किंगडम ऑफ हेवन इज विदिन यू' ईश्वर बाहेर कोठें नसून तो तुझ्या अन्तःकरणांतच आहे, ही ईश्वरविषयक भावना हिंदुस्थानांतील प्रत्येक माणसांत पूर्णपणें बाणलेली आहे. अत्यंत अडाणी व अशिक्षित असणाऱ्या खेडवळापासून तों मोठ्या तत्त्वज्ञापर्यंत या अद्वैत भावनेंत कोठेंहि फरक नाहीं. याच भावनेनें येथील लोक प्रत्येक व्यवहार करीत असतात. हें पाहून यांना अत्यंत चमत्कार वाटला. आपण आजपर्यंत अज्ञात पण ईश्वरमय अशा नव्याच जगांत प्रवेश करतों आहोंत असें यांना वाटलें आणि यांनीं हा आपला पुनर्जन्म झाला असें समजून आपणास द्विज म्हणवून घेतलें, आणि विचाराच्या दृष्टीनें अगदीं नव्या जगांत आल्याबद्दल यांना अत्यंत समाधान वाटलें.

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें अगदीं नव्या जगांत, हिंदुस्थानांत येऊन यांनीं प्रवेश केला तरी हे पक्के ख्रिस्ताचे भक्त होते. जगांत बुद्ध वगैरे थोर धर्मसंस्थापक झाल्याचें यांना चांगलें माहीत होतें तरी ख्रिस्ताविषयींची मोहिनी यांच्या मनावरून कधींहि कमी झाली नाहीं. त्यानें धार्मिक बाबतींत दाखविलेली व तरुण वयाला शोभणारी धडाडी व निर्भयता यांना अलौकिक वाटे. इतर धर्मसंस्थापक व ख्रिस्त यांच्यांत हा फरक असल्याचें हे मानीत. यांच्या जीवितक्रमावर व धावपळीवर या समजुतीची छाप दिसून येते.

गरीब, अनाथ, रोगी व संकटग्रस्त यांना मदत करण्याचे प्रसंग आले असतां हे एखाद्या देवदूताप्रमाणें तडफेनें आणि निर्भयतेनें तेथें धांवत जात. अशा यांच्या कार्यांत सरकारनें संशयानें यांना प्रतिबंध केला तर हे त्याचा निर्भयपणानें व तडफेनें प्रतिकार करीत. प्रसंगीं कायदा मोडण्यास व हुकूम तोडण्यासहि मागेंपुढें पाहत नसत. फिजी बेटांतील मजुरांची कहाणी ऐकून, सरकारनें प्रतिबंध केला तरी हे तिकडे गेले. चंपारण्य व रौलट कायद्याच्या वेळीं हे म. गांधींच्या साहाय्याला नेमके धांवून आले. म. गांधींच्या नीतिप्रधान चळवळींत किंवा रवीन्द्रनाथ टागोर यांच्या विश्वकुटुंबवादाला प्राधान्य देणाऱ्या कार्यांत हे सामील होत यांचें कारण यांच्या ह्या वृत्तींतच आहे.

सरकारविषयीं म. गांधींची भावना क्रान्तिकारक आहे असें यांना सामुदायिक कायदेभंगाच्या चळवळीमुळें वाटलें तेव्हां यांनीं एकदोन वेळां त्यांना विरोधहि केला आहे.

उंची सूटबूट घालून स्वतः मोटार चालवितांना लोकांच्या हे दृष्टीस पडले आहेत. तसेंच हे खादीचा सदरा व पंचा नेसून फिरतांना नंतर यांना लोकांनीं पाहिले आहेत.

इतर सर्व व्यवहार स्वैरपणानें करावयाचे व धर्म मात्र सावधपणें पाळावयाचा या पाश्चिमात्य सूत्राचा हे उपहास करीत. येशू ख्रिस्ताप्रमाणें धर्माचरणसुद्धां मोठ्या हिरीरीनें घडलें पाहिजे हें यांचें मत यांचें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल.

हे बायबलांतील प्रत्येक वाक्य ईश्वरप्रणीत आहे असें मानीत.

प्रत्येक देशांत यांना जिव्हाळ्याचा मित्रसमुदाय लाभला व त्याबद्दल हे स्वतःला भाग्यवान् समजत.

ख्रिश्चन लोक चर्चमध्यें वर्णभेद पाळतात, श्वेतेतरांना आपल्या चर्चमध्यें येऊं देत नाहींत, त्यांना प्रार्थनेच्या वेळीं बाजूला करतात, या गोष्टींचा हे अत्यंत त्वेषानें निषेध करीत असत. चर्चमधून वर्णभेद पाळणें आणि श्वेतेतरांना चर्चबाहेर घालविणें म्हणजे येशू ख्रिस्तालाच चर्चच्या बाहेर घालविणें होय असें यांचें निक्षून सांगणें असे. कारण खुद्द येशू ख्रिस्तच आशिया खंडांतील कृष्णवर्णीय होता.

यांचे ग्रंथः—(1) Christianity and the Labour Problem, (2) North India, (3) The Renaissance in India, (4) Christ and Labour, (5) The Indian Problem, (6) Indians in South Africa, (7) To the Students, (8) The Drink and Drug Evil, (9) What I owe to Christ (Autobiography), (10) Christ in the Silence, (11) Sadhu Sunder Singh, a Memoir, (12) Challenge of North-West frontier, (13) Indian Earth quake, (14) India and Simon Report, (15) India and Pacific. येथील व तेथील हिंदी पुढाऱ्यांच्या विनंतीवरून जपानजवळील फिजी बेटांतील हिंदी लोकांच्या स्थितीचा अभ्यास करण्याकरितां (स. १९१५, १७, ३६ सालीं) काढलेल्या तीन सफरींचा वृत्तांत (१९३७).

संपादित ग्रंथः—(1) Mahatma Gandhi—His own Story, (2) Mahatma Gandhi—At work, (3) Mahatma Gandhi's Ideas (with the specimens from his works), (4) Letters to a Friend (The Letters of Dr. Rabindranath Tagore).

मँचेस्टर गार्डियन वगैरे परदेशांतील पत्रांशीं यांचा बातमीदार म्हणूनहि संबंध होता.

हे परलोकवासी झाल्यानंतर यांच्या स्मारकाकरितां म. गांधी यांनीं मुंबईस सहा लक्ष रुपये जमविले व ते रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतनाच्या ताब्यांत दिलें (१९४१).

अॅम्हर्स्ट, लॉर्ड—(कारकीर्द स. १८२३-१८२८) हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल.

ब्रह्मदेशाशीं ब्रिटिशांचें युद्ध ही यांच्या कारकीर्दीतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. इंग्रजांनीं बंगाल प्रांत जिंकला त्याच वेळीं 'अलोंपारा' या शूर व धाडशी ब्रह्मी माणसानें ब्रह्मदेश जिंकून त्याचें एकीकरण केलें होतें. पुढें ब्रह्मी लोक इंग्रजांच्या मुलुखांत आक्रमण करूं लागले. आसाम, काचार, मणीपूर हे प्रांत व सिल्हट व चितगांव हे इंग्रजांचे जिल्हे त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतले. ब्रह्मी लोकांनीं ज्या वेळीं आराकान प्रांत आपल्या ताब्यांत घेतला तेव्हां तेथील कांहीं लोक इंग्रजांच्या आश्रयाला आले होते; त्यांस ब्रह्मी लोकांनीं परत मागितलें, परंतु इंग्रजांनीं ती गोष्ट नाकारली. त्याचप्रमाणें शहापूर हें बेट आपलें आहे असें समजून ब्रह्मी लोकांनीं तेथील इंग्रजांस हाकलून लावलें. इंग्रजांनीं फौज पाठवून तें ठिकाण जिंकून घेतलें. या सर्व गोष्टींचा निर्णय सलोख्यानें लावण्याची सूचना यांनीं ब्रह्मी सरकारला केली. परंतु ती गोष्ट ब्रह्मी सरकारनें नाकारल्यामुळें यांनीं त्याविरुद्ध युद्ध पुकारलें. प्रथमतः इंग्रजांचें जरी फार नुकसान झालें तरी शेवटीं त्यांचाच विजय झाला. शेवटीं १८२६ त येंदाबू येथें तह होऊन युद्ध संपलें. त्या तहानें तेनासरीम, आराकान व आसाम हे प्रांत इंग्रजांस मिळाले. त्यामुळें हिंदुस्थानची ईशान्य दिशा बिनधोक होऊन तिकडून परचक्राचें भय राहिलें नाहीं.

यांचे कारकीर्दीत भरतपूरच्या गादीसंबंधीं तंटे उपस्थित झाले होते. इंग्रजांनीं जाटांचे गादीवर बसवलेल्या बळवंतसिंह राजास दुर्जनसाल हा राज्य मिळविण्याच्या हेतूनें त्रास देत होता. त्यास १८२६ त यांनीं कैदेंत टाकलें.

आ

आगरकर, गोपाळ गणेश—(जन्म स. १८५६–मृत्यु स. १८९५) महाराष्ट्रांतील थोर समाजसुधारक व बुद्धिवादी पुरुष. सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाडापाशीं टेंभू गांवीं यांचा जन्म झाला. पुढें इंग्रजी तिसरीपर्यंतचें शिक्षण यांचे मामा, दत्तोपंत भागवत यांचेबरोबर कऱ्हाड येथें झालें. पण पुढील शिक्षणाकरितां मामा पुण्यास गेला व हे शाळा सोडून मुन्सफ कोर्टांत उमेदवार झाले. पण शिक्षण घेण्याकडे यांचा कल असल्यानें नागपूरकर मुन्सफांच्या पाऊणशें रुपयांच्या मदतीनें हे रत्नागिरीस गेले. पण तेथें यांची नीट सोय लागली नाहीं. एक आप्त होते ते वारले व वार वगैरे लावून जमेना, म्हणून हे कऱ्हाडला परत आले व तेथें दवाखान्यांत कंपांउडरची नोकरी पत्करली. पण ती सोडून आपल्या एका मामाबरोबर अकोल्यास गेले. तेव्हां हे सोळा वर्षांचे होते. तेथें घरगुती अडचणींस तोंड देत शिक्षक श्री. नि. मो. महाजनि यांच्या कृपेनें हे प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले (१८७५).

यांना शाळेत येण्यास एके दिवशीं उशीर झाला; तेव्हां शिक्षक म्हणाले, 'तुम्ही असेंच मागे पडणार. तुमच्या हातून काय होणार आहे ?' तेव्हां यांनीं तडफेनें उत्तर दिलें, 'तुमच्यासारखा एम्. ए. होईन तरच नांवाचा आगरकर.'

यांचे गुरु महाजनि यांनींहि यांचें हायस्कुलांत असतांचें वर्णन केलें आहे त्यांत यांचें भाषण ठसक्याचें व आत्मप्रत्ययानें मुसमुसलेलें असल्याचें लिहिलें आहे.

यांच्या गुरुंनीं आपआपसांत वर्गणी करून साठ रुपये जमविले व कॉलेजांतील पहिल्या तीन महिन्यांला पुरेल एवढी रक्कम यांच्या हवालीं केली. ही गुरुदक्षिणा घेऊन यांनीं डेक्कन कॉलेजांत प्रवेश केला. अकोल्याला 'कऱ्हाड समाचार' नांवाचें वर्तमानपत्र निघत होतें. त्याला लेखनसाहाय्य करण्याबद्दल यांना पांच रुपये मिळत होते. तीन महिन्यांनंतर यांना ज्युनियर स्कॉलर्शिप मिळाली. पण ती अपुरी असल्यानें यांना इतर उद्योग करावे लागत. डेक्कन कॉलेजच्या संमेलनानें पन्नास रुपयांचें बक्षीस लावून निबंध मागविले, तें यांच्या 'हिंदु एकत्र कुटुंब-पद्धति' या निबंधाला मिळालें. वक्तृत्व समारंभांतहि पन्नास रुपयांचें बक्षीस यांनीं मिळविलें. तथापि खर्चाची तोंडमिळवणी करणें यांना दुष्कर होई. एका सदऱ्यावर यांना कांहीं दिवस काढावे लागत. एम्. ए.च्या परीक्षेच्या वेळीं फी भरण्याला यांच्याजवळ पैसे नव्हते. म्हणून यांनीं फीकरितां एक नाटक लिहून पैसे मिळविण्याचें ठरविलें. जाग्रणें करून हे नाटक लिहूं लागले, हें केरूनाना छत्रे यांना कळलें. तेव्हां त्यांनीं यांची फी भरल्यामुळें नाटक अपुरेंच राहिलें. पण यांच्या या आपन्न स्थितीमुळें यांचा आनुवंशिक दमाहि यांना त्रास देऊं लागला. तत्त्वज्ञान व इतिहास घेऊन हे एम्. ए. झाले. त्या वेळीं मिल्ल व स्पेन्सर यांच्या बुद्धिप्रामाण्यवादी व अज्ञेयवादी तत्त्वज्ञानांचा सर्वत्र बोलबाला होता. त्याचा यांच्यावरहि परिणाम होऊन प्रत्येक गोष्टीस बुद्धिवादाची कसोटी हे लावूं लागले. पण तत्कालीन इतर तरुणांप्रमाणें अनाचार मात्र यांच्या हातून घडला नाहीं.

तसेंच यांनीं आपल्या भावी आयुष्याचीहि रूपरेखा निश्चित करून आपल्याबद्दल विशेष सुखाची आशा बाळगणाऱ्या आईला बी. ए. होतांच पुढील पत्र लिहिलें : "आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत. आतां त्याला मोठाल्या पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील असे मोठाले मनोरथ, आई, तूं करीत असशील; पण मी आतांच तुला सांगून टाकतों कीं, विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हांव न धरतां मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार ! "

न्यू इंग्लिश स्कूल सुरू करण्याच्या खटपटींत चिपळुणकरशास्त्र्यांच्याबरोबर टिळक व हे होते. पण पहिल्या वर्षी (जाने. १८८०) एम्. ए. नापास झाल्यामुळें परीक्षा पास झाल्यावरच यांनीं शाळेंत दाखल होण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें दुसऱ्या वर्षी हे त्या मंडळींत प्रत्यक्ष दाखल झाले. पुढल्या वर्षी दोन दिवसांच्या अन्तरानें 'मराठा' व 'केसरी' हीं पत्रें सुरू करण्यांत आलीं (१८८१). केसरीच्या दुसऱ्याच वर्षी बर्वे-प्रकरणांत मर्यादातिक्रम झाल्याबद्दल यांना १०१ दिवसांची शिक्षा झाली. मराठ्याचे संपादक म्हणून टिळकहि या शिक्षेंत होते. तुरुंगांतहि 'हक्क बोला' म्हणून यांना शिपायांला वारंवार सांगावें लागे. 'डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे एकशें एक दिवस' हें पुस्तक यांच्या मनोवृत्तीवर चांगला प्रकाश पाडतें.

शाळेची वाढ होत जाऊन कॉलेजहि निघालें (१८८५). यांनीं लोकांत ज्ञानप्रसार व्हावा म्हणून बुद्धिप्रामाण्याची

कास धरून नानाविध विषयांचें विवेचन केलें तरी यांचें अन्तःकरण सामाजिक विषयांतच रमत असे. स. १८८४ सालीं सरकारी कायद्याची मदत घेऊन बालविवाहाला प्रतिबंध करावा असा पूर्वपक्ष मलबारीशेटजींनीं केला. यांना हें मत पूर्ण मान्य असूनहि सर्व सहकारी यांच्या विरुद्ध असल्यानें त्याचा केसरींतून पुरस्कार करण्याची मात्र यांना चोरी झाली. शेवटीं एकदोन रकान्यांत स्वतःच्या नांवावर लेख लिहावेत अशी स्थिति आली. ही स्थिति असह्य होऊन ता. २५ ऑक्टो. १८८७ रोजीं यांनीं आपला केसरीशीं असलेला संबंध सोडला आणि सामान्य गोष्टींस आमरण चिकटून राहण्यापेक्षां विशेष महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टींकडे यांनीं लक्ष देण्याचें ठरविलें. आणि 'सुधारक' काढून आपल्या कामास सुरुवात केली (१८८८). पहिल्या वर्षी खर्च वजा जातां तीस रुपये फायदा उरला. यांना पगार दरमहा तीन रुपये पडला. प्रतिकूल समाजांत आपले विचार निर्भयपणें मांडीत राहणें हें थोर 'महात्म्याला शोभण्यासारखें कृत्य' आहे यांत शंका नाहीं. ठार मारण्याची धमकी, यांची खोटी प्रेतयात्रा काढणें वगैरे सर्व प्रकार प्रतिपक्षांनीं केले. यांचा दमाहि वाढला. संमति-वयाच्या बिलाचा वाद, चहाचें प्राशन्य वगैरे विषयांचा व्यवस्थित समाचार घेण्याचें कामहि चालू होतें. याच वेळीं होळकर सरकारनीं देऊं केलेली पांचशें रुपये दरमहाची नोकरी नाकारून यांनीं आपल्या स्वार्थत्यागावर कळस चढविला. आपट्यांच्या मृत्यूनंतर हे फ. कॉलेजचे प्रिन्सिपल झाले (१८९२). शेवटीं दारिद्र्य, दमा आणि देशकार्य यांनीं जीर्ण झालेलें शरीर नेऊनच कालाला समाधान मानावें लागलें. यांची कीर्ति अजरामरच आहे.

'काळी पगडी, बहुतकरून पांढरा अंगरखा, शुभ्र कोटाचे उपरणें आणि ब्राह्मणी चढाऊ जोडा' असा हा सुधारकाग्रणीचा पोषाख असे. आईच्या मृत्यूनंतर बाईचा व मिशांचा संबंध काय म्हणून यांनीं मिशा काढण्याचें नाकारलें. मृत्यूनंतर यांच्या पेटींत उत्तर कार्यकरितां म्हणून ठेवलेली रुपयांची पुरचुंडी सांपडली.

(१) डोंगरीच्या तुरुंगांतील एकशे एक दिवस. (२) 'विकारविलसित' हें हॅम्लेटचें रूपांतर यांनीं डोंगरीच्या तुरुंगांत पुरें केलें (१८८३). याशिवाय (३) वाक्यमीमांसा नांवाचा व्याकरणविषयक ग्रंथ (१८८८). (४-५) केसरींतील निवडक निबंध (१८८८). (६) विविधविषयसंग्रह (निबंध), (७-८-९) निबंधसंग्रह (सुधारकांतील) असें यांचें वाङ्मय आहे (१८९५).

महाराष्ट्रांतील मध्यम वर्गाचा आयुष्यक्रम आर्थिक कारणानें बदलत चालला असतां नव्या परिस्थितीस अनुसरून यांनीं त्या आयुष्याचें समर्थन केल्यामुळें नवीन पिढीचा वर्ग यांना आपला तत्त्ववेत्ता समजत असे. तोच सुधारकवर्ग आणि त्यांचे हे पुढारी अशी पुढें प्रसिद्धी झाली.

यांनीं आपल्या समाजांतील चालीरीतींची बुद्धिवादानें छाननी करण्यास आणि प्रत्येकांतील गुणदोष स्पष्टपणें मांडण्यास सुरुवात केली. हें करतांना यांनीं आपल्या समाजांतील पोषाख वगैरे बाह्य गोष्टींपासून परलोक, चातुर्वर्ण्य, ग्रंथप्रामाण्य, जातिभेद वगैरे विषयांचा परामर्ष घेतला. राजा, प्रजा, कायदे, स्वराज्य, स्वातंत्र्य, अन्न-वस्त्राचा प्रश्न इत्यादि मूलभूत प्रश्नांची छाननी सडेतोड-पणें यांनीं केलेली आहे. समाजसुधारक म्हणून यांची पुढें अधिक प्रसिद्धि झालेली असली तरी हे राजकीय विचारांतहि सर्वांच्या पुढें होते. 'धर्मशास्त्राच्या आज्ञा-प्रमाणेंच सरकारचे कायदेसुद्धां कांहीं मर्यादेपर्यंतच पाळावयाचे असतात. सत्य बोलतांना लोकांना, जुन्या समजुतींना किंवा खुद्द राजालासुद्धां भितां उपयोगी नाहीं. प्रथम विरोध झाला तरी लोकांना शेवटीं सत्य बोलणारा कोण हें ध्यानांत आल्याशिवाय राहत नाहीं. बाह्य राज्यक्रांतीपेक्षां सामाजिक विषयाची म्हणजे अंतःक्रांति महत्त्वाची आहे. किंबहुना अंतर्गत क्रांती-शिवाय राज्यक्रांतीहि अपेशी होईल,' अशी यांची विचारसरणी होती.

हे तत्त्वनिष्ठ क्रांतिकारक होते आणि लो. टिळक हे व्यवहारी राजकारणी होते. अनवश्यक व सहज पार न पाडतां येणाऱ्या गोष्टी बोलून लोकांचा विरोध कशाला ओढवून घ्या, असें टिळकांचें म्हणणें होतें. तर सत्य दिसेल तें न बोलल्यास किंवा मतलबापुरतेंच बोलल्यास आपणां-वर सत्यापलापाचा दोष येतो असें यांना वाटे, म्हणूनच दोघांत विरोध उत्पन्न झाला.

आज यांच्या म्हणण्याचा विजय झालेला दिसत आहे. राजकीय परिस्थिति सुधारावी अशी इच्छा असेल तर समाजांतील दोष कमी केले पाहिजेत, लोकांच्या अंगांत गुणांची वाढ झाली पाहिजे, ही गोष्ट आतां सर्वांनींच मान्य केलेली आहे. म. गांधींसारखे पुढारी कौन्सिल प्रवेशापेक्षां अहिंसा, दारूबंदी, ग्रामोद्योग, अस्पृश्योद्धार वगैरेंनाच विशेष महत्त्व देतात.

यांच्या निबंधाच्या विषयांचे चार भाग पडतात : १ व्यक्तींचें नैमित्तिक आचरण, २ सामाजिक इतिहास, ३ नैमित्तिक पक्षभेद, ४ स्त्रियांची उन्नति. या सर्व निबंधांच्या विषयाची निवड समर्पक आणि विवेचनपद्धति मार्मिक आणि चटका लावणारी आहे. व्यक्तीच्या जीवनांतील गोष्टींचें बारीकसारीक ज्ञान, अभ्यास आणि समाजहिताची उत्कट इच्छा यांमुळें यांचे निबंध वाचनीय झाले आहेत.

आपल्या विचारांवर यांचा पूर्ण विश्वास आहे, आणि आपण करीत असलेलें विचारप्रवर्तनाचें कार्य इष्टफलदायी आहे, याबद्दल यांना शंका नाहीं. योजना व भावनेपेक्षां विचारावर यांचा भर आहे. त्यामुळें प्रतिपक्षाच्या म्हणण्यांतील तथ्यांश हे विचारांत घेतल्याशिवाय राहत नाहींत. जुन्यांतील चांगल्याचा पुरस्कार करावयाचा आणि वाईटाचा त्याग करण्यास भाग पाडावयाचें हें यांचें जीवितकार्य होतें. त्याकरितां हे बुद्धिप्रधान चिकित्सा करून मतपरिवर्तनाचा मार्ग पत्करीत.

स्वार्थाकरितां केलेल्या गोष्टींकडेसुद्धां लोकांनीं सहानुभूतीनें बघावें अशी आपली अपेक्षा असते. मग स्वार्थनिरपेक्ष चळवळ करणाऱ्याला लोकांनीं सहानुभूति दाखवावी अशी इच्छा असणें स्वाभाविक आहे. आपल्या ध्येयाकरितां होळकर सरकारकडून आलेली दरमहा पांचशेंची नोकरी यांनीं नाकारली, संस्थानिकांची बाजू घेऊन शिक्षा भोगली आणि आपले विचार मांडण्याकरितां मिळकत नसतांहि वर्तमानपत्र काढलें; असें असतां यांचें म्हणणेंहि लोकांनीं समजून न घेतां यांची जिवंतपणीं प्रेतयात्रा काढावी व अनेकदां यांची अवहेलना करावी हें खरोखरच दुःखपूर्ण आहे.

यांना जिवंतपणीं लोकांची सहानुभूति लाभली नाहीं, पुढेंहि फारशी लाभण्याची आशा नाहीं. तथापि या सदाचारी आणि त्यागी पुरुषानें केलेलें स्वतंत्रपणें विचार करावयास लावण्याचें कार्य नमूद केल्याशिवाय कोणालाहि महाराष्ट्राचा इतिहास लिहितां येणार नाहीं !

आगाखान, दुसरे—(मृत्यु स. १८८१) मुसलमानांतील इस्मायिली पंथाचे धर्मगुरु, प्रसिद्ध राजकारणी आणि इंग्रज सरकारचे विश्वासू मित्र.

हे आगाखान हसन अलीशाह यांचे पुत्र होत. इराणच्या शहांनीं यांना इस्मायिलांचे इमाम म्हणून गादीवर बसण्याचे वेळीं सन्मानार्थ गौरवचिन्हें धाडलीं.

यांचें नांव नसिरुद्दीन असें आहे. हे दुसरे आगाखान म्हणून प्रसिद्ध आहेत.

पहिल्या आगाखानांचें चरित्र आमच्या मध्ययुगीन चरित्रकोशांत पाहावें.

आगाखान, तिसरे—(जन्म स. १८७७) मुसलमानांतील इस्मायिली पंथाचे धर्मगुरु, प्रसिद्ध राजकारणी आणि इंग्रज सरकारचे विश्वासू मित्र.

यांना इंग्रज सरकारनें वयाच्या पहिल्या वर्षापासून पेन्शन सुरू केलें व नवव्या वर्षी हिज हायनेस ही पदवी दिली.

यांना फारशी, अरबी व इंग्रजी शिकविण्यांत आलें. तसेंच धार्मिक व व्यावहारिक शिक्षणाची जोडहि यांच्या भाषाज्ञानाला देण्यांत आली.

यांचें संपूर्ण नांव "हिज हायनेस दि राइट ऑनरेबल सर सुलतान मुहम्मदशाह" असें आहे.

यांच्या अनुयायांची संख्या हिंदुस्थानांत कित्येक दशलक्ष आहेच, पण जगांतील पूर्व आफ्रिका, मध्य आशिया इत्यादि सहा देशांतहि यांचे तितकेच अनुयायी आहेत.

जगांत आज यांची प्रसिद्धि धर्मगुरु म्हणून तर आहेच; पण त्यापेक्षांहि आंतरराष्ट्रीय नागरिक म्हणूनच हे जास्त प्रसिद्ध आहेत.

तसेंच यांची लोकप्रियताहि लक्षांत भरण्यासारखी आहे. त्याचें कारण यांचा पवित्र वंश, त्यामुळें प्राप्त झालेली विशेष प्रकारची मान्यता, राजकारणांत वैशिष्ट्यपूर्ण वागण्याची यांची हातोटी आणि अफाट संपत्ति हें असलें पाहिजे. 'बँक ऑफ लंडन'मध्यें जेवढी संपत्ति आहे त्यापेक्षांहि अधिक संपत्ति यांचेजवळ असल्याचें सांगतात.

यांचे अनुयायी यांना बडील, माता, पालक, मार्गदर्शक व तत्त्वज्ञानी म्हणून ओळखतात. सच्चा कलेचे भोक्ते म्हणून यांच्याविषयीं यांच्या अनुयायांत प्रेम आढळून येतें. इतर लोकांतहि यांच्याविषयीं असाच प्रेमादर आढळून येतो. यांच्या कलाप्रेमांत तत्त्वनिष्ठा असते. केवळ कला म्हणून हे कलेचे उपासक नाहींत.

या सर्व गुणांमुळें यांना राज्य नसूनहि हे रूढ्या अर्थानें सम्राट् आहेत.

हिंदी मुसलमानांच्या शिक्षणाकरितां अलिगड युनिव्हर्सिटीच्या स्थापनेंत यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. अशाच प्रकारची युनिव्हर्सिटी कैरोला 'अल अजहार' या नांवानें यांच्या पूर्वजांनीं स्थापिली होती. अलिगड युनिव्हर्सिटीला हे दरसाल १०,००० रुपये देत असतात.

व यांनीं सुरवातीला ३० लाख रुपये या कार्यास जमवून दिले आहेत. १९१० सालीं शिया व सुनी या दोन्ही जमातींनां यांना मानपत्र दिलेलें आहे. यांना 'नोबल प्राइज' द्यावें असा कौन्सिल ऑफ स्टेटनें ठराव केलेला आहे. मोर्ले-मिंटो सुधारणांपासून ते राउन्ड टेबल कॉन्फरन्सपर्यंत हिंदुस्थानांतील राजकारणाचें हे एक अविभाज्य अंग बनून राहिले आहेत.

यांचें १ लें लग्न १८९८ त झालें. नंतर १० वर्षांनीं एका इटालियन स्त्रीला मुसलमानी धर्माची दीक्षा देऊन यांनीं तिच्याशीं विवाह केला. तिच्यापासून झालेला दुसरा मुलगा हा यांचा आजचा वारस आहे. ही स्त्री १९२६ सालीं वारली. नंतर ३ वर्षांनीं अॅन्ड्री कॅरन या फ्रेंच स्त्रीशीं यांचा ३ रा विवाह झाला.

हे एका विशिष्ट धर्मपंथाचे प्रमुख असले तरी यांची दृष्टि संकुचित नाहीं. यांच्यांत धार्मिक दुराग्रह नाहीं. टर्फ व रोड्यांची पैदास यांतील हे निष्णात आहेत. यांनीं डर्बी तीन वेळ जिंकली आहे. लीग ऑफ नेशन्सच्या कौन्सिलचे हे प्रेसिडेन्ट होते. हिंदुस्थानांतील एक प्रमुख राजकारणी असूनहि हे कोणत्याच विशिष्ट पक्षाचे नाहींत. महाराणी व्हिक्टोरिया, सातवे एडवर्ड व हल्लींचे त्यांचे बरेच यांच्याशीं यांचा स्नेह होता व आहे. १८९७ च्या दुष्काळांत यांनीं कच्छ, काठेवाड, पुणें व मुंबई येथें दुष्काळी कामें काढून दुष्काळाची तीव्रता कमी केली व स्वतःचा बादशहाप्रमाणें खर्च केला. त्यानंतर ठेगांतहि यांनीं हीच वृत्ति ठेवली. गांधींच्या पूर्वी अस्पृश्यता-निवारणाबाबतहि यांनीं सक्रिय प्रयत्न केला आहे. स्त्री-शिक्षण, बालविवाह व पडदा यांबाबत यांचीं मतें आधुनिक आहेत. स्त्रियांच्या वैधव्यावरहि यांनीं सडेतोड मतें मांडून तीन पिढ्यांपूर्वीच हल्ले चढविले आहेत.

पहिल्या महायुद्धामध्यें यांनीं केलेली महत्त्वाची कामगिरी पाहून सरकारनें यांना ११ तोफांच्या सलामीसह आपल्या थोर लोकांतील पहिला दर्जा दिलेला आहे.

हे खेळाडू म्हणूनहि प्रसिद्ध आहेत. घोड्यांच्या शर्यतींचा व्हाइसरॉय कप जिंकण्याची यांची मनीषा आहे.

India In Transition हा यांचा ग्रंथहि सुप्रसिद्ध आहे.

आगाशे, गणेश कृष्ण—(मृत्यु स. १९२७) गद्य लेखकार, मिरज संस्थानचे कारभारी व रावबहादूर. यांनीं कृ. कोल्हटकरकृत 'मतिविकार' व कृ. प्र. खाडिलकर यांच्या 'विद्याहरण' नाटकांवर रंगभूमि मासिकांतून टीकात्मक लेख लिहिले होते (१९१४). शिवाय यांची सार्थ ज्ञानेश्वरीहि आहे (अ. म. वा. से.).

आगाशे, गणेश जनार्दन—(जन्म स. १८५२–मृत्यु स. १९१९) मराठी कवि. यांचा जन्म व इंग्रजी शिक्षण पुण्यास झालें. यांनीं मॅट्रिकच्या परीक्षेंत जगन्नाथ-शंकरशेटसंस्कृतस्कॉलरशिप व बी. ए. च्या परीक्षेंत भगवानदास पुरुषोत्तमदास शिष्यवृत्ति मिळविली होती. यांनीं सरकारी शिक्षण खात्यांत नोकरी पत्करून हायस्कूलच्या मुख्याध्यापकापासून गव्हर्नमेंट सेंट्रल बुक डेपोच्या क्युरेटरपर्यंत कामें केलीं. पेन्शन घेतल्यावर डेक्कन कॉलेजच्या संस्कृत प्राध्यापकाच्या जागीं यांची नेमणूक झाली होती. इंग्लिश, संस्कृत व मराठी या तीन भाषांचा व त्यांतील ग्रंथांचा यांचा अभ्यास चांगला होता. जुन्या परंपरेंतील पंडितकवींत यांची गणना करावी लागेल. यांचें 'बिरुदावली' (१९०१) हें काव्य न्यायमूर्ति म. गो. रानडे यांच्या शोकपर आहे व 'बाष्पांजली' हें काव्य तेव्हां बी. ए. च्या वर्गात असणाऱ्या राजाराम नांवाच्या मुलाच्या मृत्यूबद्दल आहे. शिवाय तीन हरिभाऊ, एडवर्ड बादशहा, गो. कृ. गोखले, यंदाचा हिंवाळा वगैरे यांच्या कवितांहि शोकपर आहेत. याशिवाय यांनीं विविध विषयांवर विद्वत्ताप्रचुर अनेक लेख लिहिले आहेत. यांचें वाङ्मयः—१ राज्यारोहण काव्य, २ सुंदरेची संक्रान्त गोष्ट, ३ सद्गुणमंजरी १८९१, ४ बालशिक्षण, ५ बिरुदावली १९०१, ६ महाराष्ट्र वाङ्मय, ७ शुक्रग्रस्त विचित्र सूर्यग्रहण १८७४, ८ अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें–भाषान्तर १८९१, ९ बाष्पांजली (अ. म. वा. से.).

आगासकर, शां. पु.—(जन्म स. १८९६ सुमार) सुप्रसिद्ध चित्रकार.

यांची चित्रकलेंतील प्रसिद्धि बहुशीं उत्कृष्ट 'पोर्ट्रेट पेंटर' म्हणून होती. चित्रांतील माणसाची उत्कृष्ट ओळख यांच्याइतकी दुसऱ्या कोणालाहि साधत नाहीं. खऱ्या कलाकृतींत त्या व्यक्तीला पाहून चित्रकाराच्या मनांत आलेल्या भावना व्यक्त व्हाव्या लागतात. मनांत येणाऱ्या भावना चित्रांत उतरविण्याचें कसब फार थोड्या कलावन्तांत असतें. त्या थोड्या कलावन्तांपैकीं हे एक होत.

यांचीं कांहीं 'पोर्ट्रेटस्' इतकीं उत्तम साधलीं आहेत कीं, त्यांसमोर उभें राहिलें असतां हें चित्र असल्याचें

भान नाहींसें होतें. अगदीं चालताबोलता जीव कपडा फाडून डोकावत असल्याचा भास होतो.

यांच्या चित्रांत रंगाचा किंवा कुंचल्याचा मोहकपणा किंवा सफाई नसते. मात्र पाहिजे असलेला परिणाम आणण्याकरितां हरतऱ्हा केलेल्या असतात. प्रकाशाची बाजू अतिशय जाड असते. कुंचले मारलेले असतात ते मात्र आंतील स्नायूंच्या रोखानें. हे हायलाइटकरितां तर कुंचल्याच्या दांड्यानें रंग उचलून टाकीत. छायेची बाजू मात्र फार गुळगुळीत असते.

आघारकर, शंकर पुरुषोत्तम—(जन्म स. १८८४) सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ.

रत्नागिरी जिल्ह्यांतील मालवण हें गांव यांचें जन्मस्थान. यांचे वडील पुरुषोत्तम जयराम हे एंजिनियर खात्यांत सुपरवायझर होते. यांचे मूळ गांव हर्णै.

वनस्पति व प्राणिशास्त्र ऐच्छिक विषय घेऊन बी. ए. झाल्यानंतर हे वनस्पति, प्राणी व भूगर्भशास्त्र (सृष्टिशास्त्रें) घेऊन एम्. ए. झाले (१९०९).

कांहीं काळ मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांत जीवशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर, कांहीं काल संशोधनांत व्यतीत करावयाचा या इच्छेनें कलकत्त्याच्या 'इंडियन म्युझियम'मध्यें हे दाखल झाले. याच सुमारास कलकत्ता युनिव्हर्सिटीला श्री. राशबिहारी घोष यांनीं दिलेल्या दहा लाख रुपयांच्या देणगीमुळें ज्या चार प्राध्यापकांच्या जागा उत्पन्न झाल्या त्यांपैकीं उपयुक्त वनस्पतिशास्त्राच्या प्राध्यापकाच्या जागेकरितां आशुतोष मुकर्जी यांनीं यांना श्री. रामन् यांच्यामार्फत विनंति केली व ती जागा यांनीं स्वीकारली. या नेमणुकीच्या एका अटीनुसार हे आपल्या विषयाच्या संशोधनाकरितां जर्मनीला रवाना झाले (१९१४). परंतु पुढें लवकरच महायुद्ध सुरू झाल्यानें ब्रिटिश प्रजाजन म्हणून यांना अटक करण्यांत आली, युद्ध संपल्यानंतर यांची सुटका झाली. "हिंदुस्थानांतील रुक्ष भागांत असणाऱ्या वनस्पतींचीं स्वप्रसाराचीं साधनें व त्यांचें मूलस्थान" या विषयावर यांनीं लिहिलेल्या प्रबंधाबद्दल बर्लिन विद्यापीठानें यांना डॉक्टरेट दिली (१९१९).

जर्मनींतील कार्य आटोपल्यानंतर यांनीं नॉर्वे व डेन्मार्क येथील वनस्पतिशास्त्रज्ञांशीं ओळखी करून घेतल्या. नंतर कांहीं काळ हे इंग्लंडमध्यें होते. या काळांत यांनीं लंडननजीकच्या 'क्यू' या बिभागांत असणाऱ्या 'रॉयल बोटॅनिकल गार्डन्स'मधील ब्रिटिश वनस्पतींचें अध्ययन केलें. नंतर फ्रान्स, स्पेन, इटली इत्यादि देशांत वनस्पति-अवलोकनार्थ प्रवास केल्यानंतर हे हिंदुस्थानास परत आले (१९२०).

आजपर्यंत यांनीं केलेल्या कामगिरीचें स्वरूप विविध आहे. अध्ययन, अध्यापन, संशोधन, संशोधनात्मक संघटन व बृहन्महाराष्ट्रीय कार्य असें तें होय.

यांच्या प्राणिशास्त्रावरील संशोधनाच्या आरंभाची हकीकत किंचित् मनोरंजक आहे (१९११). या वेळीं महाबळेश्वरच्या व आजुबाजूच्या प्रदेशांतील प्राणी गोळा करण्याकरितां हे हिंडत असतां कोयना खोऱ्यांतील तांबी व वेण्णेच्या कांठच्या मेढें या नदीच्या डोहांत एक प्रकारचा चक्राकार प्राणी (Medusa) यांना सांपडला. हा प्राणी समुद्रांतील असून याच्या गोड्या पाण्यांत राहणाऱ्या चार पांचच जाती आजपर्यंत शास्त्रज्ञांना अवगत होत्या. यांना मिळालेली प्राण्याची ही जात तर अगदीं नवीन व अज्ञात अशी ठरली व कलकत्त्याच्या इंडियन म्यूझियमचे सुपरिंटेंडेंट डॉ. ॲनंडेल यांनीं तिला 'लिम्नोक्लिडा इंडिका' हें नांव दिलें. वरील प्राणी आफ्रिकेंतील व्हिक्टोरिया न्यांझा व टांगानिका या सरोवरांत राहणारा असतांना तो कृष्णेच्या उगमाजवळ कसा येऊन पोंचला हें भूपृष्ठावरील प्राण्यांच्या अभ्यासकांना एक मोठें कोडें पडलें आहे. त्याचप्रमाणें वर्षांतून फक्त तीन चार महिनेच हा प्राणी आढळत असल्यानें बाकीचे दिवसांत त्याचें काय होतें हाहि त्यांचेपुढील एक मोठा प्रश्न आहे. डॉ. ग्रेव्हली, डॉ. सुंदरलाल होरा, डॉ. श्रीनिवासराव इत्यादि लोकांच्या सतत परिश्रमानंतरहि हा प्रश्न अद्याप तसाच अज्ञात राहिला आहे.

पुढें १९१४ त कलकत्त्याला प्राध्यापक म्हणून यांची नेमणूक झाल्यानें यांचें हें संशोधन तसेंच अपुरें राहून वनस्पतिशास्त्राकडे यांचें लक्ष वळलें.

वनस्पतींचें वर्गीकरण व त्यांचा भूपृष्ठावरील प्रसार यांचा अभ्यास करून त्यांच्या उत्पत्तिस्थानासंबंधीं निष्कर्ष काढणें व त्याचप्रमाणें वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासाचा व्यवहाराशीं मेळ बसवणें हा यांच्या संशोधनांतील सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासाचा उपयोग मुख्यतः शेती, फॉरेस्ट्री व औषधी या व्यावहारिक बाबतींत होतो.

शेतीमध्यें एकाच ऋतूंत आपली वाढ पुरी करणाऱ्या वनस्पतींचा उपयोग करावयाचा असतो तर फॉरेस्ट्रींत १००-१०० वर्षे जगणाऱ्या वनस्पतींचा विचार करावयाचा असतो. यांपैकीं शेतकीविषयक संशोधन यांना

विशेष महत्त्वाचें वाटल्यावरून यांनीं या तऱ्हेची सामग्री मिळविणें व निरनिराळ्या पिकांच्या वाढीचा व त्यांवरील रोगांचा अभ्यास करून हल्लीं उपलब्ध असणाऱ्या जातींपेक्षां जास्त चांगल्या जाती शोधून काढण्यास लागणाऱ्या प्रक्रिया शोधून काढल्या आहेत. वनस्पतींच्या अवलोकनार्थ यांनीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत प्रवास करून तेथील वनस्पतींचा संग्रह केला आहे. यांपैकीं १९२१ व १९२३ सालीं यांनीं केलेला नेपाळचा प्रवास विशेष महत्त्वाचा आहे.

हल्लीं यांच्या प्रयोगशाळेंत पुढील संशोधन चालू आहे.

१. आंबा व केळें यांच्या हिंदी जातींचा अभ्यास करून त्या जातींचे अन्योन्य संबंध ठरविणें व त्यांच्या मूळ जातींचा शोध करून त्यावरून नव्या चांगल्या जाती क्या निर्माण करितां येतील हें निश्चित करणें. 'इंपीरियल कौन्सिल ऑफ् ॲग्रिकल्चरल रिसर्च'च्या द्रव्यसाहाय्यानें हें काम चालू आहे.

२. बंगाल मिल ओनर्स असोसिएशनच्या विद्यमानें बंगालमधील लांब धाग्याच्या कापसावरील रोग व त्यांचेवरील उपाय यांचें संशोधन.

३. भातांच्या पिकावरील रोग व भातास लागणारें खत यांचें संशोधन.

४. भाताचें पीक सध्यांपेक्षां जलद कसें तयार करितां येईल त्यावरील संशोधन.

'संशोधनात्मक संघटन' हें यांच्या कार्याचें आणखी एक महत्त्वाचें दालन आहे. 'इंडियन सायन्स काँग्रेस'च्या नागपूर येथील अधिवेशनाचे हे चिटणीस व वनस्पतिशास्त्रिचे अध्यक्ष होते (१९२४). तेव्हांपासून १९३५ सालीं हे तिचे सतत चिटणीस होते. त्या काळांत झालेल्या वाढीचे, सांपत्तिक स्थितीचे व कार्याच्या श्रेयांत यांचा वांटा बराच मोठा आहे. १९३८ सालीं झालेल्या रौप्य महोत्सव समारंभाची सर्व योजना यांनींच आंखली होती. 'सायन्स काँग्रेस'नें केलेल्या अकेडमी कमेटीचे हे जोड चिटणीस असून कमेटीच्या शिफारशीप्रमाणें स्थापन झालेल्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस ऑफ इंडिया' या संस्थेचेहि हे पहिल्यापासून चिटणीस आहेत.

याशिवाय इंडियन बोटॅनिकल सोसायटी, इंडियन सोसायटी ऑफ सॉइल सायन्स वगैरे संस्थांशींहि यांचे अगदी निकटचे संबंध आहेत.

आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांची परिषद (ॲमस्टरडॅम, १९३८), इंटरनॅशनल युनियन ऑफ बायॉलजी, आंतरराष्ट्रीय भूमिशास्त्र परिषद (Soil Science, Oxford) व इंपीरियल बोटॅनिकल कॉन्फरन्स (लंडन) या परिषदांस हे हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून हजर होते.

या वेळीं १८५१ च्या प्रदर्शनांचे शिलकींतून देण्यांत येणाऱ्या स्कॉलरशिपची योजना हिंदी विद्यार्थ्यांना लागू करण्याचा प्रयत्न यांनीं केला होता. तसेंच क्यू (लंडन) येथील बागेंत हिंदुस्थानच्या खर्चानें चालू असलेल्या मदतनिसाचे जागेवर हिंदी वनस्पतिशास्त्रज्ञाची नेमणूक करण्याकरतां यांनीं केलेल्या खटपटींत यांना यश आलें.

कलकत्त्याच्या एशियॅटिक सोसायटीच्या कार्यकारी मंडळांत जीवशास्त्राचे चिटणीस म्हणून हे काम करीत असून यांनीं सायन्स काँग्रेसमध्यें केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ यांना या संस्थेनें 'सुवर्णपदक' अर्पण केलें (१९४४).

१९४३ सालच्या दिल्ली येथील बृहन्महाराष्ट्र परिषदेचे हे अध्यक्ष होते.

कलकत्त्याच्या महाराष्ट्र निवासच्या दिवाणखान्यांत यांचा षष्टयब्दपूर्ति-समारंभ डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला होता.

आचरेकर, प्रो. गंगाधर भिकाजी—(जन्म स. १८८५–मृत्यु ३ जून १९३९).

गायन व तंतुवाद्य-प्रवीण. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील आचरें गांवीं झाला. शास्त्रज्ञान व कला याचा एकत्र संगम झालेल्या व्यक्तींपैकीं हे एक होत. मराठी ६–७ इयत्तांपर्यंत शिक्षण झाल्यावर यांच्या वडिलांनीं यांना गायनाचें शिक्षण देण्याचें ठरवून त्याकरितां सुप्रसिद्ध बापटबुवांना शिक्षक म्हणून ठेविलें. बापटबुवा हे सुप्रसिद्ध बाळकृष्णबुवांचे सहाध्यायी होते. हे प्रथम राजकोट (काठेवाड) राजकुमार कॉलेजमध्यें (१९१०), नंतर पुणें मेल ट्रेनिंग कॉलेजमध्यें संगीत शिक्षक होते (१९१०–१९३८). हे जसे गवई तसेंच बीनकारहि होते. प्रत्येक रागाचे श्रुतिरूपस्वर, रागाची उत्पत्ति, स्वरांचीं श्रुतिस्थानें इत्यादि हे सप्रमाण दाखवून देत. गेल्या २५–२६ वर्षांपासून मि. क्लेमंट, श्री. देवल, प्रो. आचरेकर, प्रो. बर्वे वगैरे विद्वानांनीं श्रुति–विषयाचा ऊहापोह केला तो फारच महत्त्वाचा आहे. कोमल, तीव्र स्वरांचीं स्थानें वीणेवरील लांबीच्या प्रमाणकांनीं व कंपनसंख्यांनीं देण्याचें कार्य वरील पंडितांनीं केलें आहे.

या सर्वांत यांचा यत्न यशस्वी ठरण्याचें कारण यांनीं प्राचीन श्रुतींच्या सिद्धतेवरील चतुःसारणांचा प्रयोग देऊन त्यांत प्रचलित श्रुतिस्वर दर्शविले हें होय. यांत यांनीं श्रुतिनिदर्शनाची स्वपरिभाषाहि निर्माण केली आहे हें एक यांचें वैशिष्ट्य होय.

यांनीं 'शालेय संगीत', 'मत्सरीकृता मूर्च्छना' वगैरे पुस्तकें लिहिलीं आहेत. त्याचप्रमाणें पुण्यांत निघणाऱ्या 'भारतीय संगीत' या त्रैमासिकांतील यांचे लेखहि मननीय असत. यांना प्रसिद्धीची लालसा मुळींच नसे. युनिव्हर्सिटींत हे संगीताच्या अभ्यासक्रमाबाबत नेमलेल्या विषयनियामक कमिटीचे सभासद होते हेंच यांच्या विद्वत्तेचें द्योतक होय. बाजारी हार्मोनियममधील स्वर, टेंपर्ड म्हणजे बेसुरे आहेत, ते प्रमाणबद्ध व सुरेल करून घेण्यासाठीं यानीं एक महत्त्वाची यान्त्रिक सुधारणा केली. कॉलेजमध्यें अध्यापकाचें काम करणारा हा शास्त्रज्ञ कलावंत बीन, सतार, दिलरुबा, हार्मोनियम वगैरे स्वतः बनवीत असे. आपलीं वाजविण्याचीं सर्व वाद्यें यांनीं स्वतः केलेलीं असत. इतकी कल्पकता व कारागिरी असूनहि घड्याळें दुरुस्त करणें; हिरे, माणकें, पाचू, मोतीं यांची परीक्षा करणें; वैद्यकी परीक्षा करणें; ज्योतिषविषयक फलें सांगणें वगैरेंतहि ते प्रवीण होते. अनेक गरिबांना ते स्वखर्चानें औषधें देत.

बापटबुवांच्या जवळ धृपदख्याल इत्यादि सर्व प्रकारच्या चिजा होत्या त्यांचा यांना पूर्ण लाभ मिळाला. त्यामुळें यांच्याजवळ चिजांचा मोठा भरणा असे. इंग्रजी किंवा संस्कृत येत नसतांहि पाश्चात्यांचें ध्वनिशास्त्र व रत्नाकरांतील श्रुतिग्राममूर्च्छना बुद्धिमत्तेनें ग्रहण करून यांनीं चतुःसारणा गणितसिद्ध प्रयोगानें सिद्ध केल्या आहेत. मि. फॉक्स स्ट्रँगवे या पाश्चात्य पंडिताला इकडील प्राचीन ग्रन्थांतील श्रुतिविषय समजावून घेण्यास यांच्याशिवाय दुसरा तज्ज्ञ मिळाला नाहीं. हा विषय समजावून घेतल्यानंतर त्यानें आपल्या 'म्युझिक ऑफ हिंदुस्थान' या ग्रन्थांत यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यांचें शास्त्रीय ज्ञान विद्वान् व तज्ज्ञांना मान्य असे. हेहि शास्त्रज्ञ विद्वानांशीं संगीताबद्दल चर्चा करून त्यांतील सिद्धान्त ग्रहण करीत. यांचा स्वभाव परोपकारी असून हे उदार अंतःकरणाचे असत. संगीताचें शिक्षण देण्याची आवड असल्यामुळें पुष्कळांना निरपेक्षतेनें तें यांनीं दिलें आहे. यांचें सारें आयुष्य संगीत-अध्यापक म्हणूनच गेलें. मरणापूर्वी सुमारें २॥ वर्षांपासून यांना हृदयविकार उत्पन्न झाला होता.

सध्याचें हार्मोनियम हें वाद्य पाश्चात्य आहे. शुद्ध स्वराची कल्पना पाश्चात्य संगीतज्ञांना नाहीं. त्यामुळें तंबोऱ्यावर गाणाऱ्या आपल्याकडील गवयांना तें वाद्य बेसूर वाटतें. त्याची सुधारणा करण्याचा प्रयत्न मि. क्लेमंट यांनीं केला. पण त्यांचें वाद्य वादनोपयोगी न होतां त्याला अजस्र यंत्राचें स्वरूप प्राप्त झालें. पण ती गोष्ट यांनीं प्रयत्नानें साध्य केली. कारण हे स्वतः गायक, वादक आणि वाद्यकार होते. शिवाय शोधक, चिकित्सक आणि योजक अशी यांची बुद्धि होती.

तेव्हां यांनीं त्या वाद्यांतील स्वरांतरें बदलून अर्ध तारस्वराचे आणखी दोनदोन भाग पाडले. आणि तंतुवीणेवरून षड्जपंचम भावानें प्रत्येक स्वर कायम करून घेतला. त्याकरितां पेटीचे पांढरे काळे सूर बदलावे लागले नाहींत, पण पेटीच्या सुरांची रचना दोन मजली होती ती चार मजले झाली. पण कोणत्याहि स्वरापासून आपल्या संगीतांतील नैसर्गिक स्वरसप्तक सिद्ध करण्याची अजब युक्ति यांनीं आपल्या पेटींत योजली आणि अनैसर्गिक स्वरान्तराचा हार्मोनियमवरील कलंक आपल्या अचाट कल्पनेनें काढून टाकला. यामुळें यांच्या पेटीमध्यें षड्ज, गांधार, पंचम, निषाद हे चारहि स्वर तंबोऱ्याच्या तारेप्रमाणें एकजीव झालेले ऐकूं येत. आणि कोणत्याहि स्वरावरील सुसंवाद साधण्याची युक्ति सोपी होई. अलीकडे आपल्या संगीतांत अत्यंत आवश्यक असणारी मींड पेटींतून निर्माण करण्याचे प्रयत्नांत हे गुंतले होते. आपल्या या नव्या पेटीचे प्रयोग पुण्या-मुंबईस यांनीं करून दाखविले आणि आर्यसंगीताच्या दृष्टीनें तिचें महत्त्वहि समजावून दिलें. परंतु दुर्दैवानें इकडील कोणाहि गवयाला अशी पेटी साथीला ठेवण्याची इच्छा झाली नाहीं. सच्चे सुरांत गायन करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक गवयानें यांच्या 'श्रुतिमंडळमंजूषा' किंवा 'स्वरसंवादिनी'चा उपयोग करणें आवश्यक आहे. (मा. सं. व्या.) तथापि पूर्ण शुद्ध स्वर पेटींतून तंबोऱ्याप्रमाणें निघणें अशक्य असल्याचें कांहींचें म्हणणें आहेच.

आचार्य (कालगांवकर), कृष्णाजी विष्णु— (जन्म स. १८५७–मृत्यु स. १९१९) इतिहाससंशोधक. यांचा जन्म कऱ्हाड तालुक्यांतील कालगांव येथें झाला. हे शाळाखात्यांत मराठीशिक्षक होते. साने, खरे, पारसनीस वगैरेंच्यामुळें यांना इतिहाससंशोधनाची गोडी लागली. जुन्या कागदपत्रांचा संग्रह व तपास करून यांनीं तद्विषयक माहितीपूर्ण अनेक लेख लिहिले. भारत इतिहास

संशोधक-मंडळाचे ग्रंथांत व इतर मासिकांत यांनीं आपले लेख प्रसिद्ध केले. कै. पारसनीस यांच्या भारतवर्ष व इतिहाससंग्रह या दोन्ही मासिकांतून 'जुन्या ऐतिहासिक गोष्टी' या सदराखालीं यांचे बरेच लेख गोष्टी रूपानें प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय काव्येतिहाससंग्रह, विविधज्ञानविस्तार व शाळापत्रक यांतहि यांचे लेख आले आहेत (अ. म. वा. से.) व त्यांतहि यांनीं आपलें आत्मचरित्र दिलें आहे (वि. ज्ञा. वि. सप्टें. १९१९).

आचार्य, चिंतामणि रघुनाथ—(जन्म १७ मार्च १८२८–मृत्यु स. १८८०).

मद्रासच्या ज्योतिष शाळेंत हे पहिले असिस्टंट असून तेथें १७ वर्षें होते. यांची मातृभाषा व जन्मदेश तामीळ (द्रविड) असावा असें वाटतें. यांना संस्कृत जरी येत नसे तरी इंग्रजींत हे निष्णात होते. हे स्वतः पुष्कळ वर्षें वेध घेत असत. स. १८४७ त यांना मद्रास वेधशाळेंत नोकरीवर घेतलें. तेथें आयुष्याच्या शेवटपर्यंत काम करून हे १८८० सालीं मरण पावले. यांचें सर्व घराणेंच ज्योतिष्यांचें होतें.

आचार्य, एम्. के.—(जन्म स. १८७६) सुप्रसिद्ध सनातनी पुढारी.

मद्रासच्या ख्रिश्चन कॉलेजमध्यें यांचें प्रमुख शिक्षण झालें. बी. ए., एल्. टी., इत्यादि पदव्यांनीं विभूषित होऊन यांनीं कॉलेज सोडलें. कांहीं दिवस हेडमास्तरचें काम केल्यानंतर स्वतंत्र राजकारणी गृहस्थ या नात्यानें जनतेच्या समोर येण्यास यांनीं सुरुवात केली. सार्वजनिक कार्यकर्ते, ग्रंथकार व वर्तमानपत्रकार या तीनहि दृष्टींनीं लोकादरास पात्र झालेले हे गृहस्थ आहेत.

ग्रंथ:—(१) पोर्ट्रेट्स् फ्रॉम इंडियन क्लासेस, (२) दि बेसिक ब्लंडर इन् दि रीकन्स्ट्रक्शन ऑफ दि इंडियन कॉनॉलजी बाय ओरिएन्टॅलिस्ट्स्, (३) इंडो ब्रिटानिका.

नाटकें:—(१) कुमुद, (२) दशरथ.

चिंगलपट व अर्काटतर्फे लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें हे निवडून आले होते. स्वराज्यपक्ष व कॉंग्रेसतर्फेचे सभासद होण्याचा मानहि यांना मिळाला होता (१९२८).

वर्णाश्रम स्वराज्य-संघाचे प्रेक्षक प्रतिनिधी म्हणून राउंड टेबल कॉन्फरन्सलाहि हे हजर होते (१९३०).

आचार्य, यादवजी त्रिकमजी—(जन्म स. १८८२) आयुर्वेदाचे अभ्यासक व आयुर्वेदाचे अप्रसिद्ध ग्रंथ संशोधनपूर्वक प्रसिद्ध करणारे सुप्रसिद्ध वैद्य.

हे काठेवाडांतील पोरबंदर शहरीं पिढीजात वैद्यकी करणाऱ्या घराण्यांत जन्मास आले. यांचे वडील त्रिकमजी गोवर्धनजी आचार्य पोरबंदरच्या राणासाहेबांचे राजवैद्य होते. त्यांचेजवळ व पं. गौरीशंकरजी यांचेजवळ यांनीं वैद्यकीचें यथासांग अध्ययन केलें. यांचें संस्कृताचें प्राथमिक अध्ययन पोरबंदरच्या राजकीय संस्कृतपाठशाळेंत झालें आणि पुढील विशेष अध्ययन मुंबईस झालें. प्रयागचे हकीम रामनारायणजी यांच्याजवळ यांनीं युनानी वैद्यकाचेंहि ज्ञान संपादन केलें. आज मुंबईस यांचा वैद्यकीचा धंदा पहिल्या प्रतीचा चालू आहे. वैद्यकीच्या व्यवसायाबरोबर ग्रंथसंशोधन व प्रकाशनाचें कामहि यांचें सतत चालू असतें.

वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं 'माधवनिदान' या सुप्रसिद्ध ग्रंथाचें 'मधुकोष' टीकेसह संशोधन करून तयार केलेला यांचा ग्रंथ निर्णयसागर छापखान्यानें प्रसिद्ध केला. तेव्हांपासून आजपर्यंत यांचें ग्रंथसंशोधन व प्रकाशन हें कार्य अव्याहत चालू आहे. जुनीं हस्तलिखितें हर ठिकाणांहून जमा करून त्यांना संशोधनपूर्वक प्रसिद्धी देण्यांत यांचा हातखंडा आहे. "सुश्रुतसंहिता" या आर्ष ग्रंथाचें "डल्हणटीके"सहित प्रकाशन करतांना अशीच काळजी घेऊन तो शुद्ध स्वरूपांत यांनीं प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. 'चक्रपाणिटीके'-सहित 'चरकसंहिता' प्रसिद्ध करतांना तर यांनीं एक प्रत जर्मनींतून आणविली होती. शुद्ध व अधिकृत प्रकाशन लोकांपुढें येण्यासाठीं वेळ, श्रम व पैसा यांच्या खर्चाकडे यांनीं कधींच पाहिलें नाहीं. या वयांतहि पहाटे चार वाजतां उठून आवश्यक कार्यें उरकल्यावर हे आपलें आवडतें संशोधनाचें कार्य सकाळीं आठ वाजेपर्यंत शान्तपणें करीत असतात. स्वतःच्या प्रकाशनाइतकें दुसऱ्यांच्या प्रकाशनांनाहि यांनीं द्रव्यसाहाय्य केलें आहे. कै. डॉ. वामन गणेश देसाई, एम्. बी. यांचें 'भारतीय रसशास्त्र' व 'औषधीसंग्रह' यांनींच छापून प्रसिद्ध केलें. जुनीं हस्तलिखितें संशोधून यांनीं आजवर पुढील ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत—

१ माधवनिदान (मधुकोष व आतंकदर्पण या दोन टीकांसह), २ सुश्रुतसंहिता (डल्हणविरचित निबंधसंग्रह व्याख्येसहित), ३ चरकसंहिता (चक्रपाणिकृत आयुर्वेददीपिका टीकेसह), ४ रसहृदयतंत्र, ५ रसप्रकाशसुधाकर, ६ गदनिग्रह, ७ राजमार्तंड, ८ नाडीपरीक्षा, ९ वैद्यमनोरमा, १० धारापद्धति, ११ आयुर्वेदप्रकाश, १२ रसायनखंड, १३ रसायनपद्धति, १४ लोहसर्वस्व,

१५ रससार, १६ रससंकेतकलिका, १७ रसकामधेनु (तीन पाद) व १८ क्षेमकुतूहल.

यांपैकीं सटीक सुश्रुत व चरक हे वैद्यांच्या अभ्यासांतील सर्वमान्य ग्रंथ असल्यानें त्यांच्या शुद्ध प्रकाशनाचें महत्त्व फार आहे. या ग्रंथाची अनुक्रमें तिसरी व दुसरी आवृत्ति निघाली आहे. या ग्रंथांतून असलेल्या संदिग्ध वचनांवर टीपा, पाठभेद, जरूर तेथें चित्रें, कोष्टकें व परिशिष्टें देऊन हे मुळांतच उपयुक्त असणारे ग्रंथ यांनीं अधिक उपयुक्त केले आहेत.

याशिवाय यांनीं संशोधलेले–१ प्रसिद्ध मन्त्रनिघण्टु व वातघ्नत्वादि निर्णय, २ त्रिशती (मूळ) हे दोन ग्रंथ पं. ज्येष्ठाराम मुकुंदजी यांनीं पंचवीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध केले होते.

तथापि हीं सर्व जुन्या ग्रंथांचीं संशोधित प्रकाशनें झालीं. यांत यांचे स्वतःचे ग्रंथ फारसे नव्हते. आतां यांनीं स्वतः तयार केलेले ग्रंथहि प्रसिद्ध झाले आहेत. ते पुढीलप्रमाणें:–१ द्रव्यगुणशास्त्र (या संस्कृत व हिंदी भाषेंत लिहिलेल्या ग्रंथाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला असून दुसरा छापत आहे).

हा ग्रंथ या विषयाचें पाठ्य पुस्तक म्हणून अत्यंत उपयुक्त आहे. या ग्रंथाला बनारस हिंदुविश्वविद्यालयांतील प्रधानाध्यापक डॉ. बा. अ. पाठक, एम्. बी., बी. एस्. यांचा आधुनिक पदार्थविज्ञानाची स्थूल कल्पना आणून देणारा विस्तृत विवेचक उपोद्घात आहे.

कै. वै. पं. हरिप्रपन्नशर्मा यांच्या 'रसयोगसागर' या ग्रंथाला यांचें अमोल साहाय्य झालें. आपलीं स्वतःचीं ३७ हस्तलिखितें देऊन यांनीं त्यांना मोठेंच साहाय्य केलें.

तसेंच डॉ. गणनाथ सेन यांच्या 'प्रत्यक्षशारीर' या संस्कृत ग्रंथाचें डॉ. बाक्रे व पाठक यांचेकडून गुजराथी भाषान्तर करवून तें झंडु फार्मसीच्या मालकाच्या साहाय्यानें यांनीं प्रसिद्ध केलें.

नेपाळचे पं. हेमराज शर्मांनीं संशोधिलेली 'काश्यपसंहिता' त्यांच्याच विस्तृत व विद्वत्ताप्रचुर संस्कृत उपोद्घातासह यांनीं छापल्यानें वैद्यकीच्या अभ्यासकांवर फार उपकार झाले आहेत.

संशोधनपुरःसर आयुर्वेदीय ग्रंथप्रकाशनाशीं यांचें नांव कायमचें निगडित झालें आहे यांत संशय नाहीं.

यांनीं केलेली ही आयुर्वेदाची अविस्मरणीय सेवा लक्षांत घेऊन यांना मथुरेच्या संमेलनांत 'आयुर्वेद मार्तंड' ही पदवी देऊन गौरविण्यांत आलें. हरिद्वारच्या (१९२५) व ग्वाल्हेरच्या (१९३२) अ. भ. वै. संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान यांना देण्यांत आला. एकंदर सात संमेलनांत यांचा विशेष गौरव करण्यांत आला. संमेलनाला हे आपले मानाचे, गौरवाचे आणि इभ्रतीचे प्रतीक वाटतात.

संमेलनांतील चालू कार्यकर्त्यांशीं यांचे मतभेद असले तरी यांच्या योग्यतेविषयीं प्रतिपक्षाच्या मनांतसुद्धां मतभेद नाहीं.

पं. मदनमोहन मालवीय यांच्या लक्षांत यांची योग्यता येतांच त्यांनीं बनारसच्या हिंदुविद्यापीठांत रु. ५०० वर यांना आयुर्वेदशाखेचे प्रधानाध्यापक नेमिलें. पण यांची मुंबईतील धंद्याची प्राप्ति व जबाबदारी याच्या चौपटीनें असल्यानें त्या विद्यालयाची व जागेची घडी बसवून हे आपलें नांव राखून परत व्यवसाय करण्यास मुंबईस आले.

मुंबई प्रांतांत घडविलेल्या वैद्यक-नियंत्रण कायद्यानुरूप अस्तित्वांत आलेल्या पहिल्या बोर्डांत हे सभासद म्हणून पांच वर्षे काम करीत होते.

भारतांतील बहुतेक आयुर्वेद-संस्थांशीं संचालक, परीक्षक, सल्लागार, अध्यक्ष, दाते इत्यादि अनेक नात्यांनीं यांचा संबंध आला आहे. खास मुंबईसहि कै. पं. हरि प्रपन्नजींच्या सहकार्यानें यांनीं 'श्री. मुंबई आयुर्वेदीय पाठशाळा' चालविली होती.

आज हे पुष्कळ संस्थांतून निवृत्त होत असले तरी आपलें उर्वरित आयुष्य व धंद्यांतील बहुतेक कमाई ग्रंथप्रकाशनाकरितां खर्च करावी असा यांचा अभिनंदनीय मनोदय आहे. आयुर्वेदाच्या इतिहासांत यांना मोठें मानाचें स्थान आहे (आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे).

आजगांवकर, जगन्नाथ रघुनाथ— (जन्म स. १८७९) मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध लेखक आणि संतकाव्यांचे अभ्यासक. यांचें गांव सावंतवाडी संस्थानांतील आजगांव. इंग्रजी ४ थींनंतर यांना शिक्षण घेतां आलें नाहीं (१८९६).

यांचें पहिलें लेखन मुंबईच्या 'गुराखी' नांवाच्या दैनिक पत्रांत झालें. नंतर यांनीं अनेक ठिकाणीं लिहिलें असलें तरी यांची विशेष प्रसिद्धि केसरींतील लेखामुळें झाली. कै. शि. ए. भारदे यांनीं 'भारद्वाज' या नांवानें 'सुधारक' साप्ताहिकांत 'आळंदीचा ज्ञानदेव ज्ञाने-

श्वरीचा कर्ता नव्हे' या मथळ्याखालीं एक लेखमाला लिहिली. त्या लेखांत 'ज्ञानेश्वरी लिहिणारे ज्ञानदेव निराळे व आळंदीचे ज्ञानदेव निराळे' असें सिद्ध करण्याचा यत्न केला होता. त्या वेळीं यांनीं त्याविरुद्ध मत केसरीद्वारा प्रसिद्ध केलें. तेव्हां दुसरी बाजू लोकांच्या निदर्शनास आली. नंतर विस्तृतपणें खंडन करणारे लेख कै. श्रीपतबुवा भिंगारकर यांनीं लिहिले आणि ते पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले.

तसेंच कै. राजारामशास्त्री भागवत यांच्या 'मराठ्यांनीं ख्रिश्चन व्हावें' या लेखावर यांनीं केलेली टीका, कै. बा. अ. भिडे यांच्याशीं पांच वामनांबद्दल व केळकर यांच्याशीं केलेला 'मतिविकार' नाटकावरील टीकेबद्दल वाद हे यांच्या सडेतोड टीकापद्धति व मार्मिक लेखनशैली यांबद्दलच्या प्रसिद्धीस कारण झाले.

यांनीं कविताहि शेंकडों लिहिल्या आहेत. 'कवनकुतूहल' हें यांच्या कवितासंग्रहाचें पुस्तक प्रसिद्ध आहे. वाटेल त्या वृत्तांत किंवा चालीवर सफाईदार कविता करण्यांत यांचा हातखंडा असे. हे कविताहि फार थोड्या वेळांत करतात. एकदां केसरींतील पद्यरचनेच्या चढाओढींतील पहिलें बक्षीस यांना मिळालें होतें. तथापि हे आपणांस कवि म्हणवून घेत नाहींत.

आजपर्यंत यांनीं अनेक पुस्तकें लिहिलीं असलीं तरी 'महाराष्ट्र कविचरित्रा'मुळें यांना विशेष प्रसिद्धि लाभलेली आहे. ३१०० पृष्ठें व अकरा भाग या ग्रंथानें व्यापिले आहेत. या चरित्रग्रंथांत माहितीच्या शास्त्रशुद्धतेपेक्षां भाविकपणाच अधिक आहे, आणि त्यामुळेंच हीं चरित्रें अत्यंत रसाळ झालेलीं आहेत. शास्त्रशुद्ध चरित्र लिहिण्यापेक्षां वाङ्मयाचें रसग्रहण करण्यांत हे मोठे कुशल आहेत. त्यामुळें संतचरित्राची चिकित्सा करणाऱ्या बुद्धिवाद्यांचें समाधान साधण्यापेक्षां सर्वसामान्य वाचकांचे हे अत्यंत आवडते लेखक बनले आहेत.

यांच्या लेखणीप्रमाणें यांची वाणीहि मोठी प्रवाही आणि परिणामकारक आहे. वेंचक शब्दप्रयोग, स्पष्ट व जोरदार उच्चार, तळमळ, उपरोध आणि उतारे हे यांच्या वक्तृत्वांतील विशेष होत. पुणें वसंतव्याख्यानमाला (१९१०), व मराठी साहित्यसंमेलन (१९०९) येथील यांचीं मराठी कवींवरील व्याख्यानें अत्यंत गाजलेलीं आहेत. मुंबई विश्वविद्यालयांत ५ वर्षें मॅट्रिकचे आणि नागपूर विश्वविद्यालयांत एम्. ए. व बी. ए. चे हे परीक्षक होते.

यांना 'महाराष्ट्रभाषाभूषण' ही पदवी आदरानें लावण्यांत येते.

यांचे ग्रंथः—१ महाराष्ट्र कविचरित्र १-११ खंड, २ नेपाळ-वर्णन, ३ कवनकुतूहल (यांचा कवितासंग्रह), ४ सं. प्रणयानंद नाटक, ५ चक्रवर्ति हम्मीर, ६ विद्वान् सोबती कीं कुशल गृहिणी, ७ सन्त गोपाळबुवा माळगांवकर चरित्र (१९२७), ८ भारतीयांचे वेद, इत्यादि.

आजरेकर, श्रीपाद लक्ष्मण—(जन्म स. १८८३) सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ.

यांचें शिक्षण आजरें व बेळगांव येथें होऊन हे मॅट्रिक झाले (१८९९). यांचा बी. ए. चा विषय वनस्पतिशास्त्र व प्राणीशास्त्र हा होता. यानंतर यांना तंत्रविषयक ज्ञानसंपादन करण्याकरितां देण्यांत येणारी 'सर मंगळदास नथूभाई शिष्यवृत्ति' मिळून हे केंब्रिज विश्वविद्यालयांत दाखल झाले (१९०५). 'शास्त्रीय शेती' या विषयाबद्दल यांना तेथें प्रशस्तिपत्र मिळालें (१९०७) व पुढें बी. ए. ही पदवी मिळाली (१९०८). या परीक्षेकरितां यांचे वनस्पति, भूगर्भ व रसायन हे विषय होते. शिवाय यांना तेथें मुंबई सरकारनें वनस्पतीमुळें उत्पन्न होणाऱ्या विशेष रोगांचा अभ्यास करण्याकरितां शिष्यवृत्ति दिली होती.

हिंदुस्थानांत परत आल्यावर यांना पुणें ॲग्रिकल्चरल कॉलेजमध्यें वनस्पतिरोगकारक हरिद्द्रव्यहीन 'वनस्पतिशास्त्राचे' प्राध्यापक नेमण्यांत आलें. या स्थानावर हे आठ वर्षें होते. तेथें यांनीं मुंबई शेतकी खात्यांतील वनस्पतिरोगसंशोधनाचा पाया घालण्याचें महत्त्वाचें कार्य केलें. स. १९१७-१९ च्या दरम्यान यांना मुंबई सरकारच्या वनस्पतिशास्त्रज्ञाची जागा मिळाली. पुढें यांना वऱ्हाड मध्यप्रांताच्या त्याच जागेवर मध्यवर्ति सरकारनें नेमिलें (१९२०). पुढें हे मुंबई प्रांताचे वनस्पतिरोगतज्ञ म्हणून नेमले गेले. त्यानंतर हे पुण्याच्या शेतकी कॉलेजचे प्रिन्सिपल झाले (१९२२). हें स्थान स्वप्रयत्नानें मिळविणारे हे पहिलेच हिंदी गृहस्थ होत. पण यांचा ओढा प्राध्यापनकार्याकडे असल्यानें यांनीं मुंबईच्या 'रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' या उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेंत वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक म्हणून आपली बदली करून घेतली. तेथें पांच वर्षें काम केल्यावर यांची अहमदाबादच्या गुजराथ कॉलेजला बदली झाली व तेथून हे सेवानिवृत्त झाले (१९३८).

यांचें अध्यापन, माहिती, भाषा व आकर्षकपणा यांनीं

32312

युक्त असे. शिवाय यांच्या व्यक्तित्वाची छाप यांच्या समीप येणाऱ्या प्रत्येकावर पडे. यांचें संशोधनकार्यहि महत्त्वाचें आहे. 'वनस्पतींचे रोग' हा यांचा मुख्य विषय असून त्यावर देशी व परदेशी नियतकालिकांत यांनीं अनेक लेख लिहिले आहेत. त्यांपैकीं 'सांठवून ठेवलेल्या बटाट्यांच्या रोगा'वरील यांचें संशोधन फारच महत्त्वाचें समजण्यांत येतें. यांनीं शोधून काढलेल्या बऱ्याच हरिद्-द्रव्यहीन वनस्पतींना 'आजरेकर' म्हणूनच शास्त्रीय ग्रंथांत संबोधण्यांत येतें.

यामुळें यांची मानमान्यता विशेष वाढली. यांनीं आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें 'इंडियन बोटॅनिकल सोसायटी' या नांवाची संस्था काढली. शिवाय त्या संस्थेतर्फे निघणाऱ्या मासिकाच्या संपादकमंडळांतील हे प्रमुख आहेत. तसेंच अलाहाबाद येथील 'नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्स' या संस्थेचे हे फेलो होते. शिवाय हिंदुस्थानांत शुद्ध शास्त्रीय संशोधनास वाहिलेल्या दोन संस्थांपैकीं 'धि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस ऑफ इंडिया' या संस्थेच्या संस्थापकांपैकीं हे एक होत. तसेंच मुंबई व आंध्र विश्वविद्यालयानें यांना आपल्या शास्त्रीय विषयांच्या कमिट्यांवर नेमिलें आहे.

यांचें वाचन व नवेंनवें संशोधन आकलन करण्याचें काम सतत चालू असतें. त्याचप्रमाणें मराठी भाषेंत लेखन करून आपलें ज्ञान लोकांना देण्याचें कामहि हे करीत असतात. महाराष्ट्र ज्ञानकोशांतील वनस्पतींच्या रोगांवरचा निबंध यांनींच लिहिलेला आहे.

तसेंच नागपूरच्या नवभारत ग्रंथमालेंत 'वनस्पति-जीवन' हें यांचें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. तसेंच केवळ शास्त्रीय ज्ञान लोकांना देण्याकरितांच मराठी भाषेंत निघणारें 'सृष्टिज्ञान' हें मासिक चालविण्यांत यांचा हात आहे. त्यांत यांचे बरेच लेख प्रसिद्ध झाले आहेत. हें सर्वच लेखन उच्च दर्जाचें आहे.

हिंदवी लोक कोणत्याहि संशोधनाच्या व जबाबदारीच्या कामावर काम करण्यास सर्वतोपरि लायक आहेत असें यांचें आग्रहाचें प्रतिपादन असून सरकारनें युरोपियनांच्या तोडीनें हिंदवी गृहस्थांना लायकीप्रमाणें या जागा द्याव्यात याबद्दल हे वरिष्ठांशीं नेहमीं झगडत असत. त्याबाबत आपल्यावर वरिष्ठांचा राग होऊन आपलें नुकसान होईल किंवा काय याची पर्वा यांनीं कधींच केली नाहीं. या दृष्टीनें, १९१८ सालीं लार्ड इस्लिंग्टन यांचे अध्यक्षतेखालीं जें 'पब्लिक सर्व्हिस कमिशन' सरकारनें नेमिलें त्या कमिशनपुढें यांची झालेली साक्ष फारच मुद्देसूद, दणदणीत व महत्त्वाची आहे.

सेवानिवृत्त होऊन हे पुण्यास राहूं लागल्यानंतर यांच्या ज्ञानाचा, अभ्यासाचा आणि अभ्यासू वृत्तीचा अनेक संस्थांना फायदा मिळत असतो.

आठल्ये, कृष्णाजी नारायण—(जन्म स.१८५२–मृत्यु स. १९२७) कवि, टीकाकार व निबंधकार. टेंभू (जि. सातारा) येथें जन्म. वडील दशग्रंथी वैदिक असल्यानें यांनाहि घरीं तेंच शिक्षण मिळालें. कऱ्हाड येथें मराठी शिक्षण पुरें करून हे इंग्रजी शाळेंत गेले. पण द्रव्याच्या अडचणीमुळें तें सोडून यांनीं पुण्यास येऊन ट्रेनिंगचें शिक्षण घेतलें. सातारा जिल्ह्यांत पांच वर्षें शिक्षकाची नोकरी पत्करली. पण पुढें चित्रकलेचें अधिक शिक्षण घेण्याकरितां हे मुंबईच्या जे. जे. आर्ट स्कूलमध्य सुमार तीन वर्षें राहिले व यांनीं तैल-चित्रकलेचें ज्ञान संपादिलें. मध्यंतरी सातारच्या आबासाहेब महाराजांनीं यांच्याकडून आपली एक मोठी तसबीर करून घेतली. तो अभ्यास पुरा झाल्यावर हे बडोद्यास गेले व तेथें हायस्कुलांत रंगकलेवर यांचें एक व्याख्यान झालें. तें व्याख्यान दिवाण सर टी. माधवराव यांना इतकें आवडलें कीं त्यांनीं यांस दरमहा शंभर रुपये पगारावर आपणांकडे ठेवून घेतलें. आणि आपल्या बैठकीच्या शेजारील खोली यांना काम करावयास दिली. त्या ठिकाणीं यांनीं श्री. जन्नाबाईसाहेब गायकवाड, ताराबाबा सावंतवाडीकर, रघुनाथराव भोसले सावंतवाडीकर, डॉ. भालचंद्र, रावबहादूर कीर्तने यांच्या तसबिरा चितारल्या. पुढें राजे सर टी. माधवराव दिवाणगिरीचें काम सोडून मद्रासेस गेले, त्यांच्याबरोबर हेहि तिकडे गेले. तेथून यांचे एक बंधू मलबारांत कोचीनास आजारी असल्यामुळें हे कोचीनास गेले. तेथें हे वीस वर्षें राहिले. तेथें व्हालकार्ट नांवाच्या कंपनीचे मॅनेजर क्लेन यांचे हे हिंदुस्थानी भाषा शिकविणारे पंडित होते.

तेथें स्थिर झाल्यावर गीतेवर नाना वृत्तांत 'गीता-पद्यमुक्ताहार' नांवाचें पुस्तक यांनीं लिहिलें. हेंच यांचें पहिलें पुस्तक होय. या पुस्तकाबद्दल निर्णयसागर छापखान्याच्या मालकांनीं यांच्या हातांत बारा तोळ्यांचें सोन्याचें कडें घालून यांचा सन्मान केला. याच वेळीं शृंगेरीपीठाच्या शंकराचार्यांकडून यांस 'महाराष्ट्रभाषाचित्रमयूर' ही पदवी अर्पण करण्यांत आली. त्यानंतर यांनीं 'केरळ-कोकीळ' मासिक सुरू केलें. प्रथम पांच वर्षें हें कोचीनास निघे व नंतर मुंबईस गुर्जर कंपनीकडून निघूं लागलें. हें

मासिक त्या वेळीं आबालवृद्धांना अत्यंत प्रिय असे. त्या वेळीं याचे तीन हजारांवर वर्गणीदार असत. कविता, पुस्तकपरीक्षण, लोकोत्तर चमत्कार या सदरांवर लोकांच्या फार उड्या पडत. तें पंचवीस वर्षे चालवून यांनीं मराठी वाचकांत वाङ्मयाची अभिरुचि उत्पन्न केली. 'कलमबहाद्दरांना शेलापागोटें' हें यांचें सदर निःस्पृह पण विघातक असे. यांची भाषा हृद्य व आकर्षक असे. वादकुशल टीकाकार म्हणून यांची ख्याति होती. यांचें वाङ्मयः- १ ब्रह्मचर्याश्रम, २ सुलभवेदान्त, ३ कर्मयोग, ४ गीता-(आर्याबद्ध), ५ सार्थ दासबोध, ६ राजयोग, ७ ज्ञानेश्वरी-सार्थ, ८ ग्रहदशेचा फटका, ९ मथुरा-गणेशसौभाग्य, १० माहेरचें मूळ-काव्य, ११ मुलीचा समाचार-काव्य, १२ शृंगारतिलकादर्श-काव्य, १३ सासरची पाठवणी-काव्य, १४ सुश्लोकलाघव-काव्य, १५ पंचतंत्रामृत-कादंबरी, १६ विवेकानंदजीवन, १७ मुलें थोर कशीं करावीं ? १८ ज्ञानेश्वरांचें गौडबंगाल, १९ माझें कलसूत्री घर अथवा नरदेहाची रचना, २० नजरबंदशिक्षक, २१ माझें गुरुस्थान, २२ वसंतपूजा, २३ समर्थांचें सामर्थ्य, २४ फाकडे तलवारबहाद्दर, २५ गीता पद्य-मुक्ताहार (अ. म. वा. से.).

आनंदाचार्लू, पी., रावबहादूर—(मृत्यु स. १९०८).

काँग्रेसच्या मूळ संस्थापकांपैकीं एक. हे नागपूरच्या (१८९१) काँग्रेसचे अध्यक्ष होते. हे उत्तम वक्ते होते. स्वयंसैनिकदलांत हिंदी लोकांना घेत नव्हते याबद्दल लोकांचीं अन्तःकरणें थरारून सोडणाऱ्या भाषणानें यांनीं निषेध व्यक्त केला. 'आर्मीनियन, निग्रो, पश्चिम आफ्रिकेतील मोलाटो वगैरे मानवी समाजांत कोठेंहि मानाचें स्थान नसलेल्या व कलकत्त्यासारख्या गल्ल्याकुच्च्यांतून भटकत फिरणाऱ्या लोकांना हिंदी स्वयंसेवकदलांत प्रवेश मिळतो, आणि ते आमच्या घरादारांचे संरक्षक बनतात. पण हिंदी लोकांचा मात्र स्वयंसेवकदलांत प्रवेश होत नाहीं. सरकारनें हे असे चीड अणणारे वर्णभेद निर्माण केले आहेत,' असे जळजळीत उद्गार यांनीं काढले. वीस वर्षांहून अधिक काल यांनीं देशाची सेवा केली (राष्ट्रीय सभेचा इतिहास पा. ८६).

आपटे, गोविंद विनायक—(मृत्यु स. १९२५) इतिहाससंशोधक. यांनीं (१) आपटे घराण्याचा इतिहास, (२) पटवर्धन घराण्याचा इतिहास, (३) बरवे घराण्याचा इतिहास, (४) निर्मळक्षेत्रवर्णन, (५) श्रीक्षेत्र वाईवर्णन, (६) न्यायाचा मासला-हीं पुस्तकें लिहिलीं आहेत (अ. म. वा. से.).

आपटे, गोविंद सदाशिव—(जन्म स. १८७०-मृत्यु स. १९३७) सुप्रसिद्ध ज्योतिषशास्त्रज्ञ.

यांचा ज्योतिषशास्त्राचा व पंचांगाचा व्यासंग जबर होता. हे मुळचे सातारचे राहणारे. यांचें मॅट्रिकपर्यंत शिक्षण पुण्यास झालें व पुढचें शिक्षण उज्जयिनी येथें माधव कॉलेजांत झालें. ग्वाल्हेर व उज्जयिनी येथें सायन्स, गणित व विशेषतः रसायनशास्त्राचे हे प्रोफेसर होते. १० वर्षे हे माधव कॉलेजचे प्रिन्सिपल होते. कॉलेजांत काम करीत असतांना यांना ज्योतिषशास्त्राचा नाद लागला. हे १९०४ सालीं मुंबईस झालेल्या अखिल भारतीय पंचांग सभेस उज्जयिनीचे प्रतिनिधी म्हणून हजर होते. १९२५ सालीं पुणें येथें झालेल्या पंचागसभेंत शुद्ध पंचांग पक्षातर्फे हे पंच होते. यांनीं 'ज्योतिर्गणितवार्तिक' व 'सर्वानंद करणकम्' इत्यादि संस्कृत व मराठी ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले आहेत.

'सर्वानन्दकरणम्' हा यांचा करणग्रंथ बनारस हिंदु-विश्वविद्यालयांत व बनारस गव्हर्नमेंट संस्कृत कॉलेज-मध्यें आचार्यपरीक्षेस नेमिला आहे.

हे एम्. ए., बी. एस्सी. असून यांचे ग्रंथ ग्रह-लाघवाच्या धर्तीवर आहेत. त्यांत यांनीं सूक्ष्मता साधण्याकरितां आधुनिक सुधारणा समाविष्ट केल्या आहेत. उज्जयनीच्या वेधशाळेंत स्वतः वेध घेऊन यांनीं हे ग्रंथ लिहून प्रसिद्ध केले असल्यानें त्यांना विशेष महत्त्व आहे. तसेंच प्रथम संस्कृतभाषेंत लिहिल्यानें सर्व प्रान्तांत त्यांचा प्रसार होण्यास मदत झाली आहे. सर्वानन्द-लाघवाचें यांनीं स्वतःच मराठींत भाषान्तर केलें. हिन्दींतहि पं. मुकुंद वल्लभ मिश्र यांनीं भाषान्तर केलें.

तसेंच यांच्या पंचांग जलद तयार करण्यास उपयुक्त असणाऱ्या 'पंचांगचिंतामणि' व 'ग्रहचिंतामणि' या दोन सारण्या 'पुणें ज्योतिषशिक्षण महाविद्यालया'नें प्रसिद्ध केल्या आहेत. शिवाय यांनी "The Initial Point of Our Zodiae" या नांवाचें इंग्रजी पुस्तकहि प्रसिद्ध केलें आहे. यांना सरकारनें रावसाहेब व शके १८३७ च्या ज्योतिषसंमेलनानें 'गणकचूडामणि' ही पदवी दिली होती.

आपटे, दत्तात्रय विष्णु—(जन्म स. १८८०-मृत्यु स. १९४३) सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक.

यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण जमखिंडी येथें झालें व फर्ग्युसन कॉलेजमधून हे बी. ए. झाले (१९०२).

वंगभंगाचे चळवळींत हे यवतमाळ (वऱ्हाड) येथें राष्ट्रीय शाळेंत काम करीत व 'हरिकिशोर' या साप्ताहिकांत लिहीत. पण दडपशाहींत तें सर्व बंद पडून हे मुंबईस 'राष्ट्रमत' दैनिकाच्या संपादकवर्गांत आले. पण तेंहि बंद पडल्यावर हे गोव्यांत शिक्षक म्हणून गेले. तेथें हे पोर्तुगीज भाषा शिकले. पण पहिल्या महायुद्धास सुरुवात झाल्यावर तेथें राहणेंहि यांना अशक्य झालें, व हे पुण्यास आले व तेथेंच आमरण राहिले.

पुण्यास आल्यावर हे कांहीं दिवस 'चित्रमयजगत्' व 'शालापत्रक' या मासिकांचें संपादकीय काम पाहत. पण असहकारितेच्या चळवळींत तेथील धोरण यांना जमेनासें झालें. तेव्हां यांना आनंदाश्रमांत प्रेसचे व्यवस्थापक म्हणून काम मिळालें. याच वेळीं मुधोळच्या महाराजांनीं यांच्याकडून 'मुधोळच्या राजघराण्याचा इतिहास' लिहून घेतला.

हे दिखाऊ राष्ट्रभक्त नसून हाडाचे तत्त्वज्ञ राष्ट्रभक्त होते. इतिहास-संशोधक राजवाडे यांचे हे शिष्य असल्यानें यांच्या राष्ट्रभक्तीला ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचा पाठिंबा होता. शास्त्रशुद्ध व्यासंग ही राष्ट्राची खरी संपत्ति होय, असा यांचा विश्वास असे. या धोरणानें सतत निरपेक्ष व्यासंग करणें आणि व्यासंगी लोकांना व्यासंग करण्यास उत्तेजन देणें ही यांची भूमिका होती. यामुळें यांच्याभोंवतीं व्यासंगी लोकांची एक प्रभावळ उत्पन्न झाली.

यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचें सखोल अध्ययन केलें होतें, आणि त्यांत एक प्रकारची शिस्त होती.

यांचे ग्रंथ–१ इतिहासमंजिरी, २ श्रीरंगपट्टणची मोहीम, ३ शिवचरित्रप्रदीप, ४ शिवभारताची प्रस्तावना, ५ घोरपडे घराण्याचा इतिहास, ६ शिवचरित्र-निबंधावलि, ७ पत्रसारसंग्रह.

हें यांचें लेखन व संकलन इतिहासाच्या सूक्ष्म अभ्यासाला मार्गदर्शक झालें आहे. यामुळेंच यांना पुण्याच्या भारत-इतिहास-संशोधकमंडळाच्या सन्माननीय आजीव सभासदत्व आणि मंडळाच्या उपाध्यक्षाचा मान देण्यांत आला होता. सतत व्यासंगानें व निष्ठावंत शिष्य तयार करून राजवाडे-सांप्रदायाची परंपरा यांनीं पुढें चालविली होती.

इतिहास विषयाप्रमाणेंच गणित-ज्योतिषाचाहि यांना नाद असे. त्या दिशेनें यांनीं शिवाजीच्या वेळच्या ज्योतिष-संशोधनाच्या प्रयत्नाचा उलगडा केला. खरे जंत्रीचें महत्त्व इतिहाससंशोधकांस पटवून दिलें. तसेंच करणकौस्तुभ, बीजगणित, लीलावती इत्यादि ग्रंथांचें विवरण केलें. अलीकडे भास्कराचार्यांच्या संस्कृत ग्रंथाचें सर्वांना समजेल असें सटीप भाषांतराचें काम यांनीं अंगावर घेतलें होतें. तें जवळजवळ संपवीत आणलें होतें. याशिवाय टिळक-पंचांगाचे दृष्टीनेंहि यांनीं बरेंच लिखाण केलें आहे. अगदीं अलीकडे हे केरोपंती ग्रहसाधनावरून सूर्यग्रहणाचें सूक्ष्म गणित कसें बसवावें या कामगिरींत गुंतले होते. या बाबतींत अनेक अभ्यासकांशीं विचार-विनिमय करून व गणिताच्या सर्व पद्धती तपासून पाहून केरोपंती ग्रहसाधनाला यांनीं मानाचें स्थान दिलें होतें.

आपटे, नारायण हरि—(जन्म स. १८८९) सुप्रसिद्ध ध्येयवादी कादंबरीकार व लघुकथालेखक.

सातारा जिल्ह्यांतील समडोळी गांवीं यांचा जन्म झाला. तेथें प्राथमिक व सातारा येथें इंग्रजी ४ इयत्तेपर्यंत यांचें शिक्षण झालें. स. १९०४ मध्यें हे घरांतून पळाले व एक वर्षपर्यंत हे हिंदुस्थानांत फिरत होते. स. १९०५–११ पर्यंत यांचें वास्तव्य जयपूर येथें होतें. स. १९०६ मध्यें हरि नारायण आपट्यांच्या करमणूक पत्रांत यांची पहिली गोष्ट प्रसिद्ध झाली. स. १९०९ मध्यें यांची 'अजिंक्य तारा' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. आणि महाराष्ट्रांत लेखक म्हणून हे पुढें आले. तेव्हांपासून आतांपर्यंत यांनीं सतत लेखन करून विपुल ललित वाङ्मय निर्माण केलें आहे आणि तें अत्यंत लोकादरास पात्र झालें आहे.

हे 'किर्लोस्कर' मासिकाचे कांहीं वर्षे सहसंपादक होते. तसेंच यांनीं 'मधुकर' नांवाचें मासिकहि पुष्कळ वर्षें चालविलें.

यांच्या कादंबऱ्यांत सर्वांत जास्त लोकप्रियता मिळालेलें पुस्तक या नात्यानें "न पटणारी गोष्ट अर्थात् चित्तशुद्धि" यास विशेष महत्त्व आहे. "कुंकू" या सुप्रसिद्ध चित्रपटाचें कथानक यांनीं या कादंबरीवरून तयार केलें व त्यामुळें यांना कीर्तीचा व तो चित्रपट तयार करणाऱ्या प्रभात फिल्म कंपनीस पैशाचा अतोनात लाभ झाला. या चित्रपटाचें दिग्दर्शन व्ही. शांताराम यांनीं केलें असून केशवराव दाते व शांता आपटे या कलाकारांच्या त्यांत भूमिका होत्या. सध्यां चित्रपटसृष्टींत इतर कलाकारांच्या मानानें कथालेखकास तुच्छ लेखण्यांत

येत असलें, तरी "कुंकू"च्या प्रचंड यशांत यांचा वांटा बराच मोठा होता हें निःसंशय.

याशिवाय "पहाटेपूर्वीचा काळोख" व "भाग्यश्री" या कादंबऱ्याहि त्यांतील लालित्य, वास्तवता इत्यादि गुणांमुळें लोकप्रिय झाल्या आहेत.

कथालेखन हा ह्यांच्या लेखनाचा दुसरा एक महत्त्वाचा प्रांत आहे. यांच्या कथाहि यांच्या कादंबऱ्यांप्रमाणें मांडणी व संदेशाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असतात. आरामविराम, सुमनगंध इत्यादि यांचे लघुकथासंग्रह सुप्रसिद्ध आहेत.

आजच्या तरुणांच्या गरजा, परिस्थिति व मनाची घडण ध्यानांत घेऊन, त्यांच्याशीं वाटाघाट करून एक वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध गृहस्थ या नात्यानें यांनीं त्यांना केलेल्या सूचनांनीं यांच्या वाङ्मयाचा बराच मोठा भाग व्यापिला आहे. इकडील परिस्थितीचा, आपल्या धर्माचा, संस्कृतीचा व आर्थिक घडामोडीचा विचार करून यांनीं पुस्तकें लिहिलेलीं असल्यानें तीं अतिशय लोकप्रिय झालीं आहेत. 'सुगरिणीचा संसार', 'गृहसौख्य' इत्यादि पुस्तकें या वर्गांत येतात.

यांचें लेखन आकर्षक, ठसठशीत आणि परिणामकारक असतें. कथानकें साधीं आणि स्वाभाविक असतात. त्यांची मांडणी करतांना यांची कुशलता व्यक्त होते. स्वभावरेखन पटणारें असतें आणि वर्णनांत मर्यादातिक्रम कोठेंहि नसतो. 'कलेकरितां कला कां जीवनाकरितां कला' अशा वादांत हे कधींच पडत नाहींत. पण आपल्या लेखनानें मात्र 'जीवनाकरितां कला' हा आपला सिद्धान्त हे डोळ्याआड कधींहि होऊं देत नाहींत. त्यामुळें यांचें लेखन हें समाजाला केवळ घटकाभर करमणुकीचें न वाटतां कायमचें लाभदायक वाटतें.

हे सिद्धहस्त लेखक आहेत. यांना कथानकें निवडण्याकरितां भोंवतालच्या परिस्थितीला सोडून अंतराळांत जावें लागत नाहीं. हे रोजच्या घरगुती प्रसंगांतून लोकांच्या मनाला हलवून सोडणाऱ्या सुंदर कथा, कादंबऱ्या निर्माण करतात. यांची लेखनशैली व मांडणी स्वयंभू आहे. यांना संस्कृत किंवा युरोपांतील लेखकांचा आश्रय न घेतां भावनापूर्ण कथा लिहितां येतात.

यांच्या या यशस्वीपणानें कांहीं आत्मविश्वास नसलेल्या लेखकांनीं यांच्यावर भाषांतराचा किंवा चौर्याचा आरोपहि केला; पण हे त्या सर्व प्रसंगांतून सुखरूप बाहेर पडले आहेत, व आरोप करणारेच फजीत झाले आहेत.

जें तंत्र लोकप्रिय असेल तें घेऊन आपलीं कथानकें लोकांपुढें हे मांडूं शकतात. तसेंच इष्ट प्रमेय डोळ्यांपुढें ठेवून तें गणिताप्रमाणें आपल्या कथानकांतून सहज सिद्ध करून दाखवितात. त्यामुळें यांच्या कादंबऱ्या एक ठशाच्या कधींच भासत नाहींत.

वयाच्या दृष्टीनें जुन्या पिढींतील परंतु विचारांच्या दृष्टीनें मात्र नवतरुणांच्या इतकेच पुढारलेल हे लेखक असल्यानें हे नव्या-जुन्यांत सारखेच लोकप्रिय आहेत. यांची भूमिका गंभीर विचारवाद्याची आहे. केवळ प्रक्षोभक विचार व्यक्त करण्यापेक्षां संयमपूर्वक विचारांच्या सर्व बाजू भावनात्मकतेनें लोकांच्या पुढें मांडण्याचें काम हे करतात. कारण खपेल तें लिहावें अशी यांची वृत्ति नाहीं व कधींच नव्हती.

आपटे, महादेव चिमणाजी—(जन्म स. १८४५–मृत्यु स. १८९४) आनंदाश्रमाचे संस्थापक.

प्रथमपासूनच बुद्धिमान् व अभ्यासू वृत्ति असल्यामुळें घरच्या आत्यंतिक गरिबींतहि स. १८६८ सालीं ते बी. ए. झाले, व पुढें १८७१ च्या एलएल्. बी. च्या परीक्षेंतहि पास होऊन हे पहिले आले. पुढें मुंबईच्या नानाशंकरशेटच्या शाळेंत हेडमास्तराचें काम करून उत्कृष्ट शिक्षक म्हणून ह प्रसिद्धीस आले. यांच्या योग्यतेनुरूप सरकारकडून यांना युनिव्हर्सिटीचे फेलो नेमण्यांत आलें. पुढें वकिली करावयास लागल्यानंतरहि मुंबईचे प्रख्यात कायदेपंडित म्हणूनहि हे समजले जाऊं लागले. क्रीडाभुवनाच्या दंग्याच्या खटल्याचें काम यांनीं इतक्या सफाईनें चालविलें कीं, मॅजिस्ट्रेटनें खटल्याचा निकाल यांच्या विचारसरणीप्रमाणेंच दिला.

देशाच्या कलाकौशल्याच्या वृद्धीबद्दल यांना फार कळकळ वाटत असे. ह्या कलाकौशल्याच्या शिक्षणासाठी यांनीं एका गृहस्थास खरचीनें विलायतेंत व अमेरिकेंत पाठविलें होतें. त्याचप्रमाणें पुण्यांत चाकू-काड्यांचा कारखाना काढण्याची यांची खटपट चालली होती. परंतु ह्या दोन्ही कार्यांत बराच द्रव्यनिधि खर्च होऊनहि फायदा झाला नाहीं. पुणें येथील 'आनंदाश्रम' ही संस्कृत ग्रंथांच्या जीर्णोद्धारार्थ काढलेली संस्था यांनींच प्रस्थापित केलेली आहे. त्याचप्रमाणें या संस्थेंत अभ्यास करणाऱ्या १०–१२ विद्यार्थ्यांची जेवणाची व राहण्याची आणि प्रत्यहीं पांच संन्याशांच्या पुडीची व्यवस्थाहि यांनीं करून ठेवलेली आहे.

यांचें मराठी लेखनहि चांगलें असे. " मौजेच्या चार घटका " हें शाकुंतल नाटकाचें यांनीं केलेलें भाषांतर प्रसिद्ध आहे.

यांच्या इच्छेप्रमाणें आनंदाश्रमांत यांनीं आपल्यासाठीं एक समाधि बांधून ठेविली होती. पुढें संन्यास घेतल्यावर ' आनंदसरस्वती ' हें नांव धारण केल्यावर हे २२ ऑक्टोबर १८९४ रोजीं मुंबईस समाधिस्थ झाले. पुढें यांचें शव पुण्याच्या आश्रमांतील समाधींत स्थित केलें गेलें.

आपटे, वामन शिवराम—(जन्म स. १८५८–मृत्यु स. १८९२) सुप्रसिद्ध बुद्धिमान्, विद्वान्, त्यागी व शिस्तीचे गृहस्थ. यांचे वडील जामिनकींत बुडाले व त्या धक्क्यानें ते वारले. यांचा वडील भाऊ कॉलऱ्यानें वारल्यानें आईहि धाय मोकलून वारली. तेव्हां हेडमास्तर कुंटे यांच्या आश्रयावर यांनीं आपला अभ्यास पार पाडला.

मॅट्रिकमधील पहिली जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप यांनीं मिळविली (१८७३). बी. ए.ला आपला आवडता संस्कृत विषय सोडून केवळ शब्द खरा करण्याकरितां यांनीं गणित विषय घेतला व त्यांत पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. आवश्यक म्हणून असलेल्या संस्कृत विषयांतहि ' भाऊ दाजी ' प्राइज मिळविलें. एम्. ए.च्या परीक्षेंतहि 'भगवानदास ' शिष्यवृत्ति मिळविली.

पुढेंहि सरकारी नोकरीच्या मोहांत न पडतां न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांना येऊन हे मिळाले. हे मागाहून येऊन मिळाले तरी सुपरिंटेंडेंटची नवी जागा निर्माण करून यांच्या ताब्यांत शाळेची सर्व व्यवस्था सोंपविण्यांत आली. यांनींहि शाळेचें काम इतक्या उत्कृष्ट शिस्तीनें चालविलें कीं सरकारी हायस्कूलवर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. यांच्या परिश्रमांमुळें जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप लागोपाठ पांच वर्षें यांच्या शाळेलाच मिळाली. स. १८८२ सालीं सरकारनें नेमलेल्या शिक्षणसमितीपुढें यांची अत्यंत महत्त्वाची साक्ष झाली. पुढें कॉलेज निघालें तेव्हांहि यांनाच प्रिन्सिपल करण्यांत आलें (१८८५).

केसरी व मराठा यांच्या उद्देश पत्रकावर यांची सही आहे, पण पुढें पत्रांच्या कर्जबाजारीपणामुळें यांनीं आपला त्यांशीं संबंध सोडला.

या कार्याबरोबरच संस्कृतकोश व "The Student's Guide to Sanskrit Composition" हीं यांचीं इंग्रजी पुस्तकें यांची कीर्ति चिरकाल टिकविणारीं आहेत. यांच्या गाइडमधील संस्कृतभाषेंतील वाक्यरचनेची माहिती अगदीं नवीन असून त्यावरून यांची सूक्ष्म बुद्धिमत्ता ध्यानांत येते. त्यामुळें हा ग्रंथ हिंदुस्थानांत व हिंदुस्थानच्या बाहेर अभ्यासक्रमांत दाखल झाला आहे.

आपटे, वासुदेव गोविंद—(जन्म स. १८७१–मृत्यु स. १९३०).

टीकाकार, कोशकार, संपादक व बालवाङ्मयकार. जन्म पूर्व खानदेशांत धरणगांव येथें झाला. मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण धुळें येथें व पुढील उच्च शिक्षण इंदूर व नागपूरचें हिस्लाप कॉलेज येथें झालें. स. १८९३ सालीं कलकत्ता-विश्वविद्यालयाचे हे बी. ए. झाले. या परीक्षेचा अभ्यास करीत असतां यांनीं बंगाली भाषेचा अभ्यास केला. पुणें नूतन मराठी विद्यालयांत चार वर्षें व मुंबईस सेक्रेटरीएटमध्यें रिपोर्टर ऑफ धी नेटिव्ह प्रेस या जागेवर फक्त दहा महिने काम केलें. वरीष्ठ अधिकाऱ्यांशीं न पटल्यानें यांना राजिनामा द्यावा लागला. नंतर हे इंदूरच्या राजकन्येस शिकविण्याकरितां अलाहाबादेस गेले. तेथें मॉडर्न रिव्ह्यूचे संपादक रामानंद चतर्जी यांच्याशीं यांचा परिचय झाला. व त्यांच्या मासिकांत हे अखेरपर्यंत मराठी पुस्तकांचें परीक्षण करीत होते. अलहाबादेस असतां मिसेस हेन्री वुडच्या ' ईस्टलिन ' व ' मिसेस हॅलिबर्टन्स ट्रबल्स ' या कांदबऱ्यांची ' माणिकबाग ' व ' दुःखाअंतीं सुख ' या नांवानें मराठींत रूपान्तरें केलीं.

नंतर ना. गोखल्यांनीं यांना ज्ञानप्रकाशचे संपादक केलें व तो यांनीं दैनिक केला. पण प्रकृतीच्या तक्रारीमुळें एक वर्षानंतर संपादकत्व सोडून पुणें येथील नूतनमराठी विद्यालयांत हे आजन्मसेवक झाले. स. १९१० पर्यंत हे तेथें होते.

वि. को. ओकांच्या ' बालबोध ' मासिकाचे हे चहाते होते. त्यांत यांनीं कांहीं सुधारणा सुचविल्या व स्वतः साहाय्य करूं का म्हणून पृच्छा केली. पण ओकांना तें न पटून दुसऱ्याची ओळहि नको असल्याचें त्यांनीं सांगितलें. तेव्हां मुलांकरितां यांनीं ' आनंद ' मासिक काढलें (१९०६). टपालापासून ते लेखनापर्यंत सर्व कामें करून व पैशाची झीज सोसून यांनीं ' आनंद ' नांवारूपाला आणलें.

स. १९१० सालीं प्रकृति बिघडली. ती थोडी बरी झाल्यावर 'चंद्रावती महिला विद्यालय, इंदूर' येथें नोकरी पत्करली. पुढें मल्हारीमार्तंडाचें संपादकत्व पांच वर्षें केलें. पुढें राजिनामा देऊन पुण्यास आले. स. १९२२ सालीं यांचा मुलगा वारल्यानें यांच्यावर औदासीन्याची छाया

पसरली. १९२७ सालीं टिळक-महाविद्यालयांतील अध्यापन सोडले. पत्नी व कन्या यांसह काशीयात्रा केली.

यांनीं स. १९२० सालीं विलायतेंतील मुलांच्या साप्ताहिकाच्या धर्तीवर 'विचारसाधन' नामक एक वर्तमानपत्र काढलें होतें. पण तें फार दिवस चालू शकलें नाहीं. महाराष्ट्र-साहित्यपरिषदेचे हे दहा वर्षें चिटणीस होते.

यांचें वाङ्मयः— १ माणिकबाग, २ दुःखाअंतीं सुख, ३ नवयुग, ४ मूर्तिमंत देशाभिमान, ५ विलक्षण भोळेपणा, ६ पेशवाईची हकीगत, ७ लेखनकला, ८ ज्ञानदीप, ९ मराठ्यांचा दरारा, १० गांधीगीता, ११ महाराष्ट्राचा बाळबोध इतिहास, १२ हिंदुस्थानचा मनोरंजक इतिहास, १३ मुलांकरितां गोड गाणीं, १४ एक दिवसाचे सुटींत, १५ चित्तरंजन भाग १–२, १६ मनी व मोत्या, १७ रवीचे उज्ज्वल किरण, १८ मौजेच्या गोष्टी, १९ वीरांच्या कथा, २० मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी, २१ बालोद्यान पद्धतीचें शिक्षण, २२ अशोक, २३ जैनधर्म, २४ बौद्धपर्व, २५ नाट्यरूप भारतवर्ष, २६ विचार-सौंदर्य, २७ नाट्यभारत, २८ नाट्य रामायण, २९ बाल-भारत, ३० बाल भागवत, ३१ महाभारतांतील सोप्या गोष्टी, ३२ मराठी बंगाली शिक्षक, ३३ रामायणांतील सोप्या गोष्टी, ३४ सौंदर्य आणि ललितकला, ३५ राष्ट्रीय शिक्षणाचें वाचन-पुस्तक, ३६ विविधज्ञानसंग्रह, ३७ टापटिपीचा संसार, ३८ महर्षींचा प्रसाद द्रोण, १-२, ३९ हरनाथ ठाकूर खंड १, ४० मराठी शब्दरत्नाकार (कोश), ४१ वाल्मीकींचा जय, ४२ भारतकन्या, ४३ [illegible] बंकीमचंद्र खंड १, २, ३, ४.

यांचें लेखन विपुल, विविध आणि परिश्रमपूर्वक केलेलें आहे. भाषान्तर, रूपान्तर आणि स्वतंत्र असे सर्व प्रकार यांच्या लेखनांत आहेत. कादंबऱ्यांत यांच [illegible] रूपान्तर-कौशल्य व भाषाप्रभुत्व व्यक्त होतें. [illegible] गोष्ट सुबोध रीतीनें सांगण्याची हातोटी यांना [illegible] साधली होती. त्यामुळें यांचें बाल-वाङ्मय अत्यंत [illegible] झालें. बालवाङ्मयामुळेंच यांचें नांव सर्वतोमुखीं [illegible]. यांचें लेखन शिस्तवार, रेखीव आणि अभ्यास-[illegible] लिहिलेलें आहे. यांचें लेखनकार्य श्रद्धेनें आणि [illegible] दृष्टी ठेवून झालेलें आहे. त्यामुळें तें चिरस्थायी [illegible]. कादंबरी कायम चालावा अशी यांनीं व्यवस्था करून [illegible] आहे. श्री. गोपीनाथ तळवलकर तें काम उत्कृष्ट [illegible] करीत आहेत (अ. म. वा. से.).

आपटे, विष्णु गोपाळ—(१८५१–१८९९).

वैद्यकीय ग्रंथाचे लेखक. कोल्हापूर येथील रहिवाशी असून दरबारचे असिस्टंट सर्जन होते. निष्णात वैद्य म्हणून यांची कीर्ति होती. यांनीं ग्रामवैद्य, प्रसूति-चिकित्सा व न्यायवैद्यक हीं पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं आहेत (अ. म. वा. से.).

आपटे, हरि नारायण—(जन्म स. १८६४–मृत्यु स. १९१९).

मराठी भाषेंतील अत्यंत प्रसिद्ध असणारे कादंबरीकार, लघुकथालेखक, नाटककार व कार्यकर्ते.

वयाच्या १४ व्या वर्षानंतर हे जेव्हां पुण्यास आले त्या वेळीं हे इंग्रजी चवथींत होते. ह्याच वेळीं यांनीं मेडोज टेलरच्या एका कादंबरीचें मराठींत भाषांतर करून वाङ्मयक्षेत्रांत पदार्पण केलें. कोणत्याहि भाषेंत यांची स्वाभाविकतः विशेष प्रगति दिसून येई. फ्रेन्च, जर्मन, बंगाली वगैरे भाषा यांनीं अल्पावकाशांत परिचित करून घेतल्या.

हे न्यू इंग्लिश स्कूलमधील आरंभींच्या विद्यार्थ्यांपैकीं एक होते. ह्याचं वेळीं प्रसिद्ध होत असलेल्या निबंधमालाद्वारां विष्णुशास्त्र्यांनीं मराठी भाषेस जें एक डौलदार स्वरूप देण्याचा प्रयत्न चालविला व त्यामुळें मालेची जी प्रशंसा होऊं लागली तिचा पगडा यांच्या कोंवळ्या मनावर पूर्णपणें बसून यांनींहि वाङ्मयमंदिरास सुशोभित करण्याचा निश्चय केला. विष्णुशास्त्री रेनॉल्डस्च्या कादंबऱ्या वाचीत आहेत हें समजतांच यांनीं त्या वाचण्याचा क्रम चालू ठेविला. ह्या त्यांच्या खडतर तपश्चर्येचें फळ यांना चांगलेंच मिळून यांचे डोळे कायमचे अधू झाले. गोपाळराव आगरकरांच्या 'विकारविलसित'—हॅम्लेटचें भाषांतर—ह्यावर यांनीं विद्यार्थिदशेंत असतांनाच ७२ पानी टीकात्मक लेख लिहिला होता. आपल्या विद्यार्थ्यानें लिहिलेल्या ह्या लेखाबद्दल आगरकरांना फारच कौतुक वाटलें. शेक्सपिअरचीं नाटकें व त्यांवरील विद्वानांचीं परीक्षणें ह्यांचा अभ्यास यांनीं आजन्म चालू ठेविला होता. शेक्सपिअर, कालिदास वगैरे महाकवींच्या ग्रन्थांचें हृद्गत उकलण्याची यांची हातोटी वाखाणण्याजोगी असे. यांचा संस्कृताचा व्यासंगहि चांगला असे. "शेक्सपिअर, कालिदास व भवभूति" ह्या मथळ्याखालीं प्रि. आगरकरांनीं एक लेख लिहून भवभूतीची योग्यता अधिक ठरविली होती. परंतु यांची कालिदासावर विशेष भक्ति असे. यांनीं त्या लेखास प्रत्युत्तर म्हणून 'बिचारा' ह्या सहीनें केसरीशीं एक पत्रव्यवहार करून

भवभूतीपेक्षां कालिदास अधिक श्रेष्ठ कसा ठरतो हें त्याच्या ग्रंथांतील उदाहरणांनीं यांनीं स्पष्ट केलें.

स. १८८३ मध्यें हे प्रवेशपरीक्षा पास झाले. त्यानंतर डेक्कन, फर्ग्युसन व पुनश्च डेक्कन वगैरे कॉलेजांतून हे ४-५ वेळां पी. इ.च्या परीक्षेस बसले. परंतु ह्या वेळीं इंग्लिश व संस्कृत पुस्तकें वाचण्याचा यांना बराच नाद लागला असल्यामुळें आणि गणित विषयाची आवड नसल्यामुळें हे उत्तीर्ण झाले नाहींत. डेक्कन कॉलेजच्या लायब्ररी व रीडिंग रूमची स्थापना झाली त्या वेळीं हे लायब्ररीस घ्यावयाच्या पुस्तकांची निवड करणारां-पैकीं एक होते. तेथील सर्व पुस्तकें यांनीं एक वर्षांत वाचून टाकलीं. पी. इ. परीक्षेंतील अपयशामुळें यांनीं तो नाद सोडून देऊन कादंबऱ्या लिहिण्यास सुरुवात केली. 'मधली स्थिति' (१८८५) ही यांची पहिली कादंबरी होय. ह्यानंतर 'गणपतराव', 'पण लक्षांत कोण घेतो' (१८९०-९३), 'यशवन्तराव खरे' (१८९२-९५), 'मी' (१८९३-९५), 'भयंकर दिव्य', 'मायेचा बाजार', 'जग हें असें आहे' (१८९७-९९), 'आजच' (१९०४-०६), 'कर्मयोग' (१९१३-१७) वगैरे सामाजिक कादंबऱ्या यांनीं क्रमानें लिहिलेल्या आहेत. त्याचप्रमाणें 'म्हैसूरचा वाघ' (१८९०-९१), 'उषःकाल' (१८९५-९७), 'सूर्योदय' (१९०५-०६), 'सूर्यग्रहण' (१९०८-०९), 'केवळ स्वराज्यासाठीं' (१८९८-९९), 'रूपनगरची राज्यकन्या' (१९००-०२), 'चंद्रगुप्त' (१९०२-०४), 'गड आला पण सिंह गेला' (१९०३), 'माध्याह्न' (१९०६-०८), 'कालकूट' (१९०९-११), व 'वज्राघात' (१९१३-१५) वगैरे ऐतिहासिक कादंबऱ्या यांनीं लिहिलेल्या आहेत. यांच्या सर्व कादंबऱ्यांत 'गणपतराव', 'कर्मयोग' व 'आजच' ह्या तीन सामाजिक आणि 'सूर्यग्रहण', 'माध्याह्न' व 'कालकूट' ह्या तीन ऐतिहासिक अशा ६ कादंबऱ्या अपुऱ्या राहिलेल्या आहेत. कथानकाची सुसंगत रचना, प्रसंगानुरूप उठाव, हुबेहूब वर्णन, यथार्थ स्वभाव-दिग्दर्शन वगैरे दृष्टींनीं यांच्या कादंबऱ्या पहिल्या प्रतीच्या ठरतात. कल्पनेनें निर्मित अशा कृत्रिम सृष्टीची स्वाभाविक सृष्टी-प्रमाणें बेमालुम बनावट करणें हा गुण यांना सहजसाध्य होता. यांच्या गुणदोषांचें विवेचन चतर्जी शरच्चंद्रावर पाहावें.

हे पुणें म्युनिसिपालिटीचे २० वर्षें सभासद व ३ वर्षें अध्यक्ष होते. यांच्या शांत व मिळूनमिसळून वागण्याच्या स्वभावामुळें यांनीं तेथें बरींच महत्त्वाचीं कामें केलीं. म्युनिसिपल बाबींत सरकारशींहि हे सामना करीत असत. स्कूल बोर्डाचे चेअरमन असतांना यांचीं शिक्षणविषयक व्याख्यानें शिक्षकांच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचीं होत. लोकल बोर्डाचेहि हे कित्येक वर्षें व्हाइस-प्रेसिडेंट होते. पुण्याच्या मद्यपाननिषेधक मंडळाचे हे सभासद असून अबकारी कमिटीपुढें लोकपक्षाची बाजू यांनीं उत्तम प्रकारें मांडली. नूतन मराठी विद्यालयासाठीं निःस्वार्थतेनें प्रयत्न करणारांत हे अग्रणी होते. हे सुधारक व प्रागतिक म्हणून गणले जात. वरील कादंबऱ्यांखेरीज यांनीं बरेंच वाङ्मय निर्माण केलें आहे.

यांचीं नाटकें—१ सन्त सखूबाई (संगीत), २ पिंगला (संगीत), ३ स्फुट गोष्टी-१-४ भाग, ४ कसे दिवस गेले? (ड्रेगच्या कहरांतील गोष्ट), ५ भासकवीच्या नाटककथा.

पत्रें—१ सगुणाबाईचीं आपल्या मुलीस.
२ गोविंदरावचीं आपल्या मुलास.

निबंध—१ विदग्ध वाङ्मय, २ मराठी वाङ्मयाचा अभ्यास: (मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेलें भाषण १९१२, अकोला).

यांनीं 'करमणूक' हें साप्ताहिक २८ वर्षें चालविलें व सुधारकपत्रहि यांनीं कांहीं दिवस चालविलें. यांच्या कादंबऱ्या व गोष्टी प्रथम करमणुकींत प्रसिद्ध झाल्यानंतर पुस्तकरूपानें काढण्यांत आल्या. यांचे सुधारकांतील लेखांचा संग्रह प्रसिद्ध झालेला नाहीं. यांच्या मृत्यूनंतर यांचे ग्रंथ आर्यभूषण प्रेसनें घेतले आणि कादंबऱ्यांच्या शाळा-कॉलेजकरितां संक्षिप्त आवृत्त्या काढल्या. यांचें चरित्र कु. वेणुबाई पानसे यांनीं लिहिलें आहे. तसेंच बापूजी मार्तंड आंबेकर हे यांचे रोजच्या बैठकींतील मित्र होते. त्यांनींहि यांच्यासंबंधीं लिहिलें आहे. वाग्भट नारायण देशपांडे यांनीं यांच्या वाङ्मयाचें रसग्रहण 'आठवणी व कादंबऱ्या' या पुस्तकांत केलें आहे.

हे महादेव चिमणाजी आपटे यांनीं स्थापन केलेल्या आनंदाश्रम संस्थेचे व्यवस्थापक होते. तोच यांच्या उपजीविकेचा व्यवसाय होता. त्याबद्दल यांना फक्त दरमहा ५० रुपये मिळत. आनंदाश्रम संस्कृत ग्रंथमालेंत 'सर्वदर्शनसंग्रह' हा संस्कृत ग्रंथ यांनीं संपादन केलेला आहे.

आयर्विन, लॉर्ड—(जन्म स. १८८१, कारकीर्द स. १९२६-१९३१) हिंदुस्थानचे व्हाइसरॉय.

व्हायकौंट हॅलिफॅक्स यांचे हे चिरंजीव व वारस. स. १९१० सालीं रिपनभागातर्फे पार्लमेंटचे मेंबर झाले. स. १९२२-२५ च्या दरम्यान हे मंत्रिमंडळांत होते. प्रथम शिक्षणखातें व नंतर शेतकीखातें यांचेकडे आलें. स. १९२६ मध्यें हे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय झाले व यांना 'पीअर' करण्यांत आलें.

लॉर्ड रीडिंगप्रमाणेंच इंग्लडमध्यें यांची अतिशय प्रतिष्ठा असे. 'ख्रिस्ती साधु' या नांवानें यांचे चहाते यांना संबोधीत. रीडिंग यांना लोकांचें प्रेम संपादन करणें कधींच शक्य झालें नव्हतें. तेव्हां त्यांचेपेक्षां अधिक सामोपचाराचा मंत्र देऊन यांना पाठविण्यांत आलें होतें. हे हिंदुस्थानांत आले त्या वेळीं कलकत्त्याला हिंदु-मुसलमान दंग्याच्या ज्वाला उसळत होत्या.

परंतु हिंदुस्थानांत आल्यानंतर थोड्याच दिवसांनीं यांच्या आगगाडीखालीं बाँब ठेवण्यांत येऊन हिंदुस्थानची परिस्थिति आपणांस वाटते तितकी सुलभ नसल्याची जाणीव यांस झाली.

स्त्रियांना देण्यांत आलेला मतदानाचा हक्क (१९२६), दक्षिण अफ्रिकेशीं केलेली तडजोड (१९२७) या दोन गोष्टी यांच्या कारकीर्दीच्या पूर्वार्धांतील महत्त्वाच्या गोष्टी होत.

यानंतर मॉंटफर्ड-सुधारणांची फेरतपासणी करण्याकरितां सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखालीं एक 'रॉयल कमिशन' नेमण्यांत आलें. परंतु त्यामध्यें एकहि हिंदी मनुष्य सामील नसल्याच्या सबबीवर हिंदी लोकांकडून या मंडळावर बहिष्कार घालण्यांत आला. हिंदुस्थानचा असंतोष क्रमाक्रमानें वाढण्यास या वेळेपासूनच सुरुवात झाली. १९२९ मध्यें इंग्लंडमध्यें रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांचें प्रधान-मंडळ आल्याबरोबर हे इंग्लंडला भेट देऊन आले. आल्याबरोबर हिंदुस्थानास 'वसाहतीचें स्वराज्य क्रमाक्रमानें देण्यांत येईल' असें यांनीं जाहीर केलें. त्याला उत्तर म्हणून कीं काय 'वसाहतीचें स्वराज्य लवकर मिळालें नाहीं तर कॉंग्रेस स्वातंत्र्याचें ध्येय पुकारील' अशी म. गांधींनीं घोषणा केली. पुढें १९३० त कॉंग्रेसची कायदे-भंगाची मोहीम पुन्हा सुरू झाली. याच वेळीं सायमन कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला, तोहि असाच निराशा-जनक होता. त्यामुळें कायदेभंगाची चळवळ अधिक जोरांत सुरू झाली. अनेक स्त्रीपुरुषांनीं त्यांत भाग घेतला होता. तेव्हां गांधी व इतर सर्व पुढारी यांना अटकेंत ठेवण्यांत आलें.

त्याच वेळीं हिंदुस्थानला कोणत्या नवीन सुधारणा द्याव्यात याचा विचार करण्यासाठीं इंग्लंडमध्यें पहिली गोलमेज परिषद भरली (१९३०). 'वसाहतीचें संपूर्ण स्वराज्य' ह्या ध्येयानें गोलमेज परिषद चालवण्यांत यावी ही गांधींची मागणी धुडकावून लावल्यामुळें तिच्यावर कॉंग्रेसपक्षीयांनीं बहिष्कार टाकला. कॉंग्रेसच्या सहकार्या-शिवाय परिषद यशस्वी होणें शक्य नाहीं, ही गोष्ट लक्षांत आल्यामुळें सरकार व गांधी यांमध्यें तडतोड करण्यांत आली. तीच 'गांधी-आयर्विनकरार' या नांवानें प्रसिद्ध आहे (१९३१).

या करारान्वयें सरकारनें सर्व राजकीय कैद्यांची सुटका केली व गांधींनीं गोलमेज परिषदेस हजर राहण्याचें कबूल केलें.

कायदेभंगाच्या चळवळीच्या सामर्थ्याची कबूली यांनीं पुढील शब्दांनीं दिली आहे. " कायदेभंगाच्या चळवळीचा कितीहि निषेध केला तरी तिच्यामुळें राष्ट्राच्या जीवनांत स्वतंत्र व समर्थ अशा राष्ट्राभिमानाची जी ज्योत प्रज्वलित झाली आहे तिची किंमत कमी करणें चुकीचें होईल. सरकारनें कितीहि दडपशाही केली तरी राष्ट्राची प्रगति कायमची बंद होणें शक्य नाहीं."

इंग्लंडमध्यें गेल्यावर 'लॉर्ड हॅलिफॅक्स' या नांवानें पुढें हे प्रसिद्ध आहेत.

आयंगार, कस्तुरिरङ्ग—(मृत्यु स. १९२३)

मद्रासचे हिंदी वृत्तपत्रकार. कांहीं दिवस वकिली केल्यानंतर संपादकाचा पेशा पत्करून यांनीं 'हिंदु' हें पत्र सतत वीस वर्षेपर्यंत अत्यंत व्यवस्थितपणें चालविलें. हें 'हिंदु' पत्र पुढें दक्षिण हिंदुस्थानचें एक प्रमुख पत्र होऊन बसलें. त्याचप्रमाणें स. १९१४ च्या महायुद्धांत युद्धक्षेत्रांच्या निरीक्षणासाठीं हे हिन्दी वर्तमानपत्र-प्रति-निधी म्हणून युरोपांत गेले होते. डॉ. ॲनी बेझन्ट यांच्या स. १९१७ त स्थापन झालेल्या होमरूल-लीगमध्यें यांनीं पुढाकार घेतला होता. कॉंग्रेसच्या कायदेभंग कमिटीचे सभासद म्हणून स. १९२२ मध्यें हे हिंदुस्थानभर साक्षी-पुरावा घेत हिंडले होते. याचा परिणाम यांच्या प्रकृतीवर होऊन हे थकले व परलोकवासी झाले. मरणापूर्वी कांहीं दिवस 'इन्डियन जर्नॅलिस्ट ॲसोसिएशन'चे अध्यक्षस्थानीं यांची निवड झाली होती.

आयंगार, दिवाणबहादूर, डॉ. कृष्णस्वामी (जन्म स. १८७१ एप्रिल १५)

वयोवृद्ध, तपोवृद्ध, इतिहासकार-संशोधक व अध्या-पक. यांचा जन्म कुंभकोणनजीक शहाजीकोट या गांवीं

झाला. ह्या गांवीं प्रख्यात शहाजीराजे भोसले यांच्या सन्मानार्थ बांधलेली एक गढी आहे. या गांवाचें पूर्वीचे एक नांव प्रख्यात तंजावरकर नायकराजा रघुनाथ याच्या नांवावरून रघुनाथपूर असें होतें. यांच्या मनांत मराठ्यांच्या इतिहासाविषयीं जो प्रेममुक्त आदर दिसून येतो, त्याचा यांच्या जन्मपरंपरेशीं साहजिक संबंध लागतो.

यांच्या बाराव्या वर्षी वडील वारल्यावर वडील बंधूंची यांच्या शिक्षणास मदत झाली व यांचा विद्याभ्यास बंगलूरास झाला. कॉलेजांत पहिल्या प्रतीचे विद्यार्थी म्हणून हे चमकले. गणित व शास्त्रें हे यांचे आवडते विषय होते. आणि कांहीं वर्षें यांनीं त्या विषयांचे अध्यापक म्हणूनहि काम केलें. परंतु गुणावर निवडणूक होऊनहि यांस स्थापत्य (एंजिनिअरिंग) शाळेंत शिष्यवृत्ति न मिळाल्यानें यांनीं आपलें लक्ष गणिताकडून काढून इतिहासाकडे लावलें.

स. १९०० मध्यें यांनीं 'वोडियार राजवटींतील म्हैसूर' या विषयावर प्रबंध लिहून मद्रासविद्यापीठाची एम्. ए. पदवी संपादन केली. लवकरच यांना इतिहासाचे प्राध्यापक नेमण्यांत आलें. श्री. वेंकय्या, प्रो. केलेट, प्रि. क्रुक, मि. भाभा, डॉ. हूल्श्, न्या. इन्नेस इत्यादि विद्वानांवर यांची चांगली छाप बसली.

चोलराजांसंबंधींचें शिलालेखादि साहित्य परीक्षून त्यावर व श्रीरामानुजाचार्यांचा काल इत्यादि विषयांवर यांनीं लिहिलेले निबंध मान्यता पावूं लागले. लवकरच यांना इंग्रजी भाषेचे एक प्राध्यापक म्हणून सेंट्रल कॉलेजांत काम करावें लागलें. या वेळीं फादर टबार्ड व मि. रिचर्ड्स यांच्यांशीं 'मिथिक सोसायटी' नांवाची संस्था स्थापण्याचे कामीं यांनीं सहकार केला. या संस्थेचे पहिले चिटणीस म्हणून यांची नेमणूक झाली, आणि संस्थेच्या द्वारां प्रसिद्ध होणाऱ्या पत्रिकेचे संपादक म्हणूनहि यांचीच नेमणूक झाली. सुमारें पांच वर्षे या संस्थेची जोपासना यांनीं काळजीनें केली व संस्था नांवारूपास आणिली.

स. १९१० मध्यें म्हैसूर सरकारनें यांची नेमणूक असिस्टंट इन्स्पेक्टर जनरल ऑफ एज्युकेशन या हुद्यावर केली आणि कांहीं दिवस मि. बीअर यांच्या जागीं मुख्य इ. ज. ऑफ एज्युकेशन म्हणूनहि यांना काम पाहावें लागलें. या कामांतहि यांनीं उत्कृष्ट लौकिक संपादन केला.

स. १९११ मध्यें यांच्या विविध ऐतिहासिक लेखांचा खंड 'एन्शन्ट इंडिया' या नांवानें प्रसिद्ध झाला.

स. १९१२ मध्यें यांची मद्राससरकारनें मद्रास-विद्यापीठाचे सदस्य म्हणून नेमणूक केली. तेव्हांपासून स. १९२९ पर्यंत सतरा वर्षें यांनीं विद्यापीठाची अनेक प्रकारें सेवा केली.

स. १९१४ मध्यें यांच्या आयुष्यांतील एका क्रान्तिकारक पर्वास आरंभ झाला. हिंदुस्थान सरकारनें मद्रास-विद्यापीठास संशोधनार्थ पासष्ट हजारांची देणगी देऊं केली. भौतिकशास्त्रसंशोधनाला ही रक्कम पुरी पडण्यासारखी नव्हती म्हणून सांस्कृतिक विषयाकडे ती द्यावी असें ठरलें, आणि तयार झालेल्या योजनेंत "भारतीय इतिहास आणि पुराणवस्तुसंशोधन" या विषयासाठीं 'अध्यापक-पीठ' निर्माण करण्यांत आलें. या पीठावर पहिले प्राध्यापक म्हणून यांची योजना करण्याचें ठरलें.

प्रतिपंचवार्षिक नेमणुकींत आणखी दोन वेळां यांचीच निवडणूक या पदावर होत गेली, आणि सतत पंधरा वर्षें यांनीं हें पद भूषविलें (१९१४-२९).

आपल्या या नवीन कामाचे मुख्य तीन भाग यांनीं केले—१ सामान्य व्याख्यानें, २ विशिष्ट व्याख्यानें, ३ प्रौढछात्रशिक्षण.

पहिल्यासाठीं यांनीं विजयनगर हा मुख्य विषय निवडला. दुसऱ्या विभागाकरितां राजेन्द्र चोल, महाबलिपुरम्, पल्लव, वाकाटक इत्यादि निरनिराळे दहा विषय घेऊन आपलीं विद्वत्तापूर्ण व्याख्यानें दिलीं, आणि त्यांपैकीं बहुतेक कमीअधिक करून प्रसिद्धहि केलीं.

यांतील 'मणिमेखलाईचें ऐतिहासिक मंथन' विशेष प्रसिद्धीला आलें, कारण फ्रान्समधील 'इन्स्तित्यूत दिस्तोरिक् इ.' या संस्थेनें त्यांस रौप्यपदक समर्पण केलें! छात्राध्यापनासाठीं वैकुंठवासी रंगस्वामी सरस्वती (सोर्सेस ऑफ विजयनगर हिस्टरी), श्री. सत्यनाथन् (हिस्टरी ऑफ दि नायकाज़ ऑफ मदुरा), श्री. गोपालन् (हिस्टरी ऑफ दि पल्लवाज़ ऑफ कांची), श्री. दीक्षितार (हिंदु ॲडमिनिस्ट्रेटिव्ह इन्स्टिट्यूशन्स), श्री. नारायणन् (अलीं हिस्टरी ऑफ शैविझम्), श्री. अप्पादुराई (इकॉनॉमिक कन्डिशन ऑफ साउथ इंडिया फ्रॉम दि ट्वेल्थ टु दि सिक्स्टीन्थ सेंचरी) इत्यादि विद्यार्थी व त्यांनीं घेतलेले संशोधकी विविध उपयुक्त विषय यांच्या अभ्यासाचे कामीं यांनीं

योग्य मार्गदर्शन केलें, आणि वरीलपैकीं बहुतेकांनीं चांगली ख्याति संपादन केली आहे. मद्रास इलाख्यांत ऐतिहासिक संशोधनाची दृढतर पायावर स्थापना करण्याचें काम यांनीं यशस्वीपणें केलें आहे.

या अवधींत कलकत्ता व म्हैसूर विद्यापीठांमार्फत यांना निमंत्रणें येऊन यांचीं व्याख्यानें झालीं.

स. १९२४ मध्यें सरकारनें यांच्या कामगिरीची प्रशंसा करणारा हुकूम प्रसिद्ध केला. म्हैसूर सरकारनें यांना 'राजसेवासक्त' ही पदवी दिली. ब्रिटिश सरकारनें प्रथम रावबहादूरु, नंतर दिवाणबहादूरु अशा पदव्या देऊन यांचा गौरव केला.

स. १९२१ मध्यें यांस आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे ऑननरी कॉरस्पॉंडंट नेमण्यांत आलें.

स. १९३१ मध्यें यांना बंगाल रॉयल ए. सो. चे फेलो निवडण्यांत आलें.

तिरुपति देवस्थानांतील शिलालेखादिकांचे पांच खंड व त्या देवस्थानाचा इतिहास प्रसिद्ध होण्यास यांचे परिश्रम पुष्कळांशीं कारण झाले.

ऑल-इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्स, इंडियन हिस्टरी कॉंग्रेस व इंडियन हिस्टॉरिकल रेकार्डस् कमिशन या तिन्ही संस्थांशीं यांचा निकट संबंध आज पुष्कळ वर्षांपासून आहे. स. १९२४ मध्यें ओरिएन्टल कॉन्फरन्स मद्रास येथें भरली तेव्हां हे तिचे चिटणीस होते व स. १९३५ च्या म्हैसूर अधिवेशनाचे हे अध्यक्ष होते. स. १९३१ मध्यें बाँबे हिस्टॉरिकल सोसायटीच्या विद्यमानें एकदांच भरलेल्या बाँबे हिस्टॉरिक कॉंग्रेसचे हे अध्यक्ष होते. पुण्यास जेव्हां भारत इतिहास-संशोधकमंडळाच्या रौप्यमहोत्सवाला जोडून पहिली ऑल-इंडिया मॉडर्न हिस्टरी कॉंग्रेस-पुढें हिचेंच नांव इंडियन हिस्टरी कॉंग्रेस असें ठेवण्यांत आलें-भरविली त्या वेळीं ऐतिहासिक प्रदर्शनाचें उद्घाटन यांचे हस्तें करण्यांत आलें (१९३५). हिंदुस्थान सरकारच्या इं. हि. रे. कमिशनवर कॉरस्पॉंडिंग मेंबर व कांहीं वेळ घटक सभासद म्हणून हे अनेक वर्षें काम करीत आलेले आहेत.

लाहोर येथील इंडियन हिस्टरी कॉंग्रेसच्या चौथ्या अधिवेशनाचे (स. १९३९) हे मुख्य अध्यक्ष होते व हैदराबाद (द.) येथील पहिल्या डेक्कन हिस्टरी कॉन्फरन्समधील प्राचीन विभागाचें अध्यक्षस्थान यांनाच देण्यांत आलें होतें (१९४५).

इंडियन हिस्टरी कॉंग्रेसमार्फत जो हिंदुस्थानचा प्रचंड इतिहास दहा खंडांत व्हावयाचा आहे, त्याची रूपरेषा यांनीं तयार करून दिली असून त्या कामीं यांचें सहाय्य सतत मिळत राहणार आहे.

यांनीं आतांपर्यंत लहानमोठे १२५ प्रबंध लिहिलेले आहेत. यांच्या ६६ व्या वर्षीं यांस हिंदुस्थानांतील प्रसिद्ध इतिहासलेखकांनीं एक 'स्मरणग्रंथ' (पृ. ५००) अर्पण केला (१९३६).

मिथिक सोसायटीचें क्वॉर्टर्ली व इंडियन अँटिक्वरी पत्रिकेचे सहसंपादक म्हणून यांनीं काम केलें आणि अलीकडे सुमारें १५-२० वर्षें हे 'जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी' हें विख्यात त्रैमासिक स्वतः चालवीत आहेत.

अशा प्रकारें वयाची सत्तरी उलटली तरी यांची इतिहाससेवा सतत एकनिष्ठेनें चालू आहे. यांची उमेद व तरतरी अद्यापि यांनीं टिकविली आहे.

यांचा स्वभाव प्रेमळ, यांची राहणी वैष्णव रामानुज संप्रदायी ब्राह्मणाची, बुद्धिमत्ता, चिकित्सा, विवेचनशक्ति उत्कृष्ट दर्जाची, असे हे सर्वमान्य इतिहासाचार्य म्हणून सर्वांच्या आदरास पात्र झाले आहेत. सांप्रत हे मद्रासेस मैलापूरम्मध्यें स्वतःच्या घरींच राहतात (दत्तो वामन पोतदार).

आयंगार, एस्. श्रीनिवास—(जन्म स. १८७४-मृत्यु स. १९४१)

गोहत्ती कॉंग्रेसचे अध्यक्ष आणि मद्रासचे माजी ॲडव्होकेट जनरल. 'हिंदु कायदा' या मेनच्या सुप्रसिद्ध ग्रंथाची सुधारून वाढविलेली आवृत्ति तयार करण्याचें काम हिंदुधर्मशास्त्रपारंगत म्हणून यांच्याकडे सोंपविलें होतें. त्याप्रमाणें तो ग्रंथ यांनीं केलेला आहे.

ब्रिटिश राजवटींत पहिले हिंदी ॲडव्होकेट जनरल होण्याचा मान मद्रास हायकोर्टांत सर भाष्यं आयंगार यांना मिळाला, त्यांचे हे जामात होते. यांनाहि पुढें ती जागा मिळाली.

त्या वेळीं राजकारणांत भाग घेणें शक्य नसलें तरी हे सामाजिक सुधारणांच्या चळवळींत भाग घेत व राष्ट्रीय सभेबरोबर भरणाऱ्या सामाजिक परिषदेस हजर राहून तींत प्रत्यक्ष भाग घेत.

होमरूल-लीगच्या चळवळीपासून हे राजकारणांत भाग घेऊं लागले. हे प्रथम नेमस्त पण पुढें जहालगटाशीं समरस झाले. बेझंटपक्षाशीं दोन हात केल्यावर पंजाबप्रकरणामुळें हे असहकारितावादी बनले. पण कॉंग्रेसमधील अहिंसा व खादी यांचा आग्रह धरणाऱ्या गटाशीं हे

केव्हांच समरस झाले नाहींत. हे पुरोगामी गटांत गणले जात. म. गांधींच्या लहरीवर काँग्रेसचें राजकारण चालावें ही गोष्ट यांना मान्य नव्हती. तथापि महात्मा गांधींच्या आज्ञेप्रमाणें स. १९२० सालीं यांनीं आपला सी. आय. ई. हा किताब सरकारकडे परत केला. तसेंच यांनीं अत्यंत भरभराटीच्या वकिली व्यवसायावर पाणी सोडलें. पुढें विधिमंडळाच्या निवडणुकीला उभे राहिले नाहींत व यांनीं सर्व वेळ काँग्रेसला दिला आणि मद्रास प्रान्तांत अशी जागृति केली कीं हे म्हणतील ती पूर्वदिशा अशी स्थिति तेथें झाली. स्थानिक संस्थांपासून मध्यवर्ति मंडळापर्यंतच्या सर्व संस्थांत काँग्रेसपक्षाचें बहुमत यांनीं स्थापन केलें (१९२३).

त्या वेळीं हे मध्यवर्ति विधिमंडळांत निवडून गेले व पं. मोतीलाल नेहरूंच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या स्वराज्यपक्षांत डेप्युटी लीडर म्हणून यांची योजना झाली.

स. १९२४–३० पर्यंत हे मध्यवर्ति विधिमंडळाचे सभासद होते. त्या वेळचीं यांचीं भाषणें दीर्घायुषी झालीं आहेत. पण पुढें पं. मोतीलाल नेहरू व हे यांच्यांत मतभेद सुरू झाला. पंडितजी गांधींकडे झुकले व हे पुरोगामी बनले.

काँग्रेसनें जातीयत्वाच्या बाबतींत अवलंबिलेलें चमत्कारिक धोरण यांना मान्य नसे. गोहत्तीच्या काँग्रेसमध्यें (१९२६) यांनीं संपूर्ण स्वातंत्र्याचा उपन्यास केला, पण लाहोरच्या अधिवेशनांत (१९२९) यांचें उद्दिष्ट पुरें झालें. स. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीनंतर यांनीं राष्ट्रीयसभा सोडली. पण अलिकडे तीन वर्षे सुभाषचंद्र बोसांच्या पुरोगामी गटाचा हे पुरस्कार करूं लागले होते.

आरू, राणू रावजी— (जन्म स. १८४८–मृत्यु स. १९२२)

देवनागरीचे सुप्रसिद्ध पंचीगार. हे प्रारंभीचे प्रसिद्ध मराठी टाइप पाडणारे पंचीगार जुन्नर तालुक्यांतील अळेंगांवचे माळी वैश्य. यांच्या घराण्यांतील पद्धतीप्रमाणें यांचें आठव्या वर्षी उपनयन (मुंज) झालें. शिक्षण वगैरे कांहीं झालें नव्हतें. स. १८५५ सुमारास मोलमजुरी करून उपजीविका करण्याकरितां हे आपल्या वडिलांबरोबर मुंबईस गेले व टाइप पाडण्याच्या कामांत यांनीं अत्यंत लौकिक मिळविला.

आलूर, व्यंकटराव भीमराव—(जन्म स.१८८०)

आधुनिक कर्नाटकांतील साहित्यिक आणि प्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचा जन्म विजापूर येथें झाला. हे बी.ए., एल्एल्.बी. वकील आहेत. तथापि यांनीं वकिली स. १९०६ सालीं सोडून स्वदेशीच्या चळवळींत भाग घेण्यास सुरुवात केली. त्या वेळच्या राष्ट्रीय आंदोलनांत राष्ट्रीयशाळाहि यांनीं चालविली होती.

धारवाड येथें यांनीं 'कर्नाटक इतिहासमंडळ' या संस्थेची स्थापना केली (१९१४) आणि कर्नाटकच्या इतिहासाच्या अभ्यासाकडे लोकांचें लक्ष वेधिलें. तें कार्य आतां बरेंच वाढीस लागलें आहे.

हे त्या वेळच्या राजकारणांत लो. टिळकांचे अनुयायी म्हणून प्रसिद्ध होते. यांनीं स. १९२१ पर्यंत राजकीय चळवळींत विशेष प्रकारें भाग घेतला.

त्यापुढें हे संपादक, साहित्यिक आणि सार्वजनिक कार्यकर्ते म्हणून लोकांच्या सतत पुढें आहेत.

हे होमरूल लीगचे राजकीय कार्यवाह, धारवाड काँग्रेस-कमिटीचे उपाध्यक्ष, कर्नाटक साहित्यपरिषदेचे एक उत्पादक इत्यादि अनेक नात्यांनीं लोकांची सेवा करीत आले आहेत. कर्नाटकसाहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद देऊन कर्नाटकानें यांचा म्हैसूर येथें योग्य प्रकारें गौरवहि केलेला आहे (१९३०).

कर्नाटकसभेच्या स्थापनेंत यांचा मोठा भाग होता. धारवाड येथील श्रीशंकराचार्य-संस्कृत-पाठशाळेचे हे अध्यक्ष, जय कर्नाटक (मासिक) व कर्मवीर (साप्ताहिक) इत्यादि कानडी भाषेतील नियतकालिकांचे संपादक म्हणून यांनीं केलेली कामगिरी अत्यंत मोलाची समजण्यांत येते.

यांचे कानडी भाषेंतील ग्रंथः–१ कर्नाटकगतवैभव, २ कर्नाटकवीररत्नगळु, ३ लो. टिळकांच्या गीतारहस्याचें कानडी भाषांतर, ४ गीताप्रकाश, ५ गीतासंदेश, ६ गीता-परिमल, ७ गीताभावप्रदीप, भाग १ व २, ८ शिक्षण-मीमांसे (स्पेन्सर्स एज्युकेशन या इंग्रजी पुस्तकाचें कानडी भाषांतर), ९ राष्ट्रीय तत्त्वमीमांसे, १० नन्न जीवनस्मृति-गळु (माझ्या जीवनांतील स्मृति, भाग १ व २), ११ विद्यारण्यचरिते (याचें रामचंद्र हयग्रीव मणूरकर यांनीं मराठींत भाषांतर केलें आहे), १२ कन्नडिगर भ्रमनिरसन इत्यादि.

हे कर्नाटक ग्रंथप्रसारकमंडळ, नवजीवन रत्नभांडार व गीताकुसुममंजरी या तीन मालांचे चालक व प्रकाशक होते (डॉ. अ. प. करमरकर).

ऑल्कॉट, कर्नल, हेन्री स्टील—(जन्म स. १८३२–मृत्यु स. १९०७).

अध्यात्मशास्त्राच्या पुनरुज्जीवनामध्येंच आधुनिक पाश्चिमात्य संस्कृतीचा व तद्द्वारा जगाचा उद्धार आहे, असें मानणारे विश्वकुटुंबी वृत्तीचे थोर गृहस्थ.

हे थिऑसाफिकल सोसायटीचे संस्थापक व आजीव अध्यक्ष होते (१८७५–१९०७). यांचा जन्म ऑरेंज (न्यूजर्सी, संयुक्त संस्थानें, अमेरिका) येथें झाला.

यांचे पूर्वज इंग्लिश प्यूरिटन होते. सातव्या हेन्रीचे वेळीं एलायचे बिशप असलेले व १४९६ मध्यें जीझस कॉलेज स्थापणारे डॉ. जॉन ऑल्कॉक हे यांचेच घराण्यांतील पूर्वज होत. 'ऑल्कॉक' या नांवाचा अपभ्रंश होऊन ऑल्कॉट नांव आलें.

यांनीं शेतकी विषयाचा शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास केला होता. न्यूयॉर्क येथील मॉडेल फार्मवर केलेल्या संशोधनकार्यामुळें वयाचे तेविसावे वर्षीच यांची आंतरराष्ट्रीय ख्याति झाली. यांनीं साखरेबाबत केलेल्या संशोधनाबद्दल 'सॉरघम अँड इंफी' (ज्वारी, बाजरी व ऊंस) या नांवाचा ग्रंथ लिहिला. त्याच्या उत्कृष्टपणामुळें पाठशाळांतून तो क्रमिक ग्रंथ म्हणून नेमला गेला. या एकंदर कार्यामुळें यांना स्वदेशांतून व परदेशांतून अनेक नेमणुका–सरकारी व बिनसरकारी–सांगून आल्या. पण त्या यांनीं नाकारल्या. यांनीं युरोपमध्यें याच संशोधनाकरितां प्रवास करून जो अहवाल लिहिला त्यास अमेरिकन ज्ञानकोशांत प्रसिद्ध होण्याचा मान मिळाला आहे.

अध्यक्ष अॅब्राहम लिंकन यांच्या कारकीर्दीत संस्थानांतील गुलामगिरी रद्द होण्याबाबत दक्षिण विरुद्ध उत्तर संस्थानांमध्यें १८५९ सालीं जेव्हां युद्ध सुरू झालें तेव्हां त्या युद्धांत हे सामील झाले. त्यांत केलेल्या कामगिरीबद्दल हे 'कर्नल' या लष्करी पदवीपर्यंत चढले. त्यामुळें त्यानंतर कर्नल या पदवीनेंच हे संबोधिले जात असत. युद्ध संपल्यावर लष्करांतील लांचलुचपतीबद्दल चौकशी करण्याकरितां सैन्य व आरमार यांचे स्पेशल कमिशनर म्हणून हे नेमिले गेले व तें काम यांनीं खुनाची दहशत बसविली गेली असतांसुद्धां मोहाला अगर भयाला बळी न पडतां केलें.

आपल्या जीवनांतील स्वातंत्र्याबद्दलचें पहिलें युद्ध म्हणून या युद्धाबद्दल उल्लेख हे करीत असत. पुढें दहा वर्षें यांनी वकिलीचा धंदा केला (१८६८–७८).

या अवधींत राष्ट्रीय विमापरिषदेचे डायरेक्टर म्हणून विम्यासंबंधींचा नवीन कायदा, एका स्नेह्याचे साहाय्यानें यांनीं तयार केला होता व संस्थानांत पास होण्याचें भाग्यहि त्यास प्राप्त झालें होतें.

वयाचे १९ वे वर्षापासून यांना परलोकविद्येबद्दल आवड असे. स. १८७४ सालीं चिरेंडन (संस्थान व्हर्माँट) या गांवीं तत्संबंधीं कांहीं चमत्कार होतात हें ऐकल्यावरून तेथें 'न्यूयॉर्क-सन' व 'न्यूयॉर्क-ग्रॅफिक' या पत्रांचे बातमीदार म्हणून हे गेले व तेथें यांनीं तद्विषयक शास्त्रीय व चिकित्सक पद्धतीनें वरील पत्रांना अहवाल धाडले. त्यामुळें युरोप व अमेरिकेंतील शास्त्रीपंडितांमध्यें व एकंदर जनतेंत फार खळबळ उडाली. हे अहवाल यांनीं पुढें 'पीपल फ्रॉम दि अदर वर्ल्ड' (परलोकांतील रहिवाशी) या नांवानें प्रसिद्ध केले. परलोकविद्येवरील पश्चिमेकडील हा पहिला ग्रंथ होय. या ग्रंथामुळें सर अल्फ्रेड रसेल वॉलेस आणि सर वुइल्यम क्रुक्स, अशासारख्या शास्त्रज्ञांशीं यांची ओळख होऊन शास्त्रीय मंडळांत यांची वाहवा झाली. याच ठिकाणीं मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांची भेट होऊन पुढें त्याचें परिचयांत रूपांतर झालें.

दोघेंहि न्यूयॉर्कला परत आल्यावर अध्यात्मज्ञानावर त्यांचीं भाषणें होऊं लागलीं. परलोकविद्येचे चमत्कार खरे आहेत. मृत्यूचे घटनेनें मनुष्याचे देहाचा नाश होतो, पण त्याचें जीवन संपत नाहीं; मन व बुद्धि या दृष्टीनें तो तसाच कायम राहतो; पण जीवनाचा हेतु काय व माणसाचे मनाचा व बुद्धीचा पुढें कसा व कोठपर्यंत विकास होत राहतो, याचा उलगडा पौर्वात्य अध्यात्मशास्त्राशिवाय होणार नाहीं, अशी त्या दोघांची त्या वेळीं भूमिका होती. त्याप्रमाणें हे अनेक नियतकालिकांतून तद्विषयक लेख लिहूं लागले, व आपल्या घरीं निरनिराळ्या पंडितांच्यासह विविध गूढ विषयांच्या चर्चेकरितां सभा करूं लागले. त्यामुळें युरोप व अमेरिकेंतील अनेक पंडितांशीं यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. ब्लॅव्हॅट्स्कीबाईंनीं याच सुमारास आपला पहिला ग्रंथ 'आयसीस अनव्हेल्ड (ब्रह्मविद्येचें रहस्यदर्शन)' हा लिहून काढला. हा लिहिण्यांत यांनीं त्यांना साहाय्य केलें, व त्यामुळेंच यांचा स्वतःचा अध्यात्मशास्त्रांत प्रवेश झाला.

या ग्रंथाचें लेखन चाललें असतां, एका रात्रीं यांना यांच्या गुरुदेवांचें दर्शन झालें (१८७५) व त्या वेळीं त्यांच्याशीं झालेल्या संवादामुळें या जीवनांतील यांचे

कार्याची यांना ओळख झाली, व त्याजवर यांची अढळ श्रद्धा बसली. या वेळीं गुरुदेवांनीं यांना आपला फेटा प्रसाद म्हणून बक्षीस दिला. तो फेटा अद्याप अड्यार (मद्रास) येथील वस्तुसंग्रहांत ठेवलेला पाहावयास मिळतो. हे त्यांचे गुरुदेव मौर्यवंशांतील एक क्षत्रिय सिद्धपुरुष आहेत. यासंबंधाची सविस्तर मनोरंजक हकीगत यांनीं 'ओल्ड डायरी लीव्हज्'च्या प्रथम खंडांत लिहिली आहे.

वर लिहिल्याप्रमाणें सभा चालल्यानंतर एके दिवशीं अध्यात्मज्ञानाचे प्रचाराकरितां एक संघ काढावा, अशी कल्पना येऊन १७ नवं. १८७५ रोजीं या दोघांनीं थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना केली. त्या वेळीं आद्य सभासद १७ स्त्री-पुरुष होतीं.

'थिऑसॉफी' हा शब्द यांनीं इजिप्तमधील अलेक्झांड्रिया शहरीं सनाचे दुसऱ्या तिसऱ्या शतकांत नियो-फायथागोरियन किंवा नियो-प्लेटोनिस्ट या नांवानें चाललेल्या आध्यात्मिक सांप्रदायाचे वाङ्मयांतून घेतला. या सांप्रदायांतील कांहीं पुरुष आध्यात्मिक ज्ञानाचे शोधार्थ हिंदुस्थानांत आले होते व त्यांची समाधिस्थितीपर्यंत प्रगति झाली होती. 'थिऑसॉफी' या शब्दाचा अर्थ ईश्वरी (प्रत्यक्ष) ज्ञान. याप्रमाणें 'थिऑसॉफी' शब्दानें अध्यात्मज्ञानाचा संघ असा अर्थ अभिप्रेत व्हावा, असा यांचा हेतु होता.

अमेरिकेंत असतांना 'बॅरन डी पाम' या नांवाचा एक सभासद निवर्तला. हा प्रसंग पाहून, मनुष्याचें प्रेत पुरण्याचे चालीपेक्षां त्याचें दहन करणें ही गोष्ट भौतिक व आध्यात्मिक या दोन्ही दृष्टींनीं जास्त प्रशस्त आहे असें वाटून यांनीं त्याचा दहनविधि सार्वजनिक रीतीनें केला. त्यासंबंधीं त्या वेळचे वर्तमानपत्रांतून आलेले सचित्र लेख अड्यार(मद्रास)चे वस्तुसंग्रहांत पाहावयास मिळतात.

अमेरिकेंत असतांनाच कांहीं हिंदी गृहस्थांची व यांची भेट झाली व त्यांचेमार्फत हिंदुस्थानांतील कांहीं आर्यसमाजिस्टांशीं यांनीं पत्रव्यवहारहि सुरू केला. दोन्ही संस्थांचें उद्दिष्ट एकच आहे अशा समजुतीनें व सिद्धपुरुषांच्या संघाचें आद्यपीठ या नात्यानें आपल्या कार्यास जास्त लायक स्थान म्हणून दोघेंहि हिंदुस्थानांत आलीं. स. १८७९ त हे मुंबईस पोंचले. तेथे यांचा मुक्काम तीन वर्षें होता. सन १८८२ सालीं यांनीं अड्यार (मद्रास) येथें सोसायटीचें मुख्य पीठ स्थापन केलें. यांना मुंबई शहर आगबोटींतून दिसूं लागतांच अतिशय आनंद झाला, व यांनीं खालीं धक्क्यावर उतरतांच लवून जमिनीस स्पर्श केला व आपल्या गुरुदेवांची जन्मभूमि म्हणून तिला आदरपूर्वक अभिवादन केलें. लवकरच कांहीं दिवसांनीं फ्रामजी कॉवसजी हॉलमध्यें यांचें व्याख्यान झालें. त्यांत हे म्हणाले, "हिंदी लोकांनीं जडवादावर उभारलेल्या, पाश्चिमात्य वैज्ञानिक संस्कृतीला भुलून न जातां आपल्या वैदिक, पारशी, बौद्ध, इस्लामी धर्मांचा रहस्याच्या दृष्टीनें व समन्वयबुद्धीनें अभ्यास करावा व आपल्या मातृभूमीचा उद्धार करावा, हेंच सुशिक्षित पदवीधरांचें आद्य कर्तव्य आहे. हिंदभूमीचें भवितव्य श्रेष्ठ आहे. ती मृत झालेली नाहीं, केवळ निद्रित आहे."

ब्लॅव्हॅट्स्कीबाई रशियन व ऑल्कॉट अमेरिकन असल्यामुळें हिंदुस्थानसरकारास यांचा संशय येऊन त्यांचे-मागें गुप्त पोलिस ठेवले गेले. हा आपल्या पवित्र कार्याचा अपमान वाटून तीं दोघेंहि अलाहाबादच्या 'पायोनिअर' पत्राचे संपादक मि. सिनेट व त्यांचेमार्फत हिंदुस्थानचे शेतकी खात्याचे सेक्रेटरी मि. ए. ओ. ह्यूम यांजकडे जाऊन त्यांचे साहाय्यानें आपल्या कार्याचे सद्हेतु-बद्दल सरकारी अधिकाऱ्यांची यांनीं खात्री करून दिली व मागें असलेल्या गुप्त पोलिसांचा बंदोबस्त करून घेतला. या प्रसंगानें वरील दोन्ही गृहस्थ सोसायटीचे सभासद झाले. मि. सिनेट यांनीं तदनंतर इंग्लंडांत जाऊन ग्रंथ व सभांचे द्वारा प्रचार केला; व मि. ह्यूम यांनीं आपली सरकारी नोकरी सोडून हिंदुस्थानभर प्रवास केला व हिंदी पुढाऱ्यांच्या गांठी घेऊन व विचारविनिमय करून राष्ट्रीय सभेची स्थापना स. १८८४ मध्यें मद्रासला सोसायटीचे वार्षिक परिषदेनंतर केली.

स. १८७९ च्या ऑक्टोबरमध्यें यांनीं 'थिऑसॉफिस्ट' या नांवाचें मासिक सुरू केलें. तेव्हांपासून तें अजून चालू आहे. याच सालीं वार्षिक परिषदेबरोबर यांनीं हिंदी कला-कौशल्याच्या वस्तूंचें प्रदर्शन भरविलें. हें हिंदुस्थानांतील पहिलें 'औद्योगिक प्रदर्शन' होय.

हिंदुस्थानांत आल्यावर अनुभवांतीं यांना असें आढळलें कीं, आर्यसमाजाचें उद्दिष्ट केवळ वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनापुरतेंच आहे व आपल्या संघाचें उद्दिष्ट सर्वच धर्माच्या पुनरुज्जीवनाकरितां आहे. म्हणून तेव्हां-पासून दोन्ही संघ निराळे राहून अलग कार्य करूं लागले.

दोघेंहि सोसायटीचे प्रचारार्थ सर्व हिंदुस्थानभर हिंडलीं. पंचशील ग्रहण करून दोघेंहि बौद्धधर्मीय बनलीं. कारण त्या वेळीं हिंदु अगर पारशी धर्मांना शुद्धीकरण मान्य नव्हतें.

हे सिंहलद्वीपांत गेले असतां तेथें मिशनरी लोकांचा अस्थानीं खिस्ती धर्मप्रचार पाहून बुद्धधर्मीय लोकांचे शिक्षणाकरितां बौद्धधर्मीयांचेच साहाय्यानें यांनीं त्या सर्व बेटभर शाळा स्थापल्या, व शिक्षणक्रमांत बौद्ध-धर्माचें शिक्षण अंतर्भूत केलें. त्याकरितां यांनीं स्वतः 'बुद्धिस्ट कॅटेकिझम' (बौद्धधर्मीय प्रश्नोत्तरावलि) या नांवाचें एक लहान पुस्तक लिहून त्यास बुद्धभिक्षूंची संमति मिळविली. याप्रमाणें यांचे हयातींत २०५ शाळा, ३ कॉलेजें कार्य करीत होतीं. हेंच कार्य कांहीं महिन्यांपूर्वी परलोकवासी झालेले सुप्रसिद्ध थि. व हिंदुस्थानचे कचेरींत सिलोनतर्फे असलेले वकील, बॅरन सर जयतिलक यांनीं पुढें चालविलें. यानंतर जपान, ब्रह्मदेश, सयाम, सिंहल-द्वीप यांतील बौद्धधर्मीय अनेक पंथांना व हीनयान आणि महायान या पंथांचीं सामान्य चौदा तत्त्वें काढून त्यांचें एकीकरण केलें. सर्वसाधारण सिंहलद्वीपांतील बौद्ध जनते-करितां भगवान् गौतमबुद्धांच्या सूक्ष्म देहाचे सात रंगांनीं अंकित असलेला असा राष्ट्रीयध्वज यांनीं तयार केला. इंग्लंडांत जाऊन सेक्रेटरी ऑफ स्टेट यांची त्यास संमति मिळवली. यामुळें यांचे प्रेतदहनाचे वेळीं यांच्या शवावर हा ध्वज ठेवून अड्यार येथें यांच्या देहाला अग्नि देण्यांत आला.

पंचम या नांवानें ओळखले जाणारे मद्रासकडील हरिजन यांच्या मुलांमुलींचे साक्षरतेकरितां यांनीं चार मोफत शाळा काढल्या (१८८५) व त्या आजन्म चालविल्या. या शाळा थिऑसाफिकल सोसायटीतर्फे चालविल्या जाऊन पुढें सरकारच्या स्वाधीन करण्यांत आल्या. यांत नेहमीं हजार-बाराशेंपर्यंत विद्यार्थी व विद्यार्थिनी असत.

थिऑसाफीचे प्रचारार्थ प्रवास करीत असतां विकत किंवा देणगी म्हणून अध्यात्म, वेदांत, योग, वैद्यक, साहित्य वगैरे विषयांवरील प्राचीन ताडपत्रावरील ग्रंथ यांनीं संग्रहित केले व स. १८८६ सालीं 'ओरिएन्टल इन्स्टिट्यूट' (प्राच्यविद्या संस्था) या नांवानें ग्रंथालय स्थापिलें. यांत हल्लीं ताडपत्रावरील १०,००० ग्रंथ आहेत. या ग्रंथालयावर योग्य पाश्चिमात्य अगर हिंदी पंडित व शास्त्री यांची नेमणूक होऊन संशोधन व प्रकाशनकार्य चालू असतें. या ग्रंथालयामार्फत नुकताच 'अप्रकाशित उपनिषद:' म्हणून ७८ उपनिषदांचा संग्रह प्रसिद्ध केला गेला आहे. क्यूबा (अमेरिका) येथील 'लोफ्यू एन्टी' या नांवाचे सभासदानें आपली तीन लाखांची जिनगी निम्मेनिम बेझंटबाई व हे यांना मृत्युपत्रान्वयें दिली. यांनीं आपले दीडलाख रुपये वरील ग्रंथालयाला अर्पण केले व बेझंटबाईंनीं आपले दीडलाख रुपये सेंट्रल हिंदु कॉलेजला दिले.

थिऑसॉफीचे प्रचारार्थ यांनीं हिंदुस्थानांत व बाहेर-देशीं अनेकदां प्रवास केला. या प्रवासांत अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलियापर्यंत प्रवासकार्य झालें. हे निवर्तले तेव्हां साधारणतः १३ देशांत थिऑसॉफीचा प्रवेश झाला होता.

स. १८८३ सालीं आपल्यामध्यें मोहनिद्रा (हिप्नॉटि-झम) व मेस्मेरिझम (प्राणशक्तिद्वारा रोगचिकित्सा) यांचे साहाय्यानें रोग बरे करण्याची शक्ति आहे, असें यांच्या प्रत्ययास आलें व त्याप्रमाणें यांनीं दक्षिण हिंदुस्थान व बंगाल येथें प्रवास करीत असतां सुमारें ६ हजार अंध, पंगु, बहिरे, मुके व वेडे अशा माणसांना बरें केलें. त्याबद्दलची हकीकत विश्वसनीय लोकांच्या प्रमाणपत्रांसह यांनीं आपल्या 'ओल्ड डायरी लीव्हज्' द्वितीय खंडाचे २९ व्या खंडांत ४३६–४५३ पानांवर दिली आहे.

यांचे ग्रंथ—

1. Sorghum And Imphee & two others.
2. People from the Other World.
3. Buddhist Catechism (४४ आवृत्त्या; २० भाषांतून भाषांतरें).
4. 'Theosophist' मासिकाचें संपादन (१९०७ पर्यंत.)
5. Old Diary Leaves Vols. 1, 2, 3, 4, 5 & 6.
6. अनेक लेख व लघुपुस्तकें (वा. ल. चिपळूणकर).

आसी—(जन्म स. १८३२–मृत्यु स. १९१५) उर्दू कवि.

यांचें समग्र नांव–मौलाना शाह अब्दुल अलीम. ठिकाण–शिकन्दरपूर (जिल्हा बलिया). आसी हें यांचें टोपण नांव आहे. हे प्रायः गाजीपुरला राहत. अरबी व फार्सीचे नामांकित पंडित होते. कविता करण्याचें हे 'नासिख' पासून शिकले.

हे सूफीपंथाचे होते. हिंदुमुसलमानांशीं यांचे संबंध अत्यंत प्रेमाचे असत. यांच्या कवितेंत भक्ति, वैराग्य, विरह व प्रेम यांचें सुंदर वर्णन आहे. यांना आपल्या

कविता जमवून छापणें पसंत नव्हतें. पण यांच्या शिष्यांनीं यांचे कवितासंग्रह छापले आहेत (क. कौ. ४.४८९).

आळतेकर, अनंत सदाशिव—(जन्म स. १८९८)

इतिहासाचे सुप्रसिद्ध अभ्यासक, संशोधक व लेखक. हे एम्. ए., डि. लिट्. आहेत. हे सध्यां हिंदु विश्वविद्यालय बनारस, येथें प्राचीन हिंदी इतिहास व संस्कृत यांचे ' मणींद्रचंद्र नंदी' प्राध्यापक आहेत. यांनीं इंग्रजींत बरेच ग्रंथ लिहिले आहेत आणि ते उच्च दर्जाचे समजले जातात. यांनीं ' डॉक्टर ऑफ लिटरेचर ' करितां लिहिलेला ' राष्ट्रकूट ' हा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे.

यांचे मराठी ग्रंथ—१ प्राचीन शिक्षण पद्धति, २ राष्ट्रकूट, ३ शिलाहार.

यांचे प्रसिद्ध झालेले इंग्रजी ग्रंथः—

(1) History of Important Towns and Cities in Gujarat and Kathiawar, (2) A History of the Village Communities in Western India, (3) Education in Ancient India, (4) A New Gupta King, (5) Rashtrakutas and their Times. [यांना हिंदुविश्वविद्यालयाची डी. लिट्. पदवी या प्रबंधामुळें मिळाली. राष्ट्रकूटांच्या सत्तेखालीं असणाऱ्या महाराष्ट्राचा इतिहास, यांत देण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे (१९३४)].

आळतेकर, प्रो. माधव दामोदर--(जन्म स. १८९०) मराठी व इंग्रजी भाषेंतील सुप्रसिद्ध लेखक व वक्ते.

यांचा जन्म कसबा कळें (सं. कोल्हापूर) येथें झाला. हे फर्ग्युसन कॉलेजांतून एम्.ए. झाले (१९१७). त्यापूर्वीच हे मुंबईच्या ' इंदुप्रकाश ' या दैनिक पत्राचे संपादक होते. (१९१५—१६). त्यानंतर हे 'New Review, Bombay'चे संपादक झाले (१९१७-२०). नंतर ' इंडियन टेक्स्टाइल जर्नल,' मुंबईचे हे मुख्यम संपादक झाले (१९२३--२४).

पुढें मुंबईच्या विल्सन कॉलेजांत यांना मराठीचे प्राध्यापक नेमण्यांत आलें (१९२४). तथापि यांचें मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांतून लिखाण सतत चालू असतें.

कलकत्त्याच्या ' कॅपिटल ' व मुंबईच्या ' टॉइम्स ऑफ इंडिया ' मधून आर्थिक विषयांवर यांनीं अनेक निबंध लिहिलेले आहेत.

शिवाय मराठींत 'नवयुग', 'मनोरंजन' वगैरे अनेक नियतकालिकांतून यांच्या गोष्टी, कविता, निबंध वगैरे विविध प्रकारचें वाङ्मय विपुल प्रसिद्ध झालेलें आहे. यांचे गोपाळ गणेश आगरकर, कालिदासाची सृष्टि, ज्ञानेश्वरी, तुकाराम वगैरेवरील विवेचनात्मक निबंध ग्रंथ, मुक्तबंध ललिता वगैरे अनेक कादंबऱ्या पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्या आहेत.

यांचें वक्तृत्वहि मोठें परिणामकारक असतें. त्यांतला उपरोध, उपहास व हास मोठा उठावदार असतो.

आळतेकर, सदाशिव खंडो—(जन्म स. १८७२-मृत्यु स. १९३८)

प्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते. यांचा जन्म आळतें (सं. कोल्हापूर) येथें झाला. यांचें शिक्षण कोल्हापूर व पुणें येथें झालें. हे बी. ए., एल्एल्. बी. होते (१९०१).

यांनीं कोल्हापूर येथें वकीली करण्यास सुरुवात केली. तेथें असतांना निरनिराळे उत्सव व स्वदेशी चळवळ यांत यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. स. १९०६ मध्यें यांनीं ' कोल्हापूर प्रतिनिधिसभा ' स्थापन करण्यांत पुढाकार घेतला; त्याचा परिणाम होऊन यांची वकीलीची सनद रद्द करण्यांत आली.

पुढें हे कऱ्हाड येथें राहण्यास आले व तेथें यांनीं वकीली करण्यास सुरुवात केली. तेथें कऱ्हाड नगरपालिकेचे कार्याध्यक्ष (१९१८), वाचनालय व अर्बन के. सोसायटीचे अध्यक्ष होते. स. १९२१ सालीं असहकारितेच्या चळवळींत यांनीं वकीली सोडली.

पुढें हे दोन वर्षे ऑल इंडिया काँग्रेस कमेटीचे सभासद होते व स. १९३२ जाने.-फेब्रु. मध्यें डेटिन्यु प्रिझनर होते. शेवटपर्यंत देवसेवा, धर्मसेवा आणि समाजसेवा करण्यांत यांनीं आपलें आयुष्य घालविलें.

यांचे ग्रंथ—१ सुलभ दासबोध, २ समर्थरत्नसंग्रह, ३ बालबोध समर्थ वाङ्मयमाला (यांचीं तीन पुष्पें मनोबोध वगैरे) प्रसिद्ध आहेत.

यांचे चिरंजीव सुप्रसिद्ध संशोधक, अनंत सदाशिव आळतेकर हे होत.

आंबेकर, बापूजी मार्तंड—(जन्म स. १८७५-मृत्यु स. १९३४) सुप्रसिद्ध लेखक व पुण्याच्या ' ज्ञानप्रकाश' या दैनिकाचे संपादक.

सातारा जिल्ह्यांतील वाई हें यांचें जन्मस्थान.

पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्यें माध्यमिक व बडोद्याच्या बडोदा कॉलेजमध्यें उच्च शिक्षणाचा लाभ यांना झाला. बडोद्याचें हवामान मात्र यांच्या प्रकृतीला कधींच मानवूं शकलें नाहीं. त्याचा परिणाम, यांच्या कॉलेजशिक्षणाची मध्यंतरींच इतिश्री होण्यांत झाला.

मात्र एका दृष्टीनें यांचा बडोदें येथील हा वास महत्त्वाचा आहे. तेथें असतांना 'सयाजी विजय' पत्राचे संचालक दामोदर सावळाराम यंदे यांनीं यांना त्या पत्राचे संपादक-वर्गांत सामील करून घेतलें. त्यामुळें हे वाईस परतले ते वृत्तपत्रव्यवसायाची कला हस्तगत करूनच.

वाईस परत आल्यावर यांनीं वर्तमानपत्रांत स्फुटें व थोर पुरुषांचीं चरित्रें लिहिण्यास आरंभ केला व थोड्याच दिवसांत आत्मविश्वास वाढून आपल्याला साजेशी नोकरी मिळवण्याच्या हेतूनें हे पुण्यास आले, आणि पहिल्याच भेटींत आपल्या व्यासंगाची व बहुश्रुततेची अशी कांहीं चमत्कारिक छाप यांनीं नटेश अप्पाजी द्रविडांचेवर–त्या वेळच्या ज्ञानप्रकाशचे संपादकांवर–बसविली कीं त्याच क्षणीं ज्ञानप्रकाशचे संपादक वर्गांत यांना सामील करून घेण्यांत आलें (१९०७).

यांचें लेखनकौशल्य, तत्कालीन विषयाचा परामर्ष घेण्यास सदैव तयार असणारी यांची बुद्धि व तडकाफडकी काम उरकण्याची असणारी यांची तयारी, यांचा परिणाम यांच्या भोंवतालच्या लोकांच्यावरोबर गो. कृ. गोखल्यांचेवरहि झाल्याशिवाय राहिला नाहीं. याचेच शिफारशीनें युनिव्हर्सिटी पदवीधर नसूनहि यांना 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी'चे सभासद करून घेण्यांत आलें.

हरिभाऊ आपटे व हे यांमध्यें आमरण वसणारा वेडनाद सुप्रसिद्धच आहे. हरिभाऊ आपट्यांचें एक छोटेखानी चरित्र लिहून आपल्या लेखकमित्राचें ऋण अंशतः कमी करण्याचा यांनीं प्रयत्न केला आहे.

इतर सर्व वृत्तपत्रव्यवसायिकांप्रमाणेंच यांच्या लेखनकृत्यांचा बराचसा भाग वर्तमानपत्रांचे स्तंभांनीं व्यापला आहे. सुबोध व आकर्षक अशा शैलीनें लिहिलेलें यांचें लेखन तत्कालीन लोकप्रियता संपादन करण्यांत अगदीं यशी झालें.

'हरिभाऊ आपटे यांचें चरित्र' व 'आपट्यांच्या आठवणी' या यांच्या दोन पुस्तकांशिवाय 'पंचतंत्र' व 'हितोपदेश' यांचें यांनीं केलेलें रूपांतर सुप्रसिद्ध आहे.

यांच्या सूक्ष्म व मर्मग्राही लेखनशैलीचा नमुना म्हणून 'टिळक-जीवनरहस्य' या यांच्या पुस्तकाकडे पाहिलें पाहिजे. जुन्या जहाल-मवाळांच्या वादांत यांचें वाद-कौशल्य चांगलेंच व्यक्त होई.

चौफेर दृष्टि, चतुरस्र बुद्धि, खेळाडु वृत्ति व खोचदार लेखणी या वर्तमानपत्रकाराला लागणाऱ्या भांडवलाचे यांचे अंगांतील वैपुल्यामुळें ज्ञानप्रकाशचे संपादक म्हणून यांचें नांव कधींहि न येतां तेथील सर्व सूत्रें मात्र यांच्या ताब्यांत राहत. ज्ञानप्रकाशला जी लोकप्रियता मध्यें कांहीं दिवस लाभली होती तिचें श्रेय काकासाहेब लिमयांच्या सर्वसंग्राहक धोरणाप्रमाणेंच यांच्या कुशाग्र लेखणीला द्यावयास पाहिजे. यांच्या लिहिण्याबोलण्यांत बहुश्रुतपणाची ऐट व मार्मिकपणाची खोंच इतकी भरलेली असे कीं कोणीहि त्यास सहजच भुलत असे.

नेमस्तांची राजकारणांतून पूर्णपणें उचलबांगडी होण्याच्या ऐन संधीला हे संपादक झाले. या वेळीं द्रविडांचे नेतृत्वाखालीं केसरीशीं सामना करून, गोखले पक्षाचा बोज यांनीं बराच राखला. त्या वेळच्या यांच्या लिखणाचा नमुना आज जरी आपणांपुढें नसला तरी त्याच थाटाची, केळकरांच्या टिळक चरित्रांवरील यांनीं लिहिलेली 'टिळक-जीवनरस्य' या नांवानें प्रसिद्ध झालेली टीका यांच्या विषारी टीकेचा मासला समजण्यास हरकत नाहीं. चरित्र व चरित्रकार यांसंबंधीं यांनीं प्रकट केलेल्या मताबद्दल आपण जरी नापसंती दाखविली तरी, ज्युनियसच्या पत्राप्रमाणें विषारी वाङ्मयाचा नमुना या दृष्टीनें तें एकमेवाद्वितीय आहे.

हाच यांच्या लेखणींतील मार्मिक बिनतोडपणा प्रो. गोगटे यांच्या 'ज्ञानसिंधु व इतर लघुकथा' या पुस्तकाच्या वाङ्मयचौर्याचे आरोपांचे वेळीं, प्रा. माटे यांच्या 'पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ' या पुस्तकाच्या सदोष भाषेच्या वादाच्या वेळीं, व गोडबोल्यांच्या 'महाराष्ट्र-शाकुंतल' या भाषांतराच्या सदोषतेच्या, निव्वळ वाङ्मयविषयक वादांतहि तडफेनें व्यक्त झाला होता.

आंबेडकर, भीमराव रामजी—(जन्म स. १८९३).

जगप्रसिद्ध विद्वान् व हरिजनसमाजाचे पुढारी. हे एम्. ए., पीएच्. डी. (कोलंबिया युनिव्हर्सिटी अमेरिका), डी. एससी., बार-ॲट-लॉ (लंडन) इत्यादि इंग्लंड-अमेरिकेच्या पदव्यांनीं विभूषित आहेत.

यांचें घराणें मूळचें महाडचें. यांचे वडील रामजी

मालोजी हे लष्करांत सुभेदाराच्या हुद्दयावर होते. तेहि अस्पृश्यसमाजाचे विशेषतः महारसमाजाचे–पुढारी होते. त्यांचें भीमराव हें चवदावें अपत्य होत. म्हणूनच हे आपला उल्लेख विनोदानें चवदावें रत्न असा करितात.

हे मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें शिकत असतां यांनीं संस्कृत भाषा घेण्याचें ठरविलें. तेव्हां त्या सरकारी हायस्कुलांतील संस्कृत शिक्षकानें हे अतिशूद्र म्हणून यांना संस्कृत शिकविण्याचें नाकारिलें. तेव्हां यांना दुसरी भाषा म्हणून फारशी भाषा घेणें भाग पडलें. पुढें यांनीं संस्कृत भाषेचें ज्ञान चांगलें संपादन केलें, ही गोष्ट निराळी.

हे मुंबईस बी. ए. झाल्यावर महाराज सयाजीराव गायकवाड बडोदा यांच्या शिष्यवृत्तीनें अमेरिकेस गेले. तेथील कोलंबिया विश्वविद्यालयांत मानसशास्त्र व अर्थशास्त्र यांचा अभ्यास करून हे एम्. ए. व पीएच्. डी. झाले (१९१३–१६).

तेथून परत आल्यावर करारापमाणें गायकवाड-राज्याच्या सिव्हिल सर्व्हिसमध्यें हे दाखल झाले.

हे इतकें शिक्षण घेऊन इतक्या मोठ्या हुद्यावर काम करूं लागले तरी हे अस्पृश्य आहेत, हें लोक विसरेनात. कचेरींत यांच्या हाताखालचे कारकून यांच्याकडे दुरून कागद फेंकीत व यांना आपल्या टेबलाला स्पर्शहि करूं देत नसत. सायंक्लबमध्यें यांचे सहकारी यांच्या अस्पृश्यतेची चेष्टा करून यांचा बुद्धिपुरःसर अपमान करीत. यांना धड राहण्यास जागा मिळेना. एका पारशाच्या हॉटेलमध्यें यांनीं कांहीं दिवस मुक्काम टाकला. पण आपली गिऱ्हायिकी तुटेल या भीतीनें त्यानेंहि यांच्यावर बहिष्कार टाकला.

अशा परिस्थितींत या मानी पुरुषाला अत्यंत मनस्ताप सहन करावा लागला आणि बडोद्याची नोकरी सोडून हे मुंबईस आले.

तेथें कांहीं दिवस सिडनहॅम कॉलेजमध्यें प्राध्यापकाचें काम केल्यावर कोल्हापुरच्या छत्रपति शाहूमहाराजांच्या प्रेरणेनें व आश्रयानें यांना स्वतंत्र धंदा करण्याच्या दृष्टीनें बॅरिस्टर होण्याकरितां इंग्लंडमध्यें जावें लागलें.

तेथें हे इंडिया ऑफिसच्या लायब्ररींत ॲन्थ्रॉपॉलजी व इकॉनमिक्स या विषयाचें वाचन करून संशोधनात्मक अभ्यास करीत आणि बॅरिस्टरीच्या टर्म्सहि भरीत. कांहीं दिवस हे जर्मनींतील बॉन युनिव्हर्सिटींतहि अभ्यासाकरितां राहिले होते. अशा प्रकारें अभ्यास करून हे लंडन युनिव्हर्सिटीचे डी. एससी. झाले. लंडन युनिव्हर्सिटीची ही डी. एससी. पदवी फार महत्त्वाची म्हणून फारच थोड्यांना लाभलेली आहे. तेथेंच हे बॅरिस्टर झाले.

यांनीं त्या वेळीं डी. एससी. पदवीकरितां लिहिलेला निबंध 'दि प्रॉब्लेम ऑफ दि रूपी' हा आतां प्रसिद्ध झालेला आहे. त्याच्या प्रस्तावनेंत यांचे गुरू प्रो. कॅनन यांनीं 'या माझ्या स्वतंत्र बुद्धीच्या व विशेष तर्कशक्ति असलेल्या शिष्यापासून मलाहि कांहीं शिकतां येण्यासारखें आहे' असे यांना अत्यंत अभिमान वाटण्याजोगे उद्गार काढले आहेत.

अशा या विद्वानाला मुंबईस आल्यावर सिडनहॅम कॉलेजच्या प्रिन्सिपालची जागा मिळूं शकली नाहीं. तेव्हां दुसरी मोठी जागा सरकारनें देऊं केली असतां ती यांनीं नाकारली आणि बॅरिस्टरी करण्याचें ठरविलें. सनदेकरितां भरावे लावणारे पांचशें रुपये यांचेजवळ नव्हते ते दादा केळूसकर वगैरे यांच्या चहाते मंडळींनीं जमवून दिले आणि ते भरून यांनीं सनद काढली व हे बॅरिस्टरी करूं लागले (१९२३). पुढें हे मुंबईच्या सरकारी लॉ कॉलेजचे प्रिन्सिपल झाले ही गोष्ट निराळी.

आतांपर्यंत आपल्या समाजाचें निरीक्षण करून आणि जागतिक प्रश्नांचा अभ्यास करून येथील शैथिल्य घालविण्याकरितां आपल्या समाजाला, हिंदुसमाजाला आणि सरकारला धक्के बसतील असे ठसठशीत कार्यक्रम आंखण्यास यांनीं सुरुवात केली, आणि ते कार्यक्रम अत्यंत निर्भयपणें यशस्वी करण्याचा धडाडीचा प्रयत्न करून यांनीं अस्पृश्यांच्या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त करून दिलें आहे.

अस्पृश्यांचा पहिला महत्त्वाचा प्रश्न पाण्याचा होता. अस्पृश्यांना स्पृश्य हिंदु सार्वजनिक पाणोथ्यावर पाणी भरूं देत नाहींत, त्यामुळें अस्पृश्यांचे अत्यंत हाल होतात हें ध्यानांत घेऊन यांनीं महाड येथील चवदार तळ्यावर पाणी भरण्याचा जाहीर सत्याग्रह केला (१९२७). महाडच्या प्रचंड चवदार तळ्यावर कोण कोठें पाणी भरतो याचा पत्ता लागणें शक्य नाहीं. पण तेथेंहि हें प्रकरण हायकोर्टांत गेलें आणि अस्पृश्यांचा त्या सार्वजनिक तळ्यावर पाणी भरण्याचा हक्क शाबीत झाला.

यांची दुसरी महत्त्वाची चळवळ म्हणजे नाशिकच्या पंचवटींतील काळ्या रामाचे मंदिरांत जाऊन देवदर्शन घेणें ही होय. पण तें लोकांच्या विरोधामुळें जमेना; पवित्र रामकुंडांत स्नान करणें तेंहि जमेना, तेव्हां मिरवणुकींतील

रथाचे दोर ओढणें व शेवटीं कांहींच जमेना, तेव्हां 'देव-दर्शनानें काय होणार!' असे उद्गार काढणें अशा क्रमानें ही चळवळ झाली.

यांनीं आळंदी, पंढरी इ. महाराष्ट्राच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचीं असणारीं क्षेत्रें टाळून नाशिक-सारखें भारतीय क्षेत्र आपल्या कार्याकरितां निवडण्यांतील यांचा हेतु आपल्या चळवळीचें स्वरूप प्रान्तिक न राहतां भारतीय व्हावें हाच असला पाहिजे. पण, रामकुंडांतील स्नानाचा सत्याग्रह यांच्या इच्छेप्रमाणें प्रसिद्धीच्या दृष्टीनें यशस्वी झाला तरी वहिवाटीच्या मुद्यावर अस्पृश्यांचा तेथें स्नानाचा हक्क कोर्टाकडून फेंटाळला गेला (१९३३).

पण यांनीं तेथील सुप्रसिद्ध काळ्या रामाच्या रथाच्या मिरवणुकीच्या वेळीं सत्याग्रह करण्याचा तो प्रश्न तसाच गाजत ठेविला. रामदर्शन तर राहोच, पण रामनवमीच्या वेळीं निघणाऱ्या छबिन्यांतील रथाला ओढण्याकरितां लावलेल्या लांबलचक दोरांना स्पर्श करूं देण्याचेंहि लोकांनीं नाकारलें. या प्रश्नाचें महत्त्व ध्यानांत यावें म्हणून मोठ्या संख्येनें अस्पृश्यसमाज जमा करणें, दंगल माजविणें, प्रसंगीं रक्तपाताची तयारी दाखविणें वगैरे प्रकारांनीं यांनीं हा प्रश्न तेथें धसास लावला. पण यांना लोकांच्या विरोधामुळें व सरकार मध्यें पडत असल्यामुळें हा प्रश्न कांहीं वर्षें चालवून तसाच सोडावा लागला. पण अस्पृश्यांच्या संघटनेस आणि अखिल-भारतीय प्रसिद्धीस यांनीं या प्रसंगांचा चांगला उपयोग करून घेतला (१९३०–३४). हे प्रथम एकदोन वर्षेंच नाशिकला चळवळीच्या वेळीं हजर राहिले. स. १९३३ सालापासून यांच्या अनुयायांनीं सत्याग्रह करण्याबद्दल हस्तपत्रकें वाटावीं आणि सरकारनें बंदी करावी असाच प्रकार चालू होता. स. १९३५ सालापासून तर तोहि प्रकार बंद झाला.

प्रथम स्पृश्यास्पृश्यांत विरोध होता, नंतर सरकारविरुद्ध लोक असा तेथें प्रकार सुरू झाला, व स्पृश्य लोक सत्याग्रह करून रथाची मिरवणूक काढण्याचा प्रयत्न करूं लागले. तेव्हां मिरवणुकीला बंदी करण्याचें धोरण ठेवलें.

यानंतर हे पहिल्या व दुसऱ्या राउंड टेबल परिषदेला अस्पृश्यांचे सरकारनियुक्त प्रतिनिधि म्हणून हजर राहिले. तेथें दुसऱ्या परिषदेंत हिंदुराष्ट्राचे एकमेव प्रतिनिधि म्हणून म. गांधी हजर होते. तेथें गांधी म्हणाले–'तुम्ही सर्व सरकारनियुक्त आहांत, लोकांनीं निवडलेले प्रतिनिधि नव्हेत. अस्पृश्यांचें मनोगत, त्यांचें हित मीच बरोबर जाणतों, अस्पृश्यांचीं मतें घेतलीं तर मीच सर्वांत वरचें स्थान पटकावीन.' हें बोलणें या स्वाभिमानी माणसाला अत्यंत झोंबलें, आणि यांनीं आपल्या बेमुर्वतखोर स्वभावाप्रमाणें त्या विधानांचा खरपूस समाचार घेऊन 'तुम्हीं आजपर्यंत अस्पृश्यांकरितां काय केलें आहे?' असा रोखठोक प्रश्न विचारला. या वादामुळें हिंदुस्थानांतील भांडणें लोकांना दिसलीं असलीं तरी यांना व अस्पृश्यांच्या प्रश्नाला जागतिक महत्त्व आलें ही गोष्ट खोटी नाहीं (१९३१).

याचा परिणाम म्हणा, किंवा मुसलमानांच्या इतकीच अस्पृश्यांची संख्या असतांना सुद्धां अस्पृश्यांना सामाजिक किंवा राजकीय बाबतींत महत्त्वाचें स्थान मिळत नाहीं म्हणून म्हणा, यांनीं अस्पृश्यांना धर्मान्तराशिवाय गत्यन्तर नाहीं अशी घोषणा केली. हिंदुसमाजाचें अंग म्हणून राहिल्यानें अस्पृश्यांची कुचंबणा होते, प्रगतीला अडथळा येतो, उच्च हिंदूंच्या औदार्याची भीक मागत राहून लाचारीनें अस्पृश्यांचा कधींहि उद्धार होणार नाहीं, असाच या चळवळीच्या मुळाशीं यांचा हेतु होता. पण यांच्या हेतुपूर्वक केलेल्या पल्लेदार नाटकी प्रतिपादनाचा परिणाम खरोखरच कांहीं भाबडे अस्पृश्य मुसलमान होण्यांत होऊं लागला, तेव्हां यांना तें आपलें प्रतिपादन आवरतें घ्यावें लागलें, आणि देवदर्शन किंवा धर्मान्तर यांनीं कोणत्याहि समाजाचा उत्कर्ष होत नसून आर्थिक स्थिति सुधारल्यानेंच होतो असें जाहीर करावें लागलें.

दुसऱ्या राउंड टेबल परिषदेच्या वेळीं हिंदी प्रतिनिधी एकमत करूं न शकल्यानें जातवार प्रतिनिधींच्या व्यवस्थेचा आणि संख्येचा निर्णय अध्यक्षांनः देणें भाग पडलें. त्यांत अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यांत आला ही गोष्ट हिंदुसमाजाच्या ऐक्याच्या दृष्टीनें विघातक आहे असें म. गांधींना वाटलें आणि त्यांनीं तो निर्णय बदलून संयुक्त मतदारसंघ स्थापन करण्याकरितां येरवडातुरुंगांत प्राणान्तिक उपोषण आरंभिलें. अस्पृश्यांच्या किंवा हिंदुसमाजाच्या प्रश्नापेक्षां म. गांधींच्या जीविताच्या प्रश्नाला तेव्हां अधिक महत्त्व येणें स्वाभाविक होतें. हिंदुस्थानांतील यच्चयावत् पुढारी यांच्यापुढें त्या वेळीं अक्षरशः लोटांगणें घालीत होते. पण यांचा तत्त्वनिष्ठेचा ताठरपणा बिलकुल कमी झाला नाहीं. दोन हट्टी आणि तत्त्वनिष्ठ माणसांचा हा लढा होता. यांनीं

स्वच्छ सांगितलें कीं, 'म. गांधींच्या प्राणापेक्षां मला माझ्या सहा कोट अस्पृश्यांच्या प्राणांचें महत्त्व जास्त वाटतें.' शेवटीं सर तेजबहादूर सप्रू यांच्या मध्यस्थीनें 'अस्पृश्यांनीं चार प्रतिनिधी निवडावेत व त्या चौघांतून एकाची निवड स्पृश्यास्पृश्य हिंदुसमाजानें संयुक्त मतदारामार्फत करावी. ही दुहेरी निवडणूक दोघांच्या संमतीनें केव्हांहि रद्द करावी. मात्र ती दहा वर्षांपुढें टिकूं नये.' असें ठरलें.

अशा तऱ्हेनें यांनीं संयुक्त मतदारसंघाला मान्यता दिली, म. गांधींचे प्राण वांचविले, अस्पृश्यांच्या एकमेव प्रतिनिधित्वाचा मान आपला असल्याची म. गांधींकडून कबुली घेतली आणि कौन्सिलांत अस्पृश्यांना जवळजवळ दुप्पट जागा मिळवून दिल्या (१९३२ सप्टें.).

तिसऱ्या राउंड टेबल कॉन्फरन्सकरितां निवडलेल्या कांहीं निवडक लोकांत यांचा समावेश झाला होता.

यानंतर यांनीं स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून (१९३६) त्यांत जातिविषयक दृष्टीला थारा न देतां आपला कार्यक्रम आर्थिक तत्त्वावर आंखला आणि आपल्या स्वतंत्र, स्वराज्यवादी, संग्राहक आणि संघटक बुद्धीचा सर्वांना प्रत्यक्ष प्रत्यय आणून दिला. हे काँग्रेसमध्यें न शिरल्यामुळें काँग्रेसच्या मंत्रिमंडळांत यांचा समावेश झाला नाहीं, पण हे बाहेर राहिल्यानें यांचा विरोध काँग्रेसला फारच जाणवला. मुंबईच्या कौन्सिलांत यांच्या पक्षातर्फे परुळेकर, चित्रे, भोळे, विनायकराव गडकरी व हे स्वतः निवडून आले.

लढाई सुरू झाल्यानंतर यांनीं व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव कौन्सिलमधील मजूरमंत्र्याची जागा पत्करली (१९४२) आणि अस्पृश्यांच्या आर्थिक व शैक्षणिक उत्कर्षाकरितां कमालीचे प्रयत्न कायद्याच्या साहाय्यानें करण्याचा प्रयत्न केला. गेल्या पन्नास वर्षांत जें मुसलमानांना करितां आलें नाहीं तें यांनीं एका वर्षाच्या अवधीत अस्पृश्यांकरितां करून दाखविलें. शेंकडा आठ जागा इंपीरियल सर्व्हिसमध्यें अस्पृश्यांकरितां राखून ठेविल्या आणि महाराष्ट्रीयांना वरिष्ठ नोकरींत प्रवेश करून दिला.

तथापि सरकारी चौकटींत राहूनहि यांनीं मद्रास व पुणें येथें भाषण करून गीता व वेद या ग्रंथांची भरपूर निंदा केली (१९४५). तसें करण्यांत यांचा हेतु अस्पृश्यांना हिंदु समाजापासून अलग राहून आपल्या कल्याणाचा विचार करण्यास शिकविणें हा असला पाहिजे. दुसरें असें कीं, हिंदुसमाजाच्या अंतःकरणांत भिनलेली उच्चनीचता ग्रंथमूलक असल्यानें त्यांच्या ग्रंथांवरच हल्ला केल्यानें ती उखडली जाईल अशी यांची समजूत होय.

यांना फक्त दोनच व्यसनें आहेत. एक उत्तम पोषाख आणि दुसरें भरपूर वाचन करणें हीं तीं दोन व्यसनें होत. त्याकरितां हे पैशाकडे कधींहि पाहत नाहींत. मुंबईस दादर येथें 'राजगृह' नांवाची यांची इमारत मुद्दाम लायब्ररीच्या सोयीनें बांधली आहे. लायब्ररीच्या सोयीनें मुद्दाम बांधलेली इमारत मुंबईस क्वचितच असेल. यांच्या स्वभावांत राठपणा व आढ्यता आढळते. तो महाराष्ट्राचा स्वभावविशेष म्हणून दाखवितां येईल. हट्टीपणा, सखोल अभ्यास आणि धार्मिकता या तिहींचें यांच्यांत चमत्कारिक मिश्रण आढळतें. फक्त सनदशीर सफाई यांच्यांत नाहीं.

यांच्या कार्याचें व कार्यपद्धतीचें सहज आकलन होणें कठीण आहे. दोनचार डाव मनांत ठेवून खेळणाऱ्या खेळाडूप्रमाणें यांची स्थिति आहे. धाडस, बुद्धिमत्ता आणि अचूकपणा हा यांच्या कार्यपद्धतीचा विशेष आहे. यांनीं मनुस्मृति जाळली, गीतेला शिव्या दिल्या आणि धर्मांतराची घोषणा केली. तरी यांचे हे प्रयत्नहि अस्पृश्य समाजाला बलिष्ठ व स्वावलंबी करण्याकरितांच आहेत. अस्पृश्य समाजांत आत्मविश्वास उत्पन्न करण्यावर आणि लाचारींतून त्यांना मुक्त करण्यावर यांचा कटाक्ष आहे. वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या लोकांकडून अस्पृश्यांचा उद्धार करण्याची चळवळ परोपकारबुद्धीनें चालविली जाते. पण यांना या परोपकारबुद्धीची अत्यंत चीड आहे. इतर मानवांप्रमाणें अस्पृश्यांनाहि मनुष्य म्हणून जगण्याचा हक्क आहे. आणि तो हक्क अस्पृश्य समाजांनीं न कचरतां संपादन करावा, इतरांच्या साहाय्याचीहि त्यांनीं अपेक्षा करूं नये, अशी यांची शिकवण आहे. हें यांचें म्हणणें उच्च वर्गांना कठोर वाटत असलें तरी तें खरें आहे आणि त्यामुळेंच अस्पृश्य हे खरे मनुष्य बनतील यांत शंका नाहीं.

यांनीं मराठी व इंग्रजी भाषेंत वेळोवेळीं पुष्कळ महत्त्वाचें लेखन लिहिलें असलें तरी यांचीं प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें पुढीलप्रमाणें आहेत :

१. दि प्रॉब्लेम ऑफ दि रुपी (डी. एससी. करितां लिहिलेला निबंध).

२. इव्हॉल्यूशन ऑफ दि प्राव्हिन्शियल फायनन्स इन् ब्रिटिश इंडिया.

३. कास्ट्स् इन इंडिया.

४. स्मॉल होल्डिंज् अँड देअर रेमिडीज.

५. पाकिस्थान (पहिली आवृत्ति १९४०–दुसरी वाढविलेली आवृत्ति १९४५).

६. मि. गांधी अँड दि एमॅन्सिपेशन ऑफ दि अन्टचेबल्स् (१९४३).

७. गांधी, जिना, रानडे. इत्यादि.

इ

इकबाल, डॉ. सर मुहम्मद—(जन्म स.१८७३–मृत्यु स. १९३८) जगप्रसिद्ध कवि व मुसलमानांचे सुप्रसिद्ध पुढारी.

यांचें जन्मस्थान सियालकोट. पूर्वी काश्मिरी ब्राह्मण असणाऱ्या घराण्यांत यांचा जन्म झाल्यानें विचारांचा सुसंस्कृतपणा यांना जन्मतःच प्राप्त झाला होता. यांच्या वडिलांचे मित्र सय्यद मीर हसन हे सियालकोटच्या 'स्कूल कॉलेज'मध्यें अरबी व फारशी भाषांचे प्राध्यापक होते. त्यांच्याच सहवासानें या भाषांविषयीं प्रेम व त्यांचे अध्ययन करण्याची उत्कंठा यांचें मनांत उत्पन्न झाली.

कॉलेज शिक्षणाचा लाभ यांना लाहोरच्या 'गव्हर्नमेंट कॉलेज'मध्यें मिळाला. यांना तत्त्वज्ञान विषयाबद्दल लहानपणापासूनच आकर्षण वाटत असे. त्या वेळचे त्यांचे गुरु सर टॉमस ॲर्नाल्ड व हे यांमध्यें घनिष्ठ संबंध घडून येण्यास यांचें हें आकर्षणच कारणीभूत झालें.

यानंतर लाहोरच्या ओरिएंटल कॉलेजमध्यें शिक्षकाचें व नंतर कांहीं दिवस गव्हर्नमेंट कॉलेजमध्यें लेक्चररचें काम केल्यानंतर हे इंग्लंडला रवाना झाले (१९०५). तत्त्वज्ञानाचें उच्च शिक्षण मिळवावयाचें हा त्यांच्या परदेशगमनांतील प्रमुख हेतु होता. त्या वेळीं तेथें असणाऱ्या प्रो. ॲर्नाल्ड यांचे सल्ल्यानें फारशी गूढविद्यात्मावर (mysticism) यांनीं प्रबंध लिहिला व त्याचे साहाय्यानें केंब्रिजची पदवी तर यांना मिळालीच, परंतु त्याबरोबरच म्युनिचची पीएच्. डी. ही पदवीहि यांनी मिळविली. याचबरोबर हे बॅरिस्टरहि झाले (१९०८).

अशा प्रकारें निरनिराळ्या महत्त्वाच्या परदेशी पदव्यांनीं विभूषित होऊन हे हिंदुस्थानांत परत आले व लाहोर येथें आपली वकिली यांनीं सुरू केली. परंतु तत्त्वज्ञान व वाङ्मय यांमध्यें रंगणारें यांचें मन वकिलींत केव्हांहि अत्युच्च यश प्राप्त करूं शकलें नाहीं.

उर्दू कवि या नात्यानें मात्र यांनीं लहानपणापासूनच प्रगति करण्यास सुरुवात केली होती. लाहोर येथें येण्याच्या पूर्वीच कांहीं गझल लिहून यांनीं तीं त्या वेळीं प्रसिद्धि-शिखरावर आरूढ झालेल्या 'दाग़' या कवीकडे दुरुस्तीकरितां पाठविलीं. त्या वेळीं यांना, 'यांत दुरुस्त करण्यासारखें कांहींच नाहीं' अशा शब्दांनीं त्या कवीकडून गौरवून घेण्याचा मान मिळाला. याच वेळीं कविसंमेलनांतहि हे वावरत असत. हिमालयाच्या सौंदर्यावर लिहिलेली यांची कविता ज्या वेळीं यांनीं उर्दू लिटररी सोसायटीसमोर म्हणून दाखविली, त्याच वेळेपासून एक होतकरू कवि या नात्यानें हे जनतेसमोर प्रामुख्यानें चमकूं लागले. यांची ही कविता 'मखज़ान' या मासिकांत प्रसिद्ध झालेली आहे.

अशा तऱ्हेनें एक प्रथितयश कवि या नात्यानें हे लोकांच्या डोळ्यांसमोर येऊं लागल्यानंतर दर वर्षी 'अन्जुमान-इ-हिमायत्-इ-इसलाम' या संस्थेच्या वार्षिक समारंभांत यांचें काव्यगायन हा एक हुकमी कार्यक्रम होऊन बसला. (ही संस्था पंजाबांतील असून मुसलमान समाजांत धार्मिक व शैक्षणिक कार्य करणारी एक कार्यकारिणी या दृष्टीनें हीस विशेष महत्त्व आहे). 'तस्वीर-इ-दर्द' (दुःखाचें चित्र), 'शिकवा' (तक्रार), 'जबाब-इ-शिकवा' (तक्रारीचें उत्तर) या यांच्या या वेळच्या सुप्रसिद्ध कविता होत.

फारशी लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वीच्या यांच्या कांहीं कविता 'बांग-इ-दिरा' (कारवानाच्या घंटेचे नाद) या नांवानें यांनीं १९२४ त प्रसिद्ध केल्या. "स्थितप्रज्ञ स्थितींतून जागे होऊन आपला काफिला उन्नतीच्या मार्गाकडे न्या" अशा तऱ्हेच्या स्फूर्तिदायक संदेशाचें उत्थान करणाऱ्या कवितांचे संग्रहाला वरील नांव खरोखरच अतिशय अनुप्रासयुक्त वाटतें. उर्दू कवींमधील यांचें पूर्वी ठरलें गेलेलें स्थान पक्कें करून टाकण्याचें काम या संग्रहानें केलें आहे.

उर्दूपेक्षांहि जास्त भावनासमतेनें आपल्या तत्त्वज्ञानपूर्ण कल्पना आपण फारशीमध्यें प्रकट करूं शकतों या गोष्टीचा शोध यांना हे इंग्लंडमध्यें असतांना लागला. ताबडतोब यांनीं फारशी भाषेंत कविता करण्यास सुरुवात केली. 'असरार-इ-खुदी' (आत्म्याचीं रहस्यें) ही यांची फारशी भाषेंतील पहिली कविता होय (१९१५).

याच नांवानें प्रसिद्ध झालेल्या यांच्या पुस्तकाच्या प्रसिद्धीनें, फारशी बोलल्या जाणाऱ्या जगांतील सर्व भागांत, अक्षरशः खळबळ उडवून दिली. त्यांतच प्रो. आर्. ए. निकोल्सन यांनीं या संग्रहाचें इंग्रजी भाषेंत भाषांतर केल्याची भर पडली आणि या संग्रहांतील कांहीं भागांचा जर्मन व इटली भाषांत अनुवाद केला गेल्यानंतर तर नुसता कहर झाला. जगाच्या पाठीवर असणारा कोणताहि मनुष्य इकबालांच्या कवितेपुढें मान लववूं लागला, व इतके दिवस भारतीय असणाऱ्या यांच्या कीर्तीचा एकदम कायाकल्प होऊन तिला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें.

या काव्यसंग्रहाचे यशानें उत्तेजित होऊन, आपल्या जगन्मान्य झालेल्या 'असरार-इ-खुदी'चा उत्तर-भाग यांनीं 'रमूज-इ-बेखुदी' (आत्मवंचनेचीं रहस्यें) या नांवानें प्रसिद्ध केला. मानवी व्यक्तिमत्त्वावर या कवितेंत यांनीं जोर दिला असून त्याच्या साहाय्यानें गांठावयाच्या उच्च ध्येयाची परमावधि करण्याकरितां काय करावयास पाहिजे याचें यांत अत्यंत काव्यमय भाषेंत वर्णन करण्यांत आलें आहे.

मानवी जीवनांत कोणीहि जनसेवेंतच आपल्या सार्वजनिक आयुष्याची परिणति मानीत असतो. त्याचे अंतरात्म्यांत जागृत असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा हा बाह्य परिणाम असतो. इतकें महत्त्वाचें काम करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा ताबा घेण्यास शिका, ही या कवितेची मध्यवर्ति कल्पना आहे.

यानंतर थोड्याच दिवसांनीं यांचा 'पयाम-इ-मश्रिक' (पूर्वेचा संदेश) हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. गटेच्या 'West Ostlicher Diwan' या पुस्तकाच्या धाटणीचें या काव्यसंग्रहांत यांनीं अनुकरण केलेलें आहे. याचेच पाठोपाठ 'जबूर-इ-अजम' (पर्शियाचीं गीतें) व 'जवीद नामा' हीं दोन पुस्तकें यांनीं प्रसिद्ध केलीं. यांपैकीं पहिल्या ग्रंथांत, कवीच्या आत्म्याचें आपल्या गुरूच्या आत्म्यासह स्वर्गांत झालेलें भ्रमण, वर्णन केलें आहे.

याच वेळीं कांहीं तरी उर्दू लिहिण्याविषयीं उर्दू चहात्यांचा यांना होणारा आग्रह वाढतच होता. त्या मागणीचा आदर करावा या हेतूनें यांनीं 'बाल-इ-जिब्रिल' (गॅब्रिअलचे पंख) व 'जर्ब-इ-कलीम' (The Stroke of the Rod of Moses) हे दोन उर्दू कवितासंग्रह प्रसिद्ध केले. 'असरर-इ-खुदी' व तत्सम फारशी कवितेंतून हाताळलेले विषयच या कवितांतून पुनरुत्थानित केलेले आपणांस दिसून येतात. त्यामुळें काल्पनिक व काव्यमय सौंदर्यानें परिपूर्ण असणाऱ्या यांच्या पहिल्या उर्दू काव्यसंग्रहापेक्षां 'उत्तिष्ठत जाग्रत' असा संदेश देणारे यांचे हे दोन काव्यसंग्रहच विशेष सुंदर वाटतात.

यानंतर यांच्या जिवंतपणींच प्रसिद्ध झालेलें यांचें शेवटचें काव्य लहान पण लांबलचक नांवाचें आहे. 'पस चि बायद कर्द अय अकवाम-इ-शर्क' (पूर्वेकडील देशांनो, आम्ही काय करावें?) हें त्याचें नांव असून पूर्वेकडील लोकांवर, पाश्चिमात्य राष्ट्रें जें वजन आणीत आहेत, त्यावर यांत टीका करण्यांत आली आहे.

यांच्या उरलेल्या स्फुट कवितांचा संग्रह यांच्या मृत्यूनंतर 'अर्मगान-इ-हिजाज' (हेदजाजची देणगी) या नांवानें प्रसिद्ध करण्यांत आला. अरबस्थानमधील तत्त्ववेत्त्यांनीं मानवी वागणुकीसंबंधीं सांगितलेले कांहीं विचार अत्यंत काव्यमय भाषेंत यांत ग्रथित करण्यांत आले आहेत. अरबस्थानसंबंधीं यांचें मनांत असणाऱ्या आदराचें अमूर्त प्रतीक या नात्यानें या काव्यसंग्रहास विशेष महत्त्व असून 'हेदजाजची देणगी' जगाला देऊन तेथें जाण्याची आपली अपुरी इच्छा यांनीं पुरी केली आहे.

मुख्यतः कवि म्हणूनच जरी यांची प्रसिद्धि असली तरी 'Reconstruction of Thought in Islam' या आपल्या उत्कृष्ट ग्रंथानें धार्मिक तत्त्वज्ञानांत यांनीं घातलेली भर केवळ उपेक्षणीय नाहीं. पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचेंच बरोबरीनें मुहम्मदी विचारांवरील यांचें प्रभुत्व दाखवणारा हा ग्रंथ असून मद्रास येथें यांनीं दिलेल्या सहा व्याख्यानांचा हा संग्रह आहे. पश्चिमेकडे तर या ग्रंथाची अत्यंत वाहवा झाली व या ग्रंथामुळेंच ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटींत Rhodes Lecturer म्हणून यांची नेमणूक झाली होती. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें हीं व्याख्यानें देणें यांना अशक्य झालें, हा प्रश्न निराळा.

'उर्दू कवि' या नात्यानें हिंदुस्थानांत यांना मिळालेली लोकप्रियता खरोखरच अत्यंत स्पृहणीय आहे.

बंगालमध्यें रवींद्रनाथ टागोरांच्या काव्याला जी जनप्रीति लाभली तिचीच तुलना फार तर यांच्या या लोकप्रियतेशीं करतां येईल. मात्र सुस्तावलेल्या जगाचे कानांत, न कचरतां व्यक्तिमत्त्व संपादन करण्याचा संदेश, यांच्या-इतक्या जोरदारपणानें देणें टागोरांना कधींच जमलें नाहीं.

गूढविद्याशास्त्राची यांना मनापासून आवड असे. तरी देखील पौर्वात्य लोकांचे संकटपरंपरेच्या मुळाशीं त्या शास्त्रावर असणारी त्यांची श्रद्धाच आहे, असें यांचें मत असे. कारण या शास्त्रावर विसंबून राहूनच ईश्वरानें निसर्गाला जिंकण्याकरितां दिलेल्या साधनांचा उपयोग ते करीत नाहींत असें यांना वाटे. " गूढविद्याशास्त्रावरील गूढ हल्ला " या नांवानें यांची ही विचारसरणी संबोधिली जाते.

आत्म्याच्या जोपासनेसंबंधीं यांनीं प्रकट केलेले विचार निट्शेच्या तत्सम तत्त्वज्ञानावरून सुचलेले आहेत. मात्र त्यांना मिळालेली घडण मात्र मुहम्मदी तत्त्वज्ञान रोमा-रोमांत भरलेल्या यांच्या धर्मप्रवण बुद्धींतून उत्पन्न झालेली आहे.

मुस्लिम समाजाचा अभिमान यांच्या शरीराच्या व बुद्धीच्या कणाकणांतून स्पष्टपणें दृग्गोचर होत असला तरी यांचें जीवितविषयक तत्त्वज्ञान पाश्चात्य विचारांनींच अधिक प्रभावित झालें होतें, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. आयुष्याच्या पूर्वार्धांत हिंदुस्थानच्या भक्तीनें-अभिमानानें भरलेलीं कवनें यांनीं लिहिलीं व उत्तरार्धांत आरब्या कवनांतून इस्लामी अधिराज्याचीं मोहक चित्रें चितारलीं. प्रथम प्रथम हिंदी राष्ट्रीय विचारांनीं ओथंबलेल्या उर्दू कविता लिहिणाऱ्या या प्रतिभाशाली कवीनें पुढें फारशी भाषेंत कविता करावयास सुरुवात करावी ही गोष्ट हिंदुस्थानियांना कधींहि योग्य वाटणें शक्य नाहीं. कारण त्यांच्या दृष्टीनें यांच्या या कृतीनें, अखंड हिंदी राष्ट्राच्या कल्पनांना चालना देण्याऐवजीं, फक्त मुसलमान जातीच्याच भावना प्रतिपादन करण्यांत आनंद मानण्याची यांची वृत्ति स्पष्टपणें दिसून येते. त्यामुळें सुरुवातीला 'नया शिवाला' (नवें देऊळ) किंवा 'हिंदी बालकांचें राष्ट्रीय गीत' यासारख्या मातृभूमीच्या अभिमानानें भरलेल्या कविता लिहूनहि पुढें हिंदी जनतेच्या हृदयांतील स्थान यांना कधींच मिळवितां आलें नाहीं.

समकालीन लेखकांवर यांची पडलेली छाप मात्र केवळ लक्षणीय आहे. आत्म्याचें सामर्थ्य, भांडवलशाही व मजूर यांमधील संबंध यांसारख्या गोष्टींसंबंधीं यांनीं प्रकट केलेल्या विचारांचेंच सध्यां अनुकरण होत आहे. भांडवलशाहीच्या विरुद्ध व मजुरांच्या बाजूनें असें धोरण प्रकट करणाऱ्या कविता आज ज्या उर्दू भाषेंत वैपुल्यानें दिसत आहेत त्याचें श्रेय आपणांस यांनाच द्यावें लागेल. भांडवलशाहीबरोबरच साम्राज्यशाहीबद्दल यांनीं प्रकट केलेला दृष्टिकोनहि असाच लोकप्रिय झालेला आहे.

याचेच पुढें जाऊन यांनीं केलेलें लोकसत्ताक राज्यपद्धतींतील दोषांचें आविष्करणहि असेंच मनोरंजक झालें आहे. " डोक्याच्या महत्त्वापेक्षां संख्याच लोकसत्ताक राज्यपद्धतींतील लोकांना अधिक वाटते " हा यांचा या राज्यपद्धतीवर सर्वांत मोठा आक्षेप आहे. त्याचप्रमाणें " मृत राष्ट्रांचीं थडगीं विभागण्याकरितां प्रेतवस्त्रें पळविणाऱ्या लोकांची समिति " हें 'लीग ऑफ नेशन्स 'ला यांनीं केलेलें पदवीदानहि असेंच मजेदार आहे.

राजकारण हा यांच्या जीवनाचा एक उपेक्षित व्यवसाय होता. कारण राजकारण हा प्रांतच यांच्या स्वभावधर्माला मानवण्यासारखा नव्हता. परंतु राजकारणांत यांनीं भाग घेतला तो आपल्या चहात्यांच्या आग्रहावरून. मुस्लिम लीगच्या अधिवेशनाचे अध्यक्ष व दुसऱ्या व तिसऱ्या राउंड टेबल कॉन्फरन्सचे प्रतिनिधी या दोन गोष्टींना यांच्या राजकारणी आयुष्यांत विशेष महत्त्व आहे (१९३१-३२).

यांपैकीं यांच्या मुस्लिम-लीगच्या अधिवेशनाला त्यांत यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत प्रकट केलेल्या विचारांच्या दृष्टीनें विशेष महत्त्व आहे. हिंदु-मुसलमान यांचेमध्यें असणाऱ्या तेढीला हिंदुराष्ट्र व मुस्लिमराष्ट्र असे हिंदुस्थानचे दोन भाग पाडण्याचा यांनीं सुचविलेला तोडगाच, आज जिनांनीं पाकिस्तान या नात्यानें पुढें आणलेल्या योजनेंत स्वीकारलेला आपणांस दिसून येत आहे.

शिक्षणतज्ज्ञ या नात्यानें यांनीं केलेली कामगिरी अशीच महत्त्वाची आहे. पंजाब युनिव्हर्सिटीच्या सिनेटचे व सिंडिकेटचे सभासद या नात्यानें व त्या संस्थेच्या ओरिएन्टल फॅकल्टीचे डीन या नात्यानें यांनीं त्या क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांना दिलेला सल्ला महत्त्वाचा असे. अफगाणिस्तानचे अमीर राजे नादिरखान यांनीं आपल्या राज्यांतील 'डिपार्टमेंट ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन 'च्या पुनरुज्जीवनाकरितां जी तिघांची कमिटी नेमली होती, तीमध्यें हे होते. हे तिघे काबूलला जाऊन त्यांनीं तेथें शिक्षणासंबंधीं एक योजनाहि आंखली

होती. पुढें नादिरखान मारले गेल्यामुळें यांची योजना तशीच राहिली.

यापेक्षांहि आपल्या कवितांतून शिक्षणाच्या ध्येया-संबंधीं व त्याकडून अभिप्रेत असणाऱ्या कार्याविषयीं यांनीं जे विचार मांडले आहेत ते अधिक महत्त्वाचे आहेत. लोकांना कांहीं तरी संदेश देण्याकरितां तळमळत असणारी बुद्धि व नवीन कल्पना नवतेजानें मांडण्याची यांची अपूर्व शक्ति, या गोष्टींच्या कोंदणांत यांनीं आपले शिक्षणविषयक विचार मांडलेले असल्यामुळें तर त्यांस एक विशेष तेज आलें आहे. त्याचेच जोडीला कल्पकता, समजूत व उत्साह आहेच.

यांना 'सर' ही पदवी यांच्या काव्यगुणामुळेंच मिळाली आहे. लाहोरच्या 'गव्हर्नमेंट हौस'मध्यें एक युरोपियन प्रवासी उतरण्यास आला. त्यानें गव्हर्नरजवळ यांच्या भेटीची इच्छा व्यक्त केली. गव्हर्नरनें चकित होऊन ह्या माहितीच्या उगमस्थानाविषयीं पृच्छा केली. प्रवाशानें यावर दिलेलें उत्तर खरोखरच आश्चर्यजनक होतें. पर्शिया, रशिया वगैरे देशांत अतिशय आवडीनें वाचल्या जाणाऱ्या कवींमध्यें यांचें नांव प्रामुख्यानें घेतलें जातें, ही माहिती ऐकून गव्हर्नर खरोखरच चकित झाला. यांना तो ओळखत होता; परंतु परदेशांत यांच्या कवितांना इतकी मानमान्यता, इतका सन्मान दिला जात असेल ही गोष्ट स्वप्नांतसुद्धां त्यास खरी वाटणें शक्य नव्हतें. त्या वेळीं गव्हर्नरनें यांना बोलावून आणलें व प्रवासी व हे यांमधील संभाषण अतिशय काळजी-पूर्वक ऐकलें. वर ऐकलेल्या माहितीच्या सत्यतेचाच पुनः प्रत्यय त्यांस मिळाला व या विद्वत्तेचा सन्मान करण्याच्या हेतूनें यांचा कांहीं सन्मान करण्याची वर त्यानें शिफारस केली आणि यांस 'सर' करण्यांत आलें.

मुहम्मदावरील यांचें भावनामय प्रेम व यांचेमध्यें मूळपासूनच असणारी सौंदर्यदृष्टि यांचे सुरेख संगमामुळें यांचे काव्यास साहजिकच नितांत रमणीयत्व प्राप्त झालें आहे. यांच्या काव्यांतील हृदयाला जाऊन भिडण्याच्या शक्तीच्या मुळाशीं मानवी जीवनासंबंधीं यांचे काव्यांत दिसून येणारी आस्थाच आहे.

"मज़हब (धर्म) नहीं सिखाता
आपस में बैर रखना;
हिंदी है हम, वतन है
हिंदोस्ताँ हमारा"

अशा स्फूर्तिदायक कवनांचा जनक असणारा हा महाकवि पुढें जरी एका विशेष धर्माचा प्रचार करणाऱ्या कविता करूं लागला तरी यांच्याबद्दल हिंदी माणसाला केव्हांहि अभिमानच वाटेल (ग्रेट मेन ऑफ इंडिया).

इचलकरंजीकर, घोरपडे, केशवराव—(मृत्यु स. १८५२)

यांच्या पूर्वीचे इचलकरंजी संस्थानचे अधिपति श्रीमंत व्यंकटराव यांचे हे धाकटे बंधु होत. स. १८३८ त व्यंकटराव निपुत्रिक मरण पावल्यामुळें हे संस्थानाधिपति झाले. यांच्या कारकीर्दीत इचलकरंजी संस्थान हें करवीरकर छत्रपतींच्या ताब्यांतील आहे, असें इंग्रजांनीं ठरविलें. त्यामुळें यांना करवीरकरांच्या ताबेदारींत राहणें न आवडून यांनीं संस्थानच्या उत्पन्नास रामराम ठोकून काशीस जाण्याचें ठरविलें. परंतु त्या वेळचे पोलिटिकल खात्याच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं यांना 'कोल्हापूर महाराजांची ताबेदारी केवळ नाममात्र असून तुमचा व कोल्हापूरकरांचा त्यांत कांहींहि संबंध येत नाहीं व तुमचा दर्जाहि त्यामुळें कमी होत नाहीं' असें सांगितल्यामुळें हे पुन्हां संस्थानचा कारभार पाहूं लागले. याच वेळीं संस्थानास कारणपरत्वें दत्तकाची जरूर लागल्यास सरकार त्याचा विचार करील, असेंहि आश्वासन ब्रिटिश सरकारकडून यांना देण्यांत आलें.

इचलकरंजीकर, घोरपडे नारायणराव गोविंदराव तथा, **बाबासाहेब**—(जन्म स. १८७०–मृत्यु स. १९४३).

कोल्हापूर संस्थानापैकीं इचलकरंजी जहागिरीचे अधिपति. हे आजरेकर जोशांच्या घराण्यांतून दत्तक आले (१८७६). यांचा विवाह परांजपे वकील, नगर, यांच्या कन्येशीं झाला (१८८६). यांचें शिक्षण राजाराम कॉलेज कोल्हापूर, व एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई, येथें झालें.

जहागिरीचा अधिकार यांच्याकडे आल्यानंतर (१८९२) यांनीं प्रथम काटकसरीनें कर्ज नाहींसें केलें. उत्पन्नांत वाढ केली. यांच्या राज्यांत प्राथमिक शिक्षण मोफत असून वरिष्ठ शिक्षणास नाममात्र फी घेतली जाते. धंदेशिक्षणाचीहि व्यवस्था आहे. जुन्या परंपरेचें ज्ञान मोफत वेद व शास्त्र शाळा चालवून देण्याची व्यवस्था केलेली आहे. संगीत, चित्रकला, व्यायाम व वाचनालयें यांना हे उत्तेजन देत.

जहागिरीच्या बाहेरील बहुतेक प्रमुख संस्थांना यांनीं मदत दिली असून आपल्या जहागिरींतील लोकांना त्यामुळें सवलती मिळाव्यात अशी व्यवस्था केली आहे. शिवाय आपल्या प्रजाजनांकरितां शिष्यवृत्त्या, परदे-

शांतील शिक्षण घेण्याकरितां लोन स्कॉलर्शिपा व ग्रंथ-प्रकाशनास साहाय्य करून यांनीं आपला विद्येविषयींचा पक्षपात व्यक्त केला आहे.

यांना स्वतः लेखनाचा व व्यासंगाचा नाद असे. त्याप्रमाणें आपले विचार प्रसिद्ध करण्याची दक्षता यांनीं घेतली आहे.

यांनीं पतपेढ्या स्थापण्यास उत्तेजन दिलें. व्यापारधंदा वाढावा असेंहि यांचे प्रयत्न असत. यांनीं यांत्रिक साहाय्यानें कापड काढून तें बाजारांत यशस्वी केलें. शेतकी व जनावरें यांचीं प्रदर्शनें वगैरेला हे उत्तेजन देत. स्वतः फळबागा करण्याचा यांना नाद होता.

मुंबईच्या जुन्या कायदेमंडळांत बारा वर्षें यांनीं इनामदारवर्गाचा प्रतिनिधि म्हणून काम केलें (१८९७–१९१०). इनामदारांच्या अडचणी मांडण्याचें काम तेव्हां यांनीं निर्भीडपणें केलें. कांहीं वर्षें हे मुंबईविद्यापीठाचे फेलो होते. शिवाय अनेक संस्थांत, सभांत व संमेलनांत भाग घेऊन लोकांना आपल्या मोठेपणाचा व सहकार्याचा कायदा यांनीं दिला आहे. यांचें खासगी आचरण अत्यंत शुद्ध व निष्कलंक असे. हे शिस्तीचे आणि वक्तशीरपणाचे भोक्ते होते. हे वर्णाश्रमधर्माचे अभिमानी असून संध्यापूजादि नित्यकर्में हे निष्ठेनें आचरीत. निरलसपणा व दीर्घोद्योग हे यांचे विशेष होत.

यांनीं हिंदुस्थान, जावा, ब्रह्मदेश व बहुतेक युरोप यांत अनेक वेळां प्रवास केला.

यांनीं आपल्या प्रजाजनांत अस्पृश्यता दूर केली व नोकरींत व शिक्षणांत सर्वांना मुक्तद्वार ठेविलें.

इचलकरंजीकर घोरपडे यांची वंशावळ आमच्या मध्ययुगीन चरित्रकोशांत दिली आहे. त्या वंशापैकीं दुसरे व तिसरे नारायणराव, पत्नी अनूबाई, पहिले, दुसरे व तिसरे व्यंकटराव व या पुरुषांचीं चरित्रेंहि त्या ग्रंथांत वर्णक्रमानें दिलीं आहेत. स. १८१८ नंतरच्या पैकीं प्रमुख म्हणून केशवराव व हे यांचें चरित्र येथें दिलें आहे. यांच्या मागें दत्तक देऊन वंश व जहागीर चालवावी असें ठरलें आहे.

इचलकरंजीकर, बाळकृष्णबुवा गायनाचार्य—(जन्म स. १८४९–मृत्यु स. १९२७) अखिल भारतीय कीर्तीचे महाराष्ट्रीय गवई व गायनशास्त्रज्ञ. यांचें घराणें कोल्हापूरपासून सोळा मैलांवर असणाऱ्या चंदूरचें राहणारें. तेथील हे जोशी म्हणून यांना चंदूरकर जोशी असेंहि म्हणत. यांचे अजोबांना—खंडभटांना–१ रामभट, २ कृष्णंभट, ३ विष्णुभट, ४ सखारामभट असे चार मुलगे होते. त्यांपैकीं हे रामभटाचे पुत्र होत. रामभटांनीं साताऱ्यास बाळाजीबोवा म्हणून सुप्रसिद्ध गवई होते त्यांच्याकडून गायनाचें शिक्षण घेतलें व रामचंद्रबुवा या नांवानें ते पुढें गवई म्हणून प्रसिद्ध झाले. मुंज झाल्यावर आई व पंधराव्या वर्षी वडील वारल्यानें यांना आपलें शिक्षण स्वतःच्या धाडसावर मोठ्या कष्टानें करावें लागलें. बळवंतराव निढळकर नांवाचे नामांकित गवई हैद्राबाद (द.) कडे होते. ते इकडे आले असतां त्यांच्या बहिणीशीं यांचें लग्न झालें.

यांनीं खालील गुरूंपाशीं शिक्षण घेतलें.

१ विष्णुबुवा जोगळेकर हरिदास म्हैसाळ, (२ वर्षें), २ अलिदातखां, जत (१ वर्ष सुमारें), ३ भाऊबुवा कागवाडकर, ४ अमरचंद, वाडीकर नाटक कंपनी (धारला जाण्याकरितां नोकरी), ५ वामनबुवा कवठेकर (धारकरांचे उपाध्ये), ६ देवजीबुवा (रामकृष्ण परांजपे, धार), ७ वासुदेवबुवा जोशी, काशी, ८ मुहम्मदखां, (रहिमतखाचे थोरले बंधु) ग्वाल्हेर.

यांनीं मुंबईसहि कांहीं दिवस गायनसमाज चालविला होता. त्यांत डॉ. सर रामकृष्ण गो. भांडारकर, महादेव चिमणाजी आपटे, कुंटे, न्यायमूर्ति तेलंग ही मंडळी गायन शिकत. डॉ. भांडारकरांची बरीच प्रगति झाली होती. तेथें प्रसिद्ध सतारवादनकार कै. विश्वनाथ रामचंद्र काळे व यांनीं 'संगीतदर्पण' मासिक वर्ष सव्वा वर्ष चालविलें. त्याच्या अंकांचें स्वतंत्र पुस्तक पुढें यांनीं प्रसिद्ध केलें.

यांच्या शिष्यांपैकीं कांहीं प्रमुखः—

१ गुंडोबुवा भिकुबुवा (औंधकर) इंगळे, २ विष्णु दिगंबर पलुस्कर, ३ अनंत मनोहर जोशी, औंध, ४ नीलकंठबुवा जंगम, मिरज, ५ दत्तात्रय विनायक काळे, ६ बाळुबुवा इजारे, ७ बाबुराव गुलगुंजे, ८ अण्णाबुवा, ९ गणेश बळवंत भाटे (मालक-नाट्यकलाप्रवर्तक सं. मं.), १० यशवंत सदाशिव मिराशी (नाट्यकलाप्रवर्तक मंडळी) इत्यादि.

स. १८९८ सालीं यांचें कुटुंब वारलें. नंतर हे मिरजेहून इचलकरंजीस आले. अण्णाबुवांनीं कोल्हापुरास गायनशाळा काढली म्हणून मधील दोन वर्षेखेरीज शेवटपर्यंत हे इचलकरंजीस राहिले. त्यामुळें यांना लोक चंदूरकर याऐवजीं इचलकरंजीकर या नांवानेंच ओळखीत.

प्रथम गुरूबरोबर हे नेपाळ वगैरे प्रान्तांत फिरले होते. नंतर स्वतःहि शिष्य बरोबर घेऊन हिंदुस्थानच्या अनेक भागांत यांनीं गायनाचे दौरे काढले. नेहमींच यांच्या गाण्यास रंग भरत असे आणि यांचे दौरे पैसा आणि कीर्ति देणारे होत. यांचे गुरु वासुदेवबुवा जोशी यांचा यांना असा वरच असे.

यांचे चिरंजीव अण्णाबुवा अकालीं मृत्यु पावल्यानें व एक मुलगीहि त्याच सुमारास वारल्यानें यांना आतां भ्रम होतो कीं काय, अशी स्थिति प्राप्त झाली. ही हकीगत कै. श्री. बाबासाहेब इचलकरंजीकर यांना समजतांच त्यांनीं यांचा समाचार घेऊन असतील तेथें दरमहा पासष्ट रुपये पाठविण्याची व्यवस्था केली. शेवटीं हे इचलकरंजीसच आले. अण्णाबुवांच्या मृत्यूनंतर सव्वा वर्षांतच यांनीं देह ठेवला.

यांनीं आपल्या गुरुजींची गाण्याची पद्धत इतकी हुबेहूब उचलली होती कीं लांबून ऐकणारास जोशीबुवाच गात आहेत कीं काय असा भास होई. यांनीं हिंदुस्थानभर हिंडून आपलें नांव अजरामर केलें. यांचें गाणें रंगलें नाहीं असें कधींच झालें नाहीं. यांचा आवाज पल्लेदार व तयारी भरपूर असल्यानें केवळ तालाची कसरत करून लोकांवर छाप पाडण्याची यांना केव्हांच जरूर भासली नाहीं. ते स्वर जाडा लावीत तरी मुख्य सुरांपासून कधींच सुटत नसत. यांच्या गाण्यांत ठामपणा व क्रम या गोष्टी विशेष होत्या. क्रमाक्रमानें विस्तार करीत करीत रागाची छाया उत्पन्न करून त्या ब्रह्मानंदांत श्रोत्यांस पोहत ठेवणें हें यांच्या गाण्यांतील मुख्य तत्त्व होय. यांची वढत व फिरत ही मुख्य लयीचे अंगानें असून बोलतान स्पष्ट, लयबद्ध व हिशेबानें समेवर येणारी असे. यांनीं विद्येची इतकी कस्त केली होती कीं कोणतीहि तान अगर आलाप कितीहि वेळां आणि केव्हांहि म्हणावयास सांगितल्यास त्यांत थोडेंहि अन्तर पडत नसे. आम्ही गाण्याचें झाड बांधतों असें हे नेहमीं म्हणत. ही गाण्याची पद्धत हुबेहूब आपल्या शिष्यांनीं उचलावी म्हणून यांचा नेहमीं कटाक्ष असे. यांचें संगीतकलेंतील प्रावीण्य पाहून मागील पिढींतील लोक यांना तानबहादूर म्हणत. बरोबरीचे व नव्या पिढींतील लोक यांना संगीतांतील भीष्माचार्य म्हणत (केशन गुंडो इंगळे यांनीं लिहिलेल्या चरित्रावरून).

यांच्या सर्व शिष्यांत प्रमुख या नात्यानें यांच्या पट्टशिष्यत्वाचा मान कै. विष्णु दिगंबर पलुस्कर यांस द्यावा लागेल. दक्षिण महाराष्ट्रांत कांहीं काळ असा होता, कीं कोणीहि गायक किंवा गायिका असो त्याच्या गुरुपरंपरेचा धागा यांच्यापर्यंत पोंचत असेच. अद्यापिसुद्धां यांचे वर उल्लेखिलेले पट्टशिष्य कै. विष्णु दिगंबर यांनीं जी विशिष्ट छापाची शिष्यशाखा तयार केली व शाखेच्या विस्ताराला जीं असंख्य पानें फुटत आहेत त्या सर्वांचें मूळ हेच होत. यांची सोज्वळ व गंभीर गायकी यांचे अल्पायुषी चिरंजीव किंवा यांचे असंख्य शिष्य, यांमध्यें अंशतः दिसून येते.

यांच्या आजन्म तपश्चर्येचें फळ यांच्या आयुष्याचे उत्तरार्धांत यांना निश्चितपणें मिळालें. इतकें वय झालेलें परन्तु दर गायनाचे वेळीं सीमोल्लंघनाचे स्वारींतील गजराजाच्या गंभीर गतीची आठवण व्हावी इतकें यांच्या गाण्यांत नावीन्य व गांभीर्य दृष्टीस आल्यावांचून राहावयाचें नाहीं. आपल्या घराण्याच्या संगीताची वजनदार अंबारी आपण वाहून नेत आहोंत या अंतःकरणांत प्रज्वलित असणाऱ्या अभिमानाचाहि कदाचित् हा परिणाम असूं शकेल.

इमाम, सर अली—(जन्म स. १८६९–मृत्यु स. १९३२).

हिंदुस्थानांतील राष्ट्रीय मुसलमान पक्षाचे संस्थापक व बिहार प्रान्तांतील सुप्रसिद्ध कायदेपंडित. यांची गणना अखिल भारतीय हिंदी पुढाऱ्यांत प्रामुख्यानें होई.

यांचा जन्म बिहारांतील अन्हा गांवीं झाला. यांच्या पित्याचें नांव शम्सुल्उल्म नबाब सय्यद इम्दाद इमाम. कॉलेजकोर्स पुरा करण्यापूर्वीच हे इंग्लंडला बॅरिस्टर होण्याकरितां गेले व तेथें बॅरिस्टर झाले. यांच्याबरोबर अबदुल रहीम आणि जस्टिस शहाउद्दीन हे दोघे बॅरिस्टर झाले. या वेळीं काँग्रेसतर्फे इंग्लंडमध्यें एक शिष्टमंडळ गेलें होतें. त्यांत जॉर्ज यूल, सुरेन्द्रनाथ बानर्जी, मुधोळकर, अर्डले नॉर्टन व सर मोरोपंत जोशी हे होते. या मंडळीबरोबर यांनीं काम केलें. पुढें यांनीं पाटणा येथें प्रॅक्टिस सुरू केलें (१८९०). उलट तपासणी, छाननी आणि मांडणी या बाबतींत यांनीं विशेष कीर्ति संपादन केली.

स. १९०८ सालीं बिहार प्रॉव्हिन्शियल कॉन्फरन्सचे हे अध्यक्ष होते व त्याच वर्षाच्या शेवटीं अमृतसर येथें भरलेल्या मुस्लीम लीगच्या अधिवेशनाचे हे अध्यक्ष होते. तेव्हांच्या यांच्या भाषणाची देशी व परदेशी पत्रांत अत्यंत वाखाणणी झाली. तेव्हां मद्रास काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. सर राशबिहारी घोष यांच्या भाषणाबरोबर यांच्या भाषणाचाहि निर्देश सर्वत्र आला.

अलीगढ मुस्लीम विश्वविद्यालयाची कल्पना काढणारे सर सय्यद अहमद यांच्या मताची छाप प्रथम यांच्यावर होती. तथापि धर्म व समाज यांच्या हिताबरोबर राष्ट्राकडे आपलें लक्ष असलें पाहिजे असें यांचें मत होतें.

कायद्याच्या ज्ञानाबरोबरच उलटतपासणीच्या कामांत यांचा हातखंडा असे. त्यामुळें बिहारमध्यें व कलकत्ता येथें प्रत्येक महत्त्वाच्या फौजदारी खटल्यांत हे असावयाचेच. त्या वेळीं बिहारप्रांत बंगालपासून वेगळा काढला नव्हता. त्यामुळें यांची छाप दोन्ही प्रान्तांवर असे. बंगालची फाळणी रद्द होतांच बिहार व ओरिसा प्रान्त मिळून स्वतंत्र प्रान्त बनविण्यांत आला. त्याचें बरेंच श्रेय यांच्याकडे आहे. हे त्या वेळीं व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे सभासद होते (१९१०–१५).

सर सत्येन्द्रप्रसन्न सिंहांनंतर मुसलमान सभासद त्या जागीं येणें अवश्य होतें म्हणून यांच्यासारख्या योग्य गृहस्थाची निवड झाली. पण प्रायः सरकारी धोरणाचें समर्थन करण्यापलीकडे यांच्या पांच वर्षांच्या कारकीर्दीत हिंदु-मुसलमान व काळागोरा या बाबतींत थोड्या उदारपणाच्या धोरणाशिवाय अधिक कांहीं घडलें नाहीं. पुढें कांहीं महिने कलकत्ता हायकोर्टाच्या न्यायाधीशाच्या जागीं हे आरूढ झाले होते (१९१७).

यानंतर कांहीं महिने हे बिहार प्रान्ताच्या कार्यकारी मंडळाचे सभासद (१९१८–१९) व लीग ऑफ नेशनमध्यें हे हिंदुस्थानचे पहिले प्रतिनिधि म्हणून हजर होते (१९२०).

यांच्या कर्तृत्वाचा दुसरा भाग म्हणजे निजामांच्या हैद्राबाद संस्थानांतील त्रैवार्षिक दिवाणपदाची कारकीर्द होय (स. १९१८–२१). यांच्यासारखा गाजलेला कायदेपंडित मुख्य प्रधान होतांच यांनीं न्याय व अंमलबजावणी खात्यांची प्रथम विभागणी केली. ब्रिटिश हिंदुस्थानांतहि काँग्रेसची फारा वर्षांची मागणी असतां ही गोष्ट अद्यापि घडून आलेली नव्हती. अशाच आणखीहि पुष्कळ सुधारणा करण्याचा घाट यांनीं घातला, पण त्यापूर्वीच ब्रिटिश हिंदुस्थानांत माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा करण्याचा उपक्रम करण्यांत आल्याकारणानें निजामांना वऱ्हाड प्रान्त मिळवून देण्याच्या कामीं ही संधि योग्य आहे असें यांना वाटलें व त्याप्रमाणें यांनीं आपला प्रचंड व्यूह रचला. सध्यांच्या निजामसाहेबांना ही गोष्ट पटण्यासारखीच होती. त्यांनीं याबाबतींत द्रव्यसाहाय्य करण्याचें ठरविताच यांनीं वऱ्हाडची मागणी अधिकृत रीत्या ब्रिटिश सरकारकडे केली. आपली बाजू बिनतोड मांडली व तेथील लोकांचें समाधान राखण्याकरितां वऱ्हाड ताब्यांत येतांच पूर्ण प्रांतिक स्वराज्य देण्याचें आगाऊच आश्वासन दिलें. १९२२—२३ सालीं याचा पुष्कळ लोकांवर अनुकूल परिणाम होऊन 'पूर्ण प्रांतिक स्वराज्य दिल्यास वऱ्हाड निजामाकडे कां जाऊं नये' असें कित्येक ज्ञाते लोक उघडपणें विचारूं लागले. पण यांच्या प्रयत्नांना असें यश दिसूं लागतांच त्या वेळचे महामुत्सद्दी व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांनीं आपला प्रसिद्ध खलिता निजामाकडे पाठविला आणि निजामाची वऱ्हाडची मागणी सपशेल फेंटाळून लावली. इतकेंच नव्हे, तर निजामाच्या बाबतींतहि 'सार्वभौमत्वाचे अधिकार ब्रिटिश सरकारला अमर्याद स्वरूपाचे आहेत' असा स्पष्ट व जाहीर इषारा दिला, व हें राजकारण हाणून पाडलें. तथापि निजामाच्या दृष्टीनें ही फार महत्त्वाची गोष्ट घडली आहे यांत शंका नाहीं. यानंतर यांनीं हैद्राबाद सोडलें व पाटण्यास आपली बॅरिस्टरी पुनः सुरू केली.

यापुढील सायमन कमिशनला विरोध करण्याची यांची कामगिरी महत्त्वाची होय. त्या कमिशनवर बहिष्कार घालण्यांत यांनीं भाग घेतला. सर्वपक्षीय परिषदेंत प्रामुख्यानें भाग घेऊन नेहरूरिपोर्ट तयार करण्यांत सहकार्य केलें. स. १९२८ सालीं कलकत्ता येथें भरलेल्या सभेंत मौ. मुहम्मदअलींस यांनीं विरोध केला. नेहरूरिपोर्टावर मुख्य सह्या करणारांपैकीं हे एक होते.

यानंतर मुसलमानांनीं संयुक्त मतदारसंघाची मागणी करावी, अशा मताचा पुरस्कारहि यांनीं केला, व त्यासाठींच राष्ट्रीय मुस्लीम पक्षाची स्थापना झाली. स. १९०६ सालीं जरी आपण विभक्त मतदार-संघाच्या बाजूचे होतों तरी आतां आपलें पूर्ण मतान्तर झालें आहे, असें यांनीं जाहीर केलें.

दुसऱ्या राउंड टेबल परिषदेकरितांहि हे गेले होते. पण त्या वेळीं यांच्याकडून विशेष काम झालें नाहीं. कांहीं आंतरराष्ट्रीय परिषदांना हजर राहण्याचा मानहि यांना मिळाला होता. हे हृदयक्रिया बंद पडून रांची येथें मृत्यु पावले.

लखनौ येथें झालेल्या नॅशनॅलिस्ट मुस्लीम कॉन्फरन्सचे हे अध्यक्ष होते (१९३१). मुसलमानांच्या वाढत्या राष्ट्रीयत्वाचा टप्पा म्हणून यांच्या भाषणाचा निर्देश तेव्हां सर्वत्र झाला.

निजाम राज्याची दिवाणगिरी स्वीकारल्याबद्दल यांना पुढें पश्चात्ताप झाला. कारण तेथील अन्तर्व्यवस्था समाधानकारक नव्हती, असें यांना वाटलें (सम एमिनन्ट बिहार कॉन्टेपररीज, पा. १०२).

इस्लाम, काझी नझरुल— (जन्म स. १८९६ सुमार) बंगालचे प्रसिद्ध वीरकवि. यांचा जन्म बंगालमधील बरद्वानजवळच्या खेड्यांत झाला. स. १९१४ च्या महायुद्धांत सैनिक म्हणून हे भरती झाले आणि यांची रवानगी इराकमध्यें झाली. तेथें युद्धांतील भयंकर संहारानें यांना कवि बनविलें. हे हिंदुस्थानांत आले तेव्हां हवालदार होते आणि असहकारितेची चळवळ जोरानें चालू होती. बंगाली संस्कृति व साहित्य यांच्याशीं यांचा परिचय चांगला आहे. येथें आल्यानंतर यांची पहिली प्रसिद्ध कविता 'विद्रोही' ही होय. बंगाली भाषेंतील उत्कृष्ट कवितेंत बसण्याचा मान हिला मिळाला आहे. पूर्वीच्या मधुर व स्वप्नमय कवितेच्या परंपरेला या कवितेनें धक्का दिला आहे. या कवितेची रचना खडबडीत असली तरी तिच्यांतील जोम वाखाणण्यासारखा आहे.

हिंदुस्थानांत आल्यानंतर प्रथमपासूनच यांनीं आपल्या कविता 'हविलदार काजी नझरुल इस्लाम' या नांवानें प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. यांच्या प्रथम-प्रथमच्या कविता आफजल-उल्-हक यांच्या 'मुस्लीम भारत' या पत्रांत प्रसिद्ध झाल्या आहेत.

यानंतर यांनीं आपलें स्वतःचें असें 'धूमकेतु' नांवाचें साप्ताहिक सुरू केलें. या पत्राला आशीर्वाद म्हणून रवींद्रनाथ टागोर यांनीं पाठविलेल्या खालील पद्यमय ओळी विशेष उल्लेखनीय आहेत :

" आय चले आय रे धूमकेतु
आँधारे बाँध अग्नि-सेतू,
दुर्दिनेर एइ दुर्गशिरे—
उडिये दे तोर विजय-केतन !
अ-लक्षणेर तिलक-रेखा
रातेर भाले होक ना लेखा,
जागिये दे रे डंका मेरे,
आछे रे जागा अर्धचेतन ! "

(भावार्थः—हे धूमकेतु, तूं ये, या अंधारांत तूं अग्निसेतु बांध. विपत्कालरूपी दुर्गशिखरावर तुझा विजयध्वज फडकावून टाक ! रात्रीच्या कपाळीं कुलक्षणाची तिलकरेखा असेना कां— जे अर्धजागृत आहेत त्यांना डंका वाजवून तूं जागें करून टाक.)

हें साप्ताहिक सुरू केल्यानंतर यामध्येंच यांची 'आगामिनी' ही सुप्रसिद्ध कविता प्रसिद्ध झाली आणि याच कवितेनें सरकारी अवकृपेचा फेरा या पत्रावर वळविला. यांचें हें पत्र लवकरच बंद पडलें व यांना तुरुंगांत धाडण्यांत आलें. याच ठिकाणीं राजबंद्यांचे तक्कारीला तोंड फोडण्यासाठीं यांनीं चाळीस दिवस अन्नसत्याग्रह केला.

यांची वर उल्लेखलेली 'आगामिनी' कविता प्रसिद्ध झाल्यानंतर वंगीय साहित्यश्रेष्ठींत मोठीच खळबळ उडाली. शैली, विचार व छंद, या सर्वच दृष्टींनीं नावीन्यपूर्ण असणाऱ्या या कवितेचें बंगाली जनतेनें स्वागतच केलें. क्रान्तिकारक भावना प्रगट करण्यास बंगाली शब्द अपुरे पडल्यानें यांनीं त्या कवितेंत फार्शी व उर्दू शब्द वापरले आहेत. यांच्या या धाडसानें शुद्ध बंगभाषेचे पुरस्कर्ते खवळून 'भ्रष्टाकार भ्रष्टाकार' म्हणून ओरडूं लागले. परंतु यांची लोकप्रियता वाढतच गेली. यांच्या कवितेंतील शब्दसौंदर्य अर्थाला भूषवितें. काव्यवस्तु व काव्यरूप एकरूप होतात. यांचें हें सामर्थ्य चित्तरंजन दासांच्या लक्षांत आलें व त्यांनीं यांच्या कविता फॉर्वर्डच्या पहिल्या पानावर छापण्यास सुरुवात केली.

चित्तरंजनदास वारले तेव्हां बंगालमध्यें जातीयता नुसती थैमान घालीत होती (१९२६). बंगाली हिंदूंचा तर, यांनीं एका वैष्णव हिंदु मुलीशीं लग्न केल्याबद्दल यांच्यावर अत्यंत राग होता. यांच्या क्रान्तिकारक कविता प्रसिद्ध होऊं लागतांच सरकारनें यांचें पेन्शन व हवालदारीचा हुद्दा काढून घेतला, व यांचे कवितासंग्रह जप्त केले. अजूनहि यांचे पांच कवितासंग्रह जप्तावस्थेंत आहेत. त्यामध्यें १९३०मध्यें जप्त झालेला यांचा 'प्रलयशिखा' हा काव्यसंग्रह विशेष प्रसिद्ध आहे. 'नव भारतेर हळदीघाट', 'जतीन दास' व 'जागरण' या कविता सोडून बाकीच्या कविता प्रसिद्ध करण्यास आतां परवानगी मिळाली आहे.

सर्व बाजूंनीं विरोध असतां यांनीं समाजवादाचें अध्ययन केलें आणि हे समाजवादी बनले.

आतां वयाच्या उताराकडे वळले असतां यांनीं प्रणयगीतें लिहिण्यास सुरुवात केली आहे. तथापि तरुणपणीं लिहिलेलीं यांचीं 'क्रांतिगीतें' हे पेटते निखारे आहेत.

यांची आर्थिक स्थिति खालावली तेव्हां बंगाल असेंब्लीनें यांना दरमहा दोनशें रुपये द्यावेत, अशी शिफारस केली. 'अग्निवीणा' हा यांचा पहिला काव्यसंग्रह आहे.

रवींद्रनाथ टागोर व हे यांच्यामध्यें असणाऱ्या स्नेहाचें

प्रतीक म्हणून रवींद्रनाथांनीं आपली 'वसंत' ही नाटिका यांना 'श्रीमान् कवि काजी नजरूल इस्लाम स्नेहभाजनेषु' या माथन्यासह अर्पण केली आहे.

इस्लामपुरकर, वामनशास्त्री—(मृत्यु स.१९१३) संस्कृत ग्रंथांचा कुशल संपादक, भाषान्तरकार व मराठी लेखक. हे एक अत्यंत दीर्घोद्योगी व व्यासंगी शास्त्री होते. 'कथासरित्सागर' या संस्कृत कथात्मक ग्रंथावरून 'बृहत्कथासागर' नांवाचा ग्रंथ मराठींत लिहून त्याचे पांच खंड यांनीं प्रसिद्ध केले. पहिला खंड १८८७ मध्यें प्रसिद्ध केला. हा ग्रंथ नऊ खंडांत प्रसिद्ध व्हावयाचा होता. याच वर्षी यांनीं 'मेघदूतकाव्यार्थदीपिका' नांवाची मराठी टीका व 'शूद्रधर्मतत्त्वप्रकाश' असे ग्रंथ प्रसिद्ध केले. या ग्रंथांखेरीज पोतदारांच्या छोट्या ग्रंथमालेंतून 'करुणराघव', 'चारुदत्त आणि वसंतसेना', 'प्रणयीमाधव', 'राजा अग्निमित्र', 'ललित वत्सराज', 'विदग्ध पुरुरवा', 'सुंदरी व वसंतसेना' हीं कादंबरीवजा पुस्तकें; बडोदें दरबारकडून 'कर्पूरमंजरी', 'आदिराजचरित्र' व 'कविताशास्त्र', आर्यभूषणकडून 'अविचाराचा परिणाम अथवा मुंजराजाचा मृत्यु', ही ऐतिहासिक कादंबरी अशीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं. यांची भाषाशैली प्रौढ, सुरस व चित्ताकर्षक होती (अ. म. वा. से.).

यांनीं बाँबे संस्कृति सीरीजमध्यें 'पराशरमाधवः' संपादित केलें आहे.

इंद्रजी, डॉ. भगवानलाल—(जन्म स. १८३९–मृत्यु स. १८८८) सुप्रसिद्ध पुराणवस्तुसंशोधक.

हे जातीनें गुजराथी ब्राह्मण. पोटजात प्रश्नोरा नागर. यांचें जन्मस्थान जुनागढ. यांचे भाऊ संस्थाननें काढलेल्या संस्कृत पाठशाळेचे प्रमुख होते. त्यामुळें महत्त्वाच्या संस्कृत ग्रंथांचें अध्ययन करण्याची संधि यांना घरींच मिळाली. परंतु पुढें लवकरच या अध्ययनाचा यांना कंटाळा येऊन इतिहासविषयांत यांचें मन विशेष रमूं लागलें, आणि त्याचेच अनुसंधानानें आपल्या प्रांताच्या ऐतिहासिक परंपरेचा मागोवा घेत घेत यांची बुद्धि गिरनार पर्वतावर कोरलेल्या लेण्यांत स्थिर झाली. परंतु तत्कालीन लिपि व हस्ताक्षरें यांच्या ज्ञानाच्या अभावीं या लेखांमध्यें कोणत्याहि प्रकारचें लक्ष लागण्याची शक्यता नाहीं ही गोष्ट लक्षांत आल्यामुळें यांनीं त्या अध्ययनास सुरुवात केली व लवकरच "अशोकस्तंभ", "रुद्रदामनचे व स्कंदगुप्ताचे शिलालेख" या गिरनार पर्वतावरील महत्त्वाच्या शिलालेखांचें अर्थज्ञान होण्याइतपत त्या शास्त्रांत यांची प्रगति झाली. त्या शास्त्राबद्दल यांना वाटणारी उत्कंठा लवकरच मि. अलेक्झांडर किन्लोक फोर्ब्स यांचे लक्षांत आली व त्यांनीं डॉ. भाऊ दाजींशीं यांची गांठ घालून दिली (१८६१) व लवकरच त्यांचे मदतनीस म्हणून यांनीं काम करण्यास सुरुवात केली.

भाऊ दाजी यांचे मदतनीस म्हणून यांनीं केलेली कामगिरी यांच्या प्रगतिपथावरील एक महत्त्वाचें पाऊल या दृष्टीनें महत्त्वाची आहे. शिलालेखांचें पद्धतशीर वाचन करणें हें प्रमुख काम व उताऱ्यांच्या नकला, जुन्या नकलांशीं रुजवात, त्याकरितां पुनः नवीन नकला करणें, त्यांमध्यें जागच्याजागीं नव्यानव्या दुरुस्त्या करणें हीं त्याचे अनुषंगानें येणारीं इतर कामें असा यांचा या वेळच्या कार्याचा ढोबळ आराखडा होता.

या अहोरात्र केलेल्या कामाच्या पुण्याईवर यांना स्वतंत्रपणें हींच कामें मोठ्या प्रमाणावर करण्याची योग्यता आली ही गोष्ट विसरतां येणें शक्य नाहीं. यांची ही तडफेनें काम करण्याची शक्ति डॉ. भाऊ दाजी यांच्याहि चांगली लक्षांत आली. कारण शेवटीं शेवटीं कांहीं दिवस हिंदुस्थानाच्या सर्व प्रांतांतील शिलालेखांचें काम त्यांनीं यांचेवर सोंपविलें होतें. सर्व प्रांतांतील शिलालेख नकलणें व त्यांची मुद्रणप्रत तयार करणें या दोन गोष्टींचा अंतर्भाव या कामांत होत असे. या कामानिमित्त यांना हिंदुस्थानांतील कोपरान् कोपरा, गांवन् गांव धुंडाळावें लागलें.

अत्यंत शीघ्र व बिनचूक रीतीनें कोणतीहि प्राचीन लिपि वाचून तिचा सुसंगत अर्थ लावणें या कामांत यांचा हात धरणारा अजून कोणी झाला नाहीं. अशा तऱ्हेनें महत्प्रयासानें नकललेल्या नकलांचें यांनीं नंतर काळजीपूर्वक भाषांतर केलें व नंतर त्याची सूचि तयार केली. इंग्लिश व प्राकृत या दोन भाषांशीं तोंडओळख हा या कार्याचा तादृश फायदा सांगतां येईल.

१२–१३ वर्षांच्या या खडतर तपश्चर्येनंतर थोडासा सुटकेचा निःश्वास टाकण्याची संधि यांना मिळाली. याच वेळीं भाऊ दाजी वारले (१८७४) व कांहीं तरी घरगुती प्रसंगामुळें यांचीं त्यांचेजवळ असलेलीं व यांनीं जमविलेलीं हस्तलिखितें यांच्याच स्वाधीन करण्यांत आलीं.

परंतु इतकी मोठी तपश्चर्या पाठीशीं असून यांना योग्य असें काम मिळवण्याकरितां थोडी वाटच पाहावी

लागली. इंग्रजी भाषेचें अपुरें ज्ञान हीच गोष्ट या आपत्तीच्या मुळाशीं होती.

अशा तऱ्हेनें दोन वर्षें सक्तीची विश्रांति घेतल्यानंतर यांचे हातून लिहिण्याचे दृष्टीनें कांहीं तरी भरीव कामगिरी होण्याचीं चिन्हें पुन्हां दिसूं लागलीं. या गोष्टीला कारण होणारी घटना मात्र खरोखरच क्षुल्लक होती. डॉ. बुल्हेर यांच्यातर्फे " इंडियन अँटिक्वेरी " मध्यें यांचा आपल्या 'केव्ह न्यूमरल्स'वरील कार्याची माहिती देणारा लेख प्रसिद्ध झाला. त्यामुळें मुंबईच्या 'रॉयल एशियाटिक सोसायटीनें यांना आपले सन्माननीय सभासद करून घेतलें व त्या संस्थेच्या लायब्ररींत यांचा प्रवेश घडून आला व अशा तऱ्हेनें किती तरी दिवसांची यांची इच्छा तृप्त झाली. केव्ह न्यूमरल्स म्हणजे लेण्यांमधील लेखांतील संख्यावाचन होय.

मुंबई गॅझेटियरच्या खंडांत यांनीं लिहिलेले लेख व डॉ. ए. कनिंगहॅम यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'आर्किऑलॉजिकल व्हॉल्यूम'ला आपल्या लेखांनीं यांनीं लावलेल्या हातभाराखेरीज असणाऱ्या यांच्या लेखांची संख्या अठ्ठावीस आहे. यांच्या लेखांतील संशोधन टिकाऊ स्वरूपाचें असून हिंदी इतिहास व शिलालेख यांचे एक यशस्वी विद्यार्थी या नात्यानें यांचें चिरंतन व जिवंत स्मारक ठेवण्यास ते समर्थ आहेत.

'केव्ह न्यूमरल्स'वरील यांच्या संशोधनाखेरीज पूर्वी कोणीं कधींहि न जाणलेल्या पुष्कळ अक्षरांचें यांनीं संशोधन केलेलें आहे. 'नाशिक शिलालेखा'ची आज जी सुस्पष्ट व हुबेहूब नकल आपल्या डोळ्यांसमोर आहे तिचें जनकत्व यांचेकडेच आहे. अशोकाच्या ८ व्या शिलास्तंभाचा तुकडा शोधून काढण्याचें श्रेय आपणांस यांनाच द्यावें लागेल. नाहींतर हा स्तंभ कोंकण कांठावरील सोपारा गांवामध्यें असेल, ही गोष्ट स्वप्नांतसुद्धां कोणीं खरी मानली नसती. मथुरेंतील सिंहशीर्षकहि यांनींच शोधून काढलें. क्षत्रपांचे खरोष्ठींतील अनेक लेख यावरच असल्यानें या संशोधनास विशेष महत्त्व आहे. कामांच्या मशिदीवरील शूरसेनवंशी यादवांचा लेख यांनींच शुद्धतापूर्वक वाचला व प्रसिद्ध केला. इसवी सनाच्या सातव्या शतकांतील हे लेख आहेत.

ओरिसा प्रांतांतील 'खारवेलचा उदयगिरी शिलालेख' नकलून त्याचें भाषांतर करण्याचें कामसुद्धां यांनींच केलें. त्यामध्यें मौर्य शकासंबंधीं असणारा उल्लेख शोधून काढण्याचा पहिला मानहि यांनाच मिळाला आहे. या सुप्रसिद्ध शिलालेखावर गेल्या तीस वर्षांत बरेंच कार्य झालें आहे. परंतु 'इंटरनॅशनल काँग्रेस ऑफ ओरिएन्टॅलिस्टस्'ला यांनीं सादर केलेल्या मूलग्राही संशोधनावरच या सर्व संशोधनाचा पाया उभारला गेला आहे ही गोष्ट विसरतां येणें शक्य नाहीं.

त्याचप्रमाणें जुन्नरजवळ 'नानाघाट' येथील गुहेंतील मोठा लेख व 'आंध्र नाणीं' यांवरील यांच्या कार्यामुळेंच आंध्रांचेबद्दल आज उपलब्ध असणारी अतिशय महत्त्वाची माहिती आपणांला उपयोगी पडत आहे. मि. कॅम्बेलच्या अध्यक्षतेखालीं प्रसिद्ध होणाऱ्या बॉंबे गॅझेटियरच्या पहिल्या भागाकरितां गुजराथचा इतिहास यांनींच लिहिला. त्यांत राजपुतान्यावर राज्य करणाऱ्या सोळंकींचा विस्तृत इतिहास आला आहे.

नेपाळच्या राजवंशावरील व राजघराण्यावरील २१ शिलालेख शोधून काढण्याबद्दल डॉ. बुल्हेर यांनीं यांना दिलेली 'नेपाळच्या इतिहासाचे पथनिर्देशक' ही पदवी खरोखरच सार्थ आहे, या गोष्टीची जाणीव आपण एकंदरींत या कार्याचें महत्त्व जाणून घेतलें असतां होते. वेरूळ शिलालेखावरील यांच्या संशोधनानेंहि दक्षिण राष्ट्रकूटांच्या इतिहासांत असेंच एक महत्त्वपूर्ण दालन उघडलें गेलें आहे.

एके काळीं बलाढ्य असणाऱ्या त्रैकूटक राजवंशाचें अस्तित्व व त्यांचा कलचूरि शक व हैहय यांच्याशीं असणारा संबंध याचा पत्ता अहोरात्र काम करणाऱ्या या गृहस्थांनींच लावलेला आहे. आभीर राजा ईश्वरदत्त याच्याशीं कलचूरि शकाचा संबंध लावून तो शक गुजराथेंतला असला पाहिजे हा यांचा सिद्धान्त व गुजराथ व नाशिकचे आभीर व चेदीचे त्रैकूटक व हैहय हे दोन्ही एकच असावेत, हा यांचा दावा इतिहासांतील त्या त्या क्षेत्रांत प्रकाश पाडणारा असून पुढील संशोधनानें यांचे हे सिद्धान्त पक्केच होत आहेत. आपल्या मरणाचे पूर्वी गुजराथच्या इतिहासाचें संशोधन करण्यांत हे गुंतले होते.

इतर दिशेनें यांनीं लिहिलेले लेखसुद्धां कांहीं उपेक्षणीय नाहींत. हिंदुस्थानांतील धार्मिक चळवळीबरोबरच " वेदवाद, ब्राह्मणवाद, बुद्धवाद या गोष्टींची वाढ होत नाहीं " हें यांचें मत त्या काळीं भयंकर समजलें जाण्याजोगें होतें. यांनीं शिलालेखांसंबंधीं लिहिलेले लेखसुद्धां पूर्वीच्या भूगोलाचें ज्ञान दाखविण्यास समर्थ आहेत.

अशा प्रकारच्या या थोर संशोधकाचें अभिनंदन कर-

ण्याचा पहिला मान लंडन युनिव्हर्सिटीनें मिळविला. त्या युनिव्हर्सिटीनें डॉ. कर्न यांच्या सूचनेवरून यांना ऑनररी पीएच्. डी. केलें. त्याचेच पाठोपाठ हॉलंडच्या 'डच ओरिएन्टल सोसायटी'नें व इंग्लंड व आयर्लंडच्या 'रॉयल एशियाटिक सोसायटी'नें यांना आपले ऑनररी सभासद करून घेतलें.

हिंदी व त्याचबरोबर परकीय संशोधकांकडून वाहवा मिळविण्याचा अपूर्व मान यांना अनेक वेळेला मिळाला होता. परदेशांतील यांचे चहाते मंडळींत ई. सेनर्ट व जी. बुल्हेर यांच्यासारखे लोक होते.

भाऊ दाजी व हे यांनीं 'आर्किऑलॉजी'चे क्षेत्रांत जवळ जवळ अर्धा शतकभर केलेली कामगिरी निःसंशय अविस्मरणीय आहे. हिंदी लोक ज्या क्षेत्राकडे जरा बावरूनच बघत होते त्या क्षेत्रांत परदेशी तज्ज्ञांचेकडून प्रशंसा मिळविण्याइतकी मोठी कामगिरी करणें ही गोष्ट केव्हांहि यांना भूषणावहच आहे.

डॉ. भाऊ दाजी यांनीं आपल्या केव्ह न्यूमरलस्च्या सुप्रसिद्ध संशोधनांत जरी यांचा उल्लेख केलेला नसला तरी डॉ. बुल्हेर यांच्या मतें या महत्त्वाच्या संशोधनांतील बऱ्याच मोठ्या भागाच्या संशोधनाचें श्रेय यांच्याकडे आहे.

भाऊ दाजी यांच्या अतिशय लाडक्या सहकाऱ्यांत मोडण्याचा मान यांना मिळाला होता. ज्या वेळीं भाऊ दाजी अतिशय आजारी होते त्या वेळीं हे नेपाळला निघाले आहेत अशी बातमी त्यांना मिळाली. ज्या वेळीं नेपाळ सरकारकडून 'तुमच्या विनंतीवरून आम्ही यांची व्यवस्था करीत आहोंत' असा निरोप आला त्या वेळीं भाऊ दाजींनीं समाधानाचा निःश्वास टाकला.

भाऊ दाजीच्या मृत्यूनंतर मात्र यांची आर्थिक स्थिति कधींच समाधानकारक राहूं शकली नाहीं. काठेवाडचे राजेसाहेब यांनीं दिलेल्या देणगीमुळें व डॉ. कॅम्बेल व बर्गेस यांच्या येणाऱ्या खंडित द्रव्यामुळें यांची आर्थिक स्थिति कधींच सुधारूं शकली नाहीं. मात्र यांच्या या दुःस्थितीची कल्पना कोणालाहि येऊं नये याबद्दल यांचा कटाक्ष असे. जवळ जवळ चवदा वर्षें अगदीं निकट मित्र असूनहि डॉ. बुल्हेर यांना मरते वेळेशिवाय आपल्या आर्थिक दैन्याचा सुगावा यांनीं कधींहि लागूं दिला नव्हता (एमिनन्ट ओरिएन्टालिस्ट).

यांनीं आपला क्षत्रप व इतर राजांच्या नाण्यांचा बहुमूल्य संग्रह व मथुरेचा सिंहध्वज ब्रिटिश म्यूझियमला भेट म्हणून मरतेसमयीं दिला.

यांची जन्मशताब्दी मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटींत मोठ्या थाटानें साजरी करण्यांत आली, यांचें तैलचित्र तेथें लावण्यांत आलें व एक इंग्रजी लेखसंग्रहहि यांच्या स्मरणार्थ प्रसिद्ध केला. तसेंच गुजराथ फोर्ब्स सोसायटीनें यांच्या शताब्दीनिमित्त एक गुजराथी लेखसंग्रह प्रसिद्ध केला. गुजराथ संशोधनमंडळानेंहि एक इंग्रजी व गुजराथी लेखाचा खंड यांच्या स्मरणार्थ काढला.

ईश्वरचंद्र

ईश्वरचंद्र विद्यासागर—(जन्म स. १८२० -मृत्यु स. १९०१)

विधवाविवाहाच्या कायद्याचे जनक व सुप्रसिद्ध संस्कृत पंडित. यांचें जन्मस्थान, बंगालमधील हुबळी जिल्ह्यांतील वीरसिंह हें गांव. पिता–ठाकुरदास वंद्योपाध्याय. हे सर्व भावंडांत वडील होते. यांनीं शाळा खात्यांत साध्या शिक्षकापासून प्रिन्सिपलच्या जागेपर्यंत कामें केलीं (स. १८४०–१८५५). पुढें यांनीं एज्यू. इन्स्पेक्टरचें काम कांहीं काल केलें. तेवढ्या काळांत जुन्या पाठशाळांतून फरक करून नवीन शिक्षणपद्धति यांनीं अमलांत आणली. स्त्रीशिक्षणासाठीं मुलींच्या शाळा सुरू केल्या; पण लोकाश्रयाच्या अभावामुळें त्या पुढें मोडल्या. पुढें वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं मतभेद झाल्यानें त्या जागेचा यांनीं राजिनामा दिला. बंगालच्या गव्हर्नरनीं मध्यस्थी केली तरी तो यांनीं परत घेतला नाहीं.

यांनीं 'वेताळपंचविशी' नामक एक पुस्तक मुलांसाठीं लिहिलें (१८४६). उपक्रमणिका, कौमुदीचे तीन भाग, शाकुन्तलाचें बंगाली भाषान्तर हीं पुस्तकें लिहिलीं. तसेंच वर्णपरिचय, कथामाला, चरितावलि वगैरे पुस्तकें शाळांसाठीं लिहिलीं. या शालेय पुस्तकांमुळें कांहीं काल

यांचें मासिक उत्पन्न पांच हजार रुपये असे. तीन हजार रुपये यांची स्थिर मिळकत होती. यांचीं शालेय पुस्तकें यांच्या मागें पुष्कळ वर्षें शाळांत चालू होतीं. 'मेट्रोपोलिटन इन्स्टिट्यूट' यांनीं स्थापन केलें. बंगाल्यांतील ती एक भरभराटीस आलेली संस्था आहे.

यांनीं विधवाविवाह हा हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें कसा सर्वस्वीं ग्राह्य आहे या विषयावर एक पुस्तक लिहिलें (१८४५). विरोधकांनीं संस्कृतभाषेंत लेख व पुस्तकें लिहून त्याचें खंडन केलें. यांनीं मात्र आपल्या उत्तर-प्रत्युत्तराचें सर्व लेखन बंगाली भाषेंत केलें. त्यामुळें यांचें म्हणणें बहुजनसमाजांत पसरलें आणि यांना लोकमताची अनुकूलता मिळाली. स्त्रिया तर यांना आपला मित्र मानीत. यामुळें पुढें विधवाविवाहाचा कायदा संमत झाला (१८५६).

आई आजारी आहे असें समजतांच वर्षाऋतु किंवा रात्र मनांत न आणतां धोधो वाहणाऱ्या नदीच्या पुरांत उडी टाकून पैलथडी जाऊन यांनीं मातेची ऋणावस्थेंत भेट घेतली. विधवाविवाहाच्या पवित्र कार्यास यांनीं आपल्या धर्मपरायण वृद्ध मातापित्यांचा आशीर्वाद घेतला होता. यांनीं लिहिलेल्या पुनर्विवाहाच्या पुस्तकाच्या दोन हजार प्रती एका आठवड्यांत खपल्या. या चवदा प्रकरणात्मक पुस्तकाचें अकरा प्रकरणांत यांनीं इंग्रजी भाषान्तर केलें. त्याचें मराठी भाषान्तर विष्णुशास्त्री पंडित यांनीं केलें. यांनीं आपल्या कार्याची मोहिनी सुशिक्षित-अशिक्षित समाजावर विलक्षण घातली होती. केशवचंद्रांसारख्या धर्मसुधारकानें 'विधवाविवाह' नाटकांत पुढाकार घेतला. खुद्द ईश्वरचंद्रांनीं रंगभूमि आजन्मांत पाहिली नव्हती तरी हें नाटक वारंवार पाहिलें. हें नाटक न पाहिलेला मनुष्यच त्या काळीं सबंध कलकत्त्यांत मिळाला नसता. यांनीं दीर्घ प्रयत्न करून स. १८५६ चा १५ वा कायदा पास करून घेतला. या कायद्यान्वयें हिंदु विधवेस पुनर्विवाह करितां येऊं लागला, तिची संतति कायदेशीर ठरली आणि तिला आपल्या पूर्व घरच्या मुलांचें पालन करण्याचाहि हक्क राहिला.

श्रीशचंद्र विद्यारत्न यांनीं दहा वर्षांच्या एका अज्ञ बालविधवेचें पाणिग्रहण करून तीस वरील कायद्याचा प्रथम लाभ मिळवून दिला. या मुलीचें लग्न तिच्या चौथे वर्षी होऊन तिला सहावे वर्षी वैधव्य आलें होतें. स. १८२८ मध्यें एका कलकत्ता शहरांत ३०९ बालविधवा सती गेल्या होत्या. स. १८३३ मध्यें राजा राममोहनराय यांच्या प्रयत्नास यश येऊन कायद्यानें सती जाण्यास बंदी करण्यांत आली. पुढें तेवीस वर्षांनीं पुनर्विवाहाचा कायदा पास झाला.

मुंबईस स. १८३५ मध्यें रघुनाथ जनार्दन व गतभर्तृका चिमाबाई या गौड सारस्वत ब्राह्मण जातींतील व्यक्तींचा पहिला पुनर्विवाह झाला. स. १८६० मध्यें डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खड यांचे घरीं गणपतराम दलपतराम व दिनकुंवर या गुर्जर व्यक्तींचा पुनर्विवाह झाला. स. १८६५ मध्यें मुंबईनजीक वांद्रें येथें पुण्याचे वकील नारायण जगन्नाथ भिडे व मोरो रामचंद्र पेंडसे यांची विधवा कन्या यांचा झालेला पुनर्विवाह कोंकणस्थ ब्राह्मण ज्ञातींतील पहिला पुनर्विवाह होय (विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांचे चरित्रांतून घेतलेली माहिती). बालविवाहाविरुद्धहि यांनीं उठाव केला होता. तसेंच बहुपत्नीकत्वाविरुद्धहि यांचा प्रचार चालू असे.

हे केवळ सुधारणेचीं तत्त्वें प्रतिपादन करीत नसत तर प्रसंगीं तीं आचरणांतहि आणीत असत. आपल्या मुलींचीं लग्नें त्या १४-१५ वर्षांच्या झाल्याशिवाय यांनीं केलीं नाहींत. एका मुलाचें लग्न एका बालविधवेशीं केलें. यांनीं आपल्या खर्चानें आपल्या गांवीं एक इंग्रजी शाळा व दवाखाना सुरू केला.

कलकत्त्यास भरलेल्या दरबारांत राणीकडून बहुमानाची सनद (१८७७) व पुढें सी. आय. ई. ही पदवी यांना देण्यांत आली (१८९०).

कमालीची मातृभक्ति, साधेपणा, निर्भयपणा आणि नीतिमत्ता यांमुळें यांची समाजावर विलक्षण छाप पडे.

उ

उजगरे, भास्कर कृष्ण—(जन्म स. १८८७–मृत्यु स. १९३५) सुप्रसिद्ध ख्रिस्ती मिशनरी व मराठींतील लेखक.

यांचें जन्मस्थान भांबुर्डा. यांचे वडील मिशनरी स्कूलमध्यें शिक्षक होते. ह्मेगमध्यें मातापितरांचा मृत्यु झाल्यानें अनाथ होऊन हे अहमदनगर मिशन स्कूलमध्यें शिक्षणाकरितां गेले. याच ठिकाणीं रे. टिळक व भारदे यांच्या सहवासानें वाङ्मयांत यांना गोडी लागूं लागली. भक्तिरसानें ओथंबलेल्या कविता लिहिण्यास यांनीं याच वेळीं सुरुवात केली. यांपैकीं कांहीं कविता मराठी प्रार्थना-पुस्तकांत ग्रथित करण्यांत आलेल्या आहेत.

याच वेळीं यांचे डोळे झपाट्यानें बिघडूं लागले. परन्तु मिरज हॉस्पिटलमध्यें यांचे डोळे परत सुधारण्यांत आले. मानवी प्रयत्नांपेक्षां ईश्वरी कृपेचाच अंश या गोष्टींत अधिक आहे अशी समजूत झाल्यानें हिंदी ख्रिस्ती लोकांच्या सेवेंत आपलें उरलेलें आयुष्य व्यतीत करण्याचा यांनीं निश्चय केला. निरनिराळ्या वृत्तपत्रांतून लिहून ख्रिस्ती लोकांच्या विपन्न दशेची कल्पना जनतेस आणून द्यावयाची ही यांची या बाबतीतींल पहिली कल्पना होती. त्याचप्रमाणें हिंदी ख्रिस्ती जनतेंत मराठी भाषा व वाङ्मय यांचा प्रसार करण्याकडेहि यांचा कल असे. नाशिक, मुंबई व निपाणी येथें भरलेल्या 'इंडियन ख्रिश्चन लिटररी कॉन्फरन्स' मध्यें यांचा बराच मोठा हात होता (१९२७–३३).

रे. टिळक यांच्या कविता तीन खंडांत प्रसिद्ध करण्याची यांची कल्पना होती. त्यांपैकीं दोन खंड यांनीं प्रसिद्ध केले असून तिसऱ्याची सामग्री यांनीं जमविली होती. यांनीं मराठी वाङ्मयाचा एक इतिहासहि लिहिला असून हिंदी ख्रिस्त्यांनीं त्यामध्यें घातलेल्या मौल्यवान् भरांवर त्यांत विशेष जोर देण्यांत आला आहे.

आपल्या आयुष्याचे उत्तरार्धांत सासवड येथें यांनीं एक धार्मिक संस्था काढली होती. सर्व धर्मांनीं मान्य केलेल्या धार्मिक तत्त्वांबद्दल विचारविनिमय करणें हा या संस्थेचा प्रमुख हेतु होता.

ख्रिस्ती धर्माच्या अभिमानाच्या यांच्या आयुष्यावर पडलेल्या छायेंत हटवादीपणापेक्षां जमवून घेण्याची वृत्तिच अधिक आहे. वाङ्मयः– (१) नारायण वामन टिळक (१९२८), (२) तरणोपाय (१९२८), (३) एका कारागृहवासी गृहस्थाचें आत्मवृत्त. (४) मराठी वाङ्मयाचा इतिहास.

उटगीकर, नारायण बापूजी—(मृत्यु स. १९३१) संस्कृतवाङ्मयाचे संशोधक आणि अभ्यासक.

हे एम्. ए. होते. प्रथम सरकारी हायस्कूलांत हे शिक्षक म्हणून लागले. तेथून पुणें डेक्कन कॉलेजमध्यें लायब्ररीवर काम केलें. प्रथम कांहीं वर्षें पुण्याच्या भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूटचे ऑननरी सेक्रेटरी होते (१९१६–१८). तेथेंच हस्तलिखितांच्या संग्रहाचे हे क्युरेटर झाले (१९१८–१९१९).

त्यानंतर महाभारताची चिकित्सक प्रत तयार करण्याचें काम तेथेंच सुरू झालें. त्याचे यांना मुख्य संपादक नेमण्यांत आलें (१९१९–१९२४). त्याप्रमाणें यांनीं नमुना म्हणून 'विराटपर्व' काढला. सर डॉ. रा. गो. भांडारकर यांच्या लेखसंग्रहाचे चार भाग निघाले त्याचें संपादकत्व यांच्याकडेच होतें.

जर्मनींतील पंडित रिचर्ड गार्बे यांच्या भगवद्गीतेच्या प्रस्तावनेचें इंग्रजी भाषान्तर यांनीं केलें. तसेंच 'गौडवहो' या ग्रंथाची शुद्ध प्रत यांनीं तयार केली. यांना स.१९२७ सालीं अर्धांगवायु झाला.

उत्तम भिक्षु—(निर्वाण स. १९४०) राष्ट्रसभेचे व हिंदुसभेचे पुरस्कर्ते सुप्रसिद्ध बौद्ध भिक्षु.

ब्रह्मदेशांतील एका अत्यंत प्रतिष्ठित बौद्ध घराण्यांत यांचा जन्म झाला. वयाच्या तिसाव्या वर्षी सर्व मायापाश तोडून हे भिक्षु बनले. बुद्ध व त्याचें तत्त्वज्ञान यांचा प्रचार करण्यांत यांनीं दिवसचे दिवस घालविले आणि थोड्याच दिवसांत बौद्ध भिक्षूंचे हे एक मोठे पुढारी बनले. बौद्ध धर्माचे प्रचाराकरितां युरोप, चीन, जपान वगैरे देशांतहि यांनीं प्रवास केला.

परंतु या धार्मिक क्षेत्रापेक्षांहि राजकीय रंगणांत असणारें यांचें वजन विशेष स्पृहणीय होतें. एकदां हे न्यायकोर्टांत चालले असतां रस्त्याचे दोहों बाजूंनीं उभे राहून ब्रह्मी स्त्रियांनीं आपल्या केसांच्या यांच्याकरितां पायघड्या केल्या. आपला पुढारी या दृष्टीनें ब्रह्मी लोकांवर यांचें असणारें वजन लक्षांत येण्यास ही एकच गोष्ट पुरेशी आहे.

हे अनेकभाषा-कोविद होते. चिनी, जपानी, इंग्लिश

पाली, हिंदी व बंगाली इत्यादि अनेक भाषांतून हे उत्कृष्टपणानें बोलूं शकत. राष्ट्रीय समेंतहि यांना असेंच मानाचें स्थान असे. ब्रह्मदेशांतील कॉंग्रेस चळवळीचे तर हे प्रमुखच होते.

ब्रह्मदेश हिंदुस्थानापासून अलग करूं नये, या ब्रह्मदेशांतील चळवळीचे हे प्रमुख होते. ब्रह्मदेश हा सांस्कृतिक व धार्मिक दृष्टया हिंदुस्थानचाच भाग आहे ही यांनीं या चळवळीस लावलेली कारणपरंपरा यथायोग्यच होती.

अखेर या चळवळीबद्दल ब्रह्मी सरकारनें यांना हद्दपार केलें. कलकत्त्यास आपली हद्दपारी कंठीत असतांनाच हे हिंदुसभेच्या राजकारणांत भाग घेऊं लागले. १९३५ त कानपूर येथें भरलेल्या अखिल-भारतीय हिंदुसभेचे हे अध्यक्ष होते. चीनमधून अनेक भिक्षु या अधिवेशनास आले होते. या अध्यक्षस्थानानंतर पंजाब, संयुक्तप्रांत, व बंगालमध्यें यांनीं मोठेमोठे दौरेहि काढले. यांच्या नेतृत्वानें संशोधून प्रसिद्ध झालेला ' भगवान् गौतम बुद्ध ' (जीवनी व उपदेश) हा हिन्दी ग्रंथ प्रसिद्ध आहे.

उदयशंकर—(जन्म स. १९००) जगप्रसिद्ध नर्तक व हिंदी नृत्याचे प्रचारक.

झालवारच्या (राजपुताना) डॉ. श्यामशंकर चौधरींचे हे चिरंजीव. जात ब्राह्मण. यांचे वडील झालवारच्या महाराजांचे खाजगी चिटणीस होते.

हे विद्यार्थी असतांना अतिशय उनाड असत. प्रवास हा त्या वेळीं यांच्या आवडीचा व्यवसाय असे. मात्र पुढें यांना चित्रकलेचा नाद लागला. चित्रकलेचें प्राथमिक शिक्षण यांना गाझीपूर येथें मिळालें व उच्च शिक्षण यांनीं बनारस व मुंबईचे स्कूल ऑफ आर्टसमध्यें संपादन केलें. (१९१७). यानंतर त्याच्या उच्च शिक्षणाकरितां हे लंडनच्या 'रॉयल कॉलेज ऑफ आर्टस्'ला रवाना झाले. त्या ठिकाणीं सर विल्यम रोथेन्स्टाइन हे यांचे पेन्टिंगमधील गुरु होते. विशेष प्रावीण्य संपादन करून हे ग्रॅज्युएट झाले. या वेळीं स्पेन्सर व जॉर्ज क्लासेन पारितोषिकेंहि यांनीं संपादन केलीं.

पुढें चित्रकार म्हणून हे कधींहि प्रसिद्धीस आले नसले तरी चित्रकलेमधूनच यांच्या नृत्यविषयक आवडीला प्रेरणा मिळाली आहे, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे.

नाट्याच्या अनुभवाची पहिली संधि यांना युरोपमध्यें असतांनाच मिळाली. स. १९१४ सालच्या महायुद्धांत जखमी झालेल्या सैनिकांचे मदतीकरितां यांच्या वडिलांनीं लंडन येथें एक नाट्यप्रयोग आंखला. तोच यांच्या नाट्यप्रवेशांतील पायाचा दगड होय.

याच वेळीं यांनीं काव्यगायन करण्यास सुरुवात केली. वडिलांनीं लिहिलेल्या नाटिकांत काम करण्याचा यांनीं प्रघात पाडला आणि मित्रमंडळींत आपले नृत्याचे कार्यक्रम करण्यासहि यांनीं सुरुवात केली.

अशाच एक नृत्यप्रसंगीं सुप्रसिद्ध रशियन नर्तिका ॲना पॅव्हेलोव्हा ह्यांचें लक्ष यांच्या नृत्याकडे वळलें व लवकरच त्यांच्या नृत्याचे ताफ्यांत यांचा समावेश करून घेण्यांत आला. याच वेळीं ॲना पॅव्हेलोव्हांना हिंदी नृत्यकला शिकविण्याची जबाबदारी यांचेवर टाकण्यांत आली (१९२३-२७).

अशा तऱ्हेनें यांच्या अंगांतील सुप्त गुणांना ॲना पॅव्हेलोव्हामुळें एकदम चालना मिळाली व त्यांनीं 'राधाकृष्ण बॅलट'मध्यें आपले सहकारी म्हणून यांना निवडल्यानें तर एक उत्कृष्ट नर्तक होण्याची संधि यांना मिळालीं. या नृत्याचे प्रयोग करण्यांत यांनीं अमेरिकेंत बरींच वर्षे व्यतीत केलीं.

यानंतर यांनीं कांहीं वर्षे युरोपमध्यें घालविली. निरनिराळ्या अडचणींना तोंड देत एक उत्कृष्ट धंदेवाईक नर्तक म्हणून हे प्रसिद्ध झाले. या दृष्टीनें यांचा युरोपांतील हा वास महत्त्वाचा आहे.

यानंतर थोड्याच दिवसांनीं हे हिंदुस्थानला परत आले (१९२९). यांच्या 'सोलो'चा पहिला प्रयोग कलकत्ता येथें झाला. यांतील पहिला माग संपल्यानंतर श्रोत्यांत बसलेल्या डॉ. अवनींद्रनाथ टागोरांनीं स्टेजवर येऊन यांची मनापासून स्तुति केली. सोलो म्हणजे एकच पात्रानें करावयाचा नर्तनप्रयोग होय.

याचे पुढचेच वर्षी मिस् ॲलन बोनर या हिंदी नृत्यकलेसंबंधीं विशेष प्रेम वाटणाऱ्या स्त्रीस जोडीदार म्हणून घेऊन यांनीं यूरोपमध्यें आणखी एक सफर काढली. हिन्दी नर्तक व गानतज्ज्ञ लोकांचा एक संचहि यांनीं या वेळीं आपल्याबरोबर घेतला होता. या वेळीं यांना मिळालेलें यश पूर्वीच्या यशाच्या मानानें किती तरी पटींनीं अधिक होतें. यानंतर हे अमेरिकेलाहि गेले.

आजपर्यंत अमेरिका व कॅनडा येथें निरनिराळ्या प्रसंगांनीं यांनीं चार सफरी केल्या असून यांच्या कार्यक्रमामुळें यांचेविषयीं आदर वाटणाऱ्या प्रेक्षकांची संख्या एक लाखाचे वर गेलेली आहे.

परंतु स्टेजवरील आपल्या यशांतच गुंग होऊन राहण्याची यांच्या मनाची तयारी नव्हती. या यशाबरोबरच हिंदी नृत्यकला व संगीत यांकरितां कांहीं तरी भरीव कार्य करावें असें यांच्या मनांत घोळत होतें. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या संघांतर्फे होणाऱ्या तुरळक धंदेवाईक नृत्यप्रयोगांमुळें खऱ्या कलावंताची उपासमार होते ही गोष्ट बरेच दिवसांपासून यांच्या लक्षांत आली होती. याच्या मुळाशीं शिक्षण व अनुभव यांच्या पार्श्वभूमीचा अभाव आहे असें यांच्या मनानें घेतलें. सर्वसामान्य जनतेची रुचि बिघडविण्याचें कामहि या नृत्यप्रयोगांकडून होत असल्याचें यांचे लक्षांत आलें.या गोष्टीला उपायहि यांचेजवळ तयार होता. गुणी विद्यार्थ्याला ज्या ठिकाणीं योग्य शिक्षण दिलें जाईल व कांहीं तरी कार्य करण्यास ज्या ठिकाणीं एखाद्या कलावंतास स्फूर्ति मिळेल अशा एखाद्या संस्थेची स्थापना करणें हाच यांच्या दृष्टीनें या गोष्टीस उपाय होता व लवकरच हें आपलें स्वप्न यांनीं सत्य सृष्टींत उतरविलें. यांनीं अल्मोरा येथें 'उदयशंकर आर्टस् स्कूल' काढलें (१९४०).

या संस्थेस आर्थिक साहाय्य मिळविण्याच्या हेतूनें हे १९३९ मध्यें आपल्या मंडळीसह साडेतीन महिन्यांच्या भारतवर्षीय प्रवासाला निघाले. हिंदुस्थानांतील मोठमोठ्या गांवीं जवळ जवळ अठ्ठ्याऐंशी यशस्वी प्रयोग यांनीं केले.

यांचे जोडीदार म्हणून नृत्य करणाऱ्या सिमकीचा उल्लेख केल्याशिवाय यांची माहिती पुरी होणार नाहीं. सिमकीचें खरें नांव 'सायमन बारबेरी'. पॅरिसमध्यें हे नृत्य करीत असतां त्यांची यांच्याशीं गांठ पडली. त्या वेळीं त्या फक्त सोळा वर्षाच्या होत्या. ज्या क्षणीं त्यांनीं पॅरिसमध्यें यांचें नृत्य पाहिलें, त्याच क्षणीं त्या यांच्या अंधभक्त बनल्या. नंतर यांच्याबरोबर हिंदुस्थानांत येऊन त्या यांच्या नृत्यांतील एकमेव जोडीदार बनल्या आहेत. 'शिवपार्वतीनृत्य'मध्यें 'उदयशंकर-सिमकी' या जोडीनें येथें व परदेशांत मिळविलेलें यश केवळ अपूर्व आहे.

विष्णुदास शिराळी या कानडी गृहस्थांचे नेतृत्वाखालीं चालणारा ऑर्चेस्ट्रा हा यांच्या नृत्यांतील बराच मोठा भाग व्यापतो. कोणीं तरी असें म्हटलें आहे कीं, यांच्या नृत्याच्या यशस्वितेंतील दोन तृतीयांश भाग ऑर्चेस्ट्राकडे जातो. त्यांतील अतिशयोक्ति सोडून दिली तरी ऑर्चेस्ट्राचा श्रेष्ठपणा कळून येण्यास हें उदाहरण पुरेसें आहे.

यांच्या सर्व नृत्याची यशस्विता सौंदर्य व संगीत या दोन्ही दृष्टींनीं परिपूर्ण अशा प्रेक्षकांवर होणाऱ्या काव्यमय परिणामांत सामावली आहे. त्याचप्रमाणें नाट्यशास्त्रानें सुचविलेल्या कोणत्याहि नियमांचें उल्लंघन करावयाचें नाहीं, हा दंडकहि यांनीं आपल्या मागें लावून घेतला असल्यानें शास्त्रीय व सर्वसाधारण अशा दोन्ही तऱ्हेच्या प्रेक्षकांच्या दृष्टीनें यांचा कार्यक्रम सरस होतो. नाट्यशास्त्रांत कथन केलेल्या सुंदर कल्पना हे अंगविक्षेपांचे साहाय्यानें तितक्याच रसिकतेनें व्यवहारांत आणून ठेवतात. मुद्राभिनय तर यांनीं इतका पराकोटीला नेलेला आहे कीं पौर्वात्य व पाश्चिमात्य अशा दोन्ही तऱ्हेच्या रसिकांचें मनोरंजन एकाच वेळीं करण्याचें सामर्थ्य त्यांचें साहाय्यानें यांना मिळालें आहे.यांच्या गारुड्याचे (Snake Charmer) नृत्याचेंच घ्याना. यांचे हातांतील नसलेला साप बघण्यासाठीं किती प्रेक्षकांनीं आपली मान उंचावली आहे त्याला गणतीच नाहीं. तीच स्थिति रास-लीला व इतर ग्रामीण नृत्यांची आहे. त्यांतील स्वच्छंदीपणा व कला यांनीं कोणताहि रसिक सहज भारला जावा इतक्या उत्कटतेनें तीं करण्यांत येतात.

त्याचप्रमाणें हे व सिमकी यांचें राधाकृष्ण-नृत्यहि असेंच लोकप्रिय झालें आहे.

परन्तु या सर्वांपेक्षांहि यांचें 'शिवपार्वतीनृत्य' हें नृत्य सरस आहे यांत शंका नाहीं. नऊ रसांतून प्रवास करणारा यांचा हा नृत्यप्रसंग यांच्या सर्वोत्कृष्ट नृत्यांत सामील होण्याच्या योग्यतेचा आहे. शांत रसांतून भयानक रसांत, करुण रसांतून रौद्र रसांत, बीभत्स रसांतून वीररसांत भावना हेलावत नेण्याचें या नृत्यांत प्रगट होणारें यांचें कौशल्य अत्युच्च आहे. न कळतच यांतील प्रत्येक पायरी ही अनंत काळपर्यन्त स्मृतींत रेंगाळणाऱ्या स्वप्नांचा एक भाग बनते.

या नृत्यांमधील सिमकीचें कौशल्यसुद्धां असेंच नयनमनोहर वाटतें. अभिनयाच्या प्रत्येक कृतीबरोबर ती आपल्याभोंवतीं सौंदर्याचीं नवींनवीं वलयें निर्माण करीत जाते.

अशा तऱ्हेच्या कलेचा सन्मान करण्यास रसिकजनांनीं अहमहमिकेनें धांवून यावें यांत कांहींच नवल नाहीं. यामुळें देशी व विदेशी, अनेक देशच्या, अनेक भाषांच्या, अनेक जमातींच्या लोकांनीं यांचेवर देणग्यांचा अक्षरशः पाऊस पाडला आहे.

निजिन्स्कीच्या मुलीनें यांना झारचिन्हांकित अंगठी दिली, सयाजीराव गायकवाडांनीं प्राचीन मुद्राभिनयावरील आपल्याजवळ असणारे बहुमोल ग्रंथ दिले, इतकेंच काय रुडॉल्फ व्हॅलेन्टिओची Cobra Ring यांना देण्यांत आली.

परंतु या देणग्यांपेक्षांहि भावनेच्या उमाळ्यांतून बाहेर आलेले थोर लोकांचे आशीर्वादच यांना अधिक बहुमोल वाटणें साहाजिक आहे. अशा लोकांत पंचम जॉर्ज, डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडनचे राजे, रवींद्रनाथ टागोर व जवाहरलाल नेहरू इत्यादि गृहस्थ आहेत. प्राचीन कलेसंबंधीं अनादर दाखवणाऱ्या नेहरूंच्याकडून मिळविलेल्या स्तुतीला या सर्व आशीर्वादांत अधिक महत्त्व आहे, यांत शंका नाहीं.

आपल्या देशांतील लोकांच्या व देवतांच्या आयुष्याचें खरेंखुरें चित्रण करण्याचें आपलें ध्येय यांनीं अनेक वेळां बोलून दाखविलें आहे. प्राचीन हिंदुस्थानांतील लोकांचें सांस्कृतिक आयुष्य घडविण्याचे बाबतींत भारतीय नृत्यानें बजाविलेली कामगिरी केवळ अवर्णनीय आहे. अगदीं तीव्र-अगदीं त्याच प्रकारची-कामगिरी सध्यांहि नृत्यांनीं पार पाडावी व आपली पूर्वीची राहणी, पूर्वीचे आचारविचार यांचे थोडेतरी नजीक आपल्या लोकांना नेऊन, पुनःप्रत्ययाच्या आनंदाचा लाभ त्यांना मिळवून द्यावा असा यांचा हेतु आहे.

बॉलरूममध्यें चालणाऱ्या धांगडधिंग्यानें आपला देश कायमचा भारला जाऊं नये अशी यांची मनापासूनची इच्छा आहे. कारण इतके दिवस आपल्या प्राचीन नृत्याकडे दुर्लक्ष केल्याचीं फळें आपण भोगतच आहोंत. आपला देश व आपले आचार यांना पारखे झालेले आपल्याकडील शेंकडो शिक्षितंमन्य विद्वान् लोक रात्रीमागून रात्री डोळे चोळीत चोळीत बॉलरूममध्यें ठेका धरून नाचत आहेत, परंतु साहेबांचें अनुकरण केलें या समाधानाखेरीज इतर कोणत्याहि समाधानाची त्यांना तिळमात्रहि प्राप्ति होत नाहीं.

या सर्व गोष्टीचा विचार करूनच यांचें असें ठाम मत बनलें कीं, पूर्वेकडील लोकांनाच काय परंतु पाश्चिमात्यांनासुद्धां हे 'बॉलरूम डान्सेस' म्हणजे एक शाप आहे व त्यापासून सुटण्याकरितां प्राचीन नृत्यांची त्यांना गोडी लावली पाहिजे.

हिंदुस्थानांतील पौर्वात्य नृत्याचे भरभराटीच्या मुळाशीं राजाश्रयाइतकीच लोकप्रियताहि होती. अशा तऱ्हेच्या कलावंतांचा संच जवळ असणें राजे लोकांना अभिमानास्पद वाटे आणि त्या कलावंतांनाहि कलाकुशल राजाधिराजांच्या पायांशीं ती वाहण्यांत आपल्या कलेचें सार्थक वाटे. नृत्यकलेला उत्तेजन देण्यांत कोणालाहि कमीपणा वाटत नसे.

परंतु हा काल पालटला. जातिभेदानें धुंदावलेल्या सभ्य गृहस्थांना कलेपेक्षां जातीकडे अधिक लक्ष द्यावेंसें वाटूं लागलें आणि या सर्व कलावंतांना जातिबहिष्कृत करण्यांत आलें. व अशा तऱ्हेनें इतके दिवस जीवाभावानें जतन करून ठेवलेली नृत्यकला नामशेष झाली.

या अवशेषीभूत नृत्यांचे संकलनानेंच हिंदुस्थानच्या पौर्वात्य नृत्यकलेचें दर्शन पाश्चिमात्य जनतेला करून द्यावयाचें असें यांनीं आपलें ध्येय ठरविलें आहे. प्राचीन काळच्या लेण्यांतील चित्रें पाहून व त्याबरहुकूम पोषाख करून शास्त्रीय हिंदी नृत्यांचे प्रयोग निर्भेळ सौंदर्यदृष्टीनें यांनीं अत्यंत यशस्वी रीतीनें केले व परदेशांतील तज्ज्ञ लोकांचें लक्ष आपणांकडे वेधून घेतलें. यांनीं नृत्यप्रयोग करून दाखविण्यापूर्वी भारतीय नृत्याबद्दल अनास्थेची भावना परदेशांत वावरत होती. आपल्याकडेहि हलक्या लोकांत ती कला अस्तित्वांत होती. पण प्राचीन काळीं ही कला ज्या तेजानें पूर्णत्वाला पोंचली होती, तेंच तेज यांनीं पुनः एकदां भारतीय नृत्यकलेला प्राप्त करून दिलें आहे.

हिंदी संस्कृतीसंबंधीं पाश्चात्य राष्ट्रांत नांदणारा गैरसमज दूर करण्याकरितां यांनीं योजलेलें नृत्य हें माध्यम खरोखरच अभिनंदनीय आहे. कारण अशा प्रकारच्या सांस्कृतिक नृत्यप्रदर्शनांनीं पाश्चात्य जनतेच्या मनांत हिंदी संस्कृतीसंबंधीं जी अनुकूल भावना उत्पन्न होईल त्याच्या शतांशानेंहि विद्वान् पुढाऱ्यांच्या अजोड वक्तृत्वानें होणें शक्य नाहीं.

"पाश्चात्य जनतेच्या डोक्यांत शिरलेलें हिंदुस्थानविरोधाचें खूळ नाहींसें करण्याचा एकच उपाय आहे व तो म्हणजे यांच्यासारख्या कलावंताच्या सहवासांत एक तास व्यतीत करणें" हे मुंबईच्या मेयरचे उद्गार घ्या, किंवा "हिंदुस्थानचें खरें स्वरूप जर हें असेल तर आमची अमेरिका हा एक जंगली लोकांचा बाजारच समजावा लागेल" हे यांचे नृत्यप्रयोग पाहून चकित झालेल्या एका अमेरिकन टीकाकाराचे उद्गार घ्या, दोहोंमध्यें वर प्रतिपादिलेल्या मतांचीच गाढ छाया पडलेली दिसून येईल.

आणि म्हणूनच, यांच्या कांहीं योजनांत यांना मिळालेलें अपयश लक्षांत घेऊनहि परदेशी कलाप्रांगणांत देवादिकांचे आधारावर संथपणें प्रवेश करणारा एक तरुण परंतु यशस्वी नृत्यकलाविशारद या दृष्टीनें यांची योग्यता निःसंदिग्धपणें श्रेष्ठच राहील.

उदास, यशवंतराव आनंदराव—(जन्म स. १८४२–मृत्यु स. १८७७)

प्रवासवर्णनकार. हे मूळ ओतूर (जिल्हा पुणें) येथील राहणारे. बी. ए. झाल्यावर यांनीं शाळाखात्यांत मध्यप्रान्तांत नोकरी धरली. पुढें मराठी ट्रान्स्लेटर होते. आणखी निरनिराळ्या खात्यांत यांनीं कामें केलीं. हे क्षयानें मृत्यु पावले. हे चांगले शोधक होते. याची वृत्ति नम्र होती. लेथब्रिजच्या इतिहासाचें मराठी भाषान्तर यांनीं केलें आहे. धौममहाबळेश्वरवर्णन या १५० पानांच्या पुस्तकांत स्थळवर्णन, क्षेत्रमहात्म्य, इतिहासप्रकरण व निबंधसार असे चार भाग आले आहेत. त्यांतील वर्णन व विवेचन दोन्ही चांगलीं उतरलीं आहेत (अ. म. वा. से.).

उपाध्याय, रामचरित रामप्रपन्नजी—(जन्म स. १८७२–मृत्यु स. १९३९) अलीकडच्या काळांतील सुप्रसिद्ध दोनचार हिन्दी कवींपैकीं एक.

हे अजमगडचे शरयूपारीण ब्राह्मण. यांचा जन्म गाजीपूर येथें झाला. संस्कृत भाषेंतील व्याकरण, साहित्य व ज्योतिष या शास्त्रांचें अध्ययन यांनीं काशींत महामहोपाध्याय शिवकुमारशास्त्री यांचेकडे केलें. नंतर हे आपल्या गांवीं येऊन जमीनदारी व शेतकी पाहूं लागले.

पं. रामचरित त्रिपाठी या सुप्रसिद्ध हिन्दी भाषेंतील कवींच्या अनुकरणानें यांना कविता करण्याची गोडी लागली. प्रथम प्रथम जुन्या पद्धतीच्या कविता जुन्या भाषेंत केल्यानंतर लोकांची रुचि खड्या बोलीकडे विशेष आहे, हें पाहून यांनीं खड्या बोलींत कविता करण्यास प्रारंभ केला. 'सरस्वती' मासिकांत यांच्या सुफल कविता प्रसिद्ध झाल्या.

यांचे काव्यग्रंथ—

१ सूक्तिसुक्तावली, २ राष्ट्रभारती, ३ देवदूत, ४ देवसभा, ५ रामचरितचन्द्रिका, ६ रामचरितचिंतामणि (प्रबंधकाव्य), ७ देवी द्रौपदी, ८ उपदेशरत्नमाला, ९ भारतभक्ति, १० मेघदूत, ११ विचित्र विवाह, १२ सत्य हरिश्चंद्र, १३ घटकर्परकी भाषाटीका, १४ अंजना, १५ सुंदरीसिंदूर प्रकरण, १६ भारतीय रत्नाकर, इत्यादि.

हिंदी भाषेंतील अलीकडील प्रमुख कवींत यांची गणना होते.

यांची राहणी अत्यंत साधी असे. गाजीपुर येथें यांनीं एक संस्कृतपाठशाळा, सनातनधर्ममंडळाची शाखा व वाचनालय स्थापन करून चालविलें होतें. (क. कौ. २. २६४–६६, श्रीशुक्ल हिंदीसाहित्य का इतिहास)

उपाध्ये, जयकृष्ण केशव—(जन्म स. १८८३–मृत्यु स. १९३५)

मराठींतील एक प्रसिद्ध कवि. यांचा जन्म नागपूर येथें झाला. २३ वे वर्षी घराचा त्याग करून वर्धा येथें तीन वर्षे रामनामाचें पुरश्चरण केलें. तेथें जुन्या मराठी ग्रंथांचें वाचन झालें. सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला. लहान वयांतच कविता करण्याचा नाद लागला. लोकमान्यांचें ओंवीबद्ध चरित्र लिहून पहिला खंड प्रसिद्ध केला (१९२४). निरनिराळ्या मासिकांतून कविता प्रसिद्ध केल्या आहेत. 'पोपटपंची' हा यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. यांची 'आधुनिक गीता' म्हणून एक विनोदी काव्य विशेष प्रसिद्ध आहे.

वागीश्वरी, नागपूर, ह्या मासिकाचे कांहीं वर्षे संपादक होते.

उपासनी महाराज—(जन्म स. १८६८–मृत्यु स. १९४१) शिर्डीच्या साईबाबांच्या कृपेस पात्र झालेले सुप्रसिद्ध सत्पुरुष.

यांचें संपूर्ण नांव काशिनाथ गोविंद उपासनी-शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे हे ब्राह्मण.

प्रथम हे जळगांवला वैद्य होते (१८९७ सुमार). हातून चुकीचें औषध दिल्याचा गुन्हा होऊन यांना चार महिन्यांच्या साध्या कैदेची शिक्षा झाली होती.

नंतर हे शिर्डीस आले (१९१०). या ठिकाणीं हे 'उन्माद अवस्थेंत' होते.

हे पुढें शिर्डीहून नागपूर व खडगपूरला गेले. त्या ठिकाणींहि अंगास विष्ठा लावणें, मोरीचें पाणी पिणें यासारख्या सामान्य मनुष्यास चमत्कारिक वाटणाऱ्या गोष्टी यांनीं केल्या. ज्या खापरांत हे शौचविधि करीत, त्याच खापरांत भिक्षा मागण्याचा यांचा प्रघात असे. खडगपूरला तर हे दिगंबर अवस्थेंतच असत. त्या ठिकाणीं

यांच्या पायखान्याची लोकांनीं पूजा केली. या ठिकाणींच लोकांची यांचेवरील भक्ति थांबली नाहीं. पुढें पुढें तर यांच्या सांगण्यावरून पाडव्याच्या दिवशीं संक्रांत पाळण्यासारखीं कृत्यें करण्यापर्यंत तेथील लोकांची मजल गेली. धर्मशास्त्राचा या गोष्टीस कांहीं आधार नाहीं, ही गोष्ट हे स्वतः कबूल करीत असतां लोक केवळ यांच्या शब्दावरून या सर्व गोष्टी करीत (१९१४).

पुढें साकोरीस १९१७ सुमारास यांना स्वतःला स्त्रीत्वाची भावना झाल्याचा भास होऊं लागला. त्यामुळें हे क्वचित् लुगडें वगैरे नेसूं लागले.

साकोरीस आल्यावर तर यांच्या चमत्कारिक कृती वाढूंच लागल्या. याचा परिणाम यांच्या भक्तमंडळींत झपाट्यानें वाढ होण्यांत झाला. भक्तमंडळीचें यांचेवर इतकें प्रेम—भक्तमंडळींनीं यांना इतके पैसे दिले– कीं मरावयाचे वेळीं यांची एकंदर मालमत्ता अनेक लाखांची भरली.

यांच्या या इमारतींत भक्तमंडळीकरितां बांधलेली धर्मशाळा, ग्वाल्हेरचे श्रीमंत सरदार जाधव यांच्या मातोश्री श्रीमती जाधव यांनीं तीस-चाळीस हजार रुपये खर्च करून बांधलेलें दत्तमंदिर, ठिकठिकाणच्या भक्तमंडळींनीं बांधलेलें यांचें स्थान व याशिवाय गणपती, शंकर, शनिमहाराज व खंडोबा यांचीं मंदिरें, यज्ञमंडप, गोशाळा, अन्नपूर्णागृह वगैरेंचा समावेश होतो.

ही सर्व वाढ क्रमाक्रमानें जरूरीप्रमाणें झाली असली पाहिजे. ज्या भाविकांना तेथील पारमार्थिक फायद्यांचा अनुभव येऊं लागला असेल तेच येथें राहिले असले पाहिजेत.

पुरुषांना स्त्रियांचा वेष देऊन हरतालिकेची पूजा करण्यास लावणें, स्वतः स्त्रीवेषांत बसून लोकांचेकडून बांगड्या मंगळसूत्रासारखे अहेर घेणें, इत्यादि यांच्या वर्तनाचा अन्वय सामान्य मनुष्याच्या बुद्धीपलीकडचा आहे.

परंतु यापेक्षांहि यांनीं आपल्या आश्रमांत पाडलेली दुसरी एक प्रथा अधिक लोकविलक्षण आहे. आत्मोन्नतीच्या पवित्र हेतूनें स्वतःशी ब्राह्मविवाहपद्धतीनें विवाह लावून अनेक मुलींचा आपल्याशीं संबंध जोडीत आणि त्यांचा हे स्वीकार करीत. साकोरीला 'सतीचरित्र' म्हणून या कन्यांचें एक आत्मनिवेदनपर पुस्तक मिळतें. त्यांतहि 'यांच्याशीं आमचें लग्न लागलें असलें तरी यांचा आमचा संबंध लौकिक नसून पारमार्थिक-पितापुत्री-नात्याचा आहे' अशा तऱ्हेची कैफियत मांडली आहे. अशा तऱ्हेनें यांना अर्पण केलेल्या शिष्या सती गोदावरी व लग्न लागलेल्या सत्तावीस मुलींचीं नांवें प्रसिद्ध आहेत. यांपैकीं सती गोदावरी तर पूर्वविवाहित आहेत. या सर्व मुली ब्राह्मण, ब्राह्मणेतर व गुजराथी आहेत.

यांच्या म्हणण्याप्रमाणें यांच्या पत्नीच्या योगें यांना ह्या ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति झाली. यांची शेवटची तिसरी पत्नी शिर्डीस आल्यानंतर वारली.

१७ ऑक्टोबर १९४० रोजीं केलेल्या आपल्या खाजगी मालमत्तेच्या मृत्युपत्रांतहि आपल्या तीन कन्यांना आणि एका भक्त स्त्रीला यांनीं ट्रस्टी नेमलें असून सती गोदावरी यांना मॅनेजिंग ट्रस्टी नेमिलें आहे.

एखाद्या भुलभुलैय्यांत सांपडावें त्याप्रमाणें यांच्यासंबंधीं निश्चित मत बनवूं इच्छिणाऱ्या मनुष्याची स्थिति होते. जर या सर्व मुली कन्या म्हणून आपल्या आश्रमांत ठेवण्याचें यांचें मनोगत होतें तर मग त्यांच्याबरोबर विवाह लावण्याचा तरी खटाटोप यांनीं कशाला केला? या सर्व गोष्टींना धर्मशास्त्राचा कांहीं आधार नाहीं, मी म्हणेन तें धर्मशास्त्र ही आपली धर्मशास्त्राची व्याख्या यांनीं केव्हांच प्रसिद्ध केली आहे!

तीच गोष्ट यांच्या सर्वसाधारण बोलण्याची. 'गुरुं वै गुरुपूजनम्' अशा प्रकारचें वाक्य उपनिषदांत आहे अशा उघड बोलण्याचें काय स्पष्टीकरण द्यावयाचें?

अशा तऱ्हेच्या मनुष्याच्या अन्तःकरणांत जे विचार स्फुरतील तें धर्मशास्त्र असें म्हणणें चमत्कारिक दिसतें.

यांचें एकंदर चरित्र पाहतां विचित्रपणा व विक्षिप्तपणा यांचाच पगडा यांच्या एकंदर वागणुकीवर पडलेला दिसतो. मुरळ्या, देवदासी, विधवा यांच्या प्रश्नांसंबंधीं सरकार कायदे करीत असतां त्याच प्रकारचा एक नवीन प्रकार यांनीं उत्पन्न केला आहे.

धर्मनिष्ठेचीं अतिशय विपरीत उदाहरणें आपण इतिहासांत वाचलीं आहेत. परंतु सध्यांच्या सुधारणेच्या काळांत असाच प्रकार 'चक्षुर्वै सत्यम्' पाहावयास मिळावा ही गोष्ट देवावर अनन्य श्रद्धा ठेवणाऱ्या भाविकांना, धार्मिकांना व समाजाचें स्थैर्य इच्छिणारांना अत्यंत क्लेशदायक वाटणें साहजिक आहे.

यांचें वाङ्मयः—१ साई वाक्सुधा (१–५ भाग), २ उपासनी वाक्सुधा (१–५ भाग), ३ सतीचरित्र (प्रवचनाचा भाग), ४ सिलेक्शन्स फ्रॉम वाक्सुधा

(गणेश कृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डेकृत). यांशिवाय यांची इंग्रजी, कानडी, गुजराथी, तामीळ वगैरे भाषांत चरित्रें व प्रवचनें पुस्तकरूपानें भाषांतरित झालीं आहेत. मराठींत 'उपासनी लीलामृत' नांवाचा चरित्रग्रंथ गद्य व पद्य (ओवीबद्ध) अशा दोन्ही स्वरूपांत प्रसिद्ध झालेला आहे. यांच्या विरुद्धहि कांहीं वाङ्मय प्रसिद्ध झालेलें आहे.

उमरीकर, बाबामहाराज—(जन्म स. १८३८–मृत्यु स.१९२४) मराठींतील संत कवि. यांना श्री.सदानंद महाराज असेंहि म्हणत. यांचे आजे व मोक्षगुरु, उद्धव चिद्घनांच्या आंबेजोगाई शाखेंतील बालकृष्ण हे होत.

यांच्या पित्याचें नांव विश्वनाथ. जन्मतःच नागानें यांच्यावर फणा धरिली होती म्हणून यांस शेष असेंहि म्हणत. हठयोग, राजयोग, प्राणायाम इत्यादि शास्त्रांत यांनीं प्रावीण्य मिळविलें. हे विरक्त होते तरी गृहस्थाश्रम स्वीकारला. पुढें आजे व गुरु बाळकृष्ण यांनीं आपली गादी चालविण्यास योग्य समजून यांना पूर्णाभिषेक केला व सदानंद असें यांना दीक्षानाम दिलें.

शेष म्हणे मज कृपा जेव्हां झाली ।
तया वेळीं गेली भेदभ्रांती ।
चराचर सर्व हरपलें दृष्टि ।
ऐसी कृपादृष्टि पूर्ण होय ॥

अशा सहज स्थितींत ते सतत असत. औरंगाबादचे पंढरीनाथ तुकाराम क्षीरसागर व भीमराव देशमुख हे यांचे आवडते शिष्य होते. उमरीचा कोमटी समाजहि यांस गुरुस्थानीं मानीत असे. उमरीचे मुसलमानहि यांस फार मानीत.

यांची सर्व कविता अध्यात्मपर असून ती सुमारें पस्तीस हजार आहे. यांच्या ग्रंथांपैकीं 'सुंदरविलास दीपिका' व 'देशिकलीलामृत' हे दोन ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले आहेत. पैकीं पहिला सुंदरविलास नांवाच्या हिंदी ग्रंथाचें मराठी भाषान्तर आहे. दुसरा 'देशिक लीलामृत' यांचे गुरु बाळकृष्ण यांच्या चरित्रावर आहे. हे दोन्ही ग्रंथ ओवीबद्ध आहेत. 'सुंदर विलासा'चे ३४ अध्याय असून २०६६ ओव्या आहेत. बद्ध, मुमुक्षु व मुक्त या विषयांचें क्रमानें विवेचन आहे. 'देशिकलीलामृत' या ग्रंथांत मुकुंदराजानें विवेकसिंधु ग्रंथ आंबेजोगाई येथें लिहिला त्या स्थळास 'मुकुंदराज गुंफा' म्हणतात असें लिहिलें आहे. भंडाऱ्याजवळ अंभोरें गांवीं लिहिला, असें महाराष्ट्र सारस्वतकार भावे म्हणतात. दोन्ही ठिकाणीं मुकुंदराजांचीं ठिकाणें सध्यां आहेत (मराठवाडयांतील अर्वाचीन मराठी वाङ्मय पा. १–११).

संन्यास घेतल्यावर दोन दिवसांनीं हे समाधिस्थ झाले (कार्तिक व. ३ शके १८४६). यांचे चिरंजीव अमृतराव महाराज विद्यमान पीठाधिपति आहेत.

उमाजी नाईक—(जन्म स. १७९१–फांशी स. १८३२) सुप्रसिद्ध बंडखोर रामोशी. याचा जन्म पुरंदर किल्ल्याच्या ईशान्य दिशेस एका कोसावर असणाऱ्या भिवडी गांवीं झाला. याच्या बापाचें नांव दादजी नाईक. खोमणे हें याचें उपनांव. जात रामोशी. दादजी नाईक वारला (१८०२) तेव्हां उमाजी अकरा वर्षांचा होता.

वर्षाचा तह झाल्यानंतर (१८०२) तेथील रामोशी मंडळी व पेशवे यांच्यांत कुरबुर होऊन पेशव्यांनी रामोशांचे हक, वतनें, नेमणुका व जमिनी जप्त केल्या. तेव्हां ती रामोशी मंडळी निजाम राज्यांत आश्रयार्थ गेली आणि तिकडे त्यांचें बस्तान बसलें. तेव्हां उमाजीहि पण आपला चुलता राघू व इतर लोकांबरोबर माणकेश्वराच्या जवळच्या प्रदेशांत गेला. पण तिकडे कांहीं आरोप येऊन हे परत येत असतां राघू व त्याचा मुलगा चकमकींत मारले गेले आणि बाकीचे लोक परांड्याच्या किल्ल्यांत तीन दिवस अडकून पडल्यावर सुटून परत आले. त्यांत हा होता (१८१५).

पुढें याला चांनजी मानिया, पुणें, यांचा माल पनवेलीजवळ खालापूर गांवीं लुटल्याबद्दल एक वर्षाची सक्त मजुरीची व फटक्यांची शिक्षा झाली. सुटून आल्यावर भोरजवळच्या वींगच्या कुळकर्ण्याच्या घरावर पडलेल्या दरोड्यांत याला पकडलें, पण यानें आपला निरपराधीपणा सिद्ध केल्यामुळें हा सुटला. याच वेळीं याचा भाऊ कृष्णा यास चोरीच्या आरोपावरून सात वर्षांची शिक्षा झाली. पण तो तेथून पळाला. याच वेळीं तुरुंगांतच या दोघां भावांनीं अक्षरओळख करून घेतली.

पुढें याचा मित्र सत्तु याच्या हातून रागाच्या भरांत एका बाईचा खून झाला व पोलिसांनीं त्याला पकडलें. तेव्हां यानें आपल्या मित्रांच्या साहाय्यानें पोलिसांच्या हातून त्याला सोडविलें (डिसें. १८२१). तेव्हांपासून पुणें प्रान्तांत याचा धुमाकूळ सुरू झाला.

दोन वर्षें अज्ञातवासांत काढल्यानंतर जेजुरीच्या यात्रेंत याचा भाऊ उचलेगिरीसुळें पकडला असतां त्याला दोन पोलिसांचे तलवारीनें खून करून यानें सोडविलें. तेव्हां याला सरकारकडून पकडलें जाणें किंवा उघड बंड करणें

याशिवाय मार्ग राहिला नाहीं. यानें सत्तूच्या साहाय्यानें बंडखोर होण्याचा मार्ग पसंत केला.

प्रथम आठदहा साथीदार व छोट्या चोऱ्या असा यांचा क्रम असे; पण पुढें यांचा संघ वाढला आणि यांनीं मोठाले दरोडे घालण्यास सुरुवात केली. पुण्याजवळील भांबुर्ड्यास असलेल्या सरकारी खजिन्यावर यांनीं हल्ला केला. त्यांत सहा हजार दोनशें रुपये लुटले (२४ फेब्रु. १८२४).

पुन्हां दोन महिन्यांनीं सासवडजवळ यांची व पोलिसांची चकमक झाली (एप्रिल १८२४). यानंतर खुद्द सासवडमध्येंहि अशीच एक चकमक झाली (एप्रिल १८२५). यानंतर सत्तु नीरेच्या कांठीं महामारीनें मेला (२७ ऑगस्ट १८२५) आणि हा टोळीचा मुख्य झाला. या वेळीं टोळींत सुमारें सत्तर माणसें, थोड्या तोड्याच्या बंदुका व तलवारी होत्या.

सरकारनें कॅ. मॅन्सफील्ड यांस कांहीं फौजेसह पाठविलें. त्यांना विशेष यश आलें नाहीं. पण याचा भाऊ अमृता त्यांच्या हातीं लागला. पण तो कबुलीजबाब देईना. नंतर ले. कारथ्यू यांना यांच्यावर छापा घालण्यास पाठविलें, पण त्यांचे श्रम वायां गेले.

मिरजेहून पुण्यास जाणारा पटवर्धनांचा वकील, पंढरपूरचा सावकार व फलटणचे बजाजी निंबाळकर यांची खाशी मंडळी यांना यांनीं लुटलें (१८२६). याच वेळीं जव्हारसिंग व रामसिंग या किकवीच्या व पोलिस अधिकारी असणाऱ्या पितापुत्रांनीं यांचा पिच्छा पुरविला होता. तेव्हां यांनीं त्यांच्याच घराची लूट करून रामसिंग या त्याच्या मुलाला पकडून नेलें आणि 'पुनः वाटेस जाणार नाहीं' या अटीवर जीवदान दिलें. या सर्व प्रकारानें याचा बोलबाला वाढतच चालला.

याच वेळीं शिवनाक महारानें आपण सर्वांना पकडून देतों, असें सांगून सरकारी मदत घेतली व याच्या साथीदारांपैकीं भोजाजी नाईक याच्या घराला वेढा घातला. पण भोजाजी निसटला आणि त्याच्या घरची मंडळीहि भोजाजी, उमाजी वगैरेनीं हल्ला करून सोडवून नेली आणि शिवनाकाला चांगलेंच जखमी केलें.

तेव्हां सरकारनें 'पूना हॉर्स' या फौजेच्या मुख्य अधिकाऱ्याला याच्यावर जाण्याचा हुकूम देऊन जेजुरी व वाल्हें यांच्यामध्यें एक पोलीस चौकी बसविली. पण यानें चौकीदारांनाच मारलें व त्यांच्या तरवारी व बंदुका आपल्या लोकांस देऊन आपलें बळ वाढविलें.

आतां मात्र शंभर शंभराच्या दोन पायदळ तुकड्या 'पूना हॉर्स' फौजेच्या मदतीकरितां देण्यांत आल्या. तेव्हां यानें कांहीं महिने हा भाग अजिबात सोडला. पण पुढें परत आला तेव्हां आपल्या विरुद्ध फारच गडबड चालू आहे असें याला दिसलें. विशेषतः कोळी लोक सरकारला मिळाले होते. सर्वसामान्य लोकांनीं तटस्थ राहावें अशी याची अपेक्षा होती ती फसली. तेव्हां सरकारला मदत करणाऱ्या लोकांचीं घरें जाळून त्यांना अद्दल घडविण्याचा यांनीं प्रयत्न केला. तेव्हां सरकारनें १ उमाजी (रु. १२००), २ कृष्णाजी (रु. १०००), ३ पांडु (रु. ८००), ४ पदोजी (रु.५००), ५ भवानी (रु. २००), ६ भोजाजी (रु. २००) अशीं बक्षिसें पकडून देणारास जाहीर केलीं.

याचीहि महत्त्वाकांक्षा वाढली व यानें कृष्णाजीस कोल्हापूरच्या छत्रपतींकडे (संभाजी ऊर्फ बुवासाहेब स. १८२२-३७) बोलणें करण्याकरितां पाठविलें. त्यांनींहि याचा शेलापागोटें देऊन योग्य सत्कार केला.

यापुढें यांनीं लूटमारीचें धोरण सोडून गांवच्या पाटलाला पत्र लिहून सरळ खंडणी मागण्याची पद्धति सुरू केली. जे सरळपणें खंडणी देणार नाहींत त्यांना दयामाया न करितां जुलूमजबरदस्ती, आग वगैरेच्या धमक्या दिल्या जात, व प्रसंगीं त्याची अमलबजावणीहि होई. खुद्द सासवडसारख्या तालुक्याच्या गांवालाहि अशा 'खंडचिठ्ठ्या' अनेक वेळां गेल्या.

या खंडचिठ्ठ्या मे. उमाजी नाईक व भोजाजी नाईक यांच्या छावण्यांतून सुटलेल्या असत व सरकारी वसूल न देण्याची त्यांत स्पष्ट ताकीद असे.

याप्रमाणें कांहीं ठिकाणांवरून यांना खंडणी मिळाली व कांहीं ठिकाणांहून यानें सक्तीनें वसूल केली.

कोळी लोक रामोशांच्या विरुद्ध असत व ते पोलिसांत शिरून याला पकडून देण्याच्या कामीं सरकारला साहाय्य करीत म्हणून यानें कोळी लोकांच्या विरुद्ध एक जाहीरनामा काढला होता व कांहीं कोळ्यांचीं घरें जाळलीं होतीं.

गराडें गांवीं तर पाटलाच्या घरांत सशस्त्र पोलिसांचा कँप पडला असतां याच्या लोकांनीं त्या घरालाच आग लावून दिली. पण पाटलाच्या सुनेशिवाय कोणी दगावलें नाहीं. पुढें साकुर्डीच्या डोंगरापाशीं अशीच गोळागोळी होऊन चकमक झडली. एक शिपाई व दोन रामोशी मेले. हिला सोनापुराची चकमक म्हणतात.

या वेळीं यानें अधिक लोक जमा करण्याकरितां दूरदूर माणसें पाठविलीं. सरकारी शिपाईहि याच्या त्रासानें जेरीस आले. पुढें हा मावळाकडे वळला. तिकडे ब्रि. सरकारच्या व सचीवांच्या गांवांकडून खंडणी वसूल केली. भोजाजी नाईक आणखी साठ माणसें मदतीला घेऊन आला. पहिलीं ऐंशी माणसें होतींच. त्यांत कांहीं घोडेस्वारहि होते. असा याचा संच वाढत चालला.

कॅ. डेव्हिस हा त्या वेळीं यांचा पाठलाग करीत होता. हे जिकडे जाण्याची हूल दाखवीत त्याच्या अगदीं निराळ्या भागांत जाऊन प्रगट होत, आणि तेथें सांपडणाऱ्या चारदोन पोलिसांना प्रसंगीं ठारहि मारीत आणि त्यांचीं मुंडकीं गव्हर्नरकडे पाठवून पत्रांत तसें लिहून कळवीत.

या एकंदर प्रकारामुळें लोकांनाहि कसें वागावें हें समजेनासें झालें. याला खंडणी द्यावी तर सरकार रागावे. न द्यावी तर हा सर्व जाळून फस्त करी. सरकारनेंहि याला व याच्या सांथीदारांला पकडून देणारास प्रत्येकाबद्दल पांच हजारांची रक्कम देण्याचा पुनः जाहीरनामा लाविला.

कोल्हापूरकडील बंडावा मिटला आणि याला सर्व व्यवहार अवजड वाटूं लागला. आपलीं वतनें मिळालीं तर सर्व प्रकार मिटवून टाकावा असें याच्या मनांत आलें व त्याप्रमाणें बोलणीं करण्याकरितां यानें आपलीं चार माणसें निवडलीं आणि पुनः बोलवूं तेव्हां यावें असें ठरवून टोळींतील लोकांना निरोप दिला (१८३० जाने.).

कृष्णा नाईकानें पुण्यांत जाऊन तडजोडीचें बोलणें केलें. त्यावरून सरकारनें २० डिसें. १८२७ रोजीं शिपायांना ठार केल्याचा गुन्हा खेरीज करून बाकीच्या सर्व गुन्ह्यांची माफी केल्याचा जाहीरनामा काढला. त्या गुन्ह्याची चौकशी करून ज्यांच्यावर आरोप शाबीत होईल त्यांना शिक्षा केली जाईल असें याला कळविण्यांत आलें. या अटी उभय पक्षांना मान्य झाल्यावर कमांडिंग ऑफिसर व हा यांची भेट होण्याचें ठरलें. हा आपल्या दोघे अनुयायांसह शिंगें, कर्णे, तुताऱ्या वाजवीत व घोड्यावर अबदागिरी धरून मिरवीत येऊन सासवड-जवळच्या टेकडीखालीं दोघांची भेट झाली. अधिकाऱ्यानें सरकारचा हुकूम वाचून दाखविला व ही भेट संपली. पुढें तर शिपायांच्या वधाबद्दल चौकशीची अट काढून टाकून याला बिनशर्थ माफी देण्यांत आली.

याच वेळीं पुण्यास धोंडोपंत नांवाच्या कलेक्टर कचेरीतील कारकुनास रामोश्यांकडून दरोडे घालवून त्यांत हिस्सा ठेविल्याबद्दल प्रथम फांशीची व अपिलांत जन्मठेपेची शिक्षा झाली होती. त्याची याच्याशीं तुलना होई.

पण याचा मात्र क्रम पुढें अगदीं बदलला. गुन्हे करणारा हा सरकारला गुन्हे पकडण्याच्या कामीं मदत करूं लागला, आणि पुढें तर याला तीस, भोजाजीला वीस, पांच नाईकांस प्रत्येकीं बारा, एक कारकुनास ६. दहा व बहात्तर रामोशी प्रत्येकीं पांच अशी पगाराची व्यवस्था सरकारांतून झाली (१८२९ जाने. १७).

हा त्या प्रान्ताचा पोलीस अधिकारीच झाला. तथापि यानें आपला व्यवसाय कांहीं सोडला नाहीं. आपल्या लोकांमार्फत बित्तंबातम्या ठेवून हा लोकांना लुटण्याचें काम बरोबर करी. फिर्याद याच्याकडेच येत असल्यामुळें तिचा कांहीं उपयोग होत नसे. हेलपाटे व त्रास वांचविण्याकरितां लोक शेवटीं भरपावती लिहून देत, नाहींतर नाद सोडीत. वरपर्यंत पुष्कळ तक्रारी झाल्या पण बरेच दिवस त्याचा उपयोग झाला नाहीं. पुढें याला पुणें येथें राहण्यास भाग पाडण्यांत आलें. याचा पगार थोडा वाढविण्यांत आला. पण यानें वतन सुटेना व त्या वेळच्या परिस्थितींत याला असें पगार खात बसून राहणें आवडेना. तेव्हां यानें बंडाचें निशाण पुनः उभारलें.

साथीदारांना जमवून आणा-शपथा झाल्या व खंडोबाचें दर्शन घेऊन कामाला सुरुवात झाली. पुणें, सातारा, नगर, सोलापूर, नाशिक व भोर संस्थान इतक्या भागांत यांची दंगल असे. म्हणूनच हा कोंकणांतहि प्रगट होई. अवजड सामानसुमान नसल्यानें हालचाल जलद असे, आणि कोठेंहि डोंगर कपारींत राहत. तेव्हां साडेतीनशें लोक याच्या टोळींत होते.

सरकारी बंदोबस्तहि जिकडे तिकडे नाकेबंदी करणारा होता. गांवच्या पाटलांनाहि विशेष अधिकार मिळाले होते. जरा कोठें बातमी लागली कीं, सशस्त्र पोलिस हजर होत. छोट्या-मोठ्या चकमकींचे प्रसंग येऊन कांहीं माणसें जायबंदी होत व कांहीं मरत. नाकेबंदीमुळें अन्नवस्त्र मिळेना. दहशत, लुटालूट, जाळपोळ व हूल हे याचे मुख्य मार्ग होते. अशा या घांवपळींत व सरकारी रोषांत याचे अनुयायी टिकेनात. हळुहळू ते याला सोडूं लागले. लोक सरकारला व याला असे दोघांनाहि भीत व दुटप्पी वागत. लोक सरकारला अनुकूल वागणार नाहींत असा याचा अंदाज फसला.

शेवटीं याची नोकरी सोडून गेलेले कांहीं लोक फितूर झाले. याला पकडून देण्याच्या कामीं त्यांनींच साहाय्य केलें. सरकारनें प्रत्येकीं पांच हजार रुपये रोख व दोन चाहूर जमीन बक्षीस देण्याचें जाहीर केलें होतें. हेंहि तोंडाला पाणी सुटण्यासारखें आमिष होतें. शेवटीं ही रक्कम दहा हजारांपर्यंत वाढविण्यांत आली. तेव्हां पूर्वी याच्याच टोळींत असणाऱ्या नाना व काळू यांनीं भोराजवळील उत्रोळी गांवीं याला पैशाच्या लोभानें आणून खुबीनें शिलक राहिलेल्या पांचसात लोकांपासून अलग केला आणि पकडून भोर संस्थानच्या पोलिसच्या ताब्यांत दिला (१५ डिसें. १८३१). यांच्यावर बंडखोरी व सरकारी नोकरींत राहून लुटालूट करणें असे दोन आरोप ठेवून पुणें येथें दोघा साथीदारांसह याला फांशीची शिक्षा देण्यांत आली (३ फेब्रु. १८३२).

हा जेजुरीच्या खंडोबाचा भक्त, परोपकारी आणि इष्टमित्रांचा समाचार घेणारा होता. याचें एकपत्नीव्रत कडकडीत असे. हा जेजुरीच्या खंडोबाच्या पुजाऱ्याला दरमहा पांच रुपये पुजेकरितां पाठविण्यास कधींहि चुकत नसे. त्यामुळें याच्याबद्दल लोकांत आदराची भावना होती. शेवटीं याच्याजवळ विशेष संपत्ति सांपडली नाहीं. हा शूर आणि मनाचा उदार होता. पकडल्यापासून फांशी जाईपर्यंतच्या कालांत हा मोकळ्या मनानें सगळ्या गोष्टी सांगे. त्यावरून हा आपणांस मोठा सरदार किंवा राजा समजे. हाताखालीं लोक वागवून अनेक वर्षें देशी-परदेशी अधिकाऱ्यांना यानें खेळवीत ठेविलें होतें यावरून याच्या शक्तीची व बुद्धिसामर्थ्याची कल्पना येते. स्वराज्याच्या कालांत हा खरोखरच मोठ्या पदवीस चढला असता. याला पकडण्याकरितां मुद्दाम नेमलेल्या कॅ. मॅकिन्टॉश या गृहस्थानें याचें समग्र चरित्र प्रसिद्ध केलें आहे, आणि त्या इंग्रजी चरित्राचा मराठींत अनंत नारायण भागवत यांनीं अनुवाद केला. आज सर्वत्र गायला जाणारा आणि अत्यंत लोकप्रिय असणारा उमाजीचा पोवाडा यानंतर रचलेला पण निराळी काव्यमय हकीगत देणारा आहे.

कॅ. मॅकिन्टॉशनें लिहिलेल्या इंग्रजी चरित्रांत याचे जाहीरनामे, खंडणी वसूल करण्याकरितां लिहिलेल्या चिठ्ठ्या व गव्हर्नर वगैरे अधिकाऱ्यांना लिहिलेलीं पत्रें मूळाबरहुकूम इंग्रजींत भाषान्तर करून छापलीं आहेत.

ए

एकबोटे, कृष्णाजी अनंत—(जन्म स. १८८६–मृत्यु स. १९१६)

मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध कादंबरीकार. हे मॅट्रिक झाल्यानंतर पोलीसखात्यांत मुख्य कारकुनाचें काम करीत. तथापि यांना लेखनवाचनाचा चांगला नाद होता. यांना सरकारी नोकरी असल्यानें ' सहकारी कृष्ण ' या टोपण नांवानें सर्व लिखाण करावें लागलें.

सहकारी कार्याविषयीं लेखन करण्याचा यांचा प्रथम संकल्प असला तरी यांचें ललित वाङ्मयच विशेष लोकप्रिय झालें होतें. ललित वाङ्मयांतहि कौटुंबिक वाङ्मय लिहिण्यांत यांचा हातखंडा असे. यापूर्वी सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या असल्या तरी मध्यमस्थितींतील साधारण कुटुंबांत प्रत्यहीं घडणाऱ्या प्रसंगांची निवड करून त्यांची आकर्षक व ठसकेबाज मांडणी करण्याच्या बाबतींत यांनीं चांगलें यश संपादन केलें. कुटुंबशिक्षणमाला नांवाची एक ग्रंथमाला काढून ती थोडक्याच कालांत यांनीं चांगलीच लोकप्रिय केली होती.

त्या मालेंत यांनीं सुमारें ३५ छोट्या कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या. त्यामुळें मिळालेल्या लोकप्रियतेनें यांचा आत्मविश्वास वाढला आणि यांनीं 'शापित महाराष्ट्र' नांवाची सुंदर ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध केली. ती मोठी कादंबरी लोकांना फारच आवडली होती. त्यानंतर यांना अकाली मृत्यु प्राप्त झाला. यांच्या मृत्युलेखांत 'महाराष्ट्राचा स्कॉट' हरपला असा यांच्यासंबंधीं केसरीनें उल्लेख केला होता. यांचें लेखन अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें असूनहि पुरस्कर्ता नसल्यानें मागें पडलें आहे.

यांचे कथाग्रंथः—

१ अखेरचा स्वार्थत्यागी देशस्थ, २ अपमानाचा मान, ३ आत्मोद्धार, ४ आधुनिक स्वयंवर, ५ खुनाचा आरोप,

६ चैत्राचा महिना, ७ माझी कहाणी, ८ मानापमान, ९ वर्षारंभ, १० संकट कीं सौभाग्य, ११ संक्रांत, १२ हा संसार कीं नरकवास, १३ ही प्रेमाची मूस कां पुरुषार्थाची कूस.

कादंबरी ऐति. राजकुंवर (१९१५), शापित महाराष्ट्र (१९१६). एकांडा धारेकरी असेंहि यांनी कांहीं वेळां टोपण नांव वापरलेलें आहे.

एकबोटे, व्यंकटेश यशवंत तथा विठ्ठलदेव– (समाधि स. १८३३)

नगर जिल्ह्यांतील भिंगार येथील सत्पुरुष. लहानपणापासूनच यांची वृत्ति परमार्थाकडे होती. संतचरित्रें, गीता व ज्ञानेश्वरी वगैरेंचा यांचा व्यासंग दांडगा असे. बालवयांतच यांनीं पंढरीची वारी सुरू केली व पहिल्याच खेपेस यांना पांडुरंगाचा साक्षात्कार झाला. वडिलांच्या मागें बंधु आनंदराव आणि यांच्यांत वांटणी झाली. तेव्हां यांच्या वांट्यास कांहीं कुळें आलीं. त्यांना यांनीं कर्जमाफी दिली व बाकीची संपत्ति ब्राह्मणांस दान दिली.

शके १७१५ (स. १७९३) सालीं यांना पुनः साक्षात्कार झाला व पुढील चाळीस वर्षें यांनीं दुधावर काढलीं.

यांची कीर्ति ऐकून श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे दर्शनास भिंगारला गेले व यांचे पुढें मोहोरांची रास ठेविली. पण यांनीं तिला स्पर्शसुद्धां करण्याचें नाकारलें.

साधुसन्तांच्या पंक्तीस हे बसले असतां यांनीं एकदां नाचायें तूप बनविलें. त्या तुपाच्या कासंडीची अद्यापहि पूजा केली जाते. असे यांचे अनेक चमत्कार आहेत. यांची पत्नी गंगाबाई; पुत्र दोन व कन्या एक झाली. चैत्र कृ. १४स स्नान घेऊन लगेच ' पुंडलिक वरदा हरी विठ्ठल ' म्हणून देह ठेवला. श्री. विनायक सीताराम शाळिग्राम संगमनेर यांनीं लिहिलेल्या नूतन संत-चरित्रांत यांचें ओंवीबद्ध चरित्र दिलें आहे. यांचें गोत्र भारद्वाज. यांचें घराणें भिंगार, पुणें वगैरे ठिकाणीं पसरलें आहे.

एडवर्ड सातवा—(जन्म ९ नवं. १८४१–मृत्यु स. १९१० मे १७)

विक्टोरिया राणीचे ज्येष्ठ पुत्र. जन्मानंतर एक महिन्याने यांना ' प्रिन्स ऑफ वेल्स ' व ' अर्ल ऑफ चेस्टर' ही पदवी देण्यांत आल्या. बालपणचें शिक्षण लिटलिटन साहेबांच्या देखरेखीखालीं व नंतरचें हेनरी बर्च, गिब्स, रे. डाल्टन, हर्बर्ट फिशर व प्रो. प्लेफेअर वगैरेंच्या नेतृत्वाखालीं झालें. यांनीं केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांत रसायनशास्त्राचा अभ्यास केल्यानंतर स. १८५८ त यांना " नाइट ऑफ दि गॉर्टर " ही पदवी देऊन सैन्यावर सेनापति नेमण्यांत आलें. स.१८६३ त हे पार्लमेन्टचे सभासद झाल्यावर यांनीं 'ड्यूक ऑफ कॉर्नवाल' म्हणून लॉर्डांच्या सभेंत प्रवेश केला. याच वेळीं डेन्मार्कचा राजा नववा ख्रिश्चन याच्या अलेक्झांड्रा नांवाच्या मुलीशीं यांचा विवाह झाला. हिच्यापासून यांना पांच मुलें झालीं.

यांना सार्वजनिक व लोकहिताच्या कामाची आवड असे. अशा प्रसंगींचीं यांचीं भाषणेंहि उत्कृष्ट होत असत. स. १८७१ चें 'सर्व राष्ट्रीय प्रदर्शन' ह्यांच्या हस्तें उघडण्यांत आलें. त्याचप्रमाणें स. १८८६ च्या हिंदुस्थान व वसाहतींतर्फे भरलेल्या प्रदर्शनाचे हे अध्यक्ष होते. सन १८९६ त वेल्स विद्यालयाचे चॅन्सेलर म्हणून यांची नेमणूक झाली. ब्रिटिश म्यूझियमच्या व्यवस्थापकांतहि हे एक व्यवस्थापक होते. व्हिक्टोरिया राणीच्या मरणानंतर हे सातवे एडवर्ड या नांवानें राज्यारूढ झाले व पार्लमेन्टच्या कायद्याप्रमाणें " Edward VII, by the Grace of God, of the United Kingdom of Great Britain & Ireland and of all the British Dominions beyond the Seas King, Defender of the Faith, Emperor of India" ही पदवी धारण केली. ९ ऑगस्ट १९०२ मध्यें यांना राज्याभिषेक झाला.

यांनीं इटली, स्पेन (१८५९), युनायटेड स्टेट्स, कॅनडा (१८६०), हिन्दुस्थान (१८७५), आयर्लंड (१८८५), फ्रान्स (१८८९), पोर्तुगाल वगैरे अनेक देशांतून प्रवास केला. सार्वजनिक शांततेच्या प्रस्थापनेसाठीं या प्रवासाचा बराच उपयोग झाला. स.१९०३-४ सालीं इंग्लंडचे फ्रान्स, स्पेन, इटली, जर्मनी व पोर्तुगाल या देशांशीं मित्रत्वाचे तह झाले. म्हणून यांना ' The Peace-maker ' —'शांतता प्रस्थापक' असें म्हणतात. स. १९०७ मध्यें अँग्लो-रशियन तह झाला. हे चांगल्या स्वभावाचे व मुत्सद्देगिरींत निष्णात असल्यामुळें यांनीं जनतेचें मन आपल्याकडे आकर्षिलें होतें.

एल्विन, व्हेरिअर—(जन्म स. १९०२)

हिंदुस्थानांतील वन्य जातींत राहून त्यांची सेवा, सुधारणा व अभ्यास करणारे इंग्लिश गृहस्थ.

हे प्रथम स. १९२७ सालीं हिंदुस्थानांत आले. यांचे वडील इंग्लंडांतील सरेलिअनचे बिशप होते.

आईच्या व पित्याच्या कडील पुष्कळ पूर्वज हिंदुस्थानांत मुलकी व लष्करी नोकरींत होते. त्यामुळें कदाचित् यांना हिंदुस्थानाबद्दल विशेष महत्त्व वाटत असावें. हिंदुस्थानांत येण्यापूर्वी हे ऑक्सफर्ड येथें इंग्रजी भाषा व धर्मशास्त्र यांच्या अखेरच्या परीक्षा पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले व स्वतः शिक्षण घेतलेल्या मेर्टन कॉलेजमध्यें लेक्चरर होते. इंग्रजी वाङ्मयांतील प्रावीण्याबद्दल यांना चार्ल्स ओल्डहॅम् शिष्यवृत्ति व मॅथ्यु ॲरनॉल्ड प्राइझ मिळालीं होतीं. हे आतां मिशनरी नाहींत.

हिंदुस्थानांतील लोकांबद्दल वाटणाऱ्या आपलेपणामुळें हे ऑक्सफर्ड येथील प्राध्यापकाची जागा सोडून इकडे आले. सुरुवातीला हे पुण्याच्या 'ख्रिस्तसेवासंघ' या संस्थेंत काम करूं लागले. पण लवकरच यांना असें दिसून आलें कीं ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या संस्थेशीं संबंध ठेवून आपणास मोकळेपणानें काम करतां येत नाहीं. म्हणून यांनीं मिशनरी कार्याशीं पर्यायानें संबंध असणाऱ्या संस्थांशींहि संबंध न ठेवण्याचें ठरविलें, व अगदीं स्वतंत्रपणें लोकांत मिसळून परोपकार व अभ्यास करण्यास सुरुवात केली.

प्रथम ते महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीकडे ओढले गेले. म. गांधींच्या साबरमतीच्या आश्रमांत हे राहण्यास गेले. दांडीचा मोर्चा व खुदाईखिदमतगारांची चळवळ यांसंबंधींचीं दोन पुस्तकें म. गांधींचा यांच्यावर झालेला परिणाम दर्शवितात. पुढें 'दि ट्रुथ अबाउट इंडिया' (१९३२) हें पुस्तक यांनीं लिहिलें. पण त्यामुळें सरकारशीं यांचा विरोध आला. राजकीय चळवळींपासून अलिप्त राहिल्याशिवाय आपणास कांहीं भरीव काम करणें अशक्य आहे अशी यांची खात्री झाली. मग यांनीं 'भूमिजनसेवामंडळ' काढलें (१९३३). तेव्हां यांना ख्रिस्तसेवासमाजांतील जुने सहकारी श्री.शामराव हिवाळे येऊन मिळाले. आणि या दोघांनीं वन्य अथवा आदिवासी जमातींच्या उन्नतीचें काम करण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें मध्यप्रान्तांत यांचें काम बऱ्याच ठिकाणीं चालू आहे.

त्या प्रान्तांतील गोंड जमातींत यांनीं आपलें काम सुरू केलें. काँग्रेसच्या औद्योगिक व विधायक बाबींचा समावेश यांनीं आपल्या कार्यक्रमांत केला तरी यांना सरकारी मदत मिळण्यास हरकत झाली नाहीं. गोंडांचा विश्वासहि यांनीं चांगला संपादन केला. यांच्या आश्रमांची व वसाहतींची संख्या हळूहळू वाढत चालली. महारोग्यांच्या शुश्रूषेकरितांहि यांनीं एक भाग उघडला.

या लोकांशीं हे अगदीं मिळूनमिसळून वागतात. यांच्याभोंवतीं त्या लोकांच्या स्त्रीपुरुषांचा नेहमीं गराडा असतो. अगदीं त्यांच्या क्षुल्लक घरगुती भांडणांत सुद्धां हे आपलेपणानें लक्ष घालतात. त्यांची भाषा तर यांनीं आत्मसात् केली आहेच पण त्यांच्यांतील बारीकसारीक गोष्टींचा यांनीं अगदीं चांगला परिचय करून घेतला आहे. यांनीं 'कोशी' नांवाच्या एका गोंड स्त्रीशीं विवाह केला (१९४०) असून यांना तिच्यापासून झालेल्या मुलाचें नांव 'जवाहरलाल' असें ठेवलें आहे.

संबळपूर नजीकच्या पाल लाहाबा गांवीं ओरिसांत यांचा सध्यां मुक्काम असून तेथें जंगलीसमाजाबद्दल शास्त्रीय संशोधनपर ग्रंथ लिहिण्याचें यांचें काम चालू असतें.

मध्यप्रांतांतील मंडला जिल्ह्यांत देवगड या ठिकाणी 'बैगा' या जमातींत हे १९३२ पासून राहत आहेत. या ठिकाणी यांनीं शाळा, दवाखाना व अनाथालय वगैरे निर्माण केलीं असून सुधारणेच्या जितक्या नजीक या लोकांना नेतां येईल तितकें नेण्याचा यांनीं प्रयत्न केला आहे. यांचें तेथील मातीनें बांधलेलें घर, त्यामध्यें असलेलें डेस्क, त्यालाच जोडून असलेली लायब्ररी, मुलांच्या खेळण्यांनीं भरून गेलेली तेथील जमीन व औषधांनीं भरलेलीं यांचीं कपाटें या गोष्टी तेथील वन्य जातींचा मोठाच आधार बनून राहिला असल्यास नवल नाहीं.

या सहवासामुळें वन्य जातींच्या चालीरीति, आचारविचार, भाषा, कपडे, वगैरे सर्व बारीकसारीक गोष्टींचें यांना अतिशय सूक्ष्म ज्ञान प्राप्त झालें. या ज्ञानाचा आपल्या परदेशी बांधवांना फायदा मिळावा या हेतूनें या जातींतील कांहीं कांहीं विशिष्ट पोटभेदांवर यांनीं विस्तृत पुस्तकें लिहिलीं आहेत. जंगली लोकांचा आयुष्यक्रम व त्यांच्या कल्पना यांच्यांशीं एकरूप होऊन अत्यंत तादात्म्येंतेनें यांनीं त्यांचेविषयीं दिलेली माहिती युरोपियनच काय परंतु सुशिक्षित हिंदी मनुष्यांसहि अपरिचित वाटण्याचा संभव आहे.

यांपैकीं यांचें अतिशय नांवाजलेलें पुस्तक म्हणजे 'The Baiga' हें होय. मायकेल पर्वतांत राहणाऱ्या या जमातीसंबंधीं यांत अत्यंत चिकित्सक बुद्धीनें माहिती देण्यांत आली आहे. लैंगिक आचरणासंबंधींचा त्यांचा दृष्टिकोन, त्यांची जादूची पद्धत, न्यायदान, पुढचें धोरण ठरवण्याची त्यांची रीत, नृत्यकला, नात्याचे संबंध वगैरे गोष्टींचें यांत अत्यंत विस्तृतपणें परीक्षण करण्यांत आलें

असून शास्त्रीय व सामान्य अशा दोन्ही वाचकांचें समाधान करण्याचें सामर्थ्य या ग्रंथांत आहे. हिंदी मानवजातिशास्त्रावरील हा एक प्रमाणभूत ग्रंथ मानण्यास हरकत नाहीं.

याचेच पठोपाठ प्रसिद्ध झालेला यांचा ग्रंथ 'The Agaria' हा ग्रंथ यांच्या 'Baiga' ची पुरवणी मानण्यास हरकत नाहीं. ही जात धंद्यानें लोहार असून मंतरलेल्या लोखंडाचे' (Magic Iron) अलंकार घालण्यांत त्यांना फार मजा वाटते. त्याचप्रमाणें यांचा 'Maria Murder and Suicide' हा ग्रंथहि सुप्रसिद्धच आहे. यांत बस्तार (Bestar) संस्थानांतील मुरिया या लोकांवर लिहिण्यांत आलें आहे. हे लोक जातीनें खुनी नाहींत. तर मग कोणत्या परिस्थितीमुळें ते खुनी बनले, याचा विचार या पुस्तकांत करण्यांत आला आहे. त्यामुळें सर्व रानटी जातींमध्यें होणाऱ्या गुन्ह्यांचें पृथक्करण आपणांस करतां येतें. या अभ्यासाकरितांच शरीररचनाशास्त्रज्ञाचा सन्मान्य हुद्दा बस्तार राज्यांत यांना देण्यांत आला असावा (१९४०).

याशिवाय 'The Muria and their Ghotul' हा यांचा ग्रंथहि प्रसिद्ध आहे.

वर उल्लेखलेले सर्वच ग्रंथ पूर्ण सहानुभूति व अत्यंत मार्मिक दृष्टीनें मिळवलेली माहिती यांतून उत्पन्न झाले असल्यानें त्यांच्या विश्वसनीयतेबद्दल शंका नाहीं.

वन्य जमातींत प्रसिद्ध असणारीं लोकगीतें, लोककथाहि यांनीं 'Folk Tales of Mahakoshal', 'Folk-Songs of the Maikal Hills' या नांवांखालीं एकत्रित केलीं आहेत. सांस्कृतिक अभ्यासाचें बहुमोल साधन या नात्यानें हे या गीतांकडे व कथांकडे पाहत असल्यानें या गीतांची हिंदी लोकांनीं केलेली आबाळ यांना अत्यंत क्लेशदायक वाटते. या गीतांचें हिंदी भाषांतरहि हे प्रसिद्ध करण्याचे तयारींत आहेत.

याशिवाय 'Aboriginals' व 'Leaves from the Jungle' (हिंदुस्थानांतील आपल्या अनुभवांचें कथन) हीं यांचीं पुस्तकेंहि प्रसिद्ध आहेत.

यांनीं कांहीं कादंबऱ्याहि लिहिल्या आहेत. 'A Cloud that is Dragonish', 'Phulamat of the Hills' अशीं त्यांचीं नांवें असून वन्य जातींच्या आचारविचारांची सूक्ष्म माहितीच कादंबरीच्या स्वरूपांत सांगण्यांत आली आहे. 'मॅन इन इंडिया' या सुप्रसिद्ध पत्राचे हे आज कित्येक दिवस संपादक आहेत.

बिहार-ओरिसामध्येंहि यांच्या कामाचा पसारा वाढत चालला असून सरकार व जनता या दोघांच्याहि विश्वासास हे पात्र झाले आहेत. परंतु कामाचें स्वरूपच इतकें प्रचंड व खर्चाचें आहे कीं मुंबईसारख्या ठिकाणीं या लोकांच्या फिल्म्स दाखवून पैसा जमा करण्याचें काम यांना वर्षांतून कांहीं दिवस करावें लागतें.

एल्जिन, लॉर्ड—(कारकीर्द स. १८६२-६३)

हिंदुस्थानचे व्हाइसरॉय. कॅनिंगनंतर हे या पदावर आले, पण एका वर्षांतच हे मृत्यु पावले.

एल्जिन, लॉर्ड—(कारकीर्द स. १८९४-९८)

हिंदुस्थानचे व्हाइसरॉय. यांचे वडीलहि हिंदुस्थानचे व्हाइसरॉय होते. यांच्या वेळीं हिंदुस्थानावर फार संकटें आलीं. चित्रळ प्रान्त व तिऱ्हा प्रान्त (खैबरच्या खालीं दक्षिणेस) यांवर आफ्रिडी लोकांनीं स्वारी केली. शेवटीं त्यांचा मोड झाला. स. १८९६ सालीं मोठा दुष्काळ पडला. त्यांत सातआठ लाख लोक मृत्युमुखीं पडले. अफूचा व्यापार कमी करण्याकरितां त्यावर नियंत्रण ठेवण्यांत आलें. स. १८९६ सालीं हिंदुस्थानांत प्लेगचा प्रादुर्भाव झाल्यानें लक्षावधि लोक मरूं लागले. पुढें दर वर्षीं प्लेगची साथ हिंदुस्थानांत पसरूं लागली. स. १८९७ सालीं पुण्यास दोन प्लेग-अधिकाऱ्यांचे खून झाले. स. १८९७ सालीं राणी व्हिक्टोरियांच्या राज्यास साठ वर्षें झालीं म्हणून हीरकमहोत्सव करण्यांत आला व दिल्लीस मोठा दरबार भरविण्यांत आला.

ऐ

पेनापुरे, वासुदेवशास्त्री— (जन्म स. १८६३– मृत्यु स. १९४१)

मुंबईचे सुप्रसिद्ध वैद्य. यांचें आयुर्वेदाचें अध्ययन वासुदेवशास्त्री कऱ्हाडकर या मुंबईच्या प्रसिद्ध वैद्याच्या हाताखालीं झालें. हे बडोद्याच्या वैद्यकीच्या परीक्षा उत्तीर्ण झाले होते. जुन्या फार थोड्या व्युत्पन्न वैद्यांत यांची गणना असे. डॉ. पोपट प्रभुराम यांच्या प्रभुराम आयुर्वेद विद्यालयाचें मूळ जें आयुर्वेदविद्यालय त्याचे हे मुख्याध्यापक होते. स. १९२०-२४ पर्यंत वै. भू. हिंलेकरशास्त्री यांनीं काढलेल्या मराठी वैद्यक वर्गांतहि हे अध्यापन करीत. मुंबई वैद्यनियंत्रण कायद्याच्या निषेधार्थ भरलेल्या मुंबई प्रान्तीय वैद्यकसंमेलनाचे हे स्वागताध्यक्ष होते. वैद्यक, धर्म व समाज यांच्या अनेक सभा-संमेलनांत हे आस्थेनें भाग घेत. निखिल भारतवर्षीय आयुर्वेद महामंडळाच्या संस्थापकांपैकीं हे एक होते. पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभा व नि. भा. आयुर्वेद विद्यापीठाचे हे परीक्षक असत.

प्रभुराम आयुर्वेद कॉलेजनें 'प्राणाचार्य' व शंकराचार्य पीठानें 'आयुर्वेद महोपाध्याय' या पदव्या देऊन यांना गौरविलें होतें. हे मोठे परोपकारी असून पैशाची अपेक्षा न करितां सेवावृत्तीनें औषधोपचार करीत असत (आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे).

ओ

ओक, जनार्दन विनायक—(जन्म स. १८७९– मृत्यु स. १९१७)

शिक्षक, संपादक व कोशकार. यांचा जन्म पुणें येथें झाला. एम्.ए. झाल्यानंतर (१९०१) फर्ग्युसन कालेजांत हे तीन वर्षें प्राध्यापक होते. पुढें मध्यप्रान्त शिक्षण खात्यांत बऱ्या पगाराची जागा मिळाल्यानें यांनीं ही नोकरी सोडली. कांहीं दिवस हे नागपूर नील सिटी स्कूलचे सुपरिंटेंडेंट होते, पण रिस्ले सर्क्युलरासारखीं सर्क्युलरें बजावण्याचें पातक आपल्या हातून होऊं नये म्हणून ती चारशें रुपये दरमहाची नोकरी सोडून हे प्रो. विजापूरकरांच्या समर्थ विद्यालयास येऊन मिळाले (१९०८). हे विद्यालयाचे चालक व प्रो. विजापूरकर प्रचारक असा थाट जमल्यावर विद्यालय भरभराटीस येणारच. पण समिति कायद्यानें तें विद्यालय बंद झालें (१९१०). तेव्हां यांनीं 'लोकशिक्षण' मासिक काढून तें सहा वर्षें चालविलें. याच अवधींत यांनीं 'गीर्वाण लघुकोश' हा संस्कृत मराठी कोश केला. यांचें बीजगणितहि प्रसिद्ध आहे.

याशिवाय लोकशिक्षणमध्यें यांनीं लिहिलेल्या निबंधांपैकीं वर्णव्यवस्थेवरील निबंधाचाहि येथें उल्लेख करावयास पाहिजे. वर्णव्यवस्था ही समाजाला जरूर आवश्यक आहे, परंतु सध्याच्या तिच्या परिस्थितींत ती पाळणें अशक्य आहे असा त्या निबंधाचा सारांश आहे.

ओक, महादेव पांडुरंग—(जन्म स. १८७४– मृत्यु स. १९३०) सुप्रसिद्ध संस्कृत शिक्षक व संस्कृत कवि.

कुलाबा जिल्ह्यांतील पेणजवळच्या वरसईचे हे राहणारे. पांडुरंगशास्त्री लोंढे यांच्याजवळ यांचें प्राथमिक संस्कृत शिक्षण झालें. मॅट्रिक (१८९३). पेण येथें शिक्षक (१८९५–१९०१). नंतर पुणें न्यू इंग्लिश स्कूलमध्यें आले. यांची संस्कृतशिक्षक म्हणून अतिशय ख्याति होती. तथापि यांचा विशेष गुण म्हणजे कोणताहि विचार हे सुलभ व ललित संस्कृतमध्यें सहज ग्रथित करीत असत हा होय.

ल्या दृष्टीनें 'सूक्तिसुधातरंगिणी' अभ्यासण्यासारखी आहे. तें पुस्तक जर्मनींत पाठ्य पुस्तकांतहि समाविष्ट झालें आहे असें म्हणतात. ज्यांनीं ज्यांनीं यांची ही कृति पाहिली त्यांनीं त्यांनीं यांच्या या गुणाची वहावाच केली आहे.

यांचे ग्रंथः—

अभिनवरत्नमाला, सुबोधपाठावलिः, सुलभसंस्कृतप्रवेश, सूक्तिसुधातरंगिणी, ज्ञानेश्वरी (संस्कृतमध्यें केली पण तींत पहिले ९ अध्यायच आहेत).

ओक, वामन दाजी— (जन्म स. १८४५–मृत्यु स. १८९७)

कवि, काव्याभ्यासक, काव्यसंशोधक व निबंधलेखक. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील चिपळूण तालुक्यांतील हेदवी नांवाचे गांवीं झाला. प्राथमिक शिक्षण गांवींच झाल्यावर रत्नागिरी हायस्कुलांतून मॅट्रिक झाले. यांनीं पहिली जगन्नाथशंकरशेट शिष्यवृत्ति मिळविली (१८७०). मुंबईस कॉलेजमध्यें असतां अभ्यास सोडून यांना नोकरी पत्करावी लागली. नागपूरच्या सिटीस्कूलांत हे काम करूं लागले (१८७५). निबंधमालाकार चिपळुणकर व हे यांच्यांत मोरोपंताबद्दल ईर्षेचा सामना झाला. यांचा निबंध निबंधमालेंतच प्रसिद्ध झांला. यांनीं मालाकारांना चुका कबूल करावयास लावून जय मिळविल्यामुळें यांचें नांव महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं झालें. नागपूरचें सिटीस्कूल सोडून हे मेल नार्मलस्कूलचे सुपरिंटेंडेंट झाले (१८८४). नंतर संबळपूरच्या हायस्कूलवरील मुख्याध्यापक झाले. तेथें यांनीं पांच वर्षें काम केलें. याच सुमारास निर्णयसागर छापखान्यानें ' काव्यमाला ' व ' काव्यसंग्रह ' हीं दोन मासिकें प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली होती. दुसऱ्या मासिकाचें संपादकत्व जनार्दन बाळाजी मोडक यांच्याकडे होतें. ते वारल्यावर (१८९०) यांना संपादक करण्यांत आलें. तें काम यांनीं इतकें उत्कृष्ट बजावलें कीं त्याबद्दल महाराष्ट्र यांचा नेहमीं कृतज्ञ राहील. यांच्यापुढें अर्थ व्यक्त करण्यास योग्य असणारी भाषा हात जोडून उभी असे. शुद्ध, रसाळ व भारदस्त भाषा हे वापरीत. पुस्तकपरीक्षणांत यांचा हातखंडा असे. गुणदोषांचें यथायोग्य विवेचन करून कवीचें हृद्गत हे व्यक्त करीत (बालबोध, जुलै १८९७).

स. १८९१ सालीं यांची बदली रामपूरच्या हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागीं झाली. उद्योगातिरेक, पत्नीवियोग व विश्रान्तीचा अभाव यांमुळें हे लवकर मृत्यु पावले.

वाङ्मयः— १ माधवनृपतिनिधनात्मक पद्यरत्नमाला १८८३, २ काव्यमाधुर्य १८८४, ३ लॉर्ड बेकन चरित्र १८८४, ४ कादंबरीकथासार १८८९, ५ मुद्राराक्षसकथासार १८८९, ६ वासवदत्ताकथासार १८८९ (अ. म. वा. से.).

ओक, विनायक कोंडदेव— (जन्म स. १८४०–मृत्यु स. १९१५)

चरित्रकार, कवि, बालोपयोगी निबंधकार. काव्यसंग्रहकार ओकांचे हे चुलतचुलत बंधु. यांचा जन्म हेदवी येथेंच झाला. थोडेंसें मराठी व इंग्रजी तीन इयत्ता एवढेंच यांचें शिक्षण. पण स्वकष्टानें यांनीं आपली मराठी भाषा चांगलीच कमावली. ' कँडीसाहेबानें मला लिहावयास शिकविलें ' असें हे म्हणत. हे आठ रुपये पगाराच्या मास्तरापासून अ. डे. एज्युकेशनल इन्स्पेक्टरचे १०० रु. पगाराच्या जागेपर्यंत चढले. यांनीं ' बालबोध ' नांवाचें मासिक सतत ३४ वर्षें चालविलें. यांनीं बालबोधांत एकंदर ४०२ चरित्रें, ४०२ कविता, ४०२ निबंध, ३७१ शास्त्रीय विषयावरील निबंध आणि इतर विषय ८५० एवढें लिहिलें आहे. यांनीं छोटींमोठीं सुमारें पन्नास पुस्तकें लिहिलीं आहेत. व त्यांतील बहुतेक निर्णयसागर छापखान्यानें छापलीं आहेत. यांच्या ग्रंथाचें स्वरूप लक्षांत घेतां यांस बालवाङ्मयाचे जनक म्हणणें अधिक शोभेल. यांची भाषा सुबोध, सरळ व मनोरम आहे. यांचें वाङ्मयः— १ लघुनिबंधमाला, २ मधुमक्षिका, ३ गद्यरत्नावली, ४ महन्मणिमाला, ५ पुष्पवाटिका, ६ शहाणपणाचा ओनामा, ७ मुलांचें कल्याण, ८ मुलास थोडासा बोध, ९ मुलास उत्तम बक्षीस, १० मनुष्याचें कर्तव्यकर्म, ११ अनुकरण, १२ शिक्षकास थोडासा बोध, १३ फुलांची परडी, १४ स्वदेशाभिमान, १५ प्रपंचरहस्य, १६ महाराष्ट्रवाङ्मय, १७ सांप्रतच्या लेखकांचें कर्तव्य, १८ शिमग्याविषयीं थोडा विचार, १९ स्त्रियांची परवशता, २० हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास, २१ हिंदुस्थानकथारस, २२ इतिहासतरंगिणी, २३ शिपायांच्या बंडांचा इतिहास, २४ रोमचा इतिहास, २५ पीटर धि ग्रेटचें चरित्र, २६ शिकंदर बादशाहाचें चरित्र, २७ आल्फ्रेड दि ग्रेटचें चरित्र, २८ सर टॉमस मनरो यांचें चरित्र, २९ ग्लॅडस्टनचें चरित्र, ३० रावराजे दिनकरराव राजवाडे यांचें चरित्र, ३१ अमीर अबदुल रहमान चरित्र, ३२ ड्यूक ऑफ वेलिंग्टनचें चरित्र, ३३ जावजी दादाजीचें चरित्र, ३४ सॅम्युअल जॉन्सनचें चरित्र, ३५ वॉरन हेस्टिंग्जची गोष्ट, ३६ फ्रान्सांतील राज्यक्रान्तीचा इतिहास, ३७ बालबोध पहिलें, दुसरें, तिसरें, चौथें, व पांचवें पुस्तक, ४२ सोपें व्याकरण, ४३ आनंदराव, ४४ शिरस्तेदार, ४५ विद्यार्थ्यांचा व्याकरणमित्र, ४६ आब्राहाम लिंकनचें चरित्र, ४७ इसापनीति, ४८ कठीण शास्त्रांतील सोप्या गोष्टी (अ. म. वा. से.).

ओगले, गुरुनाथ प्रभाकर—(जन्म स.१८८६–मृत्यु स. १९४५)

ओगले ग्लास वर्क्स या कांच, एॅनमल, कंदील,

स्टोव्ह, एव्हरसिल्व्हर भांडीं वगैरेच्या सुप्रसिद्ध कारखान्याचे एक चालक.

कोल्हापूर येथील हायस्कूलमध्यें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण झाल्यावर यांनीं मुंबईस 'व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूट' मधील एल्. एम्. इ. चा शिक्षणक्रम पहिल्या वर्गांत पहिले येऊन पुरा केला. त्यानंतर कांहीं काळ बार्शी येथील 'लक्ष्मी टेक्निकल इन्स्टिटयूट'चे प्रमुख अध्यापक म्हणून काम केल्यावर यांनीं स्वतंत्र व्यवसाय करण्याकरितां 'अमेरिकन एंजिन कंपनी' स्थापन केली. दुर्दैवानें ज्या बँकेनें यांना भांडवल पुरवठा केला, ती बुडाल्यानें सदर धंदा यांना सोडावा लागला, व हे किर्लोस्कर बंधूंच्या नवोदित कारखान्यांत एंजिनियर म्हणून काम करूं लागले.

याच वेळीं यांचे धाकटे बंधु श्री. श्रीपाद प्रभाकर ऊर्फ आत्मारामपंत ओगले यांनीं तळेगांवला कांचकारखान्यांत शिक्षण घेऊन किर्लोस्करवाडीला कांचकारखान्याचा श्रीगणेशा केला. पुढें श्री. आत्मारामपंतांनीं कऱ्हाडानजीक औंध संस्थानच्या हद्दींत स्वतंत्र वसाहत करून तेथें कांचकारखाना नेल्यावर किर्लोस्करवाडी सोडून हे त्यांना मदत करण्याकरितां आले. त्यानंतर हिंदुस्थान सरकारनें यांना कांचकामाचें उच्च शिक्षण घेण्याकरितां वार्षिक अडीचशें पौंडांची शिष्यवृत्ति देऊन विलायतेस पाठविलें. शेफील्ड येथील अभ्यासक्रम पुरा करून हे अमेरिकेला गेले व तेथील कारखान्याच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करून हे हिंदुस्थानांत परत आले.

ओगलेवाडीच्या कारखान्यांत परदेशी कंदिलाचे ग्लोब उत्तम प्रकारचे तयार होऊं लागल्यावर यांनीं मूळ कंदीलच हिंदुस्थानांत तयार करण्याची कल्पना काढली. यांच्या बंधूंस ही कल्पना पटतांच यांनीं जर्मनीला जाऊन आवश्यक माहिती घेऊन तयारी केली आणि कंदील तयार करण्याचा विभाग कांचकारखान्याला जोडला. तथापि परदेशी चढाओढीमुळें स. १९३९ पर्यंत कारखान्याला भाग्याचे दिवस लाभले नाहींत. महायुद्ध सुरू होतांच हा कंदिलाचा धंदा युद्धकार्याला विशेष साहाय्यभूत झाला व कारखान्याची भरभराट होऊन त्याची उभारणी स्थिर पायावर झाली.

या धंद्यापायीं यांना फारच झळ सोसावी लागली होती. अत्यंत कष्टप्रद स्थितींतहि यांचा आत्मविश्वास डळमळला नाहीं.

मुंबई प्रान्तांत राष्ट्रीय सभेचें मंत्रिमंडळ आलें, व त्यांनीं उद्योगधंद्यांना अनुकूल धोरण आंखलें. तेव्हां यांनीं सायकलीच्या कारखान्याची योजना परिश्रमपूर्वक आंखून त्यांना सादर केली. ती मान्यहि झाली होती. पण त्याच वेळीं बिर्ला बंधूंनीं 'हिंद सायकल्स' कारखाना काढल्यानें यांच्या योजनेला मूर्त स्वरूप आलें नाहीं.

त्यानंतर यांनीं विजेचे पंखे तयार करण्याची योजना तयार केली. तीहि राष्ट्रसभामंत्रिमंडळाला मान्य झाली होती. परंतु त्या मंत्रिमंडळानें राजीनामा दिल्यामुळें ती तशीच राहिली.

याच सुमारास सिलोन सरकारनें यांच्याकडून लंकेंत कांचकारखाना काढण्याची योजना मागविली. त्याप्रमाणें यांनीं योजनेचा आराखडा पुरविला. नुकताच त्या कारखान्याचा उद्घाटनसमारंभहि झाला. त्रावणकोर दरबारच्या सहकार्यानें यांनीं शीट ग्लासचा कारखाना अलवाये येथें काढला. त्याची सर्व व्यवस्था हेच पाहत होते. अगदीं अलीकडे सचिवोत्तम सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनीं यांना त्रिवेंद्रम् येथील मोठ्या सरकारी वर्कशॉपची पुनर्घटना करण्याकरितां सल्लागार नेमिलें होतें.

शिवाय इतक्या सर्व व्यवसायांत असतांना यांना लेखनाचाहि नाद होता. हे चांगल्यापैकीं लेखक होते. १ अमेरिकेचा प्रवास, २ एडिसनचें चरित्र हीं यांचीं पुस्तकें व कांहीं लघुकथा यांनीं लिहिलेल्या प्रसिद्ध आहेत.

ओगले बंधूंची औद्योगिक क्षेत्रांतील कामगिरी महाराष्ट्राचा व हिंदुस्थानचा औद्योगिक क्षेत्रांतील दर्जा वाढविणारी आहे यांत शंका नाहीं.

ओगले, गोपाळ अनंत— (जन्म स. १८७९–मृत्यु स. १९४५) नागपूरच्या 'महाराष्ट्र' या अर्धसाप्ताहिकाचे सुप्रसिद्ध संपादक.

कोंकणांत विजयदुर्ग येथें जन्म. शिक्षण रत्नागिरी व पुणें येथें झालें. प्रथम भोपटकरबंधूंच्या महाराष्ट्र विद्यालयांत शिक्षक होते. लो. टिळकांनीं सुरू केलेल्या दारूबंदीच्या पिकेटिंगमध्यें यांना दंडाची शिक्षा झाली होती (१९०८). स. १९०६-१० पर्यंत नागपूरचें 'देशसेवक' साप्ताहिक व मुंबईचें 'राष्ट्रमत' दैनिक वर्तमानपत्र यांशीं यांचा संबंध होता. पहिल्या पत्राचे हे मुख्य संपादक होते व दुसऱ्याचे हे सहसंपादक होते. त्या काळांत यांना प्रत्यक्ष तुरुंगवास घडला नसला तरी यांच्यावर सरकारी अवकृपा झाली होती. स. १९१४ मध्यें यांनीं

स्वतःच्या जबाबदारीवर नागपूर येथें 'महाराष्ट्र' हें मराठी साप्ताहिक सुरू केलें. तेंच यांनीं अत्यंत लोकप्रिय करून अर्धसाप्ताहिक केलें. सोलापूरच्या लष्करी कायद्याच्या संबंधीं लिहिलेल्या लेखामुळें स.१९३१ मध्यें यांना राजद्रोहाबद्दल कारावासहि पत्करावा लागला. यांच्या या पत्रानें वऱ्हाड मध्यप्रान्तांत राजकीय दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची कामगिरी केली आहे. वृत्तपत्रांत पुण्याकडे केसरीचें जें स्थान आहे तेंच स्थान वऱ्हाड-नागपूरकडे महाराष्ट्राला आहे.

हे नमुनेदार संपादक असल्यामुळें यांना पुणें मराठी वृत्तपत्रकार परिषदेचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें होतें.

राजकारणाप्रमाणेंच शैक्षणिक व औद्योगिक चळवळीकडे यांचें लक्ष असे. नागपूरच्या दादीबाई देशमुख कन्याशाळा, ओगले कांचकारखाना, पॉटरीवर्क्स व आगपेट्यांचा कारखाना यांशीं यांचा जिव्हाळ्याचा संबंध असे.

यांनीं 'महाराष्ट्र' पत्राचा ट्रस्ट केला आहे. यांचा ६१ वा वाढदिवस श्री. माधवराव पाध्ये यांच्या अध्यक्षतेखालीं थाटानें साजरा झाला होता.

ओगले, श्रीपाद प्रभाकर—(जन्म स. १८९०)

हिंदुस्थानांत प्रसिद्ध असणारे एक कारखानदार. यांचा जन्म सांगली संस्थानांतील शिरहट्टी येथें झाला. शिक्षण राजाराम हायस्कूल व कोल्हापूर येथें झालें. कांचेच्या धंद्यांतील शिक्षण तळेगांव-कांचकारखान्यांत घेतलें व स्वतंत्र कांचकारखान्यास सुरुवात केली (१९१४). गुरुनाथ प्रभाकर हे यांचे सख्खे थोरले बंधु होत.

ओझा, महामहोपाध्याय गौरीशंकर हीराचंद—(जन्म स. १८६३)

थोर संशोधक व इतिहासलेखक. सिरोही संस्थानांतील रोहेडा गांवीं 'एक सहस्र औदीच ब्राह्मण' जातींत यांचा जन्म झाला. सहस्रऔदीचांची एक शाखा सिरोही संस्थानांतील 'गोल' नांवाच्या गांवावरून 'गोरवाल' म्हणून प्रसिद्ध आहे. आबूपर्वताच्या आसपास यांची भरपूर वस्ती आहे. त्यांपैकीं बावीस प्रमुख आहेत म्हणून त्यांना 'बावीसस्थान' या नांवानें ओळखतात. हे त्यांपैकीं आहेत.

यांचे वडील विद्याव्यसनी व कर्मनिष्ठ ब्राह्मण होते. त्यांना नंदराम, भूरजी, ओंकारजी व गौरीशंकर असे चार पुत्र होते. यांनीं सहाव्या वर्षी गांवांतल्या शाळेंत प्रवेश केला. तेथें हिन्दी, हिशेब, पाढे वगैरेंचें यांनीं शिक्षण घेतलें. आठव्या वर्षी मुंज झाली. घरांतल्या रीतीप्रमाणें यांनीं शुक्लयजुर्वेद शिकण्यास आरंभ केला. आणि चाळीस दिवसांत चाळीस अध्याय तयार करून संहिता संपविली. याच वेळीं यांची बुद्धिमत्ता सर्वांच्या लक्षांत आली. पण घरची स्थिति बरी नसल्यानें यांचा एक सख्खा भाऊ नन्दराम मुंबईस मुनीमी करण्यास गेला होता त्याकडे शिक्षणाकरितां यांना रवाना करण्यांत आलें. त्या वेळीं राजपुतान्यांत रेल्वे नसल्यानें १६० मैल पायीं चालून अहमदाबादला जावें लागलें व रेल्वेचा आश्रय करावा लागला. मुंबईस आल्यावर कांहीं दिवस खासगी शाळेंत गुजराथी शिकून यांनीं गोकुळदास तेजपाळ सेमिनरी स्कूलमध्यें प्रवेश केला. नंतर तीन वर्षांनीं एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें प्रवेश केला. सकाळ संध्याकाळ विद्यालक्ष्मी पाठशाळेंत संस्कृत शिकण्याचें काम चालूच होतें (स. १८८६). मॅट्रिक झाल्यावर इंटर परीक्षेच्या वेळीं आजारी पडल्यानें यांनीं कॉलेज सोडलें. पुढें सिरोहीस तीन महिने राहून पुनः मुंबईस आले. वकीलीचा अभ्यास सुरू केला पण तिकडे यांचें मन लागेना. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या पुस्तकालयांत वाचीत बसण्याचा यांना नाद लागला. तेथें डॉ. भगवानलाल इन्द्रजींशीं यांचा परिचय झाला. यांना प्राचीन लिपि शिकण्याचा नाद लागला. त्यांत यांची चांगली प्रगति झालेली पाहून डॉ. भगवानलालनीं यांची गुजराथचा इतिहास लिहिण्यास मदत घेतली. प्राचीन नाण्यांचाहि यांचा अभ्यास त्यांच्याच साहाय्यानें वाढला.

स्वतःच्या राजपुतान्याकडे यांचें मुंबईत असल्यापासूनच लक्ष होतें. त्यासंबंधीं सर्व साहित्य यांनीं चांगलें अभ्यासिलें होतें. यांच्या व्यासंगामुळें उदेपूरच्या इतिहास विभागांत प्रथम साहाय्यक, नंतर मंत्री म्हणून यांची नेमणूक करण्यांत आली.

नंतर उदेपूर-व्हिक्टोरिया हॉलमधील संग्रहालयाचे हे क्यूरेटर नेमिले गेले (स. १८९२). यांनीं आपले ग्रंथ पं. विनायकशास्त्री वेताळ ज्योतिषी उदेपूर यांच्या प्रेरणेमुळें हिन्दींत लिहिण्यास सुरुवात केली.

सर्वांना प्राचीन लिपींचें ज्ञान सुलभ व्हावें म्हणून यांनीं 'प्राचीन लिपि माला' नांवाचा अपूर्व ग्रंथ हिन्दींत प्रसिद्ध केला (स. १८९४). डॉ. बुइलरचा 'इंडिश पॅलियोग्राफी' हा जर्मन भाषेंतील ग्रंथ त्यानंतर दोन वर्षांनीं प्रसिद्ध झालेला आहे. प्राचीन लिपिमालेची दुसरी सुधारून वाढविलेली आवृत्ति यांनीं नंतर काढली (१९१८). तिच्या

बद्दल यांना 'मंगलाप्रसाद पारितोषिक' देण्यांत आलें (१९२४). महाराजकुमार बाबू रामदीनसिंग यांनीं टॉडच्या राजपुतान्याच्या इतिहासाचें भाषान्तर केलें होतें. त्यावर टिप्पणी देऊन संशोधित करण्याचें काम यांच्यावर सोंपविण्यांत आलें. तें काम तर यांनीं केलेंच, पण शिवाय टॉडचें चरित्रहि भक्तिभावानें प्रसिद्ध केलें (१९०२). यांनीं 'सोलंकीयोंका प्राचीन इतिहास' व 'भारत वर्ष के इतिहास की प्राचीन सामग्री' ही छोटीं पुस्तकें लिहिलीं तेव्हां नागरी प्रचारिणी सभेनें यांना एक पदक देऊन यांचा गौरव केला. मेवाड व सिरोही राज्याचे इतिहास हेहि यांचे ग्रंथ अपूर्व आहेत. यांच्या 'राजपुतानेका इतिहास' या महत्त्वाच्या ग्रंथाचे चार भाग प्रसिद्ध झाले आहेत. हा ग्रंथ निःसंशय नमुनेदार आहे. त्यावरून यांची स्मरणशक्ति, संशोधनसामर्थ्य व उच्च भूमिका स्पष्ट होते. यांनीं 'मध्यकालीन भारतीय संस्कृति' या विषयावर हिंदुस्थानी अकॅडेमीद्वारा तीन व्याख्यानें दिलीं तीं पुस्तकरूपानें प्रकाशित झालीं आहेत. त्यांत स. ६००-१२०० पर्यंत भारतीय संस्कृतीच्या विविध विषयांचें विशदीकरण करण्यांत आलें आहे. हिंदुस्थान सरकारनें यांना रायबहादुर (१९११) व महामहोपाध्याय अशा दोन पदव्या देऊन यांच्या कार्याचा व विद्वत्तेचा गौरव केला आहे (१९२८).

लॉर्ड कर्झन उदेपूरला आले तेव्हां यांच्या कामावर ते अत्यंत खूष झाले. पुढें लॉर्ड मिंटोनें अजमेरच्या 'राजपुताना म्युझियम'चे यांना क्यूरेटर नेमलें. तेथें १९३८ पर्यंत म्हणजे ७५ वर्षें पूर्ण होईपर्यंत उत्साहानें काम करून सेवानिवृत्त झाले.

स. १९२० पासून नागरीप्रचारिणी पत्रिकेला पुराणतत्त्वशोधाचें रूप देऊन हे संपादक झाले. तेरा वर्षे हे संपादक होते. भरतपूरच्या हिंदी साहित्य संमेलनाचे हे अध्यक्ष होते (१९२७).

याशिवाय हे अनेक ठिकाणीं अध्यक्ष म्हणून निवडले आहेत, व छोटींमोठीं अनेक पुस्तकें यांनीं लिहून प्रसिद्ध केलीं आहेत.

राजपुतान्याचा इतिहास म्हणजे त्यावर राज्य करणारे मौर्य, मालव, ग्रीक, आर्जुनायन, वरीक, हूण, गुर्जर, बैस, चावडा, गुहिल, प्रतिहार, चौहान, राठौड, कछवाह, यादव, परमार, सोलंकी, नाग, यौधेय, तंवर, दहिया, निकुंप, डोडिया, गौड, झाला इत्यादि राजवंशांचा इतिहास, शिलालेख, ताम्रपट, नाणीं इ. मौलिक साधनांच्या सूक्ष्म अध्ययनावर आधारलेला आहे. त्यासंबंधीं भाटांच्या गानांतील अनेक गोष्टींचा कल्पितपणा सिद्ध झाला आहे. हें सर्व काम यांनीं अतिशय उच्च भूमिकेवरून व शास्त्रशुद्ध पद्धतीनें केलें याच्याबद्दल जितका आदर दाखवावा तितका थोडाच आहे (भारतीय अनुशीलन).

ओझा, सुखरामदास टी.—(जन्म स. १८७२)

सिंध प्रान्तांतील सुप्रसिद्ध वैद्य. यांचे थोरले बंधु पं. दीपचंद हे उच्च इंग्रजी शिक्षण घेऊन वकील व पुढें जज्ज झाले, तरी यांना चुलत बंधु पं. पीतांबरदास यांच्यामुळें आयुर्वेदाकडे जावेंसें वाटलें. तेच यांचे या विद्येंतील गुरु होत.

कराची येथील १९ वें नि. भा. वैद्यक संमेलन यशस्वीपणें पार पाडण्याचें श्रेय यांनाच आहे. स. १९४४ सालीं यांनीं 'कॅन्सर-परिषद' भरविली आणि देशी वैद्यकाच्या दृष्टीनें या रोगाच्या निदानचिकित्सेवर चर्चा घडवून आणली.

यांना संस्कृत, हिंदी, सिंधी, गुजराथी, मराठी व इंग्रजी इतक्या भाषा चांगल्या अवगत आहेत. धंद्यांत यांची प्राप्ति मोठी असून आयुर्वेदाच्या उद्धारासाठीं यांनीं मोठाल्या देणग्या दिल्या आहेत.

यांनीं स्वतः आयुर्वेदीय क्षयरुग्णालय मोठी देणगी देऊन, देणग्या मिळवून आणि सरकारी मान्यता मिळवून चालविलें आहे.

यांना मुंबईच्या पोपट प्रभुराम कॉलेजनें 'प्राणाचार्य' ही बहुमानाची पदवी दिली व ती कराचीचे नगराध्यक्ष जमशेद मेहेता यांच्या हस्तें प्रचंड समारोहानें मानपत्रासह यांना अर्पण करण्यांत आली.

यांना ब्रि. सरकारकडून 'वैद्यरत्न' हा किताब १९३९त मिळाला आणि लोकमान्यतेबरोबर यांना राजमान्यताहि प्राप्त झाली (आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे).

ओड्‌लमने, "विद्यावाचस्पति" आत्माराम-शास्त्री—(जन्म स. १८८१)

यांचा जन्म उत्तर कानडा जिल्हा, अंकोला तालुका येथें कर्नाटक देशस्थ ब्राह्मणांच्या कुळांत झाला. यांचे वडील नागेंद्रशास्त्री हे नांवाजलेले संस्कृत पंडित असून पुराणप्रवचन करीत असत. यांचें लहानपणीं कन्नड शाळेंत थोडेंसें प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर यांनीं इंग्रजी शाळेंत प्रवेश झाला. तेथें शिक्षण घेत असतां तीन-चार

वर्षानंतर हे आजारी पडले. तो आजार बराच बळावल्यामुळें यांची इंग्रजी शाळा सुटली. पुढें औषधोपचारांनीं प्रकृति सुधारल्यानंतर सांगली संस्थानांतील संस्कृत पाठशाळेंत राहून काव्य, अलंकार यांचा यांनीं अभ्यास केला. पुढें कांहीं काळ काशी क्षेत्रांत राहून तेथेंहि तोच अभ्यास पुढें चालू ठेवला. पण काशीची हवाहि न पचल्यामुळें यांना तेथून म्हैसूर संस्थानांतल्या महाराजा संस्कृत कॉलेजांत राहून आपलें अध्ययन पुरें करावें लागलें. तेथें अभ्यास संपवून यांनीं व्याकरण व अलंकार या उभय शास्त्रांतील उच्च परीक्षा देऊन प्रशस्तिपत्रें मिळविलीं.

याप्रमाणें शिक्षण पुरें करून स. १९१२ सालीं यांनीं मद्रास प्रांतांतील मंगळूर शहरांत बी. एम्. हायस्कुलांत संस्कृत अध्यापकाची नोकरी धरली. तेथें सुमारें १३।१४ वर्षें नोकरी केल्यानंतर कुर्ग प्रांतांत मडिकेरी शहरांतील गव्हर्नमेंट सेंट्रल हायस्कूलमध्यें हे प्रधान संस्कृताध्यापक झाले. पुढें १९३९ सालांत हे नोकरींतून निवृत्त होऊन कारवारांत पेन्शन घेऊन राहिले आहेत. कर्नाटकांतील दक्षिण भागांत यांचा शिष्यवर्ग फार मोठा असून चाहते व मित्रहि पुष्कळ आहेत.

लहानपणापासूनच यांना लेखनाची फारच आवड असल्यामुळें मराठी पत्रांतून व मासिकांतून निरनिराळ्या विषयांवर हे लेख लिहीत असत. वेदान्त हा यांचा आवडता विषय असल्यामुळें त्याचा व्यासंग यांनीं प्रथमपासूनच केला होता. हुबळींतील श्रीशंकराचार्योत्सव संस्थेकडून यांना पांच वर्षांपर्यंत वेदान्तविषयक निबंधलेखनाबद्दल बक्षीस मिळालें आहे. मराठींत जसें हे सफाईदारपणें लिहितात तसेंच संस्कृतांतहि हे काव्य व गद्यरचना करितात. कलकत्ता नगरींत " निखिल भारत साहित्य संघा "कडून सन १९१९ सालीं " धर्मनीत्योरेकवाक्यता " या निबंधलेखनाबद्दल यांना " विद्यावाचस्पति " ही पदवी मिळाली आहे. संस्कृत व मराठी लेखनाप्रमाणेंच यांनीं आपल्या मातृभाषेंत-कन्नड भाषेंत-विविध विषयांवरील लेखांची व ग्रंथांची निपज केली आहे. यांनीं १९१६ पासून १९२५ सालापर्यंत मंगळूरच्या " स्वदेशाभिमानी " या कन्नड पत्राचें संपादकत्वाचें काम केलें होतें. याशिवाय, इतर कन्नड पत्रांतून व मासिकांतूनहि हे लिहीत असत. या सगळ्या लेखांचा पुस्तकरूपानें संग्रह केल्यास ४।५ हजार पृष्ठांचा ग्रंथ होईल. यांनीं कन्नड भाषेंत उच्च प्रतीचे ग्रंथहि लिहिले आहेत. मद्रास व म्हैसूर युनिव्हर्सिट्यांतून बी. ए., एम्. ए. परीक्षांना यांचे ग्रंथ पाठ्य-पुस्तक या नात्यानें लावण्यांत आले होते.

अखिल-भारतीय-सनातन-वर्णाश्रम-स्वराज्य-संघाच्या कर्नाटक शाखेची स. १९३४ सालांत दक्षिण कानड्यांतील कुंदापूर येथें जी परिषद भरली होती तिचे हे अध्यक्ष होते.

यांच्या मराठी, संस्कृत व कन्नड भाषांतील ग्रंथांची थोडक्यांत माहिती अशीः—

संस्कृत : १ पुष्पमाला (काव्य), २ स्वत्वसंजीविनी (काव्य), ३ गद्यपद्यसंग्रहः, ४ व्यावहारिकपरामर्षः, ५ ब्राह्मणाब्राह्मणवादमूलम्, ६ योगीशगीता (अमुद्रित), ७ सावित्रीचरितम् (अमुद्रित).

मराठी : १ आर्यमातेचा निरोप, २ मराठी लेखसंग्रह, ३ " तत्त्वज्ञान मंदिरां "तील निरनिराळे लेख.

कन्नड : १ हिंदुव्रतविवेक, २ संक्षेपगीता, ३ केतुभंग (नाटक), ४ नाटककला, ५ श्रीकृष्णचरितामृतम्, ६ ईश्वरज्ञान (अमुद्रित. या ग्रंथास सुवर्णपदक मिळालें आहे), ७ सनातन धर्म.

औं

औंधकर, विष्णु हरि—(जन्म स. १८९४-मृत्यु स. १९४३)

सुप्रसिद्ध नट, नाटककार व चित्रपटकथालेखक. यांचा जन्म नामदेव शिंपी जातींत कोल्हापूर येथें झाला. शिक्षण मराठी चार इयत्तेपेक्षां जास्त घेतां आलें नाहीं.

स. १९०७ सालीं हे 'महाराष्ट्र नाटक मंडळी'त शिरले. मध्यें कांहीं दिवस ती कंपनी यांनीं सोडली होती, पण पुनः हे त्याच कंपनींत आले (१९१४). स. १९२५ पर्यंत हे त्यात कंपनींत होते. पुढें 'युनायटेड पिक्चर सिंडिकेट' मध्यें दिग्दर्शक होते (१९२५-२७). पुढें

यांनीं 'समर्थ नाटक मंडळी' सुरू केली. तिच्या तीन भागीदारांपैकीं हे एक होते.

यांच्या विठाई (तोतयाचें बंड), तुळशी (विचित्र-लीला), जिजाई (शिवसंभव), येसूबाई (बेबंदशाही) इत्यादि भूमिका विशेष प्रसिद्ध आहेत. हे स्त्रीभूमिका करण्यांत निष्णात होते, तसेंच पुरुषभूमिकाहि उत्कृष्ट करीत.

तसेंच हे उत्कृष्ट नाटककारहि होते. यांची 'बेबंदशाही' 'आग्र्याहून सुटका' व 'महारथी कर्ण' हीं नाटकें रंगभूमीवर अत्यंत यशस्वी झालेलीं आहेत.

त्याशिवाय यांनीं चित्रपटकथाहि पुष्कळ लिहिल्या आहेत. त्यांत अनन्यसाधारण यश यांना, कोल्हापूरच्या शालिनी सिनेटोनकरितां लिहिलेल्या व बाबुराव पेंटरनीं दिग्दर्शित केलेल्या 'सावकारी पाश'नें मिळवून दिलें. रामराज्य, पनघट वगैरे कथांनीं तर यांना अखिल भारतीय प्रसिद्धि मिळवून दिली. हे कविताहि साध्या पण आकर्षक करीत.

औंधचे राजे पंतप्रतिनिधि, भवानराव श्रीनिवासराव— (जन्म स. १८६८, अधिकारप्राप्ति १९०९)

महाराष्ट्रांतील औंध संस्थानचे अधिपति. विद्या, कला, सेवा आणि त्याग या सर्वच दृष्टींनीं यांनीं 'आदर्श राजा' असा सर्वांकडून बहुमान मिळविला आहे. शिवाय संस्थानचा कारभार पूर्णपणें लोकांच्या ताब्यांत देऊन स्वतःच्या कर्तबगारीवरील आणि प्रजाजनांवरील विश्वास यांनीं प्रगट केला आहे. सध्यांच्या काळांत हिंदुस्थानांतील संस्थानिकांत यांचें हें सर्वस्वीं लोकतंत्र राज्य करण्याचें उदाहरण अद्वितीयच आहे. आपले राज्यांतील प्रत्येक खेडें अन्नवस्त्रादि आवश्यक गरजांबाबत स्वयंपूर्ण असावें अशी यांची लोकशाहीच्या बाबत कल्पना आहे. प्रत्येक गांवांतून होणारा वसूल त्या गांवांतच खर्च झाला पाहिजे, असें ध्येय प्रत्यक्ष अमलांत आणण्याचा प्रयोग हे करीत आहेत. त्याबाबत यांचे चिरंजीव बॅ. अप्पासाहेब पंत आणि नातू युवराज बापुसाहेब पंत यांचें उत्तम सहकार्य यांना लाभलें आहे.

यांचें प्राथमिक शिक्षण औंधास, हायस्कूलमधील शिक्षण साताऱ्यास, कॉलेज शिक्षण डेक्कन कॉलेज पुणें येथें होऊन हे बी. ए. झाले (१८९४). नंतर यांनीं मुंबईस राहून एक वर्ष कायद्याचा अभ्यास केला. पुढें वडील श्रीनिवासराव पंतप्रतिनिधि (स. १८४८–१९०१) यांचे 'चीफ सेक्रेटरी' म्हणून हे काम पाहूं लागले (१८९७–१९०१). वडील कैलासवासी झाले तेव्हां यांनीं संस्थान निष्कर्जी केलें होतें. मध्यें श्रीमंत परशुराम श्रीनिवास ऊर्फ दादासाहेब (१९०१–५) व पुढें श्रीमंत गोपाळकृष्ण परशुराम ऊर्फ नानासाहेब (१९०५–१९०६ डिसें.) असे पितापुत्र प्रतिनिधिपदावर आले. पण कारभारी जेकब बापूजी यांच्या खुनाचा प्रयत्न केल्याचा त्यांच्यावर आरोप येऊन त्यांना धारवाड येथें राहण्याचा हुकूम झाला. आणि वारसदारांपैकीं विशेष योग्यतेचे म्हणून यांना संस्थानची गादी देण्यांत आली. अधिकारदानसमारंभ ता. ४-११-१९०९ रोजीं झाला. तेव्हांपासून आतांपर्यंत ३६ वर्षें यांची कारकीर्द अत्यंत यशस्वी झाली आहे. दीर्घकाळ यशस्वी राज्य करणारे, हिंदुधर्माचे अभिमानी, आचार व चारित्र्यसंपन्न आणि सर्व सुधारणा आपल्या राज्यांत आणून पोंचविणारे असें यांचें व यांच्या कारकीर्दीचें वर्णन करतां येईल.

हे पूर्ण निर्व्यसनी, कर्तव्यदक्ष, नियमित, कष्टाळू आणि ध्येयवादी आहेत. यांचे विचार उत्साहवर्धक आणि स्फूर्तिप्रद आहेत. यांच्यांत संदेशकथनाची शक्ति नैसर्गिक आहे.

पुणें येथें भांडारकरप्राच्यविद्यासंशोधनमंदिरांत चाललेल्या महाभारत-संशोधनाच्या कामास यांनीं प्रारंभी लक्ष रुपयांची देणगी दिली व तें काम चालतें केलें. तसेंच बनारस हिंदु–विश्वविद्यालयाला यांनीं दहा हजारांची देणगी दिली आहे. याशिवाय कोणीहि यांच्याकडून रिक्तहस्तानें परत जात नाहीं. तथापि त्यांतहि यांची एक प्रकारची दृष्टि असते. आपल्या राज्यांतील लोकांचा आपल्यावर पहिला हक्क आहे ही गोष्ट हे केव्हांहि डोळ्याआड होऊं देत नाहींत. अशा वेळीं वशिल्यानें पैसे उकळण्यास आलेल्या लोकांना यांच्या स्पष्ट व सडेतोडपणाचा प्रसाद मिळतो.

सामाजिक बाबतींतहि यांचे विचार उदार आहेत. हे भोजनाच्या बाबतींत पंक्तिभेद मानीत नाहींत. यांचे घरांत पोटजातीय व पुनर्विवाहित संततीशीं विवाह झाले आहेत. यांनीं अस्पृश्यता शाळेंत, मंदिरांत, सभेंत, कारखान्यांत, खुद्द राजवाड्यांत आणि राज्यांत नष्ट केली आहे. राणीसाहेब अस्पृष्ट सुवासिनींना हळदीकुंकू देतात, तर राजेसाहेब अस्पृष्टांचे पंक्तीस जेवतात.

हे स्वतः वृद्ध व कर्मठ असले तरी नवे विचार आकलन

करण्याची शक्ति यांच्यांत आहे. जुने पुष्कळ आचार, नित्यकर्म, श्राद्धपक्ष, उपासना हे कटाक्षानें पाळीत असले तरी नव्या गोष्टी आत्मसात् करून पचविण्याची शक्ति यांच्यांत आहे.

यांना स्वतः चित्रें काढणें, दुसऱ्यांच्या चित्रांतील रसग्रहण करणें आणि चित्रांचा संग्रह करणें यांचा छंद आहे. याशिवाय फोटोग्राफी, कोरीव, कातीव, खोदीव वगैरे प्रकारच्या कलेचेहि हे भोक्ते आहेत. त्यामुळें चित्रकलेचा व विविध पदार्थांचा यांचा म्युझियम विविध, संपन्न आणि अपूर्व आहे यांत शंका नाहीं.

यांच्या चित्रकलेसंबंधीं रा. ब. म. वि. धुरंधर म्हणतात: "यांचीं चित्रें पौराणिक आणि ऐतिहासिक आहेत. तीं लोकप्रिय आणि सर्वोत्कृष्ट आहेत. यांच्या कलेमध्यें कोणत्याहि पद्धतीचें अनुकरण नाहीं. यांची पद्धत ही स्वतःचीच पद्धत आहे. म्हणून तिला 'औंध स्कूल' म्हणणें बरोबर होईल. यांचे चित्रांतील पेहेराव व पार्श्वभाग पूर्वपद्धतीचे महाराष्ट्रीय असतात. त्याकरितां हे व्यासंगहि चांगला करतात."

यांच्या चित्रविषयक ग्रंथांत १ चित्ररामायण, २ (मराठींतील सचित्र) अजिंठा, ३ श्रीशिवाजी आल्बम् (यांत हळदणकर, सरदेसाई, केतकर, चाफळकर, रा. ब. धुरंधर व श्रीमंत पंतसाहेब यांचीं चित्रें आहेत), ४ महाभारत (प्रसिद्ध होत आहे). ५ भवानीसहस्रनाम, हे प्रमुख होत.

यांचीं खालील चित्रें विशेष वाखाणण्यासारखीं आहेत:

१ महाभारत–कृष्णचरित्र, २ भीष्मप्रतिज्ञा, ३ मुरलीवादन, स्वतः काढलेल्या यांच्या चित्रांची संख्या ५०० पर्यंत असावी.

यांनीं आपल्या चित्रसंग्रहांत जुन्या-नव्या शेंकडों चित्रकारांचीं चित्रें लक्षावधि रुपये खर्चून जमविलीं आहेत. असा म्युझियम क्वचितच असेल. त्यांत प्राचीन काळापासूनच्या प्रसिद्ध चित्रकारांचीं चित्रें संग्रहित केलीं आहेत, त्याकरितां स्वतंत्र अदाह्य इमारत बांधून हा कलानिधि सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

चित्राप्रमाणेंच चित्रकलेवरील ग्रंथसंग्रहहि यांनीं एकत्र करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. जगांतील अनेक भाषांतून चित्रकलेवर जेवढें म्हणून वाङ्मय प्रसिद्ध झालें आहे, तें आपल्या संग्रहीं आणण्याचा यांचा प्रयत्न वाखाणण्यासारखा आहे. महाराष्ट्र युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यास त्या युनिव्हर्सिटीची चित्रकला–शाखा औंधास निघावी अशी यांची इच्छा आहे. त्याकरितां हे आपला चित्रसंग्रह व पुस्तकसंग्रह देण्यास तयार आहेत. ते उत्तम चित्रकला-टीकाकार आहेत व हा यांचा गुण अजिंठा व वेरूळ या दोन चित्रकलेवरील पुस्तकांत दिसून येतो. यांनीं आहारशास्त्र, व्यायामशास्त्र, नेत्रबलसंवर्धन वगैरेंचा शास्त्रीय अभ्यास केला असून त्यांवर ग्रंथ लिहिलेले आहेत व ते प्रमाणभूत मानले जातात.

कीर्तन हा विषय यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. प्रतिवर्षी शिवजयन्ती (फाल्गुन व. ३) व वडील कै. श्रीनिवासराव पंतप्रतिनिधि यांची पुण्यतिथि भाद्रपद शु. १४ अशीं दोन कीर्तनें स्वतः करण्याची यांची पद्धत आहे. दोन्ही वेळीं अगदीं नवें आख्यान व पूर्वरंग हे करतात. व त्यांचीं पुस्तकेंहि छापून प्रसिद्ध केलेलीं आहेत. यांचा हा क्रम गादीवर आल्यापासून चालू असलेला दिसतो. त्याकरितां नित्य ठराविक वेळीं हे आख्यान बसविण्याची तालीम करीत असतात. यांचीं कीर्तनें अत्यंत परिणामकारक व ठसकेदार होतात. यांचें वक्तृत्व परिणामकारक आहे.

कीर्तनांत प्रत्येक वाक्याचा किंबहुना प्रत्येक शब्दाचा परिणाम श्रोत्यांवर व्हावा अशाविषयीं हे दक्ष असतात. एका कीर्तनाची सहा महिने तयारी करीत असतां परिणामकारक होण्याच्या दृष्टीनें शब्दांचे व वाक्यांचे पालट सारखे चालू असतात. ह्या परिणामकारकतेंत प्रसंगोचित अभिनयाची भर पडल्यानें कीर्तनाला अनुपमेय रंग चढतो. मोठा व गंभीर आवाज, तालबद्ध गाणें, अनुरूप अभिनय व रसपरिपोषक शब्दांची निवड यांमुळें यांचें कीर्तन अत्यंत आकर्षक होतें. शिवाय प्रत्येक गोष्ट अत्यंत रेखीव व मर्यादित असते. त्यामुळें ठराविक वेळांत सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडतो. आजपर्यंत यांच्या कीर्तनसुमनहारांत पौराणिक १४ व ऐतिहासिक १४ अशीं २८ आख्यानें प्रसिद्ध झालीं आहेत.

आमच्या जुन्या राजेलोकांत व्यायामाचा शोक असे. त्याकरितां पदरीं पहिलवान बाळगण्याची पद्धत होती. त्यांतून स्फूर्ति घेऊन सर्वसामान्य स्त्रीपुरुषांच्या आटोक्यांत असणाऱ्या प्राचीन सूर्यनमस्काराच्या व्यायामाचा प्रचार यांनीं सुरू केला. सर्व शरीराला सारखा व्यायाम देणारा, कोठेंहि करतां येणारा आणि साधनरहित म्हणजे बिनखर्चीं असा नमस्कारासारखा दुसरा व्यायाम नाहीं, ही गोष्ट यांच्या प्रथम ध्यानांत आली. आणि यांनीं आपल्या राज्यांतील शाळांत आवश्यक

म्हणून नमस्कार-व्यायामाचा समावेश केला. बाह्य शरीराच्या हालचालीबरोबर अन्तर्भागांत नाभीपासून कंठापर्यंत हालचाल व्हावी म्हणून 'हां हीं' वगैरे मंत्राचा उपयोग यांनीं सुरू केला. त्याकरितां तक्ते काढले, मराठी-इंग्रजी पुस्तकें काढलीं, फिल्म तयार केल्या. यांनीं या देशांत तर प्रचार केलाच, पण इंग्लंडमध्यें शाळाखात्याच्या साहाय्यानें सर्वत्र व्याख्यानांचे दौरे काढले, मुलाखती दिल्या, मतें प्रदर्शित करविलीं व नमस्काराचीं पुस्तकें लाखांनीं खपविलीं. याचा परिणाम म्हणजे या विषयावरील पुस्तकांच्या प्रती सर्व हिंदुस्थानांतील भाषांतून तर निघाल्याच, पण 'इंग्लंड, कॅनडा, आस्ट्रेलिया' येथील लोकांनींहि पुस्तकें लिहून यांच्या व्यायामाचा प्रसार केला. असे हे जबरे, चिकाटीचे व परिणामकारक व्यायामाचे प्रचारक आहेत. पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाहि यांनीं साष्टांग नमस्कार घालण्यास लावलें आहे. सूर्यनमस्कार किंवा तृचाकल्प नमस्कारपद्धतीला यांनीं सार्वत्रिक स्वरूप दिलें आहे.

औद्योगिक प्रगति झाल्याशिवाय आपले शेतकरी सुखी होणार नाहींत अशी यांची खात्री आहे.आपल्या राज्यांतील कच्चा माल आपला आपण उपयोगांत आणून त्याचा पक्का माल आपणच तयार केला पाहिजे, आपल्या गरजा परावलंबी असतां उपयोगी नाहींत, मजुरी करण्याकरितां आपल्या लोकांना बाहेर जाण्याचा प्रसंग येतां उपयोगी नाहीं, म्हणून अनेक उद्योगधंदे यांनीं सुरू केले आहेत. किर्लोस्कर बंधु, ओगले बंधु, औंध सोप वर्क्स, म्हैसूरचा साखर कारखाना व हस्त कागद कारखाना हे कारखाने यांच्या साहाय्यानें व आश्रयानें उभारले गेले व आज भरभराटीस आले आहेत. स्वदेशीचे हे कटे पुरस्कर्ते आहेत. राजेसाहेब व राणीसाहेब यांचा आपल्याच राज्यांत तयार झालेला जाडाभरडा, हातसुताचा, हातमागावर विणलेला कपडा वापरण्यावर अत्यंत कटाक्ष आहे. आपली प्रजा सुखी तर आपण सुखी, असा यांचा विश्वास असल्यामुळें आपल्या शेतकऱ्यांना शेतकीबरोबर जोडधंदे पुरविण्याचा यांचा सतत प्रयत्न चालू असतो. भरपूर अन्नवस्त्र, आवश्यक सुखसोयी, स्वावलंबी उद्योगधंदे, आणि साक्षरताप्रसार यांच्या जोरावर यांनीं आपल्याकडे सर्वांचें लक्ष खेंचून घेतलें आहे. आज औंध संस्थानांत प्रत्येक गांवीं शाळा असून संस्थानांत साक्षरतेचें प्रमाण शेंकडा २० आहे. इतकें हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठेंहि नाहीं.

हे शुक्लयजुर्वेदाच्या माध्यंदिन शाखेचे ब्राह्मण आहेत. यांचें गोत्र सावर्णि हें आहे. यांच्या विशेष योग्यतेमुळें आणि सर्व गोष्टींत लक्ष घालण्याच्या स्वभावामुळें मराठी साहित्यसंमेलन–इंदोर, कीर्तनसंमेलन–वाई, सर्वपक्षीय-पंचांगपरिषद–पुणें, व्यापारी परिषद–बारामती, चित्रकारपरिषद, व्यायाम-परिषद–बडोदें वगैरेंचें अध्यक्षपद यांना प्राप्त झालें आहे.

१ परशुराम त्रिंबक, २ श्रीपतराव परशुराम, ३ जगजीवनराव परशुराम, ४ (श्रीनिवास) भवानराव, ५ परशुरामराव भवानराव, ६ श्रीनिवासराव परशुराम, ७ परशुरामराव श्रीनिवास, ८ गोपाळकृष्णराव परशुराम, ९ भवानराव श्रीनिवासराव.

वरील औंधच्या पंतप्रतिनिधींपैकीं पहिल्या पांचांचीं चरित्रें आमच्या 'मध्ययुगीन चरित्रकोशांत' आलीं आहेत. ६-९ यांपैकीं सध्यां गादीवर असलेले श्रीमंत भवानराव यांचें चरित्र महत्त्वाचें असल्यानें आम्ही येथें दिलें आहे.

क

कझिन्स, डॉ. (जेम्स हेन्री) जयराम— (जन्म स. १८७३)

आपल्या साहित्य व कलाविषयक कार्यानें चारहि खंडांत विख्यात झालेले थोर महापंडित. यांचा जन्म बेलफास्ट (आयर्लंड) या गांवीं झाला. यांचा विवाह स. १९०३ सालीं मार्गारेट एलिझाबेथ जिलेस्पी यांच्याशीं झाला. हे वीस वर्षांचे असतां यांनीं आपला पहिला काव्यग्रंथ प्रसिद्ध केला. ए. इ. व मि. यीट्स या सुप्रसिद्ध आयरिश कवींच्या सहकार्यानें यांनीं आयर्लंडांतील साहित्याचे पुनरुज्जीवनाकरितां १८९७ सालीं संस्था काढली. हे थिऑसॉफिकल सोसायटीचे सभासद १९०४ सालीं झाले व आयर्लंडांतील सोसायटीचा कार्यप्रचार अध्यक्षांचे

प्रतिनिधि म्हणून तेथें १९१५ पर्यंत करीत होते. स. १९१५ सालीं बेझंटबाईंनीं काढलेल्या 'न्यू इंडिया' या दैनिकाच्या संपादक-मंडळांत हे येऊन दाखल झाले, व तेव्हांपासून बाईंच्या देहावसानापर्यंत त्यांचे कार्यांत हे मदत करीत असत.

बाईंनीं काढलेल्या 'नॅशनल युनिव्हर्सिटी' व 'ब्रह्मविद्याश्रम' या दोन संस्थांत यांनीं प्राध्यापक म्हणून काम केलें. मद्रास विद्यापीठाच्या कलाविभागांतील मंडळावर व सीनेटमध्यें हे सभासद आहेत. मदनपल्ली येथील थिऑसॉफिकल कॉलेजचे हे कित्येक वर्षें प्रिन्सिपल होते. यांनीं १९३३ सालीं इंग्लिश काव्यसंग्रहाचे वीस विभाग व इंग्लिश गद्याचे वीस विभाग प्रसिद्ध केले (१९३४). यांनीं चारहि खंडांतील निरनिराळ्या विश्वविद्यालयांतून काव्य व कला या विषयांतील प्राध्यापक म्हणून कार्य केलें आहे. मॅजिक लँटर्नच्या साहाय्यानें प्रमुख चित्रकारांचीं मूळ चित्रें दोनदां जागतिक प्रवास करून देशोदेशांतील विद्वान् व रसिक लोकांना यांनीं दाखविलीं आहेत; व त्याबरोबरच शिक्षण, तत्त्वज्ञान, काव्य, हिंदी संस्कृति व थिऑसॉफी या विषयांवर व्याख्यानें दिलीं. या सर्व कार्यांत यांच्या विद्वान् व कलाभिज्ञ पत्नी यांचें यांना पूर्ण साहाय्य असे.

जपानमध्यें कियोजीजुकु येथील विद्यापीठ व शिक्षणमंत्रीमंडळ या संस्थांकडून यांना स. १९१९-२० मध्यें इंग्लिश काव्याचे प्राध्यापक म्हणून केलेल्या कार्याबद्दल 'डॉक्टर' ही पदवी मिळाली. त्रिवेन्द्रम् येथील सरकारी चित्रसंग्रहालयाला संघटित स्वरूप देऊन त्रावणकोर संस्थानाच्या सांस्कृतिक जीवनाबाबत केलेल्या कार्याचें पारितोषिक म्हणून महाराजांनीं यांना महापंडित म्हणून दरबारी पोषाख व 'वीरशृंखला' संज्ञक सुवर्णकंकण देऊन बहुमान केला. दक्षिण हिंदुस्थानांतील शिक्षकसंघानें यांना कुलपति ही पदवी अर्पण केली आहे. हिंदु धर्माबरील यांचें असलेलें विशेष प्रेम व्यक्त करण्याकरितां यांनीं विधिपूर्वक हिंदुधर्माचा स्वीकार केला आहे व आपलें नांव तेव्हांपासून जे.सच्या ऐवजीं जयराम असें ग्रहण केलें आहे. याप्रमाणें आपल्या साहित्य व कलाविषयक कार्यांनीं चारहि खंडांत विख्यात झालेले असे हे एक आधुनिक जगांतील महापंडित आहेत.

यांचे ग्रंथ

१ Fundamental Unity of Asia = आशियाचें (सांस्कृतिक) मूलभूत ऐक्य.
२ Forest Meditation = अरण्यांतील चिंतन.
३ Bases of Theosophy = थिऑसफीचीं मूलतत्त्वें.
४ Work & Work-shop = कर्म व कर्मक्षेत्र.
५ Study in Synthesis = समन्वयात्मक अध्ययन.
६ Work of Promethean = प्रोमीथियनचें काम.
७ Samadarshana = समदर्शन.
८ Kingdom of Youth = तरुणांची सृष्टि (वा. ल. चिपळुणकर).

कझिन्स, मिसेस मार्गारेट एलिझाबेथ— (जन्म स. १८७८.–विवाह डॉ. कझिन्सबरोबर स. १९०३) अखिल भारतीय महिला परिषदेच्या संस्थापक.

या स. १९०४ सालीं थिऑसॉफिकल सोसायटीच्या सभासद झाल्या. इंग्लंडांतील व आयर्लंडांतील स्त्रियांच्या मतदानाच्या चळवळींत केलेल्या कार्यप्रसंगानें यांना वरील दोन्ही देशांत तुरुंगवास घडला. स. १९०४ ते १५ पर्यंत डब्लिन व लिव्हरपूल येथील सोसायटीच्या शाखांत यांनीं कार्य केलें. हिंदुस्थानांत आपल्या पतीबरोबर या स. १९१५ सालीं आल्या व मदनपल्ली व मंगलोर या दोन ठिकाणीं थिऑसाफिकल सो.च्या विद्यमानें चाललेल्या शाळांतून अध्यापनकार्य केलें. १९१७ सालीं राष्ट्रीय शिक्षणावर यांनीं व्याख्यानें दिलीं व राष्ट्रीय सभेंत दाखल झाल्या. स. १९२३ मध्यें मद्रास सरकारनें यांना निर्वेतन बेंच मॅजिस्ट्रेट म्हणून नेमिलें. या बाईंनीं चारहि खंडांत आपल्या यजमानांच्या बरोबर प्रवास करून त्यांचे साहाय्यानें अनेक चळवळी केल्या व संस्था स्थापन केल्या. स. १९०४ सालीं आयर्लंडमध्यें शाकाहाराकरितां एक संघ काढिला. १९२३ सालीं मद्रास येथें स्त्रियांकरितां सेवासदन काढिलें. १९२७ सालीं हिंदुस्थानभर प्रवास करून व सुप्रसिद्ध स्त्रीपुढाऱ्यांच्या मुलाखती घेऊन, त्यांच्या सहकार्यानें अखिल भारतीय महिला परिषदेची स्थापना केली व पहिल्या संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. बेझंट या होत्या. हल्लीं सदर परिषदेच्या या उपाध्यक्ष आहेत.

१९२८ सालीं जिनिव्हा येथें यांनीं आन्तरराष्ट्रीय थिऑसाफिचें केन्द्र स्थापन केलें. १९३२–३३मध्यें सरकारी वटहुकुमाच्या अयोग्य अमलबारीचा निषेध म्हणून तो हुकूम मोडला व या तुरुंगांत गेल्या. यांना संगीतशास्त्रविशारद अशी आयर्लंडांतील रॉयल विश्वविद्यालयाकडून पदवी मिळाली आहे. विश्वविद्यालयांतील पाश्चिमात्य संगीतशास्त्राच्या अभ्यासमंडळाच्या या अध्यक्ष आहेत.

यांचे ग्रंथ

१ Awakening of Asian Womanhood, आशिया खंडांतील स्त्रियांची जागृति.

२. Music of Orient & Occident, पौर्वात्य व पाश्चिमात्य संगीत.

३ Indian Womanhood, (हिंदी स्त्रिया) (वा. ल. चिपळुणकर).

कॅनिंग, लॉर्ड—(कारकीर्द स. १८५६-१८६२) लॉर्ड डलहौसीनंतरचे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय. यांच्या वेळीं १८५७ सालच्या बंडाची मोठीच धामधूम झाली. त्या प्रसंगांतून निभावून जाण्याइतपत हे करारी मुत्सद्दी होते. यांना हें शिक्षण यांच्या वडिलांकडूनच मिळालें होतें. यांचे वडील इंग्लंडांत परराष्ट्र मंत्री व मुख्य प्रधान अशा महत्त्वाच्या जागेवर काम करून मुत्सद्दी म्हणून विख्यात होते.

इंग्रजी राज्याची स्पष्ट कल्पना हिंदी लोकांस यांच्या कारकीर्दीत आली. सर्व यांत्रिक व राजकीय सुधारणा इंग्रजी राज्य स्थिर करण्याकरितां आणि येथील राजे-रजवाडे, जमीनदार यांना नामशेष करण्याकरितां चालल्या आहेत; शिवाय ख्रिस्ती धर्माच्या प्रसारालाहि तें उघड मदत करीत आहे; अशा समजुतीनें लोकांत असंतोष पसरला. शिवाय आपलें राज्य गेलें ही तीव्र जाणीवहि लोकांच्या मनांत होतीच. त्यामुळें बंडाचा वणवा पेटण्यास वेळ लागला नाहीं. पण एकजुटीच्या व शिस्तीच्या अभावीं बंडाचा मोड करण्यांत आला.

पण याचा परिणाम होऊन पार्लमेंटनें कायदा करून कंपनी रद्द केली व हिंदुस्थानचा कारभार इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिच्या नांवें सुरू करण्यांत आला. हिंदुस्थानचा कारभार पाहण्याकरितां भारतमंत्र्याची नेमणूक होऊन त्याच्या मदतीस पंधरा सभासदांचें एक मंडळ देण्यांत आलें. येथील गव्हर्नर-जनरलास व्हाइसरॉय हा नवा हुद्दा देण्यांत आला. नियामक मंडळ रद्द करण्यांत आलें. हिंदुस्थानांतील सर्व सैन्य विलायत सरकारच्या नियंत्रणाखालीं ठेवण्याचें ठरलें. याच व्हिक्टोरिया राणीनें एक महत्त्वाचा जाहीरनामा काढला तो 'राणीचा जाहीरनामा' म्हणून प्रसिद्ध आहे (१८५८). तो दिल्लीस मोठा दरबार भरवून मोठ्या इतमामानें यांनीं वाचून दाखविला. हा जाहीरनामा हिंदुस्थानच्या राज्य-घटनेचा मूळ पाया म्हणून उल्लेखण्यांत येतो.

बंडामुळें यांनीं आपला समतोलपणा ढळूं दिला नाहीं. आपल्या धिम्या व दयाशील स्वभावाला अनुसरून यांनीं पुढील सुधारणा अंमलांत आणल्या :

(१) कंपनीचें सैन्य व राणीचें सैन्य यांचें एकीकरण केलें. तसेंच हिंदी सैन्यांत पुष्कळ सुधारणा केल्या. (२) जमाखर्चाची घडी तज्ज्ञांच्या सल्ल्यानें सुधारली. (३) वुडच्या खलित्यास अनुसरून यांनीं स. १८५७ मध्यें मुंबई, मद्रास व कलकत्ता येथें विश्वविद्यालयें स्थापून शिक्षणांत व ज्ञानांत एकसूत्रीपणा आणला. (४) कायदे एकत्रित करून 'पिनल कोड' व 'क्रिमिनल प्रोसीजर कोड' हीं कायद्यांचीं पुस्तकें तयार केलीं व त्यांचा उपयोग सुरू केला. (५) शेती करणाऱ्या कुळांच्या हितरक्षणार्थ यानें स. १८५९ मध्यें कायदा तयार करून तो बंगाल, बिहार, मध्यप्रान्त, आग्रा व अयोध्या या प्रान्तांना लागू केला. (६) स. १८६१ मध्यें कौन्सिलसंबंधीं कायदा पास करण्यांत आला. त्या कायद्यान्वयें मुंबई, मद्रास व बंगाल या प्रांतांस कायदे-मंडळें देण्यांत आलीं. (७) पूर्वीचीं वरिष्ठ कोर्टें रद्द करण्यांत येऊन हायकोर्टें सुरू करण्यांत आलीं.

इतकीं कामें करून राज्याला एकसूत्री व व्यवस्थित रूप दिलें आणि यांनीं राजीनामा दिला. हिंदुस्थानचा पहिला व्हाइसरॉय होण्याचा मान यांना मिळ'ला. इंग्लंडमध्यें गेल्यावर तीनच महिन्यांनीं हे मृत्यु पावले.

कनिंगहॅम, जनरल सर अलेक्झांडर—(जन्म स. १८१४-मृत्यु स. १८९३) हिंदी पुराण-वस्तुसंशोधनाचे जनक व विख्यात संशोधक. हे प्रथम रॉयल एन्जिनियर्समध्यें भरती होऊन हिंदुस्थानांत १८३३ मध्यें आले, तें क्रमशः वाढत जाऊन मेजर जनरलच्या हुद्यावर १८६१ सालीं चढले. प्रथमपासूनच यांना या देशांतील प्राचीन संस्कृतीच्या सर्वांगीण अभ्यासाची गोडी लागली व यांनीं आपल्या देशभर संचाराचा उपयोग शिलालेखांच्या प्रती तयार करणें, नाणीं गोळा करणें, जुन्या ऐतिहासिक स्थळांविषयीं सांगोपांग माहिती मिळविणें, प्राचीन शिल्पकलेचे व इतर अवशेष उजेडांत आणणें व यासंबंधीं लेख लिहिणें यांत केला. हे या देशांत आले तेव्हां प्राचीन ब्राह्मी व खरोष्ठी लिपी प्रथमच उकलण्यांत आली होती आणि ज्या प्राचीन लेखांच्या अभ्यासावर हिंदुस्थानच्या इतिहासाची उभारणी करण्यांत आली त्यांच्या संग्रहाचे व अभ्यासाचे बाबतींत यांचा मोठाच वांटा होता. पुढें १८६१ मध्यें लॉर्ड कॅनिंग यांनीं आपल्या पुनर्घटनेच्या योजनेंत

पुरातत्त्वविभाग उघडून सर्व देशभर पसरलेल्या हिंदी संस्कृतीच्या अवशेषांची पाहणी करण्याचें ठरविलें, तेव्हां त्यांस यांच्यापेक्षां अधिक लायक विद्वान् त्या कामाकरितां मिळणें शक्य नव्हतें. सतत २३ वर्षे त्या कामांत घालवून यांनीं त्याबद्दल २३ रिपोर्ट प्रसिद्ध केले ते प्रत्येक संशोधकास प्रमाणभूत वाटण्यासारखे आहेत. किंबहुना, अशीं स्थळें अजून आहेत कीं, यांच्यानंतर कोणीहि संशोधक अजून तेथें पोंचला नाहीं. सत्तरी उलटून गेल्यावर हे स्वदेशीं परत गेल्यावर यांनीं आपल्या ज्ञानाची व अनुभवाची साक्ष पटविणारे हिंदुस्थानचा प्राचीन भूगोल, नाणकशास्त्र, स्थापत्य, कला इत्यादि विषयांवर प्रमाणभूत ग्रंथ लिहिले. रेल्वे नसलेल्या काळीं यांनीं उत्तर हिंदुस्थानांत एक-एका भागांत प्रवास करून तेथील सर्व प्रकारच्या माहितीचा सहानुभूतीनें पण चिकित्सक बुद्धीनें संग्रह करून अनेक ऐतिहासिक नवीं दालनें उघडलीं. सांची, भरहूत व बुद्धगया या प्रख्यात बौद्ध संस्कृतीच्या केन्द्रांचें संशोधन, तसेंच अशोकाच्या सर्व लेखांचें संकलन, प्रथम यांनींच करून ज्ञानांत फार मोठी भर टाकली. चिनी प्रवाशांच्या इतिवृत्तान्तामार्गे कोणतीं स्थळें कोठें आहेत याबद्दल यांनीं केलेल्या सूक्ष्म संशोधनावर प्राचीन भारतीय भूगोल अद्याप पुष्कळसा आधारलेला आहे, त्यावरून यांचें स्थलज्ञान किती अचूक होतें हें दिसून येतें. ऐतिहासिक संशोधनांत कालमान व कालगणना या विषयांची अतिशय आवश्यकता असते, त्यासंबंधीं यांनीं प्रथमच 'A Book of Indin Eras' (हिंदी कालगणना) हें पुस्तक लिहिलें. पंजाब व वायव्य सरहद्द या बाजूचीं ग्रीक, शक, पह्लव, कुषाण यांचीं नाणीं व गांधार शिल्पकला यांबद्दल यांनीं केलेल्या संशोधनास आधारभूत मानणें भाग आहे. यांना संस्कृत विद्या व एतद्देशीय पांडित्य व संस्कृति यांबद्दल अत्यंत आदर असून हिंदी विद्वान् चिकित्सक होऊन आपल्या देशाच्या संस्कृतीचा इतिहास उलगडांत आणतील याबद्दल यांना खात्री वाटत असे. असा थोर वृत्तीचा अष्टपैलू विद्वान् भारतवर्षातील पुराणवस्तु-संशोधनाचा पाया दृढमूल करण्यास मिळावा ही खरोखर कोणत्याहि इतिहासाभ्यासकाला भाग्याची वाटणें साहजिक आहे.

ऑफिसच्या कामाकरितां काढलेल्या सफरींचे वृत्तान्त यांनीं प्रसिद्ध केले आहेत. त्याचबरोबर बंगाल रॉयल एशियॅटिक सोसायटीच्या पत्रांत यांनीं लिहिलेल्या लेखांची संख्याहि उपेक्षणीय नाहीं. परंतु हें सर्व झालें स्फुट लिखाण. या सर्वांपेक्षां (1) The Bhilsa Topes, (2) The Buddist Period, (3) Corpus Inscriptionum Indicarum, (4) The Stupa of Bharhat, (5) The Book of Indian Eras, (6) Mahabodhi, (7) Inter alia on Ladak, (8) The Ancient Geography of India, ह्या यांच्या त्या त्या विषयांत क्रांतिकारक ठरलेल्या ग्रंथांस विशेष महत्त्व असणें साहजिक आहे. यांच्या अचाट परिश्रमांची कल्पना यांचा हा ग्रंथविस्तारच देऊं शकेल.

आपल्या लष्करांतील कार्यनिवृत्तीनंतर यांनीं आपली दृष्टि आपल्या आवडत्या व्यवसायावर—नाण्यांच्या अध्ययनावर केंद्रित केली. अजूनहि नाण्यांचे बाबतींत यांनीं केलेलें कार्य प्रमाणभूत मानण्यांत येतें. मृत्यूपूर्वी आपला नाण्यांचा संग्रह यांनीं ब्रि. म्यूझियमला देऊन टाकला होता (का. ना. दीक्षित).

करमरकर, विनायक पांडुरंग—(जन्म स. १८९२) सुप्रसिद्ध मूर्तिकार.

यांचा जन्म सासवणें, जि. कुलाबा, येथें झाला. चित्रकलेचें शिक्षण प्रिं. ओटो रॉथफील्डच्या मदतीनें बॉंबे स्कूल ऑफ आर्ट्समध्यें मेयो-मेडल मिळून पुरें झालें (१९१३). युरोपमध्यें याच विषयाचा अभ्यास करण्याची यांना संधि मिळाली (१९२०-२२). शिवाय कलकत्ता येथें शिल्पकाराचा धंदा हे चालवीत होते (१९१६-२६). पुणें येथील श्रीशिवाजी-महाराजांचा अश्वारूढ ब्राँझचा पुतळा यांनीं तयार केला (१९२८). गोंडलच्या महाराजांच्या निमंत्रणावरून १९३१ पासून गोंडळ मुक्कामीं पुतळ्यांचीं कामें केलीं.

करसनदास, मूळजी—(जन्म स. १८३२-मृत्यु स. १८७१) गुजराथमधील निर्भय आणि करारी समाजसुधारक. हे जातीनें कपोलवाणी आणि धर्मानें वैष्णव होते. यांचें मूळ गांव महुवाच्या जवळ वडाळ होतें, तरी यांचे पूर्वज मुंबईस येऊन राहिले. हे कॉलेजमध्यें दाखल झाले, पण यांचें शिक्षण पुरें झालें नाहीं.

त्या वेळीं इंग्रजी शिक्षणामुळें लोकांत एक प्रकारची जागृति उत्पन्न झाली होती. अनेक संस्था व चर्चा-सभा चालू असत. त्यांत 'गुजराथी ज्ञानप्रसारक मंडळी' नांवाची एक संस्था होती. तेथें समाजांतील चालू रीतिरिवाजांबद्दल अनेक प्रकारची चर्चा चाले. तींत पारशी, गुजराथी व महाराष्ट्रीय तरुण भाग घेत. कार्य मोठें

आकर्षक चाले. पण गुजराथी तरुणांचें तेवढ्यानें समाधान होईना, म्हणून त्यांनीं 'बुद्धिवर्धक सभा' नांवाची निराळी संस्था काढली. तींत हे भाग घेत असत.

त्या वेळचे चर्चेचे विषय समुद्रगमन, विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, सार्वत्रिक शिक्षण, हे प्रामुख्यानें असत. त्यांत हे नव्या मताचे जोरदार पुरस्कर्ते होते. यांचें केवळ व्याख्यानें देऊन समाधान होईना. तेव्हां यांनीं कन्याशाळेचें काम अंगावर घेऊन त्यांत लक्ष घातलें. तसेंच लोकमत जागृत करण्याकरितां पारसी गृहस्थाचे 'रास्तगोफ्तार' नांवाच्या पत्रांत हे लिहीत असत. पण लवकरच यांना असें दिसून आलें कीं, स्वतःचें पत्र असल्याशिवाय हिंदुसमाजांतील विविध गोष्टींची चर्चा मोकळ्या मनानें करितां येणार नाहीं. तेव्हां यांनीं 'सत्यप्रकाश' नांवाचें स्वतःचें साप्ताहिक पत्र काढिलें. (१८५५). त्याच वेळीं 'बुद्धिवर्धक सभा' हें मासिकहि पण यांच्याच मतांचें सुरू झालें. सत्यप्रकाशची संपादकीय जबाबदारी हे पार पाडीत आणि आर्थिक व्यवस्था सर मंगळदास नथुभाई वगैरे लोक पार पाडीत.

या सुमारास यांच्या कर्तृत्वानें मोहित होऊन यांना डिसा येथें शिक्षकाची नोकरी मिळाली. पण तेथें दहा महिन्यांत यांची प्रकृति बिघडली. गोऱ्या डॉक्टरनें यांना मांस खाण्याचा सल्ला दिला. पण यांनीं प्राण गेला तरी चालेल पण मांस खाणार नाहीं असें सांगितलें, आणि राजीनामा देऊन हे मुंबईस आपल्या आवडत्या कामाकडे आले. हे सुधारक असले तरी धार्मिक होते. या बाबतींत महाराष्ट्रांतील आगरकरांशीं यांचें साम्य आहे.

या वेळीं पहिल्या दोन्ही स्त्रिया वारल्यामुळें यांना तिसऱ्या लग्नाचा प्रसंग आला. तेव्हां यांनीं लग्नाच्या वेळीं घोडयावर बसून जाण्याचा रिवाज मोडून हे पायींच सासऱ्याच्या घरीं गेले. त्यामुळें लग्न मोडण्याचा प्रसंग आला, तरी हे आपल्या विचारापासून ढळले नाहींत. शेवटीं कांहींनीं मध्यस्थी केल्यावर सासऱ्याला यांच्यापुढें नमतें घ्यावें लागलें.

यानंतर वाल्लभपंथाचे महाराज व ब्राह्मण यांत तंटा सुरू झाला. महाराजांच्या मंदिरांत छप्पन भोग अर्पण करण्याची पद्धत होती. पूर्वीपासूनच ही बाब टीकास्पद होती. ब्राह्मण व महाराज यांच्यांतील तंटा मिटला तरी महाराजांच्या मंदिराची सुधारणा करण्याच्या मिषानें टीका सुरूच राहिली. यांच्यासारख्या सुधारकांनीं 'सत्यप्रकाश' वगैरे पत्रांतून टीकेची झोड उठविली. शेवटीं एका पारशानें चालविलेल्या 'चाबूक' नांवाच्या पत्रावर बेअबूची फिर्याद करण्यांत आली. महाराजांना कोर्टांत साक्षीकरितां बोलावण्यांत आलें. पण महाराजांना कोर्टांत जाणें इष्ट व योग्य नव्हतें. तेव्हां ते मंदिरांत दरवाजे बंद करून बसले.

पण त्यामुळें आस्तिकांना महाराजांचें दर्शन होईना. दर्शन घेतल्याशिवाय अन्नपाणी घ्यावयाचें नाहीं असा पुष्कळच भक्तांचा नियम होता. शेवटीं वैष्णव समाजांतील थोर लोकांनीं एक करारनामा करून सर्व जिम्मेदारी आपणांवर घेतली. मंदिर उघडलें गेलें, आणि विरुद्ध वागणारांना जातिबहिष्कृत करण्याचें ठरलें.

यांच्या खऱ्या परीक्षेची वेळ ही होती. यांनीं जातिबहिष्काराचें भय असतांहि सुधारणापक्षाच्या दृष्टीनें अशा वेळीं माघार घेणें अपायकारक आहे हें लक्षांत घेऊन आपला निश्चय मोठ्या कणखरपणानें अंमलांत आणला. बहुतेक लोक महाराजांच्या पक्षाला गेले होते. आतां महाराजांचा पक्ष हा संप्रदायाचा प्रश्न झाला होता. त्यामुळें हे प्रायः एकाकी पडले. यांना उत्तेजन देणारेहि तटस्थतेचें धोरण दाखवूं लागले. यांनीं मात्र आपल्या सख्त टीकेला सुरुवात केली, आणि महाराजांचें धोरण कसें चुकीचें आहे हें सप्रमाण सिद्ध केलें. यानंतर सुरतेच्या मोठ्या मंदिराचे महाराज यदुनाथजी मुंबईस आले (१८९०). त्यांची सुधारणावादी पक्षाशीं सहानुभूति असल्याची बोलवा होती. पण ते जुन्या-नव्याचा समन्वय करण्याचा प्रयत्न करीत. शेवटीं त्यांच्याशीं शास्त्रार्थ करण्याकरितां सभा बोलावण्यांत आली. पण ती सभा उधळली गेली. तेव्हां 'सत्यप्रकाश' या आपल्या पत्राच्या द्वारें यांनीं महाराजांची, त्यांच्या पंथाची आणि तेथील अनाचाराची अशी चर्चा केली कीं महाराजांनीं यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा करून ५० हजार रुपये नुकसानभरपाई मागितली (१८९१ मे १४). महाराजांना वाटलें हा गरीब एकाकी मनुष्य केवळ धाकानेंच बधेल; पण यांनीं आपलीं विधानें खरीं असून आपण बचाव करणार असल्याचें जाहीर केलें. तेव्हां भाटिया जातीच्या लोकांनीं सभा भरवून यांना जातीबाहेर टाकलें आणि यांना कोणी साक्षीदार वगैरे मिळूं नयेत म्हणून तसा ठराव करून सह्या घेण्याचें काम सुरू केलें. हा ठराव आणि त्यावर घेतलेल्या सह्यांचा अर्थ असाच झाला कीं, यांना खरा न्याय मिळूं देऊं नये. हें लक्षांत आल्यावर

यांनीं कांहीं पुढाऱ्यांवर न्यायदानाच्या कामांत अडथळा करण्याच्या मुद्यावर खटला भरला. तो खटला 'भाटिया कॉन्स्पीरसी केस' या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यामुळें यांना पुष्कळ लोकांनीं भय दाखविलें पण हे आपल्या कार्यापासून बिलकूल चलित झाले नाहींत. यांच्यावर एकदां हल्लाहि झाला. त्यांतून फौजदारी उत्पन्न झाली. अनेकांना हजारांनीं दंड झाले. यांनाहि खर्चाबद्दल एक हजार रुपये मिळाले. मात्र यांचा एकूण खर्च चार हजार रुपये झाला. मूळ कज्जा अजून कोर्टापुढें सुरूच झाला नव्हता.

हे महाराज कोर्टांत येण्यास डरणारे नव्हते. मोठ्या थाटानें कोर्टांत आले. भालदार-चोपदार व संपन्न वैष्णव यांनीं कोर्ट भरून गेलें. पैशालाहि तोटा नव्हता. पण यांची हिंमत अटळ होती. यांनीं हा 'वल्लभसांप्रदाय आधुनिक असून तो वैदिकधर्माविरुद्ध आहे, तसेंच महाराजांच्या अनीतीसंबंधीं मीं केलेले निर्देश खरे असून 'सिद्धान्त-रहस्य' व त्यावरील गोकुळनाथजींची टीका तसेंच भजनें वगैरेंवरून ही गोष्ट सिद्ध होते' असें म्हटलें. डॉ. भाऊ दाजी वगैरेंच्या साक्षीहि यांना पोषक अशा झाल्या. तेव्हां यांना अब्रुनुकसानीदाखल फक्त पांच रुपये देण्याचा हुकूम झाला. या प्रकारें धर्माच्या नांवावर चाललेल्या अनीतिकारक प्रकारांना आळा घालण्याचें अतिशय मोठें कार्य या खटल्यानें केलें आणि खरोखर धर्मगुरूंचीं मंदिरें सुधारण्याला या खटल्याची अतिशय मदत झाली. चहूंकडे या खटल्यामुळें अतिशय खळबळ माजली. टीका झाल्या. 'महाराजा लायबल केस' या पुस्तकांत ही सर्व हकीगत वाचावयास मिळते.

हे दोन वेळां इंग्लंडला गेले. आणि राजकोट व लिमडी या दोन संस्थानांचा कारभार करण्याची ब्रिटिश सरकारतर्फे यांना संधि मिळाली. तिचा यांनीं उत्तम फायदा घेतला आणि आपल्या लोकोपकारक कार्य-पद्धतीनें यांची कारकीर्द अतिशय लोकप्रिय झाली. शाळा, वाचनालयें, बाजार यांची यांनीं नवीन पद्धतीनें मांडणी केली. लांचलुचपत बंद केली. पोलिसबंदोबस्त उत्तम केला. अनेक प्रकारच्या संस्था काढून लोकांना चर्चा करण्यास उद्युक्त केलें. पुनर्विवाह करणारांना साहाय्य केलें आणि स्वतःचें चारित्र्य उत्तम ठेवून लोकांना उदाहरण घालून दिलें. सुधारणा करण्यास निघालेल्या माणसाची नीति आणि चारित्र्य उत्कृष्ट असलीं तरच त्याचा प्रभाव लोकांवर पडतो व कार्य यशस्वी होतें.

समाजसुधारणेचें कार्य करीत असतांच गुजराथी भाषेंत यांनीं खालील ग्रंथ करून महत्त्वाची वाङ्मयसेवा केली आहे :

१ इंग्लंडमां प्रवास (हें पुस्तक फारच चांगलें असून याचें मराठींत भाषांतर झालें आहे), २ प्रवास-प्रवेशक, ३ नीतिवचन, ४ संसारसुख, ५ कुटुंबमित्र, ६ गुजराथी-अंग्रेजीकोष, ७ महाराज लायबल केसनो हेवाल, ८ वेदधर्म, ९ देशाटन विशे निबंध, १० नीतिसंग्रह, ११ नीतिबोधक (पत्रिका), १२ राममोहनराय (पत्रिका), १३ सुधारो अने महाराज (पत्रिका), १४ अमूल्य वाण–सर चार्लस बार्टल फ्रीअरनु भाषण, १५ निबंध-माला.

सत्यप्रकाशसंपादक १८५५–९०, रास्तगोफ्तारसंपादक १८९०–९२, स्त्रीबोधसंपादक १८५९–९१. शिवाय इंग्रजींत महाराज लायबल केस प्रसिद्ध केली (ग्रंथ अने ग्रंथकार).

करंदीकर, जनार्दन सखाराम—(जन्म स. १८७५) केसरीचे संपादक व अनेक विषयांचे सूक्ष्म अभ्यासक.

यांचा जन्म कुंदगोळ, सं. जमखिंडी, येथें झाला. हे फर्ग्युसन कॉलेजांतून बी. ए. झाले (१८९७). पुढें मुधोळच्या शाळेंत हेडमास्तर होते. नंतर एलएल्. बी. झाले. नंतर धारवाड येथें शिक्षक होते.

समर्थविद्यालयांत शिक्षक (१९०७) व तेथेंच वसतिगृहाचे सुपरिंटेंडेंट होते. याच सुमारास 'समर्थ' साप्ताहिक व 'ग्रंथमाला' मासिकाचे सहसंपादक होते. चित्रमयजगताचें संपादन हे कांहीं दिवस करीत असत. स. १९११ मध्यें यांनीं केसरींत लिहिण्यास सुरुवात केली व १९१२ सालीं सहसंपादक म्हणून यांची तेथें नेमणूक झाली. मुळशी सत्याग्रहांत यांना तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली (१९२२). पुणें येथील टिळक महाविद्यालयांत हे इतिहास व अर्थशास्त्र हा विषय शिकवीत असत. १९२७ मध्यें वांईस भरलेल्या राष्ट्रीय शिक्षणपरिषदेचे व झांशीस भरलेल्या बृहन्महाराष्ट्र परिषदेचे हे अध्यक्ष होते. स. १९३१ त केसरीचे मुख्य संपादक झाले. १९३२ मध्यें कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेतल्यानें दोन वर्षांची शिक्षा झाली.

यांचे ग्रंथः—१ कौटिलीय अर्थशास्त्राचें मराठी भाषांतर (श्री. हिवरगांवकर, नगर, यांच्या सहाकार्यानें भाग १–२. १९२६–२८), २ जगांतील क्रांतिकारक लढाया

(क्रीसीच्या 'डिसायसिव्ह बॅटल्स ऑफ दि वर्ल्ड'चें भाषांतर १९०८), ३ हिंदुत्ववाद, ४ भारतीय युद्धाचा कालनिर्णय, ५ भारतीय युद्धाचा तिथिनिर्णय अथवा गीताजयंतीनिर्णय.

यांशिवाय राजकारण, इतिहास, इतिहाससंशोधन, अर्थशास्त्र, फलज्योतिष, पंचांगसंशोधन, गीतार्थ-चर्चा, रामदासी वाङ्मय वगैरेंवर यांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. यांचे विचार सूक्ष्म असून विचारांची पकड पक्की असते. त्यामुळें यांचें विशदीकरण आग्रही वाटलें तरी महत्त्वाचें असतें. यांची लेखणी विविध विषयांत सफाईनें चालते.

करंदीकर, बाळकृष्ण शंकर— (मृत्यु स. १९११) शास्त्रीय वाङ्मयाचा लेखक. मुंबई विश्वविद्यालयाचे हे बी. एससी. होते. तळेगांव येथील पैसाफंड कांच-कारखान्याचे व्यवस्थापक होते. पेणचें 'कोंकण विद्यालय' यांनीं स्थापिलें. लेखन-वातावरण व वनस्पतिशास्त्र.

करंदीकर, रघुनाथ पांडुरंग— (जन्म स. १८५७–मृत्यु स. १९३५) सातारचे सुप्रसिद्ध वकील व सार्वजनिक कार्यकर्ते. हे दादासाहेब या नांवानें ओळखले जात. यांचा जन्म खाडिलकर घराण्यांत झाला. करंदीकर घराण्यांत हे दत्तक आले होते. यांचें शिक्षण सातारा व पुणें येथें झालें. हे हायकोर्ट लीडर झाल्यावर कांहीं दिवस सबजज्ज होते (१८८४). पुढें स्वतंत्रपणें वकिली करूं लागले. यांचें बोलणें खुबीदार असून उलटतपासणीच्या कामांत हे अत्यंत पटाईत असत. लो. टिळकांच्या विश्वासांतील मंडळींत यांची गणना असे.

आपल्या वकिलीच्या प्रचंड व्यापाबरोबरच हे सार्वजनिक कार्यांत भाग घेत व आपल्या ज्ञानाचा व इंग्रजी-मराठी ज्ञानाचा फायदा सर्वांना देत. दैनंदिनी लिहिण्याबद्दल यांची प्रसिद्धि होती. जुन्या ब्राह्मणांचा कर्मठपणा व नवीनांची तडफ यांचें यांच्यांत सुंदर मिश्रण झालें होतें. त्यामुळें यांच्या वेळच्या प्रसिद्ध खटल्यांत, सार्वजनिक कार्यांत व मोठ्या व्यवहारांत यांचा साक्षात् किंवा परंपरेनें संबंध येत असे.

हे भोर संस्थानच्या फॉरेस्ट कमेटीचे सभासद होते (१८८५). तसेंच मुंबई कायदेमंडळाचे लोकनियुक्त सभासद होते (१९११). तसेंच इंग्लंडमध्यें गेले असतां यॉर्कशायरमधील लिकले येथें पहिली हिन्दी परिषद् यांनीं उघडली (१९१९). प्रॉव्हिन्शिअल पोस्टल अँड आर. एम्. एस. परिषदेचे अध्यक्ष (१९२८). वेस्टर्न इंडिया लाइफ अशुरन्स कंपनीच्या बोर्ड ऑफ डॉयरेक्टरचे चेअरमन व पुणें लॉ कॉलेजचे प्रोफेसर होते.

कौन्सिल ऑफ स्टेटचे निवडून आलेले हे सभासद होते (१९२३).

याशिवाय महाराष्ट्र साहित्यसंमेलन (१९०५ सातारा) वगैरे अनेक संस्थांचें अध्यक्षपद यांच्याकडे चालून येत असे. शेवटीं हे नागपूर येथें दिवंगत झाले. यांचे ग्रंथ—

१ केदारखंडयात्रावर्णन, २ लेटर्स फ्रॉम इंग्लंड (१९०८).

करंदीकर, विनायक जनार्दन— (जन्म स. १८७२–मृत्यु स. १९०९) कवि. जन्म धुळें येथें झाला. स्कूल फायनलपर्यंत शिक्षण तेथेंच झालें. पोलिसखात्यांत सुरुवात करून अनेक ठिकाणीं अनेक प्रकारची नोकरी केली. स्वभाव चंचल व फंदी होता. आयुष्याला स्थिरता नव्हती. मृत्यूच्या अगोदर तीन वर्षे हे नगरदेवळें येथील जहागीरदारांकडे कारभारी म्हणून काम पाहत असत. केशवसुत, टिळक व हे समकालीन असून परस्परांत गाढ स्नेह असे. अर्वाचीन कवितेला नवें वळण लावण्यांत यांचा मोठा भाग आहे. हे आधुनिक राष्ट्रीय व ऐतिहासिक कवितेचे जनक होत. यांच्यांत प्रेरक शक्ति होती. लोकांच्या अन्तःकरणांना यांनीं हालविलें. बाह्य कसरतीपेक्षां अन्तःकरण हलविण्याकडे यांचें लक्ष असे.

१ विनायकाची कविता (संग्राहक–द. अ. आपटे १९२०), २ प्रभावती नाटक (१८९२).

कर्झन, लॉर्ड— (जन्म १८५९–मृत्यु स. १९२५. कारकीर्द स. १८९९-१९०५)

हिंदुस्थानचे प्रसिद्ध व्हाइसरॉय व प्रसिद्ध राजकारणज्ञ. हिंदुस्थानांत व्हाइसरॉय म्हणून येण्यापूर्वी हे चार वेळां हिंदुस्थानांत येऊन गेले होते. त्यामुळें यांना हिंदुस्थानची बरीच माहिती होती. कट्टर कॉन्झर्व्हेटिव्ह म्हणून यांची फार ख्याति होती. तसे अत्यंत हुषार व तडफदार म्हणून यांना लोक ओळखत. हट्टी, तडफदार, कुशाग्र बुद्धीचे व साधकबाधक विचार करणारे म्हणून यांची प्रसिद्धि होती. अमुक खात्यावरून यांचा हात फिरला नाहीं असें त्या वेळीं एकहि खातें शिल्लक राहिलें नाहीं. डलहौसीनंतर हिंदुस्थानच्या कारकारावर यांचाच ठसा जास्त उठला आहे. येथें येण्यापूर्वी स. १८९१-९२ त यांनीं दुय्यम भारतमंत्र्याचें

काम केलें होतें. यांच्याइतका तरुण वयाचा व्हाइसरॉय अद्यापि कोणी आला नव्हता.

अफगाणिस्थानासंबंधीं यांनीं अलिप्तपणाचें पण स्नेहाचें धोरण स्वीकारलें. त्या वेळीं पूर्वीचा अमीर अबदुल रहमान वारला व त्याचा मुलगा हबीबुल्ला अमीर झाला. तेव्हां शिष्टमंडळ पाठवून यांनीं त्याच्याशीं नवा तह केला. त्या तहानें अफगाणिस्थानच्या अमिराच्या स्वतंत्र 'राजा' या दर्जाला मान्यता देण्यांत आली.

या तहानें इंग्रज व अफगाण यांच्यांत सलोखा निर्माण झाला. याच वेळीं सरहद्द प्रान्ताच्या रक्षणार्थ तेथील लोकांचेंच लष्कर उभारण्याचें यांनीं ठरविलें. त्यामुळें तेथील लोकांचें रक्षण चांगलें होईल अशी यांची समजूत होती. पंजाबमधील कांहीं जिल्हे व सरहद्दीवरील कांहीं प्रदेश यांचा एक स्वतंत्र प्रान्त बनवून त्याचा कारभार एका लेफ्टनंट गव्हर्नरकडे सोंपविण्याच्या कल्पनेला मूर्त स्वरूप देणारे हेच होत.

स. १९०१ मध्यें व्हिक्टोरिया राणी वयाच्या ८२ व्या वर्षी मृत्यु पावली व सातवे एडवर्ड गादीवर आले, तेव्हां यांनीं दिल्लीस मोठा दरबार भरविला (१९०३ जाने. १).

इराणच्या आखातांतहि इंग्रजांचें प्रस्थ माजविण्याचा यांनीं प्रयत्न केला. पण १९०३ मध्यें यांनीं इराणच्या आखाताकडे स्वतः दौरा काढला, व ठिकठिकाणीं ब्रिटिश व्यापार वाढवून तेथें ब्रिटिश अधिकारी नेमिले. त्यामुळें इराण व इराणचें आखात येथें इंग्रजांचें वर्चस्व कायम राहण्यास मोठी मदत झाली.

तिबेटी सरकार रशियाशीं गुप्त पत्रव्यवहार करून हिंदी व्यापारास आडकाठी आणूं लागलें. त्यामुळें यांनीं तिबेटवर स्वारी केली (१९०४). कर्नल यंगहजबंडनें तिबेटी लोकांचा पराभव केला. त्यानंतरच्या तहानें इंग्रजांस बऱ्याच व्यापारी सवलती मिळाल्या. परंतु त्याला रशिया व चीन यांनीं जोराचा विरोध केल्यानें ब्रिटिश प्रधानमंडळानें तो तह रद्द केला.

स. १९०० सालीं येथें मोठा दुष्काळ पडून दहा लाख लोक मेले व १९०४-५ सालीं प्लेगचा कहर होऊन सहा लाख लोक मृत्युमुखीं पडले. तेव्हां दुष्काळ व प्लेग-संबंधीं यांनीं कमिशनें नेमून चौकशी केली. दुष्काळाचें कारण जबर शेतसारा होय, असें मत रमेशचंद्र दत्त यांनीं दिलें. तेव्हां यांनीं पुढील व्यवस्था केली :

१ कालव्यांची वाढ, २ शेतकऱ्यांकरितां पतपेढ्या, ३ शेतकी कॉलेजें, ४ लांब मुदतीनें सारा वाढवावा, वाढ हप्त्यानें करावी व दरसाल आणेवारी करून सारा बसवावा असें ठरविलें. व ५ व्यापारी खातें निर्माण करून त्यावर स्वतंत्र अधिकारी नेमिला.

तसेंच यांनीं पुढील सुधारणा केल्या: १ हिंदी संस्थानांतील लोकांस लष्करी शिक्षण मिळावें म्हणून यांनीं राजकुमारपथकें निर्माण केलीं; व राजकुमारांस डेहराडूनच्या लष्करी कॉलेजांत शिक्षण मिळण्याची सोय केली. २ तसेंच यांनीं सरकारी उत्पन्नांत दरसाल भर पडूं लागलेली पाहून ५०० च्या ऐवजीं १००० रुपये उत्पन्नावर प्राप्तीवरील कर घेण्याचें ठरविलें. मिठावरील कर कमी केला व सोनें हें कायदेशीर चलन ठरविलें. ३ स. १९०४ मध्यें यांनीं पुराणवस्तूंच्या संरक्षणाचा कायदा पास केला. जुन्या ऐतिहासिक इमारतींची डागडुजी करण्याकरितां व ज्या इमारती जमिनींत पुरल्या गेल्या होत्या त्या उकरून काढण्याकरितां यांनीं "पुराणवस्तुसंशोधनखातें" स्थापन केलें. या खात्याचें काम फार समाधानकारक होत असून हिंदी कलाकुसरीचीं व संस्कृतीचीं स्मारकें रक्षिण्याकरितां तें खातें अहर्निश झटतें. या कार्याबद्दल यांचें नेहमीं अभिनंदन केलें जातें. ४ स. १९०४ सालीं यांनीं 'युनिव्हर्सिटी कमिशन' नेमिलें. त्याच्या शिफारशींप्रमाणें एक नवा कायदा पास करण्यांत आला. त्या कायद्यान्वयें विश्वविद्यालयांची सुधारणा करण्यांत आली. तसेंच दुय्यम खासगी शाळांच्या मान्यतेसंबंधीं कडक नियम करण्यांत आले. तसेंच त्यांची दरसाल तपासणी करण्याचें ठरलें. शिक्षणासंबंधीं यांचें हें धोरण लोकाना पसंत पडलें नाहीं.

बंगाल प्रांत फार मोठा असल्यानें त्याची फाळणी करून राज्यकारभाराच्या सोयीकरितां दोन प्रान्त करावे, असें ठरवून यांनीं त्याचे दोन भाग पाडले. आसाम, चितगांव व पूर्वबंगालमधील १५ जिल्हे असा एक भाग व बाकीचा दुसरा भाग करून त्यावर स्वतंत्र लेफ्टनंट गव्हर्नरची नेमणूक करण्यांत आली. या योजनेमुळें बंगाली लोक फार चिडले, पण यांनीं फाळणीचा बेत रद्द केला नाहीं. तेव्हां आपलें एकजीव झालेलें राष्ट्र विभागलें जातें म्हणून बंगालनें अणि त्याच्याकरितां सर्व हिंदुस्थाननें अभूतपूर्व चळवळ केली. खून-अत्याचारांना तर बंगालमध्यें ऊत आला. शेवटीं १९११ सालीं दिल्ली-दरबारांत फाळणी रद्द केल्याचें बादशहा पंचम जॉर्ज यांनीं जाहीर केलें. मात्र नव्या योजनेप्रमाणें पूर्वीच्या बंगालचे बिहार, ओरिसा, बंगाल व आसाम असे चार भाग आज झालेले आहेत.

हे १९०४ मध्यें थोडी रजा घेऊन इंग्लंडला गेले. पण व्हाइसरॉयच्या जागीं पुनः नेमणूक झाल्यानें हे त्याच वर्षीच्या डिसेंबरांत पुनः हिंदुस्थानांत आले. तेव्हां किचनेर हे सरसेनापति होते. त्यांचा व यांचा सरसेनापतीच्या दर्जासंबंधीं तंटा लागला. त्याचा निकाल ब्रिटिश प्रधानमंडळानें यांच्याविरुद्ध दिला. त्यामुळें यांनीं व्हाइसरॉयच्या जागेचा राजीनामा दिला. स. १९०५ मध्यें इंग्लंडचे युवराज हिंदुस्थानांत आले. त्यांच्या स्वागतानंतर हे इंग्लंडला परत गेले व यांच्या जागीं व्हाइसरॉय म्हणून लॉर्ड मिंटो आले.

पहिल्या महायुद्धाचे वेळीं यांनीं इंग्लंडच्या प्रधानमंडळांत प्रवेश केला. तसेंच युद्धानंतरहि परराष्ट्रीय मंत्र्याचें काम यांनीं मोठ्या तडफदारीनें केलें.

हिंदुस्थानांतील प्रागतिकांच्या सनदशीर राजकारणाचा पायाच उखडून टाकण्याचें काम यांनीं केलें. आजपर्यंत राणीचा जाहीरनामा व ब्रिटिश मुत्सद्यांचीं वचनें हीं प्रागतिक राजकारणाचा पाया समजण्यांत येत; पण यांनीं राणीचा जाहीरनामा म्हणजे कांहीं राजा व प्रजा यांमध्यें झालेला कायदेशीर करार नव्हे, हें अगदीं स्पष्टपणें सांगितलें.

तसेंच हिंदी लोक कितीहि शिकले तरी इंग्रिलश नोकरशाहीच्या अंगीं जी कार्यक्षमता आहे ती हिंदी सुशिक्षितांच्या अंगीं कधींच येणें शक्य नसल्यानें देशांतील सर्व वरिष्ठ अधिकार नेहमींच इंग्रजांच्या हातीं ठेविले पाहिजेत, असें यांचें मत होतें व तें ते उघडपणें बोलून दाखवीत.

यांनीं राजसत्ता हातीं घेतल्यापासून बहुतेक ठिकाणीं सरकारी बहुमत वाढविण्याचा प्रयत्न केला व चढाओढीच्या परीक्षांचें धोरण सोडून सरकारनियुक्ततेचें धोरण स्वीकारलें व सर्व राज्यकारभार अनियंत्रित व एकतंत्री करण्याचा प्रयत्न केला.

या प्रकारच्या यांच्या कारकीर्दीमुळें केसरीनें आपल्या अग्रलेखांत औरंगजेब बादशहाशीं यांची तुलता केली, आणि ना. गोखले यांनीं आपल्या शास्त्रशुद्ध भाषणानें बनारस काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून यांच्या कारकीर्दीची छाननी करून यांच्या अप्रिय व अहितकारक धोरणाची उत्तम स्पष्टता केली (१९०५).

कर्वे, डॉ. सौ. इरावतीबाई—(जन्म स. १९०५). मानववंशशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञ. जन्म- मिंज्यान (ब्रह्मदेश) येथें झाला. माहेरचें नांव करमरकर. स. १९२८ सालीं यांनीं एम्. ए. करितां चित्पावन कोंकणस्थ-ब्राह्मणसमाजशास्त्रविषयक निबंध लिहिला. बर्लिनच्या पीएच्. डी. झाल्या (१९३०). त्याकरितां यांच्या संशोधनात्मक निबंधाचा विषय- 'मनुष्याच्या डोक्याच्या कवटीची नेहमींची असमप्रमाणता' हा होता. मानववंशशास्त्र, प्राणिशास्त्र, संस्कृत व तत्त्वज्ञान या विषयांचा यांचा अभ्यास आहे. पुढें डॉ. दिनकर धोंडो कर्वे यांच्याशीं यांचा विवाह झाला (१९२६). नंतर या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी भारतवर्षीय महिला विद्यापीठाच्या रजिस्ट्रार झाल्या (१९३१). तेथें अनाथ बालिकाश्रमाच्या आजन्म सेविकेच्या जागेचा राजिनामा देऊन १९३९ पासून या डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूटमध्यें समाजशास्त्राच्या अध्यापक (रीडर) आहेत. "नातेंवाचक शब्द व त्यांचा समाजशास्त्रदृष्ट्या अभ्यास", "महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातींची समाजशास्त्र दृष्ट्या पहाणी", "जातींतील स्त्रीपुरुषांचें शरीरमापन व रक्तसमूहाचें परीक्षण", "ग्रामनामांचा समाजशास्त्रदृष्ट्या अभ्यास" इत्यादि विषयांवर यांचें संशोधन चालू असून निरनिराळ्या तद्विषयक नियतकालिकांत त्यांचे संशोधनात्मक निबंध प्रसिद्ध झालेले आहेत.

कर्वे, धोंडो केशव—(जन्म स. १८५८) विधवाविवाह व स्त्रीशिक्षण यांचे पुरस्कर्ते. स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते म्हणून यांची कीर्ति जगांत झाली आहे.

यांचें प्राथमिक शिक्षण व इंग्रजी चार इयत्तांचें शिक्षण कोंकणांत मुरूड येथें झालें. पांचव्या इयत्तेपासून मुंबईस आले. एल्फिन्स्टनमधून बी. ए. झाले (१८८४). गणिताच्या शिकवण्यांवर दिवस चालू असतां फर्ग्युसन कॉलेज, पुणें, येथें प्रोफेसर झाले (१८९१-१९१४). आजीव सभासद झाल्यावर दुसऱ्याच वर्षी यांचा पुनर्विवाह झाला (१८९३). तेव्हांपासून प्रत्यक्ष स्त्रीविषयक कामाला यांनीं सुरुवात केली. अनाथ बालिकाश्रम ही विधवांच्याकरितां संस्था स्थापन केली (१८९६) व तिची प्रगति व स्थित्यन्तरें होत हिंगणें येथें एक छोटेंसें विद्याभुवनच निर्माण झालें. 'अखिल-भारतीय महिलाविश्वविद्यापीठ' ही यांची सर्वश्रेष्ठ कामगिरी होय (स्थापना स. १९१६). ती संस्था चांगली चालू लागल्यानंतर यांनीं खेडेगांवांत प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून घरोघर हिंडून हे फंड उभारतात व प्राथमिक शाळा चालवितात (सुरुवात स. १९३६).

आतां अगदीं नवी समतासंघाची चळवळ यांनीं हातीं घेतली आहे (स्थापना स. १९४४).

यांनीं आपलें आत्मवृत्त प्रसिद्ध केलें आहे तें वाचलें असतां यांचा प्रांजळपणा, एकमार्गीपणा, कळकळ व कार्यैकतत्परता चांगली कळून येते. प्रथम लोकांच्या विरोधांतून यांना मार्ग काढावा लागला. पण यांच्या चिकाटीनें व कार्यैकदृष्टीनें हे यशस्वीपणें आपला कार्यभाग पार पाडून देशाची सेवा करूं शकले. आतां यांचें स्त्रीशिक्षणाचें कार्य सरकारमान्यहि झालें आहे.

यांच्या कार्याची किंवा कार्यकर्तृत्वाची ज्याला माहिती नाहीं, असा सुशिक्षित मनुष्य महाराष्ट्रांतच काय, पण हिंदुस्थानांत क्वचित्च सांपडेल. यांच्या आश्रमांत वाढलेल्या आणि विद्यालयांत शिकलेल्या महाराष्ट्राच्या शेंकडों स्वावलंबी कन्यांनीं, आपल्या या आवडत्या अण्णांचें नांव आपल्याबरोबर घरोघर नेलें आहे. ' अनाथ बालिकाश्रम ', 'कन्याशाळा', ' महिलाविद्यालय ', ' निष्काम-कर्ममठ ', ' समता-संघ ' व या सर्वांना शेखरीभूत असलेलें ' भारतीय महिलाविद्यापीठ ' या यांनीं गेल्या चाळीस वर्षांत काढलेल्या संस्था, यांच्या कर्तृत्वाचें स्मरण देत, आज लोकांच्या डोळ्यांसमोर उभ्या आहेत. अणुमात्र बीजांतून असंख्य पक्षीकुलांना आश्रय देणाऱ्या भव्य वटवृक्षाचा विस्तार व्हावा व त्या वृक्षाचे पारंब्यांपासून पुढें अनेक वृक्ष निर्माण व्हावेत, त्याप्रमाणें सुमारें ५० वर्षांपूर्वी फक्त चारपांचच विधवा व कुमारिका मुलींनिशीं हिंगण्याच्या ओसाड माळावर स्थापन केलेल्या अनाथ बालिकाश्रमांतून उत्क्रान्त झालेल्या यांच्या या अनेक संस्थांचा इतिहास आहे.

हा सर्व इतिहास यांनीं आपल्या ' आत्मवृत्तां 'त प्रसिद्ध केला असून या आत्मावृत्ताची द्वितीयावृत्ति यांच्या ज्युबिलीचे वेळीं प्रसिद्ध करण्यांत आली आहे. महापुरुषांचीं चरित्रें हीं केव्हांहि स्फूर्तिदायकच असतात. परंतु, ज्यांच्या कर्तृत्वानें पुराणमताभिमानी समाजाचें विचारांत परिवर्तन घडून आलें आहे, अशा महापुरुषानें आपल्या जीवितकार्याच्या स्वतः केलेल्या वर्णनांहून अधिक स्फूर्तिदायक कांहींच असणें शक्य नाहीं (१९२८).

अबलोन्नतीच्या कार्याच्या कोणत्याहि अंगाची उपेक्षा यांनीं कधींहि केली नाहीं. स्वावलंबनक्षमतेला व्यावहारिक तसेंच बौद्धिक स्वरूप असतें. हिंदु स्त्रीला जसें कुटुंबांत, तसेंच समाजांत आणि जगतांतहि स्वतःचें स्वतंत्र असें स्थान व कार्यक्षेत्र आहे, स्त्री ही पुरुषाप्रमाणेंच समाजाचा स्वतंत्र व कार्यक्षम घटक असणें शक्य आहे, ही भावना-ही आत्मप्रत्ययाची जाणीव यांच्या संस्थांनीं महिलावर्गांत उत्पन्न केली, व यांतच यांच्या सर्व कार्याची थोरवी सांठवली आहे. व्यक्ति किंवा संस्था या केव्हांहि नश्वरच असतात. महत्त्व असतें तें त्यांनीं उत्पन्न केलेल्या विचारपरंपरेला. या दृष्टीनें यांनीं अबलोन्नतीचे क्षेत्रांत मिळवलेल्या यशापेक्षांहि केलेलें कार्य अधिक महत्त्वाचें आहे. या दृष्टीनें यांच्या महिलाविद्यापीठाकडे पाहावयास पाहिजे. १९१९ ते २७ या काळांत महिलाविद्यापीठांतून बाहेर पडलेल्या अठ्ठावीस तरुणींपैकीं तेवीस स्त्रिया शिक्षणाचे क्षेत्रांत प्रायः स्वावलंबनाचे तत्त्वावर लोककार्य करीत आहेत. याचे उलट मुंबई विश्वविद्यालयांतून बाहेर पडलेल्या ४१ पदवीधारिकांपैकीं फक्त वीसच हें कार्य व तेंहि सरकारी शाळांतून पार पाडण्यास समर्थ ठरल्या आहेत.

यांच्या कार्याचें वैशिष्ट्य सांगण्यास हे आंकडेच समर्थ आहेत. स्त्रियांना केवळ व्यावहारिक दृष्टीनें साक्षर व स्वावलंबनक्षम करणें एवढेंच जर यांचें ध्येय असतें, तर यांनीं ' अनाथ बालिकाश्रम ' व ' महिलाविद्यालय ' या दोन संस्थांवर समाधान मानलें असतें. परंतु या स्वावलंबनक्षमतेला मान्यतेची असणारी आवश्यकता पटल्यामुळें यांनीं आपल्या अबलोन्नतीच्या कार्याची परिसीमा राष्ट्रीय महिलाविद्यापीठांत केली. या सर्वांची एका पाठोपाठ झालेली स्थापना हा कांहीं योगायोग नाहीं. यांच्या कार्याची उत्क्रांति व परिणति या संस्थांच्या विकासांत व्यक्त झाली आहे.

सेवासदन व यांनीं काढलेल्या संस्था, स्त्रीशिक्षणाचे चळवळींत महाराष्ट्रानें मिळविलेलें केवळ अपूर्व यशच नव्हे, तर त्या चळवळीची परिणतावस्था दाखवतात. परतंत्र व गरीब महाराष्ट्र इतर बाबतींत जरी मागासलेला असला तरी स्त्रीशिक्षणाचेबाबत हिंदुस्थानांतील सर्व इतर प्रान्तांच्या पुढें आहेच; शिवाय तो इतर सर्व प्रगमनशील राष्ट्रांचे इतकाच पुढारलेला आहे हें या संस्थांनीं सिद्ध करून दिलें आहे.

कर्वे, प्रा. रघुनाथ धोंडो—(जन्म स. १८८२) महाराष्ट्रांतील संततिनियमनाच्या चळवळीचे जनक.

प्रा. धों. के. कर्वे यांचा हा पहिल्या बायकोपासून झालेला एकटाच मुलगा. अतिशय उज्ज्वल तऱ्हेनें बी. ए. पास झाल्यानंतर गणित शिकण्याकरितां फर्लो घेऊन हे पॅरिसला रवाना झाले. त्या ठिकाणीं पॅरिस युनिव्हर्सिटीचा

'दिप्लोम दे सुदस्युपेरिअर' हा डिप्लोमा घेऊन हे परतले (१९२०).

यानंतर अहमदाबादचें गुजराथ कॉलेज, मुंबईचें विल्सन कॉलेज वगैरे ठिकाणीं यांनीं गणिताच्या प्राध्यापकाचें काम केलें. परंतु यांचें संततिनियमन व स्वाभिमानी स्वभाव यांमुळें हे कोठेंहि कायम राहूं शकले नाहींत. मोत्याचे सुप्रसिद्ध व्यापारी, व्हिक्टर रोझेन्थॉल यांचेहि हे कांहीं दिवस सेक्रेटरी होते (१९२६).

परंतु या धकाधकीच्या मामल्यांत संततिनियमनाचा प्रचार यांनीं कधींहि थांबविला नाहीं. यांनीं या कार्यास 'संतति-नियमन' व 'गुप्त रोगांपासून बचाव' हीं दोन पुस्तकें लिहून सुरुवात केली (१९२१). सामाजिक विचारांचा आधुनिक ज्ञानाच्या व बुद्धिप्रामाण्याचे दृष्टीनें विचार करून लोकशिक्षण देण्याचे हेतूनें यांनीं 'समाज-स्वास्थ्य' मासिक सुरू केलें (१९२७). याकरितां आर्थिक नुकसान सोसलें, लोकांच्या शिव्या खाल्ल्या, अश्लीलतेच्या कायद्याखालीं होणारे अनेक खटले सोसले, परंतु आपलें हें कार्य यांनीं सोडलें नाहीं.

भूमितींतील कृतीसंबंधींहि शाळेकरितां व कॉलेजकरितां यांनीं पुस्तकें लिहिलीं आहेत. रॅशनॅलिस्ट असोसिएशन ऑफ इंडियाच्या 'रीझन' या पत्राचेहि हे कित्येक दिवस संपादक होते. आधुनिक कामशास्त्र, आधुनिक आहारशास्त्र, त्वचेची निगा, वेश्याव्यवसाय वगैरे यांचीं पुस्तकेंहि प्रसिद्ध आहेत.

कऱ्हाडकर, महामहोपाध्याय गोपाळाचार्य अण्णा घळसाशी—(जन्म स. १८१७–मृत्यु स. १८९७) सुप्रसिद्ध संस्कृत पंडित व वैय्याकरण.

नारायणाचार्य–वासुदेवाचार्य–नारायणाचार्य–गोपाळाचार्य असा यांचा वंश आहे. यांना सखारामाचार्य व वासुदेवाचार्य असे दोन पुत्र होते. सध्यां यांचे वंशज ग्वाल्हेर येथें आहेत.

हे सात वर्षांचे असतांच यांचे वडील ब्रह्मावर्त येथें श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे बरोबर असतां वारले. नंतर आजोबा वासुदेवाचार्य यांनीं यांची मुंज केली व यांना काशीस चिंतामणशास्त्र्यांचे शिष्य गोविंदाचार्य नृसिंहाचार्य अष्टपुत्रे यांचेपाशीं अध्ययनाकरितां ठेविलें. तेथें यांनीं व्याकरणाचें महाभाष्यान्त अध्ययन केलें.

पुणें येथील विश्रामबाग पाठशाळेवर प्रथम गोविंदाचार्य अष्टपुत्रे हे प्रधानाध्यापक होते. नंतर त्यांचे शिष्य धोंडशास्त्री डेग्वेकर प्रधानाध्यापक व हे उपप्रधानाध्यापक नेमले गेले. नंतर हेहि प्रधानाध्यापक झाले. त्या वेळचे पंडित त्र्यंबकशास्त्री शाळिग्राम, मोरशास्त्री साठे, राघवाचार्य रामानुज, राघवेंद्राचार्य गजेन्द्रगडकर, कृष्णाचार्य पंढरपुरकर व गोपीनाथदादा आगाशे वगैरे होते. त्या मंडळींत यांची विशेष चहा असे (१८५६).

याच सुमारास विश्रामबाग पाठशाळेंत हे पाठ सांगत असतां एक परधर्मी अधिकारी आला. यांनीं पाठ बंद ठेविला. पण पुढें सहानुभूति ठेवणारे अधिकारी येतीलच आणि अनधिकारी लोकांना पाठ सांगण्याचा प्रसंग येणारच नाहीं अशी खात्री नसल्यानें यांनीं नोकरीचें त्यागपत्र देऊन देशान्तर करण्याचें ठरविलें, आणि तीर्थयात्रा करीत हे लष्कर ग्वाल्हेर येथें आले. तेथें राघवेन्द्राचार्यांचे पुत्र रामाचार्य यांनीं श्रीमंत बायजाबाई शिंदे सरकार यांच्यातर्फे यांना तेथें कायम राहून घेतलें.

तेथें यांचें अध्ययन-अध्यापनाचें कार्य चालू झालें. तेथें असतां यांनीं सगोत्रविवाहाच्या विरुद्ध निर्णय दिला (१८५९). नंतर पुण्यास श्रीशंकराचार्य पीठ संकेश्वर व करवीर यांच्या नेतृत्वाखालीं यांना सरपंच नेमून पुनर्विवाहविषयक वाद झाला. आणि पुनर्विवाह अशास्त्र आहे, असा निर्णय झाला (१८७०). याच विषयावर पुनः मद्रास येथें वाद झाला. तेथें श्रीजगद्गुरु मध्वाचार्य सत्यवीरतीर्थ हे प्रमुख होते. दिवाणबहादूर आर. रघुनाथराव वगैरे मंडळी प्रतिपक्षी होती. तेथेंहि यांनाच सरपंचाचा मान देण्यांत आला. निर्णयहि वरच्याप्रमाणेंच झाला (१८८४). नंतर यांना ब्रिटिश सरकारकडून 'महामहोपाध्याय' ही पदवी मिळाली. यानंतर यांनीं पुनः एकदां दक्षिणयात्रा मोठ्या समारंभानें केली. सिंहस्थांतील गोदायात्रा नाशिक येथें करावी, असा यांनीं निर्णय केला. पुढें ग्वाल्हेरीस गेले तेथें यांनीं विलायतेस गेलेल्या ब्राह्मणास प्रायश्चित्त नसल्याचा निर्णय दिला.

यांचा आचारावर मोठा कटाक्ष होता. अनधिकाऱ्याला विद्या देऊं नये, असा यांचा कटाक्ष असे.

यांचे प्रमुख शिष्य—१ सखारामाचार्य (पुत्र), २ वासुदेवाचार्य (पुत्र), ३ शुकाचार्य वासु. (नातू), ४ नारायणाचार्य वासु. (नातू), ५ वासुदेवाचार्य सखा. (नातू), ६ शंकरशास्त्री डेग्वेकर (पंढरपूर), ७ भिकाचार्य ऐनापुरे, ८ कांताचार्य पंडितराव (कोल्हापूर), ९ भालचंद्रशास्त्री गोळवलकर (लष्कर), १० व्यंकटरमणाचार्य शिरहट्टी (सांगली-व्याकरण शालाध्यापक),

११ पुरुषोत्तमशास्त्री साठे (कानपूर), १२ नंदकिशोर-भट्ट आशुकवि (नाथद्वारवल्लभाचार्य मठाचे विद्याधिकारी), १३ बलभद्रशास्त्री (मुंबई), १४ वामनाचार्य क्षीरसागर (सद्धर्म-संपादक), १५ दत्तात्रेयशास्त्री निगुडकर (राजापूर संस्कृतपाठशालाध्यापक), १६ बाळशास्त्री साने (देवरुख), १७ लक्ष्मण रघुनाथशास्त्री जोशी (देवगड).

यांचे ग्रंथः—१ शेखरभूषण, २ भागवतभूषण, ३ कुलदेवताभूषण, ४ विठ्ठलभूषण, ५ राधाकृष्णभूषण, ६ श्रीवेंकटेशसहस्रनामभूषण इत्यादि बारा भूषणें व सदाचारचंद्रिका (यांत श्रावणी, श्राद्ध, संध्या, ब्रह्मयज्ञ वगैरे) असे ग्रंथ संस्कृतमध्यें केले. त्यांपैकीं कांहीं मुद्रित व कांहीं अमुद्रित आहेत (र. कृ. पाटणकर).

कवडे, कृष्णशास्त्री— (जन्म स. १८८३)

सुप्रसिद्ध वैद्य व सार्वजनिक कार्यकर्ते. यांचा जन्म जुन्नर तालुक्यांतील पिंपरी गांवीं झाला. यांचें शिक्षण पुण्यांतच होऊन हे बी. ए. झाले आणि पुणें भावेस्कूल-मध्यें शिक्षकाचें काम करूं लागले. स. १९०५ सालच्या स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीपासून हे स्वदेशीचे निस्सीम भक्त आणि लो. टिळकांचे कट्टे अनुयायी बनले. स. १९०८ सालीं टिळकांच्यावर झालेल्या खटल्याच्या हकीगतीचें पुस्तक यांनीं प्रसिद्ध केलें. त्या वेळच्या दडपशाहीच्या काळांत तें साधें पुस्तकहि सरकारच्या डोळ्यांवर आलें. तें पुस्तक तर जप्त झालेंच, शिवाय यांना भावेस्कूलमधील नोकरी सोडणें भाग पडलें. त्यानंतर कांहीं वर्षे हे लोकमान्य टिळकांच्या चिरंजीवांचे खासगी शिक्षक म्हणून काम करीत असत. राजकीय वातावरणांत अनेक स्थित्यन्तरें झालीं तरी अविचलितपणें टिळकांच्या तत्त्वांचा अभिमान धरणारीं यांच्यासारखीं माणसें विरळा.

याच वेळीं यांनीं स्वतंत्र धंद्याची तयारी म्हणून वैद्यकीचा अभ्यास बाळशास्त्री लागवणकर आणि सदाशिव-शास्त्री भावे वैद्य यांचेपाशीं केला. अण्णासाहेब पटवर्धनांच्यापासूनहि यांनीं कांहीं धडे घेतले होते. स. १९११ सालीं यांनीं झंडु फार्मसीची एजन्सी घेतली आणि स्वतंत्रपणें वैद्यकीचा व्यवसाय सुरू केला.

हे जबर मेहनती, इंग्रजी, मराठी व संस्कृत भाषांचें उत्तम लेखन, वाचन व भाषण करण्यासारखें चांगलें ज्ञान असलेले, सार्वजनिक कार्य करण्याची नैसर्गिक आवड व चिकित्सक बुद्धि यांमुळें यांचें वैद्यकीच्या धंद्याचें बस्तान चांगलेंच बसलें. शिवाय हे अनेक कार्यांत आघाडीवर चमकूं लागले. स. १९१४ सालीं मथुरा निखिल-भारतीय वैद्यक संमेलनांत यांना 'वैद्य-पंचानन' ही मानाची पदवी देण्यांत आली. आणि यांच्या कामसू स्वभावामुळें स. १९१६ सालीं पुणें येथें भरलेल्या नि. भा. वैद्यक संमेलनाची जबाबदारी यांच्यावर टाकण्यांत आली. आणि कोचीनचे महाराज श्रीरामवर्मा यांच्या अध्यक्षतेखालीं तें संमेलन अत्यंत यशस्वी करून यांनीं भारतीय कीर्ति प्राप्त केली. आणि यांना राजमहेंद्री येथें भरलेल्या नि. भा. वैद्यक संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान देण्यांत आला (१९२२). त्यानंतर नि. भा. वै. संमेलनाचे प्रधानमंत्री व परीक्षक म्हणून अनेक वर्षे काम करून आयुर्वेदाच्या सेवकांतील आपलें प्रमुख स्थान यांनीं पुष्कळ वर्षे सतत टिकविलें.

गणेशोत्सव-मंडळ, पुणें नगरपालिका, सार्वजनिक सभा, वेदशास्त्रोत्तेजक सभा, वर्णाश्रम-स्वराज्य-संघ, स्वराज्य-पक्ष वगैरे विविध चळवळींत व संस्थांत यांचा प्रामुख्यानें भाग असे. पुष्कळ वर्षे यांच्या दवाखान्यांत पुण्यांतील विविध चळवळींचें केन्द्र असावयाचें. गांवांतील गेल्या पिढींतील प्रमुख पुढाऱ्यांची बैठक यांच्या दवाखान्यांत असावयाची. त्यामुळें कांहीं वर्षे यांचा दवाखाना म्हणजे पुण्यांतील पुढाऱ्यांचें संमेलनस्थान व विविध चळवळींचें उगमस्थान होऊन राहिलें होतें. या सर्व व्यापाचा परिणाम या कष्टाळू व भावनाप्रधान माणसाच्या शरीरावर व धंद्यावरहि झाला.

या सर्व खटाटोपांत यांच्या आयुर्वेदीय कार्यासच केव्हांहि प्राधान्य द्यावें लागेल. पुणें नगरपालिकेंतील आयुर्वेदीय दवाखाना १९१२ च्या रेजिस्ट्रेशन कायद्यानें बंद होण्याचा प्रसंग आला होता, पण तो पुनः सुरू करण्याची यशस्वी खटपट यांनींच केली आणि त्याची आधींच असलेली लोकप्रियता कै. बाळशास्त्री लागवणकर यांच्या प्रयत्नानें रोजीं ४।५ शें रोगी येण्याइतपत वाढली व पुण्याबाहेरहि असे दवाखाने निघून चालूं लागले.

कै. शंकर दाजीशास्त्री पदे यांच्या खटपटीनें नि. भा. आयुर्वेद-महामंडळ सुरू झालें व ती संस्था नांवारूपाला आणून तिच्यामार्फत आयुर्वेदविद्यापीठ सुरू करून त्याद्वारा आयुर्वेदाचा अभ्यासक्रम तयार करणें, परीक्षा घेणें व तेथील पदवीधरांस लोकमान्यता मिळवून देणें इत्यादि आयुर्वेदाच्या उत्कर्षाला कारण होणाऱ्या गोष्टी प्रामुख्यानें करणाऱ्या वैद्यांत हे एक प्रमुख आहेत.

काश्मीरपासून कोलंबोपर्यंत व कच्छकाठेवाडापासून कलकत्त्यापर्यंतच्या बहुतेक वैद्यसंमेलनांना हे उपस्थित होते. हे उपस्थित असले म्हणजे ठराव, त्यांची भाषा, मान्यता व पुढील संस्कार पार पाडण्यास यांच्याशिवाय कोण पुढें होणार? हीं सर्व कामें यांनीं अत्यंत निरलसपणें करून यांनीं आपलें स्थान अढळ केलें. त्यामुळेंच म्हैसूर संमेलनापासून अहमदाबाद संमेलनापर्यंत पांच वर्षें आयुर्वेद-महामंडळ व आ. विद्यापीठ यांच्या कचेऱ्या पुण्यास ठेवून त्यांचें काम यांच्याकडे सोंपविण्यांत आलें. स. १९१८ सालीं इन्फ्लुएंझाच्या सांथींत यांनीं पुणें नगरपालिकेमार्फत आयुर्वेदीय व्रणालय काढून तें यशस्वी रीतीनें चालवून दाखविलें.

स. १९२० नंतर राष्ट्रीय शिक्षण-संस्था काढण्याची दुसरी लाट उसळली. तेव्हां यांनीं आयुर्वेद-शिक्षणप्रधान संस्था स्थापण्याची खटपट करून टिळक महाविद्यालय स्थापण्यांत भाग घेतला. शेवटीं त्याला व्रणालय जोडण्याची व्यवस्था केली. कै. नानलशास्त्री यांना यांचें सहकार्य असे. पुढें शुद्ध आयुर्वेदाचा वाद निघून हे कै. अप्पाशास्त्री साठ्यांच्या पक्षाला गेले व कै. नानल वगैरे मंडळी मिश्र-आयुर्वेद-पक्षांत गेली. मुंबई प्रान्तिक शुद्ध आयुर्वेद-संमेलन मुंबईस भरलें त्याचे हे अध्यक्ष होते. शिवाय अष्टांग-आयुर्वेद-विद्यालय, मराठी वैद्यकवर्ग व खासगी विद्यार्थी शिकविण्याचें यांचें काम सतत चालू असेच.

वैद्यक-पत्रिका संपादक, शिरोधमनीवाद, क्लोमावरील संस्कृत निबंध, कांहीं औषधविषयक पुस्तकें असें लेखनकार्यहि यांनीं केलेलें आहे. यांचा साठीचा समारंभ वै. यादवजी त्रिकमजी आचार्य यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. आतां सरकारी आयुर्वेद बोर्डांत हे निवडून आले आहेत.

कँडी, मेजर टॉमस—(जन्म स. १८०५–मृत्यु स. १८७७) मराठीचे कोशकार, शालेय पुस्तकांचे कर्ते व कायद्याच्या पुस्तकांचे भाषान्तरकार.

हे प्रथम हिंदुस्थानांत आले ते ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी म्हणून (१८२२). स. १८३१ पासून यांनीं शिक्षणखात्यांत कामें केलीं. कॅप्टन मोलस्वर्थच्या मराठी-इंग्लिश कोशास यांनीं बरीच मदत केली होती. कॅप्टनसाहेबांच्या विलायतच्या प्रयाणामुळें अपूर्ण राहिलेला तो ग्रंथ यांनीं पूर्ण केला (१८४०–४७). या ग्रंथाची सुधारलेली आवृत्ति यांनीं पुन्हां एकदां काढली होती (१८७३). हे कांहीं वर्षें पूना कॉलेजमध्यें पहिले प्रिन्सिपाल (१८५१–५७) व डेक्कन कॉलेजमध्यें (१८६७) प्राध्यापक होते. माजी मराठी क्रमिक पुस्तकें, इंडियन पिनल कोड, सिव्हिल नि क्रिमिनल प्रोसिजर कोड यांचीं मराठी भाषांतरें यांनींच केलेलीं आहेत. शेवटीं कांहीं दिवस हे मराठी ट्रान्सलेटरहि होते.

कंबळी, सर सिद्धप्पा तोटप्पा—(जन्म स. १८८२) कर्नाटकांतील प्रसिद्ध लिंगायत व ब्राह्मणेतर पुढारी.

हे सरकारनियुक्त मंत्रिमंडळांत (१९३०–३७) व कूपर मंत्रिमंडळांत शेतकी व शिक्षण खात्याचे मंत्री होते. यांचें शिक्षण डेक्कन व फर्ग्युसन कॉलेजमध्यें झालें. एल्एल्. बी. झाल्यानंतर १९०६ ते ३० पर्यंत यांनीं धारवाडच्या कोर्टांत वकिली केली. १९२२ ते ३० पर्यंत हे हुबळी म्युनिसिपल बरोचे नॉन–ऑफिशिअल अध्यक्ष होते. १९२९–३० सालीं हे धारवाड डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. १९२० सालीं यांनीं पहिली ब्राह्मणेतर-परिषद् भरविली. १९२० पासून मुंबई कायदे-मंडळाचे हे सभासद आहेत. १९२७ ते ३० पर्यंत हे मुंबई कायदे-मंडळाचे डेप्युटी प्रेसिडेंट होते.

हे पहिल्या कर्नाटक एकीकरण परिषद् (बेळगांव), महाराष्ट्र युनिव्हर्सिटी स्थापनेच्या विचाराकरितां भरलेल्या आमंत्रित शिक्षण तज्ज्ञ परिषदेचे शिक्षणमंत्री म्हणून (१९३३ जुलै, पुणें) अ. भा. वीरशैव परिषद् (१९२७ बंगलोर, १९३६ रायचूर) वगैरे ठिकाणीं हे अध्यक्ष व कानडी साहित्य-संमेलन उद्घाटक (१९३३ हुबळी, १९३६ रायचूर) होते. तसेंच राउंट टेबल कान्फरन्सचेंहि यांना निमंत्रण होतें पण हे जाऊं शकले नाहींत. यांना सरकारनें 'सर' ही पदवी दिली (१९३७).

कॉटन, सर हेन्री जॉन स्टेडमन—(जन्म स. १८४५–मृत्यु स. १९१७ नंतर)

हे अँग्लो-इंडियन अधिकारी असून राष्ट्रीय सभेचे अध्यक्षहि होते. यांचा जन्म तंजावर जिल्ह्यांतील कुंभकोण या गांवीं झाला. यांचें इंग्लंडमध्यें शिक्षण झाल्यावर बंगाल प्रांतांत यांची नेमणूक झाली. पुढें हे बंगाल सरकारचे मुख्य चिटणीस (१८९१) व पुढें हिंदुस्थान-सरकारचे गृहमंत्री झाले (१८९६). नंतर आसामचे चीफ कमिशनर म्हणजे लेफ्टनंट गव्हर्नर म्हणून यांची नेमणूक झाली. हें काम सहा वर्षें केल्यानंतर हे सेवा-

निवृत्त झाले. आणि यांना के. सी. एस्. आय्. या पदवीनें भूषविण्यांत आलें (१९०२).

हे नोकरींत असतांनाच यांनीं 'न्यू इंडिया' नांवाचें पुस्तक लिहिलें होतें (१८८७). त्याची यांनीं यांची राष्ट्रीय सभेच्या मुंबईच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून निवडणूक होण्याच्या सुमारास दुसरी आवृत्ति काढली. त्यांत यांनीं अमेरिकेंतल्याप्रमाणें हिंदुस्थानांत संयुक्त लोकसत्ताक राज्य स्थापण्याच्या योजनेचा पुरस्कार केला होता. शिवाय इंग्लंडांत राष्ट्रसभेच्या वतीनें निघणाऱ्या 'इंडिया' पत्राच्या संपादकाचें कामहि हे करीत होते. बंगालमध्यें अधिकारी म्हणून असतां यांनीं बंगाल फाळणीस विरोध केला होता. तसेंच हिंदुस्थानांतील ब्रिटिशांचें राज्य तलवारीच्या जोरावर टिकलें नसून लोक तें चालू देतात म्हणूनच चालूं शकतें असें हे लिहीत व बोलत.

वरील प्रकारच्या यांच्या पूर्वपरंपरेमुळेंच यांना राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष करावें, अशा सूचना इंग्लंडहून येऊं लागल्या आणि यांनाहि इंग्लंडमध्यें पार्लमेंटच्या निवडणुकीस उभें राहावयाचें होतें त्या दृष्टीनें त्या सोयीच्या होत्या. अधिकारारूढ पक्षांच्या विशिष्ट भूमिकेवरून हिंदुस्थानास कांहीं फायदा होईल अशा त्या वेळच्या कल्पना असत. त्याप्रमाणें यांना स. १९०४ च्या मुंबईस झालेल्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. आणि पार्लमेंटमध्येंहि लिबरल पक्षातर्फे निवडणुकींत यश मिळवून यांचा प्रवेश झाला. दादाभाई नवरोजी व हे पार्लमेंटांत आपल्या पद्धतीप्रमाणें काम करीत असत.

हे लोकांचे हितकर्ते होते, तसेच ब्रिटिश सरकारचेहि हितकर्ते होते. लोकांच्या भावनांना योग्य वळण लावून असंतोष उत्पन्न न होतां ब्रिटिश राज्य कसें दीर्घकाळ टिकेल हेंच यांच्या सहानुभूतीचें सूत्र होतें. यांचा 'होम अँड इंडियन मेमरीज्' (१९११) हा ग्रंथहि यांच्या विचारसरणीवर व हिंदुस्थानच्या परिस्थितीवर प्रकाश पाडणारा आहे. ह्यूम, वेडरबर्न यांचीं चरित्रेंहि या दृष्टीनें अभ्यासण्यासारखीं आहेत.

काणे, महामहोपाध्याय पांडुरंग वामन— (जन्म स. १८८०) संस्कृत भाषा व हिंदुधर्मशास्त्र यांचे सुप्रसिद्ध अभ्यासक, चिकित्सक व लेखक.

हे रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोलीचे राहणारे व तेथेंच यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण झालें. नंतर विल्सन कॉलेज मुंबई येथून हे एम्. ए. झाले व यांना 'झाला वेदान्त प्राइज' मिळालें. निबंधाबद्दल यांना दोनदां 'मंडलिक गोल्ड मेडल' व पारितोषिक मिळालें. यांनीं कायद्याची एल्एल्. एम्. ही परीक्षा दिलेली आहे. स. १९१३ सालीं हे मुंबई युनिव्हर्सिटींत 'विल्सन फॉयलॉलॉजिकल लेक्चरर' होते. स. १९१५-१६ सालीं हे स्पिंगर रिसर्च स्कॉलर होते. तसेंच स. १९०९ व १९१६ सालीं अनुक्रमें एल्फिन्स्टन व विल्सन कॉलेजांत हे संस्कृतचे प्राध्यापक होते. तसेंच स. १९१७-२३ पर्यंत यांनीं मुंबई सरकारी लॉ कॉलेजांत प्राध्यापकाचें काम केलें आहे.

यांशिवाय मुंबई व मुंबईबाहेरील अनेक संस्थांशीं यांचा निकट संबंध आहे. मुंबई रॉयल एशियाटिक सोसायटीचे हे व्हाइस-प्रेसिडेंट व फेलो, मुंबई विश्वविद्यालयाचे फेलो (स. १९१९-१९२८), मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे उपाध्यक्ष, द. ब्रा. को. हाउसिंग सोसायटीचे पूर्वीचे अध्यक्ष, मुंबई ब्राह्मण सभेचे ट्रस्टी वगैरे नात्यांनीं यांचा अनेक संस्थांशीं संबंध आहे.

यांनीं इंग्रजी व मराठी भाषेंत अनेक लेख व ग्रंथ लिहिले आहेत. त्यांत यांचा खोल अभ्यास व भरपूर माहिती स्पष्ट दिसून येते. यांचा 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र' (भाग १-२) हा हिंदुधर्मशास्त्रावरील संशोधन व संकलन करणारा अनेक भागांतील ग्रंथ फारच महत्त्वाचा असून यांना भारतीयच काय पण जागतिक कीर्ति मिळवून देणारा होईल असें म्हणतात. यांनीं केलेल्या महत्त्वाच्या संशोधनात्मक लेखनाबद्दल यांच्या चहात्या विद्वान् मित्रांनीं यांच्या वयास साठ वर्षे पूर्ण झालीं तेव्हां यांना मोठ्या सन्मानानें इंग्रजी भाषेंतील एक लेखसंग्रहात्मक ग्रंथ अर्पण केला. ब्रिटिश सरकारनेंहि यांच्या विद्वत्तेचा गौरव करणारी महामहोपाध्याय ही पदवी यांना अर्पण केली. तसेंच मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीनें यांना 'कँबेल गोल्ड मेडल' दिलें (१९४४). हें मेडल दर तीन वर्षांनीं दिलें जातें. 'इंडियन अँटिक्विटीज' वर प्रबंध लिहिणारांनाच हें दिलें जातें. सर जॉन मार्शल, प्रो. देवदत्त भांडारकर, प्रो. मक्डोनेल, डॉ. शामशास्त्री, सर गंगानाथ झा, दि. ब. कृष्णस्वामी आयंगार व प्रो. होडीवाला वगैरे बाराजणांना हें आतांपर्यंत दिलें गेलें आहे. हे तेरावे होत. यांना स. १९४५ च्या ऑल इंडिया ओरिएन्टल कॉन्फरन्सचे अध्यक्ष निवडण्यांत आलें.

काथवटे, आबाजी विष्णु—(जन्म स. १८४६–मृत्यु स. १९०७)

हे वांईचे गृहस्थ पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत बरींच वर्षे संस्कृतचे प्रोफेसर होते. यांचे ग्रंथः—१ शिक्षण व अध्यापन (मराठी), २ कीर्तिकौमुदी, ३ द्व्याश्रयकाव्य, ४ अथर्ववेद उत्तरभाग (पुढले तीन संस्कृत ग्रंथ यांनीं संपादिलेले आहेत).

कादरबक्ष, सारंगीवाला—(मृत्यु स. १९३४)

बालगंधर्वांचा सारंगीवाला. नाकावर चांदीच्या फ्रेमचा चष्मा ठेवलेली, छोटीशी दाढी आणि लाल टोपी असलेली ही मूर्ति गंधर्वांच्या प्रेक्षकांचें लक्ष वेधीत असे. पुढें पुढें यांची साथ इतकी गाण्याबरहुकूम होऊं लागली कीं, त्यांतून रफारसुद्धां स्वच्छ ऐकूं येत असे. एखादे दिवशीं हे साथीला नसले तर प्रेक्षकांतून विचारणा होऊं लागे.

हे गंधर्वांना नेहमीं ' महाराज ' म्हणून संबोधीत, तर गंधर्व यांना सदोदित ' भय्या ' म्हणून संबोधीत. यांची स्वरलोलुपवृत्ति ध्यानांत घेऊन ' विधिलिखित ' नाटकाचे वेळीं गंधर्वांनीं यांच्याकडून बऱ्याचशा चाली पण घेतल्या. त्यांपैकीं ' का घातुक रुसवा ' ही भैरवी तर फारच अप्रतिम होती. हें पद धंदेवाईक ग्रामोफोन कंपन्यांकरितां गाण्याचा योग आला नाहीं. पण कराचीचे धनाढ्य व्यापारी लाला लखमीचंद ईश्वरदास यांनीं आपल्या खासगी संग्रहांत तें रेकार्ड केलें आहे.

पदांतले शब्दन् शब्द मधुर सारंगींतून प्रगट करण्याच्या कसबामुळें एखादे दिवशीं बालगंधर्वांचा आवाज तितकासा बरा नसला तरी त्याची उणीव हे आपल्या सारंगीनें भरून काढीत. अशा या साथीवर खूष होऊन नाटक आटोपल्यावर ' नुसता तुमचा ऑर्चेस्ट्रा मला ऐकावयाचा आहे ' अशी इच्छा श्रीमंत सयाजीराव गायकवाडांनीं प्रदर्शित केली होती (' कलावंतांच्या सहवासांत 'वरून).

कानिटकर, गोविंद वासुदेव—(जन्म स. १८५४–मृत्यु स. १९१८) मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध कवि व लेखक.

हे बी. ए. (१८७६) व पुढें एल्एल्. बी. होऊन चार वर्षे वकिली केल्यानंतर यांना मुन्सफाची जागा मिळाली. नोकरीवर असतां यांनीं शेक्सपियरच्या हॅम्लेट, कोरिओलेनस, मर्चंट ऑफ व्हेनिस या तीन नाटकांचीं भाषान्तरें केलीं. जॉन स्टुअर्ट मिलच्या ' सब्जेक्शन ऑफ वुइमेन ' या पुस्तकाचें ' स्त्रियांची परवशता ' या नांवानें भाषान्तर केलें. स्पेन्सरच्या ' एज्युकेशन ' या पुस्तकाचें मराठी भाषान्तर केलें. मुंबईस असतां बैरामजी मेहेरवानजी मलबारीशेट इंग्लंडला गेले असतां त्यांचें ' स्पेक्टेटर ' हें पत्र हेच चालवीत. याशिवाय स्फुट लिहिण्याचें काम चालू असेच. यांच्या मराठी भाषेच्या सेवेबद्दल यांना पुणें येथील मराठी-साहित्य-संमेलनाचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें होतें (१९०६).

यांनीं मनोरंजन (१८८६) मासिक काढलें. नंतर त्यांत निबंधचंद्रिकेचा समावेश केला व ' मनोरंजन व निबंधचंद्रिका ' असें तें निघूं लागलें.

वरीलशिवाय यांचे ग्रंथः—१ कविकूजन (संमोहलहरी वगैरे कवितासंग्रह १९३३), २ बुद्धचरित्र (संस्कृतांत काव्य), ३ नारायणराव पेशवेवध काव्य, ४ अकबर काव्य, ५ कृष्णाकुमारी काव्य, ६ गीताञ्जलि, ७ मॅक्समुल्लरकृत धर्मविषयक व्याख्यानें (कविकूजन प्रस्तावना— ले. अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे, इचलकरंजी).

कानिटकर, नारायण बापूजी—(जन्म स. १८५२–मृत्यु स. १८९७) मराठी भाषेंतील सुप्रसिद्ध नाटककार व पुणें येथील एक सार्वजनिक कार्यकर्ते.

हे मॅट्रिक झाले (१८६८) आणि नंतर वकिलीची परीक्षा देऊन हे पुणें येथें वकिली करूं लागले. यांचा वकिलींतील जम चांगल्यापैकीं असे. त्या वेळीं नवे-जुने किंवा सनातनी-सुधारक असे विचाराचे दोन प्रवाह मोठ्या वेगानें वाहूं लागले होते. वर्तमानपत्रांत व घरांत सर्वत्र हेच वादविवाद चालत. यांच्या घरांत हे जुन्या मताचे आणि गोविंद वासुदेव हे नव्या मताचे असत. तसेंच यांना आपल्या परंपरेचा आणि मराठेशाहीचा अत्यंत अभिमान असे. तो यांच्या नाटकांत सर्वत्र प्रतिबिंबित झालेला दिसतो. महाराष्ट्राची रंगभूमि बारा वर्षे केवळ यांच्या गद्य नाटकांनीं गाजत होती असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. यांचीं नाटकेंः—

१. मल्हारराव गायकवाड (बडोद्याच्या विषप्रयोग प्रकरणावर). १८७४
२. शशिकला रत्नपाळ (रोमियो-जुलियटच्या आधारें). १८८२
३. प्रतापराव चंद्रानना (सर वॉल्टर स्कॉटच्या केनिलवर्थ कांदबरीच्या आधारें). १८८३

४. तरुणी-शिक्षण नाटिका (सामाजिक). १८८३
५. शिवाजी (ऐतिहासिक). १८८९
६. बाजीराव मस्तानी (संगीत प्रेमबंधन). १८९२
७. संमति कायदा. १८९२
८. न्यायविजय (क्रॉफर्ड प्रकरणावर). १८९२
९. भावी सुधारणा-प्रदीप (शीघ्र सुधारणा दुष्परिणाम). १८९२
१०. बाजी देशपांडे (ऐतिहासिक, दुसरी आवृत्ति १९०५). १८९४
११. राजाराम (अपूर्ण). १८९६
१२. प्रतापगडचा मोहरा (अपूर्ण). १८९७

यांपैकीं बहुतेक पहिलें व शेवटचें खेरीज नाटकें रंगभूमीवर येऊन कांहीं तर अतिशयच लोकप्रिय झालीं होतीं. यांचें विवेचन जुन्याचा पुरस्कार करणारें आणि स्वाभिमानाला पोषक असे. मांडणी सोज्वळ व भाषा सफाईदार असे. तरुणीशिक्षण नाटिकेनें तर तेव्हां चांगलीच खळबळ उडविली होती.

शिवाय ते पुणें नगरपालिका सभासद, चिंचवडच्या मोरया गोसावी संस्थानचे ट्रस्टी आणि टिळकांच्या पक्षांतील विश्वासू कार्यकर्ते होते. यांचे चिरंजीव ग. ना. कानिटकर हे बाळूकाका म्हणून सर्वांच्या परिचयाचे आहेत.

कानिटकर, नारायण विनायक--(जन्म स. १८८७) दुर्जलकृषिसंशोधक.

हे बी. एससी. एम्. एजी. आहेत (१९२१). यांचा विशेष विषय रसायनशास्त्र हा होय. एम्. एजी.च्या परीक्षेकरितां प्रादेशिक अर्थशास्त्र हा यांचा विषय होता. स. १९०९ मध्यें यांनीं शेतकी खात्यांत प्रवेश केला. त्यानंतर क्रमानें हे 'सॉइल फिजिसिस्ट' या हुद्यापर्यंत चढले. १९२६ सालीं यांना मुंबई इलाख्याचे दुर्जलकृषिसंशोधक नेमण्यांत आलें व त्या जागेवरून हे १९४२ सालीं सेवानिवृत्त झाले.

यांना पहिल्यापासूनच दुर्जलकृषीचा म्हणजे थोड्या पावसावर पुरेपूर पीक काढण्याच्या विषयाचा नाद असे. १९३०-३१ सालीं हे अमेरिकेस गेले आणि तेथें या विषयाचें संशोधन व प्रत्यक्ष कार्य काय चाललें आहे याचा यांनीं सूक्ष्मपणें अभ्यास केला. मुंबई इलाख्याच्या सोलापूर व विजापूर या जिल्ह्यांतून पाऊस थोडा, कोठें जमीन उथळ व कोठें खोल काळी अशी आहे. अशा जमिनींत थोड्या पावसाच्या मदतीनेंहि पुष्कळ पीक कसें काढतां येईल याबद्दल यांनीं अत्यंत महत्त्वाची संशोधक कामगिरी केली असून, त्या कामगिरीला उपयुक्त संशोधक स्वरूपहि सुदैवानें हे सेवानिवृत्त होण्याच्या सुमारासच आलें; आणि या प्रकारें हें विशेष कार्य पूर्णतेस गेल्याचें श्रेय यांना मिळालें. या विषयावर यांनीं एक सुंदरसा ग्रंथहि लिहिला आहे. शिवाय शेतीविषयक रसायनशास्त्र, शेतीची प्रत्यक्ष कला व कांहीं समाजशास्त्रीय संशोधन यांनीं केलें आहे. जमिनीवर पडलेल्या पावसाच्या पाण्याचा किती अंश प्रत्यक्ष पिकास उपयोगी व किती व कोणकोणत्या प्रकारें फुकट जातो, व जमिनीवरून जो वाहून जातो तो जातांना जमिनीचा सकस भाग किती वाहून घेऊन जातो याची निश्चिती मुंबई इलाख्यांत यांनीं प्रथम केली. यांच्या संशोधनाचें सामान्य स्वरूप असें कीं थोड्या पावसाचे प्रदेशांत जो कांहीं पाऊस पडतो तो सर्वच्या सर्व जमिनींत जिरविण्यासाठीं जमिनींची बांधबंधस्ती समानतळींत घालतां येतील तेथें बांध घालून करावी, शेतीची नांगरट उतारकापती करावी, बी थोडें पेरून शेतींत झाडांची संख्या सामान्यतः घेतली जाते त्यापेक्षां कमी घ्यावी व जमिनीची वारंवार कुळवणी वगैरे करून जमिनींतील ओलावा हवेंत उडून जाऊं देऊं नये; म्हणजे शेतींतील थोड्या झाडांना या प्रकारें सांठवून ठेवलेला ओलावा पुरून त्यांना बीज येतें, पुष्कळशा झाडांचें गवत होऊन त्यांना दाणा न येतां तें सुकून जात नाहीं. शिवाय जें पावसाचें पाणी जमिनीवरून वाहून जातें तें जातांना सोलापूर जिल्ह्यांतील दर एकरीं जमिनीवरून सामान्यतः दरसाल १०० गाड्या चांगली माती वाहून नेतें असें यांनीं सप्रयोग व सप्रमाण सिद्ध केलें. या संशोधनाचा परिणाम म्हणजेच सध्यां विजापूर, सोलापूर जिल्ह्यांत सरकारनें समपातळींत सार्वत्रिक बांध घालून ३।४ वर्षांत जमिनीची बांधणी शेतकऱ्याच्या खर्चानें करावयाचें प्रचंड खर्चाचें कार्य सुरू केलें हा होय. अर्थात् या प्रकारें चालू असलेल्या जमीनबांधणीच्या पद्धतीस ज्या सुधारणा हव्या आहेत त्यांचा निर्देश यांनीं आपल्या ग्रंथांत केला आहे.

(1) Land and Labowr in an Indian Village No. 2, (हा एम्. एजी. च्या परीक्षेकरितां संशोधनग्रंथ लिहिला).

(2) Dry Farming in India.

कानिटकर, रावबहादुर वासुदेव बापूजी— (मृत्यु स. १९०४) पुण्याचे सुप्रसिद्ध एंजिनियर व सार्वजनिक कार्यकर्ते.

गुजराथी, फारशी, इंग्रजी व मराठी या चार भाषा यांना फार उत्तम येत. केवळ स्वतःच्या गुणाच्या जोरावर चढत हे एक्झिक्युटिव इंजिनियरच्या जागेवर नेमिले जाऊन यांनीं तेथें पुष्कळ वर्षे काम केलें. सरकारनें यांना रावबहादुर पदवी देऊन गौरविलें होतें. पुणें नगरपालिकेचे हे अनेक वर्षे सभासद होते.

पुणें काँग्रेसचा सभामंडप यांच्या देखरेखीखालीं व यांच्या नकाशाप्रमाणें उभारला गेला. फर्ग्युसन कॉलेज पुणें, रे मार्केट पुणें, नगरवाचनमंदिर पुणें, आनंदाश्रम पुणें, भांडारकर-बंगला-संगम पुणें, जैनधर्मशाळा पुणें, एल्फिन्स्टन हायस्कूल मुंबई, सेक्रेटरिएट मुंबई, लक्ष्मीविलास राजवाडा बडोदें, फलटण वॉटर वर्क्स वगैरे इमारती यांच्या योजनेप्रमाणें झाल्या आहेत. शोभा, सोय आणि काटकसर यांचा उत्तम मेळ यांच्या योजनेंत असे. यांचें वाचन सूक्ष्म व भरपूर, स्वभाव स्वाभिमानी, करारी पण परोपकारी असे. यांचा ग्रंथः—१ चार नवलकथा.

कानुगा, नित्यानंद—(जन्म स. १९००) ओरिसा प्रान्तांतील काँग्रेस कार्यकर्ते व मंत्री. ह्यांचें शिक्षण खेनशॉ कॉलेज, कटक आणि लॉ कॉलेज, कलकत्ता यांत झालें. यांनीं कायदेभंगाच्या चळवळींत भाग घेतला व सहा महिन्यांची शिक्षा भोगली. त्याच्या परिणामामुळें हायकोर्टानें यांची सनद रद्द केली. हे कट्टे काँग्रेस-भक्त आहेत. हे ओरिसा पार्लमेंटरी पार्टीचे सेक्रेटरी होते व कटक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. ह्यांच्या सर्व कारकीर्दीवर लढाऊपणाची छाप पडली आहे आणि त्यामुळेंच लोकांच्या गळ्यांतील लाल होऊन राहण्याचा मान ह्यांना मिळाला आहे.

ओरिसामध्यें काँग्रेसनें स्थापन केलेल्या मंत्रिमंडळांत जमाबंदी व पब्लिक वर्क्स खात्याचे हे प्रधान होते. कोणत्याहि गोष्टीकडे अत्यंत मनापासून व आंतरिक दृष्टीनें पाहण्याच्या यांच्या परिपाठामुळें यांची कारकीर्द अत्यंत यशस्वी झाली.

कान्हेरे, अनंत लक्ष्मण—(फांशी स. १९१० एप्रिल १९) नाशिक येथें जॅक्सन नांवाच्या कलेक्टरचा गोळी घालून पिस्तुलानें खून केला म्हणून ठाण्याच्या तुरुंगांत तिघांना फांशीं दिलें त्यांपैकीं एक.

कान्हेरे, सदाशिवशास्त्री—(जन्म स. १८७८) सुप्रसिद्ध गीताप्रवचनकार व पुढें इंग्लंडमध्यें लंडन येथें इंग्लिश स्त्रीशीं लग्न करून राहणारे गृहस्थ. इकडे यांनीं गीतेवर प्रवचनें करून चांगली मान्यता व संपत्ति मिळविली होती.

हे १९१५ सालीं इंग्लंडला गेले व स. १९४५ च्या जानेवारींत परत आले. तेथें लंडन युनिव्हर्सिटींत संस्कृत व मराठी भाषेचे हे प्रोफेसर होते. तेथें यांनीं एका इंग्लिश स्त्रीशीं लग्न केलें. तिच्यापासून यांना एक वीस वर्षांची मुलगी आहे. तिच्या लग्नाची व्यवस्था करून यांनीं तिकडचे सर्व संबंध सोडून हे आतां इकडे आले आहेत. नुकताच प्रायश्चित्तविधि करून हे आतां पुनः शुद्ध शास्त्रीबुवा बनले आहेत. पुनः गीतेवर प्रवचनें देत हिंडावें अशी यांची इच्छा आहे. हे मुंबईस आले तेव्हां पं. राजेश्वरशास्त्री द्रविड, बनारस, यांना भेटले. पण त्यांनीं 'जाणूनबुजून दीर्घकाल यवनीसंसर्ग करणाराला प्रायश्चित्त नाहीं' असें सांगितलें.

कामत, रामचंद्र कृष्ण—(जन्म स. १८७२) धार्मिक ग्रंथांचे संशोधक व अभ्यासक.

यांचा जन्म गोमान्तक प्रान्तीं असनोडें गांवीं झाला. यांचे वडील मूळ बेळगांवाकडील चंदगड गांवीं राहणारे, सुखवस्तु माध्वसांप्रदायी गौड सारस्वत ब्राह्मण होते. पुढें सराफी धंद्यासाठीं ते तेथून शहापुरीं येऊन राहिले. तेथें यांचें शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालें. यांचे गुरु पाटणेकर श्रीभाऊसाहेब फडणीस महाराज. त्यांच्या आज्ञेवरून हे बेळगांवच्या सुप्रसिद्ध रामतत्त्वप्रकाश छापखान्यांत मॅनेजरच्या कामावर राहिले. तेथें आलेल्या कामाच्या अनुभवावरून आणि लाभलेल्या विद्वानांच्या सहवासामुळें यांना श्रीगुरुचरित्रसंशोधनाची मूळ कल्पना सुचली, आणि आतां ती यांनीं यशस्वी करून दाखविली आहे.

बैलहोंगल येथें वामन नाईक यांच्या गिरणींत कॅशिअरचे नोकरीवर असतां श्रीटेंबेस्वामींच्या एका खासगी प्रवचनामुळें नामजपाचें महत्त्व यांना पटलें. नंतर यांचें 'नामचिंतामणि' हें पुस्तक तयार झालें. तसेंच भगवद्गीतेवरील निबंध, ईशप्रार्थनेची शक्ति हींहि लोकप्रिय पुस्तकें यांनीं लिहिलीं. हल्लीं हे एकनाथी भागवताचें संशोधन करीत आहेत.

कामा, खरशेदजी रुस्तुमजी— (जन्म स. १८३१; मृत्यु स. १९०९) पारशी समाजांतील सुप्रसिद्ध कार्यकर्ते व इराणच्या संस्कृतीशीं संबंध जोडणारे पुरुष.

मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें कांहीं दिवस अध्य-

यन केल्यानंतर यांनीं व्यापाराकडे लक्ष पुरविण्यास सुरुवात केली. प्रथमतः त्याकरितां यांनीं कलकत्ता व चीनची सफर काढली (१८५४). यानंतर मंचरजी होरमानजी कामा व दादाभाई नौरोजी यांचे सहकार्यानें यांनीं लंडन येथें 'कामा अँड को.' ही व्यापारी संस्था सुरू केली. इंग्लंडमधील पहिली हिंदी व्यापारी संस्था या दृष्टीनें या गोष्टीकडे विशेषेंकरून पाहावयास पाहिजे.

परंतु यांना पारशी समाज ओळखतो तें स्वतः इराणी भाषा शिकून ती आपल्या समाजबांधवांना शिकविणारे सत्पुरुष म्हणून; पट्टीचे व्यापारी म्हणून नव्हे.

यानंतर यांनीं फ्रान्स व जर्मनी येथें कांहीं दिवस वास्तव्य केलें. त्या देशांतील महापंडितांकडून इराणी भाषा व संस्कृति यांचें सम्यक् ज्ञान मिळवणें हा यांचा तेथील प्रमुख हेतु होता. याच वेळीं यांनीं फारसी, फ्रेंच व जर्मन यांचें अध्ययन केलें. प्रो. रॅप या जर्मन विद्वानांच्या कांहीं ग्रंथांचें यांनीं भाषांतर केलें आहे.

हिंदुस्थानांत परत आल्याबरोबर यांनीं आपल्या ध्येयाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. या सर्व कार्याचें श्रेय युरोपमधील वासाकडे देण्याचा यांचा प्रघात असे. हिंदुस्थानांत आल्याबरोबर यांनीं खालील गोष्टी करण्यास सुरुवात केली.

पारशी विद्यार्थ्यांना इराणी भाषेचा परिचय करून देण्याकरितां यांनीं एक वर्ग उघडला. प्रथमतः इतर कांहीं तरी उद्योग करून हा वर्ग चालविण्याचा यांचा प्रघात असे. परंतु पुढें आपलें सर्व लक्ष यांनीं यावरच केंद्रित केलें होतें.

यानंतरचें यांचें महत्त्वाचें कार्य 'जरदुस्ट्र-दिन'नी खोल करणारी मंडळी' या इराणी संशोधन-संस्थेच्या स्थापनेंत सामावलें आहे (१८६४). अजूनहि ही संस्था व्यवस्थित चालली असून नवनवीन कार्यकर्त्यांना उत्साह देण्याचें पूर्वीचें काम या संस्थेनें पूर्वीच्याच जोमानें चालविलें आहे.

या काळची यांची आणखी एक महत्त्वाची चळवळ म्हणजे 'जरदुस्ट्र अभ्यास' या मासिक पत्राचें संपादन होय (१८६६). धार्मिक महत्त्व असणाऱ्या गोष्टींची व्यवस्थित माहिती जनतेला देणें हें यांच्या या मासिकाचें प्रमुख ध्येय होतें. १८६७ अखेर हें पत्र हे चालवीत असून एकंदर अकरा अंक या मासिकाचे निघाले आहेत.

याचप्रमाणें फारसी व इराणी भाषेंत संशोधन करणाऱ्या डॉ. हौग, प्रो. बॉप, प्रो. स्पाइगेल यांसारख्या विद्वानांना मदत करून उत्साहित करण्याचा यांचा सतत प्रयत्न असे. त्याचप्रमाणें 'मुल्ला फिरोझ मदरसा', 'जमशेटजी जिजीभाई झरथोष्ट्री मदरसा' व 'नसरवानजी रतनजी टाटा मदरसा' या इराणी संस्कृतीचें शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांशींहि यांचे असेच निकटचे संबंध असत.

या सर्व प्रयत्नांत, यांनीं बक्षिसें लावून निबंध मागविण्याचा प्रयत्न करून आणखी एक पाऊल पुढें टाकलें. याप्रमाणें व्हेन्दीदादच्या गुजराथी भाषांतरास रु. ८००, हेरोडोटसनें इराणी लोकांवर लिहिलेल्या ग्रंथावरील गुजराथी निबंधास रु. ५००, सर ऑलिव्हर लॉजच्या Substance of Faith चें पारशी दृष्टिकोनाच्या परीक्षणास रु. ५०० अशीं बक्षिसें यांनीं जाहीर केलीं होतीं. हे सर्व निबंध आतां प्रसिद्ध झालेले असून पहिला निबंध तर ग्रंथरूपानेंहि प्रसिद्धि पावला व शेवटचा निबंध मुंबई के. आर. कामा ओरि. इन्स्टिट्यूटच्या पत्रांत प्रसिद्ध झालेला आहे. ती संस्था यांच्या स्मरणार्थ स्थापिली आहे.

पारशी समाजांत आज दिसत असणाऱ्या शिक्षणप्रसाराचें श्रेयहि बहुतांशी यांनाच आहे. शारीरिक, बौद्धिक व धार्मिक अशा तीनहि प्रकारच्या शिक्षणसंस्थांशीं यांचा घनिष्ठ संबंध असे. या सर्वांमध्यें पारशी धर्माच्या शिक्षणाचे क्षेत्रांत यांनीं केलेलें कार्य महत्त्वाचें आहे.

कामा, भिकाजी रुस्तुम— (मृत्यु स. १९३६) सुप्रसिद्ध क्रांतिकारक देशभक्त स्त्री. भाई परमानंद वगैरे लोक इंग्लंडांत येण्यापूर्वीच या इंग्लंडांत येऊन स्थायिक झाल्या होत्या. दादाभाई नवरोजी ज्या वेळीं पार्लमेंटमध्यें निवडून आले तेव्हां यांनीं त्यांचेकरितां बरेच परिश्रम घेतले. परंतु पुढें पुढें नेमस्त राजकारणापासून सुरुवात करणाऱ्या यांचे मनांत हळुहळू कायाकल्प होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं.

त्यांतच १९०६ त यांनीं केलेल्या अमेरिकेच्या सफरीची भर पडली. यांची व सावरकरांची भेट झाल्यावर सावरकरांच्या सशस्त्र क्रांतिवादाचा पगडा यांचे मनावर बसूं लागला. याच वेळीं यांच्या उसळत्या भावनांचें द्योतक या नात्यानें यांनीं लाला लजपतराय व सरदार अजितसिंग यांचे हद्दपारीचे निषेधार्थ हिंदी लोकांना उद्देशून काढलेलें पत्रक पाहण्यासारखें आहे.

जर्मनींत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट काँग्रेसमध्यें हिंदुस्थानसंबंधींचा ठराव कोणत्या भाषेंत मांडावयाचा ही गोष्ट पं. श्यामजी कृष्णवर्मांवर सोंपवण्यांत आली होती. सरदारसिंग, राणा व या यांनीं या परिषदेस हजर राहावें, असें क्रांतिकारक गोटांत ठरल्यावर मि. हिंडमन यांचेबरोबर या व ते स्टूटगार्ट येथें काँग्रेसला निघाले. या काँग्रेसला जाण्यापूर्वीच या दोघांनीं अभिनव-भारताची प्रतिज्ञा घेतली होती.

या काँग्रेसच्या इतर कामकाजाबरोबरच हिंदी प्रश्नासंबंधीं विचार निघणें साहजिकच होतें. या काँग्रेसमध्यें हिंदी प्रश्न काढण्याच्याच विरुद्ध मि. रॅम्से मॅक्डोनॉल्ड वगैरे मंडळी होती. परंतु हिंडमन, जॉरिस वगैरे लोकांचा हिंदी प्रतिनिधींना भरपूर पाठिंबा मिळाल्यानें हिंदुस्थानसंबंधींचा एक महत्त्वाचा ठराव पास करण्यांत आला. हा ठराव काँग्रेसमध्यें पास करण्याचे पूर्वी या परिषदेंत यांनीं हिंदी 'राष्ट्रीय ध्वज' फडकाविला. या राष्ट्रध्वजावर 'वंदे मातरम्' अशीं अक्षरें स्पष्टपणें लिहिलीं असून त्यावर दाखवलेलीं आठ कमळें हीं हिंदुस्थानांतील आठ प्रांत सुचविणारीं होतीं. हिरवा, केशरी व तांबडा अशा तीन रंगांचे पट्टे त्यावर काढण्यांत आले होते. शक्ति, विजय व धैर्योत्साह या तीन महत्त्वाच्या गोष्टींचा निर्देश रंगांचे साहाय्यानें करण्याची ही कल्पना खरोखरच सुंदर आहे.

हा ध्वज घेऊन या त्या परिषदेंत उभ्या राहिल्या त्या वेळीं कोणी तरी राजघराण्यांतील स्त्रीच तेथें अवतरल्याचा सर्व प्रतिनिधींना भास झाला.

त्या वेळीं यांनीं मांडलेला ठरावहि असाच दणदणीत होता. 'हिंदुस्थानांत ब्रिटिशांची सत्ता चालू राहणें ही गोष्ट भारतीयांच्या हिताचे दृष्टीनें अतिशय विघातक आहे. त्या दलित देशांत वास्तव्य करणाऱ्या लोकांची संख्या जगाच्या एक पंचमांश आहे. या लोकांना दास्यमुक्त करण्याचे कामीं जगांतील सर्व स्वातंत्र्यप्रेमी लोकांनीं साहाय्य केलें पाहिजे. कारण कोणताहि समाज जुलमी व अनियंत्रित सत्तेखालीं राहूं नये, हीच गोष्ट जगाची सामाजिक घडी बसवण्यास आवश्यक आहे.'

या ठरावावरील यांचें भाषणहि असेंच खणखणीत होतें. हिंदुस्थानांतील अब्जावधि पौंड ब्रिटिश पळवीत असून त्यामुळें हिंदुस्थानची कशी दैना उडाली आहे याचें हृदयद्रावक वर्णन केल्यावर यांनीं 'उठल्यासुटल्या वसाहतींच्या प्रश्नावर चर्चा करतां, मग हिंदुस्थानसारख्या परायत्त देशाचें काय?' असा रोखठोक सवाल टाकला. याच वेळीं सोशॅलिस्ट लोकांनाहि यांनीं हिंदी पक्षाकडे सहानुभूतीनें पाहण्याची विनंति केली होती.

कॉयस, फादर जेन फर्डिनांड—(जन्म स. १८७७–मृत्यु स. १९४४) हिंदुस्थानचे फ्रेंच मित्र व थोर संशोधक.

फ्रान्समधील ले मेडॉक जिल्ह्यांतील एका लहानशा खेड्यांत यांचा जन्म झाला. टौलौझ येथें माध्यमिक शिक्षण पुरें केल्यानंतर हे ख्रिस्त-संघांत सामील होऊन हिंदुस्थानला आले (१८९५). विद्यार्थी ही यांची हिंदुस्थानांत येण्याविषयींची खरी भूमिका होती.

यांनीं आल्याबरोबर मदुरा-मिशनमध्यें अध्ययन करण्यास सुरुवात केली, व त्याबरोबर त्रिचनापल्लीच्या सेंट जोसेफ कॉलेजशीं हे जोडले गेले. या ठिकाणीं यांनीं केलेल्या उपक्रमांपैकीं नॅचरल हिस्टरी म्युझियमची स्थापना ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे.

वेदान्त व तत्सम शास्त्रांचे अध्ययनाचा लाभ यांना क्युरेसिऑगच्या जेसुएट सेमिनरींत व नॉर्थ वेल्समधील सेंट ब्युनॉस कॉलेजमध्यें झाला. डब्लिनमधील सिलटाउन पार्कमध्यें यांना धर्मप्रचारकाची दीक्षा देण्यांत आली (१९०८). हीरेन एल्ड्रेन, फ्लेन्डर्स व फ्रेंच हाउस ऑफ फिलॉसफीमध्यें (गीमर्ट, हॉलंड) आपलें अध्ययन करीत असतांच यांना आपल्या शास्त्रीय ज्ञानाच्या भक्कम पायाविषयीं व अध्ययनाविषयीं शंका वाटूं लागली व पॅरिस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ मेडिसिनमध्यें यांनीं ज्या वेळीं संशोधनास सुरुवात केली त्या वेळीं तर ही शंका बळावतच चालली.

१९११ त हे हिंदुस्थानास परत आले व त्रिचनापल्लीच्या सेंट जोसेफ कॉलेजमध्यें केमिस्ट्रीचे प्रोफेसर म्हणून काम करूं लागले. या ठिकाणीं १९२२ पर्यंत काम केल्यानंतर सेंट झेवियर कॉलेजच्या (मुंबई) केमिस्ट्री विभागाचे दिग्दर्शक म्हणून यांची नेमणूक झाली.

या वेळपर्यंत एक उत्कृष्ट बायो-केमिस्ट म्हणून यांची ख्याति झाली होती. यांचें या विषयावरील प्रभुत्व लक्षांत आल्यावर हिंदुस्थानसरकारच्या विनंतीवरून मुंबईच्या हॉफकिन्स इन्स्टिट्यूटच्या फार्माकॉलॉजिकल लेबॉरेटरीची स्थापना झाली (१९२४) व निवृत्त होईपर्यंत तेथें हें काम करीत असत (१९३२). इंडियन ड्रग इन्क्वायरी कमिटीचे सभासद, बॉंबे केमिकल

सोसायटीचे सभासद, मुंबई युनिव्हर्सिटीच्या फॅकल्टी ऑफ मेडिसिनचे सभासद व बी. ए., एम्. ए. च्या फ्रेंचचे परीक्षक अशा अनेक नात्यांनीं यांनीं हिंदुस्थान व हिंदी जनता यांची केलेली सेवा निश्चित महत्त्वपूर्ण आहे. या यांच्या कामगिरीबाबत फ्रेंच सरकारनें यांना ऑफिशियर डी ॲकेडमी (१९२९) व ऑफिशियर डी लिन्स्ट्रक्शन पब्लिक (१९३६) या पदव्या देऊन यांचा गौरव केला.

युद्धाचे धामधुमीच्या फ्री फ्रेंच कमिटीच्या कामांतहि यांनीं अशीच महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

त्याचप्रमाणें मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमच्या नॅचरल हिस्टरी सोसायटीचे अध्यक्ष व नॅचरल हिस्टरी सोसायटीचे कार्यवाह व त्या संस्थेच्या त्रैमासिकाचे एक संपादक या नात्यानें यांनीं केलेली कामगिरीहि कमी महत्त्वाची नाहीं. कोणतेंहि काम असो, त्यावर यांची कुशाग्र बुद्धि, स्पष्ट विचारशक्ति व शास्त्रीय विषयांच्या विद्यार्थ्याची तर्ककर्कशता यांची छाप पडलेली असावयाची आणि त्याचेच जोडीला आपल्या बुद्धीचा सद्व्यय करण्याची लागलेली उत्कंठा यामुळें यांचें कार्य निश्चित यशस्वी व्हावयाचें.

केवळ संशोधनापेक्षां व्यवहाराशीं ज्याचा अधिक मेळ बसतो अशा शास्त्रांचें अध्ययन करण्यांत यांचें मन विशेष रमे व त्यामुळेंच मानवी कष्ट कमी करण्यास मदत करणाऱ्या शास्त्रांच्या शाखा हा आपल्या कार्याचा प्रांत यांनीं निश्चित करून टाकला होता. हिंदुस्थानांतील खवळजवळ सर्व प्रांतांतील लोकांना सतत त्रास देणाऱ्या दुष्कर्म व राउंडवर्मपासून होणाऱ्या रोगांवर जीं औषधें निघालीं आहेत त्यांचें Therapeutic मूल्य शोधून काढण्याचें काम यांनीं हॉफ्किन्स इन्स्टिट्यूटमधील आपल्या प्रयोगशाळेंत चालू ठेवलें होतें. या विषयावर यांनीं केलेल्या संशोधनापासून मिळालेले सिद्धांत इंडियन जर्नल ऑफ मेडिकल रिसर्चनें प्रसिद्ध केले असून सर्व शास्त्रीय मंडळांत एक व्यापक अध्ययन अशी या संशोधनास मान्यता मिळाली आहे. Pharmacology वरील पाठ्यपुस्तकांतहि त्याचा समावेश करण्यांत आला आहे.

सापाचें विष काढण्याचें यंत्र व त्यावरील औषधें हा यांच्या संशोधनाचा आणखी एक महत्त्वाचा प्रांत होता. पॅरिस म्युझियममधील सुप्रसिद्ध सर्पतज्ञ डॉ. मरे इसलोब्स हे यांचे या संशोधनशाखेंतील सहकारी होते. जर्नल ऑफ फिजिऑलजी अँड पॅथॉलजी ऑफ पॅरिसमध्यें या दोघांनीं सापाचें विष काढण्याच्या यंत्राची रचना व कार्य यांसंबंधीं केलेलें कार्य प्रसिद्ध झालें आहे. बहुधा बिनविषारी समजल्या जाणाऱ्या सापांचे जातींबद्दलचें हें संशोधन आहे. त्याच वेळीं हिंदुस्थानांत सर्पदंशावर अत्यंत गुणकारी समजल्या जाणाऱ्या औषधांच्या उपयुक्ततेवरील यांचें संशोधन चालूच होतें. या गोष्टींकरितां यांनीं अनेक आयुर्वेदिक व युनानी पद्धतींतहि कांहीं उपयुक्त औषध सांपडतें काय यासंबंधीं तपास केला. यासंबंधीं अगदीं त्वरित गुणकारी असें औषध यांना सांपडूं शकलें नाहीं. परंतु नाग व रसेल व्हेनम यांवर अतिशय उपयोगी म्हणून उपयोजिण्यांत येणारीं सर्व औषधें कोणताहि परिणाम दाखवीत नाहींत, ही गोष्ट यांनीं सिद्ध करून लोकांवर फार उपकार केले आहेत. या विषयावरील यांचा Indian Plant Remedies used in Snake-bite हा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे.

ॲंटीव्हेनीनच्या केंद्रीकरणाच्या पद्धतीवरील यांचें संशोधनहि असेंच महत्त्वाचें असून प्लेगच्या केमो-थिरॅपीच्या संशोधनांतहि यांचा बराच मोठा हात होता. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील उपयोगी औषधींचे व विषारी वनस्पतींचे यांना एकमेव तज्ज्ञ समजण्यांत येत असे.

त्याचप्रमाणें हिंदी औषधी वनस्पतींवर कीर्तिकर व बसु यांनीं केलेल्या संशोधनांत यांनीं सुचविलेले फेरफार देशी औषधें वापरणाऱ्या लोकांना महत्त्वाचे वाटण्याजोगे आहेत. याविषयीं चार खंडांत यांनीं प्रसिद्ध केलेलें A study of Indian Medicinal Plants हें पुस्तक या विषयावरील संदर्भग्रंथ मानण्यांत येतें. देशी पद्धतींत उपयोगिण्यांत येणाऱ्या निरनिराळ्या औषधांचें यांत वर्गीकरण करण्यांत आलें असून त्यांचा परिणाम व उपयोग यांची सखोल माहिती देण्यांत आली आहे. ज्या शास्त्रीय दृष्टीनें हे सर्व ग्रंथ लिहिले आहेत तिची सगळीकडे स्तुतिच झाली आहे. औषधी व विषारी वनस्पतींवर यांनीं बॉंबे नॅचरल हिस्टरी सोसायटीकरितां व कलकत्त्याच्या न्यू रिव्ह्यूकरितां एक लेखमालाहि लिहिली होती. 'Notes on Indian Scorpions' हा यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. यांचे बहुतेक सर्व ग्रंथ डॉ. के. एस्. म्हसकर यांचे सहकार्यानें लिहिलेले आहेत.

आपलें सर्व आयुष्य हिंदुस्थानच्या सेवेंत व्यतीत करणाऱ्या हिंदुस्थानच्या पाश्चात्य मित्रांतील यांचें स्थान मोठें असून हिंदुस्थानचे हिताकरितां यांनीं घेतलेले श्रम बहुमोल आहेत.

कालेलकर, दत्तात्रय बाळकृष्ण ऊर्फ काका– (जन्म स. १८८५) हिंदी व गुजराथी भाषेंतील सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय लेखक.

सावंतवाडीजवळील एक लहानसें गांव यांचें जन्मस्थान. यांचे वडील सरकारी नोकर होते. वडिलांची नोकरी नेहमीं फिरतीची, त्यामुळें प्रवासाचें बाळकडू यांना लहानपणापासूनच मिळालें, व त्यांतच भर पडली अंतर्मुख दृष्टीची. सृष्टीच्या व लोकजीवनाच्या आयुःक्रमाकडे आत्मीयतेनें व तन्मयतेनें पाहण्याच्या वृत्तींत या गोष्टींचें पर्यवसान झालें.

कॉलेज शिक्षण घेत असतांनाच वंगभंगाची चळवळ सुरू झाली. ही चळवळ म्हणजे यांच्यासारख्या भावनाप्रधान गृहस्थाच्या मनाला चेतावणीच होती. कसेंबसें बी. ए. होऊन राष्ट्रीय शाळांमधून शिक्षणाचें काम करण्यास यांनीं सुरुवात केली. याच वेळीं मुंबईच्या राष्ट्रमत या सुप्रसिद्ध मराठी दैनिकांतहि यांनीं काम केलें होतें.

परंतु यांना आपली अध्यापनाची खरी हौस पुरवून घेण्याची संधि मिळाली बडोद्याच्या गंगानाथ विद्यालयांत. परंतु हें सुखहि यांना फार दिवस मिळूं शकलें नाहीं. कारण वंगभंगाचे आंदोलनांत हें विद्यालय बंद पाडण्यांत आलें.

परंतु यांतूनच प्रवास करण्याची यांची अतृप्त आकांक्षा पुन्हां एकदां जोरावली. स्वामी आनंद, आचार्य कृपलानी व अनंतबुवा मर्डेकर यांच्यासह यांनीं या वेळीं सर्व उत्तर हिंदुस्थानचा प्रवास केला.

परंतु हा प्रवास संपवितांच अध्यापनाकडे यांनीं पुन्हां एकदां लक्ष पुरविण्यास सुरुवात केली. हरिद्वारचें ऋषिकुल, आर्यसमाजी गुरुकुल, राजा महेंद्रप्रताप यांचें प्रेम–महाविद्यालय, सिंधु-ब्रह्मचर्याश्रम, शांतिनिकेतन अशा किती तरी पीठांतून यांनीं आपले अगणित विद्यार्थी तयार केले. परंतु यांच्या दृष्टीनें या पीठाच्या सहवासाचा विशेष दुसराच आहे. आरंभीं क्रांतिवादी असणाऱ्या या गृहस्थांत कायाकल्प होऊन हळुहळू यांचें सेवापरायणी मनुष्यांत रूपांतर होत होतें !

यानंतर मात्र यांनीं गांधींच्या साबरमतीच्या आश्रमांत राहावयाचें ठरविलें. शांतिनिकेतनमध्यें असते वेळेपासूनच गांधींच्या सहवासाविषयींचें आकर्षण यांचे मनांत घोटाळूं लागलें होतें. त्याला आतां मूर्त स्वरूप मिळालें.

याच वेळीं गांधींनीं गुजराथ विद्यापीठाची योजना तयार केली. त्या वेळीं त्या संस्थेची स्थापना व जबाबदारी व्यवस्थित पाडणारा यांच्याशिवाय शिक्षणतज्ञ गांधींच्या दृष्टिपथांत येऊं शकला नाहीं.

यानंतर गांधींनीं आपल्या आश्रमाचें स्थान वर्ध्याला हलविलें, त्याबरोबर हेहि तिकडेच राहावयास गेले. राष्ट्रभाषाप्रचाराचें मिशन हें यांचें या वेळचें महत्त्वाचें कार्य होय.

भारतीय भाषासंघ, सार्वभाषिक वर्गकोश, हिंदुस्थानी प्रचार-सभा वगैरे अनेक उपाधींमुळें यांच्या 'काकावाडी' ची स्थापना झाली असून तिचे कार्यांत यांनीं मिळवलेलें यश केवळ स्पृहणीय आहे.

इतर काँग्रेस पुढाऱ्यांच्याप्रमाणेंच हेहि 'नऊ ऑगस्ट' चळवळींत तुरुंगांत गेले होते.

परंतु गुजराथ–किंबहुना हिंदुस्थान–यांना ओळखतो, तें हे पट्टीचे साहित्यिक म्हणून, राजकारणतज्ञ म्हणून नव्हे. जन्मानें महाराष्ट्रांतील सारस्वत ब्राह्मण असून गुजराथी भाषेवर असणारें यांचें प्रभुत्व खरोखरच 'असामान्य' या एकाच शब्दानें वर्णन करितां येईल.

यांच्या गुजराथी पुस्तकांत, कालेलकरना लेखो, दोन भाग (विविध विषय), जीवनविकास (शिक्षणशास्त्र), जीवनभारती (साहित्य), जीवनसंस्कृति (संस्कृति धर्म) हे निबंधसंग्रह; हिमालयनो प्रवास, ब्रह्मदेशनो प्रवास हे प्रवास व स्मरणयात्रा (आत्मचरित्र), जीवता तहेवारो, ओतराती दीवालो, लोकमाता, नक्षत्रमाला, जीवननो आनंद, सद्बोधशतकम्, लोकजीवन हे प्रबंध प्रमुख आहेत.

मराठी वाङ्मयांतील यांच्या ग्रंथांच्या अनुवादांची संख्या अशीच वाढत असून यांचे जवळ जवळ सर्व ग्रंथ मराठींत अनुवादित झाले आहेत. श्री. वा. कृ. चोरघडे हे त्यांचे सर्वसाधारण संपादक असून हिंडलग्याचा प्रसाद (मराठी) व हिमालयाचा प्रवास हे दोन ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहेत.

कला–एक जीवनदर्शन, जीवनसाहित्य, गांधीवाद–समाजवाद (संपादित) व लोकजीवन हे यांचे प्रमुख हिंदी ग्रंथ होत.

यांचे ग्रंथ वाचीत असतांना किंवा यांच्या सहवासांत असतांना कोणती गोष्ट जर विशेष प्रामुख्यानें जाणवत

असेल तर यांचा सुसंस्कृतपणा. या मनुष्यानें हजारों मैलांचा प्रवास व तोहि डोळे, कान व हृदय हीं जागीं ठेवून केलेला आहे, याची जाणीव पटावी इतका बहुश्रुतपणा कोणाहि मनुष्याला यांचे ठिकाणीं दिसल्याशिवाय राहत नाहीं.

सौंदर्याची व कलेची अनासक्त पूजा हीच यांची सहजवृत्ति बनली आहे, आणि यांच्या प्रवासवर्णनांतील या गोष्टींमुळें यांस इतकी अनन्यसाधारण जनप्रीति लाभली आहे.

गुजराथी वाङ्मयसेवक यांचें ऋण मानतात, तें थोड्या वेगळ्या कारणांकरितां. गुजराथीमध्यें ह्रस्व-दीर्घांचें माजलेलें अराजक नाहींसें करण्याकरितां यांनीं तयार केलेला 'जोडणी-कोश' अतिशय परिणामकारक तोडगा ठरला आहे.

गुजराथी वाङ्मयावर आपली छाप-आपली प्रभावळ-निर्माण करण्यांतहि यांनीं असेंच मोठें यश मिळविलें आहे. यांची गुजराथी शैली ही बोलभाषेइतकी सुलभ पण अर्थगामी व मौलिक आहे. यांच्या कल्पना, उपमा, पर्याय सर्वच अपूर्व असल्यानें यांची एक स्वतंत्र धाटणी तयार झाली आहे. श्री. सुंदरम्, उमाशंकर जोशी, स्नेहरश्मि, नगीनदास पारेख, भोगीलाल गांधी, चंद्रशंकर शुक्ल, कृष्णलाल श्रीधरणी यांसारखे लेखक आज गुजराथी साहित्यांत मोलाची भर घालीत आहेत; पण ते यांचें ऋण मान्य केल्यानंतरच !

गुजराथीनंतर एक राष्ट्रभाषासेवक म्हणून यांची योग्यता डोळ्यांत भरते. राष्ट्रभाषेच्या प्रश्नाला यांनीं दिलेली चालना व 'सर्वोदय' व 'सब की बोली' या पत्रांचे द्वारां यांनीं जनतेला दाखविलेलें तिचें विधायक स्वरूप पाहण्यासारखें आहे.

काळी-कंबळीवाले, महात्मा— (अनुपलब्ध) सुप्रसिद्ध परोपकारी संन्याशी. कोणा निराश झालेल्या व्यापाऱ्याला यांनीं उत्साह देऊन पुन्हां धंद्यांत घातलें. त्या व्यापाऱ्याचें भाग्य पुढें धंद्यांत उघडलें. व्यापाऱ्यानें देऊं केलेली कृतज्ञतेची भेट स्वीकारण्याचें यांनीं नाकारलें व सांगितलें "तुला पैसा खर्चच करावयाचा असेल तर हिमालयांतील यात्रेकऱ्यांचें दुःख नाहींसें करण्याकरतां कर." व्यापाऱ्यानें हृषीकेशपासून बदरीनारायणपर्यंत प्रवाश्यांकरतां मोठमोठ्या सोयी निर्माण केल्या. यांनीं या सर्वांवर देखरेख करण्याचें काम स्वीकारलें. हे स्वतः इतके विरक्त कीं आपल्या देखरेखीखालील अन्नछत्रांतसुद्धां जेवायचें तर तत्पूर्वी अमुक इतक्या घागरी छत्राच्या हौदांत भरल्या-खेरीज राहावयाचे नाहींत. यांनीं "पक्षपातरहित अनुभवप्रकाश" नांवाचा एक ग्रंथहि हिन्दींत लिहिला आहे. यांची कफनी काळ्या कांबळ्याची बनवलेली असे म्हणून यांचें नांव "काळी कंबळीवाले" असें पडलें होतें.

काळे, त्र्यंबक गुरुनाथ—(मृत्यु स. १९१४) रसायनशास्त्र व पुराणें यांचे अभ्यासक व संशोधक. यांचें घराणें मूळचें धारवाड जिल्ह्यांतील नरगेल या गांवचें. शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण. यांचा प्रारंभींचा अभ्यास धारवाड येथें झाला. कॉलेजांत दाखल होण्यासाठीं हे पुण्यास आले. पण प्रतिकूल परिस्थितीमुळें यांना तें साधलें नाहीं. यांचा मराठी व संस्कृत-विशेषतः प्राचीन-ग्रंथांचा अभ्यास दांडगा होता. हुबळी येथें असतां यांनीं 'समालोचक' (१९०८) नांवाचें मासिक काढलें होतें. पण तें फार वर्षें चालूं शकलें नाहीं. यांचे 'पुराण-निरीक्षण', 'भारतीय रसायनशास्त्र', 'रामायणनिरीक्षण' हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. 'भारतीय रसायनशास्त्राचें' तर कानडी व हिंदी या भाषांत भाषांतरहि झालें आहे. हे अखेरीच्या दिवसांत पुणें, न्यू इंग्लिश स्कूलमध्यें संस्कृतचे शिक्षक होते.

यांचें वाङ्मयः—१ रसमंजरी-भाषान्तर, २ नित्यबोध-काव्य १९०२, ३ जपानची राष्ट्रभक्ति १९०५, ४ भारतीय रसायनशास्त्र, ५ रामायण-निरीक्षण १९१४, ६ पुराण-निरीक्षण १९१२.

काळे, यादव माधव— (जन्म स. १८८१-मृत्यु स. १९४३) नागपूर कायदे-कौन्सिलचे अध्यक्ष, इतिहास-संशोधक, लेखक व बी. ए. एल्एल्. बी. वकील बुलढाणा (वऱ्हाड). हे मोठे मनमिळाऊ, अभ्यासक व लोकप्रिय गृहस्थ होते.

हे नागपूर कायदेकौन्सिलांत निवडून आलेले सभासद होते (२४-३७). तेथें हे अध्यक्षहि झाले (स. १९२६). तसेंच हे हैद्राबाद-संस्थान-प्रजापरिषद-मुंबई-अधिवेशनाचे (१९२६) व रावेरखेडी येथें होणाऱ्या बाजीराव उत्सवाचेहि अध्यक्ष होते (१९३२).

तसेंच वऱ्हाड मध्यप्रांत व्हर्ना. लिटररी अॅकॅडमी (अध्यक्ष), विदर्भ-साहित्यसंघ (उपाध्यक्ष), नागपूर-युनिव्हर्सिटी अॅकॅडमी व एक्झिक्युटिव्ह कौन्सिल (मेंबर),

देशी भाषापरीक्षक-संघाचे प्रमुख वगैरे अनेक नात्यांनीं यांचा अनेक सरकारी व निमसरकारी संस्थांशीं संबंध असे.

यांचे ग्रंथः—१ वऱ्हाडचा इतिहास, २ गोंडांचा इतिहास, ३ शशिसेनाकाव्य (संपादित), ४ ऐतिहासिक पत्रें यादीचे संपादक (सहकार्यानें), ५ नागपूर प्रान्ताचा इतिहास (१९३४), ६ नागपूर अफेअर्स (पूना रेसिडेन्सी पेपर्स), ७ नागपूर भोसल्यांची बखर (संपादित).

काळे, रा. ब. रावजी रामचंद्र—(जन्म स. १८६८–मृत्यु स. १९३६) सातारचे सुप्रसिद्ध वकील व सार्वजनिक कार्यकर्ते.

सातारा हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा पास होऊन हे डेक्कन व एल्फिन्स्टन कॉलेजमधून एम्. ए. झाले. मॅट्रिकच्या परीक्षेंत पहिली 'जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति' यांनीं मिळवली. यानंतर यांनीं एलएल्. बी. पास होऊन वकिली करण्यास सुरुवात केली (१८९२). यानंतर कांहीं दिवस हे सरकारी वकील व पब्लिक प्रॉसिक्युटर (१९०२–२०) होते. याचेच पाठोपाठ हे मुंबई कायदे-कौन्सिलांत निवडून आले व अगदीं थोड्या अपवादानें हे अखेरपर्यंत सतत निवडून येत. पहिल्या बार कौन्सिलमध्येंहि हायकोर्टतर्फे यांची नेमणूक झाली होती.

सातारा येथील लिबरल असोसिएशनचे संस्थापक (१८९६) व कार्यकर्ते या नात्यानें हे प्रथम लोकांच्या डोळ्यांसमोर आले. साताऱ्याच्या नॅशनल लिबरल-लीगच्या संस्थापकांतहि हे प्रमुख होते.

हे साताऱ्याच्या 'ऐक्य' या साप्ताहिकाचे मूळ संस्थापक व संपादक होते. या पत्रांतील यांच्या स्पष्ट व सडेतोड विचारसरणीमुळेंच यांचेकडे घरचालत येणारें मंत्रिपद यांना मिळूं शकलें नाहीं.

प्रार्थनासमाजाचे चहाते व भक्तिमार्गाचे पुरस्कर्ते ही यांची आणखी एक महत्त्वाची भूमिका होती. न्या. मू. म. गो. रानडे व गो. कृ. गोखले हे यांचे राजकीय बाबतींतील गुरु व आदर्श होते.

यांच्या अभ्यासप्रधान व त्यागी सेवापर वृत्तीवर प्रकाश पाडणारी 'दि गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स' (स्थापना स. १९३०) ही संस्था आहे. हिच्याकरितां यांनीं भारतसेवकसमाजाला सव्वा लक्ष रुपये दिले. ना. गोखले यांनीं आपले गुरु महादेव गोविंद रानडे यांच्या नांवानें संस्था काढून ज्याप्रमाणें आपलें ऋण फेडलें त्याप्रमाणें यांनींहि पण गोखले यांचे नांवें राजकारण व अर्थशास्त्र यांचा सूक्ष्म अभ्यास करणारी ही संस्था निर्माण करून आपला गोखल्यांच्या कार्यपद्धतीसंबंधीचा उत्कट आदर व्यक्त केला. यांचें स्वतःचें नांव त्या संस्थेला देण्याची सूचना आली असतांहि यांनीं गोखल्यांच्या नांवें संस्था काढण्याचा हेतु सिद्धीस नेला यावरून यांच्या तत्त्वनिष्ठेची कल्पना येते. यांच्या हेतूप्रमाणें संस्थेचें कार्य चालू आहे. तिच्यामध्यें मुंबई युनिव्हर्सिटीच्या एम्. ए. परीक्षेस बसणारे अनेक पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थी व्याख्यानादि रूपें शिक्षण घेत असतात. या संस्थेच्या कार्यकर्त्यांत यांचे जामात प्रि. ध. रा. गाडगीळ, यांच्याशिवाय श्री. व्ही. आर. गाडगीळ, बी. एजी. (मुंबई), एम्. एससी. (कॅलिफोर्निया) व श्री. एल्. व्ही. गोगटे, बी. एस्. (एन्. करोलिना) हे सद्गृहस्थ आहेत.

या संस्थेतर्फे १ हिंदी अधिकाऱ्यांचे पगार, २ ओटावा करारांचें परीक्षण, ३ पुण्यांतील फळबाजाराची पाहणी, ४ महाराष्ट्रांतील सहा जिल्ह्यांतील मोटार बसेसच्या वहातुकीची पाहणी अशीं अभ्यासपूर्वक लिहिलेलीं प्रकाशनें प्रसिद्ध झालीं आहेत. यांपैकीं पहिलीं दोन प्रि. ध. रा. गाडगीळ यांनीं लिहिलीं असून बाकीचीं दोन त्यांच्या साहाय्यानें त्यांच्या मदतनीसांनीं लिहिलीं आहेत. आणखीहि कांहीं पुस्तकें तयार आहेत.

सतत कांहीं तरी सार्वजनिक कार्य करीत राहणें आणि लोकांना उपयोगी पडणाऱ्या शिक्षणप्रधान संस्थांना मदत करणें हा यांचा स्वभावच बनला होता.

या दृष्टीनें सातारच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या वाचनालयाकरितां यांनीं दिलेली पांच हजार रुपयांची देणगी व भाऊराव पाटलांच्या रयतशिक्षण संस्थेस दिलेले अकरा हजार रुपये उल्लेखनीय आहेत. त्याचप्रमाणें यांनीं सातारच्या कन्याशाळेस आपला पंचवीस हजार रुपयांचा वाडा देऊन कन्याशाळा व महिलासदन या संस्था 'सौ. सत्यभामाबाई काळे-शिक्षणमंदिर' या नांवानें अनाथ बालिकाश्रमानें चालवाव्यात असें ठरवून दिलें.

तसेंच 'दि रामचंद्र बल्लाळ काळे आयुर्वेदिक डिस्पेन्सरी फंड' या नांवें ट्रस्ट करून पांच हजारांची देणगी दिली व आयु. धर्मार्थ दवाखाना चालविण्याची व्यवस्था केली.

मृत्यूपूर्वी यांनीं 'काळे धर्मादाय निधि' निर्माण करून संस्था व गरीब विद्यार्थी यांना दरमहा सहाशें रु. देण्याची व्यवस्था केली आहे.

मुंबई इलाख्यांतील जमीनधारापद्धति (लँड रेव्हेन्यु कोडच्या १९२८ च्या बिल नं. १४ च्या मसुद्याची इंग्रजी चिकित्सा), गृह्यधर्मचंद्रिका–विवाहसंस्कार, राष्ट्रीय–शिक्षण, सनातनधर्म–दीपिका, शिक्षणाचा प्रश्न, गीताधर्म-कौमुदी (इंग्रजी) हे यांचे ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. श्री. चं. ह. पळणिटकरांनीं 'पुरुषोत्तम' नांवाचें यांचें चरित्र प्रसिद्ध केलें आहे.

काळे, प्रो. वामन गोविंद—(जन्म स. १८७६) सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व अनेक व्यापारी संस्थांचे प्रवर्तक.

हे पुणें न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज पुणें येथें शिक्षण घेऊन एम्. ए. झाले. नंतर डेक्कन एज्यु. सोसायटींत आजीव सभासद म्हणून प्रविष्ट झाले (१९०७). यांचा विषय इतिहास व अर्थशास्त्र हा होय. हे मुंबई विश्वविद्यालयाचे फेलो (१९१९-१९२४), कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद (१९२१-२३), तसेंच इंडियन टॅरिफ बोर्डाचे सभासद होते (१९२३-२५). डेक्कन एज्यु. सो.चे चिटणीस म्हणूनहि यांनीं काम केलें आहे (१९२५-२८).

हे राजकारणांत प्रागतिक पक्षाचे आहेत. राजकारण व समाजसुधारणा यांवर यांनीं मधूनमधून लिहिलें असलें तरी यांचे ग्रंथ अर्थशास्त्रावरच विशेष आहेत. यांनीं अर्थशास्त्राचा अभ्यास विशेषतः जर्मन भाषेंतून केला आहे.

हिंदी अर्थशास्त्राचे जनक मानले गेलेल्या रानड्यांच्या व गोखल्यांच्या शिष्यत्वाचा मान यांना मिळालेला आहे. अध्ययन, अध्यापन व लेखन या त्रयीच्या साहाय्यानें यांनीं आपल्या गुरूंची परंपरा अत्यंत उज्ज्वल रीतीनें चालविली. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्यें इतिहास व अर्थशास्त्र यांचे जवळजवळ वीस वर्षेपर्यंत हे प्राध्यापक होते. याच वेळीं आपल्या बहुमोल व बहुगुणी लेखांनीं यांनीं हिंदी अर्थशास्त्रीय विचारांना चालना दिली आहे.

इंडियन इकॉनमिक असोसिएशनचे हे प्रथमपासूनच एक मोठे कार्यकर्ते असून त्या संस्थेच्या इंडियन जर्नल ऑफ इकॉनमिक्स या पत्राचे अनेक वर्षे संपादक आहेत. रिकामी जागा भरणाऱ्या इंडियन इकॉनमिक कॉन्फरन्सचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें होतें; परंतु त्याच वर्षी सरकारनें 'फर्स्ट इंडियन टॅरिफ बोर्ड'वर यांना नेमल्यानें तें स्थान हे स्वीकारूं शकले नाहींत. परंतु मग म्हैसूर येथें भरलेल्या इंडियन इकॉनमिक कॉन्फरन्सच्या १२ व्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. त्या वेळीं यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय 'इकॉनमिक्स इन इंडिया' हा होता (१९२९).

मुंबई सरकारनें नेमलेल्या लोकल सेल्फ गव्हर्नमेंट कमेटीचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें होतें (१९३८). सहकारी पतपेढ्या हा यांचा अत्यंत आवडीचा विषय असून त्यामधील एक थोर कार्यकर्ते व ग्वाल्हेर संस्थानचे सल्लागार या नात्यानें यांची योग्यता केव्हांहि मोठीच आहे.

यांच्या भूतपूर्व विद्यार्थ्यांनीं लिहिलेल्या स्फुटांचा संग्रह असणारा 'हिस्टॉरिकल अँड इकॉनमिक स्टडीज' हा ग्रंथ यांना सादर करण्यांत आलेला आहे. मुंबई प्रांतांतील विद्यार्थिविश्वांत हे किती लोकप्रिय गृहस्थ आहेत याचा हा जिवंत पुरावाच आहे.

अर्थशास्त्रीय विषयांवरील यांचे ग्रंथ केव्हांहि प्रमाणभूत मानण्याइतके महत्त्वाचे आहेत. अर्थशास्त्रीय, व्यापारी व उत्पादक अशा अनेक संस्थांशीं यांचे संबंध निगडित झालेले आहेत.

यांचे ग्रंथः—(१) बँका व त्यांचे व्यवहार (मराठी), (2) Indian Industrial and Economic Problems, (3) Indian Administration, (4) Indian Economics, (5) Dawn of Modern Finance in India, (6) Gokhale and Economic Reforms, (7) India's War Finance, (8) Currency Reform in India, (9) Constitutional Reforms in India, (10) Economics of Protection in India, (11) Economics in India, (12) Problems of World Economy, (13) India's Finance Since 1921.

'अर्थ' या मराठी साप्ताहिकाचे हे संस्थापक व संपादक आहेत.

किबे, सरदार माधवराव विनायकराव—(जन्म स. १८७७)

इंदूर येथील सुप्रसिद्ध राजकारणज्ञ, संशोधक, अभ्यासक; संस्कृत, इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेंत लेखनादि करणारे विद्वान् गृहस्थ.

यांचें घराणें मूळचें संगमेश्वरचें (जि. रत्नागिरी, ता. राजापूर); उपनांव 'देवेश्वर'. पुढें 'नाईक' म्हणूं लागले व नंतर 'किबे' म्हणून प्रसिद्ध झाले.

हें घराणें २०० वर्षांपूर्वी खानदेशांत चोरवाड प्रान्त, उत्राण येथें येऊन राहिलें. व पुढें होळकरशाहींत महेश्वरास आलें. तेथें विठ्ठल महादेव यांचे वडील बंधु बाळाजी महादेव हे जोगांचे पेढीवर काम करीत होते. विठ्ठल महादेव यांनींहि आपल्या कर्तबगारीस त्याच पेढीवर सुरुवात केल्यामुळें ते आपणास जोग म्हणवूं लागले.

विठ्ठल महादेव हे श्रीमंत यशवंतराव महाराज होळकर यांच्या फौजेंत कर्नल फुलन् यांच्या कंपूंत तोफांवर अधिकारी होते. पुण्याच्या लढाईंत त्यांनीं स्वतः तोफा डागल्याचें अस्सल पत्र उपलब्ध आहे. त्यांना तुळसाबाईचा वध करून तिच्या फौजेनें नवं. १९१७ मध्यें कैदेंत घातलें.

विठ्ठल महादेव यांचे हातून ६ जाने. १८१८ रोजीं होळकरांच्या फौजेचा महत्पूरचे लढाईंत सपशेल पराजय झाल्यानंतर मंदोसरचा तह होळकर सरकार व ईस्ट इंडिया कंपनीमध्यें झाला. त्यांनीं मरेपर्यंत होळकरशाहीचा कारभार केला. त्या वेळीं फौजेचे बखेडे व सरंजामी सरदारांचीं उत्पन्नें कमी करून, देशांत शांतता नांदवून व सुबत्ता वाढवून राज्याचें उत्पन्न ४ पासून २६ लक्षांवर नेलें. आमच्या मध्ययुगीन चरित्रांत विठ्ठल महादेव किबे ऊर्फ तात्या जोग यांचें चरित्र दिलें आहे. त्या विठ्ठल महादेवाचे सध्यांचे माधवराव हे वंशज होत. त्यांचा वंशक्रम असाः- महादेव-विठ्ठल-गणेश-विनायक-माधव.

हे संस्कृत, मराठी, इंग्रजी व हिंदी या भाषा उत्तम जाणणारे, त्यांतील वाङ्मयाचा व्यासंग करणारे आणि शेवटल्या तीन भाषांत लेखन करणारे आहेत. शिवाय राजकारणी मुत्सद्दी हा आपल्या घराण्याचा लौकिकहि यांनीं उत्तम प्रकारें संभाळला आहे. त्यामुळेंच रावबहादूर ही इंग्रज सरकारकडून व वजीर-उद्दौला (अर्थ- "सचिवोत्तम") ही होळकर सरकारकडून पदवी देऊन यांचा गौरव करण्यांत आला आहे.

धाकटी पाती (देवास) चे हे दिवाण (स. १९११-१४); इंदूरच्या महाराजांचे हे हुजूर सेक्रेटरी (स. १९१४-१६); एक्साइज व होम मिनिस्टर (स. १९१६-२६) व डेप्युटी प्राइम मिनिस्टर (स. १९२६ ते १९३३) होते.

मराठी व हिंदी भाषेच्या विशेष सेवेमुळें ते महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे मुंबई (स. १९२६) व मुंबई इलाख्याच्या सरदार, जहागिरदार, इनामदार, तालुकेदार परिषदेचे अध्यक्ष होते (स. १९३१).

कोल्हापुरास श्रीमंत महाराजा गायकवाड न आल्यानें मराठी साहित्य संमेलनाचे हे अध्यक्ष होते (१९३२). महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अनेक वर्षें व मराठी साहित्य सभा इंदूरचेहि अध्यक्ष आहेत. इंदूरच्या धारासभेचे लोकनियुक्त सभासद आहेत.

यांचा व्यासंग मोठा व्यापक असून त्यांत सूक्ष्मताहि असते. पुराणवस्तु, प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहास, अर्थशास्त्र, राजकारण व साहित्य या विषयांवर यांचे लेख प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांपैकीं महेंजोदारो व हरापा येथील संस्कृति भूमिगत केव्हां झाली असेल त्याचा रामायणावरून यांनीं लावलेला छडा व लंकेचा शोध महत्त्वाचा वाटतो.

यांचे लेख-वेदकालनिर्णय (ग्रंथमाला-कोल्हापूर), सार्वत्रिक, सार्वजनिक व सक्तीचें शिक्षण इत्यादि मराठी व दि लीग ऑफ नेशन्स व इंडियन स्टेट्स, करन्सीज इन इंडियन स्टेट्स, ब्रिटिश इंडियन सी कस्टम्स् ड्यूटी अँड इंडियन स्टेट्स हे इंग्रजी ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

किर्लोस्कर, बळवंत पांडुरंग ऊर्फ आण्णासाहेब— (जन्म स. १८४३-मृत्यु स. १८८५)

मराठी रंगभूमीवरील संगीत नाटकाचे नवयुगप्रवर्तक आचार्य, रसिक नाटककार व हौशी नट.

धारवाड जिल्ह्यांत गुर्लहोसूर गांवीं यांचा जन्म झाला. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत यांनीं कानडी-मराठींचा अभ्यास घरींच केला. पुढें इंग्रजी दोन इयत्तांचा अभ्यास यांचा कोल्हापूर येथें झाला. नंतर धारवाड येथें अभ्यास करून यांनीं मुलकी परीक्षा दिली. नंतर शिक्षणाकरितां यांना पुणें येथें ठेवण्यांत आलें. तेथें यांनीं कविता कराव्यात, नाटकें पाहावींत असा क्रम ठेविला. हरदास लोकांकरितां आणि पौराणिक नाटकांकरितांहि हे पदें करून देत. पुढें यांनीं भारत शास्त्रोतेजक नाटक मंडळी काढली आणि नगर येथें जाऊन 'विक्रम चरित्र' व 'बाजीरावाचा फार्स' वगैरे नाटकें केलीं. पण पुढें मंडळींतील लोक फुटल्यानें व यांनाहि घरच्या लोकांचा धाक उत्पन्न झाल्यानें हे गांवीं जाऊन तेथेंच राहूं लागले (१८६६).

दक्षिणा प्राइझ कमेटीनें बक्षीस लावल्यावरून यांनीं घरीं बसल्या बसल्या शिवाजी महाराजांवर ५०० आर्या केल्या. पण तें बक्षीस यांना न मिळतां महादेव मोरेश्वर कुंटे यांच्या शिवाजी काव्यास मिळालें. नंतर बेळगांव येथें यांनीं आठ वर्षें शिक्षकाची नोकरी केली. तेथें असतांना स. १८७३ सालीं यांनीं 'श्री शांकरदिग्विजय' हें गद्य नाटक लिहिलें. गायन, नाटक वगैरे यांचा छंद चालूच होता. त्या नोकरीनंतर यांनीं पोलीस खात्यांत जमादारीची व पुढें लवकरच रेव्हेन्यु कमिशनरचे आफिसांत नोकरी पत्करिली. ऑफिसच्या कामासाठीं हे पुण्यास आले असतां यांनीं एका पारशी कंपनीचें नाटक पाहिलें आणि यांना आपल्या मित्रमंडळीच्या साह्याने नाटक करण्याची तीव्र इच्छा झाली. यांनीं स्वतःच संस्कृत शाकुंतलाचें मराठी भाषान्तर करून तें आपल्या निवडक सहकार्याकडून क्रमानें रंगभूमीवर आणिलें. त्याच्या अपूर्व यशानें यांनीं कंपनीची रीतसर स्थापना केली, मिळकतीचा हिस्सा सर्वांना दिला आणि सौभद्र नाटक लिहून तें रंगभूमीवर आणलें. संपूर्ण महाराष्ट्राचें लक्ष यांनीं आपल्याकडे ओढून घेतलें. रसपूर्ण नाटक, उत्तम गुणी लोकांचा नटवर्ग आणि वैभवपूर्ण हौशी योजकता यांमुळें रसिक-अरसिक सर्वच लोकांत यांची चहा सुरू झाली. त्यानंतर यांनीं रामराज्यवियोग हें नाटक लिहिण्यास घेतलें. तीन अंक लिहून चवथा अंक सुरू केला आणि यांना देवाज्ञा झाली. यांच्या मंडळीला इंदूर सरकारचा आश्रय होता. हे खुद्द रेव्हेन्यु कमिशनरच्या आफिसनंतर इंदूर सरकारचे नोकर होते. पण कंपनीच्या दगदगीनें प्रकृति बिघडून मधुमेहाच्या विकारानें यांचा लवकर शेवट झाला. शेवटीं यांनीं आतुरसंन्यास घेतला होता. यांचे परमार्थ मार्गांतील गुरु रामचंद्रबुवा तिकोटेकर नांवाचे एक वेदान्तमार्गी गृहस्थ होते. मोरोबा वाघोलीकरांनींहि त्यांचाच उपदेश घेतलेला होता.

यांचें वाङ्मयः— १ फुटकळ उपलब्ध पद्यें सुमारें १९ कथाभागांवरील, २ अल्लाउद्दीनाची चितुडगडावरील स्वारी नाटक (१८७० सुमार अपूर्ण), ३ शांकरदिग्विजय नाटक (१८७३), ४ शाकुन्तल नाटक (पहिला प्रयोग ३१ ऑक्टो. १८८०, आनंदोद्भवनाटकगृह पुणें, प्रथम चार अंकी प्रयोग. १८८२ सालीं भाऊराव कोल्हटकर आल्यावर शकुन्तलेला पदें घालण्यांत आलीं), ५ सौभद्र, (पहिला तीन अंकी प्रयोग १८ नवं. १८८२, पहिला पांच अंकी प्रयोग मार्च १८८३), ६ रामराज्यवियोग (पहिले फक्त तीन अंक, पहिला प्रयोग २० ऑक्टो. १८८४).

शांकरदिग्विजयाचा मंगलाचरणाचा प्रवेश पूर्वीचीं गणपति-सरस्वतीचीं पात्रें गाळून यांनीं लिहिला असला तरी त्यावर पूर्वीच्या नाटकांची छाप आहे. विचित्र पोषाख केलेला विदूषक, त्याच्या बालिश कोट्या आणि तदनुरूप अभिनय हा तेथें यांनीं घातला आहेच.

कालिदासाच्या जगद्विख्यात शाकुंतल नाटकाचें यांचें भाषांतर सरस उतरलें आहे. मराठींत झालेलीं इतर भाषान्तरें प्रयोगाला व गाण्याला गैरसोयीचीं असून तितकीं सरस नाहींत. तथापि मूळ नाटकाचें बंधन असल्यामुळें तितकें आटोपसर, ठसठशीत व उठावदार वाटत नाहीं. पण शेवटलीं दोन नाटकें मात्र अगदीं स्वतंत्र व यांच्या उज्ज्वल प्रतिभेचा उत्कृष्ट नमुना आहेत. त्यांत चटकदार संवाद, कथानकाचा विकास, स्वभावपरिपोष, काव्यरचना, विनोद इत्यादि नाटकास आवश्यक असणारे गुण चांगले दृष्टीस पडतात.

शाकुन्तल नाटकाचें भाषान्तर, या दोन नाटकांतील प्रस्तावना व रचनाविशेष यांवरून यांचा संस्कृत भाषेचा आणि विशेषतः नाटकांचा अभ्यास चांगलाच व्यक्त होतो. तथापि केवळ नवीनपणापेक्षां संवादांचा चटकदारपणा, सहजमनोहर अशी पद्यरचना या गुणांमुळें यांचीं हीं नाटकें मराठीचे अविनाशी अलंकार झाले आहेत. आबालवृद्धांना घटकाभर करमणूक करून आनंद देण्याच्या बाबतींत यांच्याइतका यशस्वी नाटककार अद्यापि झाला नाहीं.

यांच्यापूर्वी होणारीं पौराणिक नाटकें सूत्रधार, विदूषक, गणपति व सरस्वती यांच्या अनुक्रमानें होणाऱ्या प्रवेशानें सुरू केलीं जात. यांनीं संस्कृत भाषेंतील पद्धतीचेंच अनुकरण केलें आणि सूत्रधार व पारिपार्श्वक यांचेकडून मंगलाचरणपूर्वक नटीशीं संभाषण करून नाटकाची प्रस्तावना केली. पौराणिक नाटकांतील सर्वच पात्रांचीं पदें सूत्रधारांनीं म्हणण्याची पद्धतिहि यांनीं बंद करून सूत्रधाराचें काम प्रस्तावनेपुरतेंच ठेवून त्या त्या पात्रास गाण्यास लावलें. पौराणिक नाटकांत विदूषक केव्हांहि प्रवेश करी तेंहि यांनीं बंद केलें. पौराणिक नाटकाला तुटक व चमत्कृतिप्रधान रूप आलें होतें तेंहि बदलून यांनीं सलग व रसाविर्भाव करणारी मांडणी करण्यास सुरुवात केली. नाटक-मंडळ्यांचें बकाली स्वरूप नाहींसें करून त्यांना शिस्तवार व भार-

दस्त रूप दिलें. व्यसनी, अशिक्षित व हलक्या समजल्या जाणाऱ्या लोकांच्या ताब्यांत नाट्य संस्था होती ती यांनीं गुणी, सुशिक्षित, वजनदार व कलावान् लोकांच्या ताब्यांत आणली. नाटकांच्या रचनेंत यांनीं आमूलाग्र बदल केला त्याप्रमाणें नाटक-मंडळींच्या रचनेंतहि यांनीं अनदीं नवी व भारदस्त व्यवस्था उत्पन्न केली. एखाद्या राजाच्या मर्जीवर नाटकमंडळ्या न चालतां स्वतःच्या कलेवर व्यवस्थित चालतील अशी आर्थिक आंखणी करण्याचें श्रेयसुद्धां यांनाच द्यावयास पाहिजे. संगीताच्या कल्पनेंतसुद्धां यांनीं क्रान्ति केली. पूर्वी हरदासी पद्धतीवर रचलेलीं पदें नाटकांत प्रायः एकाच माणसानें म्हणजे सूत्रधारानें म्हटलेलीं ऐकण्याचा प्रसंग श्रोत्यांवर येई. पण यांच्या योजनेप्रमाणें वेगळाल्या चालीवर रचलेलीं सरस पदें वेगळाल्या नाणावलेल्या गायकांच्या तोंडून ऐकण्याची संधि श्रोत्यांना मिळूं छागली. पोषाख वगैरे बाबतींतहि अशीच क्रान्ति होत होत महाराष्ट्रांतील रंगभूमि आणि तीवर काम करणाऱ्या नटांनीं हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्रान्तांपेक्षां आपला या कलेंतील व व्यवस्थेंतील अग्रेसरपणा चांगलाच व्यक्त केला आणि अजूनहि तो टिकविल्याचें श्रेयसुद्धां यांच्या भव्य आणि व्यापक योजकतेलाच द्यावें लागेल. समाजांतील तत्कालीन श्रेष्ठ पुढाऱ्यांचें सहकार्य मिळविण्याच्या यांच्या प्रयत्नासुद्धां महत्त्व द्यावयास पाहिजे. यांच्या हस्तपत्रकावर लो. टिळक वगैरेंच्या सह्या असत व यांच्या सल्लामसलतगारांतहि त्या वेळच्या न्या. रानडे, डॉ. गर्दे वगैरेंचा समावेश असे.

कर्तृत्व, गुणग्राहक भव्य दृष्टि आणि यांची यांना स्वस्थ बसूं न देणारी हौस या एकापेक्षां एक प्रकारांनीं यांच्या कर्तृत्वाचा प्रकर्ष झालेला आहे. कलेचा आविष्कार हा उचंबळून आपण होऊन प्रगट होत असतो. याबाबत यांचें उदाहरण नमुनेदार आहे. यांना नाट्यकलेची पराकाष्ठेची हौस. हे स्वतःहि नाटकांत कामें करीत. यांचीं सूत्रधार, बलराम व दशरथ हीं कामें प्रसिद्ध आहेत. यांना आवाजाची देणगी नसली तरी यांचा अभिनय चांगला व अर्थपूर्ण असे. आपल्या इष्टदेवतेच्या भक्तीचें निदर्शक असें यांनीं एक शिवपंचायतनाचें घेतलेलें चित्र प्रसिद्ध आहे. त्यांत यांनीं स्वतः शंकराची भूमिका पत्करून सुप्रसिद्ध नट भाऊराव कोल्हटकर यांस यांनीं पार्वतीची भूमिका देऊन मांडीवर घेतलें आहे, व इतर गण तयार करून शिवपंचायतनाचें चित्र काढलें आहे. या शिवपंचायतनाची किर्लोस्कर नाटक मंडळींत नित्य पूजा होत असे. यावरून यांच्या हौशी आणि रंगेल स्वभावाची, तसेंच मनांत आलेली कल्पना उत्कृष्टपणें व्यवहारांत आणण्याची चिकाटी, खर्चिकपणा आणि कलादृष्टि नजरेस येते.

मोरोबा वाघोलीकर, बाळकोबा नाटेकर, शंकर बापूजी मुजुमदार, भाऊराव कोल्हटकर, इत्यादि यांचे सहकारी होते. यांपैकीं पहिले तीन अगदीं प्रारंभापासून असून पुढले यांना क्रमानें येऊन मिळाले.

यांच्या सहकारी मंडळींनीं यांच्यानंतर कृतज्ञता प्रगट करण्याकरितां यांच्या नाटकांचे पुण्यामुंबईस प्रयोग करून त्याचें अठराशें रुपये उत्पन्न यांच्या वडिलांस दिलें. किर्लोस्कर मंडळीच्या उत्पन्नांत यांच्या पत्नीस अडीच आण्याचा हिस्सा ठेवून तो कायमपणें पोंचविला. त्यांनींहि गुर्लेहोसुर या गांवीं यांच्या नांवें 'बळवन्तेश्वर' नांवाचें शिवालय बांधून त्याच्या पूजाअर्चेची व तेथें अन्न छत्र चालविण्याची व्यवस्था केली. किर्लोस्कर नाटक मंडळी यांच्या मागें पुष्कळच वर्षे अत्यंत वैभवानें व रुबाबानें चालली (१९२४). शेवटपर्यंत तिच्या व्यवस्थेचें काम कै. शंकर बापूजी मुजुमदार यांनीं चालविलें. 'किर्लोस्कर नाटक-गृह' बांधून त्यांचें भव्य स्मारक उभारलें. यांच्या कंपनींत भाऊरावांनंतर बालगंधर्वांसारखे विख्यात नट उदयास आले. अलीकडे यांची जन्मशताब्दि महाराष्ट्रांत साजरी झाली व यांचे ग्रंथ 'समग्र किर्लोस्कर' म्हणून प्रसिद्ध करण्यांत आले.

किर्लोस्कर, लक्ष्मण काशीनाथ—(जन्म स. १८६९) सुप्रसिद्ध कारखानदार. यांचा जन्म धारवाड येथें झाला. इंग्रजी पांच इयत्तांपर्यंत शिक्षण झाल्यावर मुंबई व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्यें यांनीं दहा वर्षे शिक्षकाची नोकरी केली. नंतर वडील बंधूंसह यांनीं बेळगांव येथें सायकल-दुरुस्तीचें दुकान काढलें. स. १९०० सालीं शेतकीचीं लोखंडी आउतें तयार करण्याचा कारखाना काढला. अशा प्रकारचा हा हिंदुस्थानांतील पहिलाच कारखाना होय. स. १९१० सालीं कारखाना बेळगांव येथून औंध संस्थानच्या हद्दींत आणून किर्लोस्करवाडीची स्थापना केली. पुढें क्रमानें वाढ होत होत १९२० सालीं यांच्या चालकत्वाखालीं १६ लक्ष रुपये भांडवलाच्या लिमिटेड कंपनींत त्याचें रूपान्तर करण्यांत आलें. तेव्हांपासून किर्लोस्कर बंधु लि. या कारखान्याची भरभराट वाढतच आहे.

गेल्या दोनतीन वर्षांत किर्लोस्कर कारखान्याची आणखीहि बरीच वाढ झाली आहे. किर्लोस्करवाडी-प्रमाणें म्हैसूर संस्थानांतील हरिहर येथेंहि किर्लोस्कर कारखान्याचें एक भावंड निर्माण झालें असून त्याची उत्तरोत्तर अधिकाधिक प्रगति होत आहे. किर्लोस्कर-वाडीच्या कारखान्यांत सध्यां दीड हजाराहून अधिक लोक काम करीत आहेत. दोनशें अश्वशक्तीचीं एंजिन्स तयार करण्याचें काम किर्लोस्कर बंधु लवकरच हातीं घेणार असून त्याची पूर्वतयारी चालू आहे.

कारखान्याव्यतिरिक्त यांना खासगी असें जीवन नाहीं, असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. पाऊणशें वयमान होऊन गेल्यामुळें हे दिसायला वृद्ध दिसतात आणि यांना दिसतेंहि कमी. परंतु, तरी देखील हे घरीं स्वस्थ बसून कधींच राहावयाचे नाहींत. कारखान्याच्या यंत्रशाळेंत कसल्या तरी प्रयोगांत गर्क असलेले हे आढळतील. यांना बसून किंवा पडून राहणें ही फार मोठी शिक्षा वाटते. यांना साधें सुपारीचेंहि व्यसन नाहीं. यांना व्यसन असलेंच तर तें सतत काम करीत राहावयाचें आणि फावल्या वेळीं वाचनाचें. गेली पंचवीस वर्षे हे खादीचेच कपडे वापरीत आलेले आहेत व यांनीं चहापान वर्ज्य मानलेलें आहे.

किशनप्रसाद, महाराजाबहादूर सर— (जन्म स. १८६४–मृत्यु स. १९४०) हैद्राबाद संस्थानचे मुख्य प्रधान, राजकारणी मुत्सद्दी व प्रसिद्ध उर्दू कवि. हे सुप्रसिद्ध मोगल बादशहा अकबर याच्या दरबारीं असणाऱ्या राजा तोडरमल्लांचे वंशज. यांचें घराणें हैदराबाद राज्याचे संस्थापक निजाम-उल्मुल्क यांचेबरोबर प्रथम दक्षिणेंत आलें. आणि त्यांचे पदरीं आजपर्यंत नांदत आलें आहे. तेथें यांच्या घराण्याला मोठी जहागीरहि पण आहे. पेशकार म्हणजे अर्थसचिव हा यांच्या घराण्याचा हुद्दा आहे.

प्रथम हे पेशकार झाल्यानंतर यांना 'राजा राजायान महाराजा बहादूर' ही पदवी देण्यांत आली (१८९२). नंतर मुख्य प्रधानाच्या जागीं यांना कायम करण्यांत आलें (१९०१). ब्रि. सरकारनें पुढें के. सी. आय. ई. या पदवीनें यांना भूषित केलें (१९०३), व निजाम-सरकारनें 'समीनुस्सलतनत' ही पदवी दिली. पुढें ब्रि. सरकारनें जी. सी. आय. ई. ही पदवी दिली (१९०७).

यांची कारकीर्द हिंदु-मुसलमानांचें ऐक्य व प्रजेचा संतोष या दृष्टीनें समाधानकारक चालू असतांच व्हाइस-रॉय लॉर्ड कर्झन यांनीं बऱ्हाडचा आणि निजामाच्या कर्जाचा प्रश्न उपस्थित करून २५ लक्ष रुपयांच्या खंडणी-वर बऱ्हाडप्रांत ब्रिटिशांना कायमचा देण्याबद्दल प्रश्न उपस्थित केला आणि तो यांच्याकडून मान्य करून घेतला. त्या कारवाईंत यांना आणि ब्रिटिश सरकारला अनेकांनीं दोष दिला.

सध्यांचे निजाम उस्मानअली हे स. १९११ सालीं गादीवर आले आणि हैद्राबादच्या राजकारणांत क्रांति घडून आली. जवळजवळ सर्व वरिष्ठ जागांवर मुसल-मानांची नेमणूक होऊं लागली व यांना आपल्या मुख्य प्रधानाच्या जागेचा राजीनामा द्यावा लागला.

सर अली इमाम यांना मुख्य प्रधान नेमून अन्तर्गत सुधारणा व बऱ्हाड परत मिळविण्याचा प्रश्न धसाला लावण्यांत आला. पण लॉर्ड रेडिंग यांनीं बऱ्हाडची मागणी कायमची नाकारली आणि निजामसाहेब अन्तर्गत सुधारणेकडे वळले. तेव्हां कार्यकारी मंडळाच्या अध्य-क्षाच्या जागीं यांची नेमणूक करण्यांत आली (१९१६), पण वार्धक्यामुळें यांना ती जागा सोडावी लागली (१९३७) व सर अकबर हैदरी हे संस्थानच्या कार-भारांत व अधिकारांत लक्ष घालूं लागले.

हे अत्यंत विद्वान् व बहुश्रुत होते. फार्शी व उर्दू भाषेचा यांचा व्यासंग मार्मिक होता. उर्दूत हे कविता करीत. यांचा बराच कवितासंग्रह प्रसिद्ध झालेला आहे. तो वेदान्ती पद्धतीचा गूढगुंजनात्मक आहे.

यांचें वर्तन संग्राहक धार्मिक पद्धतीचें असे. हे सर्व धर्मांच्या लोकांशीं अत्यंत समानतेनें वागत. दानधर्म उदारहस्तें करीत. हे रस्त्यानें चालले म्हणजे पैसे उधळीत. यांच्या बऱ्याच पूर्वी झालेले निजामसाहेबांचे दिवाण व यांचे पूर्वज राजा चंदूलाल यांच्या औदार्याची उज्ज्वल परंपरा यांनीं पुढें चालविलेली होती (चंदूलाल पाहा).

किशोरीदत्तशास्त्री—(मृत्यु स. १९४३)

कानपूरचे सुप्रसिद्ध वैद्य व वैद्यकावरील ग्रंथकार. नि. भा. आयुर्वेद महामंडळाचे व विशेषतः त्याच्या विद्यापीठाचे हे जीव कीं प्राण होते. पुष्कळ वर्षें त्या संस्थांचे हे मंत्री होते. 'आयुर्वेद-संमेलन-पत्रिके'चे हे पुष्कळ वर्षें संपादक होते (१९३७–१९४३). शिवाय 'चिकित्सक' नांवाचें मासिकहि यांनीं पुष्कळ वर्षें चालविलें. यांनीं जयपूर राजकीय संस्कृत कॉलेजच्या

शास्त्री व आयुर्वेदाचार्य या परीक्षा दिल्या होत्या. हे संयुक्तप्रांत आयुर्वेदमंडळाचे 'आयुर्वेदभूषण' व पोपट प्रभुराम आयुर्वेद कॉलेज मुंबईचे 'प्राणाचार्य' होते.

यांचे ग्रंथः—(१) गृहवस्तुचिकित्सा, (२) प्रमेहचिकित्सा, (३) मकरध्वज, (४) सरलचिकित्सा. शिवाय यांच्या प्रेरणेनें प्रसिद्ध झालेले व संशोधून प्रसिद्ध केलेले संस्कृत ग्रंथ पुष्कळच आहेत (आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे).

किंकेड, चार्लस ऑगस्टस—(जन्म स. १८७०) प्रसिद्ध इतिहास-लेखक, अभ्यासक व आय्. सी. एस्. अधिकारी. शेरबर्न स्कूल व ऑक्सफर्डचें बॅलिओल कॉलेज येथें आपलें माध्यमिक व विश्वविद्यालयीन शिक्षण संपवून हे हिंदुस्थानला आले (१८९१). कराचीचे असि. कलेक्टर म्हणून यांनीं प्रथमतः काम करण्यास सुरुवात केली. या जागेवरून चढत जाऊन निवृत्त होण्याचे सुमारास हे मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश बनले होते.

या सर्व कारभारांत यांना सर्व हिंदुस्थानचा प्रवास घडून हिंदी इतिहास, संस्कृति व आचारविचार यांमध्यें एक प्रकारची विशेष गोडी वाटूं लागली. हिंदी इतिहासावर यांनीं लिहिलेले यांचे ग्रंथ यांच्या या तन्मयतेचें जिवंत स्मारक होऊन आपणांसमोर खडे आहेत.

हिंदुस्थानांतील–विशेषतः सिंध, गुजराथ व महाराष्ट्र या प्रांतांतील सहवासानें उत्पन्न झालेल्या उत्कंठेनें, ऐतिहासिक माहिती मिळवून यांनीं ती छोट्या छोट्या पुस्तकांत एकत्र केली आहे. नाविन्याचे दृष्टीनें आपल्या देशी वाचकांना त्यांत विशेष महत्त्व वाटलें नाहीं तरी हिंदुस्थानची बदनामी करण्याचा पद्धतशीरपणें प्रयत्न ब्रिटिशांकडून होत असतां त्यांतील सौंदर्यस्थळें दाखवण्याचा प्रयत्न त्यांच्याच एका जातभाईनें करावा हें विशेष कौतुकास्पद आहे.

सर्वच दृष्टीनीं रा. ब. द. ब. पारसनीस यांचे सहकार्यानें यांनीं लिहिलेला History of Marattha People हा त्रिखंडात्मक (१९१८, २२, २५) ग्रंथ विशेष महत्त्वाचा आहे. त्यामुळें यांचें नांव उच्चारतांच हा ग्रंथच प्रामुख्यानें डोळ्यांसमोर उभा राहतो.

यांच्या इतर ग्रंथांत (1) Deccan Nursery Tales (1914), (2) The Indian Heroes (1915), (3) The Tale of the Tulsi Plant, (4) The Out-laws of Kathiawar, (5) Tales from Indian Epics, (6) Tales of King Vikrama, (7) Tales of the Saints of Pandharpura, (8) Istur Phakde (1917), (9) The Hindu Gods and How to Recognize Them (1920), (10) Shrikrishna and other Stories (1920), (11) Tales from the Indian Drama, (12) The Anchorite, (13) Tales from Old Sind, (14) Folk Tales of Sind and Gujerat, व (15) Our Parsee Friends हे ग्रंथ प्रमुख आहेत.

यांचे चिरंजीव डेनिस किंकेड हेहि मुंबई इलाख्यांत सरकारी नोकर होते. त्यांचें 'Grand Rebel' हें शिवाजीच्या चरित्रावरील पुस्तक विशेष चटकदार म्हणून प्रसिद्ध आहे.

कीथ, डॉ. आर्थर बेरीडेल—(जन्म स. १८७९–मृत्यु स. १९४४) वैदिक वाङ्मय नि संस्कृत भाषा यांचे सुप्रसिद्ध पंडित व राज्यघटनाशास्त्रज्ञ.

एडिंबरो येथें आपलें प्राथमिक शिक्षण संपवून यांनीं बॅलिओल कॉलेजमध्यें प्रवेश केला (१८९७). याचे पुढचेच वर्षी 'बोडन संस्कृत स्कॉलरशिप' मिळवून हे बी. ए. झाले. प्राच्यविद्या हा यांच्या अभ्यासाचा प्रमुख विषय होता. अशाच तऱ्हेनें प्रावीण्य मिळवून हे 'डॉक्टर ऑफ सिव्हिल लॉ', 'होम सिव्हिल सर्व्हिस' व 'आय. सी. एस्.'च्या परीक्षा पास झाले.

इंग्लिश वसाहतींच्या विभागांत प्रथमतः यांनीं काम करण्यास सुरुवात केली. Colonial Navigation Conference ला हे ब्रि. सरकारचे प्रतिनिधि म्हणून हजर होते. या खात्यांत असतांना यांनीं इतक्या तन्मयतेनें काम केलें कीं, वरच्या अधिकाऱ्यांनीं त्याबद्दल यांना शाबासकी तर दिलीच, परंतु त्याबरोबर ज्या वसाहतींशीं यांचा संबंध आला, त्यांच्या धन्यवादाचा लाभहि यांना मिळाला. या दृष्टीनें अलास्का बौंड्री अरबिट्रेशनमध्यें यांनीं केलेल्या कामगिरीबद्दल यांना देण्यांत आलेले धन्यवाद प्रमुख आहेत.

परंतु या कामाचे धबडग्यांत आपल्या आवडत्या अध्ययनापासून–पौर्वात्य भाषांच्या अध्ययनापासून–यांना कांहीं काळ दूर राहावें लागलें. परंतु त्या अध्ययनाची संधि येतांच ती यांनीं दवडली नाहीं. प्रो. मॅक्डोनेल हिंदुस्थानच्या सफरीवर जातांच त्यांचे जागीं संस्कृतचे

'बोडन प्रोफेसर' म्हणून यांची नेमणूक झाली (१९०७-०८). त्यानंतर संस्कृतचे 'रीजियस प्रोफेसर' म्हणून नेमणूक होण्याची संधि मिळतांच तीहि यांनीं दवडली नाहीं. आणि येथेंच यांच्या लौकिक आयुष्यास खरी सुरुवात होते.

जवळजवळ तीस वर्षें अखंडपणें अध्ययन, अध्यापन व लेखन यांकरितां यांनीं आपणास वाहून घेतलें. प्रत्येक शास्त्रांत आपली स्वतंत्र दिशा प्रकट करणारी यांची बुद्धि, त्यामुळेंच यांच्या अभ्यासांत येणारी विविधता व कोणत्याहि गोष्टीचा अगदीं सूक्ष्मपणें विचार करण्याची यांची संवय कोणाहि इतिहासाभ्यासकाला आदरणीय वाटावी इतकी व्यापक आहे. यांचे गुरु प्रो. मॅक्डोनेल यांच्या सहकार्यानें यांनीं लिहिलेला 'Vedic Index of Names and Subjects' हा द्विखंडात्मक ग्रंथ यांच्या सर्व ग्रंथांत महत्त्वाचा समजण्यांत येतो. वेदासंबंधीं पाश्चात्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांतील एक श्रेष्ठ ग्रंथ येथेंच या ग्रंथाचें महत्त्व संपत नाहीं. प्रायः प्रत्येक वैदिक अभ्यासकाला या ग्रंथाच्या आधाराशिवाय आपला अभ्यास पुढें चालविणें अशक्य होऊन जातें. वैदिक भाषाशास्त्रावरील यांचें लिखाण असेंच महत्त्वाचें मानलें जातें.

'वैदिक इंडेक्स' या वेदावर यांनीं लिहिलेल्या पुस्तकाखेरीज हार्वर्ड ओरिएंटल सिरीजनें प्रसिद्ध केलेलें तैत्तिरीय संहिता (कृष्णयजुर्वेदाचें इंग्रजी भाषांतर) व Religion and Philosophy of the Veda and the Upanishadas हे यांचे ग्रंथ प्रमुख आहेत. पौर्वात्य धर्म व संस्कृति यांचें 'अखंड-भांडार' ही कीर्ति यांना या पुस्तकानेंच मिळवून दिली. हिंदुस्थानचा एकहि कालखंड असा नाहीं कीं, यांच्या एखाद्या ग्रंथाच्या आधाराशिवाय त्यामध्यें आपणांस प्रवास करणें शक्य होईल.

राज्यघटनाशास्त्रावरील प्रमाणभूत ज्ञाते म्हणूनहि यांची सर्व जगभर प्रसिद्धि होती. या शास्त्रावरील 'State Succession in International Law' (1907), 'Responsible Government in the Dominions' (1909), Imperial Unity and Dominions (दोन भाग, यांतील पहिल्या भागांत वसाहतींच्या स्वायत्ततेच्या मर्यादेचा विचार केला असून दुसऱ्या भागांत त्यांच्यामधील संघटनेच्या शक्यतेचा विचार केला आहे), Selected Speeches and Documents on the British Colonial Policy, 1763-1917 (1918), The Belgian Congo and The Berlin Act, Dominion Home Rule in Practice हे यांचे ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. यांमधील Responsible Government of Dominions हा त्रिखंडात्मक ग्रंथ विशेष महत्त्वाचा असून त्याकरितां ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीनें यांना 'डॉक्टर ऑफ सिव्हिल लॉ' ही पदवी दिली.

अलीकडे बरेच दिवस यांनीं आपलें सर्व लक्ष हिंदी तत्त्वज्ञानावर लहान परंतु सूचक पुस्तकें लिहिण्यांत केंद्रित केलें होतें. या दृष्टीनें Samkhya System (1918) व Karma Mimamsa या यांच्या ग्रंथांकडे पाहिलें पाहिजे. यांपैकीं पहिल्या ग्रंथांत सांख्यपद्धतींतील महत्त्वाच्या तत्त्वांच्या वाढीची चर्चा केली असून दुसऱ्या पुस्तकांत कर्म-मीमांसेसंबंधीं विद्यार्थ्यांना-हिंदी व परदेशी-वाटणारा बागुलबोवा नाहींसा करण्याचा प्रयत्न केला आहे. 'Indian Logic and Atomism' या यांच्या ग्रंथाचा उल्लेखहि याच ठिकाणीं करावयास पाहिजे.

हार्वर्ड ओरिएंटल सोसायटीनें प्रसिद्ध केलेले ऐतरेय-ब्राह्मण, ऐतरेय-आरण्यक, सांख्यायन-आरण्यक व कौषीतकी-ब्राह्मण यांचीं यांनीं केलेलीं इंग्रजी भाषांतरें यांच्या चिकित्सक व व्यापक बुद्धिमत्तेची साक्ष देण्यास समर्थ आहेत.

'Sanskrit Drama', 'History of Classical Sanskrit Literature' हे यांचे ग्रंथ संस्कृत वाङ्मयावरील यांचें प्रभुत्व दाखविण्यास पुरेसे आहेत.

याशिवाय संस्कृत ग्रंथांची सूचि करण्याचे बाबतींतहि यांचा हात धरूं शकणारा चतुरस्र विद्वान् अजून उत्पन्न झालेला नाहीं. लंडनच्या इंडियन इन्स्टिट्यूटमध्यें व ऑक्सफर्डच्या बोडलीयन लायब्ररीमध्यें असणाऱ्या संस्कृत व प्राकृत पुस्तकांची सूचि, बोडलीअन लायब्ररींतील पुस्तकांच्या सूचीची पुरवणी, त्याच लायब्ररींत असणाऱ्या प्राकृत पुस्तकांची सूचि इत्यादि यांचे या क्षेत्रांतील ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

या सव्यसाची व व्यापक गृहस्थाच्या नेमणुकीशिवाय जगांतील कोणत्याहि प्राचीन शास्त्रविषयक संस्थांचें कार्य चालणें शक्य नव्हतें. इंग्लंडची रॉयल एशियॅटिक सोसायटी व त्याचप्रमाणें अमेरिकन व जर्मन ओरिएंटल

सोसायट्यांनीं यांना आपले सभासद करून घेतलें होतें. Royal Asiatic Society's Society, of Comparative Legislation व Zeischrift der Deutschen Morgenlandischen Gesselschaft या संस्थांच्या पत्रांतील यांचें लिखाण सतत चालू असे.

संस्कृत भाषा, शास्त्र व वेद यांमधील अत्यंत क्लिष्ट प्रमेयांचें संशोधन व त्यांचें सम्यग् ज्ञान प्राप्त करून देणारे चिकित्सक विद्वान् या नात्यानें हिंदी जनतेवर यांचें असणारें ऋण सहजासहजीं न फिटण्याइतपत मोठें आहे, यांत शंका नाहीं.

कीर्तने, नीळकंठ जनार्दन—(जन्म स. १८४४–मृत्यु स. १८९६) मराठी इतिहासाचे आद्य टीकाकार व चिकित्सक. विनायकराव कीर्तन्यांचे हे धाकटे बंधु. यांचें प्राथमिक शिक्षण कोल्हापुरास व मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण मुंबईस झालें. हे डेक्कन कॉलेजांत असतां यांनीं 'ग्रँट डफकृत मराठ्यांच्या बखरीवरील टीका' हा प्रसिद्ध निबंध लिहून वाचला (१८६७). याच वेळीं यांनीं 'पूना यंग मेन्स ॲसोसिएशन' या संस्थेपुढें वरील निबंध वाचला तेव्हां कृष्णशास्त्री चिपळूणकर हे अध्यक्ष होते, व श्रोत्यांत शंकर पांडुरंग पंडित होते. या उभय विद्वानांनीं यांची खूप प्रशंसा केली. पंडितांनी तर हा निबंध आग्रहपूर्वक मागून घेऊन 'इंदुप्रकाशां'त छापला. या निबंधांत सदर ग्रंथाचा कोतेपणा व प्रमाद दर्शविले आहेत. पुढें अस्सल कागदपत्रें शोधण्यानें यांच्या या निबंधांतील विधानांस पुष्टिच मिळाली आहे. याशिवाय यांचें टेंपेस्ट नाटकाचें मराठी भाषान्तर व 'लोकप्रिय हिंदुधर्म व त्याची योग्यता' इत्यादि नांवाचा एक निबंध प्रसिद्ध आहे. यांशिवाय हंमीर महाकाव्याचें (संस्कृत) यांनीं केलेलें संपादन प्रसिद्ध आहे. इंडियन ॲंटिक्वेरी यांतहि यांनीं कांहीं इंग्रजी लेख लिहिले होते. हे जावरा व देवास धाकटी पाती यांच्या अधिपतींचे शिक्षक होते. देवासकडून यांना एक गांवहि त्याकरितां मिळाला होता. कांहीं दिवस हे मंगळूर (काठेवाड) व देवास धाकटी पाती येथील दिवाणहि होते.

यांच्या ग्रँट डफवरील निबंधाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या व आपल्या लोकांनीं इतिहास-संशोधनाचें काम हातीं घेतलें. यांनींच 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' संपादण्यास सुरुवात करून पहिला खंड विविध ज्ञानविस्तारांतून चिटणीसकृत शिवाजीचे सप्तप्रकरणी चरित्ररूपानें काढला (१८८२).

कीर्तने, रा. ब. विनायक जनार्दन— (जन्म स. १८३९–मृत्यु स. १८९१) नाटककार. जन्म राजुरी (जि. पुणें) येथें झाला. हे कऱ्हाडे ब्राह्मण. यांचे वडील दोन रुपयांच्या चाकरीपासून चढत जाऊन कोल्हापूर संस्थानचे कारभारी झाले. आई लहानपणींच वारली. शिक्षण कोल्हापूर येथें झालें. न्या. रानडे व यांचा घरोबा होता. स. १८५१ मध्यें यांच्या शाळेंत महादेवशास्त्री कोल्हटकर व विष्णुबोवा ब्रह्मचारी यांनीं यांच्या निबंधाची प्रशंसा केली. पुढें न्या. रानडे व हे एल्फिन्स्टन हायस्कूल मुंबई येथें गेले (१८५६) व मॅट्रिक झाले (१८५९). पुढें कॉलेज सोडून यांनीं साठ रुपयांवर शिक्षकाची नोकरी पत्करली (१८६२). मराठी ज्ञानप्रसारक सभेपुढें इंग्लंडांतल्या सोळाव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या राज्यक्रांतीवर (१८५९) व 'हिंदुस्थानांतल्या प्राचीन विद्या' या विषयावर निबंध वाचले (१८६०). पुढें यांची धुळ्यास बदली झाली. तेथील कलेक्टर नाना मोरो जोशी यांचा स्नेह जमला व दोघांनीं तेथें एक पुस्तकालय स्थापन केलें. क्लबांत यांचें 'जयपाल' नाटक प्रथम वाचलें गेलें. जयपालचें संविधानक ओल्ड टेस्टामेंटमधील जॉबच्या चरित्रावरून घेतलें आहे. यांनीं विद्यार्थिदशेंत लिहिलेल्या 'थोरले माधवराव पेशवे' नाटकाइतकें हें नाटक सरस नाहीं. यापुढें फक्त मालकमच्या इतिहासाचें भाषान्तर यांनीं 'मध्य हिंदुस्थानचा इतिहास' या नांवानें केलें. यानंतर यांनीं 'मथुरा' नाटक लिहावयास घेतलें होतें, पण तें पूर्ण झालें नाहीं.

हे धुळ्याहून कारवारास बदलले (६४). तेथें कंटाळून यांनीं राजिनामा दिल्यावर इंदूर संस्थानांत प्रथम विद्याखात्यांत (६५), पुढें सहा वर्षांनीं इंदूरच्या युवराजाचे शिक्षक (७१), सर टी. माधवराव यांच्या दिवाणगिरींत न्यायखात्यांत ५०० रु. पगारावर (७३), मग माधवराव बडोद्यास गेल्यावर त्यांचे मागें बडोद्यास नायब दिवाण (७५), असे हे फिरले व चढले. या वेळीं १५०० रुपये पगार न्याय, विद्या, पोलिस व खासगी वगैरे खात्यांवर देखरेखीचा अधिकार व वैभव प्राप्त झालें. वरिष्ठ शिक्षण देशी भाषेंत देण्याचे हेतूनें बडोद्यांत व्हर्नाक्युलर कॉलेज स्थापन झालें. हा प्रयोग पांच वर्षे यशस्वीपणें चालून दिवाण माधवराव विरुद्ध असल्यानें फिसकटला. पुढें बडोद्यास दिवाणगिरीवर हक्क असतांना ती मिळाली नाहीं, म्हणून रोषानें बडोदें सोडून हे पुण्यास आले (८६). पुढें इंदूरकर तक्तनशीन झाले तेव्हां त्यांनीं यांना दोन हजार पगारावर दिवाण नेमलें, पण

बेबनाव होऊन हे पुन्हां पुण्यास परत आले. यांस विसाव्या वर्षापासून मधुमेहाचा विकार होता. त्यानेंच हे वारले.

यांनीं 'चाळीस वर्षांमागचें पुणें' या नांवाची एक कादंबरी इंग्रजींत लिहावयास घेतली होती. तिचे ४० भाग ज्ञानप्रकाशांत छापले होते (१८९७). पुढें ती पूर्ण झाली नाहीं.

मराठींतील यांना पहिले नाटककार मानण्यांत येतें. स. १८६० पर्यंत फक्त पौराणिक नाटकें प्रचारांत असत.

कीर्तिकर, कान्होबा रणछोडदास— (जन्म स. १८४९–मृत्यु स. १९१९) कवि, वैद्य व शास्त्रज्ञ. जन्म मुंबई येथें झाला. हे सतरा वर्षांचे असतां मॅट्रिक झाले. मेडिकल कॉलेजांत कांहीं वर्षें घालवून (१८७०) हे विलायतेस गेले (१८७४). तेथें वैद्यकीच्या परीक्षा देऊन यांनीं बक्षिसेंहि मिळविलीं. इंडियन मेडिकल सर्व्हिसची परीक्षा देऊन हे हिंदुस्थानांत आले व ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें प्रोफेसर म्हणून काम करूं लागले. नंतर हे कांहीं वर्षांनीं पुनः इंग्लंडमध्यें गेले व नेटले रॉयल मेडिकल स्कूलमध्यें लष्करविषयक शस्त्रक्रियेचें व आरोग्यशास्त्राचें आणखी अध्ययन करून हे परत आले (१८७७). सोलापूर, कराची, सिंध हैदराबाद, बलुचिस्थान वगैरे ठिकाणीं नोकरी करून दुसऱ्या अफगाण युद्धांत हे आपल्या पलटणीबरोबर अफगाणिस्थानच्या मोहिमेवर गेले होते. ठाणें येथील इस्पितळावर बदली होऊन हे पुनः ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें प्रोफेसर झाले. हे पुढें ब्रिगेड सर्जन, लेप्टनंट कर्नलच्या बड्या बड्या लष्करी हुद्यापर्यंत चढत गेले व स. १९०४ सालीं सेवानिवृत्त झाले.

सेवानिवृत्त झाल्यावर अंधेरीच्या 'अलेक्झांड्रा लॉज' नांवाच्या विद्याश्रमांत पाश्चात्य पंडितांप्रमाणें हे गृहस्थ थोर थोर कवींच्या, शास्त्रज्ञांच्या आणि संशोधकांच्या ग्रंथसमागमांत व लेखनव्यवसायांत गढून गेलेले दृष्टीस पडत. यांचा पुस्तक संग्रह मोठा व मौल्यवान् होता. स. १८८३ सालीं यांना मुंबई विश्वविद्यालयाचे फेलो निवडण्यांत आलें होतें. स. १८९१ सालीं यांना विल्सन् फायलालॉजिकल लेक्चरर नेमलें, व तेव्हां यांनीं संस्कृत व प्राकृत भाषाविषयक व्याख्यानें दिलीं. यांनीं त्या वेळीं मराठी कवींच्यासंबंधीं सहा व्याख्यानें दिलीं. त्यांत 'मराठी कवींच्या वाङ्मयाची योग्यता कोणत्याहि उच्च परीक्षांना नेमण्याची आहे,' असें यांनीं प्रतिपादन केलें. बडोदें येथें भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाचे हे अध्यक्ष होते (१९०९). जळगांवच्या कविसंमेलनाचेहि हे अध्यक्ष होते.

यांचें वाङ्मयः— १ ब्राह्मधर्मप्रतिपादक वाक्यसंग्रह, २ भक्तिसुधा, ३ विलापलहरी, ४ इंदिराकाव्य, ५ आर्य-संगीत-माला, ६ डार्विन-चरित्र, ७ ज्ञानेश्वरवचनामृत, ८ रामदासवचनामृत, ९ अश्रु, १० इंद्रियविज्ञानविचार, ११ जलधिजवर्णन.

यांनीं वनस्पतिशास्त्राचा फार चांगला अभ्यास केला होता. मुंबई इलाख्यांतील विषारी वनस्पति, हिंदुस्थानांतील फुलें नसणाऱ्या वनस्पति, हिंदुस्थानांतील औषधी वनस्पति हे यांचे वनस्पतिशास्त्रविषयक ग्रंथ इंग्रजींत प्रसिद्ध आहेत.

वयाच्या १९ व्या वर्षीं यांनीं (१) भक्तिसुधा हें काव्य लिहिलें. भार्येच्या अकालिक निधनामुळें यांना झालेलें दुःख यांनीं (२) विलापलहरी या काव्याच्या द्वारा व्यक्त केलें. पुढें टेनिसनच्या प्रिन्सेस काव्याच्या आधारें यांनीं (३) 'इंदिरा' काव्य लिहिलें. हें काव्य मुंबई विश्वविद्यालयानें स्कूल फायनलच्या परीक्षेस नेमलें होतें.

कीलहॉर्न, डॉ. फ्रॅन्झ—(जन्म स. १८४०–मृत्यु स. १९०८) प्रसिद्ध संस्कृत पंडित, प्राच्यविद्यानिष्णात व ऐतिहासिक. यांचा जन्म जर्मनींत झाला. प्रथमपासूनच यांचा ओढा संस्कृत भाषा व व्याकरण यांजकडे होता आणि प्रख्यात प्रो. मॅक्समूलर यांनीं सायणभाष्यासह ऋग्वेद-संहिता प्रथम प्रसिद्ध केली, त्यांस यांचें साहाय्य झालें. १८६६ मध्यें ह्यांची पूना कॉलेजांत संस्कृत व प्राच्यभाषा यांचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. त्यापूर्वीच शांतनवाचार्यकृत फिट्सूत्रें प्रसिद्ध करून व्याकरणाचे सूक्ष्म अभ्यासक असें नांव यांनीं कमाविलें होतें. येथें आल्यावर पं. अनंतशास्त्री पेंढारकर व इतर विद्वानांशीं यांचा संबंध येऊन व्याकरणांतील परिभाषेन्दुशेखरासारख्या कठीण ग्रंथाचे इंग्रजी भाषांतरास यांनीं हात घातला आणि नंतर पतंजलीच्या महाभाष्याची आवृत्ति प्रसिद्ध केली. इतरहि अनेक व्याकरणविषयक लेख लिहून वेळोवेळीं इंडियन अँटिक्वरी व इतर शास्त्रीय नियतकालिकांत प्रसिद्ध करून पहिल्या प्रतीचे वैय्याकरण व संस्कृत पंडित अशी यांनीं ख्याति मिळविली.

१८८५ नंतर यांनीं आपल्या अनुपम संस्कृत ज्ञानाचा ओघ प्राचीन लेख-साहित्याकडे वळविला आणि शास्त्रीय पद्धतीनें शिलालेख–ताम्रपट आदिकरून इतिहासाचीं साधनें कशीं संपादावीं व त्यांपासून इतिहासाची पुनर्घटना कशी करावी याचा नव्यानेंच उपक्रम केला. यांच्याच पुरस्कारामुळें हिंदुस्थान सरकारनें हीं इतिहासाचीं साधनें प्रसिद्ध करण्याकरितां इं. अँटिक्वरीचें परिशिष्ट म्हणून 'एपिग्राफिया इंडिका' या त्रैमासिकाची जबाबदारी ५० वर्षांपूर्वी घेतली व त्याचे आतांपर्यंत २५ व्हॉल्यूम प्रसिद्ध झाले आहेत. पाली-प्राकृत भाषांतून लिहिलेल्या प्राचीनतर लेखांकडे विशेष लक्ष न पोंचवितां गुप्तकालापासून नंतरच्या संस्कृत भाषेंत लिहिलेल्या निरनिराळ्या ऐतिहासिक घराण्यांच्या राजवटींतील लेखांवरच यांनीं भर देऊन त्यांचा काल-निर्णय स्थिर करण्यासाठीं अविरत श्रम घेतले. लेखांत सांपडणाऱ्या वर्ष-तिथि-वार इत्यादींचा मेळ घालून बरोबर तिथि ठरवून मगच घराण्यांचे व राजांचे काल अचूक ठरवावयाचे असतात, त्या बाबतींत अविश्रांत मेहनत करून यांनीं पाया घालून दिला. कलचूरि अथवा चेदि संवत् यांचें आरंभस्थान यांनींच शोधून काढलें. सर्वांत महत्त्वाची व संशोधकास अत्यंत उपयोगी अशी यांची कामगिरी म्हणजे यांनीं उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत प्रसिद्ध झालेल्या सर्व लेखांचीं वर्षानुक्रमें पद्धतशीर यादी व राजवंशांचीं परिशिष्टें तयार करून भावी संशोधकांचा मार्ग सुलभ करून ठेवला आहे. यांच्या लेखवाचनांत बिनचूकपणा, यांनीं नमूद केलेल्या तारखांचा काटेकोरपणा व ऐतिहासिक निष्कर्ष-साधनांतील पद्धतशीरपणा अद्याप आदर्श मानला जातो. याप्रमाणें या देशांतील भाषा व इतिहास यांच्या संशोधनांत पूर्णपणें रंगून गेलेल्या या विद्वानानें सेवानिवृत्तीनंतर स्वदेशीं गेल्यावर गॉटिंजेन येथील विश्वविद्यालयांत संस्कृत प्राध्यापकाची जागा पत्करली व हिंदी विद्या व संस्कृति यांच्या अभ्यासाची आवड अनेक तरुण जर्मन विद्यार्थ्यांत उत्पन्न केली. डॉ. कीलहॉर्न व डॉ. बुल्हर यांच्याच प्रयत्नानें एक प्रसिद्ध आर्य भाषा व संस्कृति यांच्या संशोधनात्मक ग्रंथमाला प्रसिद्ध होत होती. हिंदुस्थानांतील परंपरागत विद्या व शास्त्रें यांच्याबद्दल उत्पन्न होत असलेल्या अनादरास या दोघां महापंडितांनीं वेळींच पायबंद घातला. या भूमीचें वैभव व महत्त्व युरोपांत प्रस्थापित करणें व इकडील संशोधकांस चिकित्सापद्धतीचे आदर्श घालून देणें या दुहेरी कामगिरीमुळें हे पूर्व व पश्चिम यांना सांधणारे खरेखुरे दुवे होत असें म्हणणें योग्य होईल (का. ना. दीक्षित).

कुप्पुस्वामीशास्त्री एस.—(जन्म स. १८८०–मृत्यु स. १९४३)

मद्रास इलाख्यांतील सुप्रसिद्ध पंडित आणि संशोधक. यांचा जन्म तंजावर प्रांतांतील कावेरी नदीकांठीं गणपति अग्रहार या गांवीं झाला. तेथें यांचें कुटुंब 'मलायास्थ' या नांवानें ओळखलें जात असे. यांचें मूळ नांव वेंकटवर्मा असें होतें. यांच्या वडलांचें नांव सेतुराम अय्यर असें होतें. यांचे मातामह वेंगुशास्त्री चतुःशास्त्रपारंगत होते.

हे अनेक शास्त्रांत प्रवीण असले तरी पूर्वमीमांसेमधील प्राविण्याबद्दल यांची विशेष ख्याति होती. हे एम्. ए. महामहोपाध्याय, विद्यावाचस्पति, दर्शनकलानिधि, कुलपति, आय्. ई. एस्. वगैरे अनेक पदव्यांनीं भूषित होते.

मैलापूर (मद्रास) येथील संस्कृत कॉलेजचे हे प्रिन्सिपल होते (१९०६–१०). त्रिवेदी संस्कृत कॉलेजचेहि हे प्रिन्सिपल होते (१९१०–१४). मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेजचे संस्कृतचे प्रोफेसर व मद्रास गव्हर्नमेंट ओरि. मॅनुस्क्रिप्ट लायब्ररीचे क्युरेटर होते. हे स. १९३५ मध्यें सेवानिवृत्त झाले. हिंदुस्थानांतील अनेक विश्वविद्यालयांशीं परीक्षक व इतर दृष्ट्या यांचा संबंध होता. यांनीं मद्रास युनिव्हर्सिटीचा संस्कृत ऑनर्स क्लासचा व शिरोमणि परीक्षेचा अभ्यासक्रम आंखला.

दुर्मिळ संस्कृत ग्रंथ मिळविणें आणि ते प्रसिद्ध करणें याबाबत यांची कामगिरी महत्त्वाची आहे. मीमांसेच्या प्रभाकर मताचे ग्रंथ यांनीं लोकांच्या पुढें प्रामुख्यानें आणले. 'जर्नल ऑफ दि ओरिएन्टल रिसर्च'चे हे संपादक होते. मद्रास संस्कृत ॲकॅडमी यांनीं काढली आहे. हे उत्तम शिक्षक व ग्रंथसंपादक होते. यामुळें यांना अनेक महत्त्वाच्या परिषदांचें अध्यक्षस्थान लाभलें. १ ऑल-इंडिया ओरि. कॉन्फरन्स, २ फिलॉसफिकल काँग्रेस, ३ कांजीपूर परिषद, ४ अद्वैत-सभा ऑफ साउथ इंडिया इत्यादि ठिकाणीं हे अध्यक्ष होते.

यांनीं मद्रास युनिव्हर्सिटीतर्फे संशोधनात्मक अनेक व्याख्यानमाला गुंफल्या. तसेंच अनेक ग्रंथ संपादन करून त्यांच्या उत्तम आवृत्त्या काढल्या (न्यू इंडियन अँटिक्वेरी १९४३ एप्रिल).

कुमठेकर, रावबहादूर महादेव केशव— (जन्म स. १८५७–मृत्यु स. १९२९) पुणें नगरपालिकेचे लोकप्रिय चीफ ऑफिसर व सांगली संस्थानचे दिवाण. यांचा जन्म सातारा येथें झाला. घरची स्थिति बेताचीच असल्यानें शिष्यवृत्त्या व शिकवण्या यांच्या साहाय्यानें आपल्या कुशाग्र बुद्धीच्या जोरावर हे बी. ए. झाले (१८८०). यांचें कॉलेज शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेजांत झालें. त्या वेळीं बी. ए. मनुष्य विरळा, इतका कीं बी. ए. माणसास लोक पाहावयास येत असत. प्रथम रु. ३५ वर रेव्हिन्यू खात्यांत कारकून, नंतर इगतपुरी येथें मामलेदार, तेथून १८८७ मध्यें पुणें शहर म्युनिसिपालिटीचे सेक्रेटरी म्हणून लेंड सर्व्हिसवर नेमण्यांत आलें. हीच जागा पुढें चीफ ऑफिसर म्हणून करण्यांत आली. त्या जागेवर यांनीं १८८७-१९१२ पर्यंत सतत २५ वर्षें काम केलें. कर्तबगार माणसाच्या आयुष्यांतील हा सुवर्णकाल म्हणतां येईल. ही कायगिरी यांनीं फारच प्रशंसनीय रीत्या चालवून शक्य तितकें लोकहित व समाजाचें कल्याण यांकडे तत्परतेनें लक्ष पुरविलें. श्रीमंतांपासून ते गरीबांपर्यंत सर्वांची सारखी दाद लागून त्यांचा मोठ्या आस्थापूर्वक व कळकळीनें विचार केला जाई. अजूनहि यांच्या परोपकारी व कनवाळू वृत्तीचें आदरानें स्मरण केलें जातें. म्युनिसिपालिटीनेंहि यांच्या लोकप्रिय कारकीर्दीच्या स्मरणार्थ सदाशिव पेठेंतील मुख्य रस्त्यास यांचें नांव दिलें आहे. सरकारनेंहि प्रथम रावसाहेब व नंतर रावबहादूर अशा पदव्या देऊन यांच्या कर्तबगारीचा गौरव केला. स्थानिक-स्वराज्य संस्थेंतील यांच्या आस्थेवाइक व कर्तव्यतत्पर मुख्याधिकारी म्हणून झालेल्या लौकिकामुळें सांगली संस्थानांत दिवाण म्हणून यांची नेमणूक झाली (१९१२). तेथें दिवाण म्हणून यांनीं १९२२ पर्यंत काम केलें. या अवधींत यांनीं सांगली संस्थानचा दर्जा पुष्कळच वाढविला. त्यानंतर मात्र आपलें आयुष्य पुणें येथें सेवानिवृत्त म्हणून घालविलें. हे थिऑसॉफिस्ट होते. यांच्याजवळ असलेला त्या विषयाचा ग्रंथसंग्रह यांनीं शेवटीं पुणें येथील लॉजला देऊन टाकला.

या सार्वजनिक आयुष्याबरोबर आपल्या समाजांतील एकत्र कुटुंब संस्थेंतील आदर्श पुरुष म्हणूनहि यांचा निर्देश करावयास पाहिजे. आपल्या कुटुंबांतील जवळच्या व लांबच्या सर्वच संबंधी लोकांस हे विश्वासाचें आश्रयस्थान वाटत. यांना पुत्र तीन : १ कोंडोपंत ऊर्फ दादासाहेब हे डिस्ट्रिक्ट जज्जाच्या जागेवरून रिटायर्ड झाले. दुसरे श्रीनिवास ऊर्फ पंडितराव हे रा. ब. पारसनीस यांचे जामात होत. ते वयाच्या तेहेतिसाव्या वर्षी इन्कमटॅक्स इन्स्पेक्टर असतांनाच वारले. तिसरे केशवराव ऊर्फ भय्यासाहेब-यांना नाशिकचे सरदार आबासाहेब यांना दत्तक देण्यांत आलें. ते फर्स्टक्लास सरदार व फ. क्ला. ऑनररी मॅजिस्ट्रेट असून सरकारकडून त्यांना C. B. E. ही पदवी मिळाली आहे.

कुमाराप्पा, प्रा. जे. सी.— (जन्म स. १८९२) अखिल-भारतीय ग्रामोद्योगसंघाचे संघटक व चिटणीस. हे धर्मानें ख्रिश्चन आहेत. यांचेच बंधु अर्थशास्त्रज्ञ भारतन् कुमारप्पा होत.

यांचा जन्म तंजावर येथें झाला. यांचें बालपण मद्रासला गेलें. मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाल्यावर यांचें मद्रासला डेव्होटेन कॉलेजांत शिक्षण झालें. नंतर हे अमेरिकेला गेले व तेथें न्यूयॉर्क संस्थानांतील सिरॅक्यूज युनिव्हर्सिटीचे हे बी. एससी. झाले. नंतर हे कोलंबिया युनिव्हर्सिटीचे एम्. ए. होऊन इंग्लंडला गेले, व तेथें इन्कॉर्पोरेटेड अकाउंटंट बनले.

यांनीं १९१९ पर्यंत लंडनमध्यें अकाउंटंटचें काम केलें व नंतर मुंबईला आल्यावर १९२९ अखेर यांचा तोच धंदा होता. त्यानंतर हे म. गांधींना येऊन मिळाले.

म. गांधींनीं यांना गुजराथ विद्यापीठांत अर्थशास्त्राचे प्रोफेसर नेमलें. प्राध्यापक असतांना यांनीं खेडा जिल्ह्यांतील मातर तालुक्यांच्या ५० खेड्यांची आर्थिक पाहणी केली. १९३० त यंग इंडियाच्या संपादकत्वाचें काम यांचेवर सोंपविण्यांत आलें. १९३१ त यांना १ वर्ष सक्तमजुरीची शिक्षा झाली.

मध्यंतरीं कॉंग्रेसनें हिंदुस्थान व ब्रिटन या दोन राष्ट्रांतील आर्थिक देणींघेणीं काय आहेत यांची चौकशी करण्याकरितां नेमलेल्या कमिटीचे हे संचालक होते.

त्यानंतर यंग इंडियाच्या संपादकत्वाची जबाबदारी परत यांचेवर सोंपविण्यांत आली. यांना नंतर पुन्हा दोन वर्षांची शिक्षा झाली. १९३२-३३ त ते नाशिक जेलमध्यें होते. तेथून सुटल्यावर १९३४ त बिहार भूकंपाच्या मध्यवर्ति संकट-निवारण कमिटीच्या कार्यकारी मंडळाचे हे सभासद होते. तेथील यांची कामगिरी अविस्मरणीय आहे.

१९३४ च्या अखेरीस मुंबईच्या कॉंग्रेसमध्यें 'अखिल-भारतीय ग्रामोद्योगसंघ' स्थापन झाला (ऑक्टो.).

त्याचे संघटक चिटणिसांचे जागी यांची निवड झाली. सध्यां हे तेथेंच काम करीत असतात. यांच्याकडून वऱ्हाड-मध्यप्रान्त व सरहद्दप्रान्त सरकारनें कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर असतां 'सर्व्हे ऑफ दि विहलेज इंडस्ट्री' रिपोर्ट तयार करून घेतले ते प्रसिद्ध आहेत (१९३९). या सर्व कार्यातील अनुभवांचा परिणाम यांचे टांचणवजा ग्रंथांवर झालेला आहे.

(1) Survey of Matar Taluka, (2) Public Finance and our Poverty, (3) Organization and Accounts of Relief Work, (4) Philosophy of the Village Movement, (5) Why The Village Movement, (6) Nationalism, (7) Religeon of Jesus, (8) Education for Life. इत्यादि यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

यांपैकीं Why The Village Movement चा मराठी अनुवाद 'ग्रामोद्योगाचें अर्थशास्त्र' या नांवानें धुळ्याच्या बाळुभाई मेहतांनीं केला आहे. यांच्याशिवाय निरानिराळ्या नियतकालिकांतूनहि यांनीं अनेक लेख लिहिले आहेत.

'कोणतीहि सामाजिक किंवा आर्थिक संघटना केवळ भौतिक दृष्टीनें उभारतां उपयोगी नाहीं. त्या संघटनेंत मानवी गुणांच्या विकासाला संपूर्ण वाव असला पाहिजे. तसेंच नीति आणि संस्कृति यांना मनुष्य पारखा होतां उपयोगी नाहीं. भांडवलशाही पद्धतींत उत्पादनाबरोबर सत्तेचेंहि केंद्रीभवन होतें. उत्पादनाच्या वाढीबरोबर कच्च्या मालाचा अखंड प्रवाह व बाजारपेठांची आवश्यकता सहजच उत्पन्न होते. लोभ किंवा हिंसा यांना संघटित रूप दिल्यानें त्यांतील घातुकपणा बिलकूल कमी होत नाहीं. दुर्बलांना बलिष्ठानें लुबाडावें आणि अधिक बलिष्ठ व्हावें याचा शेवट केव्हांहि युद्धांतच व्हावयाचा. जितकें सामर्थ्य प्रचंड तितकें युद्धाचें विनाशक स्वरूपहि व्यापक. अशा उत्पादन-पद्धतीनें संपत्तीहि विषम तऱ्हेनें वाटली जाते. थोडे लोक ऐषआराम भोगतात आणि बहुतेक लोकांना दारिद्र्यांत दिवस कंठावे लागतात. ज्याच्या हातांत मत्ता त्याच्या हातांत सत्ता. अशी स्थिति बनते. आर्थिक व राजकीय समतेच्या अभावीं व्यक्तित्वाचा विकास कुंठित होतो. मनुष्यांत उपजत असणाऱ्या स्फुर्ति, कौशल्य, योजकता, कल्पकता वगैरे गुणांचा नाश होऊन तो जर नुसता ठोकळा बनेल तर यापरती दुसरी कोणतीहि हानी नाहीं. ही हानी टाळण्याकरितां सांपत्तिक विषमता समाजांत उत्पन्न होतां उपयोगी नाहीं याबद्दल अत्यंत दक्षता बाळगली पाहिजे. याकरितां स्वावलंबी, विकेंद्रित व सहकारी भावनेवर आधारलेल्या ग्रामोद्योगप्रधान संस्कृतीचाच अवलंब केला पाहिजे', असें यांच्या तत्त्वज्ञानाचें सार आहे.

कुर्तकोटी, डॉ. श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य, श्रीविद्याशंकरभारती, मठ-करवीर व संकेश्वर— (जन्म स. १८७९ मे २०, शके १८०१ वैशाख व. १४). तत्त्वज्ञानाचे सुप्रसिद्ध अभ्यासक, विवेचक व हिंदुधर्माला नवजीवन देणारे प्रचारक.

यांचा जन्म धारवाड जिल्ह्यांतील कुर्तकोटी गांवच्या बतनदार पाटील कुलकर्ण्यांच्या घराण्यांत झाला. यांचें मूळ नांव लिंगेश. कानडीचें प्राथमिक व इंग्रजीचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण धारवाड येथें झाल्यावर यांच्या कानीं स्वामी विवेकानंदांची अमेरिकेंतील धर्मविजयाची कामगिरी आली. तिचा परिणाम यांच्यावर इतका झाला कीं यांनीं धर्मप्रचाराचें कार्य करण्याच्या हेतूनें संस्कृत भाषा व वेदान्तादि शास्त्रांचा कलकत्ता व काशी येथें राहून अभ्यास केला. तेथेंच पंडितमंडळानें यांना "विद्याभूषण" ही पदवी दिली. नंतर शृंगेरीस जाऊन तेथील श्रीशंकराचार्यांकडून यांनीं सांप्रदायिक पद्धतीनें वेदान्ताचें तत्त्व समजवून घेतलें. शिवाय अनेक भाषांत लेखन, प्रवचन व अध्ययनअध्यापनाचें काम सतत चालू असेच.

तथापि या विविध उद्योगांत गर्क असतांना मनाला समाधान वाटेना. भक्तिमार्गाला लागल्यावांचून तत्त्वज्ञानाचा अनुभव येत नाहीं असा मनाचा ग्रह झाल्यामुळें त्यासाठीं सातारा जिल्ह्यांतील गोंदवलें येथील सत्पुरुषाकडे हे सातआठ वर्षे भक्तिभावानें उपासना करीत राहिले. श्रीगोंदवलेकरबुवांनीं प्रसन्न होऊन यांना 'महाभागवत' असें नांव दिलें. त्यानंतर त्याच नांवानें लोक यांना संबोधूं लागले. यांनाहि मन शान्त झाल्यासारखें वाटलें. मग यांनीं सार्वजनिक कार्यांत लक्ष घालण्यास सुरुवात केली. वैदिक धर्म आणि संस्कृत विद्या हा यांचा आवडता विषय होता. प्रो. रा. द. रानडे यांच्या सहवासानें यांनीं पाश्चात्य तत्त्वज्ञानाची माहिती करून घेतली. त्यामुळें यांची दृष्टि व्यापक झाली.

भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिट्यूट पुणें, दि इन्स्टिट्यूट ऑफ फिलॉसफी अमळनेर, संस्कृत ॲकॅडमी बंगलोर, या संस्था काढण्यांत यांनीं भाग घेतला. धार-

वाडचा 'दि संस्कृत लिटलरी सोसायटी' व तिनें चालविलेली 'श्रीशंकराचार्य संस्कृत पाठशाळा' या संस्थेचें व्यवस्थापकत्व यांच्या हातीं आलें. धारवाड येथें यांनीं कानडींत दिलेलीं भगवद्गीतेवरील प्रवचनें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं आणि तें पुस्तक मुंबई विश्वविद्यालयानें कानडी घेऊन एम्. ए. ला बसणाऱ्यांसाठीं नेमिलें. 'दि हार्ट ऑफ भगवद्गीता' या यांच्या प्रबंधावरून अमेरिकेंतील एका विद्यापीठाकडून पीएच्.डी. ही पदवी यांना मिळाली. बंगलोर येथील संस्कृत अॅकॅडमीतर्फे निघणारें 'संस्कृत रिसर्च' नांवाचें त्रैमासिक यांच्याच संपादकत्वाखालीं निघूं लागलें. मुंबई विद्यापीठानें यांना वेदान्त विषयाच्या एम्. ए. चे परीक्षक नेमिलें. मुंबई सरकारनें मॉरल एज्युकेशन कन्सल्टेटिव्ह कमेटीवर यांना सभासद नेमिलें. शिवाय ख्रिश्चन मिशनऱ्यांप्रमाणें सहकारी चळवळींतहि हे भाग घेत.

अशा प्रकारच्या अनेक चळवळींशीं संबंध असल्यामुळें यांना फार फिरावें लागे. म्हणून सरकारी अधिकाऱ्यांच्या शिफारशींवरून यांना सदर्न मराठा रेल्वेनें सेकंड क्लासचा एक कायम मोफत पास दिला.

वैदिक धर्माच्या प्रचाराच्या दृष्टीनें यांची योग्यता लक्षांत घेऊन असे गृहस्थ शंकराचार्याच्या पीठावर अधिष्ठित झाल्यास बरें होईल असें वाटल्यावरून यांना तशी विनंति करण्यांत आली आणि यांनींहि पण आपल्या ध्येयाला पूरक म्हणून कोल्हापूर येथें करवीरपीठाचें शंकराचार्यत्व स्वीकारलें (१९१७ जून ३). त्या वेळीं म्हैसूर, बडोदें वगैरेंचे महाराज, व्हाइसरॉय व गव्हर्नर वगैरेंकडून अभिनंदनपर तारा व पत्रें आलीं. पुढें पीठाच्या जहागिरींत कोल्हापूरकर छत्रपति ढवळाढवळ करूं लागले, तेव्हां हे एका छाटीनिशीं संस्थानाच्या बाहेर पडले व संकेश्वर पीठावरील आचार्याशीं तडजोड करून दोन्ही पीठांतील तंटा यांनीं मिटविला.

नंतर मॉंटेग्यु-चेम्सफर्ड यांना मुलाखत देणें, प्रयाग येथें होमरूल लीगला आशीर्वाद देणें, महाराष्ट्रभर महाराष्ट्र हिंदुधर्म परिषदांचीं अधिवेशनें भरवून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, स्पृश्यास्पृश्य वाद, पतित-परावर्तन व हिंदुकरण वगैरे विषयांना प्रचंड प्रमाणांत चालना देणें वगैरे कामें यांनीं केलीं. महाराष्ट्रांत व इंग्लंडमध्यें विष्णु रघुनाथ करंदीकर यांना अधिकार देऊन अनेक लोकांना शुद्ध केलें व कांहीं युरोपीय लोकांना हिंदु धर्माची दीक्षा दिली. त्यांत मिस् मिलर नांवाच्या अमेरिकन स्त्रीचें यांनीं नाशिक येथें केलेलें हिंदुकरण अनेक कारणांनीं विशेष गाजलें.

पुण्याचें टिळक महाराष्ट्र विद्यापीठ स्थापण्यांत यांनीं भाग घेतला व त्याचे पहिले कुलगुरु हे निवडले गेले. हिंदुमहासभेच्या प्रयाग व लाहोर येथील अधिवेशनांचे हे अध्यक्ष निवडले गेले. हंपी येथील विजयनगर राज्याचा ६०० वर्षांच्या महोत्सव प्रसंगीं यांना अध्यक्ष निवडण्यांत आलें व तेथें 'दुसरे विद्यारण्य' असा यांचा गौरव करण्यांत आला. स. १९३३ सालीं अमेरिका येथील वर्ल्ड फिलॉसफी ऑफ फेथ या मोठ्या सभेचें अध्यक्षस्थान यांना देऊं केलें. पण तेथें न जातां नाशिक येथें परिषद् भरवून केलेल्या भाषणालाच मान्यता देऊन तिनें यांचा गौरव गेला.

लोकांनीं यांच्या पीठारोहणाचा रौप्यमहोत्सव केला (१९४२). त्या प्रसंगीं मोठमोठ्या माणसांनीं असा अभिप्राय व्यक्त केला कीं, हे केवळ योजना सुचविणारे नाहींत तर प्रत्यक्ष पुढें होऊन काम करून दाखविणारे आहेत. हे अनेक स्थित्यन्तरें व मतान्तरें यांतून गेले असले तरी हे आपल्या धार्मिक उच्च ध्येयावर नेहमीं अचल राहिले आहेत.

यांनीं आजपर्यंत हिंदुस्थानभर प्रवास करून संस्कृत, हिंदी, मराठी, कानडी आणि इंग्लिश भाषांत सुमारें ५००० पर्यंत व्याख्यानें दिलीं. यांचीं व्याख्यानें विवेचक आणि चिकित्सक असूनहि अत्यंत परिणामकारक होत. उपमा-दृष्टान्तांनीं कोणताहि विषय प्रतिपादण्यांत यांचा हातखंडा आहे. अत्यंत विरुद्ध असणारी सभाहि हे आपल्या वक्तृत्वानें सहज आपलीशी करतात. त्याग, ध्येयवाद, विद्वत्ता व योजकता यांचें आश्चर्यकारक मिश्रण यांच्यांत आढळतें.

यांचे ग्रंथ—

संस्कृत–१ सच्चिदानंदस्तवः, २ सिद्धान्तसारः, ३ अष्टोत्तरशतश्लोकी, ४ षड्दर्शनादर्शः, ५ समत्वगीतम् (भगवद्गीता तात्पर्य);

कानडी–भगवद्गीतासारविचार (धारवाड येथें दिलेलीं कानडींतील व्याख्यानें)

इंग्रजी—(1) Spiritual Knowledge and How to Attain It, (2) The Highest Goal of Human Life, (3) The Study of Sanskrit–a Plea for its Revival, (4) The Heart of Bhagawad–Gita, (5) Equality–a Study in the Bhagawad–Gita ;

मराठी– १ गंगासंमति अथवा हिंदुकरण-मान्यता नाटक. मराठींत स्वधर्म नांवाचें साप्ताहिक पुष्कळ वर्षें यांनीं चालविलें व त्यांत अनेक महत्त्वाच्या विषयांवर लिहिलें.

कुर्बान, फज्ल इलाही—(जन्म स. १९०३) सुप्रसिद्ध समाजसत्तावादी. पिता-मलिक करम इलाही. माता-उमर खैर. जन्मस्थान-लाहोर. यांचें घराणें कक्केजई पठाणांपैकीं आहे. यांच्या पूर्वजांनीं मोगलांच्या वेळीं अफगाणिस्थानांतून येऊन लाहोरला वस्ती केली.

मॅट्रिक पास झाले तेव्हां यांना हिंदु-मुसलमान, तुर्क-जर्मन वगैरेबद्दल थोडी कल्पना आली होती (१९१९). रौलट-कायद्याच्या वेळीं झालेली चळवळ आणि गोळीबारहि यांनीं प्रत्यक्ष पाहिलेला होता. देशभक्तिपर व्याख्यानें चालू आहेत आणि वर विमानें घरघरत आहेत, हा प्रसंग यांनीं डोळ्यांनीं पाहिला. 'भारत माता की जय', 'इस्लाम जिन्दाबाद' अशा ललकाऱ्या सुरू होत्या.

सभेच्या बाहेर येतांच यांना गोळीबाराच्या तयारींत लोक दिसले. त्या वेळीं पुढील संवाद झाला: 'तुम्ही हिंदुस्थानी असून आमच्यावर बन्दुका रोखायला तुम्हांला लाज नाहीं वाटत?' 'कोण असा पुढारी आहे कीं ज्याचे मागें आम्हीं जावें?' 'आम्हांला परदेशी लोकांशीं लढण्यास कोण तयार करील?' या संवादांतील प्रश्नाचें उत्तर आपल्यापाशीं नाहीं, अशी यांची खात्री झाली. इतक्यांत गोळीबाराचा धडाका यांच्या कानीं आला. कित्येक लोक गोळीबारांत मेले. बापानें यांना शोधून आणून कोठडींत बंद करून ठेविलें.

कॉलेजमध्यें जाण्याची इच्छा घरच्या परिस्थितीमुळें यांना दाबून ठेवावी लागली. लढाई संपलेली असल्यानें नोकरी मिळणें कठीण होत चाललें होतें. इतक्यांत खिलाफत चळवळीच्या पुढाऱ्यांनीं सच्चा मुसलमानांनीं हिजरत म्हणजे देशत्याग करून मुसलमानी देशांत जाण्याचा फतवा काढला. हे जाणाऱ्या लोकांत सामील झाले. आणि तिकिटाशिवायच पेशावरला पोंचले. अखेर अनेक अडचणींतून यांनीं अफगाणिस्थानचा रस्ता पकडला.

सर्व रस्ता डोंगराळ होता. शिवाय पायींच प्रवास होता. चोर व लुटारू यांचें भय होतें. भाषा पुश्तु यांना बिलकुल येत नव्हती. रस्ता दाखवणारा मनुष्य दाखवील तसें जायचें व सांगेल तसें वागायचें. मधूनच गोळीबारहि ऐकूं यायचा. शेवटीं जलालाबाद, काबूल वगैरे ठिकाणीं सरकारी पाहुणचारहि यांना मिळाला. पण जगांत काय चाललें आहे याचा तेथील लोकांना पत्ता असल्याचें चिन्ह कोठेंच दिसेना. शस्त्र, व्यवस्था किंवा ज्ञान या बाबतींत तेथील मध्ययुग अद्यापि संपलेलें नव्हतें. सैनिकी शिक्षण व इंग्रजांना जिंकणें या गोष्टी तेथील लोकांच्या कल्पनेंतहि नव्हत्या. त्यामुळें हे तेथें अगदीं निराश झाले आणि यांनीं रशियांत जाण्याचें ठरविलें. बोल्शेविकांबद्दल यांनीं आतांपर्यंत विरुद्धच ऐकलें होतें; पण बोल्शेविकांशिवाय इंग्रजांविरुद्ध आपणांस कोणीच उपयोगी पडणार नाहीं अशी यांची खात्री होत चालली. तुर्कस्थानांतून रशियांत शिरतांच यांचें योग्य स्वागत झालें.

ताशकंद येथें बोल्शेविकांच्या नव्या राज्यव्यवस्थेचा यांना परिचय होऊं लागला. सर्वांना सारखें अन्न, सर्वांना सारखें काम पाहून यांना नवल वाटलें. तेथें सर्व शिक्षणापूर्वी लोकांना राजनीतीचें शिक्षण अधिक दिलें जाई. त्यामुळें मूळच्या सर्व गृहीत गोष्टी सोडाव्या लागत. हे अशा क्रमानें जवळ जवळ मार्क्सवादी बनले. नंतर यांना सैनिकी शिक्षण देण्यांत आलें. शेवटीं यांस शिक्षक बनवून मजूर व शेतकरी यांच्या संघटनांचें स्वतंत्र शिक्षण देण्यांत आलें. असें शिक्षण घेऊन हे जर्मनींत येऊन नंतर हिंदुस्थानांत पोंचले (नवं. १९२६). कामाला सुरुवात केली नाहीं तोंच यांना पकडून पेशावरला नेलें व तेथें यांना पांच वर्षांची शिक्षा मिळाली (१९२७ एप्रिल). पण अपिलांत मॉस्कोला जाऊन शिक्षण घेणें हा गुन्हा नाहीं असें ठरून पांच वर्षांची शिक्षा तीन वर्षें करण्यांत आली. सुटल्यावर मिरत केसमधल्या लोकांना यांनीं मदत करण्यास सुरुवात केली व लाहोर येथें अध्ययन-चक्र चालविलें (१९२९). पुढें यांना पुनः पकडून चौकशीशिवाय तुरुंगांत ठेवण्यांत आलें. नंतर चार वर्षांनीं यांची सुटका झाली (१९३४). मजुरांतर्फे असेंब्लीच्या निवडणुकींत हे हरले. नंतर यांना पुनः सरकारनें लाहोरला नजरबंद केलें (१९३६). यानंतर सुटका झाल्यावर अजबसुल्तानाबरोबर यांचा विवाह झाला.

रामगड काँग्रेसला हे आले होते. पण कम्युनिस्ट पकडले जाऊं लागले तेव्हां हे गुप्त झाले. शेवटीं कम्युनिस्ट सुटले तेव्हां (मे. १९४२), हे बाहेर येऊन लायलपुरला काम करूं लागले. तेथें मजुरांच्या संपांत

यांना वीस दिवस तुरुंगांत राहावें लागलें. पण लढा यशस्वी झाला व यांना सोडण्यांत आलें.

धर्माकरितां देशत्याग करणारा हा तरुण क्रान्तीकरितां सर्वस्वाचा त्याग करण्यास केव्हांहि सज्ज आहे (नये भारतके नये नेता, पा. ४९२).

कुवलयानंद स्वामी— (जन्म स. १८८३) अखिल भारतीय कीर्तीचे शारीरिक शिक्षणविशारद व जागतिक प्रसिद्धी असलेले योगशास्त्रज्ञ. यांचें समग्र नांव—जगन्नाथ गणेश गुणे. स.१९०३ सालीं हे मॅट्रिक झाले व यांना जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ति मिळाली. उच्च शिक्षण बडोद्यास झालें व हे बी. ए. झाले (१९१०). बडोदा येथेंच सुप्रसिद्ध राजप्रिय राजरत्न प्रो. माणिकरावांकडे हे आकर्षिले गेले व त्यांच्याच शिष्यमंडळींत दाखल होऊन हे मल्लविद्येंत प्रवीण झाले. स. १९१६ पर्यंत हे बडोद्यासच शिक्षक होते. पुढें स. १९१६-२३ पर्यंत खानदेश शिक्षण मंडळाचे हे एक आजीव सदस्य होते.

यांच्या व इतर आजीव सदस्यांच्या परिश्रमामुळें खा. शि. मं. चें हायस्कूल चांगलेंच नांवारूपास आलें. परंतु १९२१ मध्यें त्याला राष्ट्रीय स्वरूप देण्यांत येऊन अमळनेरास स्वतंत्र राष्ट्रीय शिक्षण देणारें महाविद्यालय स्थापन करण्यांत आलें. त्यांत यांनींच पुढाकार घेतला होता व राष्ट्रीय महाविद्यालयाचें प्राचार्यपद दोन वर्षेपर्यंत यांच्याचकडे होतें. पुढें १९२३ सालीं तें अराष्ट्रीय झाल्यामुळें व यांना योगविद्येचें आधुनिक शास्त्रदृष्ट्या सर्वांगीण संशोधन करून तद्द्वारा जनसेवा करण्याची उत्सुकता असल्यामुळें यांनीं त्या मंडळाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला.

खा. शि. मंडळांत असतांनाच १९१९ सालीं यांनीं क्षेत्र मालसर (नर्मदातटाक) येथील योगविद्याविशारद परमहंस श्री माधवदासजी महाराज यांचें शिष्यत्व स्वीकारलें व त्यांच्याच कृपेनें यांना अल्पकाळांत योगविद्येचा उत्कृष्ट लाभ झाला. १९२३ मध्यें खा. शि. मं. सोडल्यानंतर यांनीं लोणावळ्यास कैवल्यधाम स्थापन करण्याच्या तयारींत एक वर्ष घालविलें व १९२४ च्या ऑक्टोबरांत विजयादशमीच्या मुहूर्तावर कैवल्यधामाची स्थापना केली. सांप्रत महाराष्ट्रांतील जगद्विख्यात झालेल्या संस्थांपैकीं ती एक संस्था आहे.

'पूर्व व पश्चिम यांच्या संस्कृतीचा मेळ घालून दोहींच्या संयोगानें अखिल मानव जातीला उद्बोधक असें नवीन तत्त्वज्ञान निर्मावयाचें,' असा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. पूर्वेकडील योगीजनांची संस्कृति ही अध्यात्मिक ज्ञानावर उभारलेली आहे, तर पश्चिमेची संस्कृति जड-वस्तुनिष्ठ असून प्रायोगिक विज्ञानावर आधारलेली आहे. यामुळें दोन्ही संस्कृति अत्यंत भिन्न आहेत. परंतु पुरातन योगीजनांच्या यौगिक सिद्धान्तांचें नव्या शास्त्राच्या साह्यानें स्पष्टीकरण करावें व त्यायोगें या दोन भिन्न संस्कृतींची सांगड घालून द्यावी, अशी यांची इच्छा आहे. त्याबरोबरच आत्मिक, सामाजिक व शारीरिक शिक्षणाचा प्रसार करावा असाहि या संस्थेचा हेतु आहे. आश्रमाच्या स्थापनेपूर्वीच यांनीं यौगिक क्षेत्रांत संशोधन केलें होतें. आश्रमाच्या स्थापनेबरोबरच यांनीं 'योगमीमांसा' नांवाचें त्रैमासिक चालू केलें व त्यांत इंग्रजी भाषेतून आसनें, बंधक्रिया, मुद्रा व प्राणायाम यांचा 'क्ष' किरणादि अर्वाचीन शास्त्रीय साधनांच्या साहाय्यानें केलेला संशोधनात्मक अभ्यास त्यांत प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. यांतील शास्त्रशुद्ध मांडणीमुळें जगाचें लक्ष यांच्या संशोधनाकडे लागलें.

शरीरशिक्षा व रोगपरिहार या बाबतींत योगाची उपयुक्तता अर्वाचीन शास्त्रांच्या आधारें यांनीं सिद्ध केली व आपल्या आश्रमांत अनेक रोग्यांना हे परिहार देऊं लागले.

योगोपचाराचें कार्य आधुनिक वैद्यकाचें ज्ञान असलेल्या व योगोपचाराचें तात्त्विक व प्रत्यक्ष ज्ञान संपादन केलेल्या तज्ज्ञांच्याच हातीं असावें असा यांचा कटाक्ष असून यांच्या हाताखालीं आजवर तीन M. B. B. S. पदवीधर योगचिकित्सेंत पारंगत झाले आहेत व ते कैवल्यधामाच्या विद्यमानें निरनिराळ्या केन्द्रांत योगचिकित्सेचें कार्य करीत आहेत. त्याचप्रमाणें आश्रमांतील अनेक सदस्यांनीं आयुर्वेद, पाश्चात्य वैद्यक व योगोपचार यांचें उत्तम ज्ञान संपादन केलें असून यांपैकीं एक सदस्य चरकतीर्थ स्वामी दिगंबरजी राजकोटच्या कैवल्यधामाचें अत्यंत यशस्वितेनें प्रमुखपद भूषवीत आहेत. लोणावळ्यास योगचिकित्सेकरितां येणाऱ्या रुग्णांच्या निदानाकरितां कैवल्यधामांत एक रुग्णविज्ञानशाला (Clinical Laboratory) असून तिचें नांव 'श्री नटवरसिंह रुग्णविज्ञानशाला' असें आहे. पोरबंदरचे महाराणा श्रीनटवरसिंहजी यांनीं आश्रमास रु. ३३००० ची देणगी दिल्यामुळें त्यांचें नांव या विज्ञानशालेस देण्यांत आलें आहे.

योगद्वारा स्वास्थ्यसंरक्षणाचें कार्य मुख्यतः लोणावळें,

मुंबई (स्थापना १९३२), व राजकोट (स्थापना १९४३) या ठिकाणीं कैवल्यधामाकडून केलें जातें. लोणावळ्यास भारतांतील सर्व प्रान्तांचे रुग्ण येतात. आश्रमाचें एक रुग्णसेवामंदिर असून त्यांत रुग्णांची शुश्रूषेबरोबर राहण्याजेवणाची सोय केली जाते. मुंबईस रोज दोनअडीचशें स्त्रीपुरुषांची स्वास्थ्यसंपादनार्थ हजेरी असते. मुंबईच्या Health Centre करितां मुंबई सरकारनें दोन लक्ष रुपये किंमतीची बॅकबेवरील रमणीय जागा कैवल्यधामास नाममात्र भाड्यानें दिली असून शिवाय या केन्द्रास सरकारकडून सालीना १ हजार रुपये ग्रँटहि मिळत असते. राजकोट येथील स्वास्थ्यसंरक्षणाचें कार्यहि उत्तम चाललें आहे. एवंच आजवर कधींहि न मिळालेलें यश योगचिकित्सेस कैवल्यधामानें मिळवून दिलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

स्वास्थ्यसंवर्धनाचें कार्यहि रोगोपहरणाच्या इतकेंच कैवल्यधामानें यशस्वी केलें आहे. यौगिक शारीरिक शिक्षणाची रचना आधुनिकशास्त्रदृष्ट्या विवेचून व सुसंघटित करून त्याला यांनीं सर्वत्र मानाचें स्थान मिळवून दिलें आहे. कैवल्यधाम स्थापन झाल्यानंतर अवघ्या तीनच वर्षांनीं संयुक्तप्रान्त सरकारनें कैवल्यधामाकडे एक डेप्युटेशन पाठविलें व त्या डेप्युटेशनचा अहवाल प्रसिद्ध करून यौगिक शारीरिक शिक्षण आपल्या प्रान्तांतील शिक्षणसंस्थांत प्रविष्ट करण्याचा प्रयत्न केला. १९३२ सालीं यांना लखनौस बोलावून कांहीं तात्पुरते शिक्षकहि यौगिक संघ व्यायामांत तयार करून घेतले. मुंबई सरकारनेंहि यांना १९२७ सालच्या शारीरिक शिक्षण कमेटीचे एक सदस्य नेमलें होतें व या कमेटीनें कैवल्यधामांतील यौगिक पद्धतीची शिफारस केली होती. पुढें १९३७ सालीं मुंबई सरकारनें नेमलेल्या शारीरिक शिक्षण समितीनें यांना अध्यक्षच निवडलें. या कमिटीनें शिफारस केल्याप्रमाणें मुंबई प्रान्ताचें सरकारी शारीरिक शिक्षणबोर्ड १९३८ मध्यें स्थापन झालें. तें बोर्ड अद्याप अस्तित्वांत असून त्याच्या अध्यक्षपदीं यांची आजवर तीन वेळां लागोपाठ नेमणूक झाली (१९३८, १९४० व १९४३). प्रान्तांतील शारीरिक शिक्षणाची युद्धोत्तर रचना सुचविण्याकरितां या वर्षी मुंबई सरकारनें नेमलेल्या समितीचें अध्यक्षपद यांस देण्यांत आलें आहे.

१९३७च्या कमिटीनें शिफारसलेल्या शारीरिक शिक्षणक्रमांत यौगिक पद्धतीचा अन्तर्भाव केला असून त्या सालापासून यौगिक व्यायामाकडे सरकारी, निमसरकारी व खासगी शिक्षणसंस्थांतून अधिकाधिक लक्ष पुरविलें जात आहे. सारांश, कैवल्यधामाच्या उद्योगानें यौगिक शारीरिक शिक्षणासहि सरकारदरबारीं मान्यतेचें स्थान मिळालें आहे. इतर देशीविदेशी पद्धतींचाहि शास्त्रदृष्ट्या यांनीं उत्तम अभ्यास केला असल्यानें यांची शारीरिक शिक्षण क्षेत्रांतील कामगिरी चिरस्मरणीय झाली आहे.

कैवल्यधामाच्या शास्त्रीय कार्याची छाप देशीविदेशी विद्यापीठांवरहि पडत चालली आहे. १९३२ सालीं अमेरिकेंतील येल् युनिव्हर्सिटीनें K. T. Behanan यांस Research Fellowship देऊन योगाभ्यासाकरितां हिंदुस्थानांत पाठविलें. त्या वेळीं डॉ. बेहॅनन् यांनीं १ वर्ष यांचेकडेच अभ्यास केला. १९३७ सालीं अमेरिकेंतील कोलंबिया युनिव्हर्सिटींतील Deputy Director of Physical Education डॉ. जोसेफाइन रॉयब्रेन या कैवल्यधामाच्या मुंबई केंद्रांत येऊन यौगिक व्यायामपद्धतीचें शिक्षण घेऊन गेल्या. हिंदुस्थानांतहि त्रावणकोर युनिव्हर्सिटीनें आपल्या विद्यार्थ्याकरितां यौगिक शारीरिक शिक्षणाचा उपक्रम केला असून कैवल्यधामाचे एक आजीव सदस्य डॉ. विणेकर, B. A., M. B. B. S. हे त्या विभागाचे Director आहेत. त्रावणकोर युनिव्हर्सिटीनें डॉ. विणेकर यांस तीन वर्षांकरितां कैवल्यधामाकडून मागून घेतलें आहे.

अशा रीतीनें रोगपरिहार व स्वास्थ्यसंवर्धन या दोनहि क्षेत्रांतील कैवल्यधामाची योगविषयक कामगिरी कितीहि महनीय असली तरी आश्रमाचें मुख्य व अंतिम ध्येय अध्यात्मच आहे. आजचे आश्रमांतील आजीव सदस्य अध्यात्माकरितांच स्वामीजींच्या नेतृत्वाखालीं एकत्र आलेले आहेत. मात्र कैवल्यधामाचें ध्येयभूत अध्यात्म केवळ व्यक्तिनिष्ठ नसून तें राष्ट्रनिष्ठ किंबहुना जगन्निष्ठहि आहे. वैयक्तिक अध्यात्म अभ्यास, वैराग्य, श्रद्धा, वीर्य इत्यादि साधनांनीं सिद्ध होतें. राष्ट्रनिष्ठ व जगन्निष्ठ अध्यात्माची गोष्ट तशी नाहीं. भारतीय व पाश्चात्य संस्कृतींचा आधुनिक शास्त्रदृष्ट्या समन्वय करून सिद्ध झालेल्या आध्यात्मिक मूल्यांवर समाजरचना झाल्याविना राष्ट्रीय अथवा जागतिक अध्यात्म सिद्ध होणार नाहीं. अशा अध्यात्माची सिद्धि, प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीनेंच कैवल्यधामाची स्थापना झाली व वाढ होत आहे.

आध्यात्मिक मूल्यांची सिद्धि, प्रचार आणि प्रसार करण्यास आत्मनिष्ठ नव्या तरुणांची जरूर आहे. अशा

कांहीं व्यक्ति आजहि आश्रमाशीं निगडित आहेत. परंतु कार्यक्षेत्राच्या वाढीच्या दृष्टीनें एवंगुणविशिष्ट तरुण तयार करण्याकरितां यांनीं आपल्या पारमार्थिक गुरूंच्या नांवानें 'श्रीमन्माधवयोगमंदिर समिति' स्थापन केली असून या समितीच्या विद्यमानें लवकरच योगमहाविद्यालय काढण्याची सिद्धता सुरू आहे. या योगमहाविद्यालयाच्या अभ्यासक्रमांत योगविद्या, पाश्चात्य व पौरस्त्य दर्शनें, तौलनिक धर्मशास्त्र, मानसशास्त्र, शारीर, इन्द्रियविज्ञान, रोगपरीक्षा, रोगहरण यांचा अन्तर्भाव असून शासनशास्त्र, अर्थशास्त्र वगैरेंचाहि स्नातकांस परिचय होईल अशी व्यवस्था आहे. योग्य तो अध्यापक वर्ग तयार करण्याकरितां Postg-raduate Research Fellowships निर्माण केल्या असून त्यांत M. A., M. sc. पदवीधर आपापल्या विषयांत Doctorate मिळवितील असा उपक्रम केला आहे.

केवळ कर्मयोगाचाहि एक विभाग कैवल्यधामांत असून त्याचें केन्द्र बोरीवली (मुंबई नजीक) येथें आहे. आदिवासी वन्य जनतेची सेवा या केन्द्राकडून केली जाते. एक प्राथमिक विद्यालय, एक मुलांचें छात्रालय, एक मुलींचें छात्रालय, दोन आयुर्वेदीय दवाखाने अशा संस्था धर्मार्थ चालत असून शिवाय वन्य जातीस आर्यसंस्कृतीची शिकवण मिळावी म्हणून अनेक प्रयत्न या केन्द्रातर्फे केले जातात व ते नृपतिजनपदांना फार प्रशंसनीय वाटत आहेत. कैवल्यधामाचे एक आजीवसदस्य श्री. लक्ष्मणजी महाजन हे या केन्द्राचे धुरीण आहेत. आश्रमाच्या कार्यास अनेक राजेरजवाडे व धनिक यांनीं हजारों रुपयांची आजवर मदत केली असून आश्रमाची एकंदर मिळकत दोन ते तीन लक्षांची आहे.

स्वामीजींचा प्रेमळ स्वभाव, पवित्र आचरण, योगविद्येची सेवा, ज्ञानदान, आर्तसेवा, राष्ट्रीय वृत्ति आणि त्यागावर उभारलेली भव्य योजकता यांमुळें यांना विसाव्या शतकांतील महर्षींची पदवी प्राप्त झाली आहे. यांनीं आधुनिक पद्धतीनें योगाचा अभ्यास व प्रचार सुरू केला नसता तर योगाबाबतसुद्धां आम्हांला युरोपकडे पाहावें लागलें असतें.

यांचे कवितांग्रंथ—१ सुदामदेव चरित्र (१९०४), २ काव्यरत्नावलि (१९०४), ३ कुवलयानंदाचीं गाणीं (१९१७).

यांचे इंग्रजी भाषेंतील महत्त्वाचे ग्रंथ—१ योगमीमांसा ४ खंड, प्रत्येकीं ४ विभाग, २ योगासनें, ३ प्राणायाम. यांचा हिंदी ग्रंथ—१ यौगिक संघव्यायाम, शिवाय अनेक संशोधनात्मक इंग्रजी लेख व व्याख्यानें.

कुळकर्णी, दिगंबर गोपीनाथ— (जन्म स. १९०६) एक महाराष्ट्रीय संशोधक. 'हिंदुस्थानांतील शेतीस मैलापाण्याचा उपयोग' या विषयावर संशोधनात्मक निबंध लिहिल्याबद्दल यांना पीएच्. डी. ही पदवी मुंबई विश्वविद्यालयाकडून देण्यांत आली (१९३९). स. १९२८ सालीं बी. एजी. झाल्यापासून दहा वर्षे एफ्लुएंट फार्म हडपसर येथें वरील विषयाचें संशोधनकार्य हे करीत होते. स. १९३४ सालीं 'पुण्यांतील घाण पाण्याचा शेतीस उपयोग' या विषयावर पाठविलेल्या प्रबंधामुळें यांना एम्. एजी. ही पदवी देण्यांत आली. तोच विषय हिंदुस्थानच्या दृष्टीनें मांडून हे पीएच्. डी. झाले.

शहरांतील मैला पाण्याचा शेतकीच्या कामीं कसा उपयोग करितां येईल हा यांच्या अभ्यासांतील महत्त्वाचा विषय होय. दर माणशीं दर वर्षी २ रुपये किंमतीचा मैला उत्पन्न होतो. त्याचा जर शेतीस पूर्ण उपयोग झाला तर ४० कोटींच्या हिंदुस्थानास ऐंशी कोट रुपये किंमतीचें खत शेतीस मिळून आर्थिक, आरोग्य व राष्ट्रीय दृष्ट्या फार मोठा उपयोग होणार आहे, हें यांनीं आपल्या निबंधांत दाखविलें आहे. हिंदुस्थानांतील मोठमोठ्या शहरांपुढें आज जो मैलापाण्याचा प्रश्न उभा आहे त्याबद्दलच यांनीं विशेष उहापोह केला आहे. हिंदी शेतीचा जिव्हाळ्याचा प्रश्न राष्ट्रहितदृष्ट्या कसा सोडवितां येईल हें दाखविणें हें यांच्या निबंधाचें वैशिष्ट्य आहे.

'हिंदुस्थानांतील साखरेचे कारखाने, त्यांची सद्यःस्थिति व भवितव्यता' या विषयावरील चढाओढीच्या निबंधाबद्दल मुंबई विश्वविद्यालयाकडून यांना 'ॲशबर्नर' प्राइझ देण्यांत आलें.

त्यानंतर स. १९३८–१९४२ पर्यंत लोण्याच्या पडजमिनी व त्यांची सुधारणा यांबाबत बारामती येथें यांनीं संशोधन केलें. लोण्याच्या जमिनीपासून 'सोडियम सल्फेट' क्षार तयार करून दाखविला असून हें कार्य मोठ्या प्रमाणांत कसें करून दाखवितां येईल हेंहि यांनीं सिद्ध केलेलें आहे. बारामती येथें मोठ्या प्रमाणावर सोडियम सल्फेट तयार करण्याचा सॉल्ट वर्क्स या नांवानें जो कारखाना उभारला आहे तो यांच्याच परिश्रमाचें फळ होय.

स.१९४५ सालीं यांनीं मोवीं संस्थानांत इरिगेशनखालीं आणण्यास योग्य अशा जमिनींची पाहणी केली असून त्याबद्दलचे नकाशे संस्थानास तयार करून दिले आहेत. इरिगेशन स्कीम हातीं घेण्यापूर्वी इरिगेशनला योग्य अशा जमिनींची पाहणी आगाऊ करणें हें किती महत्त्वाचें आहे हें यांनीं दाखवून दिलें आहे. हा उपक्रम नवीन असून अखिल भारतांतील प्रथम प्रयत्न आहे.

कुळकर्णी, रावसाहेब-पांडुरंग ज्ञानेश्वर— (जन्म स. १८८८) सुप्रसिद्ध संस्कृत पंडित, वारकरी वाङ्मयाचे अभ्यासक, सार्वजनिक कार्यकर्ते व मुत्सद्दी. यांचें लेखन पांडुरंगशर्मा या नांवानें प्रसिद्ध आहे. यांचें घराणें देवाच्या आळंदीजवळील चऱ्होली बुद्रुकचें राहणारें असल्यानें चार-पांच पिढ्यांपूर्वीपासूनच यांचा आळंदी व तेथें श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या दर्शनाकरितां येणाऱ्या वारकरी संप्रदायांतील प्रमुख लोकांशीं संबंध आला. बुद्धि तल्लख व वृत्ति धार्मिक असल्यानें यांनीं सुप्रसिद्ध ज्ञानेश्वरीज्ञ कै. कृष्णबुवा श्रीगोंदेकर, साखरे व जोग यांच्यापाशीं ज्ञानेश्वरीचें पद्धतशीर वाचन केलें. पण मूळ संस्कृत भाषेंतील शास्त्रज्ञानाची यांना आवश्यकता वाटूं लागली म्हणून हे आपल्या स्वभावानुसार काशीस जाऊन दाखल झाले. काशीस हे सहा वर्षें होते. तेथें यांनीं म. म. गंगाधरशास्त्री तेलंग, सी. आय. ई., यांचेजवळ वेदान्तशास्त्राचें अध्ययन केलें. त्याच वेळीं अलाहाबाद विश्वविद्यालयाचे मॅट्रिक होऊन कॉलेजमध्येंहि हे दाखल झाले. पण पुढें यांना कॉलेज शिक्षण पुरें करणें शक्य झालें नाहीं.

अभ्यासी वृत्ति, कष्टाळु स्वभाव, निर्भयपणा आणि महत्त्वाकांक्षा यांमुळें यांनीं जेथें जेथें पाऊल टाकलें तेथें तेथें आपली विशेष छाप बसविली. स. १९१७-२१ पर्यंत 'ज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' या विषयावर पुण्याच्या 'चित्रमय जगत्' मासिकांत यांनीं २९ लेखांक लिहिले. त्यांत यांनीं ज्ञानेश्वरांचें वेदांतविषयक प्रतिपादन श्रीशंकराचार्यांच्या अद्वैत मताचें केवळ अनुवादक नसून त्यांचे मायावादखंडन श्रीरामानुजाचार्यांच्या मताला जवळजवळ जुळतें आहे व ज्ञानेशांचा स्फूर्तिवाद शास्त्रीय पद्धतीनें सप्रमाण सिद्ध करण्याचा प्रयत्न यांनीं केला. तें सर्व प्रतिपादन अगदीं नवें आणि बिनतोड आहे. आज पंचवीस वर्षांपेक्षां अधिक दिवस ते लेख विद्वानांच्या पुढें असूनहि त्यांचें व्यवस्थित खंडन अद्यापि कोणीच करूं शकलें नाहीं. अलीकडेच नागपूरचे प्रो. शं. दा. पेंडसे यांनीं त्या प्रतिपादनाचे खंडनाचा प्रयत्न 'ज्ञानेश्वरदर्शन' या नांवाचा एक स्वतंत्र ग्रंथ पीएच्. डी. पदवीकरितां लिहून केला. तो प्रयत्न तितकासा यशस्वी झालेला नाहीं असें विद्वानांचें म्हणणें आहे. यावरून यांची मांडणी कशी जुन्यानव्या संस्कृत-प्राकृत ग्रंथांच्या भक्कम आधारावर उभारली आहे हें ध्यानांत येईल. या लेखांना अद्यापि ग्रंथरूपानें प्रसिद्धि लाभलेली नसली तरी त्यांतील विचार इंग्रजीमधूनहि मद्रासच्या तिसऱ्या ओरिएंटल ऑल इंडिया कॉन्फरन्सच्या वृत्तांतांत मांडला गेला आहे.

आळंदी येथील म्युनिसिपालिटीचे हे स. १९२०-३३ पर्यंत अध्यक्ष होते. यांच्या पद्धतीप्रमाणें हे कोणत्याहि सन्मानाच्या जागेचा निर्गुणनिराकार पद्धतीनें उपभोग घेणें शक्य नसतें. तेथेंहि यांनीं आपलें विशेष व्यक्तित्व खर्च करून कौन्सिलमध्यें नामंजूर झालेली आळंदी बॉटरवर्क्सची योजना खास गव्हर्नरच्या मंजुरीनें अंमलांत आणून यशस्वी केली. आज आळंदीस गांवांत व वारकऱ्यांना मोफत मिळत असलेल्या शुद्ध नळाच्या पाण्याचा पुरवठा हा यांच्या प्रयत्नाचें फळ होय. त्या वेळीं 'रावसाहेब' ही पदवी देऊन यांच्या त्यागी व सेवातत्पर वृत्तीचा सरकारनें गौरव केला (१९२७). त्याप्रमाणें अद्यापि कोणत्याहि म्युनिसिपालटीनें न केलेलें मुलांच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचें आळंदींतील कार्यहि यांच्याच प्रयत्नाचें फळ होय.

यापेक्षांहि यांचें प्रांतिक कायदे कौन्सिलांतील कार्य अत्यंत महत्त्वाचें आणि विशेष घटनामुळें महत्त्वपूर्ण आहे. स. १९३०-३७ सालअखेर हे कौन्सिलांतील लोकनियुक्त सभासद होते. कौन्सिलचे वृत्तांत सरकारनेंच प्रसिद्ध केलेले असल्यामुळें एक साधा पण प्रयत्नशील मनुष्य केवढें प्रचंड काम करूं शकतो याची त्यावरून उत्तम कल्पना येते. बहुमत करावयास लागणाऱ्या सूक्तासूक्त कारवाया, मंत्र्यांच्या अंतर्गत कारवायांवर प्रकाश पाडण्याकरतां करावे लागणारे साहसी प्रयत्न, एवढेंच नव्हे तर सरकारी बजेटांतील कुलंगडीं बाहेर आणण्याकरितां करावा लागणारा गौप्यस्फोट वगैरेमुळें यांनीं कौन्सिलमध्यें आपल्यासंबंधाचा एक विशेष दरारा उत्पन्न केला होता. यांनीं लक्ष घातलेलें काम हे इतक्या नेटानें, चिकाटीनें व बुद्धिमत्तेनें पार पाडीत कीं सर्वच लोक यांच्या कार्यपद्धतीनें चकित होऊन जात. धाडस हा एक यांच्या कार्यपद्धतीचाच भाग आहे. त्यामुळें यांचा वचक नाहीं असा अधिकारीसुद्धां क्वचितच आढळेल.

यांच्या कौन्सिलमधील निःस्वार्थी व निर्भय कामगिरीबद्दल आभार मानण्याकरितां मुंबईचे गव्हर्नर ना. आर. डी. बेल हे एकदां आळंदीस यांच्या घरीं आगाऊ न कळवितां मुद्दाम गेले होते.

अशा प्रकारें कोणतेंहि काम करण्याकरितां यांना अभ्यासहि जिवापाड करावा लागतो. पण अभ्यास, मेहनत यांबद्दल हे कधींच विचार करीत नाहींत. आणि ईश्वरकृपेनें यांना शरीरप्रकृतीहि यांच्या बेडरवृत्तीला साजेशी लाभलेली आहे.

डि. लोकलबोर्डांतील नऊ वर्षांची यांची कारकीर्द अशाच थाटाची आहे. तेथें स्कूलबोर्डांतहि हे सहा वर्षे होते. हे आळंदीच्या वारकरी शिक्षण-संस्थेच्या संस्थापकांपैकीं एक असून त्या संस्थेचे स. १९१९-३० पर्यंत ट्रस्टीहि होते. आळंदी संस्थानचे हे ट्रस्टी आहेत (१९४३). याशिवाय विविधज्ञान विस्तारांत अध्यात्मरामायणाचें अर्वाचीनत्व, उपनिषदांचा परप्रांतांतील प्रवास वगैरे संशोधनप्रधान सुमारें पंधरा लेख यांनीं लिहिले आहेत. तसेंच भा. इ. सं. मं. च्या वृत्तांतांत वारकऱ्यांच्या वसाहती, तुकारामाचें अभंगान्तर्गत आत्मचरित्र व. भां. रि. इं. च्या ॲनल्समध्यें ज्ञानेश्वर-नामदेवांचें समकालीनत्व (इंग्रजी) वगैरे लेख व आळंदी पास्ट ॲंड प्रेझेंट (इंग्रजी) हें पुस्तक यांनीं लिहिलें.

कुळकर्णी, रामकृष्ण केशव— (जन्म स. १८७६-मृत्यु स. १९४४) एक ध्येयवादी व चिकाटीचे बालशिक्षण कार्यकर्ते. यांचा जन्म सातारा जिल्ह्यांत वडगांवनजीक पुसेसावळी येथें झाला. यांचें हायस्कूलशिक्षण कोल्हापूर येथें होऊन हे डेक्कन कॉलेजांतून बी. ए. झाले (१८९८). यांना दक्षिणा फेलोशिप मिळाली. इतिहास व तत्त्वज्ञान हा विषय घेऊन दोन वर्षांचा अभ्यासक्रम एकाच वर्षांत उरकून हे एम्. ए. झाले (१८९९). हे अत्यंत बुद्धिमान् असल्यानें एम्. ए. च्या परीक्षेंत यांना तेलंग सुवर्णपदक मिळालें होतें. हे एल्एल्. बी. झाले तरी वकिली करण्यापेक्षां अध्यापनाकडे यांचा ओढा असल्यानें प्रथम उज्जयनीच्या माधव कॉलेजांत व नंतर ग्वाल्हेर येथील विक्टोरिया कॉलेजांत इतिहासाचे प्राध्यापक झाले. स. १९३५ सालीं हे तेथून सेवानिवृत्त झाले. यांची अध्यात्माकडे स्वाभाविकच प्रवृत्ति होती. देवासच्या श्रीशीलनाथमहाराजांच्या विशेष सहवासानें यांच्या अध्यात्मिक वृत्तीची वाढ होऊन हे सर्वांकडे समदृष्टीनें पाहणारे विश्वकुटुंबी बनले होते. अशा वृत्तीला पोषक असणाऱ्या या नवशिक्षिताचा कल थिऑसॉफिकल सोसायटीकडे वळल्यास आश्चर्य कसलें? स. १९१५ सालीं यांनीं मुंबई येथें शिक्षक पालक-संघाची स्थापना केली आणि त्या संस्थेचे चिटणीस म्हणून अत्यंत उत्साहानें आमरण काम केलें. स. १९२४ सालीं बालशिक्षणशास्त्राच्या पुढील अभ्यासाकरितां यांनीं युरोप, अमेरिका, जपान व इंग्लंड या देशांत प्रवास करून त्या शास्त्रांतील अगदीं ताज्या कल्पना व पद्धति यांची कसोशीनें माहिती मिळवून तिचा प्रसार सुमारें ८-९ बालवार्षिकें (चाइल्ड ॲन्युअल्स) प्रसिद्ध करून या देशांत केला. शिवाय १३ इंग्रजी लघुपुस्तकें त्यांपैकीं कांहींचीं अनेक देशी भाषांतून भाषान्तरें करवून व १६ प्रासंगिक पत्रिका छापून बालशिक्षणशास्त्राचा यांनीं प्रचार केला. शिवाय दक्षिण व उत्तर हिंदुस्थानांत दौरा काढून हे या शिक्षणपद्धतीचा प्रचार करीत.

कुंझरू, पंडित अयोध्यानाथ— (जन्म स. १८४०-मृत्यु स. १८९२)

सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते व राजकारणी पुरुष. हें काश्मीरी ब्राह्मणाचें घराणें अनेक पिढ्यांपूर्वी अलाहाबाद येथें स्थायिक झालें. यांना लहानपणापासूनच सार्वजनिक कार्य करण्याचा नाद असे. यांनीं आग्रा येथें वयाच्या बाविसाव्या वर्षी वकिली करण्यास सुरुवात केली आणि स्वतंत्र बाण्याचे वकील म्हणून यांनीं लौकिक मिळविला. स. १८८६-९० पर्यंत हे संयुक्तप्रांत कायदेमंडळाचे पहिले हिंदी सदस्य होते. तत्कालीन सहकाऱ्यांत यांच्याबद्दल अत्यंत पूज्यभाव असे. स. १८८८ सालीं अलाहाबाद येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेचे हे स्वागताध्यक्ष होते. त्या काळीं राष्ट्रीय सभेस सरकारचा फार विरोध होता. त्यास न जुमानतां आणि मुलकी व लष्करी अमलदारांनीं उपस्थित केलेल्या अडचणींस भीक न घालतां यांनीं आपल्या कर्तबगारीच्या जोरावर तें अधिवेशन यशस्वी करून दाखविलें.

हे आग्रा कॉलेजांत कायद्याचे प्राध्यापक होते. आग्रा येथील विक्टोरिया कॉलेजचे हे संस्थापक होत. अलाहाबाद व कलकत्ता विद्यापीठाच्या सेनेटचे हे सभासद होते.

स. १८७९ सालीं स्वतःचे एक लक्ष रुपये घालून यांनीं 'इंडियन हेरल्ड' नांवाचें पत्र काढलें. पण तें पुढें बंद पडलें. पुनः १८९० मध्यें 'इंडियन युनियन'

जन्मास आणलें आणि पंडित मदनमोहन मालवीय यांच्याकडे त्याचें संपादकत्व दिलें. यांचे पुत्र पं. हृदयनाथ कुंझरू होत.

कुंझरू, पंडित हृदयनाथ— (जन्म सन १८८७) भारत सेवक समाजाचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध राजकीय कार्यकर्ते. यांना सार्वजनिक कार्य विधायक पद्धतीनें मनःपूर्वक करण्याचें शिक्षण प. वा. ना. गोखले यांजकडून मिळालें. हे अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे बी. ए., बी. एससी. असून १९०९ सालीं भारत सेवक समाजास येऊन मिळाले. अर्थशास्त्राचें विशेष अध्ययन करण्याकरितां भारत सेवक समाजानें यांना इंग्लंडला रवाना केलें. तेथें 'लंडन स्कूल ऑफ इकॉनमिक्स' मध्यें यांनीं अभ्यास केला (१९११-१२). भारत सेवक समाजांत प्रवेश झाल्यापासून हे एक निष्ठावन्त आणि व्यासंगी कार्यकर्ते म्हणून जनतेच्या सतत डोळ्यांसमोर आहेत. खुद्द संस्थेतहि यांच्या विशेष कार्यपद्धतीमुळें पूर्वीचे अध्यक्ष गोपाळ कृष्ण देवधर हे परलोकवासी झाल्यावर यांना अध्यक्ष निवडण्यांत आलें (१९३६). हिंदुस्थानांतील होणाऱ्या राज्यघटनात्मक चळवळींचे सूक्ष्म निरीक्षक या दृष्टीनें यांची कामगिरी महत्त्वाची आहे. चालू सार्वजनिक प्रश्नांची सांगोपांग माहिती यांच्याइतकी फारच थोड्यांना असेल. मॉंटफोर्ड सुधारणांच्या वेळीं प्रागतिक पक्षानें इंग्लंडला पाठविलेल्या शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून यांनीं केलेली कामगिरी सुप्रसिद्ध आहे (१९१९). त्याचेच बरोबर संयुक्तप्रान्त कायदेमंडळाचे सभासद (१९२१-२३), ईस्ट आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसचे अध्यक्ष (१९२९), हिंदी विधिमंडळाच्या वरिष्ठ शाखेचे सभासद (१९३७ पासून) ई. आ. नॅ. कॉंग्रेसनें लंडनला नेलेल्या शिष्टमंडळाचे सदस्य (१९२९-३०) व आस्ट्रेलियांत सिडने येथें भरलेल्या दुसऱ्या ब्रिटिश कॉमनवेल्थ रिलेशन्स कान्फरन्समधील हिंदी शिष्टमंडळाचे सभासद (१९३८), अमेरिकेंत भरलेल्या पॅसिफिक रिलेशन्स कॉन्फरन्समधील हिंदुस्थानचे प्रतिनिधि (१९४५) इत्यादि यांची कामगिरी महत्त्वाची आहे. लष्कराच्या हिंदीकरणावर हे नेहमीं भर देतात. हिंदी विधिमंडळानें निवडून दिलेल्या डिफेन्स कन्सल्टेटिव्ह कमेटी व स्टँडिंग एमिग्रेशन कमेटी यांचे हे सभासद होते.

पुण्यास भरलेल्यां राष्ट्रीय प्रागतिक परिषदेचे हे अध्यक्ष होते (१९३४). परद्वीपस्थ हिंदी लोक, ब्रम्ही निर्वासित, वगैरेसंबंधाची यांची कामगिरी महत्त्वाची आहे. बनारस हिंदु विद्यापीठ व अलाहाबाद विद्यापीठ यांच्या कार्यकारिणीचे हे सदस्य आहेत. बंगाल, बिहार, ओरिसा, मलबार वगैरे प्रान्तांतील दुष्काळ व व्याधि निवारणाबाबत यांनीं चांगली कामगिरी केली आहे. अलाहाबाद येथील सेवासमितीचे कार्यवाह, कमला नेहरू रुग्णालयाच्या स्थानिक कमेटीचे अध्यक्ष, अलाहाबाद येथें स्थापन झालेल्या हिंदुस्थान स्काउट ॲसोसिएशनचे नॅशनल कमिशनर वगैरे यांचीं कामें उल्लेखनीय आहेत. 'पब्लिक सर्व्हिसेस ऑफ इंडिया' हा यांचा ग्रंथ होय.

कुंटे, महादेव मोरेश्वर—(जन्म सन १८३५-मृत्यु स. १८८८) कवि, इतिहासकार व षट्दर्शनज्ञ. साताऱ्याजवळ माहुली गांवीं गरीब भिक्षुक घराण्यांत जन्म. यांचे नऊ वर्षांनीं धाकटे बंधु अण्णा म्हणून होते. बारा वर्षेपर्यंत आयुष्य उनाडपणांत काढून हे कोल्हापुरास पळाले. तेथें मराठी व इंग्रजी शिक्षण घेऊन आपले सहाध्यायी (रा.सा.) विठ्ठलराव पाठक, (रा.ब.) बाबाजीराव सामंत व हे असे तिघे पुढील अभ्यासाकरितां मुंबईस आले. पण जवळची पुंजी लवकरच संपल्यानें यांना परत यावें लागलें. पुनः हे मुंबईस जाऊन १८५९ मध्यें मॅट्रिक झाले व स. १८६४ सालीं बी. ए. झाले.

सिंधमध्यें कराची हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागीं यांची नेमणूक झाली. तेथें दोन वर्षांत हे सिंधीचे वाकबगार पंडित झाले. सिंधीचे हे मॅट्रिकचे परीक्षकहि असत. तेथून हे कोल्हापुरास राजाराम हायस्कूलमध्यें हेडमास्तर झाले. तेथें चार वर्षांत संस्कृतचें अध्ययन सुरू करून हे व्याकरण, अलंकार, न्याय वगैरे शास्त्रांत निष्णात झाले. तेथेंच यांनीं तत्कालीन राजाराम छत्रपतींच्या मृत्युविलापाचें काव्य केलें (१८७१). राजा शिवाजी, मन हीं काव्येंहि तेथेंच लिहून यांनीं प्रसिद्ध केलीं.

तेथून हे पुणें हायस्कूलावर हेडमास्तर म्हणून नेमून आले (१८७१). पुण्यास नेमणूक झाल्यापासून मधली दोन वर्षें खेरीज (१८७९-८०) हे सोळा वर्षें पुण्यासच राहिले. मधल्या दोन वर्षांत सहा महिने मुंबईस एल्फिन्स्टनमध्यें संस्कृतचे प्रोफेसर व पुढें यांची अहमदाबाद कॉलेजावर ॲक्टिंग प्रिन्सिपलच्या जागीं नेमणूक झाली. यापूर्वीच यांनीं मीमांसाशास्त्राचा अभ्यास केला. आपल्या ज्ञानाचा फायदा 'षड्दर्शनचिंतनिका' (१८७७) या मासिकाच्या द्वारें लोकांना देण्यास यांनीं सुरुवात केली. त्यांत हे इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांत लिहीत. त्यांजवरून यांचें त्या शास्त्रांतील नैपुण्य सहज दिसून येतें.

इटलीच्या विद्वत्परिषदेकडून 'आर्य लोकांच्या हिंदु-

स्थानांतील सुधारणाक्रमाचा इतिहास ' लिहिणारास बक्षिस देण्याचें प्रसिद्ध झालें. तेव्हां तें बक्षिस मिळविण्याच्या हेतूनें यांनी ' व्हिसिसिट्यूडस् ऑफ आर्यन् सिव्हिलिझेशन इन इंडिया ' (आर्यसंस्कृतीचीं स्थित्यंतरें) या नांवाचें एक मोठें पुस्तक लिहून तें रोम येथें पाठविलें आणि तें बक्षिस यांना मिळालें. हें पुस्तक यांच्या विद्वत्तेची व शोधक बुद्धीची ओळख पटविण्यास पुरेसें आहे.

यांनीं मुंबईस जाण्यापूर्वी 'ऋषि' नांवाचें इंग्रजी काव्य केलें. त्याची इंग्रजी कवींनींहि तारीफ केली. स. १८७६-७७ सालीं दुष्काळ पडला त्याला अनुसरून यांनीं 'फॅमिश्ड व्हिलेज' या नांवाचें इंग्रजी काव्य करून प्रसिद्ध केलें.

यांनीं सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला होता. हे स. १८७८ पर्यंत पुण्यांतील प्रार्थना समाजाचे पुरस्कर्ते व अध्वर्यु होते. पण यांचें मतान्तर होतां होतां हे पूर्ण वारकरी सांप्रदायाचे बनले. हे शेवटीं रोज एक तास पायांत चाळ बांधून हातांत चिपळ्या व वीणा घेऊन घाम निघेपर्यंत भजन करीत.

औद्योगिक गोष्टीकडेहि यांचें लक्ष लागून यांनीं 'सूर्यशलाका' नांवाच्या शिसपेन्सिलीचा कारखाना काढला होता. यांत कांहीं वर्षे घालविल्यावर यांचें संगीतशास्त्राकडे लक्ष वेधलें. त्याचाहि खोल व्यासंग करून भारतीय संगीत श्रेष्ठ असल्याची यांची खात्री झाली. गायन समाजाचें काम हे मोठ्या आस्थेनें करीत.

भूगर्भशास्त्राकडे शेवटीं यांचें लक्ष वेधलें होतें. पुणें म्युनिसिपालिटीचे हे सभासद व चेअरमन होते.

यांना अनेक भाषा येत असत. आणि त्या भाषेंत हे मोठें रसाळ वक्तृत्व करूं शकत. थोडक्याच दिवसांत परकी भाषा तिच्यांतील सफाईदार रचनेसह आत्मसात् करणें हा यांचा मोठा गुण होय. मराठी भाषेंतील यांचें वक्तृत्व निःसंशय मेजवानीसारखें असे. साधें पण विविध माहितीनें भरलेलें, रसाळ पण विस्तृत असें यांचें भाषण असे. ग्रंथांप्रमाणें भाषणें शिल्लक ठेवण्याची कला आपणांकडे नव्हती याबद्दल चुटपुट लागल्याशिवाय राहत नाहीं.

यांच्या ' शिवाजी ' वगैरे काव्याची नव्या साध्या मराठी वळणामुळें पंडिती वळणांतील त्या वेळच्या विद्वानांत टरच उडविण्यांत आली. संस्कृत शब्दांचा व अलंकारांचा सोस सोडून अस्सल व्यावहारिक भाषेंत यांनीं काव्य करण्याची प्रथा पाडून नवीन युगाच्या प्रवर्तकत्वाचा मान आपल्याकडे घेतला आहे. इंग्रजी वळणावरची कविता यांच्यानंतर सुरू झाली.

कुंदगोळकर, सवाई गंधर्व-रामचंद्र गणेश— (जन्म स. १८८५) सुप्रसिद्ध गवई व नट. हे गायनशास्त्रांत निष्णात असून उत्तम गायक असल्यानें यांना कै. दादासाहेब खापर्डे यांनीं उमरावतीस जाहीरपणें 'सवाई गंधर्व' अशी पदवी दिली. हे सुप्रसिद्ध गवई अबदुल करीमखांचे शिष्य होत. शिकवण व मेहनत करून यांनीं आपली विद्या कमावलेली आहे. त्यामुळें गवई या नात्यानें यांचा दर्जा फार उच्च मानण्यांत येतो. ख्यालासारख्या उच्च प्रकारच्या गायनपद्धतींत हे चांगलेच तयार आहेत. त्यांतील विलंपत व तयारीच्या विविध ढंगी फिरतीच्या प्रकारांत हे सारखेच प्रवीण आहेत. सुरेलपणा व गोडी या दोन्ही प्रकारांनीं अबदुल करीमखांची तरकीब राखून तींत आपल्या मेहनतीनें यांनीं भर टाकली आहे.

बालगंधर्व हे आपल्या मधुर आवजानें कीर्तीच्या शिखरावर होते त्या वेळींच यांनीं नाटकांत पदार्पण करून सुभद्रेचें काम सौभद्र नाटकांत करण्यास सुरुवात केली. आणि कांहीं दिवस बालगंधर्वांचें नांव यांनीं रसिकांना विसरावयास लाविलें. परंतु लवकरच यांच्या आवाजांत दोष उत्पन्न झाला. तो थोडा घोगरा झाला. पण खांसाहेबांच्या पद्धतीनें स्वराची व इतर मेहेनत रोजीं ८।८ तास करून यांनीं आवाजाला मऊपणा व सुरेलपणा आणल्यानें व गाणें अति ढंगदार, कसदार व वजनदार असल्यानें आज तरी महाराष्ट्रीयांत यांच्या तोडीचा श्रेष्ठ गायक विरळा. अबदुल करीमखांच्या गायकींतील मुलायमपणा व भावनेचा हळुवारपणा यांनीं आपल्या ठुंबऱ्या व नाटकांतील पदांत तंतोतंत ठेवला आहे. ठुंबरी ही ख्यालापेक्षां अलग ठेवून स्वतंत्र अंगानें भावप्रचुर म्हणणें आणि ठुंबरी-ख्याल-पदें इ. कोणत्याहि गायकींत एकेक स्वराची विश्लेषणपूर्वक अनेक तऱ्हांनीं बुद्धिप्रचुर बढत करणें यांत यांचा हातखंडा आहे.

कुंवरसिंग— (जन्म स. १७७८–मृत्यु स. १८५८ आक्टो. १३) सत्तावन सालच्या युद्धांतील प्रमुख. जगदीशपुरच्या उठावणींत २७ जुलै १८५७ रोजीं यांनीं सुरुवात करून सर्व बिहार पेटविला. १३ आक्टोबर १८५८ रोजीं त्या लढ्याचा यांच्या मृत्यूनें शेवट झाला. यांचे बंधु अमरसिंग शेवटीं नेपाळकडे निघून गेले.

कृपलानी, आचार्य जे. बी.— (जन्म स. १८८६ सुमार) बिहारमधील सुप्रसिद्ध काँग्रेस कार्यकर्ते व गांधींच्या एकनिष्ठ सिंधी शिष्यांपैकी एक.

इतिहास व अर्थशास्त्र हे दोन विषय घेऊन एम्. ए. झाल्यानंतर (१९१२) कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या ताब्यांत असणाऱ्या बिहारमध्यें यांनीं अध्यापनाचें काम सुरू केलें. मुझफरपूरला हे काम करीत असतां चंपारण्यांतील उंसाच्या व निळीच्या मळ्यांत काम करणाऱ्या मजुरांची स्थिति समजावून घेण्याच्या इच्छेनें आलेल्या म. गांधींशीं यांची गांठ पडली व पुढें लवकरच राष्ट्रसभेला डोळ्यांत तेल घालून जपणारे तिचे एकनिष्ठ सेवक म्हणून यांनीं प्रसिद्धी मिळविली. त्यामुळें जेथें गांधी, तेथें सावली-प्रमाणें असणाऱ्या त्यांच्या शिष्यांमध्यें यांची गणना होऊं लागली. या दृष्टीनें गांधींच्या बरोबर खेडा (गुजराथ) येथें यांनीं केलेलें गमन महत्त्वाचें आहे. परंतु यापुढें जवळजवळ एक वर्षभर हे पं. मदनमोहन मालवीयांचे खाजगी चिटणीस होते (१९१८). यानंतर कांहीं दिवस बनारस हिंदु विश्वविद्यालयांत हे राजकारण विषयाचे प्राध्यापक होते (१९१९). एक वर्षानंतर गांधींची असहकाराची चळवळ सुरू झाली (१९२०) आणि हे आपल्या या प्राध्यापकाच्या जागेचा राजीनामा देऊन बाहेर पडले व विश्वविद्यालयांतील आपल्या कांहीं विद्यार्थ्यांचे साहाय्यानें यांनीं मिरत येथें 'श्री गांधी आश्रम' सुरू केला. खादी व ग्रामोद्योग हा तेथील यांचा व्यवसाय होता. यानंतर कांहीं दिवस यांच्या या कार्यास थोडा खंड पडला. कारण या काळांत यांना गुजराथ विद्यापीठाच्या प्राचार्यांची (प्रिन्सिपलची) जागा देण्यांत आली (१९२०-२७). परंतु या जागेवरून निवृत्त होतांच यांनीं आपलें हें कार्य पुन्हां एकदां नव्या जोमानें सुरू केलें. यू. पी., दिल्ली व सी. पी. मध्यें चालणाऱ्या खादी व ग्रामोद्योग संघटनेचे संयोजक व मिरतच्या श्रीगांधी आश्रमाचे संचालक या नात्यानें यांनीं केलेली कामगिरी, गांधींच्या कार्यपद्धतीवरील यांचा संपूर्ण विश्वास दर्शविण्यास पुरेशी आहे. आज जवळ जवळ अखंड तपभर राष्ट्रीय सभेचे चिटणीस होण्याचा मान यांना मिळाला आहे (१९३४ ते १९४५),

यांचे (१) The Gandhian Way (२) The Latest Fad (Basic Education) इत्यादि ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत. हे गांधीवादाचे उत्कृष्ट भाष्यकार आहेत. काव्याची आवड व धार्मिक मनोवृत्ति हें यांचें वैशिष्ट्य आहे. गीता, बायबल व सिंधचा प्रख्यात सूफी कवि शाह अबदुल लतीफ यांचीं काव्यें हे यांचे आवडते ग्रंथ होत.

कृष्णमाचारी, सर वंगल तिरुवेंकट— (जन्म स. १८८१) बडोदें राज्याचे सुप्रसिद्ध दिवाण. मद्रास येथील प्रेसिडेन्सी व लॉ कॉलेजांत शिक्षण घेऊन एलएल्. बी. झाल्यानंतर हे मद्रास सिव्हिल-सर्व्हिसमध्यें शिरले. पुढें कोचीन राज्यांत चीफ रेव्हेन्यु कमिशनर व साउथबरो-कमेटीचे स्पेशल आफिसर म्हणून काम केलें (१९१३-१९). नंतर रामनद राज्यांतील कलेक्टर व लॉ डिपार्टमेंटचे सेक्रेटरी होते (१९२३). यानंतर बडोद्याचे दिवाण म्हणून यांची नेमणूक झाली (१९२७-१९४५). पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या राउंड टेबल कॉन्फरन्सचे हे सभासद होते व तेथें यांनीं निरनिराळ्या कमेट्यांवर कामें केलीं (१९२९-३१). जॉइंटपार्लमेंटरी कमेटीचे हे प्रेसिडेंट होते. हे बडोद्याच्या दिवाणपदावरून निवृत्त झाल्यानंतर सान्फ्रान्सिस्को परिषदेस हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधि म्हणून उपस्थित होते. यांना सर व के. टी., सी. आय. ई. इत्यादि पदव्या ब्रिटिश सरकारनें दिल्या आहेत.

कृष्णमूर्ति जे.—(जन्म स. १८९५) जगप्रसिद्ध तत्त्वज्ञानी.

यांचा जन्म दक्षिण हिंदुस्थानांत मदनपल्ली येथें तेलगू ब्राह्मणाच्या कुटुंबांत झाला. त्या वेळीं यांचे वडील तेथें तहशीलदार होते. यांची आई हे दहा वर्षांचे असतांना वारली. तिचे दहा दिवसांतच, एकदां हे स्नान करीत असतांना, एकदम ओलेतेच बाहेर आले व म्हणाले कीं, 'आतांच आई स्नान करून बाहेर आली आहे. ती तिकडे लुगडें बदलण्याकरितां जात आहे. मीहि तिकडेच जातों.' असें म्हणून ज्या खोलींत लुगडी वाळत घालीत असत तिकडे हें गेले व कांहीं वेळानें ती दिसेनाशी झाली असें पाहून बाहेर आले.

स. १९०७ सालीं यांचे वडील सेवानिवृत्त झाले. ते १८८२ सालापासून थिऑसॉफिकल सोसायटीचे सभासद होते. सेवानिवृत्त झाल्यावर त्यांचें थिऑसॉफीवर प्रेम असल्याकारणानें, अड्यार येथें राहून आपण सोसायटीचें कांहीं तरी काम करावें, अशा इच्छेनें त्यांनीं डिसें. १९०७ मध्यें आपली सेवेची इच्छा बेझंट-बाईंच्यापाशीं प्रगट केली. पण त्यांचे कुटुंबांतील माणसें बरींच असल्यानें बाईंनीं प्रथम नकार दिला. पण पुढें

१९०९ च्या आरंभीं बाईंनीं त्यांना 'हो' म्हटलें, व ते अड्यार येथें येऊन राहिले. त्यांना चार मुलगे होते. हें आठवें अपत्य असल्यानें, यांचें नांव तिकडील रिवाजाप्रमाणें 'कृष्णमूर्ति' असें ठेवलें.

फेब्रु. १९०९ मध्यें मि. लेडबीटर हे अड्यार येथें कायम वस्तीकरितां येऊन राहिले. रोजचें कामकाज संपल्यावर ते सहकारी मंडळींना घेऊन पोहावयास जात असत. एके वेळीं हीं मुलें तळ्याचे कांठावरून पाहत उभीं असतां मि. लेडबीटर यांनीं 'तुम्हांला पोहावयास शिकावयाचें आहे का?' असें म्हणून त्यांच्या वडिलांच्या संमतीनें त्यांना शिकविण्यास सुरुवात केली. थोडघाच दिवसांत, एके दिवशीं लेडबीडर हे पोहून परत आल्यावर, त्यांचे खासगी चिटणीस मि. अर्नेस्ट वुड यांना ग्रंथकार्याला सुरुवात करण्याचे पूर्वी म्हणाले कीं, "आज माझा एक अत्यंत प्राचीन जिवलग मित्र मीं ओळखला. तो तहशीलदार नारायणय्या यांचा द्वितीय पुत्र होय. त्या वेळचा त्याचा जन्म गौतमबुद्धांच्या वेळचा होता." लेडबीटर यांनीं यापूर्वी सोसायटीच्या अनेक सभासदांचे पूर्वजन्म संशोधिले होते. तेव्हां यापुढें यांचे जन्महि संशोधून पाहावे व हे या ठिकाणीं सोसायटीचे पीठामध्यें वास्तव्य करण्यास कां आले याची कारणपरंपरा शोधून पाहावी, अशी कल्पना दोघांच्याहि मनांत येऊन त्याजबद्दल नारायणय्या यांची संमति घेऊन, या कार्यास त्यांनीं आरंभ केला; व रोज एका जन्माचा वृत्तान्त लिहिण्याचा क्रम सुरू झाला. या वेळीं लेडबीटर हे कोचावर किंवा खुर्चीवर बसून, कधीं डोळे उघडे ठेवून तर कधीं मिटून, निवेदन करीत व मि. वुड हे तो मजकूर लिहून काढीत. लेडबीटर यांनीं त्यांना सांगून ठेवलें होतें कीं, मला महत्त्वाचा वाटेल तो भाग मला जसा दिसेल तसा मी सांगत राहीन. पण तुम्हांला एखादा तपशील विशेष विस्तारानें हवा असल्यास, तसें मला तुम्हीं सांगावें. याप्रमाणें पहिले दिवशीं यांचा बुद्धकालीन जन्म लिहिला गेला. याप्रमाणें रोज एक, असे दहा जन्म लिहिले गेले, व त्यांमध्यें अनेक वेळां या जन्मांतून यांची निःस्वार्थता, शुद्ध प्रेम व अलोट त्याग झालेले व गौतम बुद्धांसारख्या महापुरुषांच्या सन्निध लोकसेवेचीं व्रतें घेतल्याचे प्रसंग पाहण्यांत आले व एकदम लेडबीटर यांना विचार उमगला कीं, मला व बेझंटबाईना गुरुदेवांकडून जगद्गुरूंच्या आगमनाची जगभर जाहीर घोषणा करावी अशी जी आज्ञा मिळाली आहे, तदनुरूप या जन्मामध्यें, कदाचित् त्यांचे कार्याचें अधिष्ठान होण्याकरितां या मुलाचें आगमन सोसायटीचे हद्दींत झालें असेल. त्या वेळीं बेझंटबाई या युरोप व अमेरिकेमध्यें जगद्गुरूंच्या आगमनाबद्दल 'चेंजिंग वर्ल्ड' या संज्ञेखालीं व्याख्यानें देत फिरत होत्या. त्यांजकडे हे पहिल्या दहा जन्मांचे पूर्व-वृत्तान्त त्यांनीं रवाना केले व नंतर फिरून दोन दशकें याप्रमाणें तीस जन्मांचे वृत्तान्त पाठविले. यानंतर बेझंटबाई १९०९ च्या अखेरीस हिंदुस्थानांत आल्या व दोघांसहि यांचें दिव्य भवितव्य प्रत्ययास आलें.

येथें आल्यावर अशा अलौकिक मुलाचें शिक्षण विशेष रीतीनें झालें पाहिजे, ही गोष्ट त्यांनीं त्यांचे वडिलांस कळविली व 'कृष्णमूर्ति व नित्यानंद या दोन्ही मुलांचे शिक्षणाची जबाबदारी, इंग्लंडांतील उच्च शिक्षणासह मजकडे आहे' असें सांगितलें व नारायणय्या यांना त्यांचेबद्दल विश्वास व आदर असल्यामुळें, त्यांनीं या योजनेला संमति दिली. या वेळीं हीं दोन्ही मुलें मैलापूर (मद्रास) या शाळेंत जात असत. त्या वेळीं शिक्षकांच्या मतानें नित्यानंद हा चलाख व बुद्धिमान् असून, हे अगदींच मंदबुद्धीचे होते.

जानेवारी ११ व १२ स. १९१० या दिवशीं अड्यार येथील पीठांतच यांना पहिली महादीक्षा प्राप्त झाली. ही दीक्षा मिळण्याची पूर्वतयारी म्हणून, यांचे गुरुदेव यांना स्वप्नस्थितींत रोज जो पाठ देत असत, तो सकाळीं उठल्यावर बेझंटबाईंचे खोलींत असतांना, 'स्वप्नस्मृति' म्हणून हे लिहून काढीत. याप्रमाणें साधनचतुष्टयाबद्दल यांना मिळालेला उपदेश, यांनीं रोजचे रोज लिहून काढला. हाच उपदेश, अनुक्रमदृष्टीनें सुसंगत करून, 'At the Feet of the Master' या नांवानें पुढें प्रसिद्ध झाला. या ग्रंथाची भाषा अत्यंत सुगम व सरळ अशी आहे, व त्यांत अत्यंत प्रसादहि भरलेला आहे.

वर लिहिलेल्या पूर्वजन्मांचा वृत्तान्त 'थिऑसॉफिस्ट' मासिकांतून बाईंनीं प्रसिद्ध केला व हा मुलगा जगद्गुरूंचे अवताराचें अधिष्ठान होणार असल्याचें आपलें मत प्रसिद्ध केलें, व यांना बरोबर घेऊन हिंदुस्थानांतील कांहीं ठिकाणीं त्यांनीं प्रवास केला. बनारस येथें असतांना तेथें चाललेल्या सेंट्रल हिंदु कॉलेजमधील शिक्षणकार्याचें त्यांनीं निरीक्षण केलें व कांहीं सभासदांना व तेथील प्राध्यापकांना साधन-चतुष्टयाच्या आधारें शिक्षणावर प्रवचनें केलीं. तीं कांहीं शिक्षकांना अत्यंत अलौकिक वाटलीं.

तीं पुढें 'Education as Service' या नांवानें प्रसिद्ध झालीं. जगद्गुरूंचे कार्याची पूर्वतयारी म्हणून बाईंनीं 'ऑर्डर ऑफ स्टार इन् दि ईस्ट' ही संस्था काढली.

याप्रमाणें काम चाललें असतां, यांच्या भावी दैवी भवितव्याबद्दलच्या खऱ्याखोट्या वदंता कानीं जाऊन, दक्षिण हिंदुस्थानांतील नारायणय्यांचे कित्येक सनातनी वृत्तीचे नातलग व स्नेही यांना हा सर्व प्रकार अत्यंत अंधश्रद्धेचा व भ्रष्टाकाराचा अतएव मुलांच्या अनहिताचा असा वाटून त्यांना आपलीं मुलें परत घेण्याची त्यांनीं गळ घातली, व त्यांतच मि. लेडबीटर यांच्यावर पूर्वी शीलभ्रष्टतेचें जें वादळ सोसायटींत उठलें होतें त्याहि गोष्टीची त्यांचे मनावर भर दिली. त्यामुळें नारायणय्या यांचे मनाची चलबिचल होऊन त्यांनीं बेझंटबाईंना मुलें परत मिळण्याबद्दल खासगी मागणी करून रुकार न मिळाल्यामुळें फिर्याद करण्याची कायदेशीर नोटीस दिली. हें पाहून आपल्या कार्यांत येणारें विघ्न टाळण्याकरितां बाईंनीं मुलांना लागलीच १९१२ सालीं विलायतेंत नेलें, व त्यांच्या ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांतील शिक्षणाची योजना करून त्यांचे पूर्वशिक्षणाकरितां डॉ. अरंडेल, मि. जिनराजदास व प्रो. वुडहाउस यांची अनुक्रमें इतिहास, संस्कृत व इंग्रजी या विषयांकरितां नेमणूक केली. तोंच त्यांचेवर मद्रास हायकोर्टांत मुलांचे कबजाबद्दल यांचे वडिलांकडून दावा दाखल झाला. या दाव्याचे चौकशींत मुलें परत मिळण्याबद्दल कारण म्हणून जो लेडबीटर यांचे अनीतिमत्तेबद्दल आक्षेप दाखविण्यांत आला होता तो शाबीत झाला नाहीं, पण 'कायद्यानें बापाला मुलें परत घेण्याचा हक्क आहे' असा निर्णय झाला. पण बाईंनीं केलेल्या प्रिव्ही कौन्सिलचे अपिलांत हा निर्णय खालच्या कोर्टानें मुलांचें स्वतःचें मनोगत काय, हें न पाहिल्यानें व मूलतः फिर्याद कायद्यानें चालू शकत नसल्यानें, रद्द केला गेला (एप्रिल १९१४).

याप्रमाणें हे व त्यांचे बंधु नित्यानंद यांचे शैक्षणिक जीवनास स्वस्थतेनें इंग्लंडांत सुरुवात झाली. नित्यानंद हे ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाचे बी. ए. झाले व पुढें कायद्याचे अभ्यासास लागले. यांत बेझंटबाईंचा हेतु असा होता कीं, हे संन्यस्तधर्मानें राहण्याचा संभव असल्यानें त्यांना लहान भावाचा सांपत्तिक आधार असावा. यांच्या शिक्षणाची वरप्रमाणें व्यवस्था केली होती, पण शिक्षकांचे नजरेस, व्यावहारिक शिक्षणाबद्दल यांची आत्यंतिक उदासीनता आढळून आली. यांनीं अनेक ग्रंथ वाचले, पण शिक्षकांचे दृष्टीनें त्यांना त्यांचे कार्यांत यश आलें नाहीं. १९२१ सालीं आपल्या बंधूंबरोबर हे हिंदुस्थानांत आले व लोककार्यांत लक्ष घालून व्याख्यान व लेखन करूं लागले. पुनः कांहीं दिवसांनीं ऑस्ट्रेलियाचे मार्गानें अमेरिकेंत गेले, व तेथें राहून कधीं युरोपांत व हिंदुस्थानांत प्रचारकार्य करूं लागले. यांचीं प्रवचनें ऐकून व विषयचर्चेची स्वतंत्र रचना व मौलिक स्वरूप पाहून बाईंच्या म्हणण्याप्रमाणें हे खरोखरच अलौकिक पुरुष आहेत असें लोकांस वाटलें. सो. च्या बाहेरचेहि शेंकडों लोक श्रवणास येऊं लागले. यांचे कार्याकरितां हॉलंडमधील बॅरन पॅलँड या नांवाचे एका श्रीमंत गृहस्थानें आपला मालकीचा एरडे या गांवीं असलेला एक प्राचीन किल्ला, भोंवतालचे पांच हजार एकर जमिनीसमवेत यांना बक्षीस दिला. बाईंनीं यांचेकरितां रहिवासाला म्हणून आर्यविहार नांवाची इमारत कालिफोर्निया(अमेरिका)मध्यें विकत घेऊन दिली. याप्रमाणें काम चालत असतां १९२५ सालचे अखेरीस सोसायटीचे सुवर्णमहोत्सवानिमित्त बेझंटबाईंबरोबर हे हिंदुस्थानाकडे परत येत असतां यांचे बंधु नित्यानंद हे अमेरिकेंत क्षयानें वारल्याचें वृत्त यांचे कानीं पडलें. त्या योगें यांना आत्यंतिक दुःख झालें. पण त्या दुःखाग्नीतूनच 'मला आत्मज्ञान व अखंड शांति प्राप्त झाली' असें ते म्हणत.

सोसायटीचे सुवर्णमहोत्सवप्रसंगीं यांचें प्रवचन चालू असतां यांचे मुखांतून अखेरी-अखेरीस जगद्गुरूचेच असे वाटणारे उद्गार निघाले, व हाच प्रसंग युरोप-अमेरिकेंतील व्याख्यानांतून अनेक वेळां व जास्त वेळपर्यंत पुनः पुनः होऊं लागला. यांचा योगाभ्यास १९२७ जाने. मध्यें पूर्ण झाला.

पण तेव्हांपासून यांचे मुखांतून सर्वांनाच अनपेक्षित अशी विचारसरणी नित्य निघूं लागली. यासंबंधींचें यांचें पहिलें प्रवचन म्हणजे 'Who brings the truth' हें असून तेव्हांपासून यांची विचारसरणी आजपर्यंत अखंड रीतीनें त्याच तऱ्हेची चालू आहे. लागलीच यांनीं यांचे कार्याकरितां बाईंनीं काढलेला संप्रदाय 'Order of Star in the East' बंद केला (१९२८), अमेरिकेंतील घराचा त्याग केला, हॉलंडमधील वर लिहिलेला किल्ला व जमीन पूर्व मालकाला परत देऊन टाकली व आपण पूर्ण संन्यस्त वृत्तीनें राहूं लागले. 'मला संप्रदाय उत्पन्न करावयाचा नाहीं,

मला शिष्य नकोत, मी कोणाचाहि गुरु नाहीं. प्रत्यक्ष माझ्या योग्यतेचे होण्याचा प्रत्येक स्त्रीपुरुषाला निसर्गदत्त हक्क असतांना, त्यांनीं माझें किंवा कोणाचेंहि शिष्यत्व पत्करणें हा त्यांचा अपकर्ष आहे ' असें हे सांगूं लागले. व त्याप्रमाणें यांचा अजूनपर्यंत जीवनक्रम चालू आहे. यापुढें चालू युद्धामुळें किंवा अन्य कोणत्याहि जागतिक अगर वैयक्तिक घटनेमुळें, यांच्या जीवनौघाला काय वळण लागेल, हें भविष्यकालाचे उदरांत अज्ञात आहे.

' जगदुद्धाराचा प्रश्न हा मूलतः, व्यक्ति उद्धाराचाच प्रश्न आहे; व हा व्यक्तीच्या, कोणत्याहि धर्माच्या, पंथाच्या, संप्रदायाच्या, समाजाच्या, देवाच्या किंवा अन्य कोणाच्याहि एवढेंच नव्हे तर माझ्याहि द्वारां होणें शक्य नाहीं. उद्धार ज्याचा त्यानें स्वावलंबनानें करून घेतला पाहिजे. उद्धाराचा मार्ग पूर्वाचार्यांनीं आधींच सांगून ठेवलेला नाहीं. प्रत्येकानें आपला मार्ग शोधून निश्चित करावयाचा आहे' याप्रमाणें या अलौकिक पुरुषाची शिकवण आत्यंतिक व्यक्तिमत्त्वाच्या पुरस्काराची आहे. यांचे ग्रंथः—

1. At the Feet of the Master, 2. Education as Service, 3. Kingdom of Happiness, 4. Who Brings the Truth, 5. Life in Freedem, 6. In What Authority, 7. Let Understanding be the Law, 8. Pool of Wisdom, 9. Life the Goal, 10. Search, 11. Immortal Friend. (वा. ल. चिपळुणकर)

(मुम्मडी) कृष्णराज वोडियार— (जन्म स. १७९४–मृत्यु स. १८६८)

म्हैसूर संस्थानचे महाराज, कानडी भाषेंतील ग्रंथकार व कवि. यांच्या पित्याचें नांव चामराज, माता–केम्पन अंबे. स. १७९९–१८६८ पर्यंत हे राज्यावर होते. यांचें चरित्र आमच्या मध्ययुगीत चरित्रकोशांत ' कृष्णराज ओडियार ' या शब्दावर दिलें आहे. येथें फक्त यांच्या कानडी वाङ्मयांतील कार्याचा उल्लेख आम्ही करीत आहोंत. हे मोठे विद्वान् असून संस्कृतांतील पुराणें, इतिहास, काव्य वगैरेंचें यांनीं कानडी भाषेंत अवतरण केलें, तसेंच स्वतंत्रपणें नवीन ग्रंथहि निर्मिले.

यांचे ग्रंथः—१ अखंड कावेरी-माहात्म्य, २ अध्यात्मरामायण, ३ अर्कपुष्करिणी-माहात्म्य, ४ उत्तरगीतें, ५ उत्तररामचरितकथे, ६ उषापरिणय, ७ कादंबरी, ८ काशीकण्ड, ९ कृष्णकथा-रत्नाकर, १० कृष्णकथासारसंग्रह, ११ गयचरित्रे, १२ चुंचनकहेयमाहात्म्य, १३ जातकसाम्राज्यटीके, १४ जैमिनिभारतद आश्वमेधिकपर्वदटीके, १५ तुलाकावेरीमाहात्म्य, १६ दशकुमारकथाकलानिधि, १७ देवी भागवत तात्पर्यटीके, १८ देवीमाहात्म्य सप्तशती, १९ देवीसायुजरसीसमालिके, २० नजुडशतक, २१ नलोपाख्यान, २२ पंचतंत्र, २३ बत्तीसपुत्तळयकथे, २४ वेताळपंचविंशती, २५ भक्तविलास इत्यादि एकावन्न ग्रंथ आहेत.

हे आपणांस स्वयंवृतकवितावधूरत्न व उभयकविताळक्षणविचक्षण या नांवानें संबोधितात. यांचे ग्रंथ विशेषतः गद्यमयच आहेत. $\frac{1}{3}$ च पद्यमय आहेत (क. क. च. भा. ३ पा. १७२ पासून पुढें).

कृष्णराव, मास्तर— (जन्म स. १८९७) सुप्रसिद्ध गवई, नट व संगीत रचनाकार. यांचें समग्र नांव कृष्णराव गणेश फुलंब्रीकर.

महाराष्ट्रीय रसिकांचा आणि यांचा प्रथम परिचय यांच्या अगदीं बाळपणांत–नाट्यकलाप्रवर्तक मंडळीच्या ' संत सखूबाई ' नाटकांत विठ्ठलाचें काम करणारा मुलगा या नात्यानें झाला. घरची विपन्न स्थितीच यांना रंगभूमीचा आश्रय स्वीकारावयास कारणीभूत झाली. यांचें बालपण अत्यंत हालअपेष्टांत गेलें.

यांची बुद्धि कुशाग्र असली तरी अभ्यासाकडे लक्ष नसल्यानें गोड आवाजाच्या जोरावर यांनीं नाट्यकलाप्रवर्तक मंडळींत प्रवेश केला. संत सखूंतील विठ्ठलाची भूमिका व 'भक्तजन सखा' या पदानें यांनीं आपल्याकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतलें. नवीन चाली लावण्याची लकब यांच्यांत तेव्हांच दिसून आली. नाट्यकलेंतील तीन वर्षांत यांना नाट्यसंगीत व शास्त्रीय संगीत यांचें शिक्षण श्री. सवाई गंधर्व यांनींच दिलें व त्यांनींच पुढील शिक्षणासाठीं अब्दुल करीमखांकडे यांना नेलें. पुढें शिक्षणाकरितां यांनीं नाट्यकला सोडली (१९१३).

अब्दुल करीमखांकडे शिक्षण घेण्याची इच्छा असूनहि अटी झेंपेनात म्हणून तो नाद यांना सोडावा लागला. एके दिवशीं सहज कै. भास्करबुवा बखल्यांना यांनीं दोन पदें म्हणून दाखविलीं. तेव्हां यांच्या हुशारीची तारीफ करून ' शिकला तर चांगला शिष्य होईल ' या दृष्टीनें त्यांनीं यांना जवळ केलें. त्यांनीं आपल्या विद्येचीं सर्व दालनें यांच्याकरितां खुलीं केलीं आणि यांनींहि आपल्या बुद्धीच्या व स्मरणशक्तीच्या जोरावर त्याचा भरपूर

फायदा घेतला. अगदीं प्रवासांत असतांना जरी बुवांना एखादी चीज आठवली तर लगेच 'अरे कृष्णा, ही चीज टिपून घे, किती दिवस आठवत नव्हती.' अशा पद्धतीनें यांना शिक्षण दिलें गेलें. त्यामुळें अमुक एखाद्या मुष्किल रागाची चीज यांना येत नाहीं असें सहसा व्हावयाचें नाहीं. त्या वेळीं कै. विष्णु दिगंबर, रामकृष्णबुवा वझे आणि कै. भास्करबुवा बखले ही मंडळी दिल्ली, अमृतसर, जालंदर वगैरेकडे जात तेव्हां हे भास्करबुवांबरोबर असावयाचेच. तेव्हां यांना उत्तर हिंदुस्थानांतील विविध गायकी ढंगांचा परिचय होऊन त्यांचा अन्तर्भाव आपल्यांत करतां आला. आणि यामुळेंच बालगंधर्वांच्या आजारीपणांत गाण्याच्या बाबतींत तरी लोकांच्या मनाची पकड घेणारा हा नट गंधर्व कंपनींत गुरूच्या संमतीनें दाखल झाला (१९१७). प्रथम यांनीं श्रीमंत बडोदें सरकारसमोर शारदेचें महत्त्वाचें काम करून आपल्याकडे लक्ष वेधून घेतलें. पण एकच प्याल्यांतील शरदच्या भूमिकेनें हे अत्यंत लोकप्रिय झाले. आणि गंधर्व कंपनींतील हे आकर्षण होऊन बसले. भोसले-गंधर्व संयुक्त प्रयोगांत यांना सौभद्रांतील नारदाची भूमिका प्राप्त झाली (१९२१). यानंतर अकस्मात् बखलेबुवा वारले आणि लोकांना वाटलें कीं, यांचा खजिना आटला. पण यांनीं गंधर्वांच्या इच्छेनुसार नव्या नाटकांत नव्या चाली पुरवून आपली योग्यता सगळ्यांच्या निदर्शनास आणली. 'नंदकुमार' नाटकांतील चाली मास्तरांच्या प्रतिभेंतून निघाल्या आहेत (१९२२). उत्तम स्वररचना करून तदनुसार हिंदी व मराठी भाषेंत केलेली पद्यरचना यांच्या सारसंग्रहांत पाहावयास सांपडते. गंधर्व मंडळीची शक्ति 'बालगंधर्व' असले तरी त्यांना देखील आपल्या संगीतासाठीं हे नव्या नव्या सुंदर चाली देत. त्यांच्यामागें सतत पंधरा वर्षे उभी असलेली शक्ति म्हणजे मा. कृष्णराव हें कोणीहि रसिक कधींहि विसरूं शकणार नाहीं. जुन्या हिंदी स्वरकारांच्या पावलांवर पाऊल टाकून गोविंदराव टेंब्यांनीं महाराष्ट्रांत स्वररचनेची धमक उत्पन्न केली, तर यांनीं तोच कित्ता गिरवून प्रत्यक्ष हिंदींतच स्वररचना करण्यास सुरुवात केली. अशा स्वररचनेपैकीं कांहीं चिजा यांनीं आपल्या 'रागसंग्रह' पुस्तकांत संग्रहित केल्या आहेत. मधुर स्वररचना करण्याच्या आपल्या कौशल्यानें केवळ रंगभूमीवर विजय मिळवून हे थांबले नाहींत. तर 'धर्मात्मा', 'अमरज्योति' व 'गोपालकृष्ण' वगैरे चित्रपटांना यांनीं दिलेल्या चालींवर यांची स्वतःची अशी निश्चित छाप आहे.

केडगांवकर, श्रीनारायणमहाराज— (जन्म स. १८९१) पुण्याजवळील केडगांवचे प्रसिद्ध सत्पुरुष. हे शिंदगी (जि. विजापूर) गांवच्या संति उपनांवाच्या दे. कृ. ब्राह्मण घराण्यांतील आहेत. यांच्या घराण्यांत 'भीमाशंकर संति' नांवाचे एक सत्पुरुष होऊन गेले. त्यांचीं कानडी पदें अद्यापि गाणगापुरीं म्हटलीं जातात. कट्टिरविलिंग-भीमाशंकर-शिवराम-नारायण असा यांचा वंश आहे. यांचे वडील-मातोश्री हे तीन वर्षांचे असतांच वारले. पुढें नरगुंदास चुलत्यानें पालनपोषण केलें. धारवाडास अजोळीं मुंज झाल्यावर यांनीं घर सोडलें (१८९८). पुढें पुण्याजवळ बोपगांवीं त्रिंबकराव अत्रे कुलकर्णी यांजकडे हे येऊन राहिले. जवळच आर्वीलाहि हे राहत. तेथें यांचें दैवी सामर्थ्य प्रगट होऊं लागलें. तेथून त्यांचे भाचे व सदाशिवराव देशपांडे, बढाणें (सुपें) यांजकडे हे येऊन राहूं लागले व तेथें स्नान, संध्या व भूतबाधानिवारण वगैरे चमत्कारांमुळें हे नारायणमहाराज म्हणून प्रसिद्ध झाले. बढाण्याच्या बेटांत औदुंबराचे झाडाखालीं हे तपश्चर्येस बसत. तेथें भूगर्भात दत्ताच्या पादुका असल्याचा यांना दृष्टान्त झाला. जमीन उकरतां खरोखरच ताजीं फुलें वाहिलेल्या पादुका सांपडल्या. तेव्हां चोहींकडून लोक यांच्या व पादुकांच्या सेवेकरितां येऊन तेथेंच राहूं लागले. तेव्हां यांनीं थोड्या अन्तरावर सोयीची जागा पाहून सध्यांच्या भव्य व पक्क्या धर्मशाळा व सुंदर दत्तमंदिर बांधलें व तेथें मोठ्या समारंभानें दत्ताच्या मूर्तीची स्थापना केली (शके १८३५ वैशाख-स. १९१३). तेंच सध्यांचें नारायणमहाराजांचें बेट होय.

यांची दिनचर्या अगदीं साधी असून त्यांत गूढ असें कांहीं नाहीं. सूर्योदयापूर्वी स्नान करून संधिकालीं सूर्याला अर्घ्यप्रदान करण्यावर यांचा कटाक्ष आहे. जुन्या परंपरेच्या वैदिक धर्माचे हे कट्टे पुरस्कर्ते असून त्यांत भक्तिमार्गाचें सुंदर मिश्रण यांनीं केलें आहे. स्नानसंध्येप्रमाणेंच देवदर्शन व भजन यांचा यांच्या नित्यकर्मात समावेश झालेला आहे.

यांची वृत्ति चमत्कार करण्याची नाहीं. अद्भुत किंवा अचाट गोष्टींची हे कधीं तरफदारी करीत नाहींत. यांचा उपदेशहि भक्तिमार्गाला अनुसरून उपवास, देवदर्शन, जप, नित्यनेम वगैरे अगदीं साध्या स्वरूपाचा असतो. तथापि लोक हे चमत्कार करितात असें सांगतात. पुणें

डेक्कन कॉलेजचे प्रो. वुडहाउस हे एकदां शिकारीला गेले असतां पाणी नसलेल्या ठिकाणीं यांनीं त्यांना झरा उत्पन्न करून पाणी पिण्याला दिल्याचा चमत्कार मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडियांत त्यांनीं आपल्या सहीनें प्रसिद्ध केला होता (श्रीनारायणचरित्र पा. ५४).

यांनीं १९३६ सालीं बेटांत अतिशय मोठ्या प्रमाणावर एक अभूतपूर्व अनुष्ठान केलें. सर्व वेदांचीं पारायणें, सर्व पुराणांचें वाचन, दर तासाला १०८ सत्यनारायण व अनेक लहानमोठीं ऋक्संहिता स्वाहाकारासारखीं अनुष्ठानें असा सतत चोवीस तास चालणारा अभूतपूर्व कार्यक्रम आठ दिवस यांनीं अगदीं शिस्तींत पार पाडला. यानंतर हे सर्व हिंदुस्थानांत हिंडून शास्त्रोक्त पद्धतीनें तीर्थयात्राहि करून आले. सर्व कार्यक्रम अत्यंत भव्य प्रमाणांत आणि शिस्तीनें पार पाडण्याची यांची हातोटी अलौकिक आहे. याशिवाय यांचें सतत मुक्तद्वार अन्नछत्र चालू असतेंच. यांत विशेष हें आहे कीं, हे कोणाकडे केव्हांहि याचना करीत नाहींत. पुढें ठेवलेलें सुद्धां प्रसाद म्हणून परत करावयाचें असा यांचा कटाक्ष आहे. केवळ देवस्थानाकरितां आग्रहानें दिलेलें तेवढें हे घेतात. अशा तऱ्हेचा वार्षिक ५०-६० हजारांचा खर्च यांचा अव्याहतपणें चालू आहे. शिवाय नैमित्तिक खर्च लक्षावधि रुपयांचे झालेले दिसतात. सामान्य लोकांना दैवी सामर्थ्याशिवाय यांच्या एकंदर व्यवस्थेची उपपत्ति लागत नसल्यास आश्चर्य कसलें ?

केतकर, वेंकटेश बापूजी—(जन्म स. १८५४–मृत्यु स. १९३०) महान् ज्योतिश्ज्ञ व संशोधक.

यांचें हायस्कूलमधील शिक्षण बेळगांवीं झालें. मॅट्रिकच्या परीक्षेंत यांचा तिसरा नंबर आला, व यांना 'बाई माणिकबाई बयरामजी जीजीभाय प्राइझ' मिळालें. गरीबीमुळें उच्च शिक्षण घेणें अशक्य होऊन यांनीं शाळाखात्यांत नोकरी धरली (स. १८७५). पुढें क्रमानें चढत जाऊन फर्स्ट असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या हुद्यापर्यंत जाऊन पेन्शन घेतलें (१९११). दरम्यान बागलकोटच्या इंग्रजी शाळेंत हेडमास्तर असतांना बदलीचे हुकूम आले असतांहि 'ज्योतिर्गणित' हा ग्रंथ लिहिण्याचें काम चालू असल्यानें सर्व बढतीचे प्रसंग यांनीं बाजूस सारले.

यांचे वडीलहि चांगले ज्योतिषी होते. त्यांनीं केरोपंती ग्रहसाधनकोष्टक हा ग्रंथ संस्कृतांत उतरला आहे. यांचे पूर्वज पांचसहा पिढ्या पैठण येथें राहत होते. तेथून बापू हे नरगुंदास व पुढें रामदुर्गास आले. तेथील संस्थानिकांचा यांस आश्रय होता. नरगुंद संस्थानचे अधिपति बाबासाहेब यांनीं सत्तावन सालच्या बंडांत सामील होतांना बापूंना 'माझ्या पदरचें एक रत्न तुमच्या स्वाधीन करतों त्याचा संभाळ करावा' असें पत्र लिहून रामदुर्गकरांच्या स्वाधीन केलें.

बापूजी आणि वडील बंधु बळवंतराव हे यांचे ज्योतिषशास्त्रांतील गुरु होत. ग्रहलाघव, सूर्यसिद्धान्त वगैरे ग्रंथांचें सोपपत्तिक ज्ञान यांनीं विशेषतः वडील बंधूंपासून संपादन केलें. त्यांत कांहीं भागाची उपपत्ति मनाला पटेना म्हणून यांनीं आपलें लक्ष आंग्ल ज्योतिषशास्त्राकडे वळविलें. उच्च गणिताशिवाय तें शास्त्र हस्तगत होत नाहीं असें पाहून तशा पुस्तकांचा स्वतःच्या मनानें एक क्रम निश्चित करून त्यांचा अभ्यास केला व त्यांत प्रावीण्य संपादन केलें, असें वॉशिंग्टन येथील प्रख्यात गणितवेत्ता सायमन न्यूकम यांच्या पत्रावरून ध्यानांत येतें. तसेंच प्रो. केरो लक्ष्मण छत्रे यांनीं ग्रंथाशिवाय भंगी काढून बिनचूक सारण्या केल्याबद्दल यांना शाबासकी दिली.

यानंतर ग्रहलाघव पद्धतीचा परंतु सूक्ष्म असा एक संस्कृत श्लोकबद्ध करणग्रंथ पंचांगकर्त्यांना मार्गदर्शक होण्याकरितां यांनीं केला (स. १८९९). त्याचें नांव 'केतकीग्रहगणितम्.' याची पहिली आवृत्ति संपून दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली आहे. त्यांत यांचे पुत्र द. वें. केतकरकृत संस्कृत उपपत्तिभाष्यहि छापलें आहे.

यानंतर यांनीं 'वैजयन्ती पंचांग-गणितम्' हा तिसरा ग्रंथ तयार केला. शास्त्रशुद्ध पंचागासंबंधानें जागृति व्हावी म्हणून मुद्दाम शुद्ध व सूक्ष्म तिथि, नक्षत्रें व योग यांच्या साधनासाठीं सारण्या तयार करून त्या या ग्रंथांत प्रसिद्ध केल्या. याचीहि दुसरी आवृत्ति निघाली आहे. अशा प्रकारें करणग्रंथ तयार झाल्यावर त्याच्या आधारें शास्त्रशुद्ध असें केतकी पंचांग काढण्यास यांनीं सुरुवात केली. (शके १८२१). तें आजपर्यंत अव्याहत चालू आहे. स. १९०५ पासून श्रीमान् खेमराज श्रीकृष्णदास, मालक श्रीवेंकटेश्वर प्रेस, यांनीं यांचें पंचांग छापण्याची जबाबदारी आपणाकडे घेतली. ती त्यांच्या मुलांनींहि पुढें चालविली आहे.

शके १८२१-२८ पर्यंत कै. कृ. गु. संगमकर, हेडमास्तर कानडी शाळा बागलकोट व बाळंभट कोटभट यांच्या मदतीनें हे स्वतःच पंचांग तयार करीत. कमलाकरशास्त्री

जोशी खेड, जनार्दनशास्त्री निगुडकर राजापूर, उप्पिनबेट्टीगिरी धारवाड, हे धर्मशास्त्रलेखनाचें काम करीत असत. पुढें शके १८२८-४१ पर्यंत माईणकरशास्त्री यांनीं पंचांग-प्रकाशनाचें कार्य अत्यंत दक्षतेनें बजावलें. पण पुढें प्रकृतीच्या अस्वास्थ्यानें त्यांना काम होईना व हेहि वृद्ध झाले. अशा स्थितींत यांनीं पंचांग काढणें बंद करण्याचें ठरविलें. पण या प्रसंगीं धारवाड ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपल नरहर वेंकटेश कोल्हटकर यांनीं श. १८४२-४४ हीं पंचांगें प्रसिद्ध केलीं. त्यानंतर अनंत गणेश हेर्लेकर व भास्कर रामचंद्र जोशी हे पुढें आले. हेर्लेकर वारल्यावर भास्कर रामचंद्र जोशी व त्यांचे बंधु नाथ दैवज्ञ हे पंचांग करीत. त्यानंतर केतकरांचे मेव्हणे गोपाळ बळवंत जोशी, पेन्शनर फडणीस, हे पंचांग करूं लागले.

शास्त्रीय गोष्टींचा प्रचार करण्यास या देशांत अत्यंत प्रतिकूलता असतांहि यांच्या पंचांगास बरीच मान्यता मिळाली आहे. यांच्या केतकी व वैजयंती या ग्रंथांच्या आधारें पुष्कळ पंचांगें प्रसिद्ध होतात.

यांनीं केलेले ग्रंथः—

१ ज्योतिर्गणितम् (संस्कृत १८९८), २ केतकी ग्रहगणितम् (संस्कृत), ३ वैजयन्ती पंचांगगणितम् (संस्कृत), ४ मराठी ग्रहगणित सोपपत्तिक (१९१४), ५ मराठी नक्षत्रविज्ञान (१९१६), ६ संस्कृत केतकी परिशिष्ट (१९१६), ७ मराठी गोलद्वय प्रश्नविमर्श (१९१८), ८ इंडियन अँड फॉरिन क्रॉनॉलॉजी (१९२३ इंग्रजी), ९ संस्कृत सौरार्य-ब्राह्मतिथिगणितम् (१९२७), १० संस्कृत भूमंडलीय ग्रहणगणितम् (१९३०), ११ शास्त्रशुद्ध पंचांग अयनांश-निर्णय (१९२९), १२ केतकी परिमल भाष्य–केतकी ग्रहगणितावरील टीका (१९३०). याशिवाय यांचे तेहतीस संशोधनात्मक लेखांचा सारांश यांच्या चरित्रांत दिला आहे.

यांपैकीं आठवा ग्रंथ रॉयल एशियाटिक सोसायटीनें प्रसिद्ध केला आहे, यावरून त्याचें महत्त्व ध्यानीं येईल. बाकीचे सर्व ग्रंथ यांनीं स्वतःच प्रसिद्ध केले आहेत. परिमलभाष्य प्रसिद्ध करण्यास श्रीमंत जमखिंडीकरांनीं पांचशें रुपयांची देणगी दिली होती.

लो. टिळक व डॉ. मो. गो. देशमुख यांच्याजवळ रावसाहेब कृष्णराव देवल यांनीं ज्योतिष व तत्संबंधीं इतर गणित-ग्रंथ करण्याकरितां तीन हजार रुपये दिले, तेव्हां त्यांनीं यांना 'शुद्ध गणित ग्रंथ लिहिणारे कोणी तरी भेटतील, परंतु ज्योतिष विषयाचे ग्रंथ लिहिणारे आज आपलेवांचून कोणी नाहीं', असा गौरव करून फलों घेतल्यावर आपण पुणें येथें येऊन लेखनादि व्यासंग करावा, म्हणून लिहिलें. पण हे स्वातंत्र्य गमावण्यास तयार झाले नाहींत (१९०७). पुनः लो. टिळक यांनीं आपल्या शुद्ध पंचांगास आधारभूत असा करणग्रंथ करण्याविषयीं यांना विनंति केली. पण यांनीं आपणास 'रेवती पक्ष' मान्य नसल्यामुळें त्या पंचांगाचा ग्रंथ लिहिण्याचें काम अंगावर घेणें म्हणजे 'ज्ञानपण्य-वाणिज्या'ची वृत्ति स्वीकारल्याप्रमाणें होतें म्हणून यांनीं तें कार्य अंगावर घेण्याचें नाकारलें (१९२०).

यांची पंचांगविषयक कामगिरी निःसंशय अभिनंदनीय आहे; पण आपसांतील यादवीमुळें देशाला त्याचा व्हावा तितका फायदा झालेला नाहीं. पंचांग कमेटी आणि हे यांचें सहकार्य होऊं शकलें नाहीं. हे प्रथम रैवत पक्षाचे होते, नंतर यांनीं चित्रापक्ष स्वीकारला असें धरून चाललें तरी यांना आपणास पटेल तें बोलण्याचा अधिकार होता. लो. टिळक व दीक्षित यांनाहि यांना रैवतपक्ष मान्य आहे असें वाटत होतें; पण तशी स्थिति नव्हती. यांनीं केवळ एक पक्ष म्हणून रैवतपक्षाचा निर्देश केलेला आहे, व इ. स. १८८५ पासून हे चित्रापक्षाचा पुरस्कार करीत होते.

दीक्षितांचा समज ज्योतिर्गणिताचें हस्तलिखित वाचून झाला आणि तो त्यांनीं आपल्या भारतीय ज्योतिष शास्त्राच्या इतिहासांत नमूद केला. पण ज्योतिर्गणित छापतांना त्यांत केलेल्या दुरुस्तीकडे दीक्षितांचें लक्ष गेलें नाहीं. पण यांनीं चित्रापक्ष घेतला तेव्हां टिळकांच्या रेवतीपक्षाशीं विरोध येऊन शुद्ध पंचांगाच्या प्रचाराचें कार्य घोटाळ्यांत पडलें.

या काळचे यांना गणेश दैवज्ञ (ग्रहलाघवकार) म्हणावयास हरकत नाहीं. यांनीं एकच विषय हातीं घेऊन केलेले परिश्रम एखाद्या तपस्व्यास शोभण्यासारखे आहेत. यांनीं आपले ग्रंथ स्वतःच्या पदरास खार लावून प्रसिद्ध केले. यांना समाजाकडून द्रव्यरूप उत्तेजन नको असून मान्यतारूप उत्तेजन पाहिजे होतें. परंतु दूरदूरच्या ठिकाणीं यांना उत्तेजन लाभलें तरी महाराष्ट्रांत तें यांना यांच्या हयातींत मिळालें नाहीं.

केतकर, डॉ. श्रीधर व्यंकटेश— (जन्म स. १८८४–मृत्यु स. १९३७) महाराष्ट्रीय ज्ञानकोशकर्ते,

समाजशास्त्रज्ञ, संशोधक व नवविचारप्रवर्तक आचार्य. यांचें मूळ घराणें कोंकणांतील अंजनवेलीचें. तेथें यांचे आजोबा पोथ्या लिहिण्याचा व विकण्याचा धंदा करीत. यांचे बडील रायपूर (मध्यप्रान्त) येथें पोस्टमास्तर होते. वेडील लहानपणींच वारल्यानें हे उमरावतीस वकिली करणाऱ्या आपल्या चुलत्याकडे–नारायणरावांकडे आले. यांचें प्रवेशपरीक्षेपर्यंत शिक्षण उमरावतीस झालें व पुढील मुंबईस विल्सन कॉलेजमध्यें झालें. हायस्कूलमध्यें असतांच यांच्या बहुश्रुतपणामुळें यांना शिक्षकसुद्धां 'एन्सायक्लोपीडिया' म्हणत असत. याच वेळीं यांची आई व बहीण वारल्यानें हे स्वतंत्र झाले आणि यांच्या आयुष्याला स्वच्छन्दी असें स्वरूप प्राप्त झालें.

इंटर व बी. ए. च्या परीक्षेंत यांना एकदां अपयश आलें आणि हे पदवीपरीक्षा न देतांच अमेरिकेस गेले. त्या वेळीं इंग्रजांचें राज्य घालविण्याकरितां बंड करणें म्हणजे देशाभिमान अशा सार्वत्रिक समजुतीची छाप यांचेवरहि पडली होती. पण हे अमेरिकेला गेल्यामुळें यांच्या जीवितकार्याला निराळें स्वरूप आलें. अमेरिकेला जाण्यापूर्वी सहाच महिने बाळकृष्ण संतुराम गडकरी यांच्या सहकार्यानें 'महाराष्ट्र वाग्विलास' नांवाचें मासिक यांनीं काढलें होतें.

यांनीं अमेरिकेस जावें अशी यांच्या चुलत्यांची इच्छा नव्हती. तसेंच यांचेजवळ जाण्याला पैसेहि नव्हते. पण यांनीं वडिलार्जित घरदार विकून हातीं येतील ते पैसे घेऊन अमेरिकेस प्रयाण केलें (१९०६) आणि तेथें कार्नेल युनिव्हर्सिटींत हे दाखल झाले. यांचा अध्ययनाचा मुख्य विषय समाजशास्त्र हा होता. नंतर तेथें हे प्रथम बी. ए. (१९०७), नंतर एम्. ए. (१९०८) व पीएच्. डी. (१९११) झाले. सर्वच विषयांकडे लक्ष देण्याच्या यांच्या वृत्तीमुळें हे पीएच. डी.च्या परीक्षेंत प्रथम नापास झाले होते (१९१०). या वेळीं यांना श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्याकडून शिष्यवृत्ति मिळत असे. पीएच. डी. साठीं 'हिंदुस्थानांतील जातिसंस्थेचा इतिहास' हा विषय यांनीं संशोधनार्थ घेतला होता.

स.१९०९ सालीं 'History of Caste in India' Vol. I या नांवानें यांचें हें संशोधन प्रथम प्रसिद्ध झालें. या ग्रंथाचा दुसरा भाग स. १९११ सालीं पुरा होऊन 'Hinduism : Its Formation and Future' या नांवानें इंग्लंडांत प्रसिद्ध करण्यांत आला. या दोन्ही ग्रंथांचें अमेरिकन व इंग्रज विद्वानांकडून चांगलें स्वागत झालें. इंग्लंडमध्यें असतांना 'अथीनियन्' पत्रांत पुस्तकांवर अभिप्राय देण्याचें काम यांनीं बरेच दिवस केलें. स्टॅटिस्टिकल असोसिएशन, रॉयल एशियॅटिक सोसायटी यांसारख्या संस्थांच्या सभांसहि हे हजर राहत.

हिंदुस्थानांत आल्यावर (१९१२ ऑक्टो.) पुढें काय करावयाचें हा प्रश्न यांना सोडवावा लागला. ता. १ जुलै १९१३ पासून एक वर्षभर कलकत्ता विद्यापीठाच्या पोस्ट-ग्रॅज्युएट शाखेंत अर्थशास्त्र, शासनशास्त्र व सार्वराष्ट्रीय कायदा या विषयाचे व्याख्याते म्हणून यांनीं काम केलें. 'An Essay on Indian Economics', 'Hindu Law' (१९१४) हे यांचे उद्बोधक प्रबंध याच वेळीं लिहिले गेले. पण सालअखेर हेंहि काम सुटलें.

स. १९१४ च्या डिसेंबरमध्यें हे मद्रासच्या राष्ट्रीय सभेला गेले व तेथें भाषावार प्रान्तरचना करणाऱ्या तत्त्वाचा प्रसार करण्याकरितां एक पत्रक छापून यांनीं तें प्रतिनिधींमध्यें वांटलें. तेथून सिंहलद्वीप, कोचीन इत्यादि प्रान्तांची यांनीं सफर केली व पुनः सायन्स काँग्रेसला हजर राहण्यासाठीं हे मद्रासला आले. तेथें मराठी व तेलगू भाषेंतील सुप्रसिद्ध लेखक श्री. के. व्ही. लक्ष्मणराव यांची ओळख झाली. लक्ष्मणरावांनीं यापूर्वीच तेलगू ज्ञानकोशाला सुरुवात केली होती. त्यामुळें मराठी ज्ञानकोशाच्या यांच्या कल्पनेस चालना मिळाली.

याच सुमारास 'राष्ट्रधर्मप्रचारकसंघ' या नांवाचा एक नवीन उपक्रम करून त्या कार्याचा यांनीं संस्कृत व्याख्यानद्वारां आंध्र व उत्कल देशांतील बेझवाडा, गुंतूर, राजमहेंद्री, कोकोनाडा, विजयनगर, गंजम, कटक, जगन्नाथपुरी इत्यादि शहरीं प्रचार केला. हिंदुस्थानाची भाषावार प्रान्तरचना आणि देशभाषेच्या द्वारें सर्व राज्यकारभार व शिक्षण, हें यांचें तत्त्वसार होतें. हल्लींचे प्रसिद्ध आंध्र राष्ट्रभक्त डॉ. पट्टाभिसीतारामय्या यासारखी मंडळी या उद्योगांत तेव्हां यांची अनुयायी होती. त्या वेळीं यांनीं रचलेला पुढील संस्कृत श्लोक त्या प्रांतांत सार्वजनिक प्रसंगीं राष्ट्रगीतासारखा गायला जात असें:—

'प्राचीना ननु शातवाहननृपा भृत्यास्तु येषां श्रुतम्।
विद्याशौर्यपरोद्यमैः खलु युतास्तस्मात् त्रिलिंगा वयम्॥
स्वत्वस्थापनमेव धर्मविभवो येषां बुधैर्ज्ञायते।
दुर्दान्ता निजधर्मपालनपराः कार्ये नवान्ध्रा वयम्॥'

हें काम संपवून कलकत्ता, रायपूर असा प्रवास करून हे नागपुरास आले. तेथें मध्यप्रान्ताच्या राजकीय परिस्थितीसंबंधीं एक उद्बोधक व विचारप्रवर्तक व्याख्यान देऊन यांनीं आपल्याकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतलें व ज्ञानकोशाची कल्पना पुढें मांडली. स. १९१५ च्या मुंबईच्या राष्ट्रीय सभेस हे हजर राहिले, पुण्यास कांहीं व्याख्यानें दिलीं, लो. टिळकांचा पाठिंबा मिळविला, ८ जुलै १९१६ ला महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ लि. ही कंपनी रीतसर नोंदविली, व सतत बारा वर्षें खपून हें अगदीं नवीन व कष्टसाध्य असणारें देशी भाषेंतील अपूर्व कार्य सिद्ध करून दाखविलें. ज्ञानकोशाचें कार्य जरी नागपूरला सुरू झालें तरी स. १९१८ सालीं त्याची एक शाखा पुण्यास उघडण्यांत आली. कार्यसौकर्याच्या दृष्टीनें पुढें पुण्याच्या शाखेलाच मुख्य कार्यालयाचें स्वरूप आलें आणि तेथेंच तें कार्य पूर्ण झालें. याच वेळीं चातुर्वर्ण्य संरक्षणपीठासारख्या योजना मांडण्याचें काम हे करीत असतच.

ज्ञानकोशाच्या कल्पनेपेक्षां तो पार पाडण्याकरितां आवश्यक असणारा व्यापकपणा, उद्योग आणि चिकाटी या बाबतींत यांचें वैशिष्ट्य दिसून आलें. ज्ञानकोशाच्या प्रस्तावनेचे पांच खंड हे यांच्या स्वतंत्र व शोधक प्रज्ञेचीं वैशिष्ट्यें स्पष्टपणें दाखवून देतात. या बाबतींत द्रव्य आणि ग्रंथ या दोन्ही संपादनाच्या जबाबदाऱ्या यांनीं पूर्णपणें पार पाडल्या आहेत. व त्याबाबत सर्व मूळ योजनाहि यांच्याच होत्या. स. १९२७ सालीं हें काम पूर्ण झालें आणि यांनीं आपला अनुभवहि पुढच्यांस उपयोगी पडावा म्हणून 'ज्ञानकोशमंडळाचा इतिहास' या पुस्तकांत सांगून टाकला.

वरील कार्य चालू असतांच त्यांत समाविष्ट होणाऱ्या विषयांच्या चर्चेसाठीं व पुरवणीवजा मजकूर देण्यासाठीं 'विद्यासेवक' नांवाचें एक मासिक यांनीं सुरू केलें (१९२५). 'गोविंदपौत्र' या नांवानें लिहिलेलीं स्फुट काव्यें, गोंडवनांतील प्रियंवदा, परागंदा, आशावादी या कादंबऱ्या, निरनिराळ्या देशांतील कहाण्या, महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण हे निबंध, स्त्रीसत्तापराभव (अपूर्ण) हें नाटक, हे सर्व 'विद्यासेवकां'तून प्रसिद्ध झाले. 'निःशस्त्रांचें राजकारण' या ग्रंथाचा कांहीं भागहि विद्यासेवकांतून प्रसिद्ध झाला. यांखेरीज गांवसासू, ब्राह्मणकन्या, विचक्षणा या यांच्या कादंबऱ्या स्वतंत्रपणें प्रसिद्ध झाल्या. याशिवाय यांच्या संकीर्ण लेखाचा एक संग्रह स. १९१५ मध्यें श्रुतिबोध मंदिरांतून प्रसिद्ध झाला होता.

मुख्यतः ज्ञानकोशाच्या कार्यांतून रिकाम्या झालेल्या मंडळीस गुंतविण्याच्या दृष्टीनें विद्यासेवक चालू असतांच 'पुणें समाचार' या नांवाचें दैनिक यांनीं सुरू केलें (१९२७). पण तें एक वर्षांतच संपुष्टांत आलें. यानंतर यांचें त्यांच्या जुन्या सहकाऱ्यांशीं बिनसून यांनीं विद्यासेवक स्वतःकडे घेतलें पण तेंहि बंद पडलें (सप्टें. १९२८). तथापि यांचें स्फुट लेखन सतत चालू असे.

ज्ञानकोशाचें कार्य संकलनप्रधान असल्यानें संशोधनात्मक लिहिण्याची यांची हौस पुरी झालेली नव्हती. यांचा संकलनापेक्षां संशोधनाकडे विशेष कल होता हें ज्ञानकोश व विशेषतः त्याच्या प्रस्तावनाखंडावरून सहज ध्यानांत येतें. त्याकरितां वैयक्तिक जबाबदारीवर 'प्राचीन महाराष्ट्र' नामक चार खंडात्मक ग्रंथ लिहून प्रसिद्ध करण्याचें कार्य यांनीं सुरू केलें. त्यांतील एक खंड 'सातवाहन पर्व' तेवढा प्रसिद्ध झाला (१९३५) व बाकीचा बराच भाग लिहून तयार आहे.

'कायस्थ प्रभूंचा सामाजिक इतिहास', 'महायुद्धोत्तर जग', 'आंगिरसांचें सत्र' (ओंवीबद्ध काव्य) व एक कादंबरी येवढें यांचें वाङ्मय अप्रकाशित आहे. 'भारतीय समाजशास्त्र' हा यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे. यांच्या मृत्यूनंतर 'Victorious India' या नांवाचा यांचा ग्रंथ यांच्या पत्नीनें प्रसिद्ध केला.

ही यांची वाङ्मयसेवा लक्षांत घेऊन पुणें येथील महाराष्ट्र शारदोपासक संमेलन (१९२९) व महाराष्ट्र साहित्य-संमेलन हैद्राबाद (१९३१) यांचें अध्यक्षपद यांना देण्यांत आलें.

यांचा राजकीय तत्त्वविचाराचा विलासहि वेळोवेळीं पाहावयास मिळे. 'निःशस्त्रांचें राजकारण' या पुस्तकांत यांनीं आपली राजकीय मतप्रणाली मांडली आहे. स. १९२६ मध्यें यांनीं 'स्वयंनिर्णयी संघ' काढला. पण त्याकडून प्रत्यक्ष स्वरूपाचें कार्य घडलें नाहीं. पुढें स. १९३४ सालीं यांनीं भारतमंत्र्यावर न्यायमंदिरांत दावा लावून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा उद्योग केला. स. १९३५ चा कायदा मंजूर झाल्यानंतर हें स्वराज्य आपणच मिळविलें असून राष्ट्रीय सभा तें श्रेय अन्यायानें हिरावून घेत आहे अशा श्रद्धेनें यांनीं महाराष्ट्र प्रांतिक सभेवर दावा केला होता.

यावरून दिसून येईल कीं हे एक विलक्षण विचाराचे गाढे पंडित होते. राहणी, पोषाख, विचार, मतें या सर्व बाबतींत हे सर्वांपेक्षां निराळे असत आणि यांचा सर्व वर्तनक्रम निर्भयपणें चाललेला असे. पण ज्ञानकोश संपल्यानंतर यांचें संघटित सामर्थ्य लयास जाऊन हे एकाकी झाले. स्वाभाविक चंचलपणा, विक्षिप्तपणा आणि एकांडेपणा यांमुळें यांना संघटित शक्ति पुनः निर्माण करतां आली नाहीं. शेवटीं पुणें येथें सांपत्तिक व शारीरिक दुःस्थितींत मधुमेहानें यांना मृत्यु आला. शेवटीं यांचा अन्त्यविधि यांच्या पत्नीच्या इच्छेप्रमाणें दहन न करितां पुरून पण वैदिक मंत्रांनीं करण्यांत आला.

यांच्या पत्नी मिस् एडिथ कोहन या जर्मन ज्यू असून त्यांची व यांची भेट इंग्लंडमध्यें झाली. त्या सेंट अँड्रयूज युनिव्हर्सिटीच्या पदवीधर असून 'तुलनात्मक धर्मशास्त्र' या विषयाचा त्यांनीं अभ्यास केला होता. लंडनमधील 'स्कूल ऑफ ओरिएंटल स्टडीज' चा मराठीचा डिप्लोमाहि त्यांनीं घेतला होता. शिवाय त्यांना फ्रेंच व डच भाषा अवगत होत्या. प्राचीन भारतीय संस्कृतीसंबंधीं बरेंच महत्त्वाचें लिखाण जर्मन भाषेंत असल्यानें जर्मन भाषा जाणणाऱ्या विद्वानांच्या साहाय्याची अपेक्षा ज्ञानकोशास होती. म्हणून जर्मन ग्रंथांचें भाषान्तर करण्याचें काम यांनीं त्यांच्याकडे सोंपविलें. या जर्मनचें इंग्रजींत करीत आणि नंतर इंग्रजीचें मराठी केलें जाई. पुढें त्यांना हिंदुस्थानांत बोलावण्यांत आलें व यांनीं त्यांना व्रात्यस्तोम विधीनें शुद्ध करून घेऊन त्यांच्याशीं वैदिकपद्धतीनें विवाह केला (१४ मे १९२०). व त्यांचें नांव शीलवतीबाई असें ठेवलें. या विवाहापासून यांना औरस संतति झाली नाहीं. प्रसिद्ध जर्मन पंडित विंटरनिट्झ यांच्या जर्मन भाषेंतील संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासाचें शीलवतीबाईनीं केलेलें इंग्रजी भाषान्तर कलकत्ता युनिव्हर्सिटीनें प्रसिद्ध केलें आहे.

तथापि आपल्या स्वभावविशेषानुसार व पत्नीच्या शिशुसंगोपनाच्या तीव्र इच्छेमुळें ठाण्याच्या अनाथालयांतून तीनचार वर्षांचा एक ब्राह्मण बालक व मुंबईच्या एका सूतिकागृहांतून दहा दिवसांच्या आंतील एक बालिका मिळवून यांनीं त्यांचें अपत्यनिर्विशेष संवर्धन केलें. बालकाचें मूळ नांव दामोदर हरी बापट होतें. त्याला विधिपूर्वक दत्तक घेऊन त्याचें नांव दामोदर श्रीधर केतकर करण्यांत आलें व मुलीचें नांव वीरा ठेवण्यांत आलें. तिचें वय यांच्या मृत्युसमयीं तेरा वर्षांचें होतें. पुणें येथें डेक्कन जिमखान्यापलीकडे यांनीं 'आशास्थान' नांवाचा एक छोटा बंगला बांधला होता. पण तो सोडून पुण्याच्या कँप विभागाचा जो एकदां यांनीं आश्रय केला तो शेवटपर्यंत कायमच होता.

'महाराष्ट्र ज्ञानाच्या दृष्टीनें युरोपियन राष्ट्राच्या बरोबरीचाच काय पण थोडा अधिक व्हावा आणि मराठींत लिहिलेल्या ग्रंथांचें इतर देशी भाषांत आणि युरोपांतील भाषांतसुद्धां भाषान्तर व्हावें, तिकडील लोकांना ज्ञानाच्या विविध शाखांत परिपूर्णता मिळविण्याकरितां महाराष्ट्रांत येण्याची आवश्यकता वाटावी आणि जगांतील सर्व विश्वविद्यालयांत व धर्मपीठांत महाराष्ट्रांतील माणसाला तज्ज्ञ म्हणून बोलावणें भाग पडावें, महाराष्ट्राचें राज्य स्वतंत्र असावें आणि मराठींतून लिहिलेल्या कायद्यांना मराठींतून सही केल्याशिवाय कायदेशीरपणा येऊं नये', अशी यांची महत्त्वाकांक्षा होती. आणि त्या दृष्टीनें यांच्या ज्ञानकोशादि सर्व कामाकडे पाहिले असतां यांच्या प्रचंड कामाचें आणि अनाकलनीय सतप्रतिपादनाचें महत्त्व ध्यानांत येतें.

भिक्षुकी, अल्पसंतुष्ट आणि जागतिक दृष्टि न ठेवतां केलेल्या प्रत्येक कामाची हे अत्यंत सडेतोडपणें हजेरी घेत. त्यामुळेंच यांना बरोबरीच्या लोकांत प्रायः कोणीच मित्र नव्हता. पण प्रतिष्ठित आणि रूढ उद्योगांची चिकित्सा करून, नवी दृष्टि उत्पन्न करणारांची प्रथम सर्वत्र अशीच उपेक्षा व अवहेलना होत असते.

वाङ्मयासारख्या अत्यंत महत्त्वाच्या व्यवहाराला यांनीं ज्ञानकोशाचें कार्य व्यावसायिक पद्धतीनें पार पाडून भारदस्त व स्वावलंबी रूप प्राप्त करून दिलें. ज्ञानकोशाकरितां यांनीं एका पैचीहि कोणाची देणगी स्वीकारली नाहीं. लेखनादि मदतहि मोबदल्याशिवाय घेतली नाहीं. मराठी भाषेंत अज्ञात असलेल्या किती तरी ज्ञानाच्या शाखा लोकांना परिचित करून दिल्या. प्रस्तावना खंडांत तर असें संकलनपूर्वक संशोधनात्मक वाङ्मय निर्माण केलें कीं, त्यांच्या इंग्रजी, फ्रेंच व जर्मन भाषान्तराची आवश्यकता प्रतिपादली गेली. आपल्या वागणुकीनें यांनीं स्वार्थत्याग आणि देशभक्ति यांच्या व्याख्या बदलण्यास भाग पाडलें आणि जागतिक ज्ञानाच्या झगझगाटांत आपण कुठें आहोंत हें आपल्या व्यापक आणि सर्वगामी पांडित्यानें दाखविण्याचें काम करून महाराष्ट्राचा मोठेपणा सर्व प्रकारें वाढविला. ज्ञानाची वाढ आणि विचाराचें नाविन्य यांमुळेंच राष्ट्राला जिवंतपणा येत असतो. तें कार्य यांनीं समाजाचा रोष पत्करूनहि स्वयंप्रेरणेनें जन्मभर मोठ्या प्रचंड प्रमाणांत स्वतःच्या हिंमतीवर केलें,

याबद्दल कोणालाहि शंका घेतां येणार नाहीं. अशा युग-प्रवर्तक माणसांची परंपरा चालविण्यास एखादा दुसरा शिष्य असमर्थ असतो. राष्ट्रांतील प्रत्येक घरांत यांच्या कार्याची अग्रपूजा करणारे अनुयायी उत्पन्न होतात व यांचें कार्य तनमनधन अर्पण करून चालविण्यास पुढें सरसावतात.

यांचे ग्रंथः—

१. समाजशास्त्र— (१) History of Caste in India (१९०९), (२) Hinduism : Its Formation and Future (१९११), (३) Hindu Law (१९१४), (४) ज्ञानकोशाचे पांच प्रस्तावना खंड (१९२०-२३), (५) भारतीय समाजशास्त्र (१९३६), (६) कायस्थ प्रभूंचा सामाजिक इतिहास (अप्रसिद्ध).

२. कादंबऱ्या— (१) गोंडवनांतील प्रियंवदा (१९२६), (२) परागंदा (१९२६), (३) आशावादी (१९२७), (४) गांवसासू (१९३०), (५) ब्राह्मणकन्या (१९३०), (६) विचक्षणा (१९३६-३७).

३. काव्य— (१) उत्तर अमेरिकेंतील वसंतकाल, (२) आंगिरसाचें सत्र (अप्रसिद्ध).

४. नाटक— (१) स्त्रीसत्तापराभव (अपूर्ण).

५. अर्थशास्त्र— (१) An Essay on Indian Economics (१९१४).

६. राजकारण— (१) निःशस्त्रांचें राजकारण, (२) Victorious India.

७. संकीर्ण— (१) संकीर्ण लेख (१९१५).

केदार, तुकाराम जयराम—(जन्म स. १८८६) नागपूर येथील सुप्रसिद्ध वकील, नागपूर विश्वविद्यालयाचे माजी व्हाइस-चॅन्सेलर व सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचा जन्म वर्धा येथें झाला व शिक्षण नागपूर येथें झालें. हे बी.ए., एल्एल्. बी. आहेत. यांचें शिक्षण सरकारी शिष्यवृत्ति मिळून झालें आहे; यावरून यांची हुषारी ध्यानांत येते.

स. १९०६ सालीं हे बी.ए. झाले. नंतर कांहीं दिवस शिक्षक होते. पुढें स. १९१० सालीं हे एल्एल्. बी. झाले. प्रथम वर्धा येथें वकीली करून (१९१०-२७) नंतर स. १९३० पासून नागपूर हायकोर्टांत ॲडव्होकेट म्हणून नांवारूपास चढले.

यांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमास प्रारंभ स. १९१२ पासूनच झाला. त्या सालीं यांचा वर्धा म्युनिसिपालिटींत प्रवेश झाला. त्यानंतर प्रत्येक निवडणुकींत यश येऊन हे वर्धा म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष झाले (१९२२-२५). त्यापूर्वी टिळक होमरूल लीगचे हे अध्यक्ष होते.

स. १९२७ मध्यें हे मध्यप्रान्त व बऱ्हाडतर्फे प्रान्तिक कायदेमंडळांत निवडून आले. तेव्हांपासून स. १९४५ पर्यंत हे तेथें सभासद आहेत. मध्यें प्रथम हे मंत्री म्हणून नेमिले गेले (१९२८-२९). पुढें पुनः डॉ. राघवेन्द्र राव यांचे सहकारी मंत्री म्हणून यांची निवड झाली होती (१९३०).

नागपूर विश्वविद्यालयाचे व्हाइस-चॅन्सलर म्हणून सहा वर्षें यांनीं महत्त्वाचें काम केलें (१९३९-४४). यांच्या कामगिरीचा गौरव म्हणूनच यांना डि. लिट्. ही पदवी दिली (१९४३). हिंदुसभेनें हैदराबाद संस्थानांत सत्याग्रहाची चळवळ सुरू केली तेव्हां हैदराबादच्या विद्यार्थ्यांकरितां नागपूर युनिव्हर्सिटीनें केलेल्या तत्परतेच्या योजनेमुळें यांची सर्वत्र वाखाणणी झाली. त्याचप्रमाणें वर्धा कॉमर्स कॉलेज सरकारनें बंद केलें होतें तें उघडण्याची खटपट करून यांनीं यश मिळविलें.

यांचें वाचन व्यापक असून यांचे हातून महत्त्वाचें लेखन चालू असतें. यांचें कालिदासाच्या कालासंबंधींचें इंग्रजींतील फुटकळ लेखन यांच्या लेखनाविषयीं आशा उत्पन्न करणारें आहे. ऋग्वेदांतील पुराव्यावरून आर्यांचें वसतिस्थान आशियामायनरजवळ असल्याचा यांचा सिद्धान्त अभ्यासी लोकांना विचार करावयास लावणारा आहे.

केरकर, केसरबाई—(जन्म स. १८९० सुमार) सुप्रसिद्ध गायिका. अल्लादियाखाँच्या गायनाची पद्धतशीर परंपरा चालवणाऱ्या मंजीखांबरोबरच यांचाहि प्रामुख्यानें उल्लेख केला जातो. अल्लादियाखाँच्याकडे शिकण्यास येण्यापूर्वी यांनीं जरा रामकृष्णबुवा वझे, भास्करबुवा बखले, अबदुल करीमखां वगैरे अनेक संगीतश्रेष्ठींची तालीम घेतली असली तरी यांच्या गायनावरील खाँसाहेबांचा ठसा सहज उठून दिसण्याइतपत स्पष्ट आहे. ख्यालाच्या गायकींत बाबलीबाई, अंजनीबाई व ताराबाई शिरोडकर यांनीं जी कीर्ति मिळवली, तिचीच सुधारून वाढवलेली आवृत्ति आज यांचेकडे आलेली आहे. वस्तुतः ख्यालाची गायकी ही स्त्री आवाजास न पचणारी; परंतु त्यांतहि प्रावीण्य संपादन करून रसिकांकडून वाहवा मिळवणें ही गोष्ट यांना एकाच औषधीच्या साहाय्यानें सिद्ध झाली आहे, तिचें नांव

मेहनत. यांचा आवाज गोड व सुरेल आहे. परंतु गाणें ऐकतांना त्यांतील गोडीपेक्षां पुरुषी रुंदीच आपणांस अधिक जाणवते. तथापि मेहनतीमुळें त्याला बांधेसूदपणा व गोलाई हीं सहजच प्राप्त झालीं आहेत. एकदां गाणें सुरू झालें कीं मग याहि सर्व बाह्य गोष्टींवरचें आपलें लक्ष नाहींसें होऊन त्यांतील सहजता आपणांस विशेष आकर्षित करते. विलंपत, तान, मुरकी, खटका–या कोणत्याहि गोष्टी घ्या; ज्या सहजतेनें त्या या सर्व गोष्टी हाताळतात तीं प्रेक्षणीय असते. यांच्या तानेंतील वैचित्र्य, बिकटता व सहजता हे गुण जसे प्रमुख आहेत, त्याप्रमाणेंच अनेक आवर्तनें दमशास टिकवून सुंदरपणें समेवर येणें हा यांच्या गायनाचा आणखी एक विशेष आहे. सम घेतल्यावर पुन्हां तान घेण्यास सुरुवात करून निरनिराळ्या लयींनीं मध्य व तार सप्तकांत फिरत करून पुन्हां एकाद्या सुंदर ठिकाणीं सम घेणें म्हणजे यांच्या हातचा मळ आहे. श्रोत्यांच्या मनाला धन्यता वाटावयास लावण्याचें व पुन्हां असें गाणें ऐकण्याचा योग येईल किंवा नाहीं अशी हुरहूर लावण्याचें सामर्थ्य यांच्या या गुणांमुळेंच यांना प्राप्त झालें आहे. गाण्यांतील सौंदर्य प्रगट करण्याचें यांचें कसब इतरत्र क्वचितच दिसतें.

केवलानंदसरस्वती स्वामी—(जन्म स. १८७७) वाईचे सुप्रसिद्ध पंडित व जुन्या नव्या शास्त्राचे सूक्ष्म अभ्यासक. पूर्वाश्रमीचें यांचें नांव नारायणशास्त्री मराठे.

यांचें जन्मस्थान सुडकोली (ता. रोहें, जि. कुलाबा). यांना व्यवहार, धर्म व वेदान्त यांचें बौद्धिक व आचारात्मक शिक्षण मातापितरांकडून मिळालें. वाईचे श्रीप्रज्ञानंद सरस्वती हे यांचे गुरु होत. त्यांच्याच नांवानें यांनीं पुढें प्राज्ञपाठशाळा काढली. यांचे मामांचे गुरु बाळशास्त्री बोडशास्त्री डेंग्वेकर होत. यांनीं आस्तिक षड्दर्शनांचें अध्ययन व वाचन केलें. मराठी भाषेंतील शास्त्रीय, इतिहासात्मक व निबंधात्मक ग्रंथांचें यांचें वाचन चांगलें आहे. गाणें व हार्मोनियम यांचाहि यांनीं सखोल अभ्यास केला आहे. प्राज्ञपाठशाळेचे हे संस्थापक व चालक असून यांनीं ३० वर्षे तेथें अध्यापनाचें काम केलें. अकोला ब्राह्मण परिषदेचे हे अध्यक्ष होते (१९२८). स. १९३१ मध्यें यांनीं संन्यास घेतला व बद्रिनारायणाचें दर्शन घेतलें. धर्मनिर्णयमंडळाच्या स्थायी धर्मचर्चामंडळाचे हे कायमचे अध्यक्ष आहेत. धर्मकोशाची मूळ योजना करून कामाला आरंभ यांनींच केला.

केशवराव, न्यायमूर्ति—(जन्म स. १८६७–मृत्यु स. १९३२ मे २१) हैद्राबादचे सुप्रसिद्ध वकील व सार्वजनिक कार्यकर्ते.

ब्रिटिश हिंदुस्थानांत न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या चरित्राला जें महत्त्व आहे तें हैदराबाद संस्थानांत यांच्या चरित्राला आहे. त्या संस्थानांतील बहुतेक सार्वजनिक चळवळींच्या व व्यापक तत्त्वज्ञानाच्या जनकत्वाचा मान यांच्याकडे जातो.

यांचा जन्म पुरजळ (ता. बसमत, जि. परभणी) येथें अजोळीं झाला. यांचें मूळ गांव त्याच तालुक्यांत 'कोरटें' या नांवाचें एक खेडें असून यांच्या घराण्यांत तेथील जोशीपणाची वृत्ति पूर्वीपासून चालू आहे. त्यामुळें हे केव्हां केव्हां 'मी जोशी आहें' असें आपल्या व्याख्यानांत अभिमानानें सांगत. यांच्या वडिलांचें नांव संतुकराव. आपले मेव्हणे हरी रावजी शेष यांच्यामार्फत विशेष शिक्षण न होतां हे तहसील कचेरींत द. म. १५ रु.च्या नोकरीवर लागले (१८८२). नोकरींत फायदा होत असूनहि स्वतंत्रपणें धंदा करण्याकरितां हे वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले (१८९०). हे वरच्या वर्गांत उत्तीर्ण झाल्यामुळें यांना हायकोर्टाची सनद मिळाली.

यांनीं प्रथम गुलबर्गा येथें पांचसहा वर्षें वकीली करून चांगला जम बसविला व हैदराबादेस वकीली करण्याकरितां येऊन राहिले (१८९६). गुलबर्गा येथें आल्यापासूनच पुण्यामुंबईच्या चळवळींकडे आपलेपणानें पाहणें व शक्य तर त्यासंबंधीं विचारविनिमय करणें वगैरे गोष्टींचा यांना नाद असे. दर सुट्टींत हे तिकडे मुद्दाम जात व व्याख्यानें वगैरे श्रवण करीत.

हैदराबादेस ज्या रामाचार्यांच्या मदतीनें हे आले होते ते लवकरच वारले आणि मराठी बोलणाऱ्या वकिलांत यांनीं लवकरच अग्रमान पटकाविला. औरंगाबादच्या हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांत यांनीं हिंदूंच्यातर्फे वकीलपत्र स्वीकारण्याचें धाडस केलें. त्यामुळें हिंदूंचें पुढारीपण यांच्याकडे सहजच चालून आलें. तसेंच वरंगळच्या हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांत व कुबेर येथील जलालशहाच्या खुनाच्या खटल्यांत यांनीं केलेल्या कामगिरीनें यांचें नांव सर्वतोमुखीं झालें.

तेथील सरकारचेंहि यांच्याकडे लक्ष गेलें आणि यांना फॅक्टरी ॲक्ट करण्याकरितां नेमलेल्या कमिशनवर सभा-

सद म्हणून घेण्यांत आलें (१९१९). यांनींहि त्यांत दोन वर्षेपर्यंत काम करून सरकार व लोक या दोघांचाहि विश्वास संपादन केला.

याच सुमारास न्यायमूर्ति राय बालमुकुंदसाहेब हे सेवानिवृत्त झाल्यावर हायकोर्टात त्यांच्या जागीं हिंदु जजाची निवड व्हावयास पाहिजे होती, पण ती तशी झाली नाहीं. ज्या हायकोर्टात शेंकडा नव्वद खटले हिंदूंचे व हिंदुधर्मशास्त्राचे तेथें एकहि हिंदु जज्ज नाहीं अशी स्थिति झाली. ही गोष्ट मुख्य प्रधान सर अली इमाम यांच्या ध्यानांत येऊन त्यांनीं यांची ॲडिशनल जज्ज म्हणून नेमणूक केली. या जागेचा पगार दोन हजारच होता. तथापि यांनीं ती जागा पत्करिली, व आपल्या अखंड समाजसेवेचें कार्यहि चालू ठेविलें.

त्या अवधींत गुलबर्गा हिंदु-मुसलमानदंगा चौकशी वगैरे अनेक कमेट्यांवर यांनीं काम केलें. आणि पांच वर्षें काम करून सेवानिवृत्त झाले (१९२६).

संस्थानांतील बहुतेक शिक्षणसंस्था, बहुतेक सार्वजनिक चळवळी, आर्यसमाज, मराठी वर्तमानपत्रें व मासिकें यांच्या जनकत्वांत यांचा महत्त्वाचा भाग असे. संस्थानाबाहेरील भारत इतिहास-संशोधक मंडळ, पुणें, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी, पुणें, वगैरेंशीं हे अगदीं आपलेपणाचा संबंध ठेवीत. हे उमरावती विदर्भ-संघाचे अध्यक्ष, जळगांवच्या विदर्भ-साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष, पुणें वाचनालय-परिषदेचे अध्यक्ष, विदर्भ साहित्य-परिषद, हैदराबाद, स्वागताध्यक्ष (१९२७) व पुणें येथें भरलेल्या दे. कृ. ब्रा. परिषदेचे अध्यक्ष होते (१९३२).

हैदराबाद संस्थानांतील कायदे मंडळांतहि यांनीं महत्त्वाचें काम केलें. सर्व प्रकारच्या लोकांत मिळून-मिसळून काम करण्याची यांची हातोटी वाखाणण्यासारखी होती.

केशवसुत—(जन्म स. १८६६–मृत्यु स. १९०५) सुधारणेची घोषणा करणाऱ्या व गूढगुंजनात्मक आधुनिक मराठी कवितेचे जनक. यांचें संपूर्ण नांव–कृष्णाजी केशव दामले. यांचें 'केशवसुत' हें सध्यां प्रचारांत असणारें नांव 'काव्यरत्नावली 'कार नारायण नरसिंह फडणीस यांनीं प्रथम उपयोगांत आणलें. रत्नागिरी जिल्ह्यांतील मालगुंड हें यांचें जन्मस्थान. यांचे वडील केसोपंत मराठी शाळामास्तर होते. लहानपणीं यांची लिहिण्याची पद्धत फारच सावकाश असल्यानें हे तेविसाव्या वर्षी मॅट्रिक पास झाले (१८८९). मुंबई, खानदेश, भडगांव, फैजपूर, धारवाड यांसारख्या अनेक ठिकाणीं यांनीं नोकऱ्या केल्या (१९०३). यानंतर कांहीं कामासाठीं हुबळी येथें गेले असतां तेथेंच प्लेग होऊन हे मृत्यु पावले.

यांची प्रसिद्धि मुख्यतः कवि म्हणून असली तरी तिची प्राप्ति यांना मृत्यूनंतर किती तरी दिवसांनीं झाली आहे. यांच्या मृत्यूनंतर पांच-सहा वर्षांनीं श्री. रा. ग. गडकरी हे कवि म्हणून लोकांच्या प्रथम डोळ्यांसमोर आले. त्यांनीं प्रथम आपण 'केशवसुतांचे सच्चे चेले' असल्याचें जाहीर करून यांच्या संप्रदायाची स्थापना केली व नंतर बालकवि ठोंबरे, रेंदाळकर व टिळक या कवींनीं यांचेंच ऋण मान्य करून यांचा संप्रदाय पक्का केला. या लोकांनीं 'तुतारी मंडळ' काढून आपल्या प्रत्येक कवितेच्या प्रसिद्धीबरोबर तुतारी मंडळाचें नांव घालावयाचें ठरवलें, व अशा तऱ्हेनें विस्मृतीच्या खोल दरींत पडलेलें यांचें नांव पुन्हां एकदां वर येण्यास सुरुवात झाली.

यांच्या इतक्या विविध, परिणामकारक व उत्साहवर्धक कविता पूर्वी मराठींत फारच थोड्या लिहिल्या गेल्या होत्या. इंग्रजी धर्तीच्या कविता करणारे वस्तुतः हे पहिलेच गृहस्थ नव्हेत. इंग्रजी भावगीतांचीं रसाळ रूपांतरें विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं कांहीं कमी प्रसिद्ध केलीं नव्हतीं. यांचा काव्यरचनाकाल वीस वर्षांचा (१८८५–१९०५) हा असून यांच्या एकंदर १३२ कविता प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं १५ कविता भाषांतरित आहेत. यांच्या स्वतंत्र कवितांपैकीं 'तुतारी', 'झपूर्झा', 'स्फूर्ती', 'वातचक्र', 'आम्ही कोण' व 'घुबड' या कविता विशेष प्रसिद्ध आहेत. यांच्या कवितेवरील पहिलें पुस्तक हरिभाऊ आपट्यांचें 'केशवसुतांची कविता' हें विशेष महत्त्वाचें आहे. याच पुस्तकाची दुसरी (१९२१) व तिसरी आवृत्ति (१९२७) यांचे भाऊ सीतारामपंत दामले यांनीं प्रसिद्ध केली. नाट्यछटाकार दिवाकर यांनीं यांच्या आयुष्याचीं कांहीं टांचणें एकत्र करून प्रसिद्ध केलीं.

केळकर, नरसिंह चिंतामण— (जन्म स. १८७२) महाराष्ट्राचे थोर मुत्सद्दी, देशभक्त आणि मराठी साहित्याचे आचार्य.

पंढरपुराजवळ मोडलिंब येथें वडील मामलेदार असतां तेथें यांचा जन्म झाला.

यांचें शिक्षण मिरज येथें होऊन हे मॅट्रिक झाले (१८८८). हे बी. ए. (१८९१) व एलएल. बी. (१८९४ मध्यें) झाल्यानंतर यांनीं सातारा जिल्ह्यांतील वकिलीची सनद काढिली. पण तो धंदा यांनीं अवघे नऊच महिने केला. इतक्यांत लो. टिळकांनीं यांना आपले मदतनीस म्हणून बोलाविलें आणि हेहि इतर चालून आलेलीं लाभस्थानें बाजूला सारून पुण्यास नोकरीवर येऊन दाखल झाले (१७ मार्च १८९६). हे अशा स्थिर योगावर पुण्यास येऊन दाखल झाले कीं, यांचें आसन पुढें कोणताहि कुयोग डळमळवूं शकला नाहीं. उलट टिळक-केळकर ही जोडी एकमेकांना पूरक असल्याचा अनुभव लोकांना आला. हे पुण्यास आल्यानंतर लॉ क्लासमध्यें शिकविण्याची व 'मराठ्या'ची बहुतेक जबाबदारी यांच्याकडे आली. स. १८९७ सालीं खटला होऊन टिळकांना शिक्षा झाली तेव्हां सोयीच्या दृष्टीनें केसरी आणि मराठा या दोन्ही पत्रांचें संपादकत्व यांच्याकडे आलें. खाडिलकर केसरीकरितां होते तरी जाहीर संपादक म्हणून हेहि लेखन करीत. टिळक तुरुंगांतून परत आल्यानंतर मात्र हे मराठ्याचे संपादक राहिले आणि हें संपादकत्व यांच्याकडे पुढें सतत सन १९१८ पर्यंत होतें. स. १९१० ते १९१८ पर्यंत हे पुनः दोन्ही पत्रांचेहि संपादक होते. नंतर १९१९ मध्यें हे टिळकांच्याबरोबर विलायतेस गेल्यानें खाडिलकर हे केसरीचे एक वर्षभर संपादक होते. पण हे स. १९१९ अखेर विलायतेहून आल्यावर १९२० च्या मे महिन्यांत यांनीं केसरीचें संपादकत्व पुनः पत्करिलें तें मध्यें एक वर्ष सोडून स. १९३१ च्या जानेवारीच्या अंकापर्यंत यांच्याकडेच होतें.

पुणें सार्वजनिक सभेची, दुष्काळासंबंधीं फॅमिन कोड अमलांत आणून शेतकऱ्यांना सूट व माफी योग्य प्रमाणांत मिळावी, अशी चळवळ होती. तेव्हांच्या व प्लेगच्या वेळीं व्हालंटियर म्हणून केलेल्या कामामुळें आणि टिळकांचे मदतनीस म्हणून यांच्यावर लोकांचा विश्वास बसत चालला. स. १८९८ मध्यें म्युनिसिपालिटीच्या-नव्या निवडणुकी निघाल्यापासून तेथें हे निवडून येऊं लागले. तेथेंहि यांच्याकडे पुढारीपणा सहजच आला. हे मार्केट कमेटीचे सहा वर्षे चेअरमन होते. स. १९१२ सालीं यांना व्हाइस-प्रेसिडेंट निवडण्यांत आलें व स. १९१८ सालीं यांची निवडणूक अध्यक्षाच्या जागीं झाली. यापूर्वी सरकारनें नेमलेल्या सभासदांपैकीं अध्यक्ष निवडला जात असे, पण ती प्रथा आतां बदलली. तेव्हांपासून १९२४ पर्यंत हे अध्यक्ष निवडून येत. पुढें मात्र यांनीं म्यु. निवडणुकीस उभें राहण्याचें स्वेच्छेनें सोडलें.

स. १९०१-०४ पर्यंत टिळकांच्याबरोबर त्यांच्या परिवारांतील माणसांनाहि ताईमहाराज प्रकरणानें ग्रासलें होतें. त्या वेळी नेहमींच्या संपादकीय कामाबरोबरच प्रत्येक ठिकाणीं यांचें वकीलपत्र दाखल असे. आणि घरचा वकील म्हणून किरकोळ समजलीं जाणारीं पण मेहनतीचीं कामें यांच्यावर सोंपविलीं जात. शेवटीं टिळकांना हायकोर्टानें सर्व फौजदारी आरोपांतून मुक्त केल्यावर या प्रकरणास उतार लागला.

याच वेळीं बंगभंगाची चळवळ जोरांत सुरू झाली. त्या वेळीं प्रान्तिक कामें करण्यास बरीच मंडळी पुढें आली होती. पण परप्रान्तांशीं व काँग्रेसमधील इतर पुढाऱ्यांशीं व्यवहार करण्यांत टिळकांना यांच्याशिवाय खरा कोणाचाच आधार नव्हता. त्या वेळीं नोकरापेक्षां सहकाऱ्याच्या भूमिकेंत यांचें रूपान्तर अधिक झालें. कारण कोणतेंहि काम व्यवस्थित आणि मनःपूर्वक करण्याचा यांचा स्वभाव आहे. परदेशी बातमीदार वगैरे टिळकांच्याकडे येत. त्यांची रीतसर व्यवस्था लावणें यांच्या मदतीशिवाय टिळकांना अशक्य होतें. टिळकांचा हा माध्याह्नकाळ होता. त्यांच्या तेजानें सरकारचेसुद्धां डोळे दिपत होते. जवळ असणारांनासुद्धा सुरक्षितपणा नव्हता. तेव्हां यांच्याहि परीक्षेची वेळ होती. टिळक तर १९०८ सालीं तुरुंगांत गेलेच, पण त्यांच्या खटल्याचें मोठ्या तातडीनें यांनीं प्रसिद्ध केलेलें पुस्तकहि जप्त झालें. याच वेळीं टिळकांना झालेल्या शिक्षेसंबंधीं यांनीं लिहिलेल्या मराठ्यांतील लेखाबद्दल यांना १२०० रु. दंड व १४ दिवसांची कैद व माफी मागेपर्यंत फिरून कैद, अशी चमत्कारिक शिक्षा देण्यांत आली (१९०८).

यानंतर नाशिक येथें जॅक्सनचा खून झाला व राजकीय वातावरण अधिक बिकट झालें. या वेळीं केसरी व मराठा हीं दोन्हीं पत्रें खाडिलकरांच्या नांवावर होतीं. खाडिलकरांचें म्हणणें, मराठा केळकरांच्या नांवावर असावा, कारण त्यांत हेच बहुतेक लिहीत असत; पण केसरी मात्र आपल्या नांवावर असावा. पण वडिलकीच्या नात्यानें यांना तसें करणें अपमानास्पद वाटूं लागलें. टिळकांना मंडाले येथें लिहिलें असतां त्यांनीं यांच्या म्हणण्यास मान्यता दिली. पण स. १९१० सालीं यांनीं आपल्या नांवें केसरीचें डिक्लेरेशन करितांच खाडिलकरांनीं आपला केसरी कचेरीशीं असलेला संबंध सोडला व

दोन्ही पत्रांचें संपादकत्व यांचेकडे आलें. त्या वेळीं बाहेरच्या विधायक चळवळी बंदच पडल्या होत्या आणि राष्ट्रीय सभा प्रागतिकांच्या हातांत गेली होती. तेव्हां यांनीं आपल्या लेखनशक्तीच्या आणि विचाराच्या जोरावर केसरीचें धोरण कायम ठेवून केसरीला लोकप्रिय केलें, आणि त्याला सरकारी झळ लागूं दिली नाहीं. या महत्त्वाच्या प्रसंगांत यांनीं केलेलें हें कार्य यांच्या आयुष्यांतील फार मोठें राष्ट्रीय कार्य गणलें पाहिजे.

टिळक सुटून येतांच पुनः बाहेरच्या कार्यास सुरुवात झाली. बेळगांवच्या परिषदेंत काँग्रेसमध्यें शिरण्याबद्दल ठराव झाला (१९१६) आणि लखनौ काँग्रेसमध्यें सर्व पक्ष पुनः काँग्रेसमध्यें एकवटले. या सर्व कार्यांत टिळकांना यांचा उजव्या हातासारखा उपयोग होई. यांच्या इतपत विधायक व सनदशीर कार्य उरकणारा मनुष्य टिळकांच्या पाशीं कोणीहि नव्हता. त्यामुळेंच यांना काँग्रेसचे सेक्रेटरी निवडण्यांत आलें. तथापि विलायतला जाणाऱ्या काँग्रेस डेप्युटेशनचे सेक्रेटरीहि यांनाच निवडण्यांत आल्यामुळें यांनीं काँग्रेसच्या सेक्रेटरीचें काम सोडलें. होमरूल-लीगच्या डेप्युटेशनचे हे सेक्रेटरी होतेच. इंग्लंडमध्यें दोन्ही डेप्युटेशनचे सेक्रेटरी असणाऱ्या यांनाच इंग्लंडांतील काँग्रेस कमेटीचें मुखपत्र 'इंडिया' चें संपादकत्व देण्यांत आलें. विलायतेहून आल्यावर सोलापूर येथें १९२० सालीं दोन्ही पक्षांची संयुक्त प्रान्तिक परिषद भरली. तिचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें. या एकंदर अनुभवामुळें शेवटीं टिळकांनीं यांना केसरी संस्थेचे एकमेव चालक नेमणें अगदीं साहजिक आहे.

टिळक वारले त्याच दिवशीं गांधींच्या असहकारितेचा पुकारा झाला आणि जुन्या अनुभवी पुढाऱ्यांचीं मतें विरुद्ध असतांहि कलकत्त्यास राष्ट्रसभेनें असहकारितेला मान्यता दिली आणि राष्ट्रसभेच्या निर्णयापुढें मान वांकविणें अवश्य म्हणून यांनीं कौन्सिल बहिष्काराच्या चळवळीचा पुरस्कार सांगूनसवरून मुदतबंद एक वर्षापुरता केला. पण गांधींच्या चळवळींचें धोरण यांना अविवेकी वाटल्यानें त्याचा सर्वस्वीं पुरस्कार यांनीं केला नाहीं.

पुढें काँग्रेसमध्येंच गया येथें कौन्सिल-प्रवेशवादी स्वराज्यपक्ष निघाला (१९२३) त्यांत महाराष्ट्राबाहेरील दास, नेहरू वगैरेंनीं पुढाकार घेतला. हे महाराष्ट्रांतील या पक्षाचे अध्यक्ष होते. पुढील कायदेमंडळाच्या निवडणुकींत प्रचंड बहुमतानें हे निवडून आले (१९२४-२५) व असेंब्लींत हे त्या पक्षाचे व्हिप होते. विठ्ठलभाई पटेल हे असेंब्लीचे अध्यक्ष निवडून आल्यावर यांना त्यांचे जागीं स्वराज्य पार्टीचे उपाध्यक्ष निवडण्यांत आलें, पण नागपूर कायदेकौन्सिलचे अध्यक्ष ना. श्री. व. तांबे यांना एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर निवडण्यांत आलें. तेव्हां स्वराज्य-पक्षांत अधिकाराच्या जागा पत्करण्यावरून मतभेद होऊन महाराष्ट्रीयांचा प्रतिसहकार पक्ष निघाला. आणि त्या पक्षातर्फेहि हे प्रचंड मतांनीं निवडून आले (१९२७-३०).

१९२७ अखेर यांनीं टिळक-चरित्राचा उत्तरार्ध दोन खंड लिहिल्यावर एक वर्षभर केसरीचें संपादकत्व सोडलें होतें (१९२८). नंतर पुनः दोन वर्षें संपादकत्व पत्करून केसरीचा ज्युबिलीचा अंक काढून तें कायमचें सोडलें (१९३१). तथापि यांच्या विविध प्रकारच्या लेखनांत बिलकुल खंड पडलेला नाहीं. केसरी अर्धसाप्ताहिक यांनींच केला (१९२८).

यांची सहृदयता, मनमिळाऊपणा, कामाचा उरक आणि जबाबदारीची जाणीव यांमुळें हे कोठें तरी महत्त्वाच्या ठिकाणीं अध्यक्ष झाले नाहींत असें वर्ष क्वचितच सांपडेल. बडोदा येथें भरलेल्या मराठी साहित्य-संमेलनाचें अध्यक्षपद यांना दोन वेळां देण्यांत आलें (१९२२, १९३१), मुझफरनगर (१९२४), संस्थान परिषद, दिल्ली (१९२४), कानपूर हिंदुमहासभा जादा, संगीत-परिषद, ग्रंथसंग्रहालय (१९२५), दलितोद्धार, दिल्ली, डाका, प्रांतिक हिंदुसभा (१९२८) हिंदुमहासभा, जबलपूर (१९२९), प्रान्तिक हिंदुसभा लाहोर (१९३०), रयत सभा, अहमदाबाद (१९२९) इत्यादि ठिकाणीं हे अध्यक्ष होते. एका उद्योगी गृहस्थानें १३०४ सभांचे हे अध्यक्ष झाल्याचें गणित प्रसिद्ध केलें होतें.

यांचे प्रमुख ग्रंथः— १ सुभाषित व विनोद, २ मराठे व इंग्रज (१९१८), ३ टिळक-चरित्र (भाग १,२,३); व तोतयाचें, बंड, चंद्रगुप्त, कृष्णार्जुन युद्ध. अमात्यमाधव, वीरविडंबन, संत भानुदास वगैरे नाटकें. यांचा सर्व लिखाणाचा संग्रह 'समग्र केळकर वाङ्मय' या नांवानें बारा खंडांत प्रसिद्ध झाला आहे.

लिहिण्याची अत्यंत हौस असलेला यांच्यासारखा लेखक विरळा. ती हौसच यांना अजूनहि नव्यानव्या क्षेत्रांत पदार्पण करण्यास उत्तेजत देत आहे. यांनीं हाताळला नाहीं असा वाङ्मयांत एकहि प्रान्त सांपडणार नाहीं. तसेंच अत्यंत जलद आणि सुबोध वाङ्मय निर्माण

करण्यांत यांचा हातखंडा आहे. १ कवि, २ शास्त्रकार, ३ कादंबरीकार, ४ लघुकथा-लेखक, ५ इतिहास-संशोधक, ६ नाटककार, ७ प्रबंधकार, ८ संपादक–इत्यादींपैकीं यांच्या गुणांचा उत्कर्ष कोठें आढळतो ? या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण असलें तरी अनुक्रमानें शेवटाकडे आपणांस धांव घ्यावी लागेल. कोणताहि विषय साधकबाधक प्रमाणांनीं समतोलपणें मांडण्यांत हे कुशल आहेत. भावनेच्या आहारीं न जातां व्यावहारिक बुद्धीनें सुवर्णमध्य काढण्यांत यांच्या आयुष्याचें सार आहे. यांच्या या स्वभावविशेषाचा फायदा राष्ट्राला अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं झालेला आहे. विनीवर जाऊन चार हात करणाऱ्या योद्धयापेक्षां सौम्यपणानें मुद्दा न सोडतां कार्य साधणाऱ्या मुत्सद्याची यांचीं प्रकृति आहे. चिरोलकेसच्या वेळीं लोकांकडून रुपयारुपयानें जमा केलेला एक लक्ष रुपयांचा टिळक ज्युबिली फंड (१९१९) केसरीच्या खजिन्यांतून तीन लाखांच्या रूपानें सव्याज परत देऊन, लोकमान्य टिळक ट्रस्ट उभारून, यांनीं आपल्या चारित्र्याला नैतिक अधिष्ठान मिळवून दिलें आहे (१९३०). साधा मनुष्य बेताच्या भांडवलावर सारासार विचारानें केवळ सद्बुद्धीच्या जोरावर राष्ट्राची कशी सेवा करूं शकतो याचें हे मूर्तिमंत उदाहरण आहेत.

केळुसकर, कृष्णराव अर्जुन—(जन्म स. १८६०–मृत्यु स. १९३४) मराठींतील सुप्रसिद्ध लेखक व सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचा जन्म कोंकणी मराठा घराण्यांत रत्नागिरी जिल्ह्यांतील केळुस या गांवीं झाला. हे मॅट्रिक होते. यांना मराठी, इंग्रजी व संस्कृत या भाषांचें ज्ञान चांगलें असे. हे उत्तमपैकीं शिक्षक होते. यांनीं मुंबईच्या विल्सन हायस्कुलांत जवळजवळ ४५ वर्षे शिक्षकाचें काम केलें. जातिवंत शिक्षकाच्या अंगीं असणारे गुण यांच्या अंगीं होते. कोणत्याहि जातींतील होतकरू विद्यार्थी दिसल्यास त्याला हरतऱ्हेनें मदत करण्याच्या कामीं हे सदोदित तत्पर असत. यांना लोक ' दादा ' म्हणत. या दादांचे कृतज्ञतापूर्वक उपकार स्मरणारे डॉ. भी. रा. आंबेडकरांसारखे पुष्कळ थोर लोक आहेत. मागसलेल्या जातींतील विद्यार्थ्यांना मदत करून पुढें आणण्याविषयीं यांची खटपट असे. ब्राह्मणेतर मंडळींत विधायक पद्धतीनें सतत कार्य करीत राहणाऱ्या लोकांत यांना मानाचें स्थान दिलें पाहिजे. यांनीं स. १८९२ सालीं ' अध्यात्मिकज्ञानरत्नावली ' मासिक काढून तें सतत सात वर्षे चालविलें. स. १९०७–१४ पर्यंत हे सरकारच्या आश्रयानें चाललेल्या ' जगद्वृत्त ' पत्राचे संपादक होते. याशिवाय तुकारामाचें चरित्र, गौतम बुद्धाचें चरित्र, सात उपनिषदांचीं भाषान्तरें, अनेक इंग्रजी ग्रंथांचीं भाषान्तरें व भगवद्गीता (मूळ श्लोक, पदें, पदार्थ सरलार्थ, वामनी समश्लोकी, मोरोपंती आर्या, मुक्तेश्वरी ओवी, तुकारामाचा अभंग, उद्धवचिद्धताची सवाई व श्लोक-सूचिसह) वगैरे यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

यांनीं शिवाजीमहाराजांचें चरित्र विस्तृतपणें लिहून प्रथम १९०७ सालीं प्रसिद्ध केलें. त्यांत थोडी भर घालून व दुरुस्ती करून मराठी व इंग्रजी अशीं दोन्ही पुस्तकें १९२१ सालीं यांनीं प्रसिद्ध केलीं.

यांच्या शिवाजीचरित्राचें उत्तम इंग्रजी भाषान्तर होऊन तें जगांत सर्वत्र पसरावें अशी मूळ इच्छा कोल्हापूरचे श्रीशाहु छत्रपति यांची. पण ते हें पुस्तक प्रकाशित होण्याच्या सुमारास मृत्यु पावले व हे गरीब गृहस्थ चांगलेच आर्थिक पेंचांत सांपडले. पण ही हकीगत इंदूरच्या होळकर सरकारनां कळतांच त्यांनीं यांना बोलावून उदार देणगी दिली, यांना कर्जातून सोडविलें आणि भाषान्तरकार प्रो. एन्. एस्. ताकाखाऊ यांनाहि योग्य मोबदला मिळाला. शाहूमहाराज गेल्यानें त्यांची यांना मदत झाली नाहीं तरी हें सर्व कार्य त्यांच्या प्रेरणेनें झालेलें असल्यामुळें यांनीं इंग्रजी पुस्तक त्यांना अर्पण केलें. हें यांचें शिवाजीचरित्र प्रौढ, शुद्ध, भारदस्त व वैशिष्ट्यपूर्ण आहे. यांच्या गौरवार्थ एक मंडळ स्थापन होऊन त्यानें यांच्या लेखांचा संग्रह, ' विचारसंग्रह ' नांवानें प्रसिद्ध केला.

कोकटनूर, डॉ. जी. रामचंद्र—(जन्म स. १८९३) सुप्रसिद्ध डॉक्टर व हुक्केरीरोडच्या 'कर्नाटक हेल्थ इन्स्टिटयूट'चे संस्थापक.

हे पुणें न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रिक झाले (१९१३) व इंटरसायन्सचा अभ्यास करून वडील बंधूंच्या बोलावण्यावरून हे अमेरिकेस रवाना झाले (१९१६). तेथें यांनीं मिनेसोटा युनिव्हर्सिटींत मेडिकल कोर्स घेतला व हे प्रथम बी. एस्. व नंतर बी. एम्. झाले. यानंतर यांनीं न्यूयॉर्कजवळील जर्सी शहरांतील खाइस्ट हॉस्पिटलमध्यें जवळजवळ १६ महिने हाउस फिजिशियन व सर्जन म्हणून काम केलें व एम्. डी. ही डिग्री घेतली. यानंतर यांनीं मिचिगन कॉपर मायनिंगमध्यें असिस्टंट फिजिशियनची नोकरी पत्करिली. अशा तऱ्हेनें सुमारें १। वर्षे काम केल्यावर तिकडील अनुभव पुरेसा वाटून हें

युरोपमध्यें गेले. व्हिएन्ना येथें यांनीं डोळ्याचे रोग व युरॉलॉजी यांचा विशेष विषय म्हणून कांहीं महिने अभ्यास केला. याप्रमाणें ८ वर्षें शिक्षण व अनुभव संपादन करून हे हिंदुस्थानांत परत आले (१९२४). लागलीच बेळगांव येथें ठळकवाडीस प्रशस्त बंगल्यांत यांनीं आपला दवाखाना व रुग्णालय उघडलें. त्याचाच विस्तार होत होत आज हुकेरीरोडवरील कर्नाटक हेल्थ इन्स्टिटयूट व हॉस्पिटलचा पसारा झालेला आपणांस दिसत आहे. तेथें शस्त्रक्रिया व उपचार करण्याची सर्व व्यवस्था असून क्षयरोग्यांकरितां स्वतंत्र विभाग आहे.

कोकटनूर, डॉ. वामन रामचंद्र—(जन्म स. १८८६) अमेरिकेंत वास्तव्य करून राहिलेले जगप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ. यांची फार मोठे रसायनशास्त्रज्ञ म्हणून सर्व जगभर ख्याति आहे. मुंबई विद्यापीठाचे बी. एस्सी. झाल्यानंतर (१९११) हे अमेरिकेंतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटींत रवाना झाले. याचे आधीं कांहीं दिवस पुण्याच्या ' रानडे इंडस्ट्रियल इन्स्टिटयूट '-मध्यें रसायनशास्त्रज्ञ म्हणून हे काम करीत होते (१९११-१२). यानंतर हे मिनेसोटा युनिव्हर्सिटींत एम्.एस्. (१९१४) व पीएच्. डी. (१९१६) झाले.

यानंतर मिनेसोटा युनिव्हर्सिटींत शेवलीन फेलो (१९१४-१५), व रीसर्च असिस्टंट (१९१५-१७) म्हणून काम केल्यानंतर, प्रथमतः मॅथिसन अल्कली वर्क्सचे रीसर्च केमिस्ट (१९१७-१८) व नंतर नायगरा अल्कली कंपनीच्या रीसर्च डिपार्टमेंटचे प्रमुख म्हणून यांनीं काम केलें. यानंतर मात्र यांनीं कन्सल्टिंग प्रॅक्टिस करण्यास सुरुवात केली. याच सुमारास हेलन ग्रेबर या अमेरिकन स्त्रीबरोबर हे विवाहबद्ध झाले.

क्लोरिन व कॉस्टिक सोडा यांच्या उपयोगासंबंधींची यांची तज्ज्ञता लक्षांत घेऊन आपल्या पुनर्रचनेच्या वेळच्या पंचवार्षिक योजनेंत प्रथम १९२८ सालीं व नंतर १९३८ सालीं सोव्हिएट रशियाच्या अधिकाऱ्यांनीं यांना आपले तज्ज्ञ व सल्लागार नेमिलें. स. १९३०-३१ सालीं ध्रांगध्रा येथील ' श्रीशक्तिअल्कलीवर्क्स 'वर टेक्निकल ॲडव्हायसर म्हणून यांची नेमणूक झाली. हे जरी मधून मधून इकडे येत असले तरी लग्न झाल्यापासून हे अमेरिकेंतच स्थायिक झाले आहेत व तेथें यांनीं तिसांपेक्षां अधिक केमिकल पेटंटस् घेतलेलीं आहेत. तेथें यांनीं प्रथम ' एरोझेन डोप सॉल्व्हंट ' व ' व्हॅट डाइज ' तयार केले व वॉर गॅसेसचा शोध लावला. हे अमेरिकन केमिस्ट सोसायटीचे व हिस्टरी ऑफ सायन्स सोसायटीचे सभासद आहेत.

स. १९४० च्या अमेरिकन पेटन्टस ऑफिसच्या परिषदेंत एक प्रमुख संशोधक म्हणून यांचा गौरव करण्यांत आला होता. त्याच वर्षी परदेशीं असूनहि अमेरिकनशास्त्रसाधनेंत अमूल्य भर घालणारा शास्त्रज्ञ म्हणून न्यूयॉर्क वर्ल्ड फेअरच्या ' हॉल ऑफ फेम 'मध्यें यांचें नांव घालण्यांत आलें. न्यूयॉर्कमधील यांच्या प्रयोगशाळेच्या स्थापनेला लेस्टर हॉफ् हैम या धनिक गृहस्थांचें साहाय्य झालें आहे. या प्रयोगशाळेनें जगाला मोठाले शोध दिले आहेत. हिंदुस्थानांतील अमेरिकन वकील व व्यापारी यांचे हे सल्लागार होते (१९२८-३२). आज अमेरिकेच्या केमिकल वॉरफेअर सर्व्हिसमध्यें हे कॅप्टनच्या हुद्यावर आहेत. हुकेरी रोडवर मोठें हॉस्पिटल चालविणारे सुप्रसिद्ध डॉक्टर यांचे सख्खे बंधु होत. यांना शास्त्राच्या इतिहासाचा छंद असून यांचें लेखनहि भरपूर आहे. यांचे कांहीं प्रसिद्ध ग्रंथ—

(1) The Antiquity of Chemical Warfare In India, (2) Discovery of Firearms and Gunpowder in Ancient India, (3) Hieroglypic Findings on the Origin of Chemistry, (4) Ancient Hindu Conception of Cosmogony.

कोकर्डेकर, लक्ष्मणराव जानराव—(जन्म १९०३-मृत्यु १९४२)

व्यायामाचे बर्लिन येथील पीएच्. डी. व राष्ट्रीय वृत्तीचे तडफदार तरुण. यांचें मूळचें आडनांव धबडगांव. कोकर्डा व त्याच्या आसपासच्या सोळा गांवांची वतनदारीची सनद पुण्याच्या पेशव्यांकडून लष्करी कामगिरीबद्दल यांच्या घराण्याला मिळाली होती. शिवाय अकोला जिल्ह्यांतील अकोटची देशमुखीहि यांच्या घराण्याकडे होती. यांचे आजोबा गंगारामपंत दोन हजार फौजेसह सेनापति तात्या टोपे यांच्या मदतीस निघाले. पण नर्मदेवरच लक्ष्मीबाई झांशीवाली पडल्याचें कळल्यावरून ते परतले. त्यामुळें इंग्रजांची यांच्या घराण्यावर अवकृपा झाली. पुढें यांचे वडील दर्यापूर तालुक्यांतील दारापुरास स्थायिक झाले व तेथेंच यांचा जन्म झाला.

हे अमरावतीस हायस्कूलमध्यें शिकत असतां यांनीं कलकत्ता जादा काँग्रेसच्या ठरावानुसार शाळा सोडली (१९२०). वऱ्हाड मध्यप्रांतांतील शाळा सोडणारे हे पहिले विद्यार्थी होत. असहकारितेचा कांहीं दिवस प्रचार केल्यावर म. गांधींचे प्रायव्हेट सेक्रेटरी यादवाड-

कर (पटवर्धन) यांच्या आजारीपणाच्या गैरहजेरींत हे साबरमती आश्रमांत गेले. तेथें चार वर्षें राहून स्नातक परीक्षेचा यांनीं अभ्यास केला. खादी व ग्रामसुधारणा यांत हे निष्णात बनले. गुजराथेंतील कांहीं गांवें पूर्ण स्वावलंबी, निष्कर्ज करण्याच्या यशस्वी प्रयोगांत यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. मलबार प्रलयनिवारण कार्यार्थ म. गांधींच्या प्रेरणेनें हे मलबारांत गेले. तेथें नारळाच्या दोराचा व्यापार संघटित करण्यास यांनीं मदत केली.

उमरावती हनुमान व्यायाम-मंडळांत यांचा प्रवेश झाला व त्या संस्थेच्या मुद्रणालयाकरितां मुद्रणकलेचें शिक्षण घेण्यास हे पुण्यास आले. तेथें अनेक चळवळींत हे भाग घेत. पुढें वऱ्हाडांत जाऊन विदर्भ युवक-परिषद डॉ. हर्डीकरांच्या अध्यक्षतेखालीं अमरावतीस भरविली (१९२८) व दुसऱ्या महायुद्धाकरितां हिंदी तरुणांनीं तयारी करण्याचा ठराव केला. पुढें फिजिकल कल्चर इन्फर्मेशन ब्यूरो काढून जगांतील व्यायाम संस्थांची माहिती आणवून यांनीं स्वतः युरोपमध्यें जाण्याचें निश्चित केलें. हनुमान व्यायाम-मंडळाची इमारत वादळानें कोसळली तिच्याकरितां दहाबारा हजार रुपये जमविले (१९२८). कलकत्ता व पुणें येथें मंडळाच्या २००।२०० खेळाडूंचीं व्यायामाचीं निदर्शनें करविलीं.

मंडळानें यांना जर्मनीस रवाना केलें. बर्लिनला हे सुमारें साडेतीन वर्षें राहिले. स. १९३० च्या गोलमेज-परिषदेस हे प्रेक्षक म्हणून मुद्दाम लंडनला उपस्थित होते. बर्लिनचा व्यायामाचा डिप्लोमा यांनीं मिळविला. 'भारतवर्षांतील धर्मानुबद्ध व्यायामपद्धति' या विषयावर निबंध लिहून डॉक्टरेट मिळविली. फिजिकल फिटनेसचा नवा फॉर्म्युला तयार करून बर्लिन ॲकॅडमीस दिला व त्यासाठीं ॲलेक्झांडर हंबोल्ट स्कॉलर्शिप मिळविली. व युरोपांतील शा. शि. विषयावरील सर्वांत उच्च डिप्लोमा संपादन केला.

पुनः परत आल्यावर गव्हर्नरच्या पेट्रनेजखालीं 'स्पोर्ट ॲंड ॲथलेटिक असोसिएशन फॉर सी. पी. ॲंड बेरार' अशी एक संस्था स्थापन करून लेख व प्रचार-द्वारा कार्य सुरू केलें.

मध्यप्रान्त कौन्सिलांतील उमेदसिंग ठाकूरांना लष्करी शिक्षणाचे बिलांबाबत यांनीं बरीच मदत केली (१९३५-३६).

नागपूर विद्यापीठानें डायरेक्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन नांवाचीं जागा उत्पन्न करून तीवर यांची नेमणूक केली. काँग्रेसनें अधिकारग्रहण केलें तेव्हां यांना व्यायामाचे चीफ ऑर्गनायझर नेमलें; पण काँग्रेसनें अधिकारन्यास केल्यावर हे नागपूर विद्यापीठाकडे आले. युद्धांतहि प्रत्यक्ष भाग घेण्याची त्यांची इच्छा होती. तसा प्रयत्नहि चालू होता. पण एकाएकीं मोटारचा धक्का लागून हा कर्तबगार व धडाडीचा पुरुष मृत्युमुखीं पडला.

कोटणीस, डॉ. द्वारकानाथ एस्.— (जन्म स. १९१२, मृत्यु स. १९४२ चीन) चीनच्या स्वातंत्र्य-युद्धास मदत करण्यास गेलेल्या काँग्रेस मेडिकल मिशनचे सदस्य.

हे मूळ सोलापूरचे. मुंबईच्या ग्रँड मेडिकल कॉलेजमधून एम्. बी. बी. एस्. होतांच यांनीं काँग्रेस मिशनच्या-बरोबर चीनला जाण्याचें ठरविलें. स्पेनच्या रणांगणावर जाऊन अनुभव घेऊन आलेले डॉ. अतल यांचे पुढारी होते. डॉ. जीवराज मेहेता व डॉ. विधनचंद्र रॉय यांनीं परीक्षा करून नागपूरचे डॉ. एम्. चोळकर, कलकत्त्याचे डी. मुकर्जी, विजयकुमार बसू व हे यांची निवड केली. मुंबईस सरोजिनी नायडू यांच्या अध्यक्षतेखालीं निरोप-समारंभ होऊन हे मुंबईहून रवाना झाले. चीनला पोंचतांच यांना यांच्या वडिलांच्या मृत्यूची बातमी कळली. यांचे वडील गिरणींत कारकून असून त्यांनीं यांना कर्ज काढून शिक्षणाला मदत केली होती. मुलगा कर्ज फेडण्यास मदत करण्याऐवजीं चीनला मदत करण्यास गेला असें पाहून वैतागानें यांच्या वडिलांनीं आत्महत्त्या केली होती. वडिलांच्या मृत्यूपेक्षां मृत्यूच्या या पार्श्वभूमीनें हे अगदीं वेडे होण्याच्या बेताला आले. पण यांनीं संयम करून आपलें अंगीकृत कार्य करण्याला सुरुवात केली.

येनानपासून १५ मैलांवर एक हॉस्पिटल चालविण्याची कामगिरी यांच्यावर प्रथमतः सोंपविण्यांत आली. तेथें दोनशें खाटा असल्यामुळें यांना व डॉ. बसू यांना भरपूर काम पडे. डॉ. अतल देखरेख करीत. डॉ. चोळकर व मुकर्जी ८० मैलांवर असलेल्या एका मेडिकल कॉलेज-मध्यें शिकवीत. तेथील भयंकर थंडीमुळें चोळकर एक वर्षाची आश्वासित मुदत संपतांच हिंदुस्थानला परतले. मुकर्जी स्वतःच्या किडनी ऑपरेशनकरितां हाँककाँगला गेले. दुसरें महायुद्ध सुरू झाल्यानें ते हिंदुस्थानाकडे वळले व रंगूनला पकडले गेले.

यानंतर हे चुंकिंगवरून ब्युसिंगला निघाले. लढाईच्या धांदलीनें कसे तरी तेथें पोंचून अनेक खेड्यांच्या एका केंद्रावर हे काम करूं लागले. रोज मध्यवर्ती ठिका-

णाची व्यवस्था पाहून किती तरी खेड्यांत यांना पायपीट करावी लागे. डॉ. अतल तर या त्रासाला कंटाळून हिंदुस्थानला रवाना झाले (मार्च १९४०). हे व बसू मात्र मिशनरी वृत्तीनें चिनी लोकांची सेवा करीत सारखें काम करीत राहिले.

यानंतर प्युपिंगला डॉ. बेथ्यून यांचे स्मरणार्थ स्थापन झालेल्या हॉस्पिटल व मेडिकल स्कूलचे यांना मुख्य नेमण्यांत आलें. शस्त्रक्रिया करण्याचें काम यांच्याकडे असे. रोज दोन याप्रमाणें यांनीं शस्त्रक्रिया केल्या. जपानी हल्ले दहशतीकरितां चालूच असत. त्यांत बसू व हे अलग झाले व धांवपळींत यांचे फार हाल होऊं लागले. याच वेळीं यांनीं 'कुओचिंग लान' नांवाच्या चिनी स्त्रीशीं लग्न केलें. ती यांच्या तेथें नर्सचें काम करीत असे (१९४१ नवं.).

याच वेळीं यांना अपस्माराचे झटके येऊं लागले. आपल्या स्त्रीपासून ही गोष्ट हे लपवीत. त्याकरितां झटक्याची कल्पना येतांच हे जवळच्या एका टेंकडीवर जाऊन बसत. शेवटीं निःसत्त्व अन्न व श्रमातिरेक यांमुळें यांना कों-कुंग या उत्तर चीनमधील एका लहानशा खेड्यांत मृत्यूनें गांठलें आणि या देशभक्त तरुणाचा अकालीं अंत झाला. यांना चिनी भाषा उत्तम अवगत झाली असून तेथील लोकांचा यांनीं कमालीचा विश्वास संपादन केला होता.

अपुऱ्या वैद्यकीय साधनांनीं यांनीं नेलेल्या मिशननें केलेल्या कार्यापेक्षां त्यामागें असणाऱ्या भावनेला विशेष महत्त्व आहे. स्वतः पारतंत्र्यांत असतांना जगाच्या कोणत्याहि भागांत स्वातंत्र्यावर घाला येतांच धांवून जाणाऱ्या हिंदुस्थानच्या विशाल हृदयाचें प्रतीक या दृष्टीनें आपण यांच्या कार्याकडे पाहिलें पाहिजे.

कोट्टूर, रावसाहेब जी. एल्.— (जन्म स. १८८७ सुमार, मृत्यु स. १९३९) कापसाचे सुप्रसिद्ध संशोधक. हे माध्ववैष्णव ब्राह्मण. पूना ॲग्रिकल्चरल कॉलेजमधून शिक्षण घेऊन बी.एजी. झाल्यावर स. १९०९ सालीं यांचा प्रवेश शेतकीखात्यांत झाला. दहा वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानंतर यांना धारवाड येथें कर्नाटक प्रान्ताचे कापसाच्या बियांचे संशोधक नेमण्यांत आलें. सतत अठरा वर्षे या विषयाचें यांनीं अत्यंत कसोशीनें संशोधनकार्य केलें, आणि त्यावर एम्. एजी. ही पदवी यांना मिळाली. या कार्याबरोबरच यांनीं ज्वारी व भुईमूग या पिकांच्या बियांच्या सुधारणेबाबतहि महत्त्वाचें कार्य केलें. पिकांच्या सुधारणेबाबत आधुनिक जननशास्त्राचा उपयोग करण्याचा प्रारंभ करण्याचें श्रेय यांना आहे. पूर्वोक्त प्रकारें कापसाचें बीं सुधारण्याबाबतचें यांचें कार्य अत्यंत महत्त्वाचें आहे. यांनीं धारवाडच्या बाजूस पेरल्या जाणाऱ्या कुमठा नांवाच्या जातीमधून धारवाड नं. १ व धारवाड नं. २ हे सुधारलेले कापसाचे वाण निष्पन्न करून त्यांना शेतींत स्थान दिलें. त्याचप्रमाणें त्याच भागांत असलेल्या धारवाड अमेरिकन नांवाच्या कापसाच्या जातींमधून गदग नं. १ या नांवाचा एक कापसाचा वाणहि निष्पादन करून तो कर्नाटकच्या शेतींत कायम केला. यापुढें विशेषतः कापसाच्या झाडाला 'सुकारा' नांवाचा जो एक रोग कर्नाटकांत पुष्कळ प्रमाणांत होत असे त्याचा त्रास मिटविण्याकरितां यांनीं कापसाच्या दोन भिन्न वर्णाचा संकर करून त्यापासून 'जयवंत' नांवाच्या एका नव्या कापसाच्या जातीची निष्पत्ति केली. त्याहि पुढें जाऊन 'नवा जयवंत' या नांवानें आणखी एक सुधारलेला कापसाचा वाण यांनीं तयार केला असून या दोन नव्या वाणांना कापसाच्या सुकाण्याचा रोग अगदींच विरळा होतो. हे वाण कर्नाटकांत तूर्त समृद्धपणें पसरविण्याची योजना सरकारनें केली आहे, व त्या योगानें तेथील शेतकऱ्यांचा पुष्कळ फायदा झाला आहे. यांचें या संशोधनाबद्दल शास्त्रीय निबंधलेखन पुष्कळ आहे, व त्यांच्या कामगिरीला याप्रमाणें सैद्धांतिक व उपयुक्त अशा दोन्ही प्रकारचें जें स्वरूप आहे तें प्रत्येकीं अत्यंत उच्च दर्जाचें मानण्याच्या किंमतीचें आहे. दुर्दैवानें यांना अकाल मृत्यु आला नसता तर यांची कामगिरी उत्तरोत्तर जास्तजास्तच संस्मरणीय झाली असती.

कोट्याळकर, बर्माप्पा रामाप्पा—(जन्म स. १८९२–मृत्यु स. १९४२) प्रसिद्ध चित्रकार व मूर्तिकार. यांचें गांव औंध संस्थानांतील गुणदाळ तालुक्यांतील कोट्याळ. शिक्षण आजोळीं मनगुळी येथें कानडी तीनचार इयत्तांपर्यंत झालें. लहानपणापासूनच चित्रें काढण्याचा आणि मूर्ति करण्याचा यांना नाद होता. हे जातीनें लिंगायत कुंभार.

हे कुंभार असल्यानें यांना मातकामाचें बाळकडू होतें. त्यामुळें क्ले-मॉडेलिंगमध्यें यांचा हातखंडा असे. हांहां म्हणतां बोटानें व हातानें हे शाडूच्या अगर मातीच्या सुंदर मूर्ति तयार करीत. त्याप्रमाणें पेंटिंग्ज करण्यांतहि ते अत्यंत वाकबगार होते.

सोलापूरच्या श्री. जिगे वगैरेंच्या आश्रयानें चित्रें

करीत, पडदे रंगवीत व यात्रेंतील हालत्या चित्रांचीं प्रदर्शनें हे भरवीत.

श्रीमंत राजेसाहेब भवानराव पंतप्रतिनिधि, औंध, यांच्या आश्रयास हे आले. तेथें गणपति, रामपंचायतन, महिषासुरमर्दिनी वगैरे चित्रें यांनीं काढलीं (१९१९). नंतर सोलापूरला पुनः गेले. तेथून पुनः आपण होऊन औंधास आले (स. १९२९).

चित्रकार या नात्यानें यांची योग्यता मोठी आहे. यांचें चित्रांतील प्रमाण व भावनालेखन अप्रतिम असे. पेन्सिल स्केच अत्यंत जोमदार असे. यांचीं पेन्सिल स्केचेस पेन्टिंग्जपेक्षांहि जोमदार आहेत.

यांचें सर्व काम मॉडेलशिवाय स्मरणावर चाले. कोणत्याहि प्रसंगाची यांना थोडक्यांत तोंडी कल्पना दिली कीं, प्रतिभेनें हे यथातथ्य चित्रण करीत. एकेका चित्रांत पन्नासपन्नास व्यक्ती चित्रीत असत.

यांची पेंटिंग्जची पद्धति जुनी असली तरी पेंटिंग्जमध्यें यांनीं नव्या तंत्राचा अवलंब केला होता. यांचें पॅचवर्कहि चांगलें असे.

चित्रकार धुरंधरांच्याप्रमाणें यांची मानवसृष्टि स्वतंत्र आहे. व्यक्तींच्या चेहऱ्यांत कानडी धर्तीचा सारखेपणा असतो. पण तज्ज्ञांचे मतें हा दोष नसून गुणच आहे.

यांचीं फुटकळ चित्रें बरींच आहेत. श्रीमंतांच्या आज्ञेवरून गोतेंतील विभूतियोगाचीं ४४ चित्रें, तसेंच गजगौरीव्रताचीं ९-१० चित्रें यांनीं काढलीं. दिल्लीतील हिंदुमहासभेच्या दिवाणखान्यांतील श्रीशिवाजीमहाराजांचें चित्र व श्रीमंतांचा पोर्ट्रेट हीं उत्कृष्ट साधलीं आहेत. औंध येथील म्युझियममध्यें यांचीं पुष्कळ उत्कृष्ट चित्रें पाहावयास मिळतात.

कोयाजी, सर जहांगीर कुंवरजी—(जन्म स. १८७५) सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ.

कॉलेज व व्यवहार या दोन्ही क्षेत्रांत सारख्याच सफाईपणानें यश मिळविणारे एक अर्थशास्त्री, हा यांचा विशेष आहे. मुंबई युनिव्हर्सिटीची बी. ए. पदवी मिळवून व त्या विद्यापीठाच्या कांहीं कॉलेजांतून प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर हे उच्च शिक्षणाकरितां केंब्रिजला रवाना झाले. त्या ठिकाणीं अर्थशास्त्र हा मुख्य विषय घेऊन हे केंब्रिजचा उच्च परीक्षा पास झाले (१९१०). यानंतर बरींच वर्षें हे कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें अर्थशास्त्राचे प्रोफेसर होते (१९११-३०). यानंतर लीग ऑफ नेशन्समध्यें हिंदी प्रतिनिधी म्हणून यांची नेमणूक झाली. या ठिकाणींच आर्थिक घसरगुंडीच्या अध्ययनाचा पुरस्कार करणारा ठराव यांनीं पास करून घेतला. प्रो. ओहलीन यांच्या "दि कोर्स अँड फेझेस ऑफ दि वर्ल्ड इकॉनमिक डिप्रेशन" या सुप्रसिद्ध रिपोर्टाचें जनकत्व आपणांस यांच्या या ठरावासच दिलें पाहिजे.

कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें प्रोफेसर असतांनाच प्रथम 'इंडियन फिस्कल कमिशन' व नंतर 'रॉयल कमिशन ऑन् इंडियन करन्सी अँड एक्स्चेंज'चे यांना सभासद निवडण्यांत आलें.

पाटणा व मद्रास युनिव्हर्सिटीमधील बनाइली व सर विल्यम मेयर व्याख्यानमालांचे व्याख्याते म्हणून यांना बोलावण्यांत आलें होतें.

१९३१ त प्रेसिडेन्सी कॉलेजच्या प्रिन्सिपलच्या जागेवरून निवृत्त झाल्यानंतर कांहीं काळ हे आंध्र युनिव्हर्सिटी आर्ट्स् कॉलेजमध्यें प्रिन्सिपल व अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून काम करीत होते (१९३२-३५).

लाहोर येथें भरलेल्या इंडियन इकॉनमिक कॉन्फरन्सच्या सहाव्या अधिवेशनाचें अध्यक्षस्थान यांना देण्यांत आलें होतें. यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय 'डिस्क्रिमिनेटिंग प्रोटेक्शन फॉर इंडिया' हा होता. हिंदी आर्थिक धोरण व चलन यांमधील सर्व हिंदी अर्थशास्त्रज्ञांतील ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध असणारे हे गृहस्थ आहेत.

'The Indian Fiscal Problem', 'Indian Currency and Exchange', 'The Indian Currency System', 'India and the League of Nations', 'The Economic Depression', 'Studies in the Shahnameh' हे यांचे ग्रंथ त्या त्या विषयांत प्रमाणभूत मानले जातात.

कोरेकल, कविसम्राट् यशवंतराव—(जन्म स. १८८५)

सुप्रसिद्ध मराठी व उर्दू कवि. यांचा जन्म हैद्राबाद येथें झाला. एक वर्षाच्या आंत आईबाप निवर्तल्यानें चुलत भावानें यांना वाढविलें. त्या काळच्या मानानें व संस्थानांतल्या वातावरणाप्रमाणें उर्दू, फारशी व इंग्रजी भाषांचें ज्ञान बेतानें संपादन केल्यावर हे वयाच्या तेरावे वर्षी कचेरींत उमेदवार म्हणून लागले. यांचा

विपुल असणारा वाङ्मयसंसार सरकारी नोकरी करीत असतांच वाढलेला आहे.

प्रथम हे उर्दू कविता करीत व त्यामुळें यांची प्रसिद्धिहि चांगली झाली. पण पुढें यांनीं मराठींत कविता करण्याचा प्रघात सुरू केला. वृत्तांचा यांचा अभ्यास फारच सूक्ष्म आहे. याशिवाय गायन, वादन, कातरकाम वगैरे अनेक कलांचा यांचा सूक्ष्म अभ्यास आहे.

यांना सकलकलाकोविद, काव्यकौस्तुभ, वृत्तसम्राट् वगैरे पदव्या आहेत. यांची कविता विपुल असून तिच्यावर प्राचीन कवितांची बरीच छाप आहे.

यांचें वाङ्मयः—मराठी–१ काव्यकुसुमकलिका (४ भाग), २ विरोधवैचित्र्य नाटक वगैरे. हिंदी–१ कौस्तुभ-किरण (लघुकथा-निबंध), २ हिंदी गद्य, ३ हिंदी कविता. उर्दू–१ कलामे नुसरत (दीवान-कवितासंग्रह), २ मकसदेहयात ऊर्फ इस्तियाके-ताअलीम (संगीत नाटक अंक ३), ३ करिष्मैइष्क (नाटक).

कोलब्रुक, हेन्री टॉमस—(जन्म स. १७६५–मृत्यु स. १८३६) हिंदी इतिहास-संशोधनशास्त्राचे जनक व हिंदुस्थानचे इंग्रज मित्र.

हिंदुस्थानांतील यांच्या राजकीय हालचालीचें महत्त्व-मापन 'मध्ययुगीन चरित्रकोशांत' (पान २७७) करण्यांत आलें आहे.

यांच्या वडिलांचें नांव सर जॉर्ज कोलब्रुक. पुढें संस्कृत वाङ्मयाचे कट्टर अभिमानी बनलेले हे गृहस्थ, सुरुवातीला हिंदुस्थान, त्याची संस्कृति व भाषा यांसंबंधीं अत्यंत प्रतिकूल असत. चार्लस् विल्कीन्सला 'संस्कृत-वेडा' हें यांनीं केलेलें पदवीदान, एशियॅटिक मिसलेनीला 'मूर्खपणाचा बाजार' हें यांनीं दिलेलें नामाभिधान किंवा अकबराच्या राजवाड्याला 'एखादें बारीकसारीक रत्न जेथें सांपडेल असा उकीरडा' हें यांनीं दिलेलें शेलापागोटें ऐकून कोणालाहि हंसूंच येईल.

परंतु संस्कृत वाङ्मयाशीं जोंपर्यंत यांचा साक्षात् संबंध आला नव्हता तोंपर्यंत यांचे हे विचार तग धरून होते. हिंदु लोक व संस्कृत भाषा यांसंबंधी यांना खरेंखुरें आकर्षण वाटूं लागलें, पर्मनन्ट सेटलमेंट प्रश्नावर यांचेकडे बरींच शिष्टमंडळें आलीं त्या वेळीं. यानंतर यांनीं बरेंच हिंडून त्या वेळीं आपणास विशेष जाणवलेल्या गोष्टी Agriculture of Bengal या पुस्तकांत नमूद करून ठेवल्या. इंग्लिश चढाओढ व कच्चा कापसाची निर्यात यांमुळें बंगालमधील गरीब हातमागवाल्यांचें कसें नुकसान होत आहे याचें विदारक वर्णन या पुस्तकांत करण्यांत आलें आहे. कच्चा कापसापेक्षां सुताचे स्वरूपांत कापूस पाठविण्याची यांनीं केलेली सूचनाहि अशीच महत्त्वाची आहे.

यांच्या संस्कृत ज्ञानाचा पहिला उपयोग यांनीं 'Digest of Hindu Law' या ग्रंथाचें संस्कृतमधून भाषांतर करते वेळीं केला. पुढें कलकत्त्यास चीफ जज्ज झाल्यानंतर यांनीं फोर्ट विल्यम कॉलेजमधील विद्यार्थ्यां-करितां 'संस्कृत ग्रामर', 'संस्कृत डिक्शनरी', 'हितोपदेश' व 'अमरकोश' (१८०८) प्रसिद्ध केले. त्याचप्रमाणें दायविभागावरील दोन सुप्रसिद्ध टीकांचें यांनीं भाषांतर प्रसिद्ध केलें. परंतु केवळ भाषांतरानें काम भागत नाहीं असें लक्षांत येतांच, जीमूतवाहन व मिताक्षरा या दोहोंचा आधार घेऊन यांनीं आपला स्वतंत्र ग्रंथ प्रसिद्ध केला. मृत्यूपूर्वी आपला दहा हजार पौंड किंमतीचा ग्रंथसंग्रह यांनीं ईस्ट इंडिया कंपनीला देऊन टाकला.

पहिल्या दर्जाचे प्राच्यविद्यापंडित अशी यांची कीर्ति आहे. 'संस्कृतचे उत्कृष्ट पंडित ही यांची कीर्ति यांच्या Miscellaneous Essays (२ भाग) या ग्रंथामुळें झाली. आपल्या आजच्या ऐतिहासिक ज्ञानाच्या किंवा याच्या परंपरेतील पुढील दुव्यांनीं इतिहासांत घातलेल्या प्रचंड भरीच्या निकषावर जर आपण यांचें कर्तृत्व ताडून पाहूं लागलों तर ती थोडीशी दिशाभूल होईल. प्रत्यक्ष पाश्चात्य पंडितांत ज्या वेळीं वाङ्मयीन परीक्षण हा भाग अज्ञात होता त्या वेळीं हिंदी धार्मिक विचार-प्रवाह व तत्त्वज्ञान यांचें अत्यंत प्रमाणभूत व अचूक परीक्षण करण्याचें कार्य यांनीं केलें आहे. यांच्या Miscellaneous Essays या ग्रंथाचें पाहिल्यास कोणत्याहि एकाच विषयाला हे चिकटून राहिले आहेत असें नाहीं. ज्योतिष, कायदा, गणित यांचें हे जितक्या भेदकपणें विवरण करतात तीच तर्कशुद्धता भाषाशास्त्राची चर्चा करतांना प्रकट होते.

या गोष्टीची जाणीव फ्रेंच लेखकांना सुद्धां झालेली आहे. संस्कृत भाषा व तदनुषंगिक इतर शास्त्रें यांवर इतके सुंदर ग्रंथ जर यांनीं लिहिले नसते तर हा फारच मोठा कालखंड पाश्चात्य जगाला अज्ञात राहिला असता, ही गोष्ट आतां सर्वत्र मान्यता पावली आहे.

सांख्य, न्याय, वैशेषिक, मीमांसा व वेदान्तशास्त्रांचा केवळ युरोपियन जनतेला परिचय करून देण्यांतच यांचें समाधान झालें नाहीं. हिंदुस्थानांतील अनेक पंथोपपंथांचें उत्कृष्ट विवरण यांनींच प्रथम मोठ्या प्रमाणावर केलें. अशा प्रकारचें कार्य अलीकडे डॉ. भांडारकरांनीं केलें. हे व कर्नल मॅकेन्झी यांचेमुळेंच जैन धर्माची उत्पत्ति व तत्त्वें यांचें संशोधन झालें. हिंदुस्थानांतील अतिशय जुना धर्मपंथ ही पदवी हे दोन संशोधक व बुल्हेर, जॅकोबी व होर्नल या यांच्या परंपरेतील मंडळी यांचेमुळेंच जैनधर्माला प्राप्त झाली.

याच कारणामुळें यांनीं जे जे निबंध लिहिले, ते सर्व त्या त्या शास्त्रांत प्रमाणभूत मानण्या इतपत महत्त्वाचे मानले जातात. वेदावर यांनीं लिहिलेला निबंध (१८०५) हा हिंदूंच्या पवित्र ग्रंथांचा पाश्चात्य जगाला परिचय करून देण्याचा पहिलाच प्रयत्न आहे. परंतु वेदाच्या अभ्यासकाला अनुवादकापेक्षां अधिक किंमत मिळणें शक्य नाहीं, या यांच्या सदोष विधानामुळें यांचें हें संशोधन जरा डागळलें गेलें.

याचप्रमाणें हिंदु बीजगणित, अंकगणित, भूमिति व ज्योतिष यांचा सखोल अध्ययन करणारे हे पहिले युरोपियन गृहस्थ असून संस्कृतशीं घनिष्ठ संबंध ठेवून इतक्या आत्मविश्वासानें या शास्त्राकडे पाहणारे हे शेवटचेच गृहस्थ आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं, आणि म्हणूनच हिंदूंच्या बीजगणितावरील यांनीं केलेल्या विवरणास (१८१७) एक विशिष्ट महत्त्व आहे. ज्या वेळीं पाश्चात्य लोक अरब व ग्रीक लोकांचेपासून गणिताच्या बाराखड्या शिकत होते त्या वेळीं हिंदी लोक आपल्या गणिती ज्ञानाचे उच्च शिखरावर होते, हीच गोष्ट यामध्यें सिद्ध करण्यांत आली आहे. या सर्व विधानांसाठीं यांनीं भास्कराचार्यांच्या लीलावतीचा व बीजगणिताचा आधार घेतला आहे. भास्कराचार्यांच्या या दोन पुस्तकांचा व ब्रह्मगुप्ताच्या स्फुटसिद्धान्ताच्या १२ व्या व १८ व्या प्रकरणाचा अनुवाद यांनीं केलेला आहे.

याचेच बरोबर एशियॅटिक रीसर्चमध्यें सती जाण्याच्या मधील खऱ्या भावना प्रकट करणारा खऱ्या हिंदु विधवेच्या कर्तव्यावरील एक निबंध यांनीं प्रसिद्ध केला होता (१७९५). सतीचा प्रकार त्या वेळीं कायद्यानें बंद केला जात असतांना यांनीं सतीचें गुणग्रहण करण्यांत दाखविलेलें धैर्य विशेष आहे.

याच वेळीं यांनीं हिंदु-विशेषतः ब्राह्मणवर्गाच्या धार्मिक आचारांवर व समारंभांवर तीन निबंध लिहिले (१७९५-१८०१). तसेंच चार्वाक, लोकायतिक, माहेश्वर, पाशुपत, पांचरात्र व भागवत या संप्रदायांसंबंधीं यांनीं प्रसृत केलेली माहितीहि अशीच महत्त्वाची आहे. 'Observations on the Sect of Jains' या निबंधांत यांनीं ग्रीक इतिहासाचा आधार घेऊन बुद्धधर्मापेक्षां जैनधर्म अधिक प्राचीन आहे, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

दक्षिण बिहार, दिल्ली यांसारख्या ठिकाणच्या लेण्यांचें वर्णन व मूल्यमापन करण्याकरितां यांनीं पांच निबंध लिहिले आहेत. Indian and Arabian Division of Zodiac and Hindu Astronomy हा यांचा ज्योतिषशास्त्रावरील निबंधहि महत्त्वाचा आहे. बंगाल रॉयल एशियॅटिक सोसायटीचे अध्यक्ष व रॉयल एशियॅटिक सोसायटीचे डायरेक्टर या नात्यानें यांनीं बजावलेली कामगिरीहि महत्त्वाची आहे,

कोल्हटकर, अच्युत बळवंत— (जन्म स. १८७९–मृत्यु स. १९३१) मराठींतील विशेष पद्धतीच्या लेखनशैलीचे जनक, लोकप्रिय वर्तमानपत्रकार व चतुरस्र वाङ्मयसेवक.

यांचे चुलते बळवंतराव व पिते वामनराव. बळवंतरावांनीं यांचें पालनपोषण केलें. म्हणून हे आपणास अच्युत बळवंत म्हणवीत. पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्यें असतांनाच यांनीं नाटकें व खेळ यांवर एक मोठा प्रबंध लिहिला होता. हे बी. ए., एलएल. बी. झाले व यांनीं नागपूर येथें वकिलीला सुरुवात केली. प्रथम हे 'शुभसूचक' साप्ताहिकांत लिहीत (१९०६); पण पुढें नागपूरला गेल्यावर यांनीं आपल्या चुलतभावास बोलावून घेऊन एक छापखाना व 'देशसेवक' पत्र सुरू केलें (१९०७). नागपूरला बोलावलेल्या काँग्रेसचा अध्यक्ष कोण असावा असा त्या वेळीं प्रश्न होता. हे लो. टिळकांच्या जहाल पक्षाचे होते. यांच्या लिहिण्याचा परिणाम म्हणून यांना राजद्रोहाच्या आरोपावरून अडीच वर्षांची शिक्षा झाली. तुरुंगांत यांचे अत्यंत हाल झाले व पत्र बंद पडलें. देशांतील वातावरण सरकारी दडपशाहीनें इतकें बदललें कीं, बाहेर आल्यावर यांना काय करावें हें सुचेना. यांनीं मद्रासला एका पेढीवर नोकरी पत्करली. पण लवकरच मुंबईचा आश्रय करून चार भाषांत वेदांचें भाषांतर करण्याची घोषणा करून 'श्रुतिबोध' नांवाचें मासिक

सुरू केलें. आणि त्यांत ऋग्वेदाचें भाषान्तर आरंभिलें. त्या कामीं श्री. दत्तो अप्पाजी तुळजापूरकर व रामचंद्र विनायक पटवर्धन हे यांचे सहकारी होते. तथापि ऋग्वेदाचें भाषान्तर पुरें होण्यापूर्वीच हा प्रचंड उद्योग सोडून हे आपल्या वृत्तपत्रव्यवसायाच्या दैनंदिन धबडग्यांत तन्मय झाले. त्या क्षेत्रांत मात्र एक यशस्वी संपादक म्हणून यांचें नांव चिरंतन टिकण्यासारखें आहे. यांचें लेखन कल्पकता व भावना यांनीं ओथंबलेलें असल्यामुळें बहुजनसमाजाचे हे लवकरच अत्यंत आवडते बनले.

वृत्तापेक्षां मताकडे यांचा ओढा असे. त्यामुळें उपरोध, उपहास व विरोध यांचा एकदां यांच्या लालित्यपूर्ण लेखणींतून वर्षाव सुरू झाला कीं प्रतिपक्षाची समता टिकणें अशक्य, त्याप्रमाणेंच स्वकीयांना आनंदाच्या उकळ्या आल्याशिवाय कधींहि राहावयाच्या नाहींत. बहुजनसमाजाला तर आपल्या आकर्षक पण सुलभ लिहिण्यानें यांनीं वर्तमानपत्रें वाचावयास शिकविलें असें म्हणण्यांत बिलकुल अतिशयोक्ति नाहीं. मराठींतील सध्यांच्या ललित पण सुलभ, विविध प्रकारच्या लेखनशैलीचे हे आद्य प्रवर्तक होत. मात्र कवीप्रमाणें अशा प्रकारचे आकर्षक लिहिणारे निरंकुश असतात. व त्या दृष्टीनें अशा लेखकांचे लेख तर्ककर्कश बुद्धीनें तपासावयाचे नसतात. १९१५-३१ पर्यंत यांनीं किती तरी वर्तमानपत्रें काढलीं आणि किती तरी बंद पडलीं. एका वेळीं यांचीं दोन दोन तीन तीन सुद्धां पत्रें चालू असत. शिवाय नाटकें-कादंबऱ्या लिहिणें, नाटक मंडळ्या काढणें, नाटक मंडळ्यांत स्वतः काम करणें चालूच असे. मात्र यांच्या या अफाट व अचाट कर्तृत्वाला अर्थशास्त्राचा आधार नसल्यानें यांचें आयुष्य द्रव्यदृष्टीनें अपेशी ठरल्यास त्यांत आश्चर्य कसलें? शेवटीं तर यांनीं आपल्या कुशल लेखणीचा स्वकीयांवरहि वार केल्यानें हे अगदींच असहाय झाले. यांनीं काढलेलीं दैनिकें: १ संदेश (१९१५-२१), २ मेसेज, इंग्रजी (१९१७), ३ संजय (१९१८), ४ इंदुप्रकाश (लेखक १९२१), ५ वंदे मातरम् (लेखक १९२२), ६ संदेश (१९२३), ७ स्वातंत्र्य (लेखक १९२४), ८ संदेश (१९२८-३०), ९ राष्ट्रमत (१९२९) १० दैनिक वृत्त (लेखक १९३०), ११ डेली न्यूज (लेखक १९३०), १२ प्रभात (लेखक १९२९-३१). साप्ताहिकें: १ शुभसूचक (लेखक १९०६), २ देशसेवक (१९०७-८), ३ सुदर्शन (लेखक १९२१-२२), ४ टिळक (लेखक १९२२), ५ युगान्तर (१९२४), ६ चाबूक (लेखक १९२४), ७ रणसंग्राम (लेखक १९२४) ८ विदूषक (१९२६), ९ चाबुकस्वार (१९२५-२७), १० संदेश (१९२७). मासिकें: १ श्रुतिबोध (जुलै १९१२-१५सप्टें.), २ उषा (१९१३), ३ महाराष्ट्र मंगलमाला (१९३०). नाटकें: १ विवेकानंद, २ नारिंगीनिशाण, ३ ताई तेलीण (अप्रसिद्ध), ४ बट्ट्याबोळ (अप्र.), ५ देवी अहिल्या (अप्र.), ६ तिनें काय सांगितलें (अप्र.), ७ सौख्यसोपान, ८ मस्तानी, ९ नूतनचंद्र (अप्र.), १० इश्श मेलं पुणें (अपूर्ण व अप्र.). कादंबऱ्या: १ इंग्रजांचा पराभव, २ लोकमान्यांच्या समाधीपुढें, ३ साधु कीं सैतान (अपूर्ण), ४ चोरून चुंबन (अपूर्ण), ५ नर्सची करुण कहाणी (अपूर्ण). गोष्टी: १ पहिली रात्र, २ दुसरी रात्र, ३ विसकटलेली वेणी, ४ रंगीला रसूल (सरकार जप्त), ५ कोल्हापूरच्या अक्कासाहेब, ६ गुलाबी विधवा, ७ भोळा सांब. ग्रंथ: १ चोरी कशी करावी? २ संक्रान्तीचा तिळगुळ म्ह. सर्वधर्म परिषद, ३ सौ. वत्सलाबाईंचीं पत्रें, ४ भगतसिंगाचें चरित्र (सरकार जमा), ५ बाबू गेनू चरित्र, ६ नाना फरारीचा पवाडा (सरकार जमा). प्रस्तावना: १ सम्राट् अशोक, २ भस्मासुर, ३ दर्यादौलत, ४ जेधे-जवळकर. लेख-१ चित्रमय जगत्, २ मनोरंजन, ३ मौज, ४ करमणूक, ५ प्रभात, ६ मनोरमा. कविता: १ मत्कुण, २ कैवारी, ३ गणेशपुराण ओव्या.

कोल्हटकर, श्रीपाद कृष्ण—(जन्म स. १८७१-मृत्यु स. १९३४) मराठींतील सुप्रसिद्ध विनोदी लेखक, नाटककार, टीकाकार व चतुरस्र लेखक.

यांचा जन्म नागपुरांत आणि बालपण बुलढाणा व अकोला येथें गेलें. लहानपणीं हे बावळट व अर्धवट म्हणून समजले जात. त्यामुळें हे एकान्तप्रिय बनले. मराठी पांचव्या इयत्तेंत असतांनाच यांनीं एक तीन अंकी संगीत नाटक लिहिलें, व इंग्रजी पांचव्या इयत्तेंत असतां 'सुखमालिका' नांवाचें नाटक लिहिलें. पण तें पुढें गहाळ झालें. त्या नाटकांतील कांहीं कल्पनांचा पुढें गुप्तमंजूष व प्रेमशोधन या नाटकांत यांनीं उपयोग करून घेतला.

यांना व्हर्नाक्युलर एक्झॅमिनेशनमध्यें पहिला नंबर येऊन द. म. १० रु. चीं शिष्यवृत्ति मिळाली. तेव्हां आत्मविश्वास वाढून यांनीं इंग्रजी कादंबऱ्या व मराठींतील अरेबियन नाइटस् व निबंधमाला वाचण्याचा सपाटा लावला. स्कॉटच्या कादंबऱ्यांनीं बाणेदारपणा व स्त्रीदाक्षिण्य अंगीं येतें असें यांचें म्हणणें होतें.

अरेबियन नाइटस् व निबंधमाला यांची कल्पना व

स्फूर्ति या दृष्टीनें यांना उपयोग झाला. हे मॅट्रिक होऊन डेक्कन कॉलेजांत दाखल झाले (१८८८). स. १८९१ सालीं बी. ए. झाल्यानंतर स. १८९७ सालीं एल्एल्. बी. झाले. मधल्या कालावधींत 'विक्रमशशिकला' व 'शापसंभ्रम' या नाटकांवरील यांची टीका विशेष गाजली. यांत 'नाटक व नीति हे परस्पर-विरोधी शब्द होत' अशी जी समजूत चांगल्या लोकांतहि होत चालली होती तिला यांनीं आळा घातला. व त्याबरोबरच टीकालेखाचा अगदीं नवा प्रकार यांनीं सुरू केला.

यांच्या टीकालेखांत यांच्या मार्मिक अवलोकनाचा चांगला प्रत्यय येतो. यांचे लेख त्या त्या विषयाचें सखोल ज्ञान मिळविण्यास त्या त्या विषयावरील इतर ग्रंथांपेक्षां नेमकें ज्ञान देणारे म्हणून अधिक उपयुक्त वाटतात. भेदक बुद्धीनें सूक्ष्मसूक्ष्म विषयांचे पदर त्यांत सोदाहरण उलगडून दाखविलेले पाहून वाचकांच्या शुद्ध शास्त्रीय ज्ञानांत भर पडून ते लेखकास धन्यवाद देतात.

यानंतर यांचें 'वीरतनय' हें पुढें अत्यंत लोकप्रिय झालेलें नाटक किर्लोस्कर मंडळीनें प्रयोग करून पुढें आणिलें. त्यांत शृंगार मर्यादित असून त्याला वीररसाची जोड देण्यांत आली. या नाटकावर झालेल्या अनेक टीकांना 'वीरतनयाची ढाल' म्हणून वि. ज्ञा. विस्तारांत उत्कृष्ट व सडेतोड लेख लिहून यांनीं उत्तर दिलें.

यानंतर प्रथम अकोला (१८९८), नंतर तेल्हारा येथें पांच वर्षें राहून, पुढें तेथील कोर्ट उठून खामगांवीं गेल्यानें, हे तिकडे गेले (१९०५). पुढें जळगांव जामोद येथें स्वतंत्र कोर्ट उघडलें (१९१८), म्हणून हे तिकडे गेले ते शेवटपर्यंत तेथेंच होते.

ललितवाङ्मयाप्रमाणेंच ज्योतिषावरहि यांनीं एक ग्रंथ लिहिला आहे. यांच्या गणित-ज्योतिषविषयक सूक्ष्म ज्ञानामुळें यांना सांगली ज्योतिषसंमेलनाचें अध्यक्षपद देण्यांत आलें होतें (१९१८). काव्याला लागणारी प्रतिभा आणि शास्त्राला लागणारी तर्कशुद्ध विचारसरणी या दोहींचा संगम यांच्यांत आढळतो.

हे सुधारणाप्रिय होते. स्त्रीशिक्षण, विधवावपन, जातिभेद, स्त्रियांचे हक्क, पुनर्विवाह, अस्पृश्यतानिवारण इत्यादि विषय यांनीं आपल्या विनोदी लेखांतून विवेचिले आहेत. सामाजिक विचारांचा प्रसार यांनीं आपल्या नाट्यादि लेखनांतून जितका केला तितका समाजाच्या खालच्या थरापर्यंत अन्य कोणाकडून फारसा झाला नाहीं.

यांचें वाङ्मय—नाटकें–१ सुखमालिका (अप्रसिद्ध व नष्ट), २ सं. वीरतनय, ३ सं. मूकनायक, ४ जन्मरहस्य, ५ सं. गुप्तमंजूष, ६ सं. सतिविकार, ७ प्रेमशोधन, ८ सहचारिणी, ९ परिवर्तन, १० वधूपरीक्षा गद्य, ११ शिवपावित्र्य. लघुकथा–१ गाणारें यंत्र, २ पति हाच स्त्रीचा अलंकार, ३ संपादिका, ४ गरीब बिचारें पाडस. कादंबऱ्या–१ दुटप्पी कीं दुहेरी, २ श्यामसुंदर. कविता–१ तो दिन, २ अनुपम सुख, ३ खरी भाऊबीज, ४ तुळशीचें लग्न, ५ छत्रीचे उपकार, ६ भयंकर जागृति, ७ एका स्त्रीची पर्जन्यविषयक कल्पना, ८ मृत अपत्याचें शेवटचें चुंबन, ९ सुखकर जागृति, १० स्थित्यंतर, ११ विलक्षण न्यायसभा, १२ सृष्टिदेवता व हृदयदेवता, १३ आगगाडी. शिवाय टीकालेख २५ व लेख ३६. हें सर्व लेखन व टीकालेख हें साहित्य 'कोल्हटकर' या ग्रंथांत एकत्र करण्यांत आलें आहे. यांनीं आपलें आत्मचरित्रहि लिहिलें आहे.

किर्लोस्कर-देवलानंतरचे मराठी नाटककार म्हणून यांना मानाचें स्थान आहे. यांच्या नाटकांनीं रंगभूमि गाजविली तरी ती यांच्या ताब्यांत कधींच आली नाहीं. यांची रचना कृत्रिम. त्यामुळें स्वभाव, रस व भावना यांचा परिपोष यांना कधींच साधला नाहीं. गद्य व पद्य यांचा संबंध यांच्या नाटकांत नसल्यानें त्यांची सांगड अपकर्षक होई. थोड्या फुटकळ कोट्या व गायनाचा नवा प्रकार यांमुळें यांचीं नाटकें कांहीं काळ आकर्षक झालीं असलीं तरी त्यांना लोकांच्या मनाची पकड कधींच घेतां आली नाहीं. किर्लोस्कर-देवल लोकप्रियच राहिले व गडकरी-खाडिलकर उदय पावतांच लोकांना यांचें विस्मरण झालें. तथापि चमत्कृतिजन्य व कोटिक्रमयुक्त विनोदाचा प्रकार यांनीं मराठींत प्रथमच आणला. विशेषतः त्यामुळें यांना गुरुस्थानीं मानणारे शिष्य नवतरुणांत बरेच आढळतात.

कोल्हटकर, भाऊराव—(जन्म स. १८६३–मृत्यु स. १९०१) महाराष्ट्रांतील विख्यात संगीत नट. यांचें नांव महाराष्ट्राच्या रंगभूमीच्या इतिहासांत अपूर्व आहे.

हे प्रथम कीर्तनाच्या मागें उभे राहून साथ करीत आणि आपल्या गोड आवाजानें श्रोत्यांना तल्लीन करीत. तेथून यांना किर्लोस्कर मंडळींत आणण्यांत आलें

(स. १८८२). प्रथम हे नट म्हणून मंडळीत शिरले, व थोड्याच दिवसांत हे मंडळीचे आधारस्तंभ व भागीदारहि बनले.

हे स्त्रियांची भूमिका यथातथ्य करणारे आणि उत्कृष्ट गायक म्हणून प्रसिद्ध होते. संगीत नाटकांचें नावीन्य, किर्लोस्कर मंडळीची भारदस्त व थाटाची सजावट आणि उत्कृष्ट गायकांची निवड यांमुळें यांची नाटकें अत्यंत लोकप्रिय झालीं. अभिनयाच्या दृष्टीनें संगीत नाटकें पाहण्याची दृष्टि त्या वेळीं नव्हती.

हे अंगानें गोंडस, गोरे, सरळ व तरतरीत नाकाचे, किंचित् लहान डोळ्यांचे असत. यांचा आवाज अत्यंत गोड व पल्लेदार असे. संगीत नाटकांचा जमाना सुरू झाल्यापासून यांच्यासारखा चढा, पल्लेदार व सुरेल आवाज दुसऱ्या कोणाचाहि नसे. तथापि यांचें गाणें शास्त्रशुद्ध नसे. यमन, भूप, भैरवी वगैरे परिचित राग सोडून इतर राग हे मेसळ करून गात.

यांची पहाडी आवाजाची जात पूर्वी तमाशांतून अति चढ्या स्वरानें लावण्या म्हणणाऱ्या गायकांची असे. यांच्या मानानें बालगंधर्वांचा आवाज मऊ आणि लवचीक आहे. यांच्या गाण्यांत गायकीपेक्षां लावणी-ठुंबरीचा ढंग असे आणि हेंच यांच्या लोकप्रियतेचें बीज होतें.

यांचें स्त्रीवेषांतील काम केवळ सौंदर्याच्या दृष्टीनें ठीक असे आणि अशी गोष्ट सांगतात की, हे एके वेळीं पैज मारून स्त्रीवेषानें बायकांतून हळदीकुंकू घेऊन बिनबोभाट परत आले. तथापि यांच्या स्त्रीवेषांत नटवेपणा तितकासा नव्हता. बालगंधर्वांचें सोंग किंवा चित्रहि पाहून हा चेहरा स्त्रीचा किंवा पुरुषाचा असा भ्रम पडतो, तशी यांची स्थिति नव्हती.

यांचें बोलणेंहि ठसठशीत व उठावदार असे. बालगंधर्वांच्या बोलण्यांतील कोमलता, लवचीकपणा, किंवा लाडिकपणा यांच्यांत नसे; थोडा कठोरपणाच भासे.

हे खेळाचा दिवस एकादशीप्रमाणें व्रतस्थपणानें पाळीत. खेळ चालू असतां पाणी पिण्याची यांना संवय असे. नाजूक प्रकृति असल्यानें मेहनतीनें यांचे डोळ्यांवर लाली चढत असे.

यांनीं मृत्युपत्रानें सार्वजनिक कार्याकरितां तीन हजार रुपये देऊन नटाला सार्वजनिक जीवनाची जाणीव असते हें दर्शविलें आहे.

कोसंबी, श्री. धर्मानंद— (जन्म स. १८७६) पालीभाषा व बौद्धधर्म यांचे जगप्रसिद्ध अभ्यासक व तज्ज्ञ.

तरुणपणींच कांहीं सांसारिक आपत्तीमुळें यांचें मन बुद्धाकडे वळलें आणि त्याच्या धर्माचें ज्ञान मिळविण्यासाठीं हे घराबाहेर पडले (१८९९). तें ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या हेतूनें प्रथम संस्कृत भाषेचें अध्ययन करण्याचें यांनीं ठरविलें. याकरितां पुणें, ग्वाल्हेर व काशी अशी त्रिस्थळी यात्रा करून यांनीं भट्टोजी दीक्षिताची कौमुदी व साहित्य यांचें चांगलें अध्ययन केलें. आणि त्यानंतर नेपाळांत बौद्ध धर्माचें ज्ञान मिळेल अशा समजुतीनें यांनीं नेपाळचा प्रवास केला. तेथें यांची निराशा झाली आणि मोठ्या प्रयासानें हे बुद्धगयेला आले. तेथें बुद्धधर्माचें सम्यग्ज्ञान होण्यास सिंहलद्वीपालाच गेलें पाहिजे असें कळल्यावरून हे अनेक हालअपेष्टा सोशीत सिलोनला गेले. या वेळीं कोलंबो शहराजवळच असणाऱ्या विद्योदय विद्यालयांत भिक्षुधर्मानें राहून यांनीं महास्थविर सुमंगलाचार्य यांच्या हाताखालीं अध्ययन केलें. परंतु थोड्याच दिवसांत प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें हे हिंदुस्थानला परतले. यानंतर सारनाथ, कुसिनारा, लुम्बीनीवन, कपिलवस्तु वगैरे अनेक बौद्धक्षेत्रांची यात्रा केल्यानंतर यांनीं बौद्ध ग्रंथाचा अभ्यास करण्याकरितां काढलेली ब्रह्मदेशची सफर पुरी केली (१९०६).

याचे पुढें मात्र हें भटकें जीवन सोडून, इतके दिवस कष्टानें मिळवलेल्या बौद्ध वाङ्मयाचा प्रचार करण्यांतच यांनीं आपलें जीवन व्यतीत केलें. बंगभंगाचे चळवळींत उत्पन्न झालेल्या कलकत्त्याच्या नॅशनल कॉलेजमध्यें व कलकत्ता युनिव्हर्सिटीमध्यें पालीच्या प्राध्यापकाचें काम करण्याची संधि यांना मिळाली.

परंतु पालीचा प्रसार महाराष्ट्रांतच करावयाची यांची इच्छा होती. या दृष्टीनें यांनीं बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांची गांठ घेतली. दर वर्षी निदान एक पुस्तक लिहिण्याचे अटीवर दरमहा पन्नास रुपये देण्याचें महाराजांनीं यांना अभिवचन दिलें. आणि हे पुण्यास येऊन राहिले. ह्या वेळीं डॉ. भांडाकरांच्या मदतीनें यांनीं पाली भाषेला मुंबई युनिव्हर्सिटींत प्रवेश मिळविला.

अमेरिकेंतील हार्वर्ड युनिव्हर्सिटींत प्रोफेसर जेम्स एच. वुड्स यांना पाली शिकविण्याचे निमित्तानें यांची त्यांच्याशीं ओळख झाली, व 'विसुद्धिमग्ग' या बौद्ध ग्रंथाचें संशोधन करण्याकरितां यांना त्यांनी अमेरिकेला

पाचारण केलें (१९१०). हार्वर्डमध्यें संस्कृत, पाली इत्यादि पौर्वात्य भाषांचे आचार्य असणाऱ्या प्रो. ल्यानमन यांचे सहकार्यानें यांनीं तें काम पुरें केलें (१९११); आणि हे स्वदेशीं आले (१९१२).

हिंदुस्थानांत आल्याबरोबर यांनीं पांच वर्षांच्या करारानें पुणें फर्ग्युसन कॉलेजांत पालीच्या प्रोफेसरची जागा स्वीकारली. या वेळीं डॉ. पु. वि. बापट, चिं. वि. जोशी, ना. के. भागवत, कै. चिंतामण वैजनाथ राजवाडे ह्या सर्व मंडळींनीं यांच्याच हाताखालीं पाली भाषेचा अभ्यास केला.

प्रो. वुड्स यांच्या आग्रहावरून १९१८ सालीं हे दुसऱ्यांदा अमेरिकेला गेले आणि तेथून १९२२ सालीं परत आले.

यानंतर तीन वर्षे हे गुजराथ विद्यापीठाच्या पुरातत्त्वमंदिराचे पाली-भाषाचार्य होते. यांनीं लिहिलेल्या बऱ्याच पुस्तकांचें लेखन याच काळांत झालेलें आहे. त्यामध्यें समाधि-मार्ग (१९२५) व बौद्ध संघाचा परिचय (१९२६) हे दोन ग्रंथ प्रमुख होत.

याच वेळीं प्रा. ल्यानमन सेवानिवृत्त झाल्यामुळें विसुद्धीमग्गाचें अपुरें राहिलेलें संस्करण पुरें करण्यासाठीं डॉ. वुड्स यांनी यांस पुनः आमंत्रण केलें (१९२६). तें संस्करण छापून तयार झाल्यावर हे परतले (१९२७). याच ग्रंथाचें नागरी भाषेंतील संस्करण अंधेरीच्या भारतीय विद्याभवन या संस्थेनें प्रसिद्ध केलेलें आहे.

हिंदुस्थानांत आल्यावर हे गुजराथ विद्यापीठांत आपल्या खर्चानेंच राहत असत. त्या वेळीं लेनिनग्राड येथें बौद्ध धर्माचे अध्ययनासाठीं स्थापन झालेल्या संस्थेंत काम करण्याकरितां यांना पाचारण करण्यांत आलें (१९२९). पण प्रकृति ठीक न राहिल्यानें हे परत हिंदुस्थानांत आले (१९३०) आणि त्याच वेळीं सुरू झालेल्या सत्याग्रहांत सामील झाले.

डॉ. वुड्स यांचे आग्रहावरून यांनीं यानंतर आणखी एकदां अमेरिकेचा प्रवास केला (१९३१-३२). यानंतर कांहीं काळ बनारस विद्यापीठाचे पाहुणे म्हणून यांना बोलावणें करण्यांत आलें होतें. त्या तेथील यांच्या निवासाचें ' हिंदी संस्कृति व अहिंसा ' हा यांचा ग्रंथ स्मारक आहे. आपले प्राचीन भारतासंबंधीचे व सामाजिक तत्त्वज्ञानासंबंधीचे विचार प्रकट करणें हा यांचा या ग्रंथलेखनांतील प्रमुख हेतु होता.

श्रमजीवि वर्गांत बुद्धाच्या अहिंसा-तत्त्वज्ञानाच्या प्रसारानें स्पृश्यास्पृश्य भेद नाहींसे करून समता स्थापन करतां येणें शक्य आहे, अशी कल्पना यांचे मनांत कित्येक दिवस घोळत होती. या विचारास मूर्त स्वरूप मिळण्याचा योग परळ येथील ' बहुजन-विहाराच्या ' स्थापनेबरोबर सिद्धीस गेला (१९३७).

१९१० सालीं सयाजीराव गायकवाडांचे सांगण्यावरून दिलेल्या व्याख्यानांचा संग्रह– बुद्ध, धर्म आणि संघ– हें यांचें पहिलें पुस्तक मानण्यास हरकत नाहीं. बुद्धलीलासारसंग्रह हें त्रिखंडात्मक पुस्तक यांनीं यानंतर प्रसिद्ध केलें. गौतम हा बुद्ध होण्याच्या पूर्वीच्या जन्मांतील कथा पहिल्या भागांत, खुद्द बौद्ध जन्मांतील कथा दुसऱ्या भागांत व बुद्धाचा उपदेश व त्याचें परिनिर्वाण कथन करणाऱ्या कथा तिसऱ्या भागांत अशी या पुस्तकाची रचना आहे. ' भगवान् बुद्ध ' हें गौतम बुद्धाचें यांनीं लिहिलेलें टीकात्मक चरित्रहि असेंच प्रसिद्ध आहे.

आपल्या पूर्वायुष्याचा वृत्तांत ' निवेदन ' (१९२४) या नांवानें यांनीं प्रसिद्ध केला असून ' खुलासा ' या नांवाचा यांच्या उत्तर आयुष्याचा वृत्तांत मुंबईच्या ' प्रकाश ' पत्रांत १९३७-३८ त क्रमशः प्रसिद्ध झालेला आहे.

यांचें लेखन व वक्तृत्व हें अत्यंत परिणामकारक असून त्यामध्यें एक विशेष प्रकारचा जिव्हाळा आढळतो. मग तें एखाद्या जुन्या ग्रंथाचें रूपान्तर असो किंवा यांचें आत्मचरित्र असो. अगदीं सामान्य स्थितींतून जागतिक प्रसिद्धि मिळविणारे हे गृहस्थ आहेत.

कौजलगी, हणमंतराव श्रीपतराव—(जन्म स. १८९०–मृत्यु स. १९४५) कर्नाटकांतील सुप्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते, कॉंग्रेसचे पुढारी व कानडी लघुकथालेखक.

स. १९१४ सालीं हे एल्एल्. बी. झाले आणि हे विजापूर येथें वकिली करूं लागले. यांची वकिली उत्तम प्रकारें चालत असतांच असहकारितेच्या चळवळींत यांनीं वकिली सोडली (१९२०) व यांनीं आपलें आयुष्य सार्वजनिक कार्याला सर्वस्वीं अर्पण केलें. यांची कामगिरी विशेषतः खेडेगांवांतील शेतकरीवर्गांत झाली आहे. त्यांचीं दुःखें यांनीं अनेक वेळां वेशीवर टांगून दाद लावून दिली. खेड्यांतील ग्रामीण जीवनांत बदल

व्हावा एतदर्थ यांचे अनेक प्रयत्न चालू होते. विशेषतः खादीकार्यास यांनीं आपलें तन, मन, धन अर्पण केलें होतें. कर्नाटक चरखा संघाचे व कर्नाटक प्रान्तिक काँग्रेस कमेटीचे हे अध्यक्ष होते. यांना राजकीय चळवळींत (स. १९२०,' ३१,' ३२) अनेक वेळां कारागृहवास घडला होता. यांच्या लघुकथाहि खेड्यांतील जीवनाचा यथार्थ परिचय करून देणाऱ्या आहेत. विनोदी लेखक म्हणून हे प्रसिद्ध होते. यांच्या मराठींतील लघुकथा 'कमलाकान्त' या नांवानें किर्लोस्कर मासिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. यांच्या खादी प्रेमामुळें लोक यांना 'खद्दर कौजलगी' म्हणत. सदाशिवराव कर्नाळ, सुबराव हळदीपूर, मध्वराव कब्बूर आणि नारायणराव जोशी हे यांचे सहकारी यांच्या आधींच दिवंगत झाले.

कौल, पंडित राजा हरिकिसन—(जन्म स. १८६९–मृत्यु स. १९४२) सुप्रसिद्ध दिवाण व अनेक मोठालीं कामें करणारे.

यांचें शिक्षण लाहोर येथील सरकारी विद्यापीठांत झालें. यांनीं स. १८९० सालीं असिस्टंट कमिशनरच्या जागेवरून, लाहोरचे डिस्ट्रिक्ट जज, डेप्युटी कमिशनर वगैरे अनेक कामें केल्यावर १९१३–१४ सालीं गुन्हेगार जातींच्या संबंधीं रिपोर्ट लिहिण्याची खास कामगिरी यांच्यावर सोंपविण्यांत आली. स. १९१७–१९ मध्यें यांना डेप्युटी कमिशनर फॉर क्रिमिनल ट्राइब्ज नेमण्यांत आलें. नंतर कमिशनर म्हणून काम केल्यावर यांची रॉयल कमिशनवर नेमणूक झाली (१९२३–२४). नंतर हे सेवानिवृत्त झाले. स. १९२५ सालीं एकॉनमिक इन्क्वायरी कमेटीचे व पुढें इंडियन टारिफ बोर्डाचे हे सभासद होते (१९२६–२७). नंतर हे भरतपूर संस्थानचे दिवाण होते (१९२७). जम्मू व काश्मीर राज्याचे हे मुख्य प्रधान होते (१९३१–३२). हे पत्याळा संस्थानचे अर्थसचीव होते (१९४०).

ख

खत्री, बाबू कार्तिकप्रसाद—(जन्म स. १८५२–मृत्यु स. १९०४) हिन्दी भाषेंतील एक पण्डित व ग्रन्थकार. ह्यांचे वडील बलदेवप्रसाद यांनीं 'शब्दकल्पद्रुम' हा वैद्यकीवरील संस्कृत कोश तयार केला. लहानपणींच यांनीं वैद्यक-ग्रन्थ मुखोद्गत केले. इंग्रजी व विशेषतः बंगाली भाषा यांना चांगली येत असे. परन्तु यांना हिन्दी भाषेची सर्वांत विशेष आवड असल्यामुळें यांचे बरेच ग्रन्थ हिन्दींतूनच प्रसिद्ध झालेले आहेत. हिन्दी गद्य लेखनाची प्रथा यांनींच निर्माण केली. हिन्दी नन्दकोश व सारस्वतदीपिका हे ग्रन्थ यांनीं प्रसिद्ध केले. 'प्रेमविलासिनी' व 'हिन्दीप्रकाश' हीं वर्तमानपत्रें यांनीं चालविलीं. त्याचप्रमाणें 'भारतजीवन' व 'सरस्वतीपत्रिका' यांचे हे संपादक होते. यांनीं आसामांत थोडाफार हिन्दीप्रचारहि केला. काशीच्या नागरीप्रचारिणी सभेचे हे सभासद होते.

उषाहरण, जया, प्रमिला, मधुमालती, दीनानाथ, कुलटा, दलितकुसुम, शिवाजी, पाकराज, विक्रमादित्य, अहिल्याबाई, मिराबाई, ईला, प्रातःस्मरण, सतीसत्त्वरक्षा, शृंगारदान, वणिग्बंधु वगैरे स्वतंत्र पुस्तकें यांनीं लिहिलीं आहेत.

खरे, गणेश सखाराम—(जन्म स. १८५४–मृत्यु स. १९१२) सुप्रसिद्ध जंत्रीकार, अभ्यासक व गणितज्ञ. यांचा जन्म गुर्लहोसूर (जि. बेळगांव) येथें झाला. बेळगांव व पुणें येथें शिक्षण होऊन यांना ओव्हरसिअरच्या परीक्षेंत पहिला क्रमांक मिळाला (१८७७).

सरकारी नोकरींत शिरल्यावर यांनीं सरहद्द प्रान्त रेल्वे, सिंध, मालेगांव, पुणें व नगर भागांत कालव्यांचीं कामें केलीं. तसेंच कुरंदवाडच्या पाणीपुरवठ्याची पहिली योजना यांनीं तयार केली. १९१० सालीं हे सेवानिवृत्त झाले. ज्योतिष व गणित हा यांचा आवडता विषय होता. शं. बा. दीक्षितकृत 'ज्योतिर्विलास अथवा रात्रींची दोन घटका मौज' या पुस्तकांतील नक्षत्रपट यांनीं तयार केला. तसेंच इतिहास-संशोधकांना उपयुक्त १५० वर्षांची शिवकालीन जंत्री यांनीं तयार केली. त्यापैकीं ९९ वर्षांची जंत्री ओरिएंटल बुक एजन्सी पुणें, यांनीं 'खरे जंत्री' या नांवानें १९२३ मध्यें प्रसिद्ध केली आहे. मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाला आवश्यक असणारा कालनिर्णय करण्यास यांनीं केलेली मोडकांच्या जंत्रीच्या पूर्वीच्या ९९ वर्षांची ती जंत्री अतिशय महत्त्वाची समजण्यांत येते. ती शक १५५१-१६४९ (स. १६२९-१७२८) पर्यंतची आहे. तिच्यामुळें या कालांतील शक, संवत, इसवी, फसली, सुहूर, जूलूस, राज्याभिषेक, हिजरी या सनांतील घटिकापळांसह तिथि, तारीख, मास, वार काढतां येतात व जुन्या कागदपत्रांतील कालनिर्णय सहज करितां येतो. यापूर्वी कालनिर्णयाकरितां गणिती तज्ज्ञांचा आश्रय करावा लागत असे. यांच्या जंत्रींतहि पंचांगांच्या भिन्नतेमुळें आणि सूक्ष्म गणिताच्या अभावीं क्वचित् दोष आढळतात. तथापि ते फार थोडे आहेत.

रा. ब. कृ. ब. देवल यांनीं प्रसिद्ध केलेल्या संगीत शास्त्राच्या सर्व निबंधांतील गणितविषयक चर्चा यांनीं केली आहे. त्याप्रमाणें त्यांनीं तयार केलेल्या श्रुति-हार्मोनियममध्यें प्रत्येक सप्तकांत बावीस श्रुतींच्या पट्ट्या बसविण्याची योजना यांनीं केली.

इंजिनियर लोकांना उपयोगी पडणारी 'अर्थ-वर्क टेबल्स' नांवाचीं दोन पुस्तकें यांनीं प्रकाशित केलीं. या पुस्तकांचा खप मुंबई इलाखा, सिलोन व ब्रह्मदेश या ठिकाणीं झाला. कात्रजचा तलाव व खानदेशांतील बंधारे हे दोन संशोधनात्मक निबंध यांनीं लिहून प्रसिद्ध केले. डॉ. सर रामकृष्ण गो. भांडारकर यांना ८१ व्या वर्षी अर्पण केलेल्या ग्रंथांत 'उदात्त, अनुदात्त व स्वरित' या विषयावर यांचा निबंध आहे. शिवाय अनेक संस्था व विद्यार्थी यांना यांनीं देणग्या दिल्या.

खरे, गणेश हरी— (जन्म स. १९०१) इतिहासांतील अनेक शाखांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणारे गृहस्थ. शिक्षण-कॉलेजच्या पहिल्या वर्षापर्यंत. १९२० अखेरीस असहकारितेच्या चळवळींत ह्यांचें कॉलेज सोडून देशसेवेंत पदार्पण; १९२२-२३ मध्यें एक वर्ष तुरुंगवास; १९२४ जून ते १९२८ डिसेंबरपर्यंत सातारा राष्ट्रीय शाळेंत शिक्षक; १९२९ जुलै ते १९३० जून-शिवचरित्र-कार्यालय पुणें, येथें नोकर; १९३० जुलै ते आजतागायत भारत इतिहास-संशोधक मंडळ, पुणें, येथें नोकर; येथील हुद्दा क्यूरेटर; संस्कृत, इंग्रजी, फार्सी, उर्दू, कानडी, हिंदी या भाषांचें ज्ञान बऱ्यापैकीं; अरबीचें प्राथमिक ज्ञान; मूर्तिकांड; लिपिशास्त्र; नाणकशास्त्र; प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहास यांचा व्यासंग; आतांपर्यंत एकट्यानें लहानमोठीं सोळा व इतरांबरोबर दोन मिळून १८ पुस्तकें व १४० लेख लिहिले त्यांचीं अनुक्रमें दोन हजार व एक हजार पृष्ठें झालीं आहेत. मुख्य पुस्तकें अशीं:-दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड १-३; ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड १-३; शिवचरित्र-साहित्य, खंड ६; शिवचरित्रवृत्त-संग्रह, खंड २-३; हिंगणें दफ्तर, खंड १; मूर्तिविज्ञान; आळंदी, पंढरपूर, भोर संस्थान व भोर म्यूझियम व शनवारवाडा यांविषयीं मार्गदर्शिका. यांचीं पुस्तकें सामान्यतः साधनविषयक असलीं तरी मूर्तिविज्ञान, श्रीविठ्ठल आणि पंढरपूरसारखीं पुस्तकें संकलनात्मक आहेत. लेख मुख्यतः विवेचनात्मक व घटनार्थनिर्धारक आहेत. थोडेसे इंग्रजी लेख सोडल्यास बहुतेक लिखाण मराठींतून झालें असलें तरी प्रमाणभूत असल्यानें इंग्रजी सरकारी नियतकालिकांतून आधारास घेतले जाते.

खरे, दाजी आबाजी— (जन्म स. १८५६-मृत्यु स. १९१६) मुंबईचे प्रसिद्ध वकील व सार्वजनिक कार्यकर्ते. वडील लवकर वारल्यानें यांचें व यांच्या वडील बंधूंचें संगोपन यांचे चुलते रावजी धोंडो मामलेदार यांनीं केलें. हे मॅट्रिक (१८७३) व पुणें डेक्कन कॉलेजांतून बी. ए. झाले (१८७७). कॉलेज-शिक्षण शिष्यवृत्त्यांवर झालें. १८८० सालीं एल्एल्. बी. झाल्यावर मुंबई हायकोर्टांत यांनीं वकीली सुरू केली. वकीलीला आवश्यक असणारे गुण यांच्याजवळ भरपूर असल्यानें मुंबईशिवाय बाहेरहि यांचें नांव विख्यात झालें. हे अनेक सार्वजनिक कार्यांत भाग घेत. हे मतानें नेमस्त व समाजसुधारक होते. धारवाडच्या प्रांतिक परिषदेचे हे अध्यक्ष होते (१९०३). स. १८९७ च्या खटल्याच्या वेळीं हे लो. टिळकांकरितां विलायतेसहि गेले होते. यांनीं 'पुनरुद्वाह' नांवाचें

एक विद्वत्ताप्रचुर पुस्तक प्रसिद्ध केलें. यांच्या छबू नांवाच्या मुलीनें ईश्वरप्रसाद गणेश पंडित नांवाच्या अहमदाबादच्या परप्रान्तीय माणसाशीं लग्न केलें होतें.

कायमधारापद्धति व कायमकुळपद्धति हा ह्यांचा राष्ट्रीयसभेंतील आवडता विषय होता. यांनीं स. १८९३ च्या लाहोर काँग्रेसमध्यें या संबंधाचा ठराव मांडला. इंग्लंडला पाठविण्यांत आलेल्या काँग्रेसच्या शिष्टमंडळाचे यांना सभासद निवडण्यांत आलें. स. १९०६ सालीं यांच्याच ठरावानें पास झालेली काँग्रेसची घटना तयार करण्याचे कामीं यांनीं अत्यंत मेहनत घेतली. स. १९०९-१३ पर्यंत हे मि. डी. ई. वाच्छा यांच्याबरोबर काँग्रेसचे सेक्रेटरी होते. तेथें हिंदुस्थानांतील कापडाच्या धंद्याची वाढ खुंटविणारा हिंदी कापडावरील कर रद्द करण्यासंबंधीचा ठराव यांनीं मांडला. स. १९१३ सालीं मुस्लीम लीगनें स्वराज्याचें ध्येय मान्य केलें, तेव्हां राष्ट्रसभेंत आलेल्या लीगच्या अभिनंदनाच्या ठरावाला यांनीं दुजोरा दिला (राष्ट्रीय सभेचा इतिहास भा. १, पा. ११७).

खरे, नारायण भास्कर— (जन्म स. १८८१) नागपूरचे एक माजी राष्ट्रसभा पुढारी, मुख्य प्रधान व व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमधील परराष्ट्रीय खात्याचे मुख्य.

यांचें इंग्रजी सहा इयत्तांपर्यंतचें शिक्षण मुंबईस झाल्यावर हे प्लेगमुळें जबलपूर येथें आपले मामा कृ. भा. गोखले यांच्याकडे गेले. तेथें दुसऱ्या वर्गांत बी. ए. झाल्यावर (१९०२), लाहोर येथें मेडिकल कॉलेजांत (१९०२-७) शिक्षण घेऊन एम्. बी. झाले. परीक्षेंत पहिला क्रम आल्यानें सुवर्णपदक व सर्जरींत रौप्यपदक मिळालें. १९०७ पासून असिस्टंट सर्जन म्हणून मध्यप्रान्तांत यांनीं नोकरी केली व १९१३ सालीं एम्. डी. झाले. हे पंजाब विश्वविद्यालयाचे पहिले एम्. डी. होत. १९१६ सालीं यांनीं नागपूरला स्वतंत्रपणें धंद्यास सुरुवात केली. धंद्यांत यांचा पहिल्यापासून उत्तम बस बसला.

स. १९२२ सालीं स्थापन झालेल्या नागपूर अनाथ वि. गृहाच्या संस्थापकांत हे असून त्या संस्थेचे १२ वर्षें अध्यक्ष होते. नागपूर पायोनियर विमा कंपनीचे हे पहिले डायरेक्टर व १९२० सालीं नागपूर राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष होते. १९२३ व १९२६ च्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या निवडणुकींत हे स्वराज्यपक्षातर्फे निवडून आले. त्या वेळीं दुफळी होऊन हे राष्ट्रसभेला चिकटून राहिले व प्रचाराकरितां निघालेल्या 'तरुण भारत' पत्राचे हे मुख्य संपादक बनले. १९३० मध्यें सविनय कायदेभंग चालू होईपर्यंत तें पत्र चालू होतें. यांनीं सहकुटुंब मीठ विकून कायदेभंग केला व मराठी मध्यप्रान्तांत जंगलसत्याग्रहाची योजना आंखली. तेव्हां यांना आरंभींच जामीन न दिल्यामुळें १ वर्षाची शिक्षा झाली. पण पुढें हृदयविकारामुळें यांना सोडण्यांत आलें. १९३२च्या सत्याग्रहांत यांनीं आर्थिक जबाबदारी स्वतःवर घेऊन लढा चालू ठेवला. गांधी-आयर्विन करारानंतर म. गांधींनीं हरिजनांच्या उद्धाराकरितां आंदोलन सुरू केलें, तेव्हां यांनीं तीन हजार रुपये दिले. राष्ट्रीय सभेनें पाटण्याच्या अधिवेशनांत कायदेकौन्सिलांत प्रवेश करण्याचा आदेश दिला (१९३४), तेव्हां बॅ. मोरोपंत अभ्यंकरांना यांनीं निवडणुकींत सर्वतोपरी साहाय्य केलें, पण ते निवडून आल्यावर वारले. तेव्हां त्यांच्या जागीं यांची बिनविरोध निवडणूक झाली. तेथें यांनीं 'आर्य मॅरेज व्हॅलिडेशन ॲक्ट' या नांवाचा कायदा पास करून घेतला. त्यामुळें आर्यसमाजी लोकांची विवाहाच्या बाबतींतील अडचण दूर झाली. पूर्वी आर्यसमाजी लोकांस आपली समाजपद्धतीनें केलेलीं लग्नें सिव्हिल मॅरेज ॲक्टाखालीं नोंदवावीं लागत. १९३६ सालीं प्रान्तिक कायदेमंडळाच्या निवडणुकी लढविण्याचें राष्ट्रसभेनें ठरविलें. तेव्हां यांची राष्ट्रसभेच्या कायदे मंडळाच्या मुख्याच्या जागीं पुढारी म्हणून एकमुखानें निवड झाली. स. १९३७ सालीं राष्ट्रसभेनें मंत्रिमंडळ स्वीकारण्याचें ठरविलें. तेव्हां गव्हर्नरनें यांना पुढारी म्हणून बोलाविलें व आपल्या प्रमुखत्वाखालीं यांनीं प्रधानमंडळ बनविलें, व हे मुख्य प्रधान झाले आणि धडाडीनें राष्ट्रसभेच्या जाहीरनाम्याप्रमाणें अहिंसावादी व हिंसावादी राजकीय गुन्हेगार सोडले, छापखान्यांच्या पूर्वी घेतलेल्या जामिनक्या रद्द केल्या व रकमा परत दिल्या, शेतकऱ्यांचा सारा रुपयास दोन आणे कमी केला, शाळेंतील मुलांना लष्करी व बंदुकीचें शिक्षण देण्यास मान्यता दिली, जप्त पुस्तकांवरील जप्ती उठवली. असा तडफदार कार्यक्रम चालू असतांच शरीफ नांवाच्या दिवाणानें हिंदु मुलीवर बलात्कार करणाऱ्या जाफर हुसेन नांवाच्या एज्युकेशनल इन्स्पेक्टरला दया दाखवून तुरुंगांतून सोडविलें म्हणून यांनीं त्याला राजीनामा द्यावयास भाग पाडलें. या निमित्तानें काँग्रेस पार्लमेंटरी कमेटीला यांच्या कारभारांत लक्ष घालणें भाग पडलें. पण यांना तें न खपून यांनीं २० जुलै १९३८ रोजीं घाईनें प्रधानपदाचा राजीनामा दिला. संयुक्त जबाबदारीचे तत्त्वाप्रमाणें दोन दिवाणांनीं यांच्याबरोबर

राजीनामे दिले. पण बाकीचे दोघे मंत्री, पुढें दोन दिवसांत होणाऱ्या काँग्रेस पार्लमेंटरी कमेटीच्या संमतीशिवाय राजीनामें देईनात, तेव्हां त्यांना गव्हर्नरनें बडतर्फ केलें. यांनीं लगेच गव्हर्नरकडे जाऊन दुसऱ्या मंत्रिमंडळाची यादी गव्हर्नरला सादर केली. पण जबाबदार राष्ट्रसभेला सोडून परस्पर गव्हर्नरकडे हे गेले. म. गांधींनीं 'हा आपला मोठा प्रमाद झाला,' असें यांच्याकडून लिहून घेतलें आणि यांना मंत्रिपद सोडण्यास भाग पाडलें. पुढें तर काँग्रेस पक्षाशीं सतत विरोधाचें धोरण स्वीकारल्यानें दोन वर्षेपर्यंत यांचें राष्ट्रसभेचें सभासदत्वहि रद्द करण्यांत आलें.

पुढें (१९४३) हे व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सभासद बनले. आणि राष्ट्रसभेचे विरोधी बनून सरकारी धोरणाचें समर्थन करूं लागले. तथापि तेथेंहि यांनीं दक्षिण आफ्रिकेंतील सरकारनें तेथील हिन्दी लोकांशीं चालविलेल्या अन्यायाच्या परिमार्जनाचा प्रतिकार करण्याकरितां जशास तसें धोरणाचा पुरस्कार करून आपल्या राष्ट्रीय व लढाऊ धोरणाची प्रचीति आणून देण्याचा प्रयत्न केला (१९४५).

खरे, वासुदेव वामनशास्त्री—(जन्म स.१८५८–मृत्यु स. १९२४) मराठी कवि, नाटककार व इतिहाससंशोधक. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील गुहागर गांवीं झाला. तेथेंच प्राथमिक शिक्षण झाल्यावर हें साताऱ्यास आले (१८७६) व तेथें पंडित अनंताचार्य गजेन्द्रगडकरांचेजवळ संस्कृताचें अध्ययन केलें. पुढें पुणें येथें संस्कृत शिक्षकाची नोकरी पत्करून प्रसिद्ध नारायणशास्त्री गोडबोल्यांच्या जवळ हे व्याकरणाचें अध्ययन करूं लागले. तेव्हां यांचा विष्णुशास्त्री चिपळूणकर, जनार्दन बाळाजी मोडक, काशीनाथ नारायण साने वगैरेंशीं परिचय होऊन यांना इतिहासाच्या अभ्यासाची व संशोधनाची गोडी लागली. टिळक व आगरकर यांच्याशींहि यांचा दाट परिचय झाला. पुणें न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेच्या वेळीं जे लोक शिक्षक म्हणून दाखल झाले त्यांत हे होते. तेथें एक वर्षभर काम केल्यावर हे मिरजेच्या शाळेंत शिक्षक म्हणून गेले. यांचें पुढील सर्व आयुष्य मिरजेसच गेलें.

संस्कृताचे शिक्षक हा उपजीविकेचा धंदा व इतिहाससंशोधनादि कामें हौसेचीं, असा यांचा कार्यक्रम सुरू झाला. यांचा इतिहासविषयक पहिला ग्रंथ 'नाना फडणिसांचें चरित्र' हा होय. तो लिहीत असतां यांना मिरजमळा संस्थानच्या ताब्यांत असलेल्या पटवर्धनी दप्तराचा सुगावा लागला. पटवर्धन सरदारांची चलती १७६०-१८०० पर्यंत चांगलीच होती. त्या वेळीं हिंदुस्थानच्या वेगवेगळ्या भागांतून झालेला सगळा पत्रव्यवहार तेथें एकत्र व शिस्तवार होता. घराण्यांत पुढें वांट्या होऊन विभाग पडले तरी दप्तर एकत्रच राहिलें. त्यांच्या नकला यांनीं स्वतः व मदतनीसामार्फत करून घेतल्या आणि ते कागद १८९७ सालीं 'ऐतिहासिक लेखसंग्रह' मासिक काढून प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. पुढें पुरेसे वर्गणीदार न मिळाल्यानें १९२४पर्यंत बारा खंडांत ग्रंथरूपानें ते प्रसिद्ध केले. त्याला माहिती देणाऱ्या विस्तृत प्रस्तावना लिहिल्या. यांच्या सारसंकलक प्रस्तावनांमुळें त्या कागदांचा उपयोग अभ्यासकांना चांगला होतो. उपजीविकेचा धंदा शिक्षकाचा तोहि अगदीं ४० रु. दरमहा प्राप्तीचा. इतिहास–संशोधनाचें काम हौसेचें पण खर्चाचें. त्याची तोंडमिळवणी नाटकें लिहून यांना करावी लागे. त्यामुळें यांचें आयुष्य गरीबींतच गेलें.

यांच्या संशोधकी कामाप्रमाणेंच यांचीं नाटकें उच्च दर्जाचीं असून तीं रंगभूमीवरहि पुष्कळ दिवस गाजलेलीं आहेत. भाषाप्रभुत्व, रसिकता, मार्मिकता व विनोद हे यांचे गुण त्यांत उत्कटत्वानें प्रकट झाले आहेत.

यांचें वाङ्मय– १ समुद्र-काव्य १८८४, २ यशवंतराव महाकाव्य १८८८, ३ गुणोत्कर्ष नाटक १८८५, ४ तारामंडळ नाटक, ५ संगीत चित्रवंचना नाटक, ६ संगीत कृष्णकांचन नाटक १९१७, ७ शिवसंभव नाटक, ८ संगीत उग्रमंगल नाटक, ९ संगीत देशकंटक नाटक, १० नाना फडणिसांचें चरित्र १८९२, ११ अधिकारयोग १९०८, १२ हरिवंशाची बखर (संपादित १९०९), १३ इचलकरंजी संस्थानचा इतिहास १९१३, १४ मालोजी व शहाजी १९२०, १५ ऐतिहासिक लेखसंग्रह भाग १-१२, १८९७-१९२४. यांचें चरित्र दा. मो. भट यांनीं लिहून पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें आहे.

खाडिलकर, नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर– (जन्म स. १८७२) सुप्रसिद्ध ध्येयवादी मराठी वृत्तपत्रकार, परदेशांतील राजकारणाचे सूक्ष्म निरीक्षक, नाटककार, गद्य रंगभूमीचे प्रस्थापक व वैदिक वाङ्मयाचे अभ्यासक.

यांचा जन्म सांगली येथें झाला व तेथें शिक्षण होऊन हे मॅट्रिक झाले (१८८९). पुणें फर्ग्युसन व डेक्कन कॉलेजांत अभ्यास होऊन हे तत्त्वज्ञान घेऊन बी. ए. झाले (१८९२) व सांगलीसच सरकारी हायस्कुलांत

शिक्षक बनले (१८९२-९४). पण ती नोकरी सोडून मुंबईस एलएल. बी.चा अभ्यास करण्याकरितां गेले. तेथें असतां यांचें 'सवाई माधवरावाचा मृत्यु' हें नाटक व 'ब्राह्मण व त्यांची विद्या' या ग्रंथावरील टीका विविधज्ञान-विस्तारांत प्रसिद्ध झाली आणि त्यामुळेंच केसरीशीं यांचा संबंध आला. १८९६ च्या सप्टेंबरांत 'राष्ट्रीय महोत्सव' हा यांचा पहिला अग्रलेख केसरींत प्रसिद्ध झाला. त्यानंतर टिळक राजद्रोहाच्या आरोपावरून तुरुंगांत गेले असतां यांनीं केसरीचा सांधा बरोबर जुळविला. म्हणून यांचे टिळकांनीं आभार मानले. केसरी सोडून हे नेपाळांत गेले. तेथें यांनीं कौलांचा कारखाना काढला व राजवाड्याला कौलें पुरविलीं, अशी एक आश्चर्यकारक घटना यांच्या चरित्रांत आहे. पण तिच्या मागील राजकारण उघड झालेलें नाहीं (१९०२-४). त्यानंतर टिळकांना शिक्षा होऊन ते मंडालेस गेले, तेव्हां केसरी व मराठा या दोहींचे १९०८-९ सालीं व १९१८-२० सालीं लो. टिळक व केळकर विलायतेस गेल्यामुळें दीडदोन वर्षें हे केसरीचे जाहीर संपादक होते. स. १९१० सालीं यांची मान्यता नसतां तुरुंगांतून टिळकांची मान्यता आणून केळकर संपादक झाले, म्हणून यांनीं जो केसरीवर बहिष्कार पुकारला तो टिळक सुटून आल्यावर १९१५ सालीं संपून हे पुनः केसरीकचेरींत जाऊं लागले. लो. टिळक वारल्यानंतर यांनीं केसरी संस्था कायमची सोडली आणि हे मुंबई येथें निघणाऱ्या लोकमान्य दैनिकाचे संपादक बनले (मार्च १९२१). तें दैनिक यांच्या संपादकत्वाखालीं फारच लोकप्रिय झालें. राष्ट्रसभेचा पुरस्कार हे उत्कृष्ट करीत असतां चालकमंडळीकडून यांच्या मतावर दडपण व संपादनसामर्थ्याविषयीं संशय प्रगट होऊं लागतांच यांनीं आपल्या स्वतःच्या मालकीचें 'नवाकाळ' नांवाचें दैनिक सुरू केलें (एप्रिल १९२३). तेंहि अत्यंत लोकप्रिय करून यांनीं आठवड्याचा नवाकाळ सुरू केला (१९२५ सप्टें.). १९२७ सालीं हिंदुमुसलमानांचे दंग्यावरील लेखामुळें ७०० रु. दंड व पोलिस सुपरिं.ला १५०० रु. अब्रू-नुकसानीदाखल यांना द्यावे लागले. पुढें राजद्रोहाच्या आरोपावरून खटला होऊन एक वर्षाची शिक्षा झाली (फेब्रु. १९२९). या वेळीं यांचा मुलगा यशवंत याच्याकडे नवाकाळचें संपादकत्व गेलें. स. १९३१ सालीं नवाकाळ-वाडीची खरेदी होऊन त्या पत्राला स्थैर्य प्राप्त झालें, आणि हे निवृत्तीच्या मार्गाला लागले. ६ मे १९३३ रोजीं सांगलीस दत्तमंदिर बांधून तेथें अनेक तत्त्वज्ञानाच्या विषयांवर धार्मिक प्रवचनें सांगण्यास यांनीं सुरुवात केली.

यांना दोनदां नाट्यसंमेलनाच्या (१९०७, १९१७ पुणें) व नागपूर मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला (१९३३). हे मॉंटफोर्ड सुधारणान्वयें होणाऱ्या मुंबई कौन्सिलच्या निवडणुकींस डेमोक्रॅटिक पक्षातर्फे उभे होते; पण लो. टिळकांच्या मृत्यूनंतर कलकत्ता कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणें यांनीं आपली उमेदवारी परत घेतली (१९२० सप्टें.).

यांच्या सर्वच लेखनांत कणखर ध्येयवाद आढळून येतो. स्वकीयांचा आत्मविश्वास जागृत करीत त्यांना ध्येयवादी बनवावयाचें आणि प्रतिपक्षावर सारखा जोरकस हल्ला करीत राहावयाचें, हा यांचा बाणा यांच्या लेखनांत स्पष्ट व्यक्त होतो; मग तें वृत्तपत्रीय लेखन असो किंवा करमणुकीकरितां लिहिलेलें नाटक असो. परदेशी राजकारणावरील यांच्या लेखांतसुद्धां हीच यांची दृष्टि आढळून येते. मुख्य उद्दिष्ट सोडून किरकोळ गोष्टींवर यांनीं आपली लेखणी कधींहि चालविली नाहीं. हे दैनिकाचे यशस्वी संपादक असूनहि यांना उत्तरप्रत्युत्तरें, खुलासेप्रतिखुलासे, टीकाप्रतिटीका असल्या तात्कालिक खुसखुशीत मजकुराची कधीं जरूरी भासली नाहीं. यांनीं संपादकत्व सोडतांच लोकमान्य दैनिक बंद पडलें आणि यांनीं केवळ स्वतःच्या हिंमतीवर काढलेला 'नवाकाळ' मात्र जोरानें चालत राहिला, यांत यांचें संपादनसामर्थ्य व्यक्त होतें.

परदेशी राजकारणाच्या बाबतींतहि अगदीं प्रारंभापासून यांचें लक्ष असे. बोअर युद्धविषयक लेखनाच्या नादानें यांची एलएल. बी.ची परीक्षा हातची गेली (१९००). पुढें यांनीं गनिमी काव्याचें युद्ध ही लेखमाला लिहिली (१९०१). केसरींतील परराष्ट्रीय राजकारणावरील लेख प्रायः यांचेच असत. त्यामुळेंच यांना 'परराष्ट्रमंत्री' असें टिळक विनोदानें म्हणत. बाल्कन युद्धावरील लेखमाला यांनींच लिहिली (१९१३). पहिल्या महायुद्धावरील केसरींतील व चित्रमयजगत्मधील यांचें मासिक समालोचन इतकें लोकप्रिय झालें कीं, तें पुढें पुस्तकरूपानेंहि निघालें. या युद्धाच्या वेळीं यांनीं जरी खुद्द कांहीं लिहिलें नसलें तरी यांनीं घालून दिलेल्या परंपरेतून येणारें समालोचन लोकांना विशेष मार्मिक वाटतें.

यांच्या नाटकांतसुद्धां असाच विशेषपणा आहे. यांचीं नाटकें हेतुप्रधान आहेत. यांचीं कथानकें लोकपरिचित व हेतु लोकप्रिय असल्यानें यांनीं अपेशी ठरलेली गद्य

रंगभूमि रसपरिपोषक कुशल मांडणीनें सजीव करून 'गद्य रंगभूमीचे प्रस्थापक' अशी पदवी प्राप्त केली. संगीतानें अभिनयप्रधान गद्य रंगभूमीला निर्माल्य करून टाकलें होतें. यांनीं गद्य नाटकें करूनहि नाटकमंडळ्या लोकप्रिय होऊन चालूं शकतात हें दाखवून दिलें. प्रसिद्ध महाराष्ट्र नाटक मंडळी यांच्याच नाटकांमुळें पुढें आली आणि कीचकवधासारख्या नाटकानें तर तिला मुबलक पैसाहि मिळवून दिला. प्रथम गद्य नाटकांतील अभिनयप्राधान्य ध्यानांत घेऊन संगीत नाटकें लिहिण्याचा यांचा विचारहि नव्हता. पण टिळकांच्या तुर्‍हंगवासानंतर यांना केसरीवर बहिष्कार घालावा लागला, तेव्हां आर्थिक प्रश्न सोडविण्याकरितां नाटककार म्हणून प्राप्त झालेल्या लौकिकाचा फायदा घेऊन यांनीं संगीत नाटकें लिहिलीं. यांच्या कवितेंत प्रसाद नसला तरी नव्यानव्या गायकी चालींचा आश्रय करून आणि गद्यपद्याचा सुंदर मेळ साधून गंधर्वासारख्यांकडून आपलीं नाटकें रंगभूमीवर आणवून, सर्वांना मागें सारून दोन तपांपेक्षां अधिक काळ रंगभूमीवर यांनीं आपलें स्वामित्व कायम ठेवलें.

यांचें वाङ्मयः— नाटकें— १ कांचनगडची मोहना (१८९७), २ सवाई माधवरावाचा मृत्यु (१८९५ विविधज्ञान विस्तार, नंतर पुष्कळ फेरबदल करून१९०६), ३ कीचकवध (१९०६), ४ बायकांचें बंड (गद्य १९०७, संगीत १९३५), ५ भाऊबंदकी (१९०९), [जप्त १९१०, जप्ती उठली १९४०], ६ प्रेमध्वज (१९१०), ७ संगीत मानापमान (१९११ मार्च), ८ सं. विद्याहरण (१९१३), ९ गद्य सत्त्वपरीक्षा (१९१४), १० सं. स्वयंवर (१९१६ डिसें.), ११ सं. द्रौपदी (१९२०), १२ सं. मेनका (१९२६), १३ गद्य सवतीमत्सर (१९२७), १४ सावित्री (१९३० लिखित).

धार्मिक प्रवचनात्मक पुस्तकें—१ संध्या, २ त्रिसुपर्ण, ३ सौर, ४ रुद्र. उपनिषदें– ऐतरेय, ईशावास्य, मांडूक्य वगैरे.

खानखोजे, पांडुरंग सदाशिव—(जन्म स. १८८५) सुप्रसिद्ध कृषितज्ज्ञ व राजकारणी पुरुष.

हे मध्यप्रान्तांतील वर्धा येथले मूळचे राहणारे. हे त्यांच्या २१ व्या वर्षी शेतकीचें उच्च शिक्षण घेण्याकरितां अमेरिकेस गेले (१९०६) आणि तेव्हांपासून हे अद्यापि तिकडेच आहेत. मध्यें कांहीं वेळां यांनीं इकडे येण्याचा प्रयत्न केला; पण अद्यापि यांचा इकडे येण्याचा प्रयत्न सफल झालेला नाहीं.

हे कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीला जोडलेल्या ऑरेगन ॲग्रिकल्चरल कॉलेजमधून कृषिविषयांत बी. एससी. झाले (१९११) व नंतर दोन वर्षांनीं वॉशिंग्टन युनिव्हर्सिटींतून एम. एससी. झाले.

स. १९१३ सालीं हे अमेरिकेंत असतां यांनीं हिंदुस्थानांत औद्योगिक शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां एक योजना तयार केली होती, आणि यांनीं त्याकरितां तिकडे दौरेहि काढले होते. या बाबतींत यांना साहाय्य करण्याकरितां पुलमन (वॉशिंग्टन) येथें 'असोसिएशन फॉर दि प्रमोशन ऑफ इंडस्ट्रियल एज्युकेशन इन् इंडिया' या नांवाची एक संस्थाहि स्थापण्यांत आली होती. या संस्थेच्या प्रसिद्धिपत्रकांत वॉशिंग्टन स्टेट कॉलेजचे प्रेसिडेंट मि. इ. ए. ब्रायन (अध्यक्ष), सी.एच्. हॅरिसन (उपाध्यक्ष) व थाय्. डी. कार्डिफ (चिटणीस) यांच्या सह्यांनिशीं जें निवेदन प्रसिद्ध करण्यांत आलें, त्यांत त्यांनीं यांच्या कार्यपद्धतीचा अत्यंत गौरव केला आहे.

अमेरिकेंतील विद्यार्जन आटोपल्यावर स. १९१४ च्या सप्टेंबरांत हे युरोपमार्गें हिंदुस्थानांत यावयास निघाले. पुढें पालेर्मो (इटली) येथून ग्रीसमार्गें हिंदुस्थानांत हे येत असल्याचें यांचें पत्र आलें, पण पहिलें महायुद्ध सुरू झाल्यामुळें यांना स्वदेशीं येणें कठीण झालें. त्यानंतर स. १९२१ पर्यंत यांच्याविषयीं इकडे कांहींच वृत्त आलें नाहीं. या दीर्घ अवधींत हे कांहीं वर्षे इराणांतील घशघई संस्थानामध्यें शिक्षणमंत्री आणि व्यापार व कृषि विभागाचे डायरेक्टर होते. तेथून तें राज्य सोडून हे १९२१ च्या नवंबरांत बर्लिनला गेले. यांच्या तेथील कामाबद्दल त्या संस्थानचे अमीर व प्रजाजन यांनीं मुक्तकंठानें प्रशंसोद्गार काढले आहेत.

बर्लिनमध्यें ह्यांची स्वामी सत्यदेवांशीं मुलाखत झाली. स्वामींनीं आपल्या 'मेरा जर्मन यात्रा' या आपल्या हिन्दी पुस्तकांत यांच्यासंबंधीं पुढील उद्गार काढले आहेत. 'यांच्याशीं माझा पूर्वीच परिचय होता. हे मोठे नम्र आणि विनयी आहेत. अमेरिकन विश्वविद्यालयाचे हे एम्.एससी. असूनहि साध्या मजुराप्रमाणें हे हिन्दी माणसाच्या सेवेंत तत्पर असतात. साधेपणा आणि सेवाव्रत धारण करून हिंदुस्थानांतून आलेल्या विद्यार्थ्यांना हे साहाय्य करीत असतात. यांना हिंदुस्थानांत जाण्याकरितां पासपोर्ट मिळत नाहीं.'

अमेरिकेंत न्यूयॉर्क शहरीं भारतीय विद्यार्थ्यांनीं

स्थापन केलेली 'दि हिंदुस्थान असोसिएशन ऑफ अमेरिका' या नांवाची एक सुप्रसिद्ध संस्था आहे. तिच्या आद्य संस्थापकांपैकीं हे एक आहेत. या संस्थेतर्फे 'दि हिंदुस्थानी स्टुडंट' या नांवाचें एक नियतकालिक प्रसिद्ध होत असतें. हे स. १९२४ सालीं जर्मनींतून मेक्सिकोंत गेल्यावर कांहीं दिवसांनीं यांना तेथील 'नॅशनल अग्रिकल्चर कॉलेजां'त कृषिशास्त्राच्या प्रोफेसराची जागा मिळाली.

हे स. १९२४ पासून अमेरिकेंत मेक्सिको देशांत वास्तव्य करून आहेत. यांनीं तेथील वास्तव्यांत कृषिविषयक जें महत्त्वाचें संशोधन केलें व पिकांबद्दल जे उपयुक्त शोध लावले, त्याबद्दल तेथील सरकारकडून व अन्य संस्थांकडून यांचा मोठा गौरव करण्यांत आला. विशेषतः तेथील 'नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्स' या विख्यात वैज्ञानिक संस्थेकडून यांचा जो अपूर्व सन्मान करण्यांत आला तो भारतवर्षाला व विशेषतः महाराष्ट्राला खचित अभिमानास्पद वाटण्यासारखा आहे.

कलकत्त्याच्या 'मॉडर्न रिव्हयू'चे संपादक रामानंद चतर्जी यांच्याच संपादकत्वाखालीं हिन्दींत निघणाऱ्या 'विशालभारत' नांवाच्या पत्रांत श्री. भवानीदयाल संन्यासी यांनींहि यांच्या आतिथ्यशीलतेची प्रशंसा करून यांना हिंदुस्थानांत येण्याबद्दल पासपोर्ट मिळत नसल्याबद्दल तक्रार केली (१९२८ डिसें.).

यांची 'दुर्जल कृषि' नांवाची लेखमाला पुणें येथें चित्रशाळेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या चित्रमयजगत् या मासिकांत क्रमशः तीन वर्षे (१९१३, १९१४, १९१५) मध्यें प्रसिद्ध झाली आहे (आनंदराव जोशी–पुरुषार्थ १९४१ मे).

यांनीं गवतापासून अन्न तयार करण्याचा शोध लावला आणि तो ब्राझील सरकारला दिला. तसेंच गव्हासंबंधीं यांनीं अनेक शोध लावलेले आहेत.

खानसाहेब, डॉक्टर—(जन्म स. १८८३) सरहद्द प्रान्तांतील राष्ट्रसभेचे मुख्य प्रधान.

हे सरहद्दगांधी अबदुल गफारखान यांचे थोरले बंधु. हे पेशावर येथें मिशन स्कूलमध्यें शिकून मॅट्रिक झाले आणि मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत एक वर्ष काढून हे इंग्लंड येथें गेले. तेथें एम्. आर्. सी. एस्. ही पदवी मिळवून हे पहिल्या महायुद्धांत सामील झाले. महायुद्धानंतर देखील हे फ्रान्समध्यें काम करीत होते. पुढें इकडे सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली तेव्हां यांना मोठ्या मुष्किलीनें इकडे येण्याची परवानगी मिळाली. हे इकडे आले तेव्हां घरांतील बहुतेक माणसें तुरुंगांत होतीं. ही स्थिति पाहतांच यांनीं तिकडील नोकरीचा राजीनामा दिला व पेशावर येथें आपला डॉक्टरीचा धंदा सुरू केला.

कॉंग्रेसनें मंत्रिमंडळ स्वीकारलें तेव्हां हे मुख्य प्रधान होते. पुढें कॉंग्रेसनें मंत्रिमंडळाचा त्याग केला तेव्हां यांनीं तें सोडलें. पुनः यांनीं मंत्रिमंडळ बनविण्याची जबाबदारी पत्करून हे मुख्य मंत्री झाले (मार्च १९४५). यांनीं एका युरोपियन स्त्रीशीं विवाह केला असून यांचीं मुलेंहि चळवळींत भाग घेणारीं आहेत (खान बंधू–प्रेमा कंटक).

खानापूरकर, विनायक पांडुरंग—(जन्म स. १८५८–मृत्यु स. १९१९) सुप्रसिद्ध गणितज्ञ ज्योतिषी.

हे जामदग्न्यगोत्री ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. सातारा जिल्ह्यांतील खानापूर येथें राहणारे होत. यांचें संस्कृत भाषा, व्याकरण, ज्योतिष इत्यादिकांचें अध्ययन जुन्या पद्धतीनें झालें असून शिवाय युरोपीय गणित आणि ज्योतिष यांचें अध्ययन केरोपंत नाना छत्रे, रावजी मोरेश्वर देवकुळे यांजपाशीं झालें. स. १८७५ मध्यें पुणें येथें वेदशास्त्रोत्तेजक सभा सुरू झाली, तिजपुढें यांची भारतीय ज्योतिष आणि संस्कृत व्याकरण यांची परीक्षा झाली.

वैनायकीय द्वादशाध्यायी या नांवाचा ताजक ग्रंथ वर्षफल करण्यास फार सोयीचा असा यांनीं केला आहे. तसेंच कुंडसार, अर्घकांड, युक्लिडच्या दोन पुस्तकांतील सिद्धान्तांच्या प्रतिज्ञांचा वृत्तबद्ध संस्कृत अनुवाद, सिद्धान्तसार हे संस्कृत ग्रंथ यांनीं केले आहेत. सिद्धान्तसार ग्रंथांत पृथ्वीच्या गति इत्यादिकांचें विवेचन आधुनिक मताप्रमाणें केलें आहे. भास्करीय लीलावती, बीज, गोलाध्याय व गणिताध्याय यांचें मराठी भाषान्तर यांनीं सोपपत्तिक केलें आहे (भा. ज्यो. इ. पा. ३०७).

खापर्डे, गणेश कृष्ण—(जन्म स. १८५४–मृत्यु स. १९३८) सुप्रसिद्ध वकील, विद्वान्, वक्ते व सार्वजनिक कार्यकर्ते पुरुष.

यांचा जन्म निजाम राज्यांत इंगोली येथें झाला. त्या दिवशीं गणेशचतुर्थी असल्यामुळें यांचें गणेश असें नांव ठेवण्यांत आलें. तथापि लोकांत हे दादासाहेब या नांवानें प्रसिद्ध होते. यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण नागपूर, उमरावती व अकोला येथें झालें. त्याच वेळीं यांनीं संस्कृतचें अध्ययन त्या वेळीं प्रसिद्ध असणारे नारायणशास्त्री पिंजरकर यांचेपाशीं शास्त्रशुद्ध पद्धतीनें केलें. त्याचा परिणाम यांच्यावर सबंध आयुष्यभर आढळून येत असे. स. १८७३ सालीं हे मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजांत दाखल झाले. क्रमानें बी. ए. होऊन (१८७७) चार वर्षें फेलोशिपचा उपभोग घेऊन एल्एल्. बी. झाले (१८८३). स. १८८४-८९ पर्यंत एक्स्ट्रॉ असिस्टंट कमिशनर म्हणून नोकरी करून स. १८९० सालीं यांनीं नोकरी सोडून वकीलीला सुरुवात केली.

वकिलीला आवश्यक असणारे गुण तर यांच्याजवळ होतेच. शिवाय विद्वत्ता, मोहक वाणी, सरकारी कामाचा अनुभव यांमुळें लवकरच हे वऱ्हाडांतील प्रमुख वकील बनले. फौजदारी खटल्यांतील मार्मिक व शोधक पण गोड उलट तपासणीमुळें आणि दिवाणी खटल्यांतील सूक्ष्म विवेचनामुळें यांचा दर्जा सारखा वाढतच चालला. पैशाचा तर यांच्यावर नुसता पाऊस पडे. एके वर्षी यांना ऐंशी हजार रुपये मिळाल्याचा दाखला आहे.

या यांच्या उत्कर्षाबरोबरच सार्वजनिक कार्यांतहि यांनीं पदार्पण केलें. स. १८९५ पासून सरकारनें काढून टाकीपर्यंत हे उमरावती म्युनिसिपालिटीचे व्हा. चेअरमन होते. म्हणजे तेव्हांचे त्या संस्थेचे सर्वांत मोठे लोकनियुक्त अधिकारी होते. उमरावती जिल्हा बोर्डाचे कित्येक वर्षें अध्यक्ष होते (१८८९-१९०७). एवढेंच कीं, दरम्यान हे सरकारनियुक्त अध्यक्ष नेमले गेल्यामुळें यांना उपाध्यक्ष म्हणण्यांत येई.

यांच्या कार्यकर्तृत्वामुळें स. १८९२ सालीं नागपूर येथें भरलेल्या सामाजिक परिषदेचें अध्यक्षस्थान व स. १८९७ सालीं उमरावती येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेचें स्वागताध्यक्षपद यांनाच देण्यांत आलें.

काँग्रेसमध्यें यांनीं अनेक परिणामकारक भाषणें केलीं. विशेषेकरून, मुंबई (१८९८), मद्रास (१९०३) व काशी (१९०५) येथील लॉर्ड कर्झनच्या धोरणावर केलेलें उपरोधिक भाषण हीं तीन भाषणें यांचीं फार प्रसिद्ध आहेत. स. १९०५ सालीं मध्यप्रान्त-प्रांतिक परिषदेचें अध्यक्षस्थान यांनाच देण्यांत आलें होतें.

हे स्वाभिमानी असल्यानें प्रथमपासूनच राष्ट्रीय विचाराचे होते. पण यांची एक सून श्रीमंत बाबामहाराज पुणें यांची कन्या असल्यामुळें आणि त्यांची सर्व जिनगी श्रीमंत जगन्नाथमहाराजांच्या हातीं जाईपर्यंत बाबामहाराजांच्या जिनगीचे हे एक ट्रस्टी असल्यामुळें लोकमान्य टिळकांशीं यांचा परिचय झाला व स्नेह वृद्धिंगत होत गेला, व हे राष्ट्रीय पक्षाशीं एकरूप झाले. पुढें तर हे असें स्पष्ट सांगत कीं, 'मी एका लोकमान्य टिळकांखेरीज जन्मांत कधीं कोणाचा अनुयायी झालों नाहीं.'

स. १९०७ सालीं यांच्यावर सरकारी रोष होऊन यांना उमरावती शहर म्युनिसिपालिटीच्या उपाध्यक्षपदावरून काढून टाकण्यांत आलें, तेव्हां यांनीं जिल्हा-बोर्डाचें उपाध्यक्षत्वहि सोडून दिलें. यांच्याविषयीं सहानुभूति व सरकारचा निषेध करण्याकरितां सर्व लोकनियुक्त सभासदांनींहि राजीनामे दिले. या वेळीं यांनीं निर्भयपणें राष्ट्रीय पक्षाचा पुरस्कार करून कोणताहि धोका पत्करण्याची तयारी दाखविली.

काँग्रेसच्या सुरक्षितपणाकरितां फिरोजशाह मेथा यांनीं नागपूर हें तिचें पूर्वनियोजित स्थळ रद्द करून ती सुरतेस भरविण्याचें निश्चित केलें (१९०७), तेव्हां सुरत येथें आपल्याला अनुकूल भूमिका उत्पन्न करण्याकरितां लो. टिळकांनीं यांनाच तेथें पाठविलें. यांनींहि पण पक्षकारांची घेतलेली फी परत करून १६ डिसेंबरला सुरत गांठली. आणि मराठी, उर्दू, हिंदी, संस्कृत वगैरे भाषाप्रमाणेंच गुजराथी भाषेंतहि आपलें मोहक, विनोदी आणि विलक्षण परिणामकारक वक्तृत्व चालवून यांनीं तेथील वातावरण बदलून टाकलें. स. १९०८ सालीं टिळकांना पकडल्याचें कळतांच वडिलांचें दुसरे दिवशींचें श्राद्ध व इतर कामें बाजूस सारून हे मुंबईस येऊन त्यांच्या सन्निध दाखल झाले, व शिक्षा होतांच हे अपील वगैरे खटपटीकरितां परस्पर मुंबईहूनच इंग्लंडला रवाना झाले. खटपटीला यश न येतांच हे परत आले व मंडाले येथें टिळकांना भेटून सव्वादोन वर्षांनीं पुनः घरीं गेले. त्या अवधींत यांच्या वृद्ध माता मुक्ताबाई ७३ वर्षांच्या होऊन मृत झाल्या होत्या. त्यांची यांची अखेरची भेटहि झाली नाहीं.

टिळक सुटून आल्यावर पुनः राजकीय चळवळीस रूप येऊं लागलें. काँग्रेसमध्यें राष्ट्रीय पक्षानें शिरावें असें ठरतांच त्या प्रश्नाचा निर्णय करण्याकरितां बेळगांव येथें

मुंबई प्रांतिक परिषदेचें अधिवेशन भरविण्यांत आलें (१९१). त्या परिषदेचें अध्यक्षस्थान टिळकांनीं यांनाच दिलें. त्या वेळचें यांचें भाषण अत्यंत मार्मिक व विचारपूर्ण असें आहे.

स. १९१७ सालीं भारतमंत्री मॉंटेग्यु राजकीय सुधारणांबाबत चौकशी करण्याकरितां हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांना भेटण्याकरितां दिल्लीस गेलेल्या कॉंग्रेस डेप्युटेशनमध्यें हे होते. तसेंच दिल्लीच्या कौन्सिलांतहि हे होते (१९१८). मॉंटफोर्ड सुधारणा अंमलांत आल्यावर 'कौन्सिल ऑफ स्टेट'मध्यें हे निवडून आले व तेथें यांनीं उत्कृष्ट कामगिरी केली. स. १९१९ सालीं खांडवा येथें भरलेल्या वऱ्हाड-मध्यप्रान्त प्रांतिक परिषदेच्या अध्यक्षस्थानीं यांची योजना झाली होती. थोड्याच दिवसांनंतर कॉंग्रेस डेप्युटेशनमधून हे इंग्लंडास गेले. तेथें यांचा मुक्काम तेव्हां ७-८ महिने होता. तेथील यांच्या इंग्रजींतील विनोदी वक्तृत्वामुळें यांची इतकी प्रसिद्धि झाली कीं, यांना तेथील वृत्तपत्रांनीं 'हिन्दी मार्क ट्वेन' म्हणून टोपण नांव दिलें.

स. १९२० सालीं लोकमान्य मुंबईस विशेष आजारी आहेत असें कळतांच हे ताबडतोब मुंबईस आले. शेवटीं त्यांचें देहावसान होतांच यांनीं आपली कर्तव्यबुद्धि जागृत ठेवून सर्वांस सुचविलें कीं, 'बळवंतरावांसारखा पुरुष पुनः आतां होणें नाहीं, व आपल्यांपैकीं कोणाहि एकाला त्यांचें काम पुढें चालवितां येणें शक्य नाहीं. तेव्हां आपण आतां त्यांच्याच शपथा घेऊन अखिल महाराष्ट्रासाठीं एक मंडळ नेमून त्याच्या सल्ल्यानेंच सर्वजण चालत जाऊं. असें करूं तरच आपला निभाव लागेल व त्यांचें कठीण कार्य आपण पुढें चालवूं शकूं.' पण ही यांची सूचना अनेक कारणांनीं त्या वेळीं अमलांत आली नाहीं.

असहकारितेचा ठराव प्रथम ज्या कॉंग्रेसमध्यें पास झाला त्या कलकत्त्याच्या (१९२०) व त्यानंतरच्या नागपूरच्या कॉंग्रेसला (१९२१) हे गेले होते. पण यांच्या सांगण्याचा तेथें परिणाम झाला नाहीं. तेव्हांपासून देशांत असहकारितेची चळवळ सुरू झाली व हे राजकारणांतून प्रायः निवृत्त झाले.

त्यानंतर श्रीजगन्नाथमहाराजांच्या दाव्याकरितां हे इंग्लंडला गेले व तिकडे पांच महिने होते (१९२३). पुण्याचें टिळक स्मारक-मंदिर उघडण्याचा समारंभ यांचेच हस्तें झाला. त्या वेळीं यांनीं केलेल्या अतिसुंदर भाषणामुळें महाराष्ट्राच्या राजकारणाला वळण लागण्यास अतिशय मदत झाली. स. १९२८ ऑक्टोबरांत यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई ऊर्फ आईसाहेब वारल्या. आणि आपला सार्वजनिक व्याप यांनीं अगदीं सोडला.

यांच्या घरीं नित्य पंक्तीस घरच्या मंडळीइतकी तरी पाहुण्यांची गर्दी असे. नेहमीं ५०-६० विद्यार्थ्यांना तरी फी, पुस्तकें, भोजन वगैरेपैकीं कांहींची तरी मदत होत असे. मधुकरी इतकी वाढण्याचा परिपाठ असे कीं, मधुकऱ्याचें एक वेळचें पोट यांच्या घरच्या अन्नानें भरावें.

यांच्या उंच, भव्य शरीरयष्टीप्रमाणेंच यांचा पोषाखहि नेहमीं भपकेदार व वैशिष्ट्यपूर्ण असे. विशेषतः यांचा भरजरी फेटा डोक्यावर श्रींच्या वेलांटीप्रमाणें मोठ्या भपकेदारपणें उभवून डोक्याला लपेटलेला असे. त्यामुळें यांच्याकडे कोणाचेंहि सहज लक्ष वेधे. औदार्यपूर्ण व खर्चिक वागणूक, भपकेदार पोषाख आणि भारदस्त खुमासदार भाषण यांमुळें यांना लोक 'वऱ्हाडचे नबाब' या टोपण नांवानें संबोधीत.

खांडेकर, विष्णु सखाराम—(जन्म स. १८९८) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध कथालेखक, कादंबरीकार व टीकालेखक.

यांचे वडील आत्मारामपंत सांगलीस मुन्सफ होते. परंतु कोंकणांतील आपल्या एका जमीनदार चुलत्याला दत्तक गेल्यानें हे विष्णु सखाराम बनले (१९१६). वडील पूर्वीच वारले असल्यानें (१९११) व दत्तक वडिलांशीं यांचें कधींच जमूं-न शकल्यानें शिक्षण व मनःस्वास्थ्य यांना हे मुकले. वकिलीची परीक्षा देऊन काल कंठणें शक्य असतांहि, आगरकरांच्या त्यागी जीवनाची चमत्कारिक छाप मनावर शाळेंत असले वेळेपासूनच बिंबली गेली असल्यानें यांनीं कोंकणांतील शिरोड्याला 'टयूटोरियल इंग्लिश स्कूल' नांवाची शाळा काढली (१९२०), व ती नांवारूपास आणण्याची जिवापाड मेहनत घेतली. आतां यांचा या शाळेशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं.

उत्कृष्ट कल्पनासौंदर्य बाळगणारे एक रसिक लेखक या दृष्टीनें सर्वसाधारण मराठी वाचक यांना ओळखतात. परंतु यापेक्षांहि महाराष्ट्रांत प्रचलित होऊं पाहणाऱ्या 'जीवनासाठीं कला' या विचारप्रणालीचे जनक या

दृष्टीनें यांस विशिष्ट महत्त्व आहे. सुसंगति, स्वभाव-चित्रण किंवा प्रसंगीं लालित्य या बाह्य गोष्टींपेक्षां वाचकाला पुनःप्रत्यय पटवून प्रत्यक्ष जीवनांत उपयोगी पडणारे नवीन संदेश देणारें वाङ्मय उत्पन्न करणें हें वाङ्मयसेवकाचें कार्य आहे, अशा प्रकारची विचारसरणी यांनीं या वादामध्यें गोवलेली आहे.

अर्थातच याशिवाय अन्य दृष्टिकोनांतून 'कांचनमृग', 'उल्का', 'क्रौंचवध' हें यांचें कादंबरी-वाङ्मय, 'नवमल्लिका', 'पहिली लाट', 'घरट्यावाहेर' हे यांचे कथासंग्रह किंवा 'छाया', 'देवता', 'संगम' या यांच्या पटकथा तपासून पाहणाऱ्या वाचकांची थोडी निराशाच होण्याचा संभव आहे.

खांबेटे, महादेव लक्ष्मण—(जन्म स. १८६८) प्रसिद्ध वकील, व्यापारी व रत्नपारखी. यांचा जन्म आंजर्ले येथें झाला. रत्नागिरी हायस्कुलांतून मॅट्रिक होऊन (१८८९) हे डिस्ट्रिक्ट प्लीडर झाले (१८९३). यांनीं १९१४ पर्यंत खानदेशांत जळगांवीं वकिली केली.

१९०२-२७ पर्यंत सोन्या-चांदीच्या मालाचें व मोतीं-जवाहिरांचें दुकान यांनीं घातलें. त्याचप्रमाणें दागिने व भांड्यांचा कारखाना चालविला. त्याबद्दल अनेक ठिकाणांहून पदकें व प्रशस्तिपत्रें मिळालीं.

जळगांव नगरपालिकेंत सभासद, कार्याध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून कामें केलीं. खांबेटे व्यायामशाळा १५०० रु., आंजर्ले इंग्रजी शाळा १२०० रु., जळगांव हायस्कूल १००० इत्यादि पुष्कळ देणग्या दिल्या.

जवाहिराचा व्यापार सुरू केल्यावर मौल्यवान् धातु, मोतीं व रत्नांचा अभ्यास केला, व त्यासंबंधीं मौक्तिक-प्रकाश, रत्नप्रदीप (दोन खंड) असे तीन सुंदर शास्त्रीय ग्रंथ प्रसिद्ध केले. या ग्रंथांत यांचा अभ्यास व अनुभव चांगला व्यक्त झाला आहे.

खुदाबक्ष, मुहम्मदबक्ष, खानबहादूर—(जन्म स. १८४२-मृत्यु स. १९०८) पाटणा ओरिएन्टल पब्लिक लायब्ररीचे संस्थापक. तीच लायब्ररी पुढें 'खुदाबक्ष लायब्ररी' म्हणून यांच्या नांवानें प्रसिद्ध झाली. यांनीं लायब्ररीच्या इमारतीकरितां ऐंशी हजार रुपये खर्च केले (१८९१). हे सुप्रसिद्ध वकील असून निजामसंस्थानच्या हायकोर्टचे हे मुख्य न्यायाधीश होते (१८९४-९८). यांचा जन्म बिहारमधील चाप्रा गांवीं झाला.

यांनीं पाटणा ओ. प. लायब्ररी तेथील हस्तलिखितें पाटण्याच्या बाहेर हलवावयाचीं नाहींत, या अटीवर सार्वजनिक केलेली आहे. या वाचनालयांत मुसलमानी वाङ्मयाचा अतिशय उत्तम संग्रह आहे. त्यांत अरबी, फारशी व इराणी भाषेंतील अत्यंत दुर्मिळ व महत्त्वाचे हस्तलिखित ग्रंथ आहेत.

जुन्या मुसलमानी जगांत वाङ्मय व ज्ञान या दोन्ही शाखांत तत्कालीन पंडितांनीं प्रगट केलेल्या चांगल्या-वाईट समजुतींची यथार्थ कल्पना आणून देणारा अमोल पुस्तकसंग्रह अशी त्याची जगभर प्रसिद्धी आहे. आपल्या वडिलांच्या अखेरच्या इच्छेला मान देण्याकरितां यांनीं या कार्यांत लक्ष घातलें. पण तेंच पुढें यांचें जीवितकार्य होऊन बसलें. दुर्मिळ हस्तलिखित ग्रंथ जमविणें व त्यांचा ज्ञानेच्छु लोकांकडून उपयोग झालेला पाहणें यांतच यांचा सर्व आनंद सामावला जाऊं लागला. कधींकधीं तर आपल्या मासिक प्राप्तीपेक्षांहि जास्त खर्च हे या ग्रंथ-संग्रहाकरितां करीत. यांच्याजवळ प्रथम १४०० हस्त-लिखितें होतीं. तीं वाढवीत हा संग्रह सार्वजनिक करिते वेळीं ४००० झालीं व यांच्या मृत्युसमयीं ती संख्या ५००० पर्यंत गेली होती. यांमध्यें डी. सॅकी, सर जॉर्ज औसले व मि. ब्लॉकमान यांसारख्या तज्ज्ञ प्राच्यविद्या-पंडितांनीं जमविलेल्या हस्तलिखितांचाहि संग्रह करण्यांत आला. 'महबूब-उल्-अल्बाब' या आपल्या हस्तलिखि-तांच्या संग्रहाची यांनीं केलेली सूची प्रसिद्ध आहे.

सर डेन्शन रॉस व सर चार्लस लॉयल यांचेमुळें लॉर्ड कर्झन यांचें लक्ष या संग्रहाकडे गेलें. तेथील अपूर्व व अमोल संग्रह पाहून ते तर थक्कच झाले. त्यांनीं वाचना-लयाकरितां इमारत व हस्तलिखितांची सूची या दोन कामाकरितां सरकारी मदत देण्याची ताबडतोब व्यवस्था केली. त्याप्रमाणें सर डेन्शन रॉस यांच्या नेतृत्वानें तयार झालेली तेथील हस्तलिखितांची अनेक खंडात्मक सूची सरकारनें प्रसिद्ध केली आहे.

मृत्युपूर्वी यांनीं प्रकट केलेल्या इच्छेस अनुसरून यांचा दफनविधि यांच्या प्रिय ग्रंथसंग्रहालयाचे आवारां-तच उरकण्यांत आला.

खेर, बाळ गंगाधर—(जन्म स. १८८८) सुप्रसिद्ध कॉंग्रेसकार्यकर्ते व मुंबई इलाख्याचे माजी मुख्य प्रधान.

जन्मस्थान रत्नागिरी. नगर सोसायटी हायस्कूलमधून मॅट्रिक व मुंबई, विल्सन कॉलेजमधून बी. ए. (१९०६).

संस्कृतचें 'भाऊ दाजी' पारितोषिक मिळालें. नंतर १९०८ मध्यें एल्एल्. बी. झाले व सॉलिसिटर फर्ममध्यें नांव नोंदविलें (१९०९). स. १९१२ मध्यें युरोप व अमेरिकेचा प्रवास करून परत आले. परत आले तेव्हां जवळ खिशांत अवघे दोन रुपये होते. तेव्हां नोकरी-करितां वर्तमानपत्रांत पुढीलप्रमाणें जाहिरात दिली : 'डबल ग्रॅज्युएटला नौकरी पाहिजे आहे.' त्यावरून न्या. बीमन यांनीं यांना आपले सेक्रेटरी म्हणून बोलाविलें. न्यायमूर्ति डोळ्यांनीं जवळजवळ अंध होते. स. १९१६ मध्यें हे न्यायमूर्तीबरोबर पुनः परदेशांत प्रवासास निघाले. परत आल्यावर मणिलाल नानवटी-बरोबर सॉलिसिटरची फर्म चालू केली (१९१८). तिचें उद्घाटन न्या. बीमन यांच्या हस्तें केलें, आणि त्याच व्यवसायांत उत्तम यश संपादन केलें.

सामाजिक कार्य तेव्हांपासून चालू होतेंच. राज-कारणाकडे तर लहानपणापासूनच ओढा होता. गांधींच्या राजकारणाकडे अभ्यासपूर्वक यांनीं लक्ष दिलें (१९२२). तेव्हां हे स्वराज्यपार्टीचे व बार्डोली चौकशी कमेटीचे सेक्रेटरी होते. यांनीं मुंबईत हरिजनांच्या उद्धारार्थ एकसारखे प्रयत्न चालू ठेविले. महाराष्ट्र हरिजन-सेवक-संघाचे हे अध्यक्ष होते. स. १९३० मध्यें मीठसत्याग्रहांत यांनीं भाग घेतला व यांना ८ महिने सश्रम कारावास व २५० रु. दंड झाला. स. १९३२ मध्यें यांना दोन वर्षें कारागृहवास भोगावा लागला. यांच्या या एकनिष्ठ व गोडव्या कार्याचा परिणाम म्हणून स. १९३७ सालीं राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें स्थापन झालीं, तेव्हां मुंबई प्रान्ताचें मुख्य मंत्रिपद यांच्याकडे आपण होऊन चालत आलें, आणि यांनीहि पण तें अत्यंत यशस्वीपणें चालवून आपला व राष्ट्रसभेचा लौकिक वाढविला.

पुढें दुसरें महायुद्ध सुरू होतांच सरकारचा युद्ध-हेतु स्पष्टपणें जाहीर होईना, म्हणून राष्ट्रसभेच्या मंत्रिमंडळानें राजिनामे दिले. तेव्हां यांनींहि राजीनामा दिला. ८ ऑगष्ट १९४२ च्या 'चलेजाव' घोषणेमुळें सर्व राष्ट्रसभेचे पुढारी तुरुंगांत गेले; त्यांत हेहि तुरुंगांत गेले. जवळजवळ दोन वर्षांनंतर तुरुंगांतून सुटून येतांच यांनीं सर्व प्रान्तभर हिंडून विधायक कार्यास सुरुवात केली.

हे बहुभाषाकोविद आहेत. कानडी साधारण व गुज-राथी भाषाहि हे सफाईदारपणें हाताळूं शकतात. कायदे-भंगाच्या चळवळींत हजारों लोक तुरुंगांत गेले, पण आपणास अपमानकारक वाटणाऱ्या अटींना मान न तुकवितां प्रत्यक्ष आपल्या जन्मदात्याच्या अन्त्यदर्शना-साठीं तुरुंगांतून बाहेर पडण्याचें यांनीं नाकारलें. अत्यंत ध्येयनिष्ठ, बुद्धिमान्, निग्रही, सच्छील, चारित्र्यसंपन्न व अजातशत्रु असा यांचा लौकिक आहे, आणि अधिकाराचा उपभोग घेतल्यानंतरहि यांनीं तो टिकविला आहे.

ग

गजेन्द्रगडकर, राघवेन्द्राचार्य वेंकटाचार्य— (जन्म स. १७९२–मृत्यु स. १८५२) विख्यात संस्कृत पंडित. धारवाड जिल्ह्यांत निजामच्या राज्याच्या सीमेवर गजेन्द्रगड या नांवाचा एक किल्ला आहे. त्याच किल्ल्या-वर यांचा जन्म झाला. यांच्या मातेचें नांव सावित्री. पिता लवकर वारल्यानें यांचें पालनपोषण मातेनेंच केलें. सांगलीजवळील हरिपुर गांवीं चुलते व्यासाचार्य यांच्या-जवळ प्राथमिक अध्ययन केल्यावर पंढरपुरीं विठ्ठलो-पाध्याय यांच्याकडे हे उच्च शिक्षणाकरितां गेले. तेथें प्रसिद्ध पंडित पंढरपूर कृष्णाचार्य, हुलगी कृष्णाचार्य इत्यादि यांचे सहाध्यायी होते. विठ्ठलोपाध्याय हे धर्म-सिंधुकार काशीनाथोपाध्याय यांचे बंधु व गदाधरीचे व्याख्याकार कृष्णंभट आर्डे यांचे शिष्य होत. ते तेथील न्यायाधीश असल्यानें त्यांना शिकविण्यास वेळ मिळेना म्हणून हे ज्ञानसूर्य म्हणून प्रसिद्ध असलेल्या नागोजी-भट्टाच्या परंपरेतील नीलकंठशास्त्री थत्ते यांच्याकडे पुणें येथें येऊन राहिले. यांची बुद्धिमत्ता पाहून थत्त्यांनीं यांना सकुटुंब होते तरी घरीं आश्रय देऊन निष्णात केलें. तेथें यांचे सहाध्यायी भास्करशास्त्री अभ्यंकर, मेरुशास्त्री गोडबोले व कुप्पाशास्त्री द्रविड वगैरे पंडित होते. असे निष्णात शिष्य तयार झाल्यावर अखेरचे दिवस काशीस घालविण्याच्या हेतूनें ते निघाले. हे त्यांना नाशिकपर्यंत पोंचविण्यास गेले होते. पुण्यास कांहीं दिवस राहून हे गजेन्द्रगडाकडे निघाले असतां यांना सातारच्या छत्रपतींनीं आश्रय देऊन ठेवून घेतलें. तेथें यांच्याकडे देशोदेशींचे एका वेळीं २०० पर्यंत विद्यार्थी

शिकत असत. त्यांची सर्व प्रकारें तेथें व्यवस्था होत असल्यानें घराला गुरुकुलाचें स्वरूप असे. कर्नाटकांतील प्रसिद्ध वैय्याकरण हनुरदासाचार्य, त्यांचे बंधु खुब्बाचार्य, बापुशास्त्री पटवर्धन, अनंतशास्त्री पेंढारकर वगैरे यांचे शिष्य होत.

पूर्वमीमांसेचें अध्ययन केल्यावांचून उत्तरमीमांसेचें अध्ययन विफल होय, हें जाणून यांनीं श्रौताग्न्याधानपूर्वक पूर्वमीमांसेचें अध्ययन केलें होतें. प्रातःकाळीं अग्नीची उपासना झाल्यावर देवघराच्या पुढील सोप्यावरच हे सकाळीं विद्यार्थ्यांना वेदान्ताचे पाठ देत आणि भोजनोत्तर इतर दर्शनांचे पाठ चालत. असें सतत बीस वर्षे अध्यापनकार्य यांनीं साताऱ्यास केलें. यानंतर ग्वाल्हेरनराधीशानें प्रधानन्यायाधीशपदावर यांची नेमणूक केल्यावर हे ग्वाल्हेरला गेले. पण तेथें जातांच यांचा कनिष्ठ पुत्र वामनाचार्य काशीस महामारीनें मृत्यु पावल्याची दुःखद वार्ता ऐकतांच यांनीं न्यायाधीशाची जागा सोडली व हे ब्रह्मावर्ती गंगातटाकी येऊन राहिले व तेथें यांनीं आपलें शेष आयुष्य सत्कर्मांत व्यतीत केलें. यांचे ग्रंथ–व्याकरण-१ विषमी, २ चंद्रिका (या दोन्ही शब्देंदुशेखरावरील टीका आहेत. पहिली मुद्रित व दुसरी अमुद्रित), ३ प्रभा (कौस्तुभव्याख्या, अमुद्रिता), ४ त्रिपथगा (परिभाषेन्दुशेखरव्याख्या–मुद्रिता), ५ प्रभा (शब्दरत्नव्याख्या–अमुद्रिता. या टीकेंत स्वकृत भाष्यटीकेचा निर्देश आहे पण ती उपलब्ध नाहीं). वेदान्त–६ विष्णुसहस्रनामटीका (मुद्रित), ७ नारायणोपनिषद्व्याख्या (मुद्रित), ८ उपाधिखंडनटीका (अमुद्रित), ९ गीताटीका (,,), १० श्वेताश्वतर टीका (,,), ११ रामतापिन्यादि उपनिषद्व्याख्या (,,).

यांचे तृतीय पुत्र रामाचार्य हे ग्वाल्हेर राज्याचें आस्थान पंडित असल्यानें त्यांचें घराणें तिकडे आहे. यांचे द्वितीय पुत्र नारायणाचार्य यांचा वंश साताऱ्यास असून त्यांनीं यांच्या पांडित्याची परंपरा अखंड चालविली आहे.

गजेन्द्रगडकर, नारायणाचार्य राघवेन्द्राचार्य—(जन्म स. १८१८–मृत्यु स. १८७३) सुप्रसिद्ध संस्कृत पंडित. हे न्याय, वेदान्त, व्याकरणादि शास्त्रांत निष्णात होते. विद्यार्थी तयार करणें हा त्या वेळच्या पंडितांस असणारा छंद यांनाहि होता. तथापि यांची कीर्ति पुनर्विवाहवादामुळें विशेष झाली. पुणें येथें श्रीशंकराचार्यांच्या पुढें शके १७९१ फा. व. ११ ते १७९२ चैत्र शु. ३ पर्यंत नऊ दिवस हा वाद चालला. उभयपक्षांचे पांचपांच मिळून दहा पंच होते. गोपाळाचार्य अण्णा कऱ्हाडकर हे सरपंच होते. विष्णुशास्त्री पंडित हे वादी व हे प्रतिवादी होते. पंडितांना न्या. रानडे, डॉ. भांडारकर वगैरे मदत करीत होते. त्यांना उत्तर देण्याचें काम यांच्याकडे होतें. शेवटीं पांच विरुद्ध चार अशा बहुमतानें पुनर्विवाह अशास्त्र, असा शंकराचार्यांनीं निर्णय दिला.

यांचे ग्रंथ–१ महावाक्यार्थखंडनम्, २ ब्रह्मानंदीखंडनम्, ३ ब्रह्मविद्याभरणखंडनम्, ४ श्वेताश्वतरोपनिषद्व्याख्या (मुद्रिता), ५ शंकरपादभूषणखंडनम्, ६ पुनर्विवाहखंडनम्, ७ न्याये बहूनि क्रोडपत्राणि.

गजेन्द्रगडकर, अनंताचार्य नारायणाचार्य–(जन्म स. १८३५–मृत्यु स. १८९३) सुप्रसिद्ध संस्कृत पंडित. यांचा जन्म वाई येथें रट्टी यांच्या घरीं झाला. यांचें अध्ययन ब्रह्मावर्ती आजे राघवेन्द्राचार्य यांजपाशीं झालें. तेथें व्याकरण व न्यायशास्त्राचें अध्ययन पुरें केलें. स. १८६० चे सुमारास हे साताऱ्यास परत आले. तेथें आपले वडिलांच्या जवळ अद्वैतसिद्धि, न्यायामृतचंद्रिका वगैरे ग्रंथांचें अध्ययन केलें व घराण्यांतील अध्यापनाचें कार्य सुरू केलें. स. १८७८ सालीं कऱ्हाड मुक्कामीं मायणीचे गर्बारे यांचे मुलाचे दत्तकासंबंधीं श्रीशंकराचार्यांसमोर जो वाद झाला त्यांत हे मुख्य होते. स. १८८४ सालीं मद्रास येथें स्त्रीपुनर्विवाहाच्या अशास्त्रतेबद्दल दि. ब. रघुनाथराव यांनीं जो वाद उपस्थित केला त्यांत हे मुख्य होते. समयसूचकता व वक्तृत्व यांबद्दल यांची ख्याति असे. यांनीं शब्देंदुशेखराच्या तिङन्त प्रकरणावर केलेलें व्याख्यान अमुद्रित आहे.

गजेन्द्रगडकर, बाळाचार्य अनंताचार्य—(जन्म स. १८६२–मृत्यु स. १९२२) सुप्रसिद्ध संस्कृत पंडित. यांना अनेक ग्रंथ मुखोद्गत असत. द्वैत व अद्वैत वेदान्त यांनीं अनेकांना शिकविला. सुधातत्त्वप्रकाशिकादि ग्रंथ यांचे तयार असत. सदर ग्रंथांचें ठरलेलें अवलोकन करण्याचा यांचा क्रम आमरण चालू होता. पंजाब, म्हैसूर, जयपूर, पुणें, बडोदें वगैरे ठिकाणीं हे परीक्षक असत. विद्याव्यासंग, सरळपणा, आस्तिकवृत्ति, जिज्ञासा व देशाभिमान यांचा यांच्या आचरणांत उत्तम मेळ दिसे. द्वैत-वेदान्तभूषण, पुराणभूषण, नरसिंहाचार्य (मृत्यु स. १९३५), सुप्रसिद्ध पंडित

व्याकरणनिष्णात विद्यावाचस्पति सेतुमाधवाचार्य (मृत्यु स. १९३८), प्रो. अश्वत्थामाचार्य, एम्. ए. एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई, (जन्म स. १८९१), केशवाचार्य बी. ए. एलएल्. बी. सातारा, मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ति प्रल्हादाचार्य, एम्.ए., एलएल्. बी. (जन्म स. १९००) हे यांचे पांच पुत्र होत.

गजेन्द्रगडकर, न्यायमूर्ति प्रल्हादाचार्य बाळाचार्य—(जन्म स. १९००) मुंबईचे सुप्रसिद्ध वकील व मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश.

लहानपणापासूनच हुषार विद्यार्थी म्हणून यांची ख्याति आहे. बी. ए.च्या परीक्षेंत हे पहिल्या वर्गांत पास झाल्यावर पुणें डेक्कन कॉलेजांत यांना 'दक्षिणा फेलो' नेमलें. हे एम्. ए.ची परीक्षा संस्कृत घेऊन पहिल्या वर्गांत पास झाले व यांना 'झाला' वेदान्त प्राइझ व भगवानदास शिष्यवृत्ति मिळाली. हे एलएल्. बी. झाल्यावर मुंबई येथें वकिली करूं लागले. तेथें वकील म्हणून इतका मोठा लौकिक अल्पवयांतच झाला कीं यांना हायकोर्ट न्यायाधीशाची जागा देण्यांत आली. धर्मकोशाच्या संपादकमंडळांत हे आहेत.

असें क्रमानें पांच पिढ्या पहिल्या प्रतीचे विद्वान् निर्माण करणारें घराणें क्वचितच आढळतें.

गज्जर, त्रिभुवनदास कल्याणदास—(जन्म स. १८६३–मृत्यु स. १९२०) गुजराथमधील सुप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ.

यांचा जन्म सुरत येथील सुतार जातीच्या कुटुंबांत झाला. हे मॅट्रिक झाल्यावर रसायनशास्त्र घेऊन मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांतून पहिल्या वर्गांत बी. एससी. ची परीक्षा पास झाले. एम्. ए. होऊन यांनीं कायद्याचाहि अभ्यास सुरू केला होता. पण यांच्या मनांत विज्ञान आणि रसायन यांसंबंधीं लोकहितार्थ अधिक काम करण्याची इच्छा होती. म्हणून यांनीं कराचीच्या सिंध कॉलेजमध्यें प्राध्यापकाचें काम पत्करिलें. पण श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या आश्रयानें रासायनिक व्यवसाय करणें अधिक सोईचें म्हणून यांनीं बडोदा कॉलेजमध्यें रसायनशास्त्राच्या प्राध्यापकाची जागा पत्करिली.

बडोदा राज्यांत यांनीं रंगकामाच्या व्यवसायासंबंधीं अहवाल तयार केला, त्याची अंमलबजावणी करण्याकरितां छापकामाची व रंगकामाची प्रयोगशाळा काढली आणि व्यापक पायावर उद्योगसंस्थेची योजना आंखली. तदनुसार गायकवाड सरकारनीं स. १८९० च्या जूनमध्यें बडोदा येथें कलाभवनाची स्थापना केली. त्या संस्थेचें यांना मुख्य नेमण्यांत आलें आणि यांनीं १८९६ पर्यंत ती संस्था भरभराटीस आणण्याकरितां पुष्कळ श्रम केले. याच वेळीं रंगविद्येंत पारंगत होण्याकरितां यांनीं जर्मन भाषेचें ज्ञान संपादन केलें आणि 'रंगरहस्य' नांवाचें त्रैमासिक सुरू केलें. कलाभवनाचा विकास होत होत तें उद्योगधंद्यांचें विद्यापीठ बनावें म्हणून यांनीं रात्रंदिवस प्रयत्न केले. पण यांची बदली निराळ्या खात्यांत होण्याचा प्रसंग येतांच या मानी गृहस्थांनीं कलाभवन सोडलें (१८९६).

बडोद्याहून हे मुंबईस आले तेव्हां विल्सन कॉलेजमध्यें यांची रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. तेथें युनिव्हर्सिटी सुधारणेची चळवळ करून यांनीं रसायनशास्त्राचा निराळा अभ्यासक्रम तयार केला व अशा तऱ्हेनें रसायनशास्त्रांत निष्णात झालेले विद्यार्थी बाहेर पडण्याची व्यवस्था केली. या वेळीं मुंबईस प्लेगचा आजार सुरू झाला. तेव्हां यांनीं त्या आजारावर आयोडिन टरक्लोराइड नांवाचें औषध शोधून काढलें. परदेशी कंपन्या या औषधाच्या पेटंटकरितां यांना मोठी रक्कम देत असतांहि यांनीं ती घेतली नाहीं, व स्वतःहि त्याचें पेटंट घेतलें नाहीं. लोकांच्या उपयोगाकरितां त्याची कृति जाहीर केली. १८९८ मध्यें मुंबईच्या महाराणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याचे तोंडास कोणी तरी पक्का रंग फांसून तो काळा केला. तो रंग कोणालाहि काढतां येईना, तेव्हां यांनीं तो काढून तो पुतळा पूर्ववत् स्वच्छ केला.

आपल्या देशांत शास्त्रज्ञ तयार करण्याच्या तळमळीनें यांनीं १८९९ सालीं 'टेक्नोकेमिकल लॅबोरेटरी' नांवाची स्वतंत्र प्रयोगशाळा मुंबईस स्थापन केली. युनिव्हर्सिटी व मेडिकल कॉलेज या संस्थासुद्धां आपले विद्यार्थी तेथें प्रयोग करण्यास पाठवीत असत, अशी येथील ख्याति होती. यानंतर यांनीं कांहीं जातीच्या खऱ्या मोत्याचें कमी होणारें तेज त्यास पुन्हां प्राप्त करून देणारी रासायनिक क्रिया शोधून काढली.

यामुळें जगांतील रसायनशास्त्रज्ञांना यांनीं चकित केलें, यांची जगभर ख्याति झाली आणि या धंद्यांत यांनीं लाखों रुपये कमाविले. ती कमाई यांनीं रसायनशास्त्राच्या प्रचाराकरितां खर्च केली. १९०२ सालीं यांच्या योजना, प्रेरणा आणि अविश्रान्त श्रम यांच्या जोरावर बडोदा येथें 'अलेंबिक केमिकल वर्क्स' स्थापण्यांत आलें.

स. १९०२ सालीं श्री. गोवर्धनराम त्रिपाठींच्या सह यांनीं 'कल्याणग्राम' नांवाच्या एका नमुनेदार वसाहतीची योजना आंखली.

वैज्ञानिक संशोधन, त्याचा व्यवहारांत उपयोग करणारे कारखाने व त्यांमध्यें काम करणारे लोक यांचा या वसाहतींत प्रामुख्यानें समावेश करण्यांत आला होता. पण यांची आर्थिक स्थिति पुढें बदलल्यानें ती यशस्वी होऊं शकली नाहीं. १९१० मध्यें यांची पत्नी वारली आणि यांना निद्रानाशाचा आजार जडला. यांचे शेवटचे दिवस करुणापूर्ण आर्थिक अडचणींत गेले.

गझनवी, अब्दुल करीम अबु अहमद— (जन्म स. १८७२) बंगालमधील लोकप्रिय जमीनदार व सार्वजनिक कार्यकर्ते.

लंडनचें सेंट पीटर्स स्कूल, जर्मतींतील जेना व इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांत आपलें शिक्षण संपवून हे हिंदुस्थानांत आले व यांनीं आपली मालमत्ता ताब्यांत घेतली (१८९४).

जुन्या इंपीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें हिंदु-मुसलमानांच्या हितसंबंधांसंबंधीं खटपट करून यांनीं आपल्या लौकिक आयुष्यास सुरुवात केली (१९०९-१२). यानंतर कांहीं दिवस मुसलमानांच्या हितसंरक्षणाकरितां बंगालतर्फे व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्येंहि यांनीं काम केलें (१९१३-१६). याच वेळीं यात्रेकरूंच्या रहदारीसंबंधीं चौकशी करण्याकरितां सिरीया, पॅलेस्टाइन व हेदजाझचे राजे हुसेन यांच्या दरबारीं गेलेल्या एका राजकीय मंडळावर यांची नेमणूक झाली होती (१९१३). कांहीं दिवस हे बंगाल सरकारचे प्रधानहि होते (१९२४-२७).

'Pilgrim Traffic to Hedjaz and Palestine'. व 'Moslem Education in Bengal' हीं यांचीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

गडकरी, राम गणेश— (जन्म स. १८८५-मृत्यु स. १९१९) मराठींतील सुप्रसिद्ध प्रतिभाशाली कवि, नाटककार व विनोदी लेखक.

यांचा जन्म गुजराथमध्यें झाला. वयाची दहा वर्षें उलटण्यापूर्वीच पितृवियोगाची आपत्ति कोसळली. पण या परिस्थितीला तोंड देत हे एकोणिसाव्या वर्षी प्रवेशपरीक्षा पास झाले. कॉलेजच्या पहिल्या वर्षांत अपयश आल्यानें हे किर्लोस्कर नाटक मंडळींत लहान मुलांचे शिक्षक बनले. तेथें श्री. कृ. कोल्हटकरांशीं परिचय होऊन त्याचें मैत्रींत रूपान्तर झालें व मंडळीबरोबर गांवोगांवीं हिंडावें लागल्यानें एकंदर अनेक गोष्टींचा यांना अनुभव आला. १९११ पूर्वी यांच्या कांहीं कविता व नाट्यपर विनोदी लेख प्रसिद्ध झाले असले तरी यांना लोकप्रियता देणारें वाङ्मय यानंतरच प्रसिद्ध झालेलें आहे.

यांच्या वाङ्मयाचे तीन भाग पडतात : काव्य, स्फुट लेख व नाटकें. यांच्या सर्व कवितांचा संग्रह वाग्वैजयंती या नांवानें यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाला आहे. यांच्या उत्कृष्ट कविता १९११-१६ या पांच वर्षांत प्रसिद्ध झाल्या. आधुनिक कवींपैकीं केशवसुत हे यांचे फार आवडते होते. हे आपणास 'केशवसुताचा सच्चा चेला' म्हणवितात. त्यांच्या तुतारीच्या धर्तीवर दसरा व झपूर्झाच्या धर्तीवर कलगीचें गाणें इत्यादि कविता यांनीं रचल्या. गुलाबी कोंडें, राजहंस, मुरली, घुंगुरवाळा इत्यादि यांच्या कविता सरस आहेत. हे आपल्या कविता गोविंदाग्रज या नांवानें प्रसिद्ध करीत.

'संपूर्ण बाळकराम' हा यांच्या विनोदी लेखाचा संग्रह प्रसिद्ध आहे. बाळकराम हें यांनीं आपल्या गद्य लेखनाकरितां टोपण नांव घेतलें होतें. यांत १९१३-१५ चे अवधींत लिहिलेले 'रिकामपणची कामगिरी' हे पांच लेख हा मुख्य भाग आहे. त्यांत ठकीच्या लग्नाकरितां कराव्या लागणाऱ्या खटपटींचें वर्णन केलें आहे. कल्पकता, कोटिबाजपणा, व्यंगोक्ति, अतिशयोक्ति इत्यादिकांमुळें हे लेख चुरचुरीत व मनोरंजक झाले आहेत. 'कवींच्या कारखान्यांत' व नाट्यविषयक लेखहि मजेदार आहेत. शिवाय सूकनायक, सकाळचा अभ्यास, दीडपानी नाटक हीं छोटीं प्रहसनेंहि यांनीं लिहिलेलीं आहेत.

कविता व स्फुट लेख या यांच्या वाङ्मयापेक्षांहि नाटककार म्हणून हे लोकांच्या विशेष ध्यानांत येतात. प्रेमविवाह, पुनर्विवाह व विषमविवाह यांसंबंधीं असणारें प्रेमसंन्यास, पतिव्रतेचा प्रभाव दाखविणारें पुण्यप्रभाव, दारूबाजीचे दुष्परिणाम दर्शविणारें एकच प्याला व कोणतेंहि प्रतिपाद्य नसलेलें भावबंधन हीं यांचीं चार नाटकें आणि संभाजीचरित्रावरील 'राजसंन्यास' व 'वेड्यांचा बाजार' हीं अपूर्ण नाटकें एवढा यांचा वाङ्मयसंसार आहे. यांनीं आपल्या लेखनानें आपल्याकडे सर्वांचें कमालीचें लक्ष वेधून घेतलें. यांच्याइतकी लोकप्रियता मराठी वाङ्मयांत अद्यापि कोणाहि लेखकाच्या वांट्यास आलेली नाहीं. तरुणांच्या मनाला मोहिनी घालणाऱ्या सर्व गुणांचा यांच्या लेखनांत उत्कृष्ट

संगम झाला आहे. सरस प्रेमगीतें, कल्पकता नि कोटिबाजपणा, रहस्यपूर्ण नाट्यकथानकें, करुण नि हास्य यांचा परमोत्कर्ष साधणारे नि हृदय हलवून सोडणारे नाट्यप्रसंग आणि प्रवाही अलंकारिक भाषा यांमुळें यांनीं तरुणांचे डोळे दिपवून टाकले. हे संदेश सांगणारे किंवा आदर्श लेखन करणारे नसतांहि उज्ज्वल कल्पकता व उत्कट भावना यांमुळें मराठींतील अत्यंत लोकप्रिय कवि बनले आहेत. याच गुणावर लुब्ध होऊन प्र. के. अत्रे व कमतनूरकर यांसारखे प्रथितयश नाटककार आपणास यांचे शिष्य म्हणवून घेण्यांत धन्यता मानीत असल्यास नवल नाहीं. यांच्या ग्रंथांचें रसग्रहणपर वाङ्मय जितकें प्रसिद्ध झालें आहे तितकें इतर दुसऱ्या कोणाहि मराठींतील ग्रंथकाराच्या वांट्यास अद्यापि आलेलें नाहीं.

यांचें वाङ्मय– १ वाग्वैजयन्ती (संपूर्ण कवितासंग्रह), २ संपूर्ण बाळकराम, ३ प्रेमसंन्यास, ४ पुण्यप्रभाव, ५ भावबन्धन, ६ एकच प्याला, ७ राजसंन्यास (अपूर्ण); ८ वेड्यांचा बाजार (अपूर्ण).

गणपत कृष्णाजी—(मृत्यु स. १८९० सुमार) मुंबईच्या प्रारंभींच्या मुद्रणविशारद लोकांपैकीं एक.

मराठीच्या बाबतींत टंकमुद्रणाचा प्रारंभ व प्रसार करण्याचें श्रेय यांच्याकडे जातें. हे भंडारी जातीचे होते. प्रथम यांनीं एक लांकडी यंत्र तयार केलें, शिशाचे तुकडे जमविले, अक्षरें कशीं उठतात तें पाहिलें, शाईचे निरनिराळे प्रयोग करून शाईहि ठरवली, लोखंडी प्रेस तयार केला, शिळा विकत घेतली व १८४१ मध्यें आपलें पहिलें पंचांग छापलें. पुढें उत्तेजन मिळवून स्वतः टाइप करण्याचा प्रयत्न यांनीं १८४३ मध्यें सुरू केला. आणि मोठ्या प्रयत्नानें अक्षराचे ठसे तयार करून अक्षरें ओतण्याचा कारखाना सुरू केला. पुढें कित्येक वर्षें या छापखान्यांत जितकें सुबक काम होत असे तितक्या प्रमाणांत उत्कृष्ट काम दुसऱ्या कोणत्याहि छापखान्यांत होत नसे. आतां जरी आपणांस त्या कलेचें विशेष महत्त्व वाटत नसलें तरी मराठीचे आद्य टंकमुद्रणकार या दृष्टीनें यांचें महत्त्व विशेष आहे. यांच्या कार्यारंभशताब्दीचा उत्सव मुंबईस साजरा करण्यांत आला. यांनीं काढलेली महाभारताची सुप्रसिद्ध दाक्षिणात्य प्रत यांच्या नांवानेंच प्रसिद्ध आहे.

गणपुले, परशुराम बळवंत— (जन्म स. १८७५) गुजराथमधील मंगलोरी कौलें, अदृश्य विटा, चिनी नळ, कप-बशा, कांचेच्या चिमण्या, बरण्या वगैरेंचे यशस्वी कारखानदार व दानशूर गृहस्थ.

भोरजवळ गुंजवणें येथें जोगदेव सावकारांकडे यांचे वडील कारकून होते. तेथेंच यांचा जन्म झाला. वयाच्या पांचव्या वर्षी वडील वारल्यानें हे आईबरोबर आपले मामा विनोद यांचेकडे बडोद्यास गेले. तेथेंच यांचें प्राथमिक शिक्षण होऊन यांनीं कलाभुवनमधील अभ्यासक्रम पुरा केला व विनोद मामांच्या कॉंट्राक्टरच्या धंद्यांत हे शिरले.

पहिल्या महायुद्धापूर्वी बडोद्याच्या महाराजांची कौलें-विटांची फॅक्टरी बुडत होती. ती यांनीं सवलतीनें चालविण्यास घेतली व त्यांत चांगलें यश संपादन केलें. अनुभवानें आत्मविश्वास उत्पन्न झाल्यामुळें बिलिमोरा येथें कौला-विटांचा कारखाना काढून त्याला लिमिटेड कंपनीचें स्वरूप दिलें. पुढें वांकानेरला (काठेवाड) फायर ब्रिक्स व फायर क्लेचा कारखाना यांनीं भाड्यानें चालविण्यास घेतला. तेथील अनुभवानें यांना आपण पॉटरी वर्क्स चांगलें करूं शकूं याची कल्पना आली. तेव्हां यांनीं मोर्वीच्या महाराजांचा बरण्यांचा कारखाना चालविण्यास घेतला व त्यास आपलें स्वतःचें परशुराम हें नांव देऊन 'परशुराम पॉटरी वर्क्स कं. लि.' असें रूप दिलें. त्या कारखान्याची दुसऱ्या महायुद्धामुळें चांगली भरभराट झाली. नंतर यांनीं ठाण (लक्तर स्टेट) येथील एका पाऱ्यांचा एक पॉटरी व क्रॉकरीचा कारखाना होता तो सुमारें दोन लक्ष रुपयांस विकत घेतला. त्याची यांच्या नेतृत्वानें उत्तम भरभराट झाली.

यांच्या वयाला सत्तर वर्षें झालीं तेव्हां यांच्या सत्तरीचा समारंभ मोर्वीच्या महाराजांच्या अध्यक्षतेखाली मोर्वी येथें झाला (फेब्रु. २८।४५). त्या वेळीं यांचे चहाते, एजंट वगैरे लोकांनीं यांना एक लक्ष पंधरा हजारांचा निधि अर्पण केला. त्यांत यांनीं स्वतःचे पस्तीस हजार रुपये घालून दीड लाखाचा निधि विश्वस्त पंचांच्या स्वाधीन केला. त्यांतून पॉटरीच्या धंद्यांत प्राविण्य मिळविण्याकरितां शिष्यवृत्ती द्याव्यात असा यांचा हेतु आहे.

यांच्यावर मोर्वीच्या महाराजांचा अत्यंत विश्वास असून इतरहि लोकोपयोगी कामांत यांचा ते सल्ला व साह्य घेत असतात. यांनीं आपल्या सचोटीनें व कर्तव्यदक्ष स्वभावानें परप्रान्तांत चांगलें यश संपादन केलें आहे.

गर्गे, शंकर काशिनाथ— (जन्म स. १८८९– मृत्यु स. १९३१) मराठींतील नाट्यछटा नांवाचा लेखनप्रकार प्रचारांत आणणारे प्रसिद्ध लेखक. हे "दिवाकर"

ह्या नांवानें प्रसिद्ध असून नाट्यछटाकार म्हणून ओळखिले जातात. हे गर्गे घराण्यांत दत्तक होते. यांचे जन्मदाते वडील गोविंद बळवंत दिवाकर हे होत. वयाच्या ३ ऱ्या वर्षीच 'दिवाकरां'ना आजीच्या (आईची आई) मांडीवर देण्यांत आलें.

स. १९०८ सालीं स्कूल फायनल होऊन प्रथम यांनीं पुण्याच्या फौजदार कचेरींत कारकुनाची नोकरी धरली. परंतु डोळ्यांच्या अधूपणामुळें ही नोकरी यांना सोडावी लागली. नंतर वर्षभर 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'च्या शाळेंत शिक्षकाची नोकरी केल्यावर हे नूतन मराठींत शिक्षक म्हणून आले. ह्या ठिकाणीं यांनीं आमरण शिक्षकाचें काम केलें.

हरीभाऊ आपटे ज्याप्रमाणें शेक्सपिअरच्या ग्रन्थवाचनानें नांवारूपास आले, त्याप्रमाणें आपणहि यावें अशा स्वयंप्रेरणेनें यांनीं शेक्सपिअरच्या अभ्यासांत मन घातलें. ह्या कार्यांत यांना कै. प्रि. वासुदेवराव पटवर्धनांचें उत्तेजन मिळालें व यांनीं मराठी वाङ्मयांत एका विशिष्ट प्रकारच्या लिखाणाची निर्मिति केली. ह्या त्यांच्या लिखाणास 'नाट्यछटा' या नांवानें संबोधण्याची प्रथाहि कै. पटवर्धनांनींच काढिली. पटवर्धनांचेबद्दल यांना नितान्त आदर असे.

यांच्या नाट्यछटा प्रथम प्रसिद्धीस आणण्याचें श्रेय श्री. न. चिं. केळकरांना आहे. 'महासर्प' व 'फाटलेला पतंग' या दोन नाट्यछटा केळकरांच्यामुळें प्रथम ता. १५-४-१९१३ च्या केसरींत प्रसिद्ध झाल्या. यांच्या एकंदर ४६ नाट्यछटा नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या. पुणें हेंच यांच्या साहित्यसंसाराचें कार्यक्षेत्र आणि त्यांतहि ठराविक ४-५ पेठांबाहेर यांनीं क्वचितच पाऊल टाकलें असेल. या मर्यादित क्षेत्रांतूनच यांनीं आपल्या लेखनांतील प्रसंगांची आणि पात्रांची निवड केली. यांचा ग्रंथसंग्रह व चित्रसंग्रह चांगला असे.

गंगाधर कविराज— (जन्म स. १८५९– मृत्यु स. १९२३) बंगालमधील आयुर्वेदीय नवयुगप्रवर्तक. हे मुर्शिदाबादचे राहणारे. 'राजेमहाराजांचे विश्वासपात्र वैद्य व विपुल ग्रंथनिर्मिति करणारे लेखक' अशी यांची प्रसिद्धि असे. यांचे ग्रंथहि विद्वत्ताप्रचुर आणि विविध विषयांवर लिहिलेले आहेत. जुन्या पद्धतीच्या पंडितांप्रमाणें यांचा सर्व वेळ अध्ययन, अध्यापन व ग्रंथलेखन यांत व्यतीत होत असे. याचे जोडीला मोठा वैद्यकीचा धंदा होताच.

यांनीं वैद्यक ११, तन्त्र २, व्याकरण ८, साहित्य १२, धर्मशास्त्र ७, उपनिषद् ८, दर्शन १४, ज्योतिष १ व इतर १३ असे ग्रंथ केले असून ते स्वतःचा छापखाना काढून बहुतेक मुद्रितहि केले आहेत. यांत मुग्धबोध व्याकरणावरील महावृत्ति टीका यांनीं अगदीं पहिल्या वयांत लिहिली असूनहि ती प्राचीन टीकांच्या तोडीची आहे. तसेंच चरकावरील 'जल्पकल्पतरु' ही टीका फारच पांडित्यप्रचुर व उपयुक्त समजण्यांत येते. मनुस्मृतिवरील टीकेंत यांनीं जागोजाग कुल्लूकाचें निर्भीडपणें खंडन केलें आहे.

यांच्या शिष्यांत म. म. द्वारकानाथ सेन, सुश्रुतभाष्यकार प्रा. हाराणचंद्र चक्रवर्ति व प्रशिष्यांत लक्ष्मीरामस्वामी, वैद्यराज योगेन्द्रनाथ व कविराज उमाचरण ही मंडळी मोडतात (आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे.).

गाझीउद्दीन हैदर— (कारकीर्द स. १८१४–१८२७) लखनौचे नबाब. हे सादतअल्लीचे चिरंजीव. हे बापापासून वेगळे राहत असत. त्यामुळें दरबारी लोकांशीं यांचें नीट नव्हतें. यांचेभोंवतीं वेगळेच हलके लोक जमा झालेले होते. यांनीं प्रसिद्ध मुत्सद्दी हकीम महेंदी यास कमी करून आपला खानसामा आगा मीर यास दिवाणगिरी दिली. स. १८०१ सालीं सादतअल्लीशीं झालेल्या तहानें यांच्या अयोध्येच्या राज्यांत इंग्रजांना हात घालण्याचें कारण उरलेलें नव्हतें. पण नेपाळच्या लढाईकरितां इंग्रजांनीं शेंकडा साडेसहा टक्के व्याजानें यांच्याकडून दोन कोट रुपये घेतले. शिवाय रिसाला व हत्ती यांनीं आपण होऊन मदतीस धाडले. यामुळें स.१८१९ मध्यें दिल्लीचा बादशाहा ब्रिटिशांशीं अराजनिष्ठ आहे असें वाटल्यावरून त्याची बादशाहात कमी करून यांना बादशाहा हें पद दिलें व यांना आपल्या नांवें नाणीं पाडण्याची परवानगी दिली (स. १८१९). पण मुसलमानांना हा दिल्लीच्या गादीचा अपमान वाटला, त्यामुळें लखनौच्या बाहेर या गोष्टीस फारशी प्रसिद्धि मिळाली नाहीं. पुनः ब्रह्मदेशच्या लढाईच्या वेळीं यांनीं कांहीं शर्तींवर इंग्रजांस एक कोट रुपये दिले (१८२५). त्यामुळें ग. ज. ॲम्हर्स्ट यांनीं खदस्तूरचें पत्र लिहून यांचें अभिनंदन केलें. यानें पुनः पन्नास लक्ष रुपये कंपनीसरकारास दिले (स. १८२६).

यांनीं सादतअल्लीची 'अमानी' पद्धत बंद करून

'इजारा' ही वसुलाची पद्धत सुरू केली. त्यामुळें वसूल कमी पडला. जमीनदार व तालुकदार लोक पुनः स्वच्छंदानें वर्तू लागले.

यास रसायनविद्या व शिल्पविद्या यांचा नाद होता. पण तेच विषय यास राज्यकारभारापासून परावृत्त करण्यास कारण झाले. गैरशिस्त व उघळा कारभार, दरबारांत प्रजेचा प्रवेश न होणें, मर्जीतल्या माणसांवर फाजील विश्वास, उपचार व मानमतराब यांवर विशेष प्रीति, यांमुळें यांच्या राज्यकारभारास बेशिस्त स्वरूप आलें.

ब्रिटिश सरकारवर सर्वस्वीं विश्वास ठेवल्यानें त्यांच्या सल्ल्याप्रमाणें यांनीं सर्व सैन्य कमी केलें. राजवाड्यांत पाहऱ्यापुरतेंहि सैन्य शिल्लक राहूं दिलें नाहीं. राज्यांतील वसूलहि दुसऱ्याच्या मदतीवांचून करतां येत नसे. (अयोध्येचे नबाब).

गाडगीळ, धनंजय रामचंद्र— (जन्म स. १९०१) सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ आणि 'गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनमिक्स' या संस्थेचे प्रमुख.

यांचा जन्म नागपुरास व शिक्षण तेथील पटवर्धन हायस्कुलांत झालें (१९१५). नंतर हे उच्च शिक्षणाकरितां इंग्लंडला रवाना झाले व केम्ब्रिजच्या क्वीन्स कॉलेजांत अभ्यास (१८-२३) करून हे बी. ए. (२१), एम्. लिट्. (२३), व एम्. ए. (२५) झाले. इकडे आल्यानंतर मुंबई सरकारच्या फायनन्स डिपार्टमेंटमध्यें ॲसिस्टंट सेक्रेटरी म्हणून हे काम करूं लागले (१९२४ आक्टो.-१९२५ जून). पुढें त्या जागेचा राजीनामा देऊन यांनीं सुरतच्या म. ठा. बा. कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून काम केलें (१९२५-३०). पण गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलि. ॲण्ड एकॉ.चें चालकत्व यांना देण्याचें ठरतांच यांनीं ती मोठ्या पगाराची व अधिकाराची जागा सोडून हे त्या संस्थेंत काम करूं लागले आणि पुण्यास स्थायिक झाले.

वरील संस्थेंत यांनीं महत्त्वाचें संशोधन स्वतः केलें आणि इतरांकडून करवून घेतलें. यांच्या नेतृत्वामुळेंच अर्थशास्त्रीय सूक्ष्म अध्ययन, अध्यापन आणि संशोधन यांचें मोठें क्षेत्र, असा या संस्थेस मोठा लौकिक प्राप्त झाला आहे.

यांच्या या लौकिकामुळेंच म्हैसूर येथें भरलेल्या 'ऑल-इंडिया इकॉनमिक्स' कॉन्फरन्सच्या २४ व्या अधिवेशनाचे यांना अध्यक्ष निवडण्यांत आलें. यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय 'Economic Policy of the State in India' हा होता (१९४०).

यांचे ग्रंथ अत्यंत शास्त्रीय पद्धतीनें सूक्ष्म अभ्यास करून लिहिलेले असल्यामुळें शास्त्रीय जगांत त्यांना अत्यंत मानाचें स्थान आहे.

यांचा 'फेडरेटिंग इंडिया' हा ग्रंथ हिंदुस्थानांत चर्चिल्या जाणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर प्रकाश पाडणारा आहे. त्यांत यांनीं मुस्लीम विभागांतील मुस्लीम जनता त्यांच्या पुढाऱ्यांच्या भूमिकेचा पूर्णपणें पाठपुरावा करणार असेल तर हिंदुस्थानच्या सध्यांच्या विद्यमान सीमांत एक मुस्लीम व दुसरें मुस्लीमेतर अशीं दोन फेडरेशनें स्थापन झाल्याचा देखावा शांतपणें पाहण्याशिवाय दुसरें गत्यन्तर नाहीं, असा आपला अभिप्राय नमूद केला आहे.

प्राथमिक-माध्यमिक व उच्च अशा सर्व शिक्षणविषयक चळवळींशीं असणारे यांचे संबंध अतिशय निकटचे आहेत. मुंबई युनिव्हर्सिटीच्या सिनेट, सिंडिकेटचे सभासद, फेलो व डेक्कन पोस्ट-ग्रॅज्युएट रिसर्च इन्स्टिट्यूटच्या कौन्सिलचे सभासद या नात्यांनीं यांनीं केलेली कामगिरी, यांचें या विषयाबद्दलचें असणारें प्रेम व तज्ज्ञता दाखविण्यास पुरेशीं आहेत. हिंदुस्थान सरकार व मुंबई सरकार शिक्षण व अर्थशास्त्र यांसंबंधीं काम करणाऱ्या कोणत्याहि महत्त्वाच्या कमेटीवर यांचें नांव प्रायः घालतात.

यांचे ग्रंथ—

(1) The Industrial Evolution of India (1924). (2) The Bombay Land Revenue System (1928). (3) The Salaries of Public Officials in India (1931). (4) Imperial Preference for India (1932). (5) A Survey of the Marketing of Fruit in Poona (सहकार्यानें 1933). (6) A Survey of Motor-Bus Transportation in Six Districts of the Bombay Presidency (सहकार्यानें 1935). (7) A Survey of Farm Business in Wai Taluka (सहकार्यानें 1940). (8) Regulation of Wages and other problems of Industrial Labour in

India (1943). (9) War and Indian Economic Policy (सहकार्यानें 1943). (10) Poona : A Socio-Economic Survey. Part I. Economic (1945). (11) Federating India (1945).

गाडगीळ, नरहर विष्णु—(जन्म स. १८९६) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध राष्ट्रसभा कार्यकर्ते, राजकारणी व ग्रंथकार.

यांचें शिक्षण नीमच, मुंबई, बडोदा व पुणें येथें झालें. हे बी. ए., एल्एल्. बी. झाल्यानंतर यांनीं पुणें येथें वकिलीचा धंदा करण्यास सुरवात केली (१९२०). सार्वजनिक कार्याचा यांना पहिल्यापासूनच नाद होता. हे पुणें जिल्हा काँग्रेस कमेटीचे मंत्री (१९२१-२४), सभासद, प्रान्तिक काँग्रेस कमेटी (१९२१-३२), ऑल इंडिया काँग्रेस कमेटी (१९२९-४५), अध्यक्ष, महाराष्ट्र प्रान्तिक काँग्रेस कमेटी (१९३१, १९३९-१९४५), पुढारी, यूथलीग, उपाध्यक्ष, मुंबई प्रान्तिक यूथलीग (१९२८-३२), अध्यक्ष, पुणें, यूथलीग (१९२८-३२), सभासद, पुणें नगरपालिका (१९२८-३२), व तेथें उपाध्यक्ष (१९२८). जी. आय्. पी. वर्कर्स युनियन (१९३०), यूथ कान्फरन्स सबर्बन डि. मुंबई व नाशिक वगैरे अनेक ठिकाणचीं अध्यक्षपदें यांच्याकडे आपणहून चालत येऊं लागलीं.

नंतर राष्ट्रसभेचे उमेदवार म्हणून मुंबई प्रान्ताच्या मध्यविभागाकडून यांची दिल्लीच्या कायदेमंडळांत प्रचंड बहुमतानें निवडणूक झाली (१९३५). तेथें हे राष्ट्रसभापक्षाचे प्रतोद होते. तेथील यांची कामगिरी यांनीं 'हिंदी कायदे मंडळांतील सहा वर्षे' (१९३५-४१) या नांवाच्या साडेचारशें पानांच्या पुस्तकांत मराठींत प्रसिद्ध केली आहे.

यानंतर ८ ऑगष्ट १९४२ च्या चळवळींत हे तुरुंगांत स्थानबद्ध होते. तेथून दोन वर्षांनीं यांची मुक्तता झाली. लागलीच यांनीं राष्ट्रसभेच्या विधायक कार्यास सुरवात केली. राष्ट्रसभेचें कार्य हा यांचा धर्मच झाला आहे. आजपर्यंत हे अनेक वेळा तुरुंगांत गेले. अलीकडे तेथें ग्रंथलेखनहि करण्यास यांनी सुरवात केली आहे. अन्तर्गत नेतृत्व व व्यापक उठावणी या दोन्ही दृष्टींनीं यांची कामगिरी महत्त्वाची आहे. यांचें बेडर मैदानी वक्तृत्वहि प्रभावी आहे. महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर समाजाला राष्ट्रसभेच्या कार्याला लावण्याचे श्रेयांतहि यांच्या धोरणीपणाला मोठा वाटा दिला पाहिजे.

यांचे ग्रंथ—१ हिंदी अंदाजपत्रकें (भाग १-२ १९४२), २ ग्यानबाचें अर्थशास्त्र (१९४३), ३ सभाशास्त्र (१९४४), ४ कायदेमंडळांतील सहा वर्षे (१९४४ आक्टो.), ५ राज्यशास्त्रविचार (१९४५) इत्यादि.

गामा, थोरला— रुस्तुम-इ-हिंद— (जन्म स. १८८० सुमार) जगप्रसिद्ध हिन्दी पहिलवान. यांनीं युरोपियन पहिलवानांत सर्वश्रेष्ठ ठरलेला रशियन पहिलवान झिस्को यास बर्लिन येथें व नंतर पुनः पतियाळा येथें चीत करून विजय मिळविला. झिबोस्कि व पिटर्सन या जगप्रसिद्ध युरोपियन पहिलवानांना यांनीं अनुक्रमें तीन व एका मिनिटांत पतियाळास चीत केलें. अमेरिकेंतहि यांनीं विजय मिळवून हिंदी पहिलवानांचें सर्वश्रेष्ठत्व अद्यापि कायम राखलें आहे. यांचे धाकटे बंधु इमामबक्ष व हे दोघेहि पतियाळा संस्थानचे आश्रित आहेत.

गामा, कल्लू— (जन्म स. १८९८ सुमार) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध पहिलवान. हे प्रसिद्ध शीख पहिलवान कीकरसिंगावर जय मिळविणाऱ्या कल्लू अलियाचे पुत्र होत. यांना राधनपुरच्या नबाबाचा आश्रय होता. स. १९१९ सालीं पुण्याच्या डेक्कन जिमखान्यावर कोल्हापूरच्या दीपासिंगाबरोबर यांची कुस्ती होऊन यांचा पहिला नंबर आला.

गायकवाड, महाराज-सयाजीराव गोविंदराव—(कारकीर्द स. १८२०-४७) बडोदा राज्याचे अधिपति.

आनंदरावांच्या निधनानंतर हे बडोद्याच्या गादीवर आले. हे हुषार होते. माळव्याच्या लढायांत आपलें सैन्य वापरल्याबद्दल यांनीं इंग्रजांकडे रक्कम मागितली होती. हे गादीवर असतांना आनंदरावांच्या राणीनें व सयाजीरावांच्या दोन सावत्र आयांनीं आपल्या मुलांना वारस ठरविण्याबद्दल प्रयत्न करून पाहिले होते.

हे प्रजेचे आवडते राजे होते. इंग्रजांना हुलकावण्या देऊन त्यांच्या तावडींतून सुटण्याचा यांनीं बराच प्रयत्न केला. तत्कालीन इंग्रजांच्या अधाशीपणामुळें यांचा स्वभाव हट्टी बनला होता, असें 'रूलर्स ऑफ बडोदा' या पुस्तकाच्या कर्त्याचें मत आहे. इंग्रजांनीं कांहीं ना कांहीं कारणानें जप्त केलेला सर्व मुलूख यांनीं पुन्हां सोडविला व संस्थानांत ढवळाढवळ करणाऱ्या इंग्रजांच्या कारवाया बंद पाडल्या. लष्कर, सरदार, सावकार, मुत्सद्दी व प्रजा वगैरे सर्वांवर यांचा वचक असे. यांना तीन पुत्र होते.

त्यांच्या पश्चात् त्यांचे वडील चिरंजीव गणपतराव (१८४७-५६) हे गादीवर आले. नंतर खंडेराव (१८५६-७०) व त्यानंतर मल्हारराव (१८७०-७५) गादीवर आले.

बडोद्याच्या गायकवाड घराण्यापैकीं पहिले व दुसरे दमाजी (पा. ४४४), पिलाजीराव (पा. ५१४), गोविंदराव (पा. ३३८), फत्तेसिंगराव (पा. ५३३) व आनंदराव (पा. १०७) यांचीं चरित्रें मध्ययुगीन चरित्रकोशांत दिलीं आहेत. या भागांत पहिले व दुसरे सयाजीराव, गणपतराव, खंडेराव व मल्हारराव यांचीं चरित्रें कारकीर्दीच्या क्रमानें दिलीं आहेत.

गायकवाड, महाराज-गणपतराव सयाजीराव— (कारकीर्द स. १८४८-१८५६ नवं.) बडोदा राज्याचे अधिपति.

पहिल्या सयाजीरावांचे ज्येष्ठ पुत्र असून हे त्यांच्यानंतर बडोद्याचे अधिपति झाले. हे बहुधा दिवाणामार्फतच राज्यकारभार चालवीत. ह्यांच्या कारकीर्दीत गुजराथेंत आगगाडी सुरू झाली. प्रजेच्या जमिनीची नुकसान-भरपाई आणि संस्थानचा मार्गावरील जकातीचा तोटा हे भरून मिळण्याच्या अटीवर यांनीं राज्यांतील जमीन आगगाडीसाठी दिली (स. १८५६). हे व ह्यांचे बन्धु खण्डेराव यांच्यांत नेहमीं तंटे होत. तांबवेकर नांवाच्या दिवाणावरूनहि यांचा रेसिडेन्ट ऑटरॅमशीं खटका उडून प्रकरण गव्हर्नर जनरलपर्यंत गेलें. परंतु पुढील घटनेच्यापूर्वीच हे १९ नोव्हेंबर १८५६ रोजीं निवर्तले. ते निपुत्रिक असल्यामुळें यांच्यानंतर बंधु खण्डेराव हे गादीचे वारस झाले.

गायकवाड, महाराज-खंडेराव सयाजीराव— (कारकीर्द स. १८५७-७१) बडोदा राज्याचे अधिपति. हे आपले ज्येष्ठ बंधु गणपतराव यांच्यानंतर गादीवर आले (१८५७).

हे कणखर स्वभावाचे, निर्व्यसनी व कांहींसे हेकेखोर होते. यांना कुस्तीचा व शिकारीचा फार नाद होता. हे स्वतः उत्तम कुस्ती खेळत व यांच्या पदरीं नामांकित पहिलवानांचे संघ असत. शिकारीचा यांना इतका नाद होता कीं, मकरपुऱ्याच्या मागच्या बाजूला एक मोठें वन तयार करण्यांत आलें होतें. कोणतेंहि काम करण्यांत यांचा विशेष जलदपणा प्रगट होत असे.

एकदां शहरांत पाण्याचा पुरवठा करण्याची कल्पना यांच्या मनांत आली. नर्मदेचें पाणी कालवा काढून बडोद्याला आणण्याची ती योजना होती. ती पुढें सफल झाली नाहीं, पण त्या कामाकरितां काढून ठेवलेल्या द्रव्यनिधींतून मकरपुऱ्याचा राजवाडा, दोन चांदीच्या तोफा, कांहीं जडजवाहीर इत्यादि वस्तु निर्माण करण्यांत आल्या.

बडोदें येथील जवाहीरखान्यांत जें मौल्यवान् जवाहीर दिसतें तें यांनीं खरीदलेलें आहे. त्याचप्रमाणें मोत्याची चादर म्हणून जी दाखविण्यांत येते तीहि यांनींच पैगंबराच्या कबरीवर टाकण्याकरितां तयार करविली. पुढें हे वारले त्यामुळें पैगंबराच्या कबरीकडे ती चादर न जातां बडोद्याच्या नजरबागेंत राहिली.

नजराणे घेण्याची पद्धत यांनीं विशेष जारीनें सुरू केल्यामुळें अनेक नालायक लोकांची गर्दी यांच्याभोंवतीं जमा झाली. शिवाय यांचे धाकटे बंधु मल्हारराव यांनीं राज्य मिळविण्याकरितां केलेला कट याच वेळीं उघडकीस येऊन त्यांना तुरुंगांत टाकण्यांत आलें (१८६३).

हे अत्यंत लोकप्रिय होते. यांचा रुबाबदार चेहरा, यांची दातृत्वशक्ति व यांचा मायाळू दिलदार स्वभाव यांमुळें प्रजाजनांना हे हवेसे वाटत. दूरदूरच्या पहिलवानांप्रमाणें काशीरामेश्वरकडील पंडितहि यांच्याकडून आपला फायदा करून घेत.

हिंदुस्थान सरकारशींहि यांचें सलोख्याचें नातें होतें. स. १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं यांच्या राजनिष्ठेवर अवलंबून आपलें सैन्य गुजराथेंतून काढून इंग्रज सरकारनें दिल्ली-लखनौकडे नेलें. यांनीं राजनिष्ठा प्रदर्शित करून साहाय्य केलें नसतें, तर पश्चिम हिंदुस्थानावर इंग्रजांचें राज्य क्वचितच राहिलें असतें, असे इंग्रज अधिकाऱ्यांचे उद्गार आहेत. आणि त्या वेळीं गुजराथेंत शांतता राखल्याबद्दल बंडाचा वणवा शांत झाल्यावर बडोदें सरकारला द्यावा लागणारा फौजेच्या खर्चाबद्दल ३ लक्ष रु. कर हिंदुस्थान सरकारनें माफ केला. त्याचप्रमाणें 'हिज हायनेस दि महाराजा ऑफ बडोदा' ही पदवी देखील त्या वेळीं मिळाली. याशिवाय मोर्चेल वापरण्याचा अधिकार व यांना दत्तक घेण्याचा अधिकार दिला तो वेगळाच. याप्रमाणें यांची कारकीर्द चांगली भाग्याची झाली. पण हे वारल्यावर यांच्या पत्नी जमनाबाईसाहेब गरोदर होत्या. त्यांना मुलगीच झाल्यामुळें यांचे धाकटे बंधु मल्हारराव गादीवर आले. त्यांना पदच्युत केल्यावर

जमनाबाईसाहेबांच्या मांडीवर दत्तक देऊन दुसरे सयाजीराव महाराज यांची कारकीर्द सुरू झाली.

हे शिपाई वृत्तीचे असल्यानें त्या वेळीं बडोद्यास बंदुका, तोफा, दारूगोळा वगैरेंचे कारखाने होते. हे मोठ्या तोफाहि विकत घेऊं लागले. पण पुढें त्या इंग्रजांनीं विकत घेतल्या. यांच्याविरुद्ध स. १८५७ मध्यें कोळ्यांचें बंड झालें होतें. १८६३-६७ या दोन सालीं यांच्या खुनाचाहि प्रयत्न झाला होता. २० नवं. १८७० सालीं यांना मकरपुरा राजवाड्यांत जलोदरानें देवाज्ञा झाली.

गायकवाड, महाराज-मल्हारराव सयाजीराव— (कारकीर्द स. १८७१-७५) बडोदा राज्याचे अधिपति. खंडेरावानंतर जमनाबाईना मुलगी झाल्यामुळें हे बडोद्याच्या गादीवर आले. खंडेराव-महाराजांच्या लोकांवर यांनीं शस्त्र धरून त्यांचे दिवाण भाऊ शिंदे यांना तुरुंगांत टाकलें व पुढें ते बहुतेक विषप्रयोगानें वारले. जमनाबाई खिन्न होऊन आपल्या मुलीसह पुण्यास येऊन राहिल्या. सर्वत्र बेबंदशाही सुरू झाली. कर्नल रॉबर्ट फेअर हे रेसिडेंट म्हणून बडोद्यास आले (१८७३ मार्च १८), त्या दिवशीं शहरांत आठ जणांना फटक्यांची शिक्षा देण्यांत आली होती.

हे स्वभावतःच साधेभोळे आणि गरीब होते. आणि कोणीं कांहीं सांगितलें कीं तेंच खरें वाटावें अशी यांची वृत्ति असे. त्यामुळें स्वार्थी माणसांचा गराडा यांच्याभोंवतीं पडला व राज्यांत अव्यवस्था होऊन तिजविषयींचा बोभाटा रेसिडेंट कर्नल फेअर यांनीं वर कळविला. तेव्हां चौकशी करण्याकरितां ग. ज. नॉर्थब्रूक यांनीं एक कमिशन नेमलें (१८७३). त्यांत अध्यक्ष सर रिचर्ड मीड, जयपूरच्या महाराजांचे मुख्य प्रधान नबाब फैजअलीखान, मुंबई इलाख्यापैकीं रॉव्हिन स्क्राफ्ट आणि कर्नल एथरिज हे दोन गृहस्थ असे चार सभासद नेमिले. त्यांच्या चौकशीवरून 'अव्यवस्था आहे' अशी सरकारची खात्री झाली. तेव्हां अठरा महिन्यांत चांगला दिवाण नेमून सुधारणा करण्याविषयीं सरकारनें यांना सुचविलें. तेव्हां यांनीं नाना खानविलकर यांना बदलून दादाभाई नवरोजी यांना मुख्य प्रधान नेमलें. पण कर्नल फेअर व यांचें बिलकुल जमेना. कर्नल फेअर यांना बडोद्याहून बदलावें असें यांनीं वर लिहिलें आणि त्याप्रमाणें त्यांचे जागीं सर लुई पेली यांची नेमणूकहि झाली. इतक्यांत विषप्रयोगाचें प्रकरण उद्भवलें.

कर्नल फेअर हे सकाळीं सात वाजतां बाहेरून फिरून बंगल्यांत आले तेव्हां सरबताचा पेला त्यांच्या मेजावर ठेवला होता. त्यांतले दोनतीन घोट ते प्याले व लिहावयास बसले. अर्ध्या तासानंतर त्यांना मळमळूं लागलें व कसेंसेंच होऊं लागलें. तेव्हां त्यांनीं बाकीचें सरबत न पितां तें बंगल्याच्या पडवींत फेंकून दिलें. रिकामा पेला पुनः मेजावर ठेवतांना तळांत व कांठाला लागलेला पदार्थ काळा असल्याचें त्यांना दिसलें व त्यांना आपणास विषप्रयोग झाला असल्याची खात्री झाली. डॉक्टर व केमिकल ॲनालायझर यांच्याकडून तोच निर्णय आला. खुद्द महाराजांचा या कामीं हात असावा असा संशय प्रगट करण्यांत आला. तेव्हां हिंदुस्थान सरकारनें चौकशीकरितां हाय कमिशन नेमलें. तें असें:—

१ नामदार सर रिचर्ड कौच, अध्यक्ष, २ श्रीमंत महाराज जयाजीराव शिंदे, सभासद, ३ श्रीमंत रामसिंगबहादुर, जयपूरचे महाराज, सभासद, ४ कर्नल सर रिचर्ड मीड, सभासद, ५ दिनकरराव रघुनाथ राजवाडे, सभासद, ६ मे. फिलिप स्यांडेल मेलव्हिल, सभासद.

स. १८७५ च्या फेब्रु. २७ पासून ३१ मार्चपर्यंत चौकशी झाली. प्रत्यक्ष राजा अपराधी धरून त्याच्या चौकशीचा हिंदुस्थानांत हा पहिलाच प्रसंग होता, यामुळें या चौकशीकडे लोकांचें विशेष लक्ष वेधलें. एतद्देशीय राजे लोकांना इंग्रजांकडून न्याय मिळण्याविषयीं लोक साशंक होते. तसेंच लोकांनाहि अशा प्रसंगीं आपलें कांहीं कर्तव्य आहे याची जाणीव होती. रेसिडेंटांनीं खटल्याच्या खर्चाकरितां अधिक रक्कम मिळणार नाहीं असें यांना कळवितांच सार्वजनिककाका गणेश वासुदेव जोशी, पुणें, यांनीं जितकें द्रव्य लागेल तितकें देण्याचें आश्वासन देऊन एका मोठ्या पेढीवर लाख रुपयांची रक्कम अनामत ठेवली. शिवाय लोकांनीं वर्गणी जमविण्यासहि सुरुवात केली.

वरील मंडळीपैकीं तिघां हिंदी गृहस्थांनीं महाराजांना निर्दोषी ठरविलें, पण युरोपियन लोकांनीं पूर्ण दोषी ठरविलें. वरच्या सरकारनें महाराजांना विषप्रयोगाच्या आरोपांतून दोषमुक्त केलें, पण दुसरे आरोप गृहीत धरून यांना पदच्युत केलें (१८७५ एप्रिल २३).

महाराणी जमनाबाईसाहेबांच्या मांडीवर एक मुलगा दत्तक देऊन त्याचें नांव सयाजीराव ठेवलें व होळकर सरकारकडून सर टी. माधवराव यांस मागून घेऊन कुलमुखत्यारी देऊन दिवाण नेमलें. शेवटीं पदच्युतस्थितींत मद्रास येथें यांचा अन्त झाला.

गायकवाड, महाराज-सयाजीराव खंडेराव— (जन्म स. १८६३-मृत्यु स. १९३८, कारकीर्द स. १८८१-१९३८) जागतिक प्रसिद्धि असलेले राज्यव्यवस्थापक, ज्ञानोपासक व समाजसुधारक बडोदा राज्याचे अधिपति. हे कवळण्याच्या काशिराव गायकवाडांचे द्वितीय चिरंजीव. यांना कै. खंडेराव गायकवाडांच्या पत्नी जमनाबाईसाहेब यांनीं दत्तक घेतलें (२७ मे १८७५). यांचें मूळचें नांव गोपाळराव असें होतें, तें बदलून सयाजीराव ठेवण्यांत आलें.

दत्तक देण्याकरितां आणलेल्या मुलांना 'कां आलांत?' असा प्रश्न केला असतां यांनींच फक्त 'महाराज होण्याकरितां' असें उत्तर देऊन जमनाबाईचें लक्ष आपणांकडे विशेष ओढून घेतलें.

यांना शिक्षण देण्याच्या बाबतींत यांच्या मातोश्री जमनाबाई, दिवाण सर टी. माधवराव व मि. इलियट यांनीं अत्यंत दक्षता बाळगून मेहनत घेतली. प्रिन्स ऑफ वेल्सचें स्वागत, दिल्ली दरबाराला जाणें, वगैरेंनीं यांच्या शिष्टाचारपूर्वक वागणुकीला वळण लागत गेलें. यांचें लग्न होऊन (१८८०) राज्यकारभाराचें व्याख्यानद्वारा शिक्षण मिळून यांना अधिकारपद प्राप्त झालें (१८८१ डिसें.). अशा तऱ्हेनें बाराव्या वर्षी खेडेगांव सोडून निरक्षर स्थितींत बडोद्यास आलेला गरीब मराठ्याचा मुलगा अठराव्या वर्षी बडोद्यासारख्या मोठ्या राज्याचा कारभार स्वतःच्या जबाबदारीवर चालवूं लागला.

मागच्या खंडेराव व मल्हारराव यांच्या राजवटींत राज्यकारभार नियमित नसून त्यांत प्रमाणबद्धता कांहींच नव्हती. त्यामुळें राज्याची आर्थिक स्थिति बिलकुल चांगली नव्हती. पण मध्यन्तरींच्या काळांत त्यांत आमूलाग्र बदल झाला. यांनीं राज्यकारभार हातीं घेतला तेव्हां जुनी वर्जफेड व्यवस्थित करूनहि संस्थानच्या तिजोरींत दीड कोटि रुपये शिल्लक असलेले आढळले. शाळाखातें, वैद्यकीय खातें वगैरेंची स्थापना व विशेषतः बडोदा कॉलेजची स्थापना या सुधारणांमुळेंच दिवाण सर टी. माधवराव यांस 'राजा' ही मानाची पदवी ब्रिटिश सरकारनें बहाल केली (१८७७).

राज्यकारभाराची व्यवस्था पाहण्यास सुरुवात केल्यावर प्रथम यांना बारीकसारीक गोष्टींकडेसुद्धां लक्ष द्यावें लागलें. प्रत्येक किरकोळ गोष्टीला यांना मंजुरी द्यावी लागे. त्यामुळें यांचा फार वेळ खर्च होई. याबरोबरच अधिकाऱ्यांना जबाबदारीची जाणीव होत नसे. तेव्हां यांनीं नियमबद्धता निर्माण करून जबाबदारीची विभागणी केली आणि आपल्या राज्याचें यंत्र आपल्या गैरहजेरींतहि सुरळित चालण्याची व्यवस्था केली. नंतर आपण परदेशांत राहून आपलें राज्य कसें चालतें याची प्रचीतीहि यांनीं पाहिली. जगाच्या प्रवासांत उपयुक्त व प्रगतिपर अशी कोणतीहि गोष्ट आढळतांच ती पहिल्या दर्जाच्या तज्ज्ञांच्या सल्ल्यानें योजना आंखून अमलबजावणीकरितां योग्य अधिकाऱ्याकडे सोंपविणें आणि मग त्याच्या अधिकारांत आपण हात न घालणें, हें यांच्या कारभाराचें प्रमुख सूत्र होय. शिवाय आरंभलेली योजना लहरीनें मध्येंच न सोडतां ती चिकाटीनें शेवटपर्यंत नेऊन यशस्वी करण्यांत यांचा हातखंडा असे.

राज्यावर येतांच यांनीं प्रजा सुखी राहावी व तिची भरभराट व्हावी म्हणून एक जाहीरनामा काढला आणि राज्याच्या प्रत्येक भागांत प्रवास करून सर्व राज्य नजरेखालीं घातलें. पहिल्या कांहीं खेपा तर यांनीं बैलगाडींतूनहि केल्या. राज्यकारभार चालविण्याकरितां अधिकाऱ्यांचें सल्लागार मंडळ नेमलें (१८८३). आणि त्याची वाढ करीत तें सत्तावीस सभासदांचें करण्यांत आलें. त्याला लेजिस्लेटिव्ह कौन्सिल किंवा धारासभा असें म्हणतात. यांनीं राज्यांत न्याय व अंमलबजावणी या खात्यांची विभागणी केली. ही सुधारणा ब्रिटिश मुलखांतहि १९४५ सालापर्यंत झाली नाहीं. संस्थानांत दिवाणी व फौजदारी कायदे करण्यांत आले (१८९२). ग्रामपंचायतीचा पुनरुद्धार करून त्यांच्यामार्फत गांवची सर्व व्यवस्था व्हावी, असें यांनीं ठरवून दिलें (१९००). आरोग्य, पोलिस, पाणी वगैरे बाबतींत नव्या योजना केल्या व आपले हुकूम सरकारी आज्ञापत्रिकेच्या द्वारें प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली.

यांना वरिष्ठ इंग्रज सत्तेशींहि सतत झगडावें लागलें. या दृष्टीनें सेटलमेंट कमिशनरचे असिस्टंट वासुदेव सदाशिव बापट यांची रेसिडेंटनें यांच्या गैरहजेरींत दरबारकडून चौकशी करवून त्यांना सहा महिन्यांची शिक्षा व दहा हजार रुपये दंड करविला (आगस्ट १८९४) असतां यांनीं परत येतांच त्यांना निर्दोषी म्हणून सोडलें (१८९५). यामुळें संस्थानच्या अन्तर्गत कारभारांत ब्रिटिश सरकारचा कितपत हात असावा असा प्रश्न उपस्थित झाला. त्याबद्दल यांना पुष्कळच मानसिक त्रास सहन करावा लागला व वरिष्ठ सरकारशीं झगडावें लागलें.

१९०० सालीं हे युरोपमध्यें असतां व्हाइसरॉय कर्झन हे बडोद्याहून ग्वाल्हेरीस गेले. बडोद्यास हे नसल्यामुळें

त्यांनीं स्वागतसमारंभ करून घेण्याचें नाकारलें. पुढें लवकरच संस्थानिकांच्या वागणुकीसंबंधीं 'कर्झनसर्क्युलर' बाहेर पडलें. त्यांत संस्थानिकांविषयीं जरा अपमानकारक भाषा होती. शिवाय संस्थानिकांनीं व्हाइसरॉयच्या परवानगीशिवाय हिंदुस्थानच्या बाहेर जाऊं नये, तशी परवानगी देणें सर्वस्वीं त्यांच्या स्वाधीन राहील, वगैरे मजकूर असल्यानें यांना तो अत्यंत अपमानकारक वाटला. हे १९०१ सालीं हिंदुस्थानांत परत आले व त्या सर्क्युलराबद्दल आपली तीव्र व स्पष्ट नापसंती यांनीं व्हाइसरॉयना कळविली.

१९०३ सालीं बादशहा सातवे एडवर्ड यांच्या राज्यारोहणनिमित्त दिल्ली येथें दरबार भरविण्याचें व हत्तीवरून मिरवणूक काढण्याचें ठरविण्यांत आलें व त्याबरोबरच सर्व संस्थानिकांनीं दरबारांत व मिरवणुकींत भाग घ्यावा अशा अर्थाचा हुकूम काढण्यांत आला; याबद्दलहि यांनीं समयोचित शब्दांत नाखुषी व्यक्त केली.

तसेंच यांच्या खास नोकरांचे पोषाख निळ्या रंगाचे होते. निळा रंग सार्वभौमत्वाचा निदर्शक, अर्थातच व्हाइसरॉयनीं अशा तऱ्हेचे बरोबरीचे निदर्शक पोषाख वापरण्यास संस्थानिकांस बंदी केली.

ता. १ जाने. १९०४ रोजीं दिल्लीस दरबार भरविण्यांत आला. समारंभाचे वेळीं व्हाइसरॉयचें भाषण झाल्यावर बादशहांचें भाषण वाचण्यांत आलें. नंतर प्रणाम करून राजनिष्ठा व्यक्त करण्याचा कार्यक्रम सुरू झाला. निजामसाहेब कुर्निसात करून परत आपले जागेवर येऊन बसले. नंतर यांची पाळी आली. तेव्हां यांनीं 'राज्यारोहण व नूतन वर्षाबद्दल माझा आभिनंदनपर संदेश बादशहांना कळविण्याची तसदी व्हाइसरॉयनीं घ्यावी' असे सूचक उद्गार काढले. १९०५ सालीं प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानांत आले असतां हे बडोद्यास नव्हते. कर्झनसाहेब यांना कोठेंहि बाहेर जाण्याची बंदी करणार होते; पण करून, तसें करण्यास मनाई झाली, असें म्हणतात. लॉर्ड मिंटो यांच्या वेळीं 'देशांत अशांतता व अराजकता माजली असल्यानें तिच्या नाशार्थ संस्थानिकांनीं मदत करावी' असें सर्क्युलर काढलें असतां 'एकट्या गायकवाड सरकारखेरीज करून इतर सर्वांनीं आपआपल्या संस्थानांतून राजद्रोहाचें समूळ उच्चाटन करण्यास संमति दिली आहे' वगैरेसारखी टीका टाइम्समधून यांच्यावर झाली. अरविंद घोष व श्यामजी कृष्णवर्मा हे जहाल राजकारणी पुरुष प्रथम यांच्याकडे नोकर असल्यानेंहि यांचेविरुद्ध जरा संशयाचेंच वातावरण असे.

ता. २२ जून १९११ रोजीं लंडन येथें झालेल्या राज्यारोहणसमारंभास हे हजर होते. पुढें डिसेंबरांत बादशहांची स्वारी दिल्लीस आली. तेथें दरबारांत व्हाइसरॉय व एक्झिक्युटिव कौन्सिलर यांनीं दरबारी प्रणाम केल्यानंतर हैद्राबादचे निजाम व यांची पाळी आली. बादशहांनीं नजर केलेलें स्वास्तिक व पट्टा घालण्याचें हे विसरले होते. शिवाय राजा व राणी यांना दोन प्रणामांऐवजीं यांनीं एक केला व पाठ न दाखवितांच परत येण्याचेंहि अवधान यांना राहिलें नाहीं. या अपमानकारक चुकीबद्दल यांनीं पत्र लिहून दिलगिरी प्रदर्शित केली. तरीहि या प्रसंगानें हे सर्वसाधारण सरकारी कार्यकर्त्यांच्या टीकांस पात्र झाले. बॅ. के. ग. देशपांडे यांना नोकरींतून कमी करण्याची मागणी यांना मान्य करावी लागली. यांनीं त्यांना नुकसानीबद्दल दहा हजार रुपये देऊन नोकरींतून रजा दिली. बडोदा कॉलेजचे प्रो. डी. एल्. पुरोहित हे पांडेचरीस जाऊन अरविंद घोषांना भेटून आले म्हणून त्यांना नोकरींतून कमी करण्याचा प्रसंग आला असतां त्यांनींच राजीनामा दिला.

हे आपल्या प्रजेंत जरी अत्यंत लोकप्रिय होते तरी त्याचाच उलट परिणाम म्हणून वरिष्ठ सरकारास अप्रिय बनले. त्यामुळें यांना वारंवार मानसिक त्रास भोगावा लागे. महायुद्धाच्या वेळीं ५० लक्षांची मदत व १ कोटीचे वॉरबाँडस् घेऊन यांनीं मदत केली. ब्रिटिश सरकारनेंहि यांना जी. सी. आय. ई. ही पदवी देऊन यांना यांच्या युद्धकामगिरीबद्दल गौरविलें (१९१७).

हे राज्यावर आले तेव्हां यांच्या राज्यांत १८० प्राथमिक शाळा होत्या. पुढें यांनीं १८९३ सालीं अमरेली प्रान्तांत प्रयोगादाखल सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अमलांत आणली (१८९३) व स. १९०६ सालीं सर्व राज्यांत प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचें करण्यांत आलें. त्याकरितां २५३९ शाळा चालविण्यांत येऊं लागल्या (रिपोर्ट ३०-३१ पान २३७). याच पद्धतीनें दुय्यम व उच्च शिक्षणाची व्यवस्था करण्यांत आली. अनेक शिष्यवृत्त्या निर्माण करून निरनिराळ्या विषयांत अभ्यास करण्याला उत्तेजन देण्यांत आलें व औद्योगिक शिक्षणाकरितां कलाभुवनासारख्या संस्थाहि निर्माण करण्यांत आल्या. स्त्रीशिक्षणाकरितां पुस्तकी व औद्योगिक शिक्षणाची योजना आंखून त्याकरितांहि यांनीं अनेक शिष्यवृत्त्या ठेवल्या. मुंबई इलाख्यांतील उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांकरितां एक लक्ष रुपयांची देणगी महाराणीसाहेबांनीं दिली.

वाचनालयाबाबतहि यांच्या संस्थानांतील प्रगति अपूर्व आहे. शाळांप्रमाणेंच वाचनालयें प्रत्येक गांवीं निर्माण करण्याकरितां यांनीं स्वतंत्र वाचनालयखातें उघडून त्यामार्फत वाचनालयें काढण्याची व्यवस्था केली. अमेरिकेंतल्याप्रमाणें फिरत्या वाचनालयांची व्यवस्थाहि यांनीं आपल्या संस्थानांत केली आहे. यांच्या मध्यवर्ती वाचनालयांत लाखांवर पुस्तकें असून अनेक विभाग पाडून त्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

याशिवाय संस्कृत, मराठी, गुजराथी, हिन्दी व इंग्रजी इत्यादि भाषांतून ३०० च्या वर ग्रंथ यांनीं छापवून प्रसिद्ध केले व अनेक ग्रंथांना उत्तेजनादाखल मदत केली. देशी भाषांना इंग्रजी भाषेमुळें जी ओहोटी लागली आहे तिच्या प्रतिकारार्थ 'श्री सयाजी शासन शब्दकल्पतरु' या प्रचंड कोशाची रचना करण्यांत आली. यांत वेगळाल्या आठ भाषांतील शब्द दिले असून राजकीय कार्यांत व व्यवहारांत सर्व प्रान्तांत एक भाषा प्रचलित होऊन तिला राष्ट्रभाषेचें स्वरूप येईल अशी व्यवस्था आधींच करण्यांत आली आहे.

ज्ञानप्रसाराप्रमाणेंच समाजसुधारणेच्या बाबतींतहि यांनीं हिंदुस्थानांत अघाडीचा मान पटकाविलेला आहे.

१ मिश्रविवाह (सगोत्र व असवर्ण विवाहाला मान्यता), २ पडदापद्धतिबंदी, ३ बालविवाहबंदी, ४ विधवाविवाह, ५ अस्पृश्यतानिवारण (१८८२ सालीं अस्पृश्यांकरितां १८ शाळा काढल्या), ६ विवाहविच्छेद, ७ कन्याविक्रयबंदी, ८ स्त्रियांचा वारसा, वगैरे कायदे करून यांनीं सामाजिक सुधारणा प्रत्यक्ष अमलांत आणल्या. वाटेल त्यानें पौरोहित्य करण्यापेक्षां विशिष्ट शिक्षण घेतलेल्यांनींच पौरोहित्य करावें म्हणून त्यांच्याहि वकिलाप्रमाणें परीक्षा घेऊन, त्यांना सनद देण्याची व्यवस्था यांनीं केली. यामुळें त्यांच्याहि उपजीविकेचा प्रश्न सुटला आणि लोकांना सुशिक्षित पुरोहित मिळूं लागले.

सुधारणांच्या या प्रत्यक्ष पुरस्कारामुळेंच यांना स. १९०४ सालीं राष्ट्रसभेबरोबर भरलेल्या 'राष्ट्रीय सामाजिक परिषदेचें' अध्यक्ष निवडण्यांत आलें. हिंदुस्थानांतच काय, पण बाहेर देशांतहि आढळलेली चांगली गोष्ट हे आपल्या राज्यांत आणून सोडण्याविषयीं अगदीं तत्पर असत.

यांनीं केलेल्या सुधारणा किंवा औद्योगिक प्रयत्न ब्रिटिश सरकारचें केवळ अनुकरण म्हणून कधींच केल्या गेल्या नाहींत. ब्रिटिश राज्यांत बालविवाहाला प्रतिबंध करणारा शारदाकायदा होण्याअगोदर किती तरी पूर्वी यांच्या राज्यांत बालविवाहाला प्रतिबंध करणारा कायदा जारी होता. ब्रिटिश राज्यांत हिंदु कायद्याला रूप देण्याचें १९४५ सालीं अशक्य वाटणारें काम १९०५ सालींच यांनीं पूर्ण केलें आहे. याशिवाय राज्यांतील कोणतीहि बाब अशी नाहीं, की तींत यांनीं सुधारणा व वाढ करून त्यांत उपयुक्तता व सोईस्करपणा आणला नाहीं.

यांनीं हिंदुस्थान, चीन, जपान, अमेरिका व युरोप या देशांत प्रवास केला. युरोपांत तर हे वारंवार जात व तेथें दीर्घकाल राहत. त्यामुळें यांच्यावर वरिष्ठ सरकारचा रोष झाल्याचींहि उदाहरणें आहेत. पण हेहि आपल्या हक्क व स्वातंत्र्याविषयीं दक्ष असल्यानें यांनीं आपला कार्यक्रम कधीं सोडला नाहीं. आणि यांनीं आपल्या डोळे उघडे ठेवून केलेल्या प्रवासाचा फायदा आपल्या राज्याला भरपूर दिला.

यांनीं राज्यावर येतांच अनेक समाज-सुधारणांचा पुरस्कार कायद्यानें केलेला असला तरी हे जुलमानें कोणतीहि सुधारणा समाजावर लादण्याच्या सर्वस्वीं विरुद्ध असत. अस्पृश्यतानिवारणाच्या पुरस्काराबाबत यांची बरोबरी करणारा कोणीहि सांपडणार नाहीं. त्यांचें शिक्षण, वसतिगृहें व त्यांना नोकऱ्या देण्याच्या बाबत यांनीं जास्तींत जास्त व्यवस्था केली. अस्पृश्यांना आपलें खंडेरावाचें खासगी मंदिर खुलें करण्याचें काम यांनीं केलें; पण राज्यांतील सर्व मंदिरें अस्पृश्यांना खुलीं करण्याचे बाबतींत लोकमताचा थोडा विरोध दिसतांच मनांतून इच्छा असूनहि तो प्रश्न तसाच तहकूब ठेवला.

सर टी. माधवराव, व्ही. पी. माधवराव, काजी शहाबुद्दीन, सर रमेशचंद्र दत्त, सर मनुभाई मेथा, कृष्णमाचारी इत्यादि यांचे प्रमुख दिवाण होत.

यांचें पहिलें लग्न तंजावरच्या मोहिते कुलांतील राजकन्या लक्ष्मीबाईशीं झालें व त्यांचें नांव चिमणाबाई असें ठेवण्यांत आलें. त्यांना एक कन्या झाली, पण ती लहानपणींच वारली. त्यांचें दुसरें अपत्य फत्तेसिंहराव. पण त्यानंतर त्या लवकरच वारल्या (१८८५). त्यांच्या लग्नाच्या दहाव्या दिवशीं लक्ष्मीविलास राजवाड्याचा कोनशिलासमारंभ झाला. 'चिमणाबाई न्यायमंदिर' त्यांच्या स्मरणार्थ आहे. फत्तेसिंहराव स. १९०८ सालीं वारले. त्यांचे चिरंजीव प्रतापसिंह हे सध्यां गादीवर आहेत.

दुसरा विवाह देवासचे सरदार बाजीराव अमृतराव घाटगे यांच्या कन्या गजराबाईंशीं झाला. त्यांनेंहि नांव चिमणाबाईच ठेवण्यांत आलें. त्याहि पतिनिष्ठ असून निरनिराळ्या कामीं यांना मदत करीत असतात. आपल्या सुधारक पतीचे विचार त्यांनीं आत्मसात केले. त्यांनीं स. १९१४ सालीं पडदाचाल जाहीर रीतीनें सोडली. यांना जयसिंहराव, शिवाजीराव, इंदिराराजे व धैर्यशीलराव अशीं अपत्यें झालीं. यांपैकीं जयसिंहराव व शिवाजीराव वारले. इंदिराराजे यांचें कुचबिहारच्या राजाशीं लग्न झालें.

यांच्या आयुष्याचे सहा काळखंड पडतात.–१.राज्याशीं संबंध येण्यापूर्वीचा बाल्यकाळ. तो अगदीं खेड्यांत गरीब कुटुंबांत गेला (१८६३-७५), २. शिक्षणकाळ. यांचें शिक्षण घरींच अनुभवपद्धतीनें झालें (१८७५-८१), ३. राज्यारोहण झाल्यानंतर राज्यपद्धतीची पुनर्घटना व तिचा अंमल करण्याची व्यवस्था करण्याचा काळ (१८८१-८७), ४. यानंतर प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें प्रवास वगैरे करून विविध अनुभव संपादन करण्याचा काळ (१८८७-९५), ५. मनामध्यें जमविलेल्या नव्या कल्पना व नवे विचार यांचा उच्चार व आचरण करण्याचा काळ (१८९५-०९), ६. यापुढील काळ मात्र यांनीं आपली राज्यव्यवस्था सुप्रतिष्ठित करून स्थैर्यानें तिची प्रगति करण्यांत घालविला (१९०९-३८). अशा प्रकारें यांच्या आयुष्याचें थोडक्यांत चित्र काढतां येईल.

हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्य आणि संस्थानें यांतील राज्यकारभाराची नेहेमीं तुलना होते. या तुलनेंत ब्रिटिश राज्यापेक्षांहि सर्व प्रकारें व्यवस्थित अणि प्रगतिपर राज्यकारभार चालविण्याच्या बाबतींत यांची व यांच्या संस्थानची ख्याति आहे. अठराव्या वर्षी अधिकार प्राप्त झाल्यापासून यांनीं आपल्या प्रगतिपर धोरणाला सुरुवात केली आणि आपल्या दीर्घकालीन कारकीर्दीत हे आपल्या जागरूक धोरणापासून कधींच च्युत झाले नाहींत. त्यामुळें यांनीं आपल्या प्रजेची व राज्याची भरभराट तर साधलीच पण उत्कृष्ट राज्यकर्ता अशी कीर्तिहि कमावली. ब्रिटिश राज्यांत अनेक वेळां असंतोषानें उग्र रूप धारण केलें; पण हे परप्रान्तांत राज्य करीत असूनसुद्धां यांनीं आपल्या राज्यांत खरोखरच अभिमान बाळगण्यासारखें विश्वासाचें वातावरण शेवटपर्यंत कायम टिकविलें. यांच्या राज्यांत लहरीपणाला थोडासुद्धां वाव नसे. प्रत्येक गोष्ट योजनापूर्वक आरंभून ती योजनेबरहुकूम तज्ज्ञांकडून पार पाडण्यावर यांचा कटाक्ष असल्यानें गोंधळ किंवा धरसोड न होतां आंखीव पद्धतीनें सर्व गोष्टी पार पडत. प्रत्येक खात्यावर पूर्ण वाकबगार माणसें नेमण्यावर यांचा कटाक्ष असे व जगांतील पहिल्या दर्जाच्या लोकांशीं आपल्या राज्यकारभाराचा संबंध येईल अशी व्यवस्था हे ठेवीत. जेथें यांचा संबंध येई तेथें आपली छाप ठेवण्याची कला यांना पूर्ण साधली होती. राउंड टेबल कॉन्फरन्सशीं संबंध येतांच 'संस्थानिकांनीं आपले हक्क कमी झाले तरी फेडरेशनचा पुरस्कार करून आपली जूट व शक्ति वाढवावी' असा यांनीं आदेश दिला. तसेंच यांचा अनेक जागतिक परिषदांशीं संबंध आला व तेथेंहि यांनीं उत्कृष्ट व नवीन विचारांचीं भाषणें करून आपली छाप कायम ठेवली. सतत ध्येयवादानें आणि संग्राहक बुद्धीनें वागून यांनीं आपला उत्कर्ष साधला, आपल्या प्रजेचें कल्याण केलें, मराठ्यांच्या उज्ज्वल इतिहासांत भर घातली आणि जगांतील एक कर्तबगार आणि यशस्वी महाराजा म्हणून अलौकिक कीर्ति मिळविली.

गायकवाड, सिताराम रामचंद्र— (जन्म स. १८५९, मृत्यु स. १८९७) शाईच्या कागदाचे उत्पादक व स्थलवर्णनकार. यांचें शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालें होतें. रसायनशास्त्राचा यांचा अभ्यास चांगला होता. यांनीं शाईचा कारखाना काढून चांगले पैसे कमाविले. यांनीं शाईचे कागद, गोळ्या, पूड वगैरे तयार करण्याची कल्पना काढून स. १८८८ सालीं चांगली प्रसिद्धि मिळविली. यांच्या शाईच्या कागदाची फार वाखाणणी झाली. स. १८९० सालीं हे कागद विलायतेंत एक लाख खपले. यांचा विद्याव्यासंग जबर होता. यांनीं लिहिलेलें 'पुणें वर्णन' हें पुस्तक विशेष प्रसिद्ध आहे. या पुस्तकांत पुण्यासंबंधींची प्राचीन व तत्कालीन सर्व माहिती दिली आहे.

यांचें वाङ्मय— (१) विजापूरवर्णन १८८४; (२) पुणें वर्णन भाग १।२, १८८६।१८८८; (३) कुणकेश्वर; (४) सोलापूर जिल्ह्याचा भूगोल; (५) विजापुरांतील प्राचीन इमारती १८८७; (६) बाळबाळंतीणसंगोपन १८८८; (७) आर्शारिया १८९५.

गांगुली, सुप्रकाश— (जन्म स. १८८६) कलावशेषांचे सुप्रसिद्ध अभ्यासक व बडोद्याच्या आर्टगॅलरीचे व्यवस्थापक. हे जगप्रसिद्ध कवि रवीन्द्रनाथ टागोर यांचे भाचे. यांचें शिक्षण डोव्हेटन विद्यापीठ, कलकत्ता, येथें झालें. नंतर उत्तम कला व पुराणवस्तु-

संशोधन यांचे अभ्यासासाठीं हे युरोपास गेले. यानंतर यांनीं डॉ. बी. बी. स्पूनर यांचे सहकारी म्हणून इंपीरियल आर्किऑलॉजिकल सर्व्हेमध्यें सहा वर्षें काम केलें. तेथें यांनीं बंगाल, बिहार, ओरिसा, आसाम व छोटा नागपूर या प्रान्तांतील जुने शिलालेख घेऊन त्यांचे फोटो काढणें, त्यांची यादी तयार करणें, कलकत्ता येथील पदार्थसंग्रहालय आणि त्याच्या शाखा यांमधून जुन्या हिंदी कलावशेषांचा अभ्यास करणें अशा तऱ्हेचा व्यासंग केला.

(1) 'Descriptive Guide to the Baroda Museum and Art Gallery', (2) 'A Monograph on Ragas and Raginis', (3) 'A Monograph on Rajput and Kangra Paintings', (4) 'A Short History on the Art of Brocade Weaving in Gujarat', (5) 'Moghal Textiles', (6) 'Lacquer Work in India' हे यांचे ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत.

गांगुली, सुरेन्द्रनाथ— (मृत्यु स. १९२१ सुमार) सुप्रसिद्ध बंगाली चित्रकार. अवनींद्रनाथ टागोरांचे शिष्य.

यांचीं 'नारद', 'नहुष', 'Discomfited Durvasa' इत्यादि चित्रें प्रसिद्ध आहेत. यांच्यावर कोणत्याहि कलमाची छाप पडलेली नसून यांचें कलम अगदीं स्वतंत्र आहे. अजिंठा-चित्रपद्धतीचा क्वचित् भास होतो. हे एकवीस वर्षांचे अल्पवयी मृत्यु पावले.

गांधी, मंगळदास— (जन्म स. १८९४ सुमार) अट्टल चोर. उंच देहयष्टि, मजबूत हाडपेर, पाणीदार डोळे व एका पायानें लंगडा. हा हुषार, कल्पक व दूर दृष्टीचा होता. हा सत्यवादी असल्यानें तुरुंगांत यास लोक 'महात्मा गांधी' असें विनोदानें म्हणत.

हा मूळ काश्मीर प्रान्तांतील जम्मूचा राहणारा. याला उर्दू लिहितांवाचतां येतें व इंग्रजीहि थोडेंफार समजतें. गेल्या महायुद्धांत लष्करांत भरती होऊन हा मेसापोटेमियांत गेला होता. तेथें यानें अनेक धाडसाचीं कामें केलीं. शत्रूचे प्रदेश जिंकल्यावर ते लुटण्याचे देखावे यानें पाहिले होते व ती कला याला अवगत झाली होती.

पहिलें महायुद्ध संपल्यावर बेकारींत हा मोटार ड्रायव्हर झाला. पण लवकरच याचा साहसी स्वभाव जागृत होऊन हा लूटमार करूं लागला. अशा प्रकारें हा अट्टल चोर बनला व याला अनेक (सात आठ) वेळां तुरुंगांत जावें लागलें. मध्यंतरीं एकदोनदा उपरती होऊन हा आपल्या गांवीं निघून गेला होता; पण कांहीं दिवस लोटले कीं नशेबाजाच्या तल्फीप्रमाणें ही याची वृत्ति जागृत होई व हा मुंबईस येऊन आपलें चौर्यकर्म सुरू करी.

स. १९३१ च्या गणेश चतुर्थीच्या रात्रीं ठाकुरद्वारावरील एका प्रभु गृहस्थाच्या घरीं चोरी करावयाचें यानें ठरविलें होतें. हें बिऱ्हाड दुसऱ्या मजल्यावर असल्यानें हा वर जाणाऱ्या पाण्याच्या नळाला धरून मध्यरात्रीच्या सुमारास वर चढला. आतां खिडकीला हात घालणार तोंच आंतून कोणीं खिडकी उघडली व याचा हात निसटून हा इतक्या उंचावरून खालीं पडला. हें पाहतांच आंतून खिडकी उघडणाऱ्या वृद्धाच्या तोंडून 'अरेरे! माझ्या दाराशीं हत्या होणार! फुकट मरणार बिचारा!' असे उद्गार निघाले. या उद्गारांचा याच्या मनावर फारच परिणाम होऊन याला लाज वाटली व पश्चात्तापानें यानें इतःपर चोरी करावयाची नाहीं असें ठरविलें (गुन्हेगार, पा. १२६-१२९). गुन्हेगारांचें मानसशास्त्र या दृष्टीनें हें चरित्र अभ्यासण्यासारखें आहे.

गांधी, महात्मा-मोहनदास करमचंद— (जन्म स. १८६९ ऑक्टोबर २) हिंदुस्थानचे जगप्रसिद्ध पुढारी व विसाव्या शतकांतील अभिनव राजकीय तत्त्वज्ञानी.

यांचा जन्म काठेवाडांत सुदामपुरी अथवा पोरबंदर येथें झाला. यांचे आजे उत्तमचंद हे पोरबंदरचे आणि वडील करमचंद हे पोरबंदर, वांकानेर व राजकोट या संस्थानांचे दिवाण होते. यांची आई कर्मठ, धर्मशील व करारी होती. हे संप्रदायानें वैष्णव असून जातीनें वैश्यांपैकीं बनियामोढवाणी होत.

यांचें शिक्षण काठेवाड हायस्कूलमध्यें झालें. हे मॅट्रिक झाल्यावर (१८८७) पुढल्याच वर्षी शिक्षणाकरितां इंग्लंडला रवाना झाले (१८८८). तेथें हे लंडन युनिव्हर्सिटीचे मॅट्रिक होऊन बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाले (१८९१).

यांनीं प्रथम मुंबई हायकोर्टाची सनद काढली (१८९३). पण त्याच सालीं दक्षिण आफ्रिकेंत एका कुळाची बाजू समजावून देण्याकरितां यांना जाण्याची संधि मिळाली. पगार, कच्चा खर्च व एक वर्षाची मुदत ठरली व हे झांजीबारला पोंचले. तेथें यांना

काळागोरा हा भेद प्रत्येक ठिकाणीं जाणवूं लागला. दरबानच्या कोर्टांत डोक्याला पगडी घालून हे बसले असतां यांना मॅजिस्ट्रेटनें पगडी काढण्यास सुनाविलें. पण यांनीं पगडी काढण्याचें नाकारून हे कोर्टाबाहेर पडले.

हिन्दी लोकांच्या श्रमानें आफ्रिकेचें नंदनवन झालें; पण त्यांना तेथें मजूरापेक्षां जास्त किंमत नाहीं. यांनासुद्धां तेथें 'मजूर वकील' असेंच म्हणत असत. प्रथम हिंदुस्थान सरकारच्या प्रोत्साहनानें ते मजूर तिकडे गेले, पण त्यांना नागरिकत्वाचा साधा हक्कहि नाकारण्यांत येऊं लागला. यानंतर कांहीं हिन्दी लोक साउथ आफ्रिकन रिपब्लिकमध्यें शिरले. तेथें बोअर लोकांचें राज्य होतें. तेथें आशियांतील लोकांच्या विरुद्ध कायदे होऊं लागले, तेव्हां परवाने असणारांनींच व्यापार करावा असें ठरलें. पण बोअर लोकांनीं हिन्दी लोकांना परवाने देण्याचेंच बंद केलें. तेव्हां प्रिटोरिया येथील ब्रिटिश एजंटांनीं "परवान्याची फी सरकारकडे पाठवून द्या व तरीहि परवाना न मिळाला तर परवान्याशिवाय व्यापार करा" असा सल्ला हिन्दी लोकांना दिला. यामुळेंच यांना कायदेभंगाची कल्पना प्रथम मिळाली असावी. नंतर जेव्हां हिन्दी लोक पकडले जाऊं लागले तेव्हां यांनीं पैसे न देतां तुरुंगांत जाण्याची सूचना केली. या दडपशाहीविरुद्ध यांनीं पाठविलेले अर्ज ब्रिटिश सरकारनेंहि निर्दोषी ठरविले. त्या वेळीं नाताळ इंडियन काँग्रेसचे हे सेक्रेटरी असत व तेथें ही चळवळ जोरांत होती. हिंदुस्थान सरकारपुढें या तक्रारी मांडण्याकरितां हे हिंदुस्थानांत आले (१८९६). पण तिकडे यांच्याविषयीं लोकमत अत्यंत कलुषित करण्यांत आलें व हे तिकडे परत गेले असतां लोकांच्या क्षोभांतून पोलिसाचा वेष घालून यांना बाहेर पळावें लागलें.

हक्क पाहिजेत तर जबाबदारीहि पत्करिली पाहिजे म्हणून बोअर युद्धांत यांनीं ऐन रणक्षेत्रांतून जखमी लोकांना उचलून आणण्याचें ब्रिटिशांतर्फे काम केलें (१८९९). प्रकृतीकरितां हे १९०१ सालीं हिंदुस्थानांत आले असतां तिकडे ब्रिटिश व बोअर यांचा तह होऊन त्यांत हिंदी लोकांसंबंधीं प्रतिकूल धोरणावर शिक्कामोर्तब झालें आणि यांनीं ब्रिटिशांना केलेली मदत वायां गेली. तेव्हां यांनीं 'ट्रान्सव्हाल ब्रिटिश इंडियन असोसिएशन' स्थापली व आपण तिचे सेक्रेटरी झाले. जोहान्सबर्गमध्यें प्लेग झाला असतां हिन्दी लोकांच्या शुश्रूषेबाबत यांनीं अत्यंत कष्ट केले. नंतर 'इंडियन ओपिनियन' नांवाचें इंग्रजी, गुजराथी, हिंदी व तामीळ या चार भाषांत चालविण्यांत येणारें साप्ताहिक काढलें (१९०४). रस्किनचें 'Unto This Last' हें पुस्तक वाचून यांना एक नवा मार्ग सुचला आणि यांनीं 'फिनिक्स' नांवाची वसाहत स्थापिली. छापखाना व पत्रें वसाहतीच्या स्वाधीन केलीं व शिवाय स्वतःचे पाऊण लाख रुपये अर्पण केले. याच वेळीं टॉलस्टॉयच्या Kingdom of God is Within You या पुस्तकाचा व भगवद्गीतेचा यांच्यावर विशेष परिणाम झाला. झुलू या स्थानिक लोकांनीं बंड केलें असतां यांनीं डोली-वाहकाचें काम करून लोकांची शुश्रूषा केली (१९०६). ही कामगिरी उरकून हे जोहान्सबर्गला येतात तों "नवीन परवाने काढण्याबद्दलचा आणि त्याकरितां करावयाच्या अर्जावर गुन्हेगाराप्रमाणें 'अंगठ्याचा ठसा असावा' असा हुकूम काढणारा 'काळा कायदा' निघाला (१९०६). ही अपमानकारक पद्धत अमान्य करावयाची व जरूर तर त्याकरितां सत्याग्रह करून तुरुंगांत जावयाचें असें यांनीं जाहीर भाषण केलें. परंतु या धमकीस न जुमानतां तो कायदा बादशाहाच्या मंजुरीकरितां इंग्लंडला पाठविण्यांत आला. तेव्हां हे इंग्लंडला गेले व तेथें यांनीं केलेल्या प्रयत्नास यश येऊन बादशहांनीं त्या कायद्यास मान्यता देण्याचें नाकारलें.

परंतु पुढच्याच वर्षी वसाहतीला स्वातंत्र्य देण्यांत आलें आणि वसाहतीच्या कौन्सिलांत बादशहांनीं मंजूरी न दिलेल्या त्या कायद्याला मान्यता देण्यांत आली. अशा स्थितींत यांना कायदेभंगाची मोहीम सुरू करण्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. यांच्यासह कित्येकांना पकडण्यांत आलें, पण चळवळ फोफावतच चालली. तेव्हां ज. बोथाच्या गव्हर्नमेंटनें जनरल स्मट्सना मध्यें घालून यांच्याशीं वाटाघाटी सुरू केल्या. तेव्हां असें ठरलें कीं, परवानगीच्या सक्तीचा कायदा रद्द करावा पण हिन्दी लोकांनीं स्वेच्छेनें आपलीं नांवें रजिस्टर करून सर्टिफिकिटें घ्यावींत. अंगठ्याचा ठसा देऊन सक्तीनें नांव नोंदविणें यांत गुन्हेगारीचें रूप होतें, तसें स्वेच्छेनें नांव नोंदविण्यांत नव्हतें. पण हा फरक सामान्य लोकांच्या लक्षांत येईना. त्यामुळें ते लोक यांच्याविरुद्ध गेले व यांचा जीव घेण्याची भाषा बोलली जाऊं लागली. पण या धमकीला भीक न घालतां हे कचेरींत जावयास निघतांच यांना एका पठाणानें बेशुद्ध होईपर्यंत मारलें. हे शुद्धीवर येतांच यांनीं प्रथम आपलें नांव नोंदविण्याकरितां अर्ज केला. पण गव्हर्नमेंटनें स्वेच्छेनें नांव नोंदविणारास सवलत

देऊन इतरांबाबत मात्र जुनाच कायदा पास केला. तेव्हां जोहान्सबर्गला पुनः सभा भरवून लोकांनीं आपली सर्टिफिकिटें जाळून टाकलीं व पुनः एकदां कायदेभंगास सुरुवात झाली (जुलै १९०८). त्यांत यांना, यांच्या पत्नीला व कित्येक लोकांना तुरुंगवास घडला व कित्येकांच्या घरादारांचा व धंद्याचा पूर्ण नाश झाला. पण अखेर जून १९१४ ला या लढ्याचा पूर्ण शेवट होऊन इंडियन रिलीफ बिलान्वयें हा कायदा मागें घेण्यांत आला, ३ पौंड डोईपट्टी रद्द झाली व इतर कर्मीपणा आणणाऱ्या गोष्टी दूर होऊन यांचा १०० टक्के जय झाला. येथें यांच्या चरित्रांतील आफ्रिका खंड संपतो. या जयामुळें यांच्या चळवळीच्या एका नव्या पद्धतीकडे जगांतील सर्व लोकांचें लक्ष वेधलें व यांचें सर्वत्र कोडकौतुक झालें.

यानंतर हे इंग्लंडला गेले, तेव्हां नुकतीच पहिल्या महायुद्धास सुरुवात झाली होती. ' अब्युलन्स कोअर ' काढून युद्धास मदत करण्याची यांची इच्छा होती; पण प्रकृति बिघडल्यानें हे हिंदुस्थानांत आले (१९१५ जाने.) ना. गोखल्यांना हे सुरुवातीपासूनच गुरु मानीत. त्यांच्या सांगण्यावरून कोणच्याहि चळवळींत भाग घेण्यापूर्वी एक वर्ष हिंदुस्थानभर हिंडून येथील परिस्थिति अवलोकन करण्याचें यांनीं ठरविलें. या वेळीं ना. गोखले वारले. त्यांनीं 'गांधी हे खरोखर महात्मा आहेत, माझे गुरु रानडे किंवा राममोहन रॉय हेच फार तर, यांची बरोबरी करूं शकतील ' या शब्दांनीं यांना गौरविलें होतें. त्यामुळें हिंदुस्थानांत येतांच यांना लोक ' महात्मा ' म्हणूं लागले.

नंतर यांनीं अहमदाबादेजवळ साबरमतीच्या तीरीं ' सत्याग्रहाश्रम ' (१९१५ मे २५) काढला. आफ्रिकेंतील यांच्या फिनिक्स वसाहतीचीच कल्पना या आश्रमाच्या मुळाशीं होती. यांच्या तत्त्वावर विश्वास ठेवणारे कांहीं स्त्री-पुरुष यांना मिळाले. जातिभेद न पाळण्याचें यांच्या आश्रमाचें तत्त्व होतें. एका अस्पृश्य कुटुंबालाहि आश्रमांत आश्रय देण्यांत आला. त्यामुळें यांची आर्थिक मदत बंद पडली. मग यांनीं अस्पृश्यांत जाऊन राहण्याचें ठरविलें. तथापि तसें होण्यापूर्वी यांना पंधरा हजारांचा अनपेक्षित चेक मिळाला.

यांचा विशेषपणा बनारस हिंदुविश्वविद्यालयाच्या उद्घाटनसमारंभाच्या वेळीं यांनीं केलेल्या भाषणानें सर्वांच्या लक्षांत आला आणि बहुजनसमाजाचें लक्ष यांनीं आपल्याकडे वेधून घेतलें (४ फेब्रु. १९१६). यांचा स्पष्टवक्तेपणा तेथें कोणालाच झेपला नाहीं. राजेमहाराजे तर केव्हांच सभेंतून अदृश्य झाले, पण डॉ. बेझंटसारख्यांनाहि सभास्थान सोडावें लागलें.

यानंतर फिजी बेटांत पाठविण्यांत येणाऱ्या मुदतबंद मजुरांची पद्धत बंद करण्यांत येईल असें आश्वासन देऊन, तिकडे मळेवाल्यांना मात्र ही पद्धत पांच वर्षें आम्ही बंद करीत नाहीं असें आश्वासन सरकारनें दिल्याची बातमी सर्वत्र पसरली. तेव्हां यांनीं सत्याग्रह करण्याची घोषणा करतांच व्हाइसरॉयनें ती पद्धति बंद केल्याचें जाहीर केलें (१२ मे १९१७). अशा कार्यामुळें लोकांचें यांच्याकडे विशेष लक्ष वेधत चाललें.

लखनौ राष्ट्रसभेच्या वेळीं बिहारमधील कांहीं प्रतिनिधींनीं चंपारण्यांतील शेतकऱ्यांकडे यांचें लक्ष वेधिलें. तेथें शेतकऱ्यांना सक्तीनें नीळ पेरावयास लावीत. १९१७ च्या एप्रिलमध्यें हें मोतीहारी गांवीं चौकशीकरितां गेले. तेव्हां यांच्या या वास्तव्यामुळें सार्वजनिक शांततेस धोका असल्यानें जिल्हा सोडून जाण्याचा यांना हुकूम झाला. तो हुकूम यांनीं मानण्याचें नाकारिलें व खटला भरला असतां गुन्हा कबूल करून शिक्षा भोगण्यास तयार झाले. पण सरकारी हुकमानें खटला काढून घेण्यांत आला; आणि यांना व यांच्या अनुयायांना तेथें काम करण्यास मोकळीक मिळाली. तेथें यांच्या अनुयायांत राजेन्द्रप्रसाद, कृपलानी, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सो.चे डॉ. देव व स्वयंसेवकांत शंकरराव देव होते. पुढें सरकारनें चौकशी करण्याकरितां कमिशन नेमिलें, त्यांत यांचा समावेश केला. कमिशनच्या वृत्तान्ताला अनुसरून सरकारनें एक कायदा केला व शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्यांत आलीं. हीं गाऱ्हाणीं त्यापूर्वीच्या शंभर वर्षांत कोणत्याहि उपायानें दूर झालीं नव्हतीं.

या वेळीं अहमदाबादेंतील मजूर व मालक यांच्यांतील तेढ वाढत चालली. तेव्हां यांनीं मजुरांची बाजू घेतली. पण पुढें बावीस दिवसांत यांच्याकडून कांहींच न झाल्यानें संपवाल्या मजूरांत शिथिलता येत चालली. तेव्हां यांनीं प्राणान्तिक उपोषणाचा निश्चय जाहीर करून तीन दिवसांतच मजूर व मालक यांचा सलोखा घडवून आणला (१९१८). याच वेळीं यांनीं यांच्या पद्धतीनें काम करणाऱ्या मजूर महाजन संस्थेची स्थापना केली.

यानंतर गुजराथेंत खेडा जिल्ह्यांत दुष्काळ पडला

(१९१८ मार्च) व शेतकऱ्यांना शेतसारा भरणें अशक्य झालें. शेतकऱ्यांनीं यांना निमंत्रण केलें. यांनीं योग्य भाषेंत अर्ज करून सारातहकुबी मागितली. पण यांचा अर्ज फेंटाळला गेला. तेव्हां यांनीं शेतकऱ्यांना सारा न देण्याचा सल्ला दिला. सारा न दिल्यानें शेतांतील पिकें जप्त करण्यांत आलीं. त्यावर यांनीं जप्त केलेली पिकें कापून नेण्याचा शेतकऱ्यांना सल्ला दिला. त्यामुळें शेतकऱ्यांना शिक्षा झाल्या, पण पुढें तडजोड होऊन हें प्रकरण मिटलें.

सरकारलाहि यांच्या प्रभावी नेतृत्वाची कल्पना आली व सरकारला युद्धाच्या कामीं मदत करण्याकरितां भरविलेल्या दिल्ली दरबारास यांनीं एकदां नाकारिलें असतां पुनः आमंत्रण देऊन नेण्यांत आलें. तेथें यांनीं हिंदुस्थानची आकांक्षा हिंदी भाषेंतून मांडली आणि आपलें सत्याग्रहाच्या चळवळीचें काम बंद करावयास सांगणें म्हणजे जीवन तहकूब करावयास सांगणें आहे असें लिहून कळविलें.

पहिलें महायुद्ध संपल्यानंतर 'डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट' आपोआप रद्द होणार होता. तेव्हां सरकारनें रौलेट ॲक्टसारखे काळे कायदे घडविले. त्याला विरोध करण्याकरितां यांनीं ६ एप्रिल १९१९ हा दिवस ठरविला. सर्व हिंदुस्थानभर हरताळ, उपवास, प्रार्थना, मिरवणुकी व सभा झाल्या. जप्त व बेकायदा वाङ्मयहि प्रसिद्ध करण्यांत आलें. हे दिल्लीकडे जात असतां पंजाब व दिल्ली प्रांतांत जाण्यास यांना बंदी करण्यांत आली. यांनीं हुकूम मानण्याचें नाकारिलें. तेव्हां यांना पकडण्यांत आलें त्यामुळें सर्व हिंदुस्थानभर दंगे होऊन अनेक भयंकर गोष्टी घडल्या.

यांना ११ एप्रिलला मुंबईस आणून सोडलें. तेथें मुंबई प्रान्ताच्या बाहेर न जाण्याचा हुकूम यांच्यावर बजावण्यांत आला. तो मोडण्याचा यांचा विचार होता. पण ठिकठिकाणच्या अत्याचारांच्या बातम्या ऐकून यांनीं अत्याचार थांबविण्याकरितां तीन दिवसांचें उपोषण करून ही अखिल भारतीय स्वरूपाची पहिली अपूर्व मोहीम बिनमुदत तहकूब केली.

ता. १३ एप्रिल १९१९ रोजीं अमृतसर येथें 'जालियनवाला बाग' नांवाच्या बंदिस्त जागेंत मनाई केलेली सभा भरविली म्हणून यांत्रिक तोफांतून गोळीबार करण्यांत आला. त्यांत चारशें लोक मृत्यु पावले व बाराशेंच्या वर लोक जखमी झाले. शिवाय लष्करी कायदा पुकारून लोकांचे अनन्वित हाल करण्यांत आले ते वेगळेच. त्याच्या चौकशीकरितां सरकारनें हंटर कमिशन नेमिलें. त्यांत राष्ट्रसभेपैकीं कोणी नव्हतें. राष्ट्रसभेनें स्वतंत्र चौकशी-कमिशन नेमून सरकारी कमिशनशीं सहकार्य करण्याचा प्रयत्न केला; पण तो न जमल्यानें तिनें आपलें चौकशीचें काम स्वतंत्रच केलें. पण हें सर्व प्रकरण व त्यावर पांघरूण टाकण्याच्या सरकारी धोरणामुळें लोक अत्यंत असंतुष्ट झाले. त्यांतच खिलाफतविषयक धोरणानें मुसलमान समाज अत्यंत नाखूष बनला आणि सरकारनें देण्यास काढलेल्या मॉंटफोर्ड सुधारणाहि अत्यंत हिणकस आढळल्या. तेव्हां यांच्या निर्भय आणि परिणामकारक ठरलेल्या असहकारितेशिवाय तरणोपाय नाहीं असें सर्वांना वाटूं लागलें. यांनींहि पण प्रसंगाप्रसंगानें व्यक्त केलेल्या असहकारितेची घोषणा टिळकांच्या मृत्यूच्या दिवशीं जाहीरपणें केली (१ ऑगस्ट १९२०). यांचा सत्याग्रह आफ्रिकेपासूनच प्रसिद्ध होता पण 'नॉन-को-आपरेशन' म्हणजे असहकारितेच्या नव्या चळवळीचा जन्म मात्र या वेळीं झाला.

असहकारितेच्या चळवळींतील कार्यक्रम यांनीं पुढीलप्रमाणें मांडला : १ सरकारी पदव्या व मानाच्या जागांचा त्याग, २ सरकारी व निमसरकारी समारंभांत भाग न घेणें, ३ सरकारी व निमसरकारी शाळाकॉलेजांतून मुलें काढून त्यांची राष्ट्रीय शाळांत व्यवस्था करणें, ४ ब्रिटिश कोर्टांवर बहिष्कार घालून खासगी लवादांमार्फत तंटे मिटविणें, ५ मेसापोटेमियांतील लष्करी कामाकरितां कारकून व मजूर म्हणून भरती न होणें, ६ कौन्सिल उमेदवारांनीं आपलीं नांवें परत घेणें व उभे राहणाऱ्यांना मतें न देणें, व ७ परदेशी मालावर बहिष्कार.

यांत पुढें पोलीस नि लष्कर यांना सरकारी नोकरींतून निवृत्त करण्याच्या प्रयत्नाचा व सारांबंदीचाहि समावेश झाला.

वरील कार्यक्रम शिस्तीनें पार पाडण्याकरितां हे व अल्लीबंधु यांनीं देशभर दौरे काढून लोकांत उत्साह व शिस्त उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. या नव्या कार्यक्रमाला मान्यता घेण्याकरितां कलकत्त्यास राष्ट्रसभेचें जादा अधिवेशन भरविण्यांत आलें (१-९ सप्टें. १९२०). यांच्या ठरावाला प्रचंड बहुमतानें मान्यता मिळाली. यांनींहि 'माझा कार्यक्रम पार पाडाल तर एक वर्षांत स्वराज्य' हा मंत्र उच्चारून देशभर नवें चैतन्य निर्माण

केलें. नवीन सुधारणांना अनुसरून होणाऱ्या कौन्सिल निवडणुकींत शेकडा ऐंशी लोकांनीं मतें दिलीं नाहींत. लेखन व भाषण यांच्या द्वारां यांनीं देशांत अगदीं नवा आत्मविश्वास उत्पन्न केला. यांच्या चळवळींच्या प्रभावांत नवेजुने सर्व पुढारी ओढले गेले. प्रान्तोप्रान्तीं देशाकरितां सर्वस्वाचा त्याग करून मोठमोठे वजनदार लोक रात्रंदिवस काम करूं लागले. पं. मोतीलाल नेहरु व चित्तरंजन दास यांच्यासारख्यांनींसुद्धां वकीली सोडली. राष्ट्रसभेच्या नागपूर येथील वार्षिक अधिवेशनांत तर यांच्या कर्तृत्वाचा विशेषच प्रभाव पडून यांचें नेतृत्व पक्कें झालें (१९२० डिसें.). राष्ट्रसभेनें 'सनदशीर मार्गानें वसाहतीचें स्वराज्य' हें ध्येय सोडून 'शांततेच्या व न्याय्य मार्गानें स्वराज्य' असा त्यांत बदल केला.

आपल्या या नव्या चळवळीची छाप लोकांवर किती बसली हें पाहण्याकरितां यांनीं एक कोटीचा टिळक स्वराज्य फंड उभारणें, वीस लाख चरके सुरू करणें, मद्यबंदी घडवून आणणें व ग्रामपंचायती स्थापन करणें असा कार्यक्रम हातीं घेऊन तो यशस्वीपणें पार पाडला. टिळक स्वराज्य फंड तर १५ लक्षांनीं अधिकच जमला आणि यांच्या चळवळीला लोकांचा भरपूर पाठिंबा आहे ही गोष्ट सिद्ध झाली. अलीबंधूंच्या भाषणांतील अत्याचारप्रवर्तक वाक्यांबद्दल यांनीं त्यांना जाहीर माफी मागण्यास भाग पाडलें (१९२१ मे); पण जुलैंत यांनीं मुलकी व लष्करी नोकरांना सरकारशीं असहकार करण्याचा आदेश दिला. तेव्हां सर्वत्र खटले व दडपशाही सुरू झाली. सप्टें. १७ ला युवराज हिंदुस्थानांत आले तेव्हां तर हरताळ, निषेध वगैरे होऊन दंगे व रक्तपातहि झाला. यांनीं पांच दिवसांचा उपवास जाहीर करून एक दोन दिवसांत शांतता स्थापन केली. या वेळीं २०।२५ हजार लोक बंदींत पडले, त्यांत दास, नेहरु, लजपतराय यांच्यासारखीं माणसें होतीं. तरीहि सत्याग्रह थांबण्याचें चिन्ह दिसेना.

ता. १ फेब्रुवारी १९२२ ला यांनीं व्हाइसरॉयना पत्र लिहून 'दडपशाही बंद करून नागरिक हक्कांच्या शाश्वतीची हमी द्या, नाहीं तर बार्डोली तालुक्यांत सारा-बंदीची मोहीम सुरू करतों' असें कळविलें. उत्तरीं नकार येतांच अहमदाबाद राष्ट्रसभेनें दिलेल्या सर्वाधिकाराला अनुसरून यांनीं ती योजना आंखली. पण ५ फेब्रु. रोजीं बिहारमध्यें चौरीचुरा येथें दंगा होऊन लोकांनीं पोलीसांना जाळल्यामुळें यांनीं आपल्या 'अनत्याचाराच्या तत्त्वाला बाध आला' म्हणून ही चळवळ बिनमुदत स्थगित केली आणि प्रायश्चित्तादाखल पांच दिवसांचा उपवास केला. कायदेभंगाची चळवळ बंद करून यांनीं भूमिका तयार करण्याकरितां देशाला विधायक कार्यक्रमाचा आदेश दिला. सरकारनेंहि यांना 'यंग इंडिया' मधील तीन लेखांबद्दल सहा वर्षांची शिक्षा दिली (१९२२ मार्च).

या तुरुंगवासांतून यांची सुटका अपेंडिसायटिसवरील शस्त्रक्रियेकरितां प्रथम झाली (१२-१-२४). पुढें एक महिन्यांत यांना मुक्त करण्यांत आलें. त्यापूर्वीच राष्ट्रसभेच्या अनुमतीनें स्वराज्यपक्षानें कौन्सिलांत प्रवेश केला होता. देशांत फेरनाफेर असे दोन पक्ष पडले होते. यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या बेळगांव राष्ट्रसभेंत दोन्ही पक्षांना आपल्या इच्छेप्रमाणें काम करण्यास संमति देऊन यांनीं समेट घडून आणला (१९२४ डिसें.).

पण कायदेमंडळांतील अडवणूक यशस्वी होत नाहीं अशी खात्री पटतांच १९२९ च्या राष्ट्रसभेंत पं. मोतीलाल नेहरू यांनीं कायदेमंडळावरील बहिष्काराचा व सत्याग्रहांत सामील होण्याचा ठराव मान्य करून घेऊन पुनः सत्याग्रहाचें शिंग फुंकण्यांत आलें आणि त्याचें नेतृत्व यांनीं पत्करिलें.

कांहीं तरी साध्या घटनेंतून आश्चर्यकारक परिणाम घडवून आणण्याची यांची हातोटी अद्भुत आहे. याबाबत 'दांडीची यात्रा' काढून मिठाचा कायदा मोडण्याचा जो सत्याग्रह यांनीं केला त्याचें उदाहरण नमुनेदार आहे. हिंदुस्थानाच्या प्रचंड किनाऱ्यावर अपरंपार मीठ पैदा होत असतां येथें परदेशांतून मीठ येतें आणि येथील लोकांना मिठावर प्रचंड कर भरण्याचा प्रसंग येतो, या साध्या घटनेवर यांनीं सर्वांना सहज पटतील अशा अकरा मागण्यांचा मसुदा तयार करून तो व्हाइसरॉयला सादर केला (३० जाने. १९३०). आणि आपल्या चळवळीची पद्धतशीर मांडणी करून हे कार्याला लागले. सरकारकडून मागण्या मान्य करणें दूरच राहिलें, उलट धमकावणीचें उत्तर आलें. तेव्हां यांनीं 'गुडघे टेकून भाकरी मागितली असतां धोंडा पदरांत टाकला' असें प्रत्युत्तर देऊन 'या चळवळींत यश मिळालें नाहीं तर साबरमती आश्रमांत पुनः पाऊल टाकणार नाहीं,' 'माझ्या आयुष्यांतील हा स्वराज्याचा शेवटला लढा आहे' इत्यादि प्रतिज्ञा जाहीर करून सर्वांचें लक्ष आपणांकडे खेचून घेतलें. 'अत्याचार घडले तरी हा लढा मी थांबविणार नाहीं' असेंहि लोकांना आश्वासन

दिलें व १२ मार्च १९३० ला साबरमती आश्रमांतून बाहेर पडले. आधल्या दिवशीच चार प्राध्यापक व सोळा विद्यार्थी यांचें 'अरुण दळ' पुढल्या मुक्कामावर दाखल झालें होतें. ठरलेल्या वेळीं हे आपल्या ७२ सत्याग्रह्यांसह निघाले. सकाळीं एका ठिकाणीं तर संध्याकाळीं दुसऱ्या ठिकाणीं असे मुक्काम करीत दांडीकडे प्रयाण सुरू झालें. यामुळें गुजराथेंतच काय पण हिंदुस्थानच्या अणुरेणूंतून स्पंदन सुरू झालें. बेकायदा मीठ तयार करणें, त्याची विक्री करणें, जंगल-सत्याग्रह वगैरे प्रकार सर्वत्र सुरू झाले. हिंदुस्थानांतच काय पण जगांतील सर्व वर्तमानपत्रांत त्याचे ध्वनि उमटूं लागले. सरकारी नोकर व कौन्सिलांतील सभासद राजीनामे देऊं लागले. प्रथम न पकडतांच सत्याग्रह्यांचा आवेश नष्ट करण्याचा सरकारचा विचार होता. पण यांनीं मिठागरावर हल्ले करण्याची सूचना दिली. शेवटीं कराडी येथें यांना पकडून येरवडा येथें चौकशीशिवाय अटकेंत ठेवण्यांत आलें (४ मे १९३०). यामुळें चळवळ शिथिल न होतां अधिकच फोफावली. 'नवजीवन' पत्र जप्त झालें. सप्रू-जयकर यांच्या दौत्यानें काम भागत नाहीं असें पाहून तुरुंगांत असणाऱ्या नेहरू पितापुत्रांना येरवडा येथें आणवून त्यांची व यांची भेट करविण्यांत आली.

पण वाटाघाटी करून जाहीर केलेल्या १ राष्ट्रीय सरकार, २ विभक्त होण्याचा हक्क, ३ राष्ट्रीय कर्ज व ४ संक्रमणकालांतील बंधनें या अटी सरकारला मान्य न झाल्यानें तडजोड फिसकटली. पहिली गोलमेज परिषद् लंडन येथें यांच्याशिवायच पार पडली (१२ नवं.१९३०). पण यांच्याशिवाय परिषद् म्हणजे आंकड्याशिवाय पूज्यें होत. लगेच यांना यांच्या १९ अनुयायांसह तुरुंगांतून मुक्त करण्यांत आलें (२५ जाने. १९३१). व्हाइसरॉयनें सलोखा व शांतता यांची इच्छा करणारें पत्र यांना धाडलें. शेवटीं स्वतःपुरतें मीठ करण्याच्या व तुरुंगांतील चळवळे बिनशर्त सोडण्याच्या अटींवर तडजोड झाली (५ मार्च १९३१); आणि यांची तिसरी सत्याग्रहाची प्रचंड चळवळ विजयी होऊन येथें समाप्त झाली. हे राष्ट्रसभेचे एकमेव प्रतिनिधि म्हणून गोलमेज परिषदेस गेले व तेथें यांनीं देशाची शिष्टाई उत्कृष्टपणें केली.

पण परत येण्यापूर्वीच देशांत चळवळ सुरू होऊन अनेक पुढारी तुरुंगांत गेले होते. यांनीं सामोपचाराचा शेवटचा प्रयत्न करून पाहिला. पण यश न आल्यानें चळवळीचें शस्त्र यांनीं बाहेर काढण्यापूर्वीच यांना मुंबईस अटक होऊन येरवड्याच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें (४ जाने. १९३२)

गोलमेजपरिषदेनें अस्पृश्यांना हिंदूंतून वेगळें काढून त्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिला होता. ही अनिष्ट गोष्ट बदलून घेण्याकरितां यांनीं तेथें प्राणान्तिक उपोषण आरंभिलें आणि शेवटीं संयुक्त मतदारांनीं निवडलेल्या चारांपैकीं एकाला अस्पृश्यांनीं निवडावें असें ठरून हें प्रकरण यशस्वी झालें (२०-२६ सप्टें. १९३२).

शेवटीं यांनीं 'अस्पृश्यतेचा नायनाट करण्याकरितां' उपवास-कालांत मिळालेल्या सर्व सवलती त्याच कामाकरितां पुनः मिळवून तुरुंग हें अस्पृश्यतानिवारणकार्याचें केन्द्र बनविलें.

हिंदुस्थानांतील प्रमुख पंडितांची परिषद् येरवडा तुरुंगांत भरवून त्यांच्या सहीनें प्रचलित अस्पृश्यतेला शास्त्रांत आधार नसल्याचें पत्रक प्रसिद्ध केलें ($३\frac{१}{३}$). अखिल भारतीय हरिजन सेवक संघ काढून त्याचें नेतृत्व घनश्यामदास बिर्लांना दिलें व बाप्पा ठक्करांना चिटणीस केलें. गौरवदर्शक 'हरिजन' शब्द उपयोगांत आणला. त्याकरितां पंचवीस लाखांचा निधि उभारण्याचें ठरविलें व हरिजन साप्ताहिक सुरू केलें (११ फेब्रु. १९३३). अस्पृश्यतानिवारणाबाबत लोकांत जागृति व प्राञ्जलपणा आणण्याकरितां यांनीं ११ दिवसांचा उपवास आरंभला. या वेळीं सरकारनें यांना मुक्त केलें. यांनीं या मुक्ततेचा उपयोग राजकीय चळवळीकडे करण्याचें नाकारिलें. तथापि यांनीं सामुदायिक कायदेभंग बंद करून फक्त वैयक्तिक कायदेभंग चालू ठेवला. त्याकरितां यांना पकडून (१ ऑगष्ट १९३३) स्थानबद्ध करण्यांत आलें (४ ऑगष्ट). पण यांनीं स्थानबद्धतेची अपमानकारक अट मोडल्यामुळें यांना एक वर्षाची शिक्षा झाली. यांना मागें मिळालेल्या तुरुंगांतील सवलती या वेळीं बंद झाल्या. यांनीं पुनः उपोषण आरंभलें. पांच दिवसांत यांना हॉस्पिटलांत पोंचवावें लागलें.

पण हा खेळ खेळण्यापेक्षां शिक्षेची मुदत यांनीं हरिजनकार्यांत घालविण्याचें ठरवून हे राजकारणापासून निवृत्त झाले (३ आगष्ट १९३४) व यांनीं दहा महिनेपर्यंत हरिजनांच्या उद्धारार्थ हिंदुस्थानांत प्रचंड दौरा काढला. या दौऱ्यांत पुणें येथें यांच्यावर बाँब टाकण्याचा प्रयत्न झाला. अजमेर येथें यांच्या एका अनुयायाकडून स्वामी लालनाथ नांवाच्या सनातनी विरोधकावर लाठी प्रहार झाला. त्याबद्दल यांनीं सात दिवस उपवास करून प्रायश्चित्त घेतलें. मलबारांतील गुरुवायूरच्या मंदिरप्रवेशा-

बद्दल मतमोजणी केली असतां यांना शेंकडा सत्तर मतें अनुकूल पडलीं. या वेळीं यांनीं प्रचंड जागृति करून या कामाकरितां आठ लक्ष रुपये जमविले.

पूर्वी हे राष्ट्रसभेंतून कायदेमंडळांतील कार्यास वाव देण्याकरितां बाजूस सरले होते (१९२४-३०). आणि मुंबईस भरलेल्या अधिवेशनापासून हे राष्ट्रसभेचे चार आणे देणारे साधे सभासदहि राहिले नाहींत (२६ आक्टो. १९३४). राष्ट्रसभा व आपण यांच्यांत अहिंसादि बाबतींत पूर्ण मतैक्य नसल्यानें आपल्या सत्याग्रहादि चळवळी यशस्वी होत नाहींत हें यांनीं राष्ट्रसभा सोडण्याचें कारण दिलें. तथापि ' अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ ' काढण्याचा ठराव करून यांच्या कार्याला राष्ट्रसभेनें आपला पाठिंबाच दिला. मात्र यांनीं ग्रामोद्योगाची सर्व योजना राष्ट्रसभेंतून हेतुपूर्वक अलग ठेवली व तिची मांडणी मध्यप्रान्तांत वर्ध्याजवळ शेगांवीं झोपड्या बांधून आरंभिली.

गोलमेजपरिषदेच्या वाटाघाटींतून बाहेर पडलेल्या १९३५च्या राज्यघटनेप्रमाणें आलेल्या निवडणुकी राष्ट्रसभेनें लढवून हिंदुस्थानच्या अकरा प्रान्तांपैकीं सात प्रान्तांत राष्ट्रसभेचीं मंत्रिमंडळें दैनंदिन व्यवहारांत ढवळाढवळ न करण्याचें हिंदुस्थान सरकारचें आश्वासन मिळून स्थापन झालीं (१७ जुलै १९३७). त्यांनीं राजबंदी सोडणें, जुलमी कायद्यांचें उच्चाटण करणें, दारूबंदी, शिक्षणाची वर्धायोजना, कशील त्याची जमीन, राष्ट्रभाषाप्रचार, साक्षरताप्रसार, गुजराथेंतील करबंदीच्या चळवळींत जप्त झालेल्या जमिनी परत देणें वगैरेसारखीं कामें करून जनतेच्या मनावर पूर्ण छाप बसविली. हा सर्व परिणाम स्थितप्रज्ञाप्रमाणें राष्ट्रसभेपासून अलग झालेल्या या महात्म्याचा होय, हें अगदीं उघड गुपित आहे.

पण ३ सप्टें. १९३९ रोजीं ब्रिटिशसरकारच्या मागोमाग हिंदुस्थानसरकारनें विधिमंडळाची संमति न घेतांच हिंदुस्थानला जर्मनांविरुद्ध युद्धांत लोटतांच राष्ट्रसभेच्या आदेशानुसार सातहि प्रान्तांतील मंत्रिमंडळांनीं राजिनामे दिले (२२ आक्टो. १९३९).

राजकोट राज्यांत राजकीय सुधारणांबाबत नेमलेल्या कमेटींतील प्रथम जाहीर झालेलीं नांवें परत घेतलीं जातांच यांनीं वचनभंगाबद्दल उपोषणास सुरुवात केली. पण व्हाइसरॉयनें मध्यस्थी करितांच यांनीं उपवास सोडला. पण दडपणानें मिळालेला न्याय कलंकित म्हणून यांनीं राजकोटचा प्रश्नच सोडून दिला (१७ मे १९३९).

संप्रदायाचें स्वरूप येतें म्हणून १४४ निष्ठावन्त कार्यकर्त्यांचा ' गांधीसेवा-संघ ' विनोबा भावे, किशोरीलाल मश्रूवाला वगैरे ९ सभासदांपुरतां मर्यादित केला (मलिकंदा, १९४०).

हिंदुस्थानला युद्धोत्तर राष्ट्रीय सरकार देण्याच्या स्टॅफर्ड क्रिप्स योजनेचा ' Post-dated Cheque ' ' पुढल्या तारखेची हुंडी ' म्हणून यांनीं धिःकार केला (१९४२).

परंतु एकीकडून वाढती दडपशाही व दुसरीकडून जपानी स्वारीचें दडपण यांमुळें मुंबईस भरलेल्या काँग्रेस कमिटीनें पुढील निर्णय घेण्याचें ठरविलें (७ ऑगस्ट १९४२): " दाराशीं आलेल्या जपानचा प्रतिकार करण्यास हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें हिंदी माणसाचेच हातीं असलीं पाहिजेत व त्याकरितां इंग्रजी सत्ता येथून नाहींशी झाली पाहिजे." पण हा निर्णय बाहेर येण्याच्या पूर्वीच यांना व इतर कार्यकर्त्यांना पकडण्यांत आलें. या वेळच्या खळबळीची कल्पना ६०,२२९ लोकांना अटक, १८०००, स्थानबद्ध, ९४० ठार व १६३० जखमी हे आंकडे देतील.

या चळवळीची ' चले जाव ' म्हणून प्रसिद्धि असून ' करेंगे या मरेंगे ' हा या वेळचा मंत्र होता. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां केलेलें हें ' अनत्याचारी उघड बंड ' होतें. या वेळीं झालेला पूल पाडणें, तारा तोडणें, रूळ उखडणें वगैरे कार्यक्रम यांच्याशीं चर्चा झालेला पण यांनीं मान्यता न दिलेला होता.

यांना आगाखान पॅलेस, पुणें, येथें ठेवण्यांत आलें. तेथें आपल्यावरील जपान-धार्जिणेपणाचा आरोप धुऊन टाकण्याकरितां यांनीं २१ दिवसांचा उपवास केला. तेथेंच प्रथम त्यांचे एकनिष्ठ सहकारी महादेवभाई देसाई (१९४३ ऑगस्ट १५) व नंतर यांच्या पत्नी कस्तुरबा यांना देवाज्ञा झाली (१९४४ फेब्रु. १८). पुढें यांना केवळ प्रकृतीच्या निमित्तानें मुक्त करण्यांत आलें (६ मे १९४४).

वेव्हेलयोजनेकरितां भरलेल्या सिमला कॉन्फरन्सच्यावेळीं हे सल्लागार म्हणून सिमल्यास उपस्थित होते (१५ जुलै १९४५). यांनीं त्या योजनेसंबंधीं अनुकूल धोरण स्वीकारलें, पण मुस्लीम लीगचे नेते जिना यांच्या विरोधामुळें ती परिषद् अयशस्वी झाली. आणि येथें ' तिसरी सत्ता आहे तोंपर्यंत जातीजातींत ऐक्य होणें अशक्य आहे ' या यांच्या उक्तीचें पुनः एकदां प्रत्यन्तर आलें.

यांची एखाद्या प्रश्नाकडे सर्वांचें लक्ष केन्द्रित करून विचार करावयास लावण्याकरितां केवळ पाण्यावर राहून

उपवास करण्याची पद्धत आहे. उपवास करण्यापूर्वी हे त्याचा हेतु नि परिणाम यांची योग्य तऱ्हेनें भरपूर प्रसिद्धि होईल अशी व्यवस्था करितात व आपल्याकडे सर्वांचें लक्ष वेधून घेतात. ह्यांचे प्रमुख उपवास—

सन	मुदत	हेतु
१९१८	३ दिवस	मजूर-मालक ऐक्य किंवा प्राणान्त.
१९१९ एप्रिल	३ दिवस	अत्याचार थांबविणें.
१९२०	७२ तास	अहिंसाभंग.
१९२१ सप्टें.	५ दिवस	ऐक्य व शांतता.
१९१२ फेब्रु.	५ दिवस	चौरीचुरा दंगा प्रायश्चित्त.
१९२४(१०ऑक्टो.)	२१ दिवस	हिंदु-मुसलमानांचें ऐक्य.
१९३२ सप्टें.	६ दिवस	अस्पृश्यांचा मतदारसंघ संयुक्त करणें किंवा प्राणान्त.
१९३३ फेब्रु.	५ दिवस	अस्पृश्यतानिवारण जागृति
१९३३ मार्च	२१ दिवस	आश्रमवासीयांचें नैतिक अधःपतन.
१९३३ आगष्ट	५ दिवस	हरिजन कार्यास बंदी.
१९३४ आगष्ट	७ दिवस	स्वामी लालनाथ लाठी-प्रहार प्रायश्चित्त.
१९३९ मे	५ दिवस	राजकोट वचनभंग.
१९४३ फेब्रु.	२१ दिवस	जपान-धार्जिणेपणाचा आरोप धुऊन टाकणें.

मोठमोठाले निधि उभारून सार्वजनिक कार्यांची व्यवस्था करण्याचें आणि आपल्या चळवळीसंबंधीं असणारी लोकांची अनुकूलता निदर्शनास आणण्याचें कामहि यांचें सतत चालू असतें. त्यावरून यांची व्यापक संघटना आणि भव्य दृष्टि यांचीहि कल्पना येते. यांनीं जमविलेले कांहीं निधि—

साल	नांव	संकल्प	जमलेली रक्कम
१९२१	टिळक स्वराज्य फंड	१ कोटी	१ कोटि २५ लक्ष
१९२५	चित्तरंजनदास स्मारक		१० लाख
१९२९	खादी		३ लाख
१९३३	हरिजनसेवक	२५ लाख	८ लाख
१९४१	अँड्रयूज स्मारक		६ लाख
१९४४	कस्तुरबा स्मारक	१ कोटि	१ कोटि १२ लक्ष

यांशिवाय यांचे सूत, खादी, ग्रामोद्योग, गांधी-सेवा-संघ वगैरेकरितां अनेक लहानमोठे निधि आहेत.

यांच्या पूर्वी हिंदुस्थानांत मवाळ व जहाल असे दोन राजकीय पक्ष होते. यांच्या कार्यपद्धतींत मवाळांचा अभ्यासूपणा आणि जहालांची चढाई यांचें योग्य मिश्रण आढळतें. यांनीं जहालांच्या दहशतवादांतील हिंसा काढून टाकली, विधायक कार्यक्रमाची जोड देऊन लोक संघटित केले आणि त्यांचा दाब राज्य-सत्तेवर आणून ती काबीज करण्याचा प्रयत्न आरंभला. त्यामुळें जहाल-मवाळ सर्वच यांच्या कार्यक्रमांत सामील झाले.

यांच्यांत लोकसंग्रह करण्याची, लोकांवर छाप ठेवण्याची आणि लहानमोठीं माणसें उपयुक्त कामास लावण्याची हातोटी विलक्षण आहे. त्यामुळें यांच्या प्रभावळींत हिंदुस्थानांतील पहिल्या दर्जाचीं माणसें एकत्र झालीं आहेत. तसेंच त्या त्या विषयाचा मूलगामी विचार करणारे तज्ज्ञहि यांच्यापाशीं आहेत. त्यांच्या सल्ल्यानें यांचें काम योजनापूर्वक चालत असल्यामुळें यांचे विरोधक उथळपणानें उपहासास्पद होतात. तसेंच संपत्तीचें महत्त्वहि हे पूर्ण ओळखतात. यांची प्रत्येक योजना भक्कम आर्थिक पायावर उभारलेली असते, आणि जेथें बिनहिशेबी पैसा खर्च करावा लागतो अशा कामाकरितांहि यांनीं अनेक पद्धतशीर योजना आखलेल्या असतात. त्यामुळें यांच्या बहुविध योजना आणि चळवळी पद्धतशीरपणें चाललेल्या आढळतात. राजकारणाची झळ लागूं नये अशा चळवळी यांनीं राजकारणापासून पूर्ण अलग राखलेल्या असतात, हें खादी, सूत, ग्रामोद्योग वगैरेंच्या संस्थांवरून आपणांस दिसून येतें.

अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळींत यांनीं आपण सनातनी हिंदु असल्याचें सांगितलें होतें. पण मानव धर्माविरुद्ध असणारी अस्पृश्यता शास्त्रांत असणें यांना शक्य वाटत नाहीं. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादांत ब्राह्मणांच्या त्यागाची व तपस्येची प्रशंसा करून ब्राह्मणेतरांना ब्राह्मण होण्यास पुनर्जन्म घेतला पाहिजे असें यांनीं प्रतिपादिलें. वर्णव्यवस्था यांना पूर्वी ईश्वरी देणगी आहे असें वाटे. पण आतां तेथें अहंकाराशिवाय कांहीं शिल्लक नाहीं असें वाटून हे पूर्णपणें तिच्या व जातिभेदाच्या विरुद्ध झाले आहेत. विवाह केल्यावर पतिपत्नींनीं पूर्ण ब्रह्मचर्य पाळावें असें हे उपदेशितात. वैदिक मंत्रांचें हिंदी भाषा-

न्तर करून त्याचा विवाहांत यांनीं उपयोग केला. जुना संस्कार किंवा नोंदणी यावर कटाक्ष न ठेवतां हे स्वतःच्या जबाबदारीवर विवाह लावतात.

हे औषध म्हणूनसुद्धां मांस भक्षणाच्या विरुद्ध आहेत. दूध काढण्याच्या विशेष क्रूर पद्धतीमुळें हे गाई-म्हशींचें दूध पीत नाहींत, पण शेळींचें पितात.

लोकव्यवहारांकरितां जन्मभाषेइतपत उत्कृष्ट माध्यम नाहीं असा यांचा कटाक्ष असून हिंदुस्थानाकरितां प्रान्तिक भाषांशीं समन्वय पावणारी हिंदुस्थानी भाषा उपयोगांत आणण्यावर यांचा कटाक्ष आहे. हिन्दीऐवजीं हिन्दुस्थानी भाषा आणि देवनागरीप्रमाणें उर्दू लिपीहि आवश्यक करण्याकडे यांचा कल आहे. उर्दू लिपीचा आग्रह धरून हे हिन्दी संमेलनांतून नुकतेच बाहेर पडले. राष्ट्रसभेंत किंवा कोठेंहि हे हिन्दी किंवा गुजराथी भाषांत व्यवहार करतात. याशिवाय कितीतरी भाषा व लिपि शिकण्याचा यांचा व्यासंग चालू असतो. सध्या यांना तेरा भाषा येतात.

लोकांचा पूर्णपणें पाठिंबा मिळविण्यास भाषा, पोषाख, गरजा वगैरे प्रकारांनीं आपण पूर्णपणें त्यांच्याशीं तन्मय झालें पाहिजे आणि त्यांच्या अडचणी उलगडण्याचा प्रयत्न केला पाहिजे असा यांच कटाक्ष आहे. हे धार्मिक असले तरी ईश्वरावर हवाला ठेवून स्वस्थ बसणारे नाहींत. यांचा ईश्वराइतकाच स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास असून हे निराश कधींच होत नाहींत.

सत्य आणि अहिंसा यांवरील यांचा विशेष कटाक्ष राष्ट्रसभेला झेपेना म्हणून हे राष्ट्रसभेंतून बाहेर पडले. जाति-जातींत ऐक्य करण्याचे बाबतींत यांना अपेश आले. मुसलमान व हरिजन यांनीं यांचें धोरण लक्षांत घेऊन स्वतःच्या जातीचा प्रमाणाबाहेर फायदा करून घेतला. मुसलमान तर चौदा मागण्या, पाकिस्थान आणि आतां पन्नास टक्के प्रतिनिधित्व 'पॅरिटी' अशा क्रमानें वाट चालून राष्ट्र-सभा ही सवर्ण हिंदूंची असें ठरविण्यांतहि यशस्वी झाले आहेत. हरिजनहि मुसलमानांचाच मार्ग आक्रमण करीत आहेत. अशा तऱ्हेनें आपसांत एकी करण्याच्या नादांत राष्ट्रांत निराळेच प्रश्न उत्पन्न झाले आणि राष्ट्राचें अखंडत्वच धोक्यांत आलें. उशीरा का होईना पण आतां मात्र त्यांच्या अनुनयाचा मार्ग यांनीं सोडलेला दिसतो.

यांच्या तत्त्वज्ञानांतील हरताळापासून करबंदीपर्यंतचा कार्यक्रम आणि सत्य, अहिंसा, चरखा, खादी, सेवा वगैरे आवश्यक नित्यकर्म प्रसिद्ध आहे. पण तें तत्त्वज्ञान कौटुंबिक प्रश्न सोडविण्यास उपयोगी पडलें तरी जागतिक प्रश्न सोडविण्यास कितपत उपयोगी पडेल याबद्दल अजून संशय आहे. तथापि लोकशाहींत उदय पावलेल्या अनेक राजकीय तत्त्वज्ञानांत यांच्या तत्त्वज्ञानाला विशेष स्थान आहे यांत शंका नाहीं.

उत्कट संग्राम किंवा उग्र तपस्या यांपैकीं एकाचें अखंड आचरण करण्यांत आपलें सर्व आयुष्य यांनीं वेंचिलें आहे आणि तीं दोन्ही एकमेकाला पूरक होतील अशी दक्षता यांनीं घेतली आहे.

यांचें बहुतेक सर्व महत्त्वाचें इंग्रजी गद्य लिखाण हरिजन व यंग इंडिया यांमध्यें वेळोवेळीं लिहिलेल्या स्फुटांत विखुरलेलें आहे. सत्य परिस्थितीचें निदर्शन हेंच ध्येय प्रत्येक लिखाणांत कायम ठेवण्याचा यांचा कटाक्ष असल्यानें यांच्या लेखनाची एक स्वतंत्र अशी धाटणी उत्पन्न झाली आहे. भाषेकडे वाचकाचें पूर्ण दुर्लक्ष होईल इतकें साधें लिहून त्याचें सर्व लक्ष प्रतिपाद्य विषयावर केंद्रित करणें, हें यांच्या या धाटणीचें प्रमुख वैशिष्ट्य आहे.

हे आपल्या लिखाणांत अलंकार वापरण्याच्या कधींहि भरीस पडत नाहींत. परंतु यामुळेंच ज्या क्वचित्प्रसंगीं हे अलंकाराचा उपयोग करितात तेव्हां तो अतिशय प्रभावी असतो. 'हिमालयीन प्रमाद', मिस् मेयोच्या पुस्तकावर 'ड्रेन इन्स्पेक्टर्स रिपोर्ट' हा यांनीं मारलेला शेरा किंवा क्रिप्स योजनेवरील 'Post-dated Cheque' हा अभिप्राय हे या दृष्टीनें पाहण्यासारखे आहेत.

यांच्या प्रत्येक लिखाणाच्या मागें दडलेले विचार यांनीं प्रगट केलेल्यापेक्षां अधिक महत्त्वाचे असतात. यांचें लेखन वाचीत असतांना, या लेखांत प्रगट केलेल्या मुद्द्यांपेक्षां अधिक मौल्यवान् विचारसंपदा या मनुष्याचे हृदयांत जागृत असल्याची जाणीव सतत कायम राहते.

यांच्या लिखणांत आग्रहहि असतो. परंतु आपल्या प्रतिपक्षीयांचें म्हणणें विचारांत घेतांना त्याची छाया स्वतःवर हे कधींहि पडूं देत नाहींत. प्रतिपक्षाचें म्हणणें किंचित्हि विकृत न करतां मांडावयाचें, त्यानंतर त्यावरील आपलें म्हणणें मांडावयाचें व शेवटीं आपल्या मतावरील आपला विश्वास अधिकांत अधिक जोरदार भाषेंत प्रगट करावयाचा, ही यांच्या लेखनाची नेहमींची पद्धत आहे.

परंतु या शेवटच्या भागांत मात्र हे प्रत्येक शब्दामागें आपल्या सर्व आयुष्याची तपश्चर्या उभी करतात.

समाजाचें बळ त्याच्या आर्थिक व्यवस्थेवर अवलंबून आहे हें ध्यानांत घेऊन यांनीं ग्रामोद्योग, चरखा, सूतसंघ व खादी यांकडे लक्ष दिलेलें आहे. यंत्रयुगानें आर्थिक विषमता निर्माण व्हावी आणि सर्व दृष्टीनें समाज नाशाच्या मार्गास लागावा यापरती यांना दुसरी कोणतीहि हानि वाटत नाहीं. म्हणून यांनीं घरबसल्या पोटाला देणारा चरखा प्रचारांत आणला. तीन लाख लोकांना कामाला लावून एक कोटि रुपयांची खादी दरवर्षी निर्माण करण्याची व्यवस्था केली. तसेंच वर्धा-शिक्षणयोजनेप्रमाणें हस्तव्यवसायाचें शिक्षण देऊन शाळा स्वावलंबी करण्याची यांची योजना आहे.

विसाव्या शतकांतील एका नव्या नीतिप्रधान राजकीय तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते व त्याचा प्रत्यक्ष व्यवहारांत प्रयोग करून दाखविणारे महात्मे अशी यांची भूमिका आहे. यांचे गुरु गो. कृ. गोखले यांच्या राजकारणाच्या अध्यात्मीकरणाची कल्पना यांनीं प्रत्यक्ष व्यवहारांत आणली. निर्भेळ सत्य आणि पराकाष्ठेची अहिंसा हीं यांचीं प्रमुख साधनें आहेत. सत्य हा यांचा परमेश्वर असून अहिंसेनें त्याचा शोध लावणें शक्य आहे असा यांचा सिद्धान्त आहे. मगनलाल गांधींच्या 'सदाग्रह' शब्दाचें यांनीं 'सत्याग्रह' या शब्दांत रूपांतर केलें. कायदेभंग, अनत्याचार व असहकार हे सर्व सत्याग्रहाचेच प्रकार होत. हे आपल्या नीति आणि आचार यांवर उभारलेल्या सामुदायिक संघटनेनें हें राज्ययंत्र ढिलें करून प्रतिस्पर्ध्याला तडजोड करण्यास भाग पाडतात आणि प्रभावी होतात.

हे केवळ तत्त्वाच्या भोवऱ्यांत सांपडून व्यवहार विसरत नाहींत. स्वतःच्या समाजाला प्रतिष्ठितपणें अन्नवस्त्र मिळवितां आलें पाहिजे आणि कोणत्याहि देशांतील माणसाशीं आपल्याला प्रेमानेंच राहतां आलें पाहिजे, असा यांच्या अहिंसेचा व्यापक अर्थ आहे.

म. गांधी यांचीं गुजराथी पुस्तकें:—१ आत्मकथा (दोन भाग), २ गोसेवा, ३ नीतिनाशने मार्गे, ४ अनासक्ति योग (गीता भाषान्तर), ५ गीतापदार्थकोष, ६ गीताबोध, ७ धर्ममंथन, ८ त्यागमूर्ति, ९ गामडांनी वहारे, १९ हिंद-स्वराज्य, ११ सर्वोदय, १२ एक सत्यवीरनी कथा, १३ सो टका स्वदेशी, १४ देशी राज्योनो प्रश्न, १५ राष्ट्रभाषा विषे विचार, १६ गांधी-वाइसरॉय पत्रव्हेवार, १७ वर्णव्यवस्था, १८ व्यापक धर्मभावना, १९ रचनात्मक कार्यक्रम-तेनुं रहस्य अने स्थान इत्यादि. हींच यांचीं पुस्तकें इंग्रजी, हिन्दी वगैरे अनेक भाषांत प्रसिद्ध झालीं आहेत.

गिडने, सर हेन्री अल्बर्ट जॉन—(जन्म स. १८७३) नेत्ररोगाचे तज्ज्ञ व अँग्लो-इंडियन लोकांचे पुढारी. यांचें शिक्षण कलकत्ता, ऑक्सफर्ड, केंब्रिज व लंडन येथें झालें.

हे एफ्. आर. सी. एस्.; एफ्. आर. एस्. सी. ओ. (ऑक्स्फर्ड); एफ. आर. एस्. ए. (लंडन), डी. पीएच्. (कँटब) वगैरे पदव्या मिळविलेले सेवानिवृत्त आय्. एम्. एस्. लेफ्टनंट कर्नल आहेत.

हे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचे पोस्टग्रॅज्युएट कोर्सचे नेत्ररोगांवरील लेक्चरर होते (१९११).

यांनीं हिंदी लष्करी खात्यांत प्रवेश केला (१८९८). चीन (१९००-०१), ईशान्य (१९१३) व वायव्य (१९१४-१५) सरहद्दीवर काम केलें. शेवटच्या ठिकाणीं हे जखमीहि झाले होते.

इंडियन अँड डोमिसाइल्ड युरोपियन असोसिएशनचे अध्यक्ष व इंग्लंडला गेलेल्या अँग्लो-इंडियन शिष्टमंडळाचे हे पुढारी होते. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद (१९२४-१९४५) व रॉयल मजूर कमिशनचे असिस्टंट कमिशनर होते.

पहिल्या राउंडटेबल कॉन्फरन्स लंडनचे हे सभासद होते.

यांच्या ग्रंथाचें नांव—Numerous Works on ophthalmic Surgery.

गिरोलीकर, महाराज प्रल्हाद अण्णा लोथे—(जन्म स. १८५६—समाधि स. १९२४) वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध सत्पुरुष. हे कृष्णशास्त्री बारशीकरांच्या हाताखालीं नागपुरास शिकले. अध्ययनाचा विषय व्याकरणशास्त्र, पण वेदान्तशास्त्रांत यांच्यासारखें सुबोध, चित्ताकर्षक व परिणामकारक प्रवचन करणारे विरळा! यांचें रूपसौंदर्य अवर्णनीय असून आत्मप्रसाद, गुरुप्रसाद व देवताप्रसाद यांच्या योगें मुखावर जें स्मित विलसत असे तें नास्तिकाच्या ठिकाणीहि आस्तिक्याची भावना उत्पन्न केल्याशिवाय राहत नसे. स्वदेशीची चळवळ १९०६ सालीं उदय पावली. तेव्हां पोलिसांच्या धाकानें सर्व लोक दूर राहत, पण हे जाहीर सभांना नेमानें हजर राहत. पूर्ण सनातनी पद्धतीचा घरांतील आचार असूनहि अस्पृश्यता-

निवारणासंबंधीं चाललेल्या प्रयत्नांची बाजू हे समजावून घेत.

घरांत शंकराची उपासना इतकी उज्ज्वल होती कीं, महाशिवरात्रीच्या सुमारास काशीक्षेत्राच्या आसपास असले तरी घरच्या उत्सवास नेमानें यावयाचेच. तेथें भागवतपुराण नित्यनेमानें वाचलें जाई. यांच्या घराण्यांत सत्पुरुष म्हणून प्रसिद्ध असलेले हे सातवे पुरुष होत. सात पुरुषांनीं अयाचित वृत्तीनें आपली जीवनयात्रा चालविली. यांना वैद्यकीचें ज्ञानहि उत्कृष्ट होतें.

यांच्या गिरोली येथें समाधिस्थलीं काळ्या पाषाणाचें सुंदर टुमदार देवालय उभारण्यांत आलें आहे. तेथें यांची पुण्यतिथि चैत्र वद्य दशमीस होत असते. यांचें चरित्र 'संतमाला' ग्रंथांत प्रसिद्ध झालें आहे.

यांची परंपरा यांचे पुतणे आबाजी महाराज गिरोलीकर उत्तम प्रकारें चालवीत आहेत.

गिल्डर, डॉ. मंचरशा धनजीभाई दोराबजी– (जन्म स. १८८२) सुप्रसिद्ध डॉक्टर व राष्ट्रसभेच्या मुंबई प्रांताच्या मंत्रिमंडळांतील आरोग्यमंत्री.

ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई व युनिव्हर्सिटी कॉलेज, लंडन, येथें आपलें वैद्यकीय शिक्षण संपवून हे एम्. डी., एफ. आर. सी. एस. झाले.

मुंबईच्या गोकुळदास तेजपाल हॉस्पिटलचे मुख्य या नात्यानें हे प्रथम जनतेच्या डोळ्यांसमोर आले. पारशी फीवर हॉस्पिटल, के. ई. एम्. हॉस्पिटल व जी. एस. मेडिकल कॉलेज या संस्थांशीहि यांचे निकटचे संबंध आहेत.

परंतु या सर्वांपेक्षांहि हे जनतेला परिचित आहेत ते 'मजुरांचे डॉक्टर' म्हणून. काँग्रेस राजवटींतील मुंबई-सरकारचे आरोग्यमंत्री या दृष्टीनें यांनीं केलेली कामगिरी यांच्या याच वृत्तीची द्योतक आहे.

The Human Electro-cardiogram (सर टॉमस लुइस यांचे सहकार्यानें) व The Pulse in the Aortic Disease हे यांचे ग्रंथ सुप्रसिद्ध आहेत.

गुणे, वैद्य गंगाधरशास्त्री गोपाळ—(जन्म स. १८७५) नगरचे सुप्रसिद्ध वैद्य. महाराष्ट्रांतील कर्तबगार निष्णात वैद्यांत यांची गणना होते. अगदीं गरीबींतून स्वकष्टानें व दृढ व्यासंगानें हे एक मोठे वैद्य म्हणून प्रसिद्धीस आले. पण त्यापेक्षां नगरच्या आयुर्वेद-महाविद्यालयाचे संस्थापक, प्रधानाध्यापक, 'भिषग्विलास' या मासिकाचे संपादक आणि आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. या औषधी कारखान्याचे संचालक म्हणून यांचा लौकिक अखिलभारतीय स्वरूपाचा झाला आहे.

मॅट्रिकपर्यंत इंग्रजी शिक्षण झाल्यावर कोल्हापूरचे वै. बाबासाहेब गुणे आणि पुण्याचे वै. वाकणकर यांचेकडे यांचें ग्रांथिक व प्रात्यक्षिक शिक्षण झालें. शिवाय पंढरपूरचे हेल्थ ऑफीसर डॉ. त्र्यं. र. गुणे यांचेजवळ ॲलोपाथीचेंहि शिक्षण यांनीं घेतलें. होमिओपाथीचाहि यांचा व्यासंग आहे.

यांनीं ग्रंथलेखनहि बरेंच केलें आहे. 'औषधीगुणधर्मशास्त्र' हा यांचा चार खंडात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहे. डेंग्यु, इन्फ्लुएंझा, इत्यादि रोगांवर यांचीं छोटीं पुस्तकें आहेत. याचबरोबर 'भिषग्विलास' हें मासिक आज सतत बीस वर्षांपेक्षां अधिक काल हे चालवीत आहेत.

प्रथम नगर येथें १९१७ सालीं आयुर्वेदविद्यालय काढून यांनीं कामास सुरुवात केली. पण मध्यतरीं ती संस्था बंद करून हे अमळनेरच्या राष्ट्रीय विद्यालयांत आयुर्वेदाचे अध्यापक म्हणून गेले (१९२०). पण ती संस्था बंद झाल्यावर पुनः नगरास येऊन हे तेथील आपलीं सर्व कामें पूर्ववत् करूं लागले. आज महाराष्ट्रांतील अग्रेसर विद्यालयांत यांच्या विद्यालयाची गणना होते.

स. १९३८ च्या वैद्यकनियंत्रण कायद्याला अनुसरून स्थापन झालेल्या वैद्यकबोर्डानें यांच्या विद्यालयास मान्यता देऊन प्रारंभीं मोठी देणगी व ग्रँटहि दिली. विद्यालय पुष्कळ वर्षे देणगीवर चालून सरकारी मदतीवर वाढीस लागलें तरी आज त्याचा खर्च आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. या यांच्या औषधी कारखान्याकडून प्रामुख्यानें चालल्यानें आधुनिक उपकरणांनीं, पदवीधर वैद्य नि डॉक्टर अध्यापकांनीं व रुग्णालय, प्रयोगशाळा शवच्छेदनगृह या साधनांनीं संपन्न असें त्याचें महाविद्यालय झालें आहे.

यांना चाळीसगांवच्या महाराष्ट्रप्रांतीय व नागपूरच्या नि. भा. वैद्यकसंमेलनाचें अध्यक्षपद देण्यांत आलें होतें. देशी वैद्यकबोर्डाचे सभासद म्हणूनहि तीन वर्षें यांनीं काम केलें. देशी व पाश्चात्य असें वैद्यकाचें मिश्र शिक्षण द्यावें या मताचे हे कट्टे पुरस्कर्ते आहेत. वैद्यकनियंत्रणाचा कायदा घडवून आणणारांपैकीं हे एक होत. आयुर्वेदांतील मूलतत्त्व त्रिदोष हें होय. त्रिदोषांच्या चर्चेकरितां व ते दृक्प्रत्यसिद्ध आहेत, हें ठरविण्याकरितां भरलेल्या पनवेल व बनारस परिषदेंत हे प्रमुख होते.

गुणे, डॉ. त्र्यंबक रघुनाथ— (जन्म स. १८७७) श्रीक्षेत्रपंढरपूरचें आरोग्य सुधारण्यांत यांनीं आपलें सर्व आयुष्य वेंचलें. कॉलऱ्यापासून श्रीपांडुरंगांच्या दर्शनास येणाऱ्या अनेक भाविकांचे प्राण वांचविण्याचें श्रेय त्यांनीं संपादिलें आहे. त्याबद्दल यांची अखिलभारतांत किंबहुना अखिल जगांत आदर्श आरोग्य-संरक्षक म्हणून त्या खात्यांतील लोकांनीं स्तुति केली.

हे सन १८९३ त मॅट्रिक, व सन १८९८ त ग्रँट मेडिकल कॉलेजांतून एल्. एम्. ॲन्ड एस्. ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले. सर्व शिक्षण निरनिराळ्या छात्रवृत्तींवर झालें. डॉक्टर झाल्यावर गुजराथेंत कांहीं दिवस असिस्टन्ट सर्जन म्हणून काम केलें. पुढें सन १९०१ जुलैंत पंढरपुरास यांनीं मेडिकल ऑफिसरची नौकरी पत्करली. सन १९२२ पर्यंत हे त्या कामावर होते. यांचे सर्व लक्ष पंढरपूरचें आरोग्य सुधारण्याकडे असे. बावीस वर्षांतील यांची स्पृहणीय कामगिरी पाहून १९२२ पासून पंढरपुरास हेल्थऑफिसरची जागा निर्माण करून व यांची स्पेशल केस करून यांना पंढरपूरचे फर्स्ट क्लास हेल्थ ऑफिसर नेमिलें.

दूरदूरच्या गांवांहून पंढरपुरास यात्रेनिमित्त पायीं येणाऱ्या यात्रेकरूंचें आरोग्य नीट न राहिल्यानें यात्रा पंढरपुरास आली म्हणजे त्या दिवसांत दररोज कॉलऱ्यानें ६०० पर्यंत मृत्यु होत. किंबहुना मुंबईइलाखा, मध्यप्रांत, कर्नाटक इत्यादि दूरदूरच्या भागांत हा संसर्गजन्य रोग यात्रा झाल्यावर जोरांत बळावत असे. तें सर्व यांच्या परिश्रमानें बंद होऊन आतां पंढरपुरास यात्रेंत लागण झाल्याचें क्वचितच ऐकूं येऊं लागलें. " ट्रॉपिकल कॉन्फरन्स ऑफ मेडिसिन " या आंतरराष्ट्रीय वैद्यक-सभेंत पंढरपूरच्या आरोग्यव्यवस्थेचें वर्णन होऊन ती व्यवस्था अखिलभारतांत आदर्श ठरली आहे. ' टाइम्स ऑफ इंडिया'नें (१४ जुलै १९२७) पंढरपूरच्या आरोग्य व्यवस्थेबद्दल लिहितांना यांचा पंढरपुरांतील एक 'तेजस्वी तारा' म्हणून उल्लेख केला.

यांचें ॲलोपथीचें ज्ञान सूक्ष्म असून ते सोलापूर, नगर, नाशिक इत्यादि जिल्ह्यांत ख्यातनाम डॉक्टर म्हणून प्रसिद्ध आहेत. आर्यवैद्यकाचाहि यांचा अभ्यास सखोल असून यांनीं पाश्चत्य व पौर्वात्य वैद्यकाचा तुलनात्मक अभ्यास करून आर्यवैद्यकावर एक तुलनात्मक सुंदर ग्रंथ लिहिला आहे. अद्याप तो अप्रकाशित आहे.

गुणे, डॉ. पांडुरंग दामोदर— (जन्म स. १८८२–मृत्यु स. १९२२) प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ व वेदाभ्यासक.

यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यांतील राहुरीस झाला. अहमदनगर एज्युकेशन सोसाएटीच्या हायस्कूलमधून हे मॅट्रिक झाले व यांना दुसरी जगन्नाथशंकरशेट शिष्यवृत्ति मिळाली (१९००). तसेंच विल्सन कॉलेज, मुंबई, येथें शिक्षण घेऊन भाऊ दाजी प्राइज मिळवून बी. ए. व झाला-वेदान्त शिष्यवृत्ति मिळवून हे एम्. ए. झाले. १९०८-१० मध्यें हे फर्ग्युसन कॉलेजांत संस्कृतचे प्राध्यापक होते. हिंदुस्थानसरकारकडून शिष्यवृत्ति मिळाल्यानें संस्कृतचा विशेष अभ्यास करण्याकरितां हे जर्मनींत लिप्झिक येथें गेले, आणि तेथें तीन वर्षे अभ्यास करून पाएच. डी. पदवी संपादन करून हे हिंदुस्थानास परत आले (१९१४). इकडे आल्यावर 'माझा युरोपचा प्रवास' (१९१५) व ' जर्मनींतील लोकशिक्षण ' (१९१६) हीं दोन पुस्तकें यांनीं लिहिलीं.

जर्मनींत असतां यांनीं तेथें आपल्या आवडत्या ' भाषाशास्त्र ' या विषयाचें संशोधनपूर्वक अध्ययन केलें. भाषाशास्त्रावर यांनीं लिहिलेलें 'An Introduction to Comparative Phylology' हें इंग्रजी पुस्तक व त्या विषयावरील यांचे अनेक इंग्रजी-मराठी निबंध यांचा त्या विषयावरील अधिकार दाखविण्यास पुरेसे आहेत. यांचा प्राकृत भाषांचा व्यासंगहि वाखाणण्यासारखा होता. भांडारकर-प्राच्यविद्यासंशोधनमंदिर, पुणें, या संस्थेच्या संस्थापकांपैकीं हे एक प्रमुख होते (१९१६). मुंबई युनिव्हर्सिटींतील विल्सन फॉयलॉलॉजिकल लेक्चर्स देण्याचा मानहि यांना मिळाला होता.

यांनीं मराठी कवितेच्या पूर्वीच्या व हल्लीच्या स्थितीविषयीं तुलनात्मक प्रासंगिक विचार (महाराष्ट्रसाहित्य पत्रिका), भाषाशास्त्र व निरुक्ति (विविधज्ञानविस्तार), मराठी भाषेचा कालनिर्णय (भा. इ. सं. मं. षष्ठ इतिवृत्त), अपभ्रंश भाषेंतील वाङ्मय (भा. इ. सं. मं. सप्तमवृत्त) व अनेक ग्रंथांचीं परीक्षणें लिहिलीं आहेत.

गुप्त, बालमुकुन्द—(जन्म स. १८६५–मृत्यु स. १९०६)

हिन्दी भाषेचे एक अप्रतिम लेखक, कवि व परीक्षणकार. सरल, शुद्ध व चटकदार भाषा लिहिण्यांत हे

प्रवीण असत. यांच्या कविताहि सुंदर व मार्मिक असत. 'भारतमित्र' या प्रसिद्ध हिन्दी वर्तमानपत्राचे हे संपादक होते. हिंदीच्या उन्नतीसाठीं यांनीं बरीच खटपट केली.

हे हरियाना प्रान्तांतील रोहतक जिल्ह्यामधील गुरियानी गांवचे राहणारे. तेथें यांचा जन्म झाला. हे अग्रवाल वैश्य. यांचे पूर्वज दीघल येथून गुरियानी गांवीं आल्यामुळें यांना दीघलिया म्हणूनहि म्हटलें जात असे. यांच्या वंशाचें 'नग्गे पोते' हें एक नांवहि प्रसिद्ध आहे.

प्रथम स. १८८७ त चुनारच्या 'अखबारे चुनार' या व नंतर स. १८८८-८९त लाहोरच्या 'कोहिनूर' या उर्दू पत्राचे हे संपादक होते. परंतु याच वेळीं यांनीं पं. दीनदयाल शर्मा यांच्यासमवेत हिंदी शिकण्याची प्रतिज्ञा करून ती ताबडतोब तडीस नेली. पुढें स. १८८९ च्या शेवटीं 'हिंदुस्थान' या पं. मदन मोहन मालवीयजींच्या संपादकत्वाखालीं चालणाऱ्या हिंदी वर्तमानपत्राशीं यांचा संबंध आला. याच पत्राचे दुसरे संपादक पं. प्रतापनारायण मिश्र यांच्या साहाय्यानें यांना हिंदीचें चांगलें ज्ञान झालें. नंतर कांहीं दिवस 'हिंदुस्थान'चे सहसंपादक म्हणून राहून हे त्यांतून पृथक् झाले. पुढें ५ वर्षेपर्यंत हे 'हिन्दी बंगवासी'चे सह-संपादक होते. या वेळीं यांनीं आपल्या योग्यतेचा पूर्ण परिचय करून दिला. स. १८९८ त 'भारतमित्रा'चें संपादकत्व स्वीकारून शेवटपर्यंत त्याच्या उन्नतीसाठीं यांनीं प्रयत्न केला.

'मडेल भगिनी', 'हरिदास', 'रत्नावली नाटिका', 'शिवशंभुका चिट्ठा', 'स्फुट कविता', 'खिलौना', 'खेल-तमाशा', 'सर्पाघात-चिकित्सा' इत्यादि यांचीं लिखित आणि अनुवादित पुस्तकें होत.

हे उद्योगी व सत्यप्रिय असत. ते सनातन धर्माचे कट्टे अनुयायी होते. प्राचीन कवि, पंडित वगैरे लोकांची निंदा करून कोणी आपली प्रतिष्ठा वाढवूं लागला तर यांना तें सहन होत नसे (क. कौ. २. १९४).

गुप्त, मैथिलीशरण रामचरण—(जन्म स. १८८६) वर्तमान हिन्दी भाषेतील सर्वोत्कृष्ट कवि. वाल्मिकी, तुळसीदास यांच्या परंपरेस शोभणारी हृदयाचा ठाव घेणारी यांची कविता आहे.

यांचा जन्म चिरगांव (झांशी) येथें झाला. यांचे वडील कविताप्रेमी असून कविता करीत असत. तसेंच यांचे बंधु सियारामशरण हेहि हिन्दींतील सुप्रसिद्ध कवि आहेत.

यांची कविता व्याकरणशुद्ध, साधी पण अत्यंत भावनामय आहे. त्याग, कर्तव्य आणि नीतिमत्ता यांचा सहज संदेश देण्याची यांच्या काव्यांतील शक्ति आश्चर्यकारक आहे. वाल्मिकी, तुळशीदास वगैरे राष्ट्रीय कवींनीं ज्यांच्या त्यागावर पूर्णपणें प्रकाश पाडला नाहीं असे प्रसंग निवडून यांनीं त्यावर आपल्या प्रतिभाशक्तीनें प्रकाश पाडला.

या दृष्टीनें यांचीं 'साकेत' व 'यशोधरा' हीं दोन काव्यें पाहण्यासारखीं आहेत. साकेत काव्यांत लक्ष्मणपत्नी उर्मिलेचा त्याग यांनीं उठावदारपणें वर्णिला आहे. रामाबरोबर लक्ष्मण सर्वांना उठावदारपणें दिसतो. पण त्याची पत्नी उर्मिला कोठेंच वर्णिलेली नाहीं. तसेंच गौतमबुद्धाचा त्याग सर्वांच्या नजरेंत भरतो पण त्याची पत्नी बिचारी यशोधरा अवर्णितच राहते. या दोन्ही स्त्रियांच्या त्यागाचें आणि उदात्ततेचें वर्णन यांनीं मोठ्या आत्मीयतेनें आपल्या काव्यांत केलें. वियोगस्थितींत लक्ष्मणाचा मोठेपणा सांभाळण्याविषयीं उर्मिला अगदी दक्ष होती. एकदां लक्ष्मण रामाला सोडून हिला भेटण्यास आल्याचा भास झाला. तेव्हां हिला अत्यंत धक्का बसला आणि हिच्या तोंडून उद्गार निघाले—

प्रभु नहीं फिरे, क्या तुम्हीं फिरे।
हम गिरे, अहो! तो गिरे गिरे॥

राम परत फिरल्याशिवाय लक्ष्मणानें परत फिरणें हा हिला कमालीचा अधःपात वाटला.

यांच्या 'भारतभारती' या काव्यानें वाचकांच्या मनांत राष्ट्रीय भावना निर्माण केल्या आहेत. प्रारंभींच कवि विचारतो—

हम कौन थे, क्या हो गये है, और क्या होंगे अभी।
जाओ, विचारो, आज मिलकर ये समस्याएँ सभी॥

सध्यांच्या दुःस्थितींचें वर्णन करतांना शेतकऱ्यांचें दुःख तर अगदीं मोजक्या शब्दांत पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे—

बरसा रहा है रवि अनल, भूतल तवासा जल रहा।
है चल रहा सन-सन पवन, तनसे पसीना ढल रहा॥
देखो कृषक, शोणित सुखाकर हल तथापि चला रहे।

या काव्याच्या शेवटीं कवीनें कळकळीनें विचारलें आहे कीं—

हतभाग्य हिंदुजाति ! तेरा पूर्वदर्शन है कहाँ ?।
वह शील, शुद्धाचार, वैभव, देख अब क्या है वहाँ ॥

'जयद्रथवध' व 'पंचवटी' या यांच्या काव्यांत मनोहारिता आणि सहजता हे यांचे प्रमुख गुण उत्कटतेनें पाहण्यास सांपडतात. पंचवटी या खंडकाव्यांत लक्ष्मणाचें चरित्र प्रामुख्यानें रंगविलें आहे. त्यांत यांचे काव्यांत सर्वत्र आढळणारा प्रसाद भरपूर आढळतो. यांच्या कल्पनेचा विलास पाहा—

है बिखेर देती वसुन्धरा, मोती, सबके सोनेपर,
रवि बटोर लेता है उनको, सदा सबेरा होनेपर ॥
और विरामदायिनी अपनी, सन्ध्या को दे जाता है, ।
शून्य श्याम तनु जिससे उसका, नया रूप झलकाता है ॥

सरस व भावनाप्रधान कविता लिहून लोकांना संदेश देणारा हा महाकवि, चिरगांवांत गेलें असतां, अंगांत कोपरापर्यंत मळकट बंडी, गुढघ्याखालीं येण्यास भिणारें साधें धोतर आणि डोईवर बुंदेली पगडी अशा पोषाखांत चारचौघांतून निवडून काढणें कठीणच पडेल. तथापि कालानुसार होत जाणारे बदल आत्मसात् करून नव्या पिढीबरोबर नव्या पद्धतीनें व नव्या विचारानें कविता करून आपलें अग्रस्थान टिकविण्याचें कसब मात्र यांच्याजवळ पूर्ण आहे. कथात्मक काव्य लिहीत असतांहि त्यांत समरस होऊन राष्ट्रीय भावनांचा आविष्कार करण्यांत हे सिद्धहस्त आहेत. हे संदेश देणाऱ्या कविता लिहीत नाहींत, पण यांच्या काव्यांतून लोकांना संदेश मिळाल्याशिवाय राहत नाहीं. हे गायक नाहींत, पण काव्य म्हणतांना हे स्वतः आणि लोकांनाहि काव्यांतील भावनेशीं एकरूप करून तन्मय करून सोडतात.

अर्वाचीन काळांत यांच्याइतका लोकप्रिय कवि हिंदी भाषा बोलणारांत दुसरा नाहीं. प्रसाद, ओज, करुणादि रस व शब्दालंकार इत्यादि गुणांनीं यांचें काव्य पूर्ण असतें. यांचे काव्यावर पाश्चात्य छाप नसून तें पूर्ण भारतीय वळणाचें आहे. तसेंच तें प्रायः गूढ किंवा आत्मचिंतनपर नाहीं. यांच्या काव्यांत हिन्दी संस्कृतीचें पुनरुज्जीवन करण्याची तळमळ दिसून येते. आणि तें निद्रिस्त मनाला धक्के देऊन जागृत केल्याशिवाय राहत नाहीं. तसेंच यांचें काव्य अगदीं खालच्या थरांतील दीन लोकांच्या मूक भावना प्रकट करतें. त्यामुळें सर्व समाजाला हे आपले कवि वाटतात. साधी भाषा, मनाला भिडणारे विचार आणि तळमळ यांमुळें जनतेचे खरेखुरे कवि होण्याचें भाग्य यांना लाभलें आहे.

याच यांच्या लोकप्रियतेमुळें यांचे काव्यग्रंथ खपतातहि भरपूर. आपल्या ग्रंथांच्या मुद्रणाकरितांच केवळ यांनीं आपल्या चिरगांवीं छापखाना काढला असून यांचे बंधु सियारामचरणजी त्याची सर्व व्यवस्था पाहत असतात. यांच्या पन्नाशीचे व साठीचे उत्सव सर्वत्र मोठ्या समारंभानें साजरे झाले.

विनयामुळें पन्नाशीच्या उत्सवाच्या वेळीं हे कोठेंच उपस्थित झाले नाहींत; मात्र काशीच्या उत्सवमंडळास यांनीं पुढील निरोप धाडला—

'यह सुयोग दुर्लभ, पर सुनिये, निज भविष्य है उदार ।
जो पिछे आ रहे है, उन्हींका, मै आगेका जयजयकार ॥'

यांचें वाङ्मय—१ भारतभारती, २ जयद्रथवध, ३ रङ्गमें भंङ्ग, ४ किसान, ५ पद्यप्रबन्ध, ६ शकुन्तला, ७ विरहिणी व्रजाङ्गना, ८ पत्रावली, ९ वैतालिक, १० चन्द्रहास, ११ तिलोत्तमा, १२ झांसीका युद्ध, १३ पञ्चवटी, १४ मेघनादवध, १५ स्वदेशसंगीत, १६ वनवैभव, १७ बकसंहार, १८ सैरन्ध्री, १९ अनघ, २० द्वापर, २१ यशोधरा (गद्ययुक्त), २२ हिंदू, २३ मङ्गल घट, २४ विकट भट, २५ गुरुकुल, २६ सिद्धराज, २७ साकेत, २८ झंकार, २९ वीरांङ्गना इत्यादि.

गुरु, पं. कामताप्रसाद गंगाप्रसाद—(जन्म स. १८७५)

हिंदी भाषेचे व्याकरणकार, कवि व लेखक. यांचा जन्म मध्यप्रांतांतील सागर शहरीं झाला. हे कान्यकुब्ज ब्राह्मण असून कंपिलेचे पाण्डेय होत. परंतु वंशपरंपरेमुळें यांना गुरु नांवानेंच संबोधिलें जातें.

यांचें शिक्षण सागर येथेंच होऊन संस्कृत घेऊन हे प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर उर्दू व फारसीचें शिक्षण घेऊन यांनीं २ वर्षें सागरच्या हायस्कूलमध्यें शिक्षकाचें काम केलें. नंतर यांची रायपूर येथें बदली झाली. या ठिकाणीं यांचा व पं. माधवरावजी सप्रे यांचा निकट संबंध येऊन सप्रे यांना साहित्याबाबत यांनीं पुष्कळ मदत केली. यानंतर कालाहंडी संस्थानांत हे शाळेचे डेप्युटी इन्स्पेक्टरहि झाले. त्याचप्रमाणें हे कांहीं दिवस छुईखदान संस्थानच्या राजकुमाराचे शिक्षक होते. पुढें जबलपूरच्या नॉर्मल स्कूलमध्यें हिंदी साहित्य व व्याकरण शिकविण्यासाठीं यांची नेमणूक झाली. स. १९२० च्या सुमारास १ वर्षपर्यंत हे प्रयागच्या "बालसखा" व "सरस्वती" पत्रांचे संपादक होते.

जबलपूरच्या राष्ट्रीय हिंदी मंदिरांतहि हे एक वर्ष संपादक होते.

शिक्षकाच्या कार्यास आरंभ केल्यानंतर हिंदी साहित्याकडे यांची आवड जाऊन हे लेख व कविता लिहूं लागले. यांचें लिखाण 'सरस्वती'मधून प्रसिद्ध होत असे. यांचे टिकात्मक इंग्रजी लेख मुंबईच्या 'इंडियन एज्युकेशन' या मासिकांतून येत असत. यांच्या कविता व लेख टोपण नांवानें प्रसिद्ध होतात.

यांना इंग्रजी, हिंदी, संस्कृत व फारसी यांशिवाय उडिया, बंगाली आणि मराठीचेंहि थोडेंफार ज्ञान आहे. हिंदी व इतर भारतीय भाषांच्या व्याकरणाचें तुलनात्मक अध्ययन यांनीं केलें आहे. यांना हिंदी भाषा व व्याकरणाचें प्रमाण म्हणून मानलें जातें.

'सत्य प्रेम' व 'पार्वती और यशोदा' (उडिया पुस्तकाच्या आधारें) या कादंबऱ्या; 'सुदर्शन' व 'हिंदुस्तानी शिष्टाचार' हीं नाटकें; 'भौमासुर-वध', 'विनय पचासा' व 'पद्यपुष्पावली' हीं पद्यात्मक पुस्तकें; 'अत्याचारी' (पद्य-विनोद संबंधीं पुस्तक) आणि 'भाषा-वाक्यपृथक्करण' व 'सहज हिंदी रचना' हीं व्याकरणात्मक पुस्तकें इत्यादि वाङ्मय यांनीं निर्माण केलें. 'भाषा-वाक्यपृथक्करण' व 'सहज हिंदी रचना' हीं पुस्तकें मध्यप्रांतांतील हिंदी शाळांत प्रचलित आहेत. यांचें सर्वांत महत्त्वपूर्ण व विद्वत्तासूचक पुस्तक म्हणजे "हिंदी व्याकरण" हें होय. या पुस्तकाच्या सुधारणेसाठीं जी कमिटी नेमली होती तिनें हें पुस्तक अद्वितीय ठरविलें आहे. मध्यप्रांत सरकारनें या पुस्तकाबद्दल यांना एक सुवर्णपदक बक्षिस दिलें. मध्यप्रांतांतील सर्व शाळांच्या प्रचलित हिंदी पाठ्य पुस्तकांशीं यांचा विशेष संबंध होता.

हे प्रयाग हिन्दी साहित्य संमेलन व मध्यप्रांतीय हिन्दी साहित्य-संमेलन (जबलपूर) यांच्या कार्यकारिणी सभेचे सभासद आहेत. त्याचप्रमाणें जबलपूरच्या कविसमाजाचे हे अध्यक्ष आहेत. मध्यप्रांत शिक्षण-विभागाच्या अनेक उच्च हिन्दी परिक्षांचे हे परीक्षकहि आहेत. हे मध्यप्रांतांतील एक उत्कृष्ट टीकाकार म्हणून समजले जातात. यांची भाषा व्याकरणसंमत, सारगर्भित व सहजसुलभ असून यांच्या कविता प्रसादपूर्ण आणि भावनामय असतात. (क. कौ. २ ३०३-३०७).

गुरुदत्त विद्यार्थी—(जन्म स. १८६४ एप्रिल २६–मृत्यु स. १८९० मार्च १८) प्रतिभाशाली वैदिक पंडित आणि आर्यसमाजाचे प्रारंभीच्या पुरस्कर्त्यांपैकीं एक प्रमुख. आर्यसमाजाचे हे प्रमुख उपदेशक होते.

हे एम्. ए. असून सायन्स आणि गणित विषयांत निष्णात होते. महर्षि दयानंदस्वामी अजमेर येथें मृत्युशय्येवर असतां हे त्यांच्या दर्शनाकरितां गेले. स्वामीजींना तेव्हां अत्यंत वेदना होत होत्या. तथापि त्यांच्या तोंडावर वेदनांचा कोणताहि परिणाम दिसत नव्हता. त्यांची ती आश्चर्यकारक सहनशीलता पाहून हे नास्तिक व अनीश्वरवादी असतां आस्तिक व ईश्वरवादी बनले. आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आपलें सर्व आयुष्य आर्यसमाज आणि वैदिक साहित्याच्या सेवेला यांनीं अर्पण केलें.

लाला लजपतराय, महात्मा हंसराज आणि हे अशा तिघांनीं मिळून महर्षि दयानंदांच्या स्मारकार्थ दयानंद अंग्लो-वैदिक कॉलेजची स्थापना केली (स. १८८६ लाहोर) आणि त्याकरितां सर्वस्वाचा त्याग करून इतरांनाहि असाच त्याग करण्याची यांनीं स्फूर्ति उत्पन्न केली. दयानंद अँग्लो-वैदिक कॉलेज सोसायटीच्या कार्याचा मोठा व्याप प्रचंड स्वरूपांत सतत वाढत चालला आहे. दुर्दैव एवढेंच कीं, यांचा देहान्त फार लवकर झाला.

इंग्रजींतील 'वैदिक मॅगेझिन' मासिक यांनींच ग्रथम सुरू केलें. यांचें वाङ्मय हिन्दी, उर्दू व इंग्रजीमध्यें आहे. यांचे ग्रंथ—

(१) गुरुदत्तलेखावली (हिन्दी), (२) ओंकार उपासना (उर्दू). इंग्रजी—(३) Evidences of Human Spirit, (४) Wisdom of the Rishis, (५) Terminology of the Vedas, (६) Upanishadas with Commentary, (७) Mundak-Upanishada (Translation and Exposition), (८) Criticism on Monier William's Indian Wisdom.

गुला महाराज—(जन्म स. १८९८–मृत्यु स. १९३८ जुलै १९) भिल्ल समाजाला पुनर्जन्म देणारे पश्चिम खानदेशांतील साधु पुरुष. भिल्लसमाजाची लोकसंख्या पश्चिम खानदेश जिल्ह्यांत सुमारें साडेतीन लाख असून हे लोक स्वभावानें प्रामाणिक आहेत. शिक्षणाचा अभाव व दारूचें व्यसन यांमुळें या समाजाची अत्यंत दुर्दशा झाली आहे. पण या दुर्दशेतून भिल्लांचा उद्धार करणारा त्यांच्याच जातींत निर्माण झाला. तळोद्यापासून चार

मैलांवर असणाऱ्या मोरखड गांवीं यांचा जन्म झाला. मोरखडचें नांव यांनीं आवडीनें रंजनपूर असें ठेविलें. यांच्या आईचें नांव मैना व बापाचें नांव भायल्या. बापाचा धंदा सालदारी, रखवाली किंवा गुराची राखोळी. हाच धंदा यांच्याहि वाटयास आला. पण भिल्लांत क्वचित् आढळणारें नित्य स्नान, तुळशीला पाणी घालणें व सूर्यदर्शन झाल्याशिवाय न जेवणें इत्यादि नियम हे पाळीत असत. या नियमांमुळें यांनीं सालवारी सोडून रखवाली व मजूरी हे दोन स्वातंत्र्यानें करितां येणारे धंदेच करून आपली उपजीविका करण्यास सुरुवात केली. हळुहळूं यांच्या मुखातून सर्वाभूतीं परमेश्वर असल्याचें तत्त्वज्ञान बाहेर पडूं लागलें, त्या अर्थी हे 'आप' हा शब्द वापरूं लागले व यांचे नियम निष्ठेनें पाळणाऱ्या लोकांचें एक 'आपमंडळ' सहज तयार झालें. लोक यांना गुलामहाराज म्हणत असले तरी हे आपणास 'गुलाम भगवान्' भगवंताचे गुलाम असें म्हणवून घेत. हे अगदीं निरक्षर होते; तथापि कांहीं गूढार्थक मजकूर यांनीं एका फळीवर लिहवून घेतला व तो मजकूर आपल्या अन्तर्यामींच्या विचाराचें प्रतिबिंब असें मानून त्याची आपल्या झोपडींत रोज सकाळसंध्याकाळ व दर सोमवारीं जाहीर रीतीनें आरती करण्याचा प्रघात यांनीं सुरू केला. आरतीकरितां तेलवातीशिवाय कशाचीच अपेक्षा नसे. आरतीसमारंभ सुरू केल्यापासून हे चारपांच महिन्यांतच वारले; तथापि हा साप्ताहिक जाहीर आरतीचा समारंभ वाढतांवाढतां मोरखड तथा रंजनपूरला पंढरपूरचें भाग्य प्राप्त झालें. लक्षावधि भिल्लांच्या व भिल्लेतरांच्या स्त्रीपुरुषांना तो गांव क्षेत्रासारखा वाटूं लागला. यांच्या मृत्यूनें तर या यात्रेला ओहटी न लागतां भरतीच येऊं लागली. कित्येक प्रसंगीं रेल्वेलाहि गुलामहाराज स्पेशल ट्रेन सोडाव्या लागत. यांची पत्नी दगीबाई यांचे बंधु रामदास महाराज व मुलगा शंकर महाराज ह्यांनीं यांचें काम पुढें चालविण्याचा प्रघात चालू ठेवला.

दुर्दैवानें यांच्यामागें या सामुदायिक आरतीसमारंभास उतरती कळा लागली. तरी पण दूरदूरच्या खेड्यांतील शेंकडो कुटुंबांतून यांच्या नियमांचें निष्ठापूर्वक पालन, नित्य यांच्या तसबिरीची पूजा व सकाळ-संध्याकाळ भक्तिभावानें आरती केली जाते.

यांच्या शिकवणीचें सार–शौचास पाणी न्या, रोज स्नान करा, गंध व कुंकूं लावा, दारू पिऊं नका, मांस खाऊं नका, खरें बोला, देवाला भजा-इत्यादि (आप श्री गुलामहाराज चरित्र–शंकर विनायक ठकार).

गुलाबराव महाराज—(जन्म स. १८८१–समाधि स. १९१५) अतिमानुष कोटींतील महान् साधु व कवि.

यांचा जन्म उमरावतीपासून १२ मैलांवर असणाऱ्या लोणी (टाकळी) या गांवीं झाला (शके १८०३ आषाढ शुद्ध १०). पित्याचें नांव गोंदूजी, मातेचें नांव अलोकाबाई व आडनांव मोहोड. यांचें घराणें सूर्यवंशी भारद्वाज गोत्री राणारजपूत असूनहि व्यवहारांत आपणास हे शूद्र म्हणवीत. माधान गांवची पाटीलकी यांचे घराण्यांत वंशपरंपरेनें चालू आहे. हे सुमारें नऊ महिन्यांचे होतांच यांचे डोळे आल्याचें निमित्त होऊन त्यांतच कांहीं अपघातानें ते बिघडून हे कायमचे अंध बनले. यांची आई यांच्या चवथ्या वर्षींच वारली. यांचा प्रतिपाळ अजोळीं मातामहीनें म्हणजे आईच्या आईनें केला. माधानपासून ४ मैलांवरील आखातवाड–दत्तापूर या गांवच्या गणाजी भुयार यांच्या वडील कन्येशीं शके १८१४ फाल्गुन व. ५ रोजीं यांचें लग्न झालें. यांच्या पत्नीचें नांव मनकर्णिका. हे कुटुंबाला नांवानेंच हाका मारीत. यांनीं पत्नीला व्यंकटेशस्तोत्र, शिवलीलामृत व ज्ञानेश्वरी शिकविली. यांना एक पुत्र झाला. शके १८२७ च्या श्रावण वद्यांत यांची पत्नी निवर्तली. यांनीं आपल्या झाब्या नांवाच्या कुत्र्यास व हिराबाई नांवाच्या वेश्येस अनुग्रह करून सद्गतीस पोंचविलें. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं स्वप्नांत दर्शन देऊन मांडीवर बसवून शके १८२४ सालीं वैदिक धर्माचा व कृष्णभक्तीचा उपदेश करून त्याच्या प्रसाराची यांना आज्ञा दिली. तेव्हांपासून यांनीं 'ज्ञानेश्वरकन्या' व 'श्रीकृष्णपत्नी' असें नामाभिधान धारण केलें व हे गळ्यांत मंगळसूत्र, वेणी-कुंकवादि सौभाग्यचिन्हें धारण करूं लागले.

यांची कविताशक्ति सद्य-स्फूर्तिजन्य असल्यानें प्रत्यहीं नूतन पद्यांनीं भगवंतांना आळविणें, गद्यपद्यमय ग्रंथरचना करून लोकांस सन्मार्गी लावणें, मुमुक्षूंचा उद्धार करणें, सत्संगति व प्राचीनअर्वाचीन ग्रंथांचें परिशीलन हा यांचा नित्य व्यवसाय होता.

ज्ञानोत्तरकालीं देखील दृष्ट दुःखनिवृत्त्यर्थ व परमानंदप्राप्तीकरितां भगवद्भक्ति हें यांचें ध्येय होतें. त्याप्रमाणें हे नित्य पार्थिवपूजा, श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पादुकांची व कृष्णमूर्तींची पूजा, एक वेळ भोजन, दर गुरुवारीं ज्ञानेश्वरमहाराजांची पालखी, वर्षांतून एक वेळ आळंदीची वारी व प्रतिवर्षी मार्गशीर्षांत कात्ययनी-

व्रतोत्सव मोठ्या समारंभानें करीत. या व्रताचा उद्देश श्रीकृष्ण हे पति व आपण स्वतः पत्नी या अत्युच्च मधुर भक्तीचा प्रत्यक्ष आचरणानें आस्वाद घेतां यावा हा असे. फार काय, महाराज 'वासुदेव' हें नांव कधीं तोंडानें उच्चारीत नसत. इतकी प्रात्यक्षिक मधुरभक्ति आचरणारे महात्मे श्रीगौरांगानंतर हेच आपल्याकडे होऊन गेले.

यांची अलौकिक बुद्धिमत्ता व भक्ति-ज्ञान-वैराग्यादि संपत्ति लहानपणापासून प्रगट दिसूं लागली. यांनीं सांख्य, योग, वेदान्त, वैद्यक, व्याकरणादि विषय लोकांस शिकविले. हस्तस्पर्शानें व्याधि-पीडित जनांचे रोग दूर केले. यांचें आचरण अत्यंत शुद्ध व श्रौतपरंपरेला धरून होतें. उपासनादृष्टीनें हे हरिहरोपासक असून, मधुराद्वैताचे पुरस्कर्ते व मधुराद्वैतदर्शनाचे आचार्य होत. यांनीं नाडीवरून रा. रा. ल. रा. पांगारकरांना ओळखून काढलें. यांची ग्रंथपरीक्षणाची पद्धत म्हणजे अनुक्रमणिका व प्रस्तावना यांवरून हात फिरविला कीं झालें. ग्रंथाच्या अमक्या पानांत अमका श्लोक आहे हें हे बिनचुक सांगत; हा यांचा मोठा दृष्ट चमत्कार असे. पृथ्वींतील सर्व धर्मांचीं तत्त्वें यांना अवगत होतीं. यच्चावत् लौकिक व अलौकिक शास्त्रांचें हृदय यांना करतलामलकवत् होतें. जगांतील कोणत्याहि भाषेंतील धर्मशास्त्रविषयक विचार यांना पूर्ण ज्ञात असून श्रुति-युक्ति-अनुभवानें ते दुसऱ्यास समजावून देण्यांत कुशल व अधिकारानुरूप नित्यनूतन साधनप्रक्रिया सांगण्यांत हे प्रवीण होते. यांनीं आपल्या स्वयंस्फूर्तीच्या प्रासादिक, ओजस्वी व वेगवती वाणीनें हजारों अभंग, ओव्या, पदें, लावण्या, श्लोक वगैरे केले आहेत. ते इतरांना अनेक जन्मांत करणेंहि अशक्यच आहे (श्रीगुलाबवाटिका-विहार–वासुदेव वामन मुळेकृत).

' यांच्याकडे पाहिलें कीं हा पुरुष मूर्तिमंत चमत्कार आहे असें वाटे. हे बोलूं लागले कीं, भक्तिप्रेमाचा नुसता पाऊस पडे. हे चर्चा करूं लागले कां, यांची निर्दोष वादसरणी, विलक्षण ज्ञान व युक्तिवाद पाहून मन कुंठित होई. यांची अत्यंत मधुर वाणी ऐकून चित्त नागासारखें डोलूं लागे. पूजादि कर्मे हे इतक्या सशास्त्र रीतीनें व सद्भावनेनें तासचे तास करीत कीं, तीं यांची कर्मनिष्ठा पाहून कर्मठालाहि धन्यता वाटे. कर्मज्ञान-उपासना या तीनहि बाबतींत यांचें अन्तःकरण व आचरण इतकें बिनखोड असून अव्याजमनोहर होतें कीं ही साधुमूर्ति लोकांना मार्ग दाखविण्यासाठींच अवतरली आहे असें भाविकांच्याच काय पण सुबुद्ध तार्किकांच्याहि मनाला वाटे.

अव्यंग कर्म, विशुद्ध ज्ञान व अलोट भक्ति ह्या तिहींचें एकीकरण सत्पुरुषावांचून अन्यत्र कोठेंहि दिसत नाहीं. हें सर्व यांच्यांत होतेंच. पण याशिवाय अर्वाचीन चिकित्सक दृष्टीलाहि ज्याचा उलगडा होत नाहीं अशा कित्येक गूढ गोष्टी यांजजवळ होत्या. यांच्या सहवासानें ही एक लोकोत्तर विभूति आहे असें कोणाहि पुरुषास कबूल करावें लागे (ल. रा. पांगारकर).

कुणबी कुलांत जन्म, वयाच्या नवव्या महिन्यांत प्राप्त झालेलें अंधत्व, शिक्षणाचा अभाव, खेड्यांतील राहणी, आणि सत्संगतीहि नाहीं, अशा स्थितींत जुन्या-नव्या शास्त्रांतील व अनेक धर्मांतील पारंगतत्व यांच्यांत कसें आलें याचें उत्तर यांनीं आपल्या ग्रंथांत दिलें आहे.

हे प्रथम दुसऱ्याकडून ग्रंथ वाचवून घेत, पण ज्ञानेश्वरांनीं अनुग्रह करून यांना मंत्र दिल्यावर यांना ज्ञानसिद्धि प्राप्त झाली. यांचें आश्चर्यकारक ज्ञान म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं दिलेल्या मंत्राचा प्रभाव होय, हें यांनींच स्पष्ट लिहून ठेविलें आहे.

यांचा 'संप्रदाय सुरतरु' हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांत यांनीं आपलें जीवितकार्य नमूद केलें आहे. त्यांत यांची नम्रता व आत्मविश्वास उत्कटपणें दिसून येतो. त्याचा प्रास्ताविक भाग असा–' पूर्वी प्रल्हादाची आर्तता पुरविली हें ऐकून मी अयोध्येस गेलें, तर रामरायांना कैकेयीनें वनांत धाडलें होतें, आणि माझी इच्छा अपुरी राहिली. पुढें कृष्णावतारी गेलें, तों कृष्णाला अक्रूरानें मथुरेस नेलें; पुढें पंढरपुरीं इच्छा पुरी व्हावी म्हणून गेलें, तों पांडुरंगाची मूर्ति अनागोंदीच्या राजानें आपल्या राजधानीस नेली; आतां आळंदीला मात्र दुर्दैवाची वावटळ विरून गेली आणि ज्ञानराजांच्या कृपेचा मेघ कारुण्याच्या धारांचा अखंड वर्षाव करीत आहे. परंतु त्याच वेळीं चातकाला मुखरोग व्हावा तशी माझी अवस्था झाली आहे. पण तोहि नामस्मरणानें गेला असून त्या करुणाघनाचें अमृतजल प्राशन करावयास मिळालें आणि जो अपूर्व आनंद आला त्याचा उद्गार म्हणजेच हा संप्रदायसुरतरु.'

बुवाबाजीचा यांना अत्यंत तिटकारा असे. मनुष्यानें होतां होईतों संसारी असावें असा हे उपदेश करीत. सक्तीनें धर्मान्तर झाल्यास प्रायश्चित्त देऊन शुद्ध करावें

असें हे म्हणत. सत्यशोधक समाजाचें तत्त्वज्ञान आणि प्रचारपद्धति यांना बिलकूल मान्य नसे. यांचे ग्रंथ लिहून घेण्याचें श्रेय यांचे अनुग्रहीत शिष्य नारायण पैकाजी पंडित, श्रीज्ञानेश्वरमंदिर, पाताळेश्वररस्ता, नागपूर व उमरावतीचे कै. हरिभाऊ केवले यांना आहे. यांचें अप्रसिद्ध वाङ्मयहि पुष्कळ आहे. त्याच्या प्रसिद्धीची खटपट श्री. शंकर जयराम सूर्यवंशी, पेन्शनर, नाशिक हे करीत आहेत. यांचे दोन अभंग नमुन्यादाखल पुढें दिले आहेत.

समदृष्टि नव्हे मांगासवें खाणें ।
यथेच्छ सेवणें वेश्येलागीं ॥
समदृष्टीसाठीं देह व्हावा तृण ।
क्षणोक्षणीं प्राण कासावीस ॥
जोडा आणि तोंड एकाचि चर्माचे ।
संघटन त्यांचें करूं नये ॥
अन्न आणि विष्ठा एकाचि धान्याची ।
साम्यता दोहींची म्हणूं नये ॥
देह प्राण मन बुद्धि या उपाधि ।
सोडिलिया शुद्धि समता ये ॥
ज्ञानेश्वर-स्वामी न होतां कृपाळ ।
वटवट वेळ वृथा सारी ॥
—गाथा १२६२

धर्मचाड तरी पहावें भारत ।
समन्वयीं चित्त ठेवोनीया ॥ १
नीतिचाड तरी गावें रामायण ।
वाल्मिकी-कीर्तन काव्यशुद्ध ॥ २
भक्तिचाड तरी शुद्ध भागवत ।
सदा हृदयांत ठेवा वेगीं ॥ ३
ज्ञानचाड तरी वसिष्ठ स्मरवा ।
अन्तरीं धरावा गुह्यभाव ॥ ४
गुरुचाड तरी स्मरा ज्ञानेश्वर ।
हेंचि धर्मसार बोलिलें म्यां ॥ ५

यांचे ग्रंथ मराठी व संस्कृत भाषेंत आहेत. क्वचित् हिन्दींत कवित्व आढळतें.

मराठी–१ संप्रदायसुरतरु (भाग १–२ ओंवीबद्ध, दोन आवृत्त्या), २ पत्रव्यवहार (भाग १-२, दोन आवृत्त्या), ३ व्यवहारधर्मबोध (दुसरी आवृत्ति, पूर्वीचें नांव साधुबोध), ४ अलौलिकव्याख्यानमाला, ५ अभंग-गाथा, ६ भागवत-रहस्य (खंड १-२), ७ पदांची गाथा (भाग १-२), ८ हरिपाठप्रवेश (श्रीज्ञानेश्वरकृत हरिपाठावरील टिपणें), ९ योगप्रभाव, १० प्रेमनिकुंज, ११ स्त्रीगीतसंग्रह.

यांशिवाय पुढील ग्रंथ अप्रसिद्ध आहेत:—मराठी–१ इतर संकीर्ण प्रकरणें, संस्कृत–१ एकादशीनिर्णयः; २ संप्रदायकुसुममधु; ३ प्रमोदकल्लोलः; ४ वाल्मिकीसारोद्धारः; ५ श्रीधरोच्छिष्टपृष्टिः (भागवतदशमस्कंधटीका), ६ नारदसूत्रभाष्यम् इत्यादि.

गुलाम अलिया—(जन्म स. १८५०–मृत्यु स. १९०३) सुप्रसिद्ध हिन्दी पहिलवान. पॅरिसमध्यें जाऊन सॅन्डोशीं कुस्ती मागितली पण ती यांना मिळाली नाहीं. पण १९०२ सालीं परिस–प्रदर्शनांत संपूर्ण युरोपांतील पहिलवानांत यांचा पहिला क्रम मान्य करण्यांत आला. थोरल्या गामाच्या पूर्वी रुस्तुम-इ-हिंदचा किंवा जगांतील अद्वितीय मल्लाचा मान यांचा होता. हे कलकत्त्यास मृत्यु पावले. औंधसरकारचे आश्रित निजाम वल्लद-इमाम उद्दीन हे यांचे शागीर्द होत.

गुंगा—(जन्म स. १९०१· मृत्यु स. १९४४) हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध मल्ल. यांच नांव फिरोजुद्दीन, बापाचें नांव गामु बालीवाला. आजोबाचें नांव बाली. यांचा जन्म सियालकोटजवळ उगोकी गांवीं झाला. यांचे वडील लोकरीचा व्यापार करीत असत.

यांची लहानपणीं प्लेगच्या आजारामुळें बोलण्याची व ऐकण्याची शक्ति नष्ट झाली. म्हणून यांस गुंगा म्हणत. वयाच्या १६-१७ व्या वर्षापासूनच यांनीं कुस्ती खेळण्यास सुरुवात केली. यांचे कुस्तींतील पहिले प्रतिस्पर्धी गामा हे होत. त्यांचा यांनीं अगदीं सहजपणें पाडाव केला. नंतर झालेल्या आणखी दोन सामन्यांत यांनीं त्यांना चीत केलें. याच वेळीं यांनीं गुत्तासिंग, हैदर, गामा एक्का व कालीया या जलालपूरच्या उत्कृष्ट खेळाडूंना लीलेनें जिंकलें. पण यांच्या आयुष्यांत गामाचा भाऊ इमामबक्षाबरोबर झालेल्या कुस्तीइतकी मोठी कुस्ती कधींच झाली नसेल. यांची ही कुस्ती चार वेळां झाली व पहिल्याच खेपेस वीस मिनिटांत यांनीं त्यास चीत केलें. दुसऱ्यांदा इमामबक्षानें यांना ५५ मिनिटांत लोळविलें. तिसरी अनिर्णीत राहिली. पण चौथी मात्र यांनीं जिंकली. हे व्यायामाकरितां दररोज दोन हजार दंड व दोन हजार बैठका काढीत. श्री. एस्. मुजुमदार यांनीं केलेल्या तपासणीप्रमाणें यांच्या शरीराच्या निरनिराळ्या अवयवांचीं मापें खालीलप्रमाणें आहेत:–उंची-५ फूट ११॥ इंच. मान

१८ इंच. छाती ४९। इंच. मनगट ७½ इंच. मांड्या २७½ इंच. पोटऱ्या १६ इंच. हात १३। इंच. दंड १६।। इंच. हे मृत्यूपूर्वी पुष्कळ दिवस कोल्हापूरच्या महाराजांचे आश्रित होते. रुस्तुम-इ-हिंदचा किंवा जागतिक अद्वितीय मल्लाचा मान हे कांहीं दिवस जगले असते आणि परदेशाला गेले असते तर यांना मिळाला असता.

गुंजीकर, रामचंद्र भिकाजी—(जन्म स. १८४३ एप्रिल ३०–मृत्यु स. १९०१ जून १८) मराठी भाषेतील सुप्रसिद्ध ग्रंथकार व लेखक.

गुंजी (परगणा खानापूर, जि. बेळगांव) या गांवावरून यांना गुंजीकर म्हणूं लागले. वास्तविक यांचें उपनांव केंकरे. यांचा जन्म जांबोटी गांवीं व तेथेंच यांचें प्राथमिक शिक्षण झालें. पुढें इंग्रजी शिक्षणाकरितां हे बेळगांवीं गेले. तेथें इंग्रजी सहावीपर्यंत शिक्षण घेऊन पुढील शिक्षणाकरितां हे मुंबईस रवाना झाले व तेथें मॅट्रिक झाले (१८६४). एल्फिन्स्टन कॉलेजांत नांव घालून स्वावलंबनानें यांनीं अभ्यास सुरू केला. पण यांना कॉलेजशिक्षण अर्धवट सोडावें लागलें (१८६६ अखेर). पुढें एल्फिन्स्टन हायस्कूलांत शिक्षक, हुबळीस हेडमास्तर व असिस्टंट डेप्युटी एज्यु. इन्स्पेक्टरच्या जागेवरून हे सेवानिवृत्त झाले (१८९८). तीस वर्षांच्या नोकरींत यांनीं २० वर्षें मुंबईसच काढलीं.

मुंबईस असतां प्रथम हे 'मित्रोदय' पत्रांत लिहीत. पुढें यांनीं स्वतःच्याच संपादकत्वाखालीं 'विविधज्ञानविस्तार' हें मासिक सुरू केलें (१८६७). हे सरकारी नोकर असल्यानें यांचें नांव संपादक म्हणून त्यावर दिलें नसलें तरी पहिलीं सात वर्षें संपादनकार्य हेच करीत. पुढेंहि त्या मासिकावर संपादक म्हणून कोणाचें नांव घालीत नसत. निबंधमालेच्या पहिल्या अंकांत या विविधज्ञानविस्तारावर गौरवपर लिहिलें आहे.

तसेंच स्वधर्म, स्वभाषा व स्वसंस्कृति यांच्यावर खिस्ती व सुधारक यांचे होणारे हल्ले सडेतोडपणें परतविणारें 'दंभहारक' मासिकहि काढण्यास यांचें नेतृत्व कारण होतें (पहिला अंक १० आक्टो. १८७१–१८७५).

मुंबई विद्याखात्यानें केलेल्या शुद्धलेखनाचे नियमांविरुद्ध यांचा अभिप्राय असल्यानें विविधज्ञानविस्ताराचा सरकारी आश्रय बंद झाला. आणि यांना त्या मासिकाशीं असलेला संबंध सोडावा लागला (१८७५ जाने). यांच्यानंतर यांच्याइतक्याच तत्परतेनें हरि महादेव पंडित हे वि. ज्ञा. विस्ताराचें काम पाहूं लागले.

यांना बंगाली व कानडी याहि दोन भाषा चांगल्या येत असत.

यांचे ग्रंथ—१ मोचनगड-मराठींतील पहिली ऐतिहासिक कादंबरी (१८७१), २ गोदावरी (अपूर्ण), ३ अभिज्ञानशाकुन्तल (भाषान्तर १८७०), ४ रोमकेतुविजया (रोमियो आणि ज्युलिएटचें रूपान्तर १८६९), ५ विद्यावृद्धीच्या कामीं आजची अनास्था (व्याख्यान), ६ सरस्वती-मंडळ (१८८४), ७ भ्रमनिरास, ८ सौभाग्यरत्नमाला, ९ कौमुदीमहोत्साह (रा. का. पां. परब यांचे सहकार्यानें त्रैमासिक वैय्याकरण सिद्धान्तकौमुदीचें सटीप भाषान्तर–१८७५ सुरू. अपूर्ण), १० रामचंद्रिका (विस्तृत धातुरूपावलि), ११ सुबोधचंद्रिका (भगवद्गीता, टीका १८८८), १२ कन्नडपरिचय (१८९५), १३ लाघवी लिपि किंवा अति त्वरेनें लिहिण्याची युक्ति (१८७४).

याशिवाय गणित, ज्योतिष, आरोग्य, कालनिर्णय, नीति, इतिहास वगैरे विषयांवरील अनेक निबंध, पुस्तकपरीक्षणें व इतर विषयांवर यांचे लहानमोठे ८९ लेखांची यादी, यांच्या भाषा, व्याकरण, लिपि वगैरेवरील अनेक संकलित लेखांच्या आरंभी दिलेली आढळते.

गोकाक, विनायकराव कृष्णराव—(जन्म स. १९०८) इंग्रजी भाषेचे सुप्रसिद्ध प्राध्यापक व लेखक आणि कानडी भाषेतील उत्कृष्ट कादंबरीकार, कवि व टीकाकार.

यांचा जन्म सावनूर (जि. धारवाड) येथें झाला व तेथेंच यांचें हायस्कूलमधील शिक्षण झाल. नंतर धारवाडच्या कर्नाटक कॉलेजांत यांनीं प्रवेश केला. नंतर हे एलिस पारितोषिक घेऊन पहिल्या वर्गात बी. ए. झाले (१९२९) व एम्. ए. झाले (१९३१). इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, अस्खलित वक्तृत्व आणि परिणामकारक अध्यापन व या गोष्टींबरोबरच गोड स्वभावानें यांनीं विद्यार्थ्यांचीं मनें भारून टाकलीं असल्यास नवल नाहीं.

अशा माणसाला अधिक ज्ञान मिळविण्याकरितां डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें इंग्लंडला पाठविण्याचें ठरवावें ही गोष्ट अपेक्षितच होती. ऑक्सफर्ड येथें जाऊन इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास दोन वर्षेपर्यंत यांनीं जीझस कॉलेजमध्यें केला (स. १९३६-३८) आणि

बी. ए.च्या परीक्षेंत पहिल्या पांचांत यांचा क्रमांक आला.

परदेशांतून या देशांत आल्यावर सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्यें हे प्रथम प्राध्यापक म्हणून आणि नंतर प्रिन्सिपल म्हणून काम करीत होते. यांच्या विशेष योग्यतेमुळें सांगलीचें ऑक्सफर्ड झालें होतें. पण शेवटीं यांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या आजन्म सभासदत्वाचा त्याग केला आणि यांच्या लाभाला तेथील विद्यार्थी मुकले. यांच्या जागेवर आलेले प्रि. पंडित यांनीं यांच्यासंबंधीं प्रथम काढलेले उद्गार ध्यानीं घेण्यासारखे आहेत. प्रि. पंडित म्हणाले, 'प्रि. गोकाक हे प्रि. आगरकर, ना. गोखले, रँ. परांजपे यांच्या परंपरेंत शोभणारे प्रिन्सिपल होते. त्यांची जागा सहज भरून निघणें अशक्य आहे.' यावरून यांची योग्यता स्पष्ट होते.

सध्यां हे धारवाडच्या कर्नाटक कॉलेजमध्यें इंग्रजीचे प्रोफेसर आहेत.

विद्यार्थि-दशेंतच यांचें कानडी भाषेकडे लक्ष वेधलेलें होतें. त्या भाषेंत यांच्या लेखनाचा चांगलाच प्रभाव पडूं लागला होता. पुढें पुढें तर उत्कृष्ट कवि, टीकाकार व नाटककार म्हणून यांचा लौकिक झालेला आहे. कानडी भाषेला पुरोगामी वळण लावण्याच्या कामीं यांच्या साहित्यसेवेचा फार उपयोग झालेला आहे.

कानडीप्रमाणें इंग्रजींतहि हे कविता करतात. यांनीं नाटकें लिहिलीं आहेत आणि इतर लेखनहि हे करीत असतात. तेंहि अत्यंत श्रेष्ठ प्रतीचें असतें, असें तज्ज्ञांचें मत आहे.

गोखले, कृष्णाजी केशव—(मृत्यु स. १९२७) मराठींतील कथालेखक, जत संस्थानचे न्यायमूर्ति व दिवाण.

स्त्रीशिक्षणाचे हे पुरस्कर्ते होते. यांचे लेखनांतहि त्याचें प्रतिबिंब दिसतें. यांनीं सुमारें पाऊणशें गोष्टी लिहिल्या. इंग्रजी कथांचें बेमालूम रूपान्तर करण्याची यांची हातोटी चांगली होती. सध्यांच्या लघुकथांपेक्षां यांच्या गोष्टी त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें रहस्यप्रधान होत्या. लोकांना विचार करावयास लावण्यापेक्षां करमणूक करण्याकडे त्या वेळीं वाङ्मयाचा कल असे.

यांचें वाङ्मय—१ आजपासून पन्नास वर्षांनीं (आंग्ल कादंबरी-लेखिका जेन ऑस्टेनच्या प्राइड अँड प्रेज्युडिसचें रूपान्तर), २ तिलोत्तमा (गायनाची लोकप्रियता वाढविण्याकरितां), ३ एकत्र कीं विभक्त (एकत्र कुटुंबपद्धतींतील दोष दाखविणारी कादंबरी १९२०), ४ हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा (मनोरंजन-लेखमाला), ५ खूप केलीत सूनबाई व इतर गोष्टी, ६ मूर्तिमन्त गुलामगिरी (नवयुग मासिकांत प्रसिद्ध झालेली).

गोखले, गंगाधर नीळकंठ—(जन्म स. १८८७) थिऑसॉफिकल सोसायटीचे हिंदुस्थानांतील एक प्रमुख कार्यकर्ते व स्थापत्यविशारद.

यांचें मूळ ठिकाण मिरज. यांचे आईबाप लहानपणींच निवर्तले. वडील असिस्टंट एंजिनियरचे हुद्यापर्यंत चढले होते. यांचें शिक्षण सातारा व पुणें येथें झालें. पुण्याचे सायन्स कॉलेजांतून पदार्थविज्ञान व रसायन हे विषय घेऊन स. १९०६ मध्यें बी. एससी. झाले. त्याच कॉलेजांतून १९०९ सालीं एल. सी. ई.चे परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिले आले. शिवाय मुंबई युनिव्हर्सिटीकडून एक सुवर्णपदक, एक शिष्यवृत्ति व दोन पारितोषिकें मिळालीं. यामुळें या वेळचे सरकारी नियमाप्रमाणें यांना मुंबई इलाख्याचे पब्लिक वर्क्स खात्यांत एकदम असिस्टंट एंजिनिअरची जागा मिळाली. त्या खात्यांत यांची नोकरी धारवाड, नीरा कॅनाल व सिंध प्रांतांत झाली. या खात्यांत यांनीं १९१० ते १९२३ पर्यंत नोकरी केली. अखेरचीं कित्येक वर्षे हे एक्झिक्युटिव्ह एंजिनिअरचे हुद्यावर होते. यांचेच कारकीर्दींत लॉइड बराज या जगांतील एक प्रचंड म्हणून प्रसिद्ध असलेल्या सक्करच्या धरणाचें काम सुरू झालें. त्या योजनेंत यांचा चांगलाच हात होता. पुढें १९२४ सालांत कराचीस नादिरशा-दिनशा एंजिनिअरिंग कॉलेज निघालें, तेव्हां त्या कॉलेजचे पहिले प्रिन्सिपल म्हणून यांची नेमणूक झाली. तें काम यांनीं १९२३ ते १९३५ पर्यंत केलें. मध्यंतरीं १९१८ मध्यें हे इंडियन डिफेन्स फोर्समध्यें दाखल होऊन कराचीच्या ११ व्या विभागाचे १९२९ ते १९३५ पर्यंत सेकंड लेफ्टनंट कमांडिंग ऑफिसर होते. त्याचप्रमाणें हे डिस्ट्रिक्ट स्कॉउट कमिशनर होते. एंजिनिअरिंग कॉलेजाची भरभराट यांचे कारकीर्दींत झपाट्यानें झाली. कॉलेज सुरू झाल्यापासून पांचवे वर्षींच यांचा एक विद्यार्थी युनिव्हर्सिटीचे अखेरचे परीक्षेंत यांचेप्रमाणेंच पहिल्या वर्गांत पहिला आला. पुढेंहि हा मान यांच्या आणखी दोन विद्यार्थ्यांना मिळाला. याप्रमाणें यांचें अध्यापनकार्य अत्यंत यशस्वी व वरिष्ठ प्रतीचें असून हे विद्यार्थिवर्गांत अत्यंत लोकप्रिय असत. सन १९२७ सालीं हे

एकदां इंग्लंडचो सफर करून आले. तेथून आल्यावर यांनीं आपला पोषाख पार बदलून टाकला. धोतराचा काचा, अंगांत एक स्वच्छ पांढरा सदरा व वरून ऋतुमानाप्रमाणें खाकेखालून एक शुभ्र साधें उपरणें अगर शाल, पायांत पुणेरी जोडा व डोकें शिरस्त्राणहीन. हाच पोषाख अजून यांचा कायम आहे. कराचीस असतांना आठवड्यांतून एकदां धर्मप्रवचन, एक दिवस गोरगरीबांच्या झोपड्यांत जाऊन त्यांना औषधपाणी देणें अगर धान्य वगैरे वांटणें असा यांचा कार्यक्रम असे. कराचीच्या श्रीशिवाजी हायस्कूल, मित्रमंडळ, ब्राह्मणसभा, सिंध असोसिएशन वगैरे हरएक संस्थांस यांचें भक्कम साहाय्य व आधार असे.

स. १९३५ सालीं यांनीं कराची सोडली तेव्हां तेथील 'सिंध-मराठा' या साप्ताहिकानें 'गोखले विशेषांक' काढला. त्यांत यांच्या अनेक स्नेह्यांनीं यांच्या गौरवपर लेख लिहिले. सरकारी नोकरींत असतांहि यांनीं आपल्या निर्लोभी, निःस्पृह, धीट व सरळ वर्तनानें वरिष्ठांवरहि छाप ठेविली. तरुण वयांत सर्व हितचिंतकांच्या उपदेशाविरुद्ध सेवानिवृत्ति पत्करिली आणि उर्वरित आयुष्य थिऑसॉफीच्या सेवेमध्यें घालविण्याचा संकल्प करून हे अड्यार तेथें दाखल झाले (१९३५). त्याच सालीं हिंदी शाखेचे जनरल सेक्रेटरी म्हणून यांची नेमणूक झाली आणि १९४४ अखेरपर्यंत यांनीं तें काम केलें. काम करीत असतां अनेक जुनाट प्रश्नांचा निकाल केला. तसेंच बनारस येथील सोसायटीच्या इमारतींची सुधारणा करून येथें सौंदर्याचें व शांतीचें वातावरण उत्पन्न केलें. सामुदायिक पूजेकरितां 'ज्योतिरालय' स्थापून भिंतीवर मानवाच्या उत्क्रांतीवर प्रकाश पाडणारीं चित्रें, सभागृहांत कुबेर, अग्नि, वरुण व वायु यांचीं चित्रें, खुल्या मैदानांत हिंदुस्थानचें शुभ्र मानचित्र, हिमालयावर भगवान् दक्षिणामूर्ति व त्यांचे दोन शिष्य व दुसऱ्या बाजूवर अढळपद मिळविणाऱ्या ध्रुवबाळाची मूर्ति स्थापिली.

यांनीं युरोपकडे १९२७ व १९३५ सालीं (सहकुटुंब) प्रवास करून तेथील स्थितीचें निरीक्षण केलें.

यांचे ग्रंथः—

1. Practical Education, 2. Seientific Religion, 3. Europe in Summer of 1935, 4. Indian Theosophist, 5. Arts and Science Courses, 6. Engineering Courses, 7. Technical and Industrial Education = Educational Magna Charta.

गोखले, नामदार गोपाळ कृष्ण— (जन्म स. १८६३ मे ९–मृत्यु स. १९१५ फेब्रु. १९) हिंदुस्थानचे सुप्रसिद्ध राजकारणी पुढारी, इंग्रजी भाषेंतील जगप्रसिद्ध वक्ते व सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी या संस्थेचे संस्थापक.

यांचा जन्म चिपळूण तालुक्यांत ताम्हणमळा येथें झाला. प्रथम कोल्हापूर येथें शिक्षण घेऊन मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजांतून हे बी. ए. झाले (१८८४). तेव्हांपासून १९०२ पर्यंत हे डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद व फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्राध्यापक होते. तेथें हे गणित, इंग्रजी, अर्थशास्त्र व इतिहास हे विषय शिकवीत. १८८७ मध्यें हे पुणें सार्वजनिक सभेचे चिटणीस, १८८८ मध्यें सुधारक या इंग्रजी-मराठी साप्ताहिकाचे संपादक झाले. त्यांत हे विशेषतः इंग्रजी विभागांत लिहीत. लो. टिळक व हे १८८९ सालीं पहिल्यानें राष्ट्रसभेंत प्रविष्ट झाले.

१८९४ सालीं सरकारनें उघडपणें सांगितलें कीं, 'सर्व वरिष्ठ जागा नेहमींच युरोपियनांना मिळाल्या पाहिजेत.' यावर यांनीं कडक टीका केली व सरकारवर वचनभंगाचा आरोप केला. स. १८५८ चा जाहीरनामा अगदीं खऱ्या अर्थानें घ्यावयाचा नाहीं, असें सर जेम्स फिट्झ जेम्स स्टीफन यांच्यासारख्या इंग्लिश जज्जाचें म्हणणें असेल तर आतांपर्यंत दिलेलीं सगळीं वचनें कागदाच्या चिटोऱ्यांप्रमाणें कचऱ्याच्या पेटींत टाकण्याच्या योग्यतेचीं आहेत असें म्हणावें लागेल, असे निराशेचे उद्गार यांनीं काढले. रयतेच्या कळकळीनें राज्यकारभारावरील खर्च कमी करून त्यांच्यावरील कराचा बोजा कमी करावा म्हणून हे शुद्ध गणिती पद्धतीनें विचार मांडीत.

१८९५ सालीं पुणें येथें भरणाऱ्या राष्ट्रसभेचे हे स्थानिक चिटणीस होते, व १९०४ सालीं राष्ट्रसभेचे हे जोड-चिटणीस होते.

१८९७ सालीं हे पुण्याच्या डेक्कन सभेचे प्रतिनिधि म्हणून हिंदुस्थानच्या जमाखर्चाची तपासणी करण्याकरितां नेमलेल्या वेल्बी कमिशनपुढें साक्ष देण्याकरितां इंग्लंडला जाण्याकरितां निघाले. उमरावती काँग्रेसमध्यें यांना निरोप देण्याचा थाटाचा समारंभ झाला. साक्षी देणारांत सुरेंद्रनाथ बानर्जी, दादाभाई नवरोजी वगैरे लोक होते. तेथें यांनीं उत्तम प्रकारें साक्ष देऊन उत्तम लौकिक संपादन केला.

प्लेगच्या धामधुमींत लष्करांतील शिपायांनीं पुण्यांतील स्त्रीपुरुषांवर अनन्वित अत्याचार केल्याचीं यांना इंग्लंडमध्यें अनेक मित्रांचीं पत्रें गेलीं. पत्रें लिहिणारांनीं आपलीं नांवें बाहेर न फोडण्याची यांना विनंति केली होती. त्या पत्रांच्या आधारें यांनीं लंडन मँचेस्टर गार्डियनमध्यें तशीं विधानें केलीं. पण तीं विधानें सिद्ध करण्याकरितां यांना मिळालेली खासगी माहिती प्रगट करणें विश्वासघाताचें वाटलें. शिवाय खासगी मिळालेली माहिती खरी असली तरी तिच्याशीं अनेक स्त्रीपुरुषांच्या बेअब्रूचा संबंध होता. म्हणून यांनीं ती माहिती प्रगट करण्यापेक्षां विधानें परत घेऊन माफी मागण्याचा प्रतिष्ठित मार्ग पत्करिला. त्यामुळें हे विवेचक लोकांच्या आदरासच पात्र झाले (१८९८).

१९०० मध्यें मुंबई प्रांतिक कौन्सिलमध्यें गेल्यावर लँड रेव्हेन्यूसंबंधींच्या सरकारी धोरणावर यांनीं कडक टीका केली.

१९०२ पासून पुढें अखेरपर्यंत हे वरिष्ठ कायदेमंडळांत काम पाहत असत. त्या कायदे-मंडळांतीलहि अंदाजपत्रकांवरील यांचीं भाषणें माहितीपूर्ण, परिणामकारक, कळकळीचीं आणि विद्वत्ताप्रचुर असत.

१९०४ सालीं यांना ब्रिटिश सरकारनें सी. आय. ई. ही पदवी देऊन यांचा गौरव केला.

पुढें हे इंग्लंडला गेले ते बनारस काँग्रेसपूर्वी तेथील अध्यक्षपद स्वीकारण्यास परत आले.

लॉर्ड कर्झन यांचे कारकीर्दीत अंदाजपत्रकांत कृत्रिम रीतीनें दाखविलेली शिल्लक हा यांचा कौन्सिलांतील धिःकाराचा विषय होता. ही कृत्रिम शिल्लक हुंडणावळींतील हातचलाखीमुळें दिसे. ' चलनी नाण्याचें धोरण तरी निर्दोष करा किंवा कर तरी कमी करा ' असें हे बजावीत. मिठाच्या करावर बोलतांना तीन पै किंमतीच्या मिठाच्या टोपलीस पांच आणे कसे पडूं लागले हें यांनीं सप्रमाण दाखविलें. पब्लिक सर्व्हिस कमिशन व स्टेट सेक्रेटरीचे हुकूम यांबाबत यांचीं भाषणें माहितीपूर्ण असत.

आदर्श शिस्तीला धरून वागणारे नेमस्त म्हणूनच यांची ख्याति होती. पण यांच्या थंड वृत्तीमुद्धां कधींकधीं अनावर होत. लॉर्ड कर्झन यांचें दडपशाहीचें धोरण, बंगालची फाळणी, कलकत्ता कॉर्पोरेशनच्या हक्कांवर गदा, युनिव्हर्सिटी कायद्यांत सुधारणा व महाग शिक्षण हीं कृत्यें पाहून यांचेंहि मन फार क्षुब्ध होई. व हे प्रकटपणें म्हणत, ' जनतेच्या हिताच्या दृष्टीनें नोकरशाहीशीं सहकार्य करण्याच्या वृत्तीला रामराम ठोकावा लागेल, ' ' अलीकडे बंगालमध्यें जे महापूर आले त्यांमुळें कांठावर इकडे तिकडे पाणी जाणें साहजिक आहे. ज्या वेळीं प्रचंड जनसमुदाय जागा होऊन गुलामगिरीच्या नाशाकरितां व स्वातंत्र्याच्या संपादनाकरितां स्वयंस्फूर्तीनें चळवळ करूं लागतो, त्या वेळीं कांहीं किरकोळ अतिरेकाच्या गोष्टी होणें अपरिहार्य असतें, ' ' अगदीं अखेरचा उपाय म्हणून व लोकांचें भक्कम पाठबळ असेल तर बहिष्कार शस्त्राचा उपयोग करण्यास हरकत नाहीं ' (१९०५ बनारस), ' पांच खेड्यांपैकीं चार खेड्यांतून शाळा नाहींत व आठ मुलांपैकीं सात मुलें अज्ञानांतच लहानचीं मोठीं होत आहेत.' साक्षरतेचें प्रमाण शेंकडा बारा आहे असें म्हणण्यापेक्षां वरील मांडणी अधिक परिणामकारक व स्पष्ट आहे.

बनारस राष्ट्रसभेचे अध्यक्ष असतां लॉर्ड लिटनचें एक पत्र यांनीं उघडकीस आणलें. त्यांत ' ह्या मागण्या व आकांक्षा कधीं पुऱ्या होऊं शकणार नाहींत व होणारहि नाहींत हें आपण जाणतों ' इत्यादि मजकूर होता.

' सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी ' म्हणजे भारतसेवक-समाजाची स्थापना ही यांची एक अत्यंत महत्त्वाची कामगिरी आहे (१९०५). अशी संस्था स्थापण्याची कल्पना यांच्या मनांत १८९७ सालापासून होती. वेल्बी कमिशनपुढें साक्ष देण्याकरितां हे इंग्लंडला गेले असतां, यांनीं तेथें असलेल्या डॉ. र. पु. परांजपे यांच्याशीं तेथें अशी संस्था स्थापन करण्याबद्दल वाटाघाट केली होती. जून १२, १९०५ रोजीं ही संस्था स्थापण्यांत आली. यांच्याशिवाय आरंभीं गो. कृ. देवधर, न. अ. द्रविड व अनंत विनायक पटवर्धन हे तीन सभासद होते. संस्थेचा आरंभ शिवराम हरि साठे यांच्या हस्तें करण्यांत आला.

या संस्थेचे पुढील सहा उद्देश आहेत—(१) स्वतःच्या उदाहरणानें व उपदेशानें देशांत उत्कट देशभक्ति जागृत करणें. (२) सर्वसाधारण जनतेच्या प्रश्नांचा विचार करून त्यांना राजकीय शिक्षण देणाऱ्या चळवळी आरंभणें. (३) जातीजातींत सहकार्य व सलोखा वाढविणें. (४) शैक्षणिक चळवळींना—विशेषतः स्त्रीशिक्षण, मागासलेल्यांचें शिक्षण, तसेंच औद्योगिक व शास्त्रीय शिक्षण यांस मदत

करणें. (५) देशांतील उद्योगधंद्यांचे वाढीस मदत करणें. (६) मागासलेल्या लोकांच्या उन्नत्यर्थ प्रयत्न करणें.

ब्रिटिशांचा हिंदुस्थानशीं आलेला संबंध दैवी योजनेमुळें आला असून त्यांच्यापासून घटनात्मक पद्धतीचा आपणांस लाभ मिळवावयाचा आहे; तसा लाभ मिळविण्याकरितां जातीय, प्रांतिक व धार्मिक दृष्टीपासून पूर्ण अलिप्त असणारे पण सतत देशसेवा करीत राहणारे राष्ट्रीय मिशनरी निर्माण झाले पाहिजेत, अशा लोकांनीं देशाच्या कार्यापुढें सर्व वैयक्तिक स्वार्थ तुच्छ मानून धर्मबुद्धीनें अखंड राजकारण करणें आवश्यक आहे, उपजीविकेचा दुसरा कोणताहि उद्योग न करितां आपली सर्व शक्ति देशाच्या कामीं खर्ची घालणारे लोकच फक्त असें कांहीतरी कार्य करूं शकतील, निदान पांच वर्षेपर्यंत एकादें सार्वजनिक विधायक कार्य केल्याशिवाय या संस्थेंत प्रवेश मिळणार नाहीं, अशा यांनीं आंखून दिलेल्या धोरणानें आतांपर्यंत ही संस्था चालत आहे.

पुणें हें या संस्थेचें मुख्य केंद्र असून मद्रास, मुंबई, नागपूर, अलाहाबाद येथें हिच्या शाखा आहेत. लाहोर व कटक येथें कार्याचीं केन्द्रें आहेत. यांच्यानंतर ना. श्रीनिवासशास्त्री, कै. गो. कृ. देवधर हे अध्यक्ष होते. आतां पं. हृदयनाथ कुंझरू हे अध्यक्ष, अमृतलाल ठक्कर, श्री. ग. वझे, नटेश अप्पाजी द्रविड, आर. सूर्यनारायणराव व आर. आर. बखले हे या संस्थेंतील प्रमुख कार्यकर्ते आहेत.

सुरतेच्या फुटीनंतर राष्ट्रसभेच्या चळवळींत यांनीं विशेष पुढाकार घेतला. द. आफ्रिकेला यांनीं भेट दिली व म. गांधींच्या सत्याग्रहाच्या चळवळीस यांनीं मोठी मदत केली. स. १९०९ च्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनांत सत्याग्रहाच्या पंथाबद्दल यांनीं आनंद व्यक्त केला व त्या पंथाच्या तत्त्वज्ञानाबद्दल यांनीं स्पष्टीकरण केलें. वरिष्ठ कायदेमंडळांतील यांचें काम अधिक प्रमाणांत चालू होतेंच. १९१४ सालीं राष्ट्रसभेंतील दोन पक्षांत एकीकरण करण्याचा प्रयत्न झाला. या एकीकरणाबाबत प्रथम हे अनुकूल होते. पण पुढें तें फलदायी होईल असें यांना वाटेनासें झालें.

यांचें सार्वजनिक जीवन निष्ठामय व त्यागपूर्ण होतें. अत्यंत कठोर गोष्टी सौम्य शब्दांत पण आधारासह मांडण्याची हातोटी यांना फार चांगली साधली होती. हे टीका करीत असतां गोड भाषा वापरीत असले तरी हे शिष्टाईचा आव आणून गुळमुळीत धोरण स्वीकारीत नसत.

लोकांच्या वतीनें राजदरबारीं राज्यकर्त्यांना विरोध करूनहि सरकारमान्यता कायम ठेवण्याचा मान यांनींच प्रथम मिळविला. हे आपणांस न्या. महादेव गोविंद रानडे यांचे शिष्य म्हणवीत, आणि त्यांच्या नेतृत्वावर यांची अत्यंत श्रद्धा असे. सरकारविरोधी भडक चळवळीपुढें विधायक पद्धतीनें सतत काम करीत राहण्याचा यांचा सोज्वल मार्ग बहुजनसमाजाला तितकासा आकर्षक वाटला नाहीं, यामुळें लोकमान्यता न लाभतां लोकविरोधालाच यांना बळी पडावें लागलें. यांनीं आंखून दिलेल्या मार्गानें देशसेवा करणारा एक मोठा वर्ग आहे. आणि म. गांधींसारखे लोकोत्तर पुरुष यांचेच शिष्य म्हणवून घेण्यांत अभिमान मानतात. त्याग आणि विधायक कार्य यांच्या पायावर उभारलेल्या यांच्या निःस्वार्थ देशसेवेबद्दल कोणालाहि आदरच व्यक्त करावा लागेल.

यांचे ग्रंथ—१ शालेय-अंकगणित, मराठी व इंग्रजी भाग १-३. २ Speeches (मद्रासच्या नटेसन कंपनीनें प्रसिद्ध केलेलीं).

गोखले, रामचंद्र जनार्दन—(जन्म स.१८७५) गूढचिकित्साभंडळाचे संस्थापक व चालक.

यांचा जन्म सातारा जिल्ह्यांत दहिवडी येथें झाला. सातारा व पुणें येथें शिक्षण होऊन हे बी. ए. झाले (१८९८) व ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिक्षकाची नोकरी केली.

अज्ञानाच्या मुळाशीं सूक्ष्मावलोकनाचा व चिकित्सेचा अभाव असतो. अंधश्रद्धेमुळें गूढ उकलण्याची माणसाला बुद्धिच होत नाहीं. गूढ चमत्कार व भ्रम यांचें संशोधन करून त्यांतील सत्य प्रगट केल्यास लोकांची चिकित्साबुद्धि व शोधक वृत्ति वाढेल आणि त्यामुळें अज्ञान व अंधश्रद्धा कमी होईल. या हेतूनीं यांनीं गूढचिकित्सामंडळ ही संस्था काढली (१९३३).

आजपर्यंत या मंडळानें संशोधनपूर्वक निर्णीत केलेल्या गोष्टी—१ सर्पविषावर रामबाण उपाय म्हणून मानलेल्या सुमारें ७५ वनस्पति व २० मान्त्रिक उपाय यांचें मुंबईच्या हाफ्किन्स इन्स्टिट्यूटमध्यें डॉ. के. एस्. म्हसकर यांनीं केलेल्या प्रयोगांवरून वैयर्थ्य.

२. सर्पभक्षक प्रो. राव यांचेजवळील सर्पविषावरील उपायांची निरुपयोगिता.

३. सर्पाचें श्रवणेन्द्रिय तीक्ष्ण तर नाहींच, पण त्यास संगीत वा मधुर स्वर यांची आवड नाहीं, याची प्रयोगानें सिद्धि.

४. सर्पमणि व त्याचे गुण यांविषयीं लोकभ्रमाची निवृत्ति.

५. भुताटकीच्या बहुतेक चमत्कारांची अविश्वसनीयता.

६. विस्तवावरून चालत जाण्यास मंत्रतंत्राची मुळींच जरूरी नाहीं. अनवाणी चालणाऱ्या कोणाहि माणसास तळव्याच्या जाडपणामुळें ३-४ पावलें विस्तवावरून चालत जातां येतें.

७. फलज्योतिषाचें अशास्त्रीयत्व.

८. भोलानाथ नंदीचें अतींद्रिय ज्ञान सत्य नाहीं. त्याचें विशिष्ट माणसाजवळ किंवा वस्तूजवळ जाऊन थांबणें हें शिकविलेल्या खुणांवर अवलंबून आहे.

९. पौर्णिमा व अमावास्या या दिवशीं रोग, विशेषतः मानसिक रोग, वाढतो किंवा मृत्यु जास्त होतात, अशी समजूत आहे. पण यास प्रत्यक्ष अनुभवाचा आधार मुळींच नाहीं. हे दिवस व अन्य दिवस यांत या दृष्टीनें फरक आढळून येत नाहीं. ही गोष्ट यांनीं पुणें-मुंबईचे मृत्यूचे आंकडे व वेड्याच्या इस्पितळांतील मुख्य डॉक्टरांचा अनुभव मागवून त्यांवरून सिद्ध करून दाखविली.

यांचे ग्रंथ—१ लोकभ्रम, २ फलज्योतिषचिकित्सा, ३ व्यायामशास्त्र, ४ पुरुषार्थाचें मूळ, ५ आरोग्यदीप, शिवाय भूमिति व भूगोल विषयांवरील अनेक शालेय पुस्तकें.

गोखले, शंकर लक्ष्मण—(जन्म स. १८६९) अमेरिकेंत स्थायिक झालेले सुप्रसिद्ध हिन्दी विज्ञानाचार्य व संशोधक.

यांचा जन्म वाई येथें अत्यंत गरीब भिक्षुक ब्राह्मणाच्या घराण्यांत झाला. यांच्या वडिलांचें नांव लक्ष्मण विठ्ठल गोखले. लहानपणीं आई-वडील वारल्यानें यांचे आप्त गं. ब. गोखले यांनीं यांचें पालनपोषण केलें. हे बी. ए. नागपूरच्या स्कॉटिश मिशनच्या कॉलेजमधून व केमिस्ट्री घेऊन हे एम्. ए. झाले. १८९८ सालीं यांनीं इंदूरच्या होळकर कॉलेजांत प्राध्यापकाची जागा स्वीकारली. तेथें अध्यापनाबरोबर यांचें अध्ययनहि चालू होतें. त्यामुळें १९०५ सालीं हे फिजिक्स हा विषय घेऊन पुनः एम्. ए. झाले. कॉलेजांत हे फिजिक्स व केमिस्ट्री हे दोन्ही विषय शिकवूं लागले.

पण या आपल्या आवडत्या विषयांचें अधिक ज्ञान मिळविण्याकरितां हे १९११ सालीं अमेरिकेला रवाना झाले. तेथें गेल्यानंतर यांची योग्यता लक्षांत घेऊन सुप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठांत प्रयोगशाळेंतील दुय्यम म्हणून यांची नेमणूक झाली. या प्रयोगशाळेंत यांनीं High Pressures वर संशोधन सुरू केलें. हें यांचें संशोधन इतकें समाधानकारक झालें कीं, तेथील सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. चार्लस व पी. स्टीनमेझ यांनीं यांची खास शिफारस करून G. E. C. मध्यें यांना जागा मिळवून दिली. त्या ठिकाणीं जनरल इलेक्ट्रिक कंपनीच्या एंजिनिअरिंग लेबोरेटरीचे प्रमुख डॉ. लुई व पी. रॉबिन्सन यांचे हाताखालीं काम करण्याची संधि यांना मिळाली. या ठिकाणीं हे आठ वर्षें होते. या अवधींत यांनीं कितीतरी शास्त्रीय प्रबंध लिहिले, प्रयोगसाधनें तयार केलीं व लोहचुंबकीय परिमाणें (Magnetic Measurements) निश्चित केलीं. १९२० च्या डिसेंबरांत हे परत हिंदुस्थानांत आले, व ज्या ठिकाणीं हे प्राध्यापक होते त्याच इंदूरच्या होळकर कॉलेजांत प्रिंसिपल झाले. परंतु १९२२ मध्यें परत हे अमेरिकेला गेले.

अमेरिकेंत जाण्यापूर्वी कांहीं दिवस इंग्लंडमध्यें ग्लासगो येथील बावर्ड व टॅटलॉक यांच्या लॅबोरेटरींत काम करीत असतां व्होल्टेजचें त्वरित मापन करण्याकरितां यांनीं पोटेन्टिओ मीटर तयार केला. अमेरिकेंत गेले तेव्हां G. E. C. मधील यांची जागा राखून ठेवली होतीच. त्या ठिकाणीं हे १९३३ अखेर होते. पुढें हे सेवानिवृत्त झाले. रिसर्च एंजिनियर फॉर मॅग्नेटिक्स हा यांचा तेथील हुद्दा होता. तेथील यांचें मुख्य संशोधन चुंबनप्रक्रिये (Magnetization) बद्दल आहे. हें संशोधन यांनीं १९१३ मध्यें सुरू केलें आणि १९२३ मध्यें पूर्ण केलें.

स. १९१३ च्याहि पूर्वी ५० वर्षें अनेक संशोधकांनीं याबद्दल प्रयत्न केला होता. चुंबकाची शक्ति व सिद्ध चुंबन (Magnetization Produced) यांमधील संबंध निश्चित करण्याचे प्रयत्न अनेक संशोधकांनीं केले. जर्मन शास्त्रज्ञ डॉ. फ्रालीश (१८८२), बोंझा क्वेट व डॉ. स्टिनमेझ व केनेली (१८९९) या तिघांचे सिद्धान्त अनुक्रमें बरोबर समजण्यांत येत. पण यांनीं या तिघांच्या संशोधनांतील मूळ नियमच चुकीचा असल्याचें सिद्ध केलें, आणि नवीन बिनचूक सिद्धान्ताची मांडणी करण्याकरितां प्रयोगांना सुरुवात केली. आटोकाट प्रयत्नानंतर यांचा चुंबनप्रक्रियेसंबंधींचा सिद्धान्त १९२६ च्या सप्टेंबरांत मान्य होऊन प्रसिद्ध करण्यांत आला.

'गोखले लॉ' या नांवानें यांचा हा सिद्धान्त प्रसिद्ध आहे.

केनेलीच्या सिद्धान्ताचें खंडन करण्यास हे उद्युक्त झाले, याचें कारण पुढीलप्रमाणें आहे. चुंबनशक्तीच्या अंतिम मर्यादेचें मोजमाप करण्यांत हे गुंतले होते. त्यासाठीं बनविलेल्या स्वतःच्या प्रयोगसाधनांतून केनेलीच्या सिद्धान्ताशीं विसंगत असे निर्णय यांना मिळूं लागले. पण स्वतःच्या साधनाबद्दल तर यांची खात्री होती. प्रयोगान्तीं यांचा संशय खरा ठरून यांनीं केनेलीचा सिद्धान्त चुकीचा ठरविला.

स. १९२८ मध्यें चुंबनप्रक्रिया व चुंबनशक्ति यांमधील प्रमाणासंबंधाचे सिद्धान्त यांनीं सिद्ध करून दाखविले. हे सिद्धान्त शोधून प्रस्थापित करण्यासाठीं यांनीं उपयोगांत आणलेलें सॅच्युरेशन थर्मामीटर पुढें G. E. C. आपल्या कारखान्यांत वापरूं लागले.

विश्वविद्यालयांत उपयोगी पडेल अशी चुंबकीय आवरणाची (Magnetic Shielding) एक अत्यंत सुलभ रीति शोधल्याबद्दलचें श्रेय, या विषयावरील आपले सिद्धान्त १९२९ सालीं यांनीं प्रसिद्ध केल्यानंतर यांना देण्यांत येऊं लागलें. यांनीं त्याचें पेटंट घेतलें आहे.

यांच्या दीर्घकाल सतत चाललेल्या संशोधनांतून अनेक शाखांत यांनीं नवे सिद्धान्त प्रस्थापित केले आहेत. स्फेरिकल हार्मॉनिक्स या गणितांतील उच्चतर शास्त्रावर यांनीं कांहीं नवे सिद्धान्त बसविले आहेत.

तसेंच हिंदुस्थानच्या प्राचीन वाङ्मयाचा व समाजाचा यांचा व्यासंग गाढ आहे. भगवद्गीता, महाभारतांत व रासक्रीडा, भागवतांत प्रक्षिप्त असल्याचें यांचें संशोधन विचारणीय आहे. औंधच्या पुरुषार्थ व पुण्याच्या सह्याद्रि मासिकांत यांचे व यांच्या पत्नी उमाबाई यांचे लेख प्रसिद्ध होत असतात.

गोगटे, गणेश वामन—(जन्म स. १८७४–मृत्यु स. १९२९) मराठींतील चरित्रकार आणि स्वामी विवेकानंदांच्या समग्र ग्रंथांचे अनुवादक.

रत्नागिरीच्या दक्षिणेस असणाऱ्या गोळप गांवीं यांचा जन्म झाला. हे मॅट्रिक झाल्यावर ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें गेले. पण लवकरच यांना शिक्षणाला रामराम ठोकावा लागला आणि हे व्यापारांत शिरले. पण तो अयशस्वी होऊं लागल्यावर हे राष्ट्रमत, मनोरंजन वगैरे नियतकालिकांत लेख लिहूं लागले. बहुतेक सर्व विषयांत यांच्या लेखणीचा संचार असे. नोकरी करावयाची नाहीं असा यांचा बाणा असल्यानें हे आर्यन वॉच कंपनींत काम करीत. पण अशा कामापेक्षां काव्यशास्त्रविनोदाकडे यांचें लक्ष जास्त असे. त्यामुळें यांच्या लिहिण्यांत बहुश्रुतता आलेली होती. वेदान्त विषयाकडे यांचें लक्ष विशेष असल्यानें यांनीं विवेकानंदांच्या ग्रंथांस मराठी पेहेराव चढविला आणि ते ग्रंथ तेरा खंडांत प्रसिद्ध झाले. ग्रंथांतील अर्थाकडे यांचें लक्ष विशेष असल्यानें यांनीं केलेलें भाषान्तर रसाळ झालें आहे. ग्रंथावर नांव घालावयाचें नाहीं, असा यांचा बाणा असल्यानें यांचे ग्रंथ प्रसिद्ध होऊनहि यांचें नांव अज्ञात राहिलें आहे. यांचे ग्रंथः—१ समग्र विवेकानंद (१–१३ खंड), २ कौंट टॉलस्टॉयचें चरित्र (१–५ खंड), ३ कैसरची प्रभावळ, ४ प्रिन्स बिस्मार्क, ५ ज्ञानदीप (अ. म. वा. से. २२७).

गोगटे, राजाराम विनायक—(जन्म स. १८९५) अमेरिकेंतील United Nations Relief and Rehabilitation Administration,Washingtion या ४४ राष्ट्रांनीं स्थापिलेल्या संस्थेच्या शिष्टमंडळांतील सभासद म्हणून हिंदुस्थानांत आलेले महाराष्ट्रीय गृहस्थ.

हे मूळचे इंदूरचे. यांचें शिक्षण पुणें व मुंबई येथें झालें. वयाच्या २५ व्या वर्षी यांनीं हिंदुस्थान सोडलें. प्रथम जपान येथें जाऊन नंतर अमेरिका, कॅलिफोर्निया, कोलंबिया, हर्बर्ट वगैरे ठिकाणीं जाऊन शिक्षण घेतलें. समाजशास्त्र व तत्त्वज्ञान हे यांचे विषय होते. १९२३ सालीं हे प्राध्यापक झाले. १९२६ च्या सुमारास सॅनफ्रान्सिस्को येथें विश्वविद्यालयीन जागतिक संमेलन भरलें होतें. त्यांत हे भारताचे प्रतिनिधि होते. तिकडील अनेक विश्वविद्यालयांत यांनीं काम केलें आहे. आलगा लँडन या स्त्रीशीं यांचा विवाह झाला आहे. धर्म ही खासगी बाब म्हणून कोणींच धर्मान्तर केलें नाहीं. हे अमेरिकेचे नागरिक झाले आहेत. तेथें ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिस्ट म्हणून युद्ध-कचेरींत हे 'इंडिया डेस्क'चें काम पाहूं लागले. दोन वर्षें काम पाहिल्यावर वरील संस्थेंत भारतीय तज्ज्ञ म्हणून यांची नेमणूक झाली व तेथून हे हिंदुस्थान सरकारनें दिलेल्या आठ कोटि रुपयांच्या देणगीचा विनियोग करण्यासंबंधीं वाटाघाट करण्यासाठीं शिष्टमंडळाबरोबर हिंदुस्थानांत आले.

गोडबोले, कृष्णशास्त्री—(जन्म स. १८३१–मृत्यु स. १८८६) प्रसिद्ध गणित-ज्योतिषशास्त्रज्ञ.

यांचा जन्म वाईचा. हे चित्पावन ब्राह्मण. यांचा अभ्यास मराठी शाळेंत, संस्कृत पाठशाळेंत व पूना संस्कृत कॉलेजांत झाला. यांस लहानपणापासून गणिताचा नाद होता. यांनीं पाठशाळेंत शंकर जोशी यांजपाशीं ज्योतिषशास्त्राचें अध्ययन केलें. पुढें पूना कॉलेजच्या नॉर्मल स्कूलचे हे शिक्षक झाले. त्यांत मुख्यतः हे गणित शिकवीत. पुढें मुंबईच्या वेधशाळेंत, पूना ट्रेनिंग कॉलेजांत, सिंधहैद्राबाद हायस्कूल, कराची हायस्कूल, मुंबई ऍल्फिन्स्टन हायस्कूल वगैरे ठिकाणीं यांनीं कामें केलीं. सिंधप्रांतांत असतां सिंधीचें व फारसीचें यांनीं अध्ययन केलें. स. १८७१–७९ पर्यंत मुंबई विश्वविद्यालयांत हे सिंधी भाषेचे परीक्षकहि असत.

स. १८५६ मध्यें यांनीं व वामन कृष्ण जोशी गद्रे यांनीं मिळून ग्रहलाघवाचें मराठी भाषांतर सोदाहरण करून छापलें. तें बहुतेक विश्वनाथी टीकेचें भाषान्तर आहे. या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापली आहे. यांनीं ग्रहलाघवाची उपपत्तीहि मराठींत लिहिली आहे. तींत मल्लारीटीकेंतील दोष दुरुस्त केले आहेत असें समजतें. ही छापण्याजोगी आहे. याशिवाय स. १८८५ च्या सुमारास लिहिलेला ज्योतिषशास्त्राच्या इतिहासाचा लहानसा लेख शं. बा. दीक्षितांनीं पाहिला होता. स. १८६२ सालीं यांनीं 'ज्योतिःशास्त्र' या नांवाचें मराठी पुस्तक इंग्रजीतील चेंबर्सच्या पुस्तकावरून लिहून छापलें. तें आतां प्रचारांत नाहीं. हॅंडनच्या बीजगणिताचें मराठी भाषान्तर पूर्वी झालें होतें तें स. १८५४ मध्यें दुरुस्त करून यांनीं छापिलें. तें बरींच वर्षें शाळाखात्यांत चालत असे. स. १८७४ मध्यें हे व गोविंद विठ्ठल करकरे या दोघांनीं मिळून मराठींत युक्लिडच्या भूमितीच्या पहिल्या चार पुस्तकांचें भाषान्तर केलें. त्यापूर्वी नानाशास्त्री आपटे यांनीं केलेलें युक्लिडच्या पुस्तकाचें भाषान्तर मराठी शाळांत चालत असे. पुढें स. १८८५ पासून कै. रा. मो. देवकुळे यांचें पुस्तक चालूं लागलें. स. १८८२ मध्यें 'वेदांचें प्राचीनत्व' या नांवाचा एक निबंध यांनीं थिऑसाफिस्ट मासिकांत इंग्रजी लिहिला तो निराळा छापला आहे. 'मासानां मार्गशीर्षोऽहम्' या गीतावाक्यावरून मार्गशीर्षांत वसंत असें घेऊन शकापूर्वी ३० हजार वर्षें वेदकाळ असें सिद्ध करण्याचा त्यांत प्रयत्न आहे. सिंधी भाषेंत यांनीं अंकगणिताचें पुस्तक केलें (स. १८६९) व मराठी भाषेचें एक चांगलें व्याकरण स. १८६७ मध्यें केलें. स. १८९५ मध्यें त्याची तिसरी आवृत्ति छापली. सिंधीभाषेविषयींहि यांनीं एक पुस्तक केलें (स. १८६८). 'पंचांग मध्यम रविचंद्रावरून करावें' असें यांचें मत एकदां प्रसिद्ध झालें होतें (भा. ज्यो. इ. पा. ३०५). लघुचिंतामणीचें यांचें सोदाहरण मराठी भाषान्तर आहे.

यांचे ग्रंथ– १ चेंबरचें ज्योतिशास्त्र १८६२, २ मराठी भाषेचें नवीन व्याकरण १८६७, ३ ग्रहलाघव-भाषान्तर १८५६, ४ सिंधी भाषेचें निरूपण.

गोडबोले, डॉ. नरसिंह नारायण—(जन्म स. १८८८) सुप्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ, संशोधक व अभ्यासक.

यांचा जन्म धारवाड येथें झाला. तेथेंच इंग्रजी माध्यमिक शिक्षण होऊन हे डेक्कन कॉलेज, पुणें, येथून बी. ए. (१९०७) व फर्ग्युसन कॉलेजमधून बी. एससी. झाले (१९०८). नंतर यांनीं एम्. ए. ही डिग्री घेतली (१९१०). नंतर रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कराचीच्या डी. टी. कॉलेजमध्यें व सायन्सचे प्राध्यापक म्हणून लाहोरच्या सरदार दयाळसिंग कॉलेजमध्यें यांनीं काम केलें. तेथून बनारस हिंदुविश्वविद्यालयांत यांना आणण्यांत आलें. नंतर हे जपान, फिलिफाइन आयलंड्स् वगैरे ठिकाणीं प्रवास करून तेथील औद्योगिक शिक्षणाची यांनीं पाहणी केली (१९१७–१८). तेथून आल्यावर डिपार्टमेंट ऑफ् इंडस्ट्रियल केमिस्ट्रीची यांनीं तेथें स्थापना केली आणि तेथें हे प्रिंसिपल म्हणून काम करूं लागले (१९१९). जपानची यांनीं केलेली औद्योगिक पाहणी यांनीं व्याख्यानांनीं लोकांच्या समोर मांडली. पंजाब, कलकत्ता व म्हैसूर येथील विश्वविद्यालयांकडून यांचीं 'जपानची आर्थिक व औद्योगिक प्रगति' या विषयावर मुद्दाम व्याख्यानें करविण्यांत आलीं (१९१९–२०).

बनारस हिंदुविश्वविद्यालयांत अप्लायिड केमिस्ट्रीचें प्राध्यापकत्व चालू असतांच Semi-Large Scale Manufacturing ला यांनीं सुरुवात केली होती. अशा तऱ्हेचा हा जगांतील पहिलाच प्रयत्न आहे.

पुढें हे जर्मनींत गेले आणि बर्लिन विश्वविद्यालयांत चार टर्मसमध्यें यांनीं पी. एचडी. ही पदवी संपादन केली. तेथील यांचा संशोधनाचा विषय 'शेंगादाण्याचें पृथक्करण' हा होता (१९२३–२५).

नंतर बनारस येथें आल्यावर यांनीं तेथें हिंदुविश्वविद्यालयातर्फे 'कॉलेज ऑफ टेक्नॉलजी' काढलें. आणि

प्रत्यक्ष शिक्षण देण्याकरितां १ ऑइल, सोप्स, फॅटस्, २ फार्मास्युटिकल, ३ सिरेमिक्स, ४ फाइन केमिकल, ५ ग्लास इंडस्ट्री या शाखा सुरू केल्या.

तेलें, साबण आणि चरबी यांचें पृथक्करण करण्यांत हिंदुस्थानांत यांचा पहिला नंबर आहे. हिंदुस्थानचे या विषयांतील प्रतिनिधि म्हणून युरोपांतील एका कॉन्फरन्स-करितां यांची हिंदुस्थानसरकारतर्फे निवडणूक झाली होती. पण इतर कांहीं खासगी कारणानें हे तिकडे जाऊं शकले नाहींत.

यांचें तूप, त्यांतील भेसळ व त्याचें शास्त्रीय पृथक्करण वगैरे प्रतिपादन करणारें एक इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणें सर्व प्रकारच्या दुधांत गोदुग्धाचा उत्कृष्टपणा सिद्ध करणाऱ्या यांच्या ग्रंथाची जगभर ख्याति झाली आहे. मांस, मासे व अंडीं या सर्वांपेक्षां गोदुग्ध हें सर्व प्रकारें उत्कृष्ट असल्याचें यांनीं सिद्ध केलें आहे. जर्मन भाषेंत व अमेरिकेंत यांच्या उत्कृष्ट प्रतिपादनामुळेंच या ग्रंथाचा प्रसार झाला आहे.

गृहोद्योग, ग्रामोद्योग व लहानमोठे धंदे आपल्या देशांत काढून कसे चालवितां येतील याबद्दल यांचा व्यासंग सतत चालू असतो. घरगुती धंदे कसे चालवावेत याची पाहणी करण्याकरितांच यांनीं पुनः एकदां जपानला फेरी मारली (१९३६-३७). मेहेनत, स्वस्ताई आणि सुबकपणा यांबाबत यांनीं जपानमध्यें हिंडून अभ्यास केला.

रबर इंडस्ट्री विद्यालय, काड्याच्या पेट्या, शिसपेन्सिली इत्यादि उद्योगांबाबत सर्व दृष्टीची सूक्ष्म माहिती व तपशीलवार आंकडे यांच्याइतके इतरत्र क्वचितच तयार आढळतील.

यांचे ग्रंथ—

(1) Butter-Fat सद्रोपाल यांच्या सहकार्यानें (१९३०) दुसरी आवृत्ति, (१९३६), (2) Candle Manufacture (पहिली आवृत्ति १९३५, दुसरी आवृत्ति १९४५), (3) " Manufacture of Lead and Slate Pencils " (१९४५), (4) " Milk, the Most Perfect Food ", (5) " The Rubber Industry in India " (6) " Manufacture of Plastics " यांपैकीं शेवटचे दोन ग्रंथ All-Indi Manufacturer's Organisation नें प्रसिद्ध केलें आहे.

गोडबोले, परशुराम बल्लाळ ऊर्फ परशुराम तात्या—(जन्म स. १७९९-मृत्यु स.१८७४) मराठी भाषेंतील कवि, छंदशास्त्रज्ञ व संस्कृत नाटकांचे मराठी भाषान्तरकार.

यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील पावसगोळ प. बळवंत-परशुराम-बळवंत-परशुराम असा यांचा वंशक्रम आहे. यांचें घराणें वाईस रास्त्यांच्या आश्रयानें आलें. यांचा जन्म वाईसच झाला. यांचें मोडी अक्षर उत्तम होतें. यांचें संस्कृत भाषेचें अध्ययन नारायणशास्त्री देवांचे पाशीं झालें. यांचे बंधु दाजीबा. त्यांस मोरोपंतादि मराठी कवींचीं काव्यें वाचण्याचा फार नाद असे. हे पुढें पुणें येथें आपले मामा जोग यांच्या पेढीवर नोकरीस राहिले. पुणें येथें ' बोर्ड ऑफ एज्युकेशन ' या मंडळीनें मराठी कोश तयार करण्याकरितां जी विद्वान् मंडळी नेमली त्यांत यांची योजना झाली. पुढें मे. कँडी यांनीं शाळांकरितां क्रमिक पुस्तकें लिहिण्याबाबत यांची मदत घेतली. त्या जागेवर हे अखेरपर्यंत होते. हे त्यांचे उजवे हात होते. तेव्हांच्या मराठी क्रमिक पुस्तकांतल्या सगळ्या कविता यांच्या आहेत. सरकारी काम संभाळून यांनीं अनेक मराठी ग्रंथ केले.

यांचें मराठी भाषेवर उत्तम प्रभुत्व असे. यांनीं केलेलीं भाषान्तरें ही भाषान्तरें वाटत नाहींत इतकीं तीं सफाईदार झालीं आहेत. मराठी कवींच्या काव्यांचा अभ्यास यांनींच मराठींत प्रथम पद्धतशीर सुरू केला. हे मोठे रसिक आणि मर्मज्ञ होते. मराठी कवितेचा अर्थ लावण्याच्या कामीं यांचा हातखंडा असे. विशेषतः मोरोपंतांची आर्या लावण्यांत यांची फार प्रसिद्धि होती. महाराष्ट्रांत कवींचें माहात्म्य वाढत चाललेलें पाहून यांना फार संतोष होई.

यांनीं संस्कृताचें मराठी करून नवी कविता रचून आणि जुन्या कविता लोकांत प्रसिद्धीस आणून मराठी भाषेची फार मोठी सेवा केली आहे. मराठी वाङ्मयाचें महत्त्व ज्यांच्या प्रयत्नामुळें लोकांच्या लक्षांत येऊं लागलें त्या लोकांत यांना अग्रस्थान दिलें पाहिजे.

यांचें वाङ्मयः—

संस्कृतवरून मराठीः—१ वेणीसंहार, (१८५७), २ उत्तरराम चरित्र (१८५९), ३ शाकुन्तल (१८६१), ४ मृच्छकटिक, ५ नागानंद, ६ पार्वती-परिणय; जुन्या कवींच्या काव्यांतील निवडक संग्रहः—७ नवनीत,

८ केकादर्श (केकावलीवरील टीका), ९ सर्वसंग्रह (माधव चंद्रोबाचे मदतनीस), १० तुकारामाची गाथा (रा. ब. शंकर पांडुरंग पंडितांना मदत); नवीन ग्रंथः—११ मराठ्यांच्या इतिहासावर सोप्या कविता, १२ नामार्थदीपिका, १३ बालबोधामृत, १४ कादंबरी-सार, १५ वृत्तदर्पण.

गोडबोले, रघुनाथ भास्कर—(मृत्यु स.१८८७) मराठी भाषेतील सुप्रसिद्ध कोशकार.

यांचा जन्म वाई येथें झाला. पुणें येथें थोडें इंग्रजी शिक्षण झाल्यावर कांहीं वर्षें सैन्यांत व नंतर शाळा-खात्यांत नोकरी केली. हे परमार्थवृत्तीचे होते. यांनीं निजाम राज्यांतील नांदेडजवळील हंसराज नांवाच्या साधूंचा अनुग्रह घेतला होता.

यांचें वाङ्मय—१ मराठी भाषेचा नवीन कोश (१८७०), २ हंसकोश (१८७६), ३ भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश (पहिली आवृत्ति, निर्णय-सागर १८७६, दुसरी आवृत्ति चित्रशाळा १९२८), ४ मराठी-इंग्रजी कोश (१८८०), ५ भारतवर्षीय अर्वाचीन चरित्रकोश (१८८१).

यांनीं स्वयंस्फूर्तीनें फारच माहिती संशोधनपूर्वक एकत्र करून प्रसिद्ध केली आहे. संशोधनाचें युग सुरू होण्यापूर्वी झालेलें यांचें हें काम फारच महत्त्वाचें आहे. यांचा हंसकोश यावांचून आजहि अभ्यासकांचें पदोपदीं नडतें, यावरून त्या ग्रंथाची योग्यता समजून येईल.

यांच्या कोशांपैकीं शब्दकोशाची कल्पना जुनीच होती, पण प्राचीन-अर्वाचीन कोशाची कल्पना मराठींतच काय पण संस्कृतादि जुन्या व इंग्रजी वगैरे अर्वाचीन भाषांत सुद्धां अपूर्व आहे. त्या कोशाकरितां भारतीय युद्धापर्यंत प्राचीन व भारतीय युद्धानंतर अर्वाचीन अशी कल्पना धरून यांनीं व्यक्ति, ग्रंथ, स्थळें वगैरेंची वर्णक्रमानें माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. आधाराकरितां प्रायः रामायण, महाभारत हे प्रमुखत्वानें पण इतरहि कांहीं उपलब्ध असलेलीं पुराणें घेतलीं आहेत. जागोजाग आधारहि देण्याचा प्रयत्न केला आहे. हे अगदीं सनातनी मताचे असल्यानें वेद-शास्त्राविरुद्ध असलेल्या मतांचा हे कडक निषेध करतात. वैदिक ग्रंथांतील माहिती इतरांना देणें शास्त्रशुद्ध नाहीं म्हणून यांनीं दिली नाहीं. श्वेतकेतूवर उपनिषदांतील माहिती देणें बरोबर नाहीं, म्हणून यांनीं त्या उपनिषदांचा अनुवाद असणाऱ्या आत्मपुराणांतून माहिती दिली आहे. रामशास्त्री सुरपुरकर हे यांचे प्राचीन कोशाचे साहाय्यक होते. यांनीं तो कोश शके १८९२-९८ या सात वर्षांत पुरा केला.

गोडबोले, रामशास्त्री—(जन्म स. १८३७–मृत्यु स. १९१३) महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध पंडित व वैय्याकरण. यांचे गुरु सातारचे भास्करशास्त्री अभ्यंकर. हे मूळचे माहुलीचे राहणारे. भास्करशास्त्री अभ्यंकर कैलासवासी झाले तेव्हां त्यांचे नातू वासुदेवशास्त्री अभ्यंकर सुमारें आठ वर्षांचे होते. त्यांच्या दहाव्या दिवशीं गुरूंना तिलांजलि देतांना त्यांचें 'अध्यापनाचें व्रत विनामूल्य आजीव चालवीन' असा यांनीं संकल्प केला आणि तो अखंडपणें मोठ्या निष्ठेनें चालविला. हे जरी माहुलीस राहत तरी साताऱ्यास गुरुजींच्या घरीं जाऊन त्यांचे दोन नातू व प्रमुख शिष्य यांना निरलसपणें विद्यादान करीत. त्यामुळें यांचा मुक्काम एक रात्र साताऱ्यास व एक रात्र माहुलीस होई. शेवटीं हे पुण्यास राहण्यास आले. तेथेंहि यांचें अध्यापनाचें कार्य सतत चालू असे.

महाराष्ट्रांतील व्याकरणशास्त्राच्या परंपरेचा संबंध यांच्याशीं किंवा गजेंद्रगडकर घराण्याशीं पोंहचतो. व्याकरणशास्त्राचे सिद्धान्तकौमुदी, प्रौढमनोरमा, शब्द-रत्न, शब्दकौस्तुभ, परिभाषेन्दुशेखर, लघुशब्देन्दुशेखर, परमलघुमंजूषा, वैय्याकरणभूषण, पातंजलमहाभाष्य, कैयट वगैरे व्याकरणशास्त्रांतील ग्रंथांचें अध्यापन यांच्यापाशीं चाले. इतर शास्त्रांचेहि ग्रंथ हे शिकवीत.

यांना संस्कृत भाषेंत कविता करण्याची शक्ति चांगली होती. हे स्तोत्रें सहज व सरस करीत. तीं लिहून ठेवण्याची यांना आवश्यकता वाटत नसे.

यांचा मंत्रशास्त्राचा चांगला व्यासंग असे. सप्तशती वगैरे ग्रंथ यांना मुखोद्गत असून ते यांच्या नित्य पठनांत असत.

यांचा शुद्ध आचार, अध्यापनाचें अखंड चाललेलें निरपेक्ष कार्य आणि पांडित्य यांमुळें भोर, इचलकरंजी, औंध आणि मिरज येथील राजांवर यांचें चांगलें वजन असे. यांनीं कधींहि कोणापाशीं याचना केली नाहीं. आगगाडींत बसावयाचें नाहीं असा यांचा नियम होता. नमस्कार घालण्याचा नियम कधीं चुकला नाहीं. शेवटीं नमस्कार घालीत असतांच हृदयक्रिया बंद पडून यांना मृत्यु आला.

यांचे प्रमुख शिष्य—पं. रघुनाथशास्त्री अभ्यंकर, कै. म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर, कै. महादेवशास्त्री जोशी, कै. बापुशास्त्री जोशी (धारवाड), कै. मोरशास्त्री दिवेकर, कै. विठ्ठलशास्त्री धारुरकर, कै. विनायकशास्त्री खानापूरकर इ.

गोडे, परशुराम कृष्ण—(जन्म स. १८९१ जुलै ११) सुप्रसिद्ध संशोधक व अभ्यासक. यांचा जन्म देवरुख (जि. रत्नागिरी) येथें झाला. गोडे यांचें मूळ उपनांव ठाकूर होतें. हें घराणें काश्यप गोत्री कऱ्हाडे ब्राह्मणाचें असून त्याचें मूळ वसतिस्थान रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड तालुक्यांत जामसांडें व हडपीड गांवीं होतें असें यांनीं सिद्ध केलें आहे. हल्लींचे जामसांडे येथील ठाकूर व गोडे हे एकच होत. यांनीं आपल्या घराण्याविषयीं बरेंच ऐतिहासिक संशोधन केलें आहे. प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रांमध्य गोडेबखर व मुडागडच्या लढाईचा इतिहास (Bombay Uniuersity Journal, January 1937) हे महत्त्वाचे आहेत. रा. गोडे यांचे एक पूर्वज नारो रायाजी गोडे (ठाकूर) यांनीं सुमारें दहा हजार सैन्य जमा करून स. १७४८ मध्यें तुळाजी आंग्रे यानें वसविलेल्या मुडागडावर स्वारी करून तो किल्ला जमीनदोस्त केला. या पराक्रमाबद्दल गंगाधर कृष्ण प्रतिनिधि यांनीं नारो रायाजी यांस विशालगडच्या पायथ्याशीं असलेलीं देवडें व भडकंबें हीं दोन गांवें खोती इनाम दिलीं तीं अद्याप गोडे घराण्याकडे चालू आहेत. सुमारें स. १७८२ पासून आजतागायत गोडे घराण्याची वस्ती भडकंबें येथें आहे.

यांचे वडील कृष्णाजी गोविंद गोडे (स. १८६१–१९३०) हे समाजसुधारक होते. यांना वाचनाचा फार नाद असून त्यांच्या विचारावर कै. आगरकर व लोकमान्य टिळक यांच्या लेखांचा फार परिणाम झाला होता. त्यांनीं आपल्या तीन मुलींस महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या शिक्षणसंस्थेंत शिक्षण दिलें व नंतर या मुलींपैकीं सर्वांत वडील कै. सौ. बनूबाई सहस्रबुद्धे, रावबहादुर डॉ. दत्तात्रेय लक्ष्मण सहस्रबुद्धे यांच्या पत्नी व त्यांच्या भगिनी कै. सौ. मालतीबाई कर्वे, प्रा. र. धों. कर्वे यांच्या पत्नी यांनीं रा. परशुराम कृष्ण गोडे यांचें शिक्षण पूर्ण केलें. स. १९०० ते १९०७ पर्यंत रा. गोडे यांचें प्राथमिक शिक्षण राजापूर, रत्नागिरी व कोल्हापूर (समर्थ विद्यालय) येथें होऊन स. १९०८ सालीं हे पुढील शिक्षणाकरितां न्यू इंग्लिश स्कूलमध्यें दाखल झाले. स. १९१० मध्यें ते मॅट्रिक परीक्षा पास होऊन त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें पुढील अभ्यासक्रम पूर्ण केला. नंतर स. १९१६ त हे बी. ए. (सेकंड क्लास ऑनर्स–संस्कृत) ची परीक्षा पास झाले. नंतर पुण्यांतील तीन हायस्कुलांत शिक्षकाची नोकरी करून स. १९१८ मध्यें हे एम्. ए. ची परीक्षा (इंग्रजी व संस्कृत) पास झाले. स. १९०८ ते १९१८ पर्यंत यांना कै. डॉ. पांडुरंग दामोदर गुणे यांच्या अध्यापनाचा लाभ झाला. स. १९१८–१९१९ रा. गोडे हे कर्वे युनिव्हर्सिटीमध्यें इंग्रजी व संस्कृत या विषयांचे प्राध्यापक होते. डॉ. गुणे व त्यांचे साहाय्यक यांनीं याच वेळीं भांडारकर ओरिएण्टल रिसर्च इन्स्टिट्यूट स्थापन केली. डॉ. गुणे व प्रा. रा. द. रानडे (हल्लीं अलाहाबाद युनिव्हर्सिटीमधील तत्त्वज्ञान विषयाचे प्रधान अध्यापक) यांचे सल्ल्यावरून यांनीं भांडारकर इन्स्टिट्यूटमध्यें असिस्टन्ट क्यूरेटरची जागा २६ एप्रिल १९१९ रोजीं पत्करिली. लवकरच म्हणजे जानेवारी १९२१ मध्यें यांना इन्स्टिट्यूटचे क्यूरेटर नेमण्यांत आलें व त्या जागेवर हे आजपर्यंत नोकरी करीत आहेत. स. १९४३ मध्यें इन्स्टिट्यूटच्या रौप्य-महोत्सवप्रसंगीं यांना त्यांच्या प्रशंसनीय सेवेबद्दल व संशोधनात्मक कार्याबद्दल संस्थेकडून एक रौप्यपदक (Distinguished Services Medal) सर राधाकृष्णन् यांचे हस्तें अर्पण करण्यांत आलें.

यांचें संशोधनकार्य हे बी. ए. च्या वर्गांत असतांना सुरू झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांचा पहिला संशोधनात्मक निबंध महाभारताविषयीं असून तो Sanskrit Research (Bangalore) या नियतकालिकांत १९१६ मध्यें प्रसिद्ध झाला. या निबंधाबद्दल डॉ. कुर्तकोटी (हल्लीं शंकराचार्य) यांनीं यांना ५० रुपयांचें बक्षिस दिलें. तदनंतर यांनीं आपली नोकरी संभाळून संशोधनास वाहून घेतलें. सन १९२२ डॉ. गुणे (भाण्डारकर इन्स्टिट्यूटचे पहिले चिटणीस) वारल्यामुळें यांना मार्गदर्शक असा गुरु मिळाला नाहीं. नंतर यांनीं १९२५ पासून त्यांच्या ताब्यांत दिलेल्या सरकारी हस्तलिखित-संग्रहाचा उपयोग करून संस्कृत ग्रंथ व ग्रंथकार यांचें कालनिर्णयात्मक संशोधन सुरू केलें व तद्विषयक सुमारें २०० निबंध अनेक प्राच्यविद्याविषयक नियतकालिकांत प्रसिद्ध केले. सन १९४१ सालीं यांचीं ५० वर्षें पूर्ण झालीं त्या वेळीं यांनीं आपल्या

२०२ निबंधांची सूचि (Bibliography) प्रसिद्ध केली. या सूचीचे शेवटीं यांनीं हिंदुस्थानांतील व बाहेरील विद्वानांचीं मतें छापलीं आहेत त्यावरून यांच्या संशोधन-कामगिरीची पूर्ण कल्पना येईल. स. १९४१ नंतर यांचें लक्ष हिंदी संस्कृतिविषयक इतिहासाकडे वेधलें व सुमारें १०० निबंध यांनीं या संस्कृतीसंबंधानें लिहिले आहेत. या निबंधांत कांहीं निबंध मराठ्यांच्या इतिहासाबद्दल आहेत. यांनीं वरील सूचीच्या शेवटीं आपल्या निबंधांचें विषयवारी वर्गीकरण (Subject-Index) केलें आहे. त्यांतील विषयः—अलङ्कारशास्त्र, छन्दःशास्त्र, संस्कृत ग्रंथांचे टीकाकार, धर्मशास्त्र, लोककथा, गणित, हिंदी संस्कृति, हिंदुस्थानचा इतिहास (गुजरात, काठेवाड, माळवा, महाराष्ट्र, राजपुताना, विजयनगर वगैरेबद्दल व मुसलमानांच्या इतिहासासंबंधीं), जैन ग्रंथ व ग्रंथकार, ज्योतिःशास्त्र, कामशास्त्र, काव्य, कोश, मीमांसा, नाटक, नाट्य, नाणकशास्त्र, न्यायशास्त्र, मानसशास्त्र, पुराणें, संगीत, समाजशास्त्र, तन्त्र, वैद्यक, वेदान्त, विज्ञान, व्याकरण, योग—येणेंप्रमाणें आहेत. संस्कृत वाङ्मयाचा बिनचूक इतिहास लिहिण्यास यांच्या निबंधांची बरीच मदत होईल असें प्रसिद्ध आंग्ल प्राच्यविद्याविशारद डॉ. ए. बी. कीथ (एडिंबरो) यांचें मत आहे. ते लिहितातः—" Your excellent contributions to our exact knowledge of literary Chronology. Such work is most useful to future historians of Sanskrit literature and I am very glad,you are taking it up so consistently. " यांच्या कांहीं निबंधांचीं भाषांतरें, हिंदी, संस्कृत व गुजराती मासिकांत प्रसिद्ध झालीं आहेत. यांच्या निबंधांचीं व्यक्तिशः येथें नांवें देणें शक्य नाहीं, परंतु त्यांचें थोडेंसें दिग्दर्शन करणें जरूर आहे तें येणेंप्रमाणेंः—बैलगाडीचा इतिहास, नथीचें प्राचीनत्व, कऱ्हाडे ब्राह्मणांचा इतिहास, जिलबीचा इतिहास, अंजीराचा इतिहास, जोंधळ्याचा इतिहास, भवानी तरवारीसंबंधीं तत्कालीन पुरावा देणारा लेख, चहाचा इतिहास, छत्रपति संभाजीचा पारिजातध्वज (भगवा झेंडा), गाबीत, साळी व पद्मसाळी या जातींचा इतिहास, सवाई जयसिंगनें केलेल्या अश्वमेधाबद्दल निबंध, कागदाचा इतिहास, गुलाबपाण्याचा इतिहास इत्यादि. रा. गोडे यांच्या सर्व निबंधांचें पुस्तकरूपानें प्रसिद्धीकरण झाल्यास त्याचा सर्व इतिहाससंशोधकांस बराच उपयोग होईल असें मत बऱ्याच तज्ज्ञांनीं प्रकट केलें आहे. आजतागायत यांनीं ३०० निबंध प्रसिद्ध केले आहेत व त्यांची एकूण पृष्ठसंख्या जवळजवळ २००० आहे.

ऐतिहासिक संशोधनाखेरीज बरेंच संपादकीय काम यांनीं केलें आहे. या कामाचा आरंभ १९३० मध्यें झाला. प्रा. रा. द. रानडे यांनीं स्थापन केलेल्या ॲकडेमी ऑफ फिलासफी ॲन्ड रिलिजन या संस्थेचे हे आरंभापासून चिटणीस आहेत. या संस्थेच्यातर्फे यांनीं Review of Philosophy and Religion हें नियतकालिक सुरू करून तें १९३६ पर्यंत चालविलें. स.१९३८-१९४०त यांनीं Oriental Literary Digest नांवाचें मासिक डॉ. सुमित्र मंगेश कत्रे (हल्लीं डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर) यांचे साहाय्यानें चालविलें. नंतर १९३८ मध्यें या दोघां विद्वानांनीं New Indian Antiquary नांवाचें मासिक सुरू केलें तें आजतागायत चालू आहे. या मासिकांत जगांतील सर्व नामांकित विद्वानांचे प्राच्यविद्याविषयक लेख येत असतात. रा. गोडे व डॉ. कत्रे यांनीं New Indian Antiquary-Extra Series नांवाची ग्रंथमालाहि सुरू केली आहे. त्यांत कांहीं विद्वानांचे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. या दोघांनीं संपादन केलेल्या ग्रंथांमध्यें, प्रा. पां. वा. काणे स्मारक-ग्रंथ, डॉ. टॉमस स्मारक-ग्रंथ, सर डेनिसन रॉस स्मारक-ग्रंथ व सुखटणकर स्मारक-ग्रंथ हे उल्लेखनीय आहेत. हे हल्लीं कलकत्त्याचे सुप्रसिद्ध विद्वान् डॉ. बी. सी. लॉ यांचा एक स्मारक-ग्रंथ संपादीत आहेत. सन १९३६ पासून यांनीं तयार केलेली भाण्डारकर इन्स्टिट्यूटमध्यें असलेल्या सरकारी हस्तलिखितांची वर्णनात्मक सूची छापण्याचें काम सुरू झालें आहे. या सूचीचे यांनीं केलेले ४ भाग या संस्थेनें प्रसिद्ध केले आहेत व पुढील भागांचें प्रकाशन चालू आहे. यांनीं संपादन केलेल्या ग्रंथांची पृष्ठसंख्या सुमारें १०,००० होईल. सन १९३७ पासून यांच्या सर्व संपादकीय कार्यांमध्यें यांचे मित्र डॉ. कत्रे यांचें अमूल्य साहाय्य झालें आहे. त्याचप्रमाणें त्यांना सन १९२५ ते १९४३ कै. डॉ. सुखटणकर (भाण्डारकर इन्स्टिट्यूटच्या महाभारताचे प्रसिद्ध संपादक) यांच्या मैत्रीचा व साहचर्याचा चिरस्मरणीय लाभ झाला व या मैत्रीचें प्रतीक म्हणून यांनीं सुखटणकर स्मारक-ग्रंथ (२ भाग) नुकतेच (१९४४-४५) प्रसिद्ध केले आहेत. यांशिवाय रा. गोडे यांनीं सुमारें ३५० ग्रंथांचें समालोचन प्रसिद्ध केलें आहे.

गोपालाचार्य, पंडित डी.—(जन्म स. १८५० -मृत्यु स. १९२५) आयुर्वेदाच्या क्षेत्रांत काम करणारे सुप्रसिद्ध पंडित.

यांचें घराणें पिढीजात वैद्याचें असून यांचें वैद्यकीचें शिक्षण पित्याजवळ झालें. पण तेवढ्यानें तृप्त न होतां म्हैसूर राजकीय आयुर्वेदपाठशाळेंत पुट्टस्वामीशास्त्रीपाशीं यांनीं आयुर्वेदाचें आणखी अध्ययन केलें. व तेथील धर्मार्थ चिकित्सालयांत अनुभव संपादन केला, व परीक्षेंत उत्तम यश संपादन केलें. हिंदुस्थानभर प्रवास करून चर्चा व अवलोकन केल्यावर मद्रास येथें वैद्यकी व चिकित्साधर्मवैद्यशाळेंत प्रधानाध्यापकाचें काम केलें. याच वेळीं यांनीं अनेक अनुभूत औषधीकल्प निश्चित केले. त्यांतील प्लेगावरील यांचा 'हैमादिपानक' हा अमोघ ठरला. या सर्व औषधीकल्पांचे जोरावर यांनीं स्वतःचा 'आयुर्वेदाश्रम' काढला. त्यांतून प्राप्त झालेला पैसाहि यांनीं विद्यार्थ्यांना वेतनादि रूपानें वांटून टाकला. 'नात्मार्थं नापि कामार्थमथ भूतदयां प्रति ॥ यो वर्तते चिकित्सायां स सर्वमतिवर्तते ॥' ही चरकोक्ति यांनीं सार्थ केली. वैद्यकींत मिळविलेला धनसंचयहि यांनीं स्वतः स्थापन केलेल्या 'मद्रास आयुर्वेद-कलाशाळा' या संस्थेस अर्पण केला.

यांच्या दिगंत कीर्तीला साजेसा सन्मानहि यांना लाभला. मुंबई, गद्वाल, काशी व कलकत्ता संमेलनांत यांना प्लेगावरील औषधाबद्दल सुवर्णपदकें देण्यांत आलीं. कलकत्ता व नाशिक संमेलनांत यांना अनुक्रमें भिषङ्मणि व आयुर्वेदमार्तंड या पदव्या देण्यांत आल्या. १९१३ सालीं वैद्यरत्न हा ब्रि. सरकाराकडून किताब यांना प्राप्त झाला. १९०९ व १३ सालीं यांना केरळ वैद्य समाज सप्तम-महोत्सव (१९०९) व मुंबई संमेलन (१९१३), हरिद्वार, ऋषिकुल ब्रह्मचर्याश्रमाचें वैद्य-संमेलन (१९१७), त्याच सालीं आंध्र आयुर्वेद-संमेलन बेझवाडा, तेन्नाळदेशांत गुण्टूर-आयुर्वेद-युनानी वैद्य सं., सर्वांत महत्त्वाचें लाहोर नि. भा. आयुर्वेद महासंमेलन (१९१८), तिरुवहीन्द्रपूर-दुसरें द्राविड वैद्यसंमेलन (१९१९) इत्यादि ठिकाणीं यांना अध्यक्षपदाचा मान मिळाला. यांच्या भाषणांत आयुर्वेदीय तत्त्वज्ञानाचें सोपपत्तिक विवेचन व मध्यवर्ति, कायमच्या आयुर्वेदपदार्थ-संग्रहाची योजना यांबाबतचे विचार महत्त्वाचे होते (आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे).

गोविंद—(जन्म स. १८७४-मृत्यु स. १९२६) मराठी भाषेंतील राष्ट्रीय वृत्तीचे शाहीर कवि.

यांचें समग्र नांव गोविंद त्र्यंबक दरेकर. जात मराठा. यांचे वडील लहानपणींच वारले. आणि लहानपणींच ताप येऊन हातपाय कायमचे लुले पडल्यानें हे पंगू झाले व यांना शिक्षण घेतां आलें नाहीं. स. १८९८-९९ च्या सुमारास बॅ. वि. दा. सावरकरांची व यांची गांठ पडली. त्यांच्यापासून यांना राष्ट्रीय कविता करण्याची स्फूर्ति मिळाली. सावरकरांची 'मित्रमेळा' नांवाची एक संस्था होती. तेथें हे आपल्या देशप्रेमानें रसरसलेल्या कविता म्हणून दाखवीत. १९०६ च्या सुमारास हीं वेळोवेळीं रचलेलीं यांचीं कवनें 'लघु-अभिनवमाला' म्हणून प्रसिद्ध करण्यांत आलीं. त्या मालेंतून प्रसिद्ध झालेल्या नऊ पुष्पांपैकीं पांच पुष्पें यांचीं आहेत. पुढें मित्रमेळ्याचें रूपान्तर 'अभिनव भारत' या क्रांतिकारक संस्थेंत करण्यांत आलें. स. १९०८-९ चे दडपशाहीचे काळांत हीं सर्व पुष्पें सरकारनें जप्त केलीं. त्यानंतर १९१७ पर्यंत यांनीं कविता लिहिल्या नाहींत. १९१८ मध्यें होमरूलची चळवळ सुरू झाल्यावर यांनीं पुनः कविता लिहिण्यास सुरुवात केली.

'गोविंदाची कविता' या नांवानें यांचा कविता-संग्रह प्रसिद्ध झाला आहे (१९३०-३१). यांच्या या संग्रहांतील बहुतेक कविता १९१८ नंतर लिहिलेल्या आहेत. यांच्या काव्याचा मुख्य विशेष म्हणजे रसरसणाऱ्या भावना. यांचा आवडता रस म्हणजे वीररस. यांच्या भावनेची गंगा वीररसानें फोफावत अनुप्रास आणि नादमाधुर्य यांच्या दुथडींतून चालली कीं, श्रोत्यांच्या अंतःकरणाला देशाभिमानाची भरती आल्याशिवाय कधींहि राहत नाहीं. राष्ट्रीय वृत्तीच्या शाहीर कवींत यांचें स्थान अद्वितीय आहे. राजस्थानच्या इतिहासांत चांदभाटाला जो मान दिला जातो तोच मान आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासांत यांना देणें योग्य होईल.

यांच्या 'महाराष्ट्राची भूपाळी', 'सुंदर मी होणार' वगैरे कविता त्या वेळीं सर्वतोमुखीं झाल्या होत्या.

गोविंददास जीवनदास शेठ—(जन्म स. १८९६) हिन्दी भाषेंतील सुप्रसिद्ध लेखक, नाटककार. राजकारणी, सार्वजनिक कार्यकर्ते, व्यापारी व दानशूर गृहस्थ.

हे आपले वडील जीवनदास यांना वयाच्या साठाव्या

वर्षी दसऱ्याच्या दिवशीं झाले. त्या वेळीं यांच्या वडिलांनीं लाखों रुपये धार्मिक कार्यांत व उत्सवांत खर्च केले. यांचें शिक्षण घरींच हिन्दी व इंग्रज शिक्षकाच्या तज्ज्ञ देखरेखीखालीं झालें. इतर विषय न शिकतां यांनीं इंग्रजी साहित्याचाच विशेष अभ्यास केला. बंगाली, मराठी, गुजराथी वगैरे भाषा हे स्वतःच शिकले.

१९२० सालीं यांनीं असहकारितेच्या चळवळींत उत्साहानें भाग घेतला. यांचें वय लहान असलें तरी यांच्या नेतृत्वाची महती जनतेस समजली. १९२३ सालीं हे स्वराज्यपक्षातर्फे मध्यप्रान्तांतील जमीनदारांचे प्रतिनिधि म्हणून दिल्लीच्या मध्यवर्ति कायदे मंडळांत निवडून आले. तसेंच १९२५ सालीं सर एम्. बी. दादाभाई व सर हरिसिंग गौर यांसारखे प्रतिस्पर्धी असतां हे कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें निवडून आले. १९२९ सालीं राष्ट्रसभेच्या आदेशाप्रमाणें यांनीं आपल्या कायदेमंडळांतील सभासदत्वाचा राजीनामा देऊन हे सत्याग्रहांत सामील झाले. या मुदतींत तीन वेळां एक ते सहा वर्षेपर्यंत शिक्षा होऊन यांना कारावास भोगावा लागला. १९३३ सालीं पुनः दिल्लीच्या मध्यवर्ति कायदे-मंडळांत हे निवडून आले. तेथें व्यापारधंद्यांतील दर्दी सभासद म्हणून यांची ख्याति होती.

असहकारितेच्या चळवळींत यांनीं ऑननरी मॅजिस्ट्रेटची जागा तर सोडलीच, पण वार्षिक ६०-७० हजार रुपयांचा फायदा देणारा लँडर अरबथनॉट या इंग्रज दुकानाशीं असलेला दीर्घकालीन संबंधहि सोडला.

वयाच्या अकराव्या वर्षापासून यांना हिन्दी वाचनाचा नाद लागला व पुढील तीनचार वर्षांत यांनीं चम्पावती, कृष्णलता व सोमलता या तीन कांदबऱ्या लिहिल्या. नंतर सोळाव्या वर्षी यांनीं शेक्सपिअरच्या रोमिओ अँड ज्युलिएट, पॅरोक्लिस प्रिन्स ऑफ टायर व विन्टर्स टेल यांच्या आधारें सुरेन्द्रसुन्दरी, कृष्णकामिनी, होनहार आणि व्यर्थसंदेश या कांदबऱ्या लिहिल्या. याच वेळीं कवितेबद्दल यांना आवड उत्पन्न होऊन 'बाणासुर-पराभव' हें एक महाकाव्य यांनीं लिहिलें. यांत १८ सर्ग असून विविध छन्दांमुळें तें मनोहर झालें आहे.

यांची नाटककार म्हणूनहि चांगली प्रसिद्धि आहे. यांचीं आधुनिक पद्धतीचीं एकांकी नाटकें यशस्वी झालीं आहेत. तीं वाचनीय म्हणून त्यांचा खप चांगला होतो. हीं लहान नाटकें ललित प्रसंगीं करून दाखविण्याची पद्धतहि पडत चालली आहे. जुन्या रामलीला वगैरेपेक्षां साहित्यिक दृष्टि यांमध्यें अधिक आढळते.

जबलपुरांतील शारदाभुवन वाचनालयाची स्थापना २५ हजार रुपये देऊन यांनीं केली आणि त्याची व्यवस्था जबलपूर राष्ट्रीय हिन्दी मन्दिरातर्फे करण्यांत आली. टिळकस्वराज्य फंडास यांनीं १० हजार रुपये दिले. जबलपूर प्लेग रिलीफ कमेटीस यांनीं १५ हजार रुपये जमवून दिले. याशिवाय यांनीं किती तरी संस्थांना मोठाल्या देणग्या दिल्या आहेत.

पुण्याच्या तृतीय महाराष्ट्र प्रान्तिक माहेश्वरी सभेचे व जळगांवच्या पंचम मुंबईप्रान्तीय माहेश्वरी सभेचे हे अध्यक्ष होते. अखिल भारतीय माहेश्वरी परिषदेचें मन्त्रिपद यांनीं पुष्कळ वर्षे भूषविलें आहे.

यांच्या कांदबऱ्या—१ चम्पावती, २ कृष्णलता, ३ सोमलता, ४ सुरेन्द्रसुंदरी, ५ कृष्णकामिनी, ६ होनहार, ७ व्यर्थसन्देह.

काव्यें—बाणासुरपराभव.

नाटकें—१ कर्तव्य, २ हर्ष, ३ प्रकाश.

यांनीं 'धुवांधार' वगैरे पुष्कळ चित्रपटकथाहि लिहिल्या आहेत.

गोस्वामी, किशोरीलाल श्रीवासुदेवशरण— (जन्म स. १८६५—मृत्यु स. १९३१) हिन्दीचे सुप्रसिद्ध लेखक व कवि.

वृन्दावनच्या प्रसिद्ध श्रीकेदारनाथजी महाराजांचे हे नातू, त्याचप्रमाणें यांचे मातामह गोस्वामी श्रीकृष्ण-चैतन्यदेवजी हे भारतेन्दु बाबू हरिश्चन्द्रांचे गुरु. त्यामुळें भारतेन्दूशीं यांचा निकट स्नेहभाव झाला.

वयाच्या ८ व्या वर्षी यांच्या विद्याभ्यासास प्रारंभ झाला. आपल्या मातामहांच्यापाशीं यांनीं हिन्दी साहित्य, पिङ्गलशास्त्र वगैरेचा अभ्यास केला. राजा शिवप्रसाद सितारेहिन्द व भारतेन्दूच्या प्रेरणेवरून यांनीं "प्रण-यिनी-परिणय" ही हिन्दी कादम्बरी प्रथम लिहिली. यांचें शिक्षण काशीस झालें. यांनीं संस्कृतांतील न्याय, योग, व्याकरण, वेदान्त, ज्योतिष इत्यादि विषयांचें अध्ययन करून साहित्यांतील 'आचार्य'—परिक्षेपर्यंतचे ग्रन्थ वाचून काढले. यांच्या पित्याबरोबर हे आरा येथें कांहीं दिवस राहत होते. तेथेंहि यांनीं प्रसिद्ध विद्वान् श्रीपीताम्बर मिश्रजी व रुद्रदत्तजी यांचेजवळ संस्कृता-ध्ययन केलें. आरा येथें वाचनालय नसल्यामुळें यांनीं तेथें आर्य पुस्तकालयाची स्थापना केली व तद्वारें हिन्दीचा प्रसार केला. तेथील प्रसिद्ध वैद्यराज पं. बालगोविन्द

त्रिपाठी यांच्या साहाय्यानें यांनीं तेथें 'वर्णधर्मोपयोगिनी' सभेचीहि स्थापना केली व तिच्याद्वारां एक पाठशाळा सुरू केली. स. १८९०त याच सभेचे प्रतिनिधि म्हणून हे दिल्लीच्या भारतधर्म महामण्डलांत गेले.

'कुरमी जातीं'च्या वर्णव्यवस्थेवर यांनीं संस्कृतांत एक पुस्तक लिहिलें असून तें "विज्ञ वृन्दावन" पत्रांतून प्रसिद्ध झालें.

'सरस्वती' या प्रसिद्ध हिन्दी मासिकाचे व 'नागरी-प्रचारिणी पत्रिका', 'नागरी प्रचारिणी ग्रन्थमाला', 'बालसखा' वगैरेंचे हे संपादक व सह-संपादक होते. मध्यंतरीं यांनीं 'उपन्यास' व 'श्रीवैष्णव सर्वस्व' अशीं दोन मासिक पुस्तकें सुरू केलीं. १९१३त यांनीं वृन्दावन येथें 'सुदर्शन छापखाना' उघडला. नागरी प्रचारिणी सभेचे हे प्रथमपासूनच सभासद होते; परंतु पुढें सभेच्या कार्यकर्त्यांशीं मतभेद होऊन यांनीं सभेचा संबन्ध सोडून दिला. आग्रा येथील गौड महासभेचे हे अध्यक्ष होते. तसेंच रीवाँ राज्यांतील चतुःसम्प्रदाय श्रीवैष्णव महासभेचे हे पंच असून रीवाँचे स्वर्गीय महाराज यांचा आदर करीत असत.

हीरक-महोत्सवाचे वेळीं यांनीं महाराणी व्हिक्टोरिया यांचें संस्कृतांत चरित्र लिहून काशीच्या 'वैष्णव-समाजा'तर्फे तें इंग्लंडला पाठविलें.

यांनीं एकंदर २७ काव्यात्मक, २५ चरित्रात्मक, २५ नाटकें, ६५ कादम्बऱ्या, १५ साम्प्रदायिक विषयांवरील, ११ विविध विषयांवर, ११ गाण्यांचीं इतकीं विविध विषयांवरील पुतकें लिहिलीं. यांशिवाय 'मयूखमालिनी', 'प्रणयोच्छ्वास,' 'शृङ्गाररत्नमाला,' 'शृङ्गारसुधाकर,' 'शृङ्गारसुधाबिन्दु,' 'सांख्यसुधाकर,' 'संक्षिप्त सांख्य-तत्त्व-समास-कारिका' हीं ७ संस्कृत पुस्तकें व सुमारें ४१ स्फुट लेख इत्यादि लिखाण यांनीं लिहिलें. यावरून हिन्दी साहित्याची यांनीं केलेली सेवा व यांचें साहित्यमय जीवन यांची कल्पना येईल. साहित्याशिवाय यांना इतर कशांतहि गोडी लागत नसे. भोजन, भजन व निद्रा यांशिवायचा सर्व वेळ हे साहित्योत्पत्तीसाठीं खर्च करीत. हे नेहमीं म्हणत कीं, 'एकाद्या सभेंत जाऊन हिन्दीची सेवा करण्यापेक्षां घरीं राहूनच ती अधिक होते. लोकांनीं यांना पुष्कळ वेळा पदव्या देण्याचें ठरविलें, पण यांना ही गोष्ट न आवडल्यामुळें यांनीं तिचा इन्कार केला. एकदां भारत-धर्म मण्डळानें यांना एक पदवी लिहून पाठविली असतां यांनीं असें प्रत्युत्तर दिलें कीं 'असाहित्य-सेवक साहित्य-सेवकांना पदवी देऊन आपली अयोग्यताच प्रगट करीत नाहींत, तर साहित्य-सेवकांचा अपमानहि करतात.' हे हिन्दींत फार सुंदर व्याख्यान देत. व्रजभाषा व खडीबोली या दोहोंमध्यें ते त्वरित कविता करीत. हाच गुण यांच्या संस्कृत कवितेंतहि दिसून येई. अनेक भाषांत लिहिण्यांत यांचा हातखंडा असे (क. कौ. २:२१४-२१).

गोहरजान—(जन्म स. १८७०–मृत्यु स. १९३०) सुप्रसिद्ध गायिका व उर्दू भाषेंतील कवयित्री.

वयांत आल्यावर यांनीं गायनकला संपादन केली. नजीरखाँ व प्यारासाहेब हे यांचे गायनकलेंतील गुरु. ख्याल, होरी वगैरे उच्च दर्जाचे गाण्याचा यांचा अभ्यास चांगला होता व यांनीं तो शेवटपर्यंत टिकविला होता.

तथापि ठुमरी-गायक म्हणून पुढें यांची कीर्ति फार झाली. ठुमरीच्या गायनांत आवश्यक असणारा भाव या फार उत्कृष्ट करीत. कवनांतील भावना स्वराइतकीच बोलांच्या लडिवाळपणानें प्रदर्शित करण्याची यांची हातोटी अपूर्व होती. स्वर, भाव आणि शब्दांचें रसानुकूल ठसकेदार उच्चारण यांमुळें यांच्या गायनाची मोहिनी सर्व प्रकारच्या श्रोत्यांवर सहज पडे. गोड, गोल, सुरेल आणि भरदार आवाजाची देणगीहि यांना होती.

ऐन तारुण्यांत या दरभंगा दरबारांत गायिका होत्या. पुढें कलकत्त्यास राहूं लागल्या. उतार वयांत यांनीं म्हैसूर दरबारचा आश्रय घेतला. सर्व हिंदुस्थानभर भरपूर प्रसिद्धि, उत्तम लौकिक आणि विपुल संपत्ति यांचा लाभ यांना झाला.

गोहेल, सूरसिंहजी जगतसिंहजी—(जन्म १८७४–मृत्यु स. १९००).

'कलापी' या टोपणनांवाखालीं प्रसिद्ध असलेले गुजराथी कवि. हे काठेवाडांतील लाठी देशचे ठाकोरसाहेब होत. यांचें शिक्षण राजकुमार कॉलेजांत झालें. स. १८९५ त हे गादीवर बसले. वयाच्या १६ व्या वर्षी यांच्या रमा नांवाच्या आवडत्या बायकोच्या दासीमध्यें शोभना नांवाची एक ६-७ वर्षांची दासी होती. तिनें ह्यांचें मन आकर्षून घेतलें. पुढें ती वयांत आल्यावर तिचें एक लग्न यांनीं लावून दिलें असतांनाहि तिच्यावरील प्रथमच्या प्रेमपाशांत सांपडून जनापवादास न भितां यांनीं तिच्याशीं लग्न केलें (१८९८). तिचेंहि

आपल्या नवऱ्यावर प्रेम नव्हतें. 'हृदय-त्रिपुटी' नांवाच्या आपल्या काव्यांत यांनीं हिचा व रमेचा संबंध कसा होता हें सांगितलें आहे.

लहानपणापासून इंग्लिश, संस्कृत, उर्दू व गुजराथी वाङ्मयाचा यांनीं अभ्यास चालू ठेवला होता. यांच्या मनाचा कल विशेषतः काव्य व तत्त्वज्ञान ह्यांकडे विशेष असे. संस्थानी कारस्थानांच्या त्रासामुळें हे त्यापासून अलिप्त असत. विद्वानांच्या सहवासाची यांना विशेष आवड असे. पुढील वयांत यांना संसाराचा अत्यंत वीट आला. यांच्या प्रणय-कवितांना 'प्रणयगीता' असें एका ग्रंथकारानें म्हटलें आहे. ह्या कविता उर्दू कवींच्या गझल वृत्तांत असून उर्दू कवितांच्या प्रेमगीतांची छटा त्यांत दिसते. उर्दू शफी कवीच्या कवितांचें यांनीं भाषांतर केलें आहे व तें बरें साधलें आहे. यांचें 'कमलिनी' हें काव्य शेलेच्या 'मेघ' या कवितेच्या धर्तीवर आहे. यांचें काश्मीर-प्रवासवर्णनपर काव्य उत्कृष्ट झालेलें आहे. त्याचप्रमाणें यांचें 'हमीर' हें ऐतिहासिक प्रसंगावरील काव्य फार सुंदर आहे. ह्यांचीं मिश्र गुजराथींतील काव्यापेक्षां शुद्ध गुजराथींतील काव्यें सरस आहेत. यांचीं प्रेमासंबंधींचीं कडवीं गुजराथी लोकांत म्हणींसारखीं प्रचलित आहेत. निसर्गाशीं यांच्या काव्याचा विशेष संबंध असल्यानें यांना गुजराथचा वर्ड-स्वर्थ असें म्हणतात.

आपनी यादी, शिकारिनी, ग्राम्य माता, अस्वस्थ गृहिणी, बिल्वमंगल इत्यादि यांच्या कविता फार प्रसिद्ध आहेत.

गोळे, महादेव शिवराम—(जन्म स. १८५८ फेब्रु.–मृत्यु स. १९०७ डिसें.) मराठी भाषेंतील विचारवन्त ग्रंथकार. (वरील जन्म-मृत्यूचे सन मराठी ग्रंथसूचींत १८५९-१९०६ असे दिले आहेत.)

यांचा जन्म सातारा जिल्ह्यांतील मर्ढे येथें झाला. यांचे वडील हे सहा-सात वर्षांचे असतांना वारले. यांचा व यांचे धाकटे बंधु गोपाळराव यांचा सांभाळ आईनें केला. यांचे आईचे वडील कृष्णभट गोखले हे अतिशय भाविक असे हरिभक्त होते. यांनीं पुण्यांत शनिवार पेठेंत गोवर्धनेश्वराचें देऊळ बांधलें. गोखल्यांच्याकडे हे प्रथम आईबरोबर आले आणि तेथें यांचें पुढील शिक्षण झालें. इंग्रजी सहावीपर्यंत खासगी तऱ्हेनें अभ्यास करून हे हायस्कूलमध्यें दाखल झाले. मॅट्रिक (१८७७), सायन्स हा ऐच्छिक विषय घेऊन हे बी. ए. व एम्. ए. झाले (१८८३), व लागलीच डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद बनले. प्रथम हे शाळेचे सुपरिंटेंडेंट म्हणून काम करीत होते. पुढें आगरकरांच्या मृत्यूनंतर हे फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपल झाले (१८९५). १९०२ मध्यें हे सेवानिवृत्त होऊन आपल्या शेतीच्या गांवीं जाऊन राहिले.

यांचे कुटुंबाचा मृत्यु, वडील चिरंजीवांचें अकाली निधन, शेतींतील नुकसान वगैरेमुळें हे थकत चालले. अखेर दम्याचा विकार फारच बळावला तेव्हां हे नाशिक येथें येऊन राहिले व तेथें यांचा अंत झाला.

यांचे 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' आणि 'हिंदुधर्म आणि सुधारणा' हे दोन ग्रंथ भाषा व विचार या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचे आहेत. समाजशास्त्रदृष्ट्या हिंदुधर्माची चिकित्सा करून त्या धर्माचें रहस्य प्रगट करण्याचा मान यांना दिला पाहिजे. प्रायः जुन्या आचारविचारांचें समर्थन करण्याकडे यांचा कल असला तरी त्यांतील विवेचन अत्यंत खोल व मार्मिक आहे यांत शंका नाहीं. यांची भाषा तर फारच मनोहर, साधी, सरळ, पोक्त व स्वाभाविक असून अत्यंत प्रवाही आहे. क्लिष्ट सामाजिक विषय यांनीं एखाद्या कादंबरी-सारखा रसाळ बनविला आहे. यांचे हे ग्रंथ मराठी भाषेचे अविनाशी अलंकार होत.

यांचें वाङ्मयः—१ शाळेचा अभिमान (१८९४), २ कुळाचा अभिमान, ३ संस्कृत कोर्सेस, ४ अमरसार (संस्कृत-मराठी, संस्कृत-इंग्रजी, इंग्रजी-संस्कृत कोश १८८३), ५ ब्युबानिक प्लेग व त्यासंबंधीं लोकांचीं कर्तव्यें (१८९७), ६ हवा (१८९१), ७ ब्राह्मण आणि त्यांची विद्या (१८९५), ८ हिंदुधर्म आणि सुधारणा (पहिली आवृत्ति १८९८, दुसरी आवृत्ति १९२७).

गोंदवलेकर महाराज—(जन्म स. १८४४–मृत्यु स. १९१३)

एक सत्पुरुष. आजा लिंगोपंत, पिता रावजी व माता गीताबाई. हे सातारा जिल्ह्यांतील दहीवडीचे शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण. यांचें पाळण्यांतील नांव गणपति. घरांत पंढरीची वारी कित्येक पिढ्यांपासून होती.

अबूच्या पहाडांतील योग्यापाशीं योगाभ्यास केला. वऱ्हाडांत गेले असतां श्रीतुकारामम्हाराज येळीवकर यांना गुरु केलें. हे रामदासी परंपरेतील होते. यांची परंपरा कल्याणस्वामींकडून आली होती.

दक्षिणोत्तर सर्व तीर्थयात्रा केल्या. काशीची कावड रामेश्वरास अनेकवार घातली. मथुरावृंदावन, अयोध्या वगैरे करून नेपाळांत गेले. नैमिषारण्याच्या एकान्तांत कांहीं काळ वस्ती केली. उज्जयिनीच्या बाहेर वनांत १२ वर्षे घोर तपश्चर्या केली. इंदूरलाहि थोडा वेळ राहिले. तिकडे कांहीं अद्भुत चमत्कार केले. नंतर गोंदवल्यास आले. मातोश्रींना घेऊन पुनः एकदां तीर्थयात्रा केल्या.

यांनीं रामदासी संप्रदायाचा व रामभक्तीचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर केला. गोंदवलें, पंढरपूर, सोलापूर, हर्दा, वऱ्हाड, आटपाडी इत्यादि ठिकाणीं यांनीं राममंदिरें बांधलीं व हजारों लोकांस रामनामाचा छंद लावला. यांचे हजारों शिष्य आहेत. यांना रामदासस्वामींचा दुसरा अवतार म्हणतात. नामप्रीति, दक्षता, शिस्त, टापटीप, व्यवहारचातुर्य इत्यादि गुण यांच्यांत होते. यांचे शिष्य जालना येथील अनंतसागर हे महान् सत्पुरुष होते. ब्रह्मानंद (अनंतशास्त्री) व श्रीशंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) हीं शास्त्रज्ञ पंडित माणसें यांच्या प्रमुख शिष्यांत मोडतात. कर्नाटकांत तमण्णाशास्त्री ऊर्फ सच्चिदानंद यांनीं महाराजांवर कवनें करून यांचा संप्रदाय व कीर्ति वाढविली आहे.

यांनीं परमार्थाप्रमाणें प्रपंचहि व्यवस्थित केला. स्नानसंध्या, पंचमहायज्ञ, अतिथिसत्कार, अन्नदान व नामसंकीर्तन यांमुळें यांचें घर राममंदिरासारखें सर्वकाळ पवित्र वाटे. श्रीसमर्थांच्या उपदेशाप्रमाणें यांचें वर्तन होतें. हे कुळधर्मकुलाचार यथास्थित चालवीत. नित्य सकाळीं एकनाथी भागवत, दासबोध यांचें निरूपण स्वतः करीत. यांचें सायंकाळचें भजन फार प्रेमळ असे. यांचा नामस्मरणाचा मुख्य उपदेश असे. हे नामस्मरणांत तल्लीन होत. गाईवर व ब्राह्मणांवर यांची निष्ठा मोठी होती.

महाराजांचें कवित्व व पत्रव्यवहारहि उपलब्ध आहेत. यांचें एक चरित्र सोलापूरचे घुगरदरे मास्तर यांनीं छापलें आहे. त्र्यं. ना. देशपांडे शिवापूर, पुणें यांनीं यांच्या 'तोंडचीं गद्यपद्यरूप वचनें' एकत्र काढलीं असून तीं क्रमशः 'मुमुक्षु' मासिकांत प्रसिद्ध झालीं आहेत. (ल. रा. पांगारकर–संत-चरित्रमाला).

गौड, रामदास ललिताप्रसाद—(जन्म स. १८८१) हिन्दी व उर्दू भाषेंतील कवि, लेखक व सार्वजनिक कार्यकर्ते.

यांचा जन्म जौनपूर येथें झाला. जात कायस्थ. हल्लीं हे काशीस राहतात. आपल्या वडिलांकडून यांनीं फारसी, गणित व इंग्रजीचें शिक्षण घेतलें. यांची आई व आजी नित्य नियमानें श्रीतुळशीदासाचें रामचरितमानस वाचीत असल्यामुळें बालवयांतच यांना त्याबद्दल प्रेम उत्पन्न झालें. पुढें वयाच्या १० व्या वर्षी यांनीं एक पांच-सहाशें छन्दांनीं युक्त असें रामायण लिहिलें. त्यानंतर यांनीं 'स्वप्नादर्श'ची रचना केली.

वयाच्या १५ व्या वर्षी जौनपूर हायस्कूलमधून हे प्रवेशपरीक्षा पास झाले. नंतर ७ वर्षांनीं सेंट्रल कॉलेजमधून हे बी. ए. झाले. स. १९०४ ते ६ पर्यन्त हे कायस्थपाठशाळेंत रसायनशास्त्राचे प्रोफेसर व स. १९०४ ते १९१८ पर्यंत सेंट्रल कॉलेजांत रसायनशास्त्राचे डेमॉन्स्ट्रेटर होते. मध्यंतरीं स. १९०८ मध्यें हे रसायनशास्त्र घेऊन एम्. ए. झाले. पुढें स. १९१८ मध्यें बनारस हिंदु विश्वविद्यालयाच्या प्राच्य विभागांत ते रसायनशास्त्राचे प्रोफेसर व सेनेट व कला, शास्त्र व प्राच्यविद्याशास्त्री मंडळाचे सदस्य होते. स. १९२०-२१ च्या असहयोग चळवळींत यांनीं ही नोकरी सोडून मिर्झापूरच्या राष्ट्रीय विद्यालयांत काम करूं लागले. १३ डिसेंबर १९२१ रोजीं प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या ५५ सभासदांबरोबर यांनाहि अटक होऊन १॥ वर्ष कारावासाची शिक्षा झाली. परंतु पुढें स. १९२३ त सरकारनें सर्वांच्या बरोबर यांनाहि सोडून दिलें. तेव्हांपासून हे काशीस राहतात. हे ज्ञानपरिषदेचे ऑनररी फेलो व हिन्दी साहित्य-संमेलनाचे सभासद आहेत.

वयाच्या १८-२० वर्षाचे वेळीं छत्तीसगडच्या 'मित्र' या पत्रांत यांच्या 'रस' या टोपण नांवानें कविता येत असत. हल्ली त्यांनीं 'रघुपति' हें नांव धारण केलें आहे. बी. ए. झाल्यानंतर स. १९०५ पर्यन्त यांनीं हिन्दी ग्रंथांची एक सूची इंग्रजींत तयार करून तींत ग्रंथांचा निर्माणकाल, कवींचें संक्षिप्त वृत्त वगैरे गोष्टी अनेक ग्रंथ व रिपोर्टांचे आधारें संकलित केल्या होत्या.

कायस्थपाठशाळेंत असतांना यांनीं 'गौड हितकारी' नामक उर्दू पत्राचें संपादन केलें. यांच्या या कामगिरीमुळें गौड कायस्थांच्या इतिहासाची माहिती उजेडांत आली व तीवरून यांनीं पुढें 'तजकिरये सुचारवंशी' नामक गौड कायस्थांचा इतिहास लिहिला.

मानसिक, सामाजिक, धार्मिक वगैरेबद्दलचा संकुचित-

पणा नष्ट करण्यासाठी यांनीं प्रयाग येथें 'विज्ञान-परिषद' स्थापून व्याख्यानें व पुस्तकांच्या द्वारें शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारास सुरुवात केली. यासाठीं स. १९१५ त यांनीं 'विज्ञान' मासिकहि सुरू केलें. त्यांतील भुनगा पुराण, वायुमण्डलपर विजय, वैज्ञानिक अद्वैतवाद, रसायन, विज्ञानसूत्र इत्यादि लेख विद्वत्तापूर्ण आहेत. यांचे शेंकडों लेख 'अब्दुल्लाह' नांवानेंहि निघालेले आहेत. राष्ट्रीय विद्यालयासाठीं यांनीं ७ पोथ्या हिन्दी-मध्यें लिहिल्या.

उर्दू, इंग्रजी, फारसी, संस्कृत या भाषांचे हे विद्वान् आहेत. याशिवाय बंगाली, गुजराथी, मराठी व प्राकृत भाषांचेंहि यांना यथोचित ज्ञान आहे. यांचें वक्तृत्वहि परिणामकारक असतें. पूर्वी हे चिकित्सक शास्त्रज्ञ होते; अलीकडे हे भाविक भगत बनले आहेत (क. कौ. २, ३५२-५५).

ग्रिफिथ, राल्फ टॉमस हॉचकिन—(जन्म स. १८२६-मृत्यु स. १९०६) वेद व पुराणग्रंथ यांचे सुप्रसिद्ध अभ्यासक व अनुवादक.

विल्टशायर परगण्यांतील कोर्सली हें गांव यांचें जन्मस्थान. वेस्टमिन्स्टर स्कूल व ऑक्सफर्डच क्वीन्स कॉलेज येथें आपलें शिक्षण संपवून हे एम्. ए. झाले (१८४७). विश्वविद्यालयीन अध्ययनाचे कालांतच सुप्रसिद्ध संस्कृत-भाषाभ्यासी विल्सन यांचे सहवासामुळें संस्कृत भाषाध्ययनाची यांना आवड उत्पन्न झाली, काशीच्या क्वीन्स कॉलेजमध्यें इंग्लिश वाङ्मयाचे प्राध्यापक म्हणून नेमणूक होऊन हे हिंदुस्थानांत आले. 'Specimens of Old Indian Poetry' या रामायणमहाभारताच्या कांहीं भागाच्या अनुवादानें संस्कृत वाङ्मयाशीं असणारा आपला संबंध प्रगट केला (१८५३).

इंग्लिशचे प्राध्यापक, प्रिन्सिपल व शेवटीं 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' अशा क्रमानें हे चढत गेले. आणि १८८५ त निवृत्त झाल्याबरोबर निलगिरीमधील कोटगिरींत यांनीं आपलें उर्वरित आयुष्य संस्कृत ग्रंथांचे सान्निध्यांत व्यतीत केलें.

याच ठिकाणीं वेदांचा छंदोबद्ध अनुवाद करण्याच्या यांच्या अनेक वर्षांच्या कल्पनांना मूर्त स्वरूप मिळण्याचा योग आला. The Hymns of the Rig-veda, The Hymns of the Sam Veda, The Hymns of the Yajur Veda, The Hymns of the Atharwa Veda अशा क्रमानें यांचीं ऋक्, यजुस्, साम, अथर्व या चार वेदांचीं भाषांतरें लवकरच प्रसिद्ध झालीं. (१८८९-९७). The Birth of the War-God (१८५३), Idylls from the Sanskrit (१८६६), The Ramayana of Walmiki (१८७०-७५) हे यांचे इतर अनुवादित ग्रंथहि प्रसिद्ध आहेत.

'पंडित' या संस्कृत पत्राचे हे संस्थापक व बरींच वर्षें संपादक होते.

केवळ भाराभर भाषांतरें करणारे अशी यांची प्रसिद्धि कधींच नव्हती. वेदांतील मूळ वातावरण, कल्पना व धाटणी या गोष्टी तंतोतंत आपल्या अनुवादांत उतरविण्यास यांच्या काव्यगुणापेक्षां यांचें संस्कृतचें ज्ञानच अधिक उपयोगी पडलें. आपल्याकडील मल्लिनाथादि टीकाकारांचें अनुकरण व पाश्चात्य टिपणीपद्धतीचा अवलंब अशा दुहेरी दृष्टिकोनांतून यांचीं भाषांतरें निघालेलीं आहेत. त्यामुळें यांच्या भाषांतराच्या तंतोतंत खरेपणाबद्दल कधीं कधीं वाद उत्पन्न होतो; परंतु सर्वसाधारण वाचकाला वेदांची मूलकल्पना समजावून घेण्यास यांच्याइतके रसाळ व वाचनीय अनुवाद दुसरे नाहींत.

यामुळेंच पूर्ण पाश्चिमात्य ज्ञानानें युक्त असलेला पौर्वात्य विद्याभ्यासक अशी यांची भूमिका कधींच नसूनहि प्रमुख प्राच्यविद्यासंशोधकांत एक निश्चित स्थान यांना मिळालें आहे.

ग्रियर्सन, सर जॉर्ज अब्राहम—(जन्म स. १८५१ जाने ७-मृत्यु स. १९४१ मार्च ८) हिंदुस्थानांतील भाषाशास्त्राच्या अभ्यासाचे जनक, पुरातत्त्ववेत्ते व सरकारी अधिकारी.

हे जुन्या सरकारी नोकरांपैकीं असून त्यांचे स्कॉलरशिप व भरपूर मेहेनत हें वैशिष्ट्य होतें. वयाच्या २३ व्या वर्षी हे सिव्हिल सर्व्हंट म्हणून नोकरींत दाखल झाले; त्या वेळेपासूनच हे आपला फुरसतीचा वेळ हिंदुस्थानांतील असंख्य भाषा व लिप्या यांच्या अभ्यासांत घालवूं लागले. यांनीं आपला कालिदासावरील पहिला निबंध १८७७ मध्यें प्रसिद्ध केला. तेव्हांपासून अखेरपर्यंत यांचा व्यासंग सतत चालू होता. १९३६ सालीं यांचा ८५ वा वाढदिवस साजरा करण्यांत आला. त्या वेळीं यांना 'व्हाल्यूम ऑफ इंडियन अँड इराणियन स्टडीज' हा ग्रंथ अर्पण करण्यांत आला. त्या ग्रंथांत हिंदुस्थानांत ६०वर्षेपर्यंत यांनीं केलेल्या भाषाशास्त्रविषयक अभ्यासाचा अत्यंत गौरवपूर्वक उल्लेख करण्यांत आला आहे. त्याच

ग्रंथांत २० पानें यांच्या लिखाणाच्या सूचीनें व्यापलेलीं पाहून यांच्या लिखणाचा व्याप ध्यानांत येतो. तसेंच हिंदुस्थानांतील २०० पेक्षां अधिक लिप्यांवर असलेलें यांचें प्रभुत्वहि समजून येतें. अनेक लिप्यांप्रमाणें अनेक भाषाहि यांना येत असल्या तरी हिंदुस्थानांतील वायव्य भागाच्या भाषेवर यांचें विशेष प्रभुत्व होतें. यांनीं त्यांपैकीं कित्येक ज्ञात ब अज्ञात भाषांचीं व्याकरणें लिहिलीं. तसेंच मध्ययुगीन व अर्वाचीन इन्डो-आर्यन ग्रंथांचीं भाषान्तरें केलीं.

यांनीं 'लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' या ग्रंथाचे २० खंड प्रसिद्ध करून हिंदुस्थानांतील भाषांच्या अभ्यासकांना पूर्वपरंपरा तर प्रगट करून दाखविलीच, शिवाय त्या त्या भाषेंतील अनेक उतारे देऊन नवीन अभ्यासकांना सांगाडा निर्माण करून देऊन त्यांच्या घटनेचा अभ्यास करून, त्यांची वर्गवारी करण्याचा प्रयत्न केला. यांच्या या कार्यामुळें हिन्दी विश्वविद्यालयांचें भाषाशास्त्राच्या शास्त्रीय अभ्यासाकडे लक्ष ओढलें गेलें. यापुढें प्रत्येक संशोधकावर यांच्या या कार्याची छाप पडणें अपरिहार्य होऊन बसलें आहे.

यांचा हा प्रचंड प्रयत्न भाषाशास्त्रांतील नवीन शोधास जन्म देणारा असल्यानें यांच्या उत्तर आयुष्यांत यांच्यावर जगांतील सर्व भागांतून पदव्या व मान यांचा वर्षाव झाला. बंगालच्या व मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या शाखेचे हे ऑननरी फेलो होते. नागरी प्रचारिणी-सभा (काशी), बिहार अँन्ड ओरिसा रिसर्च सोसायटी, दि मॉडर्न लँग्वेज असोसिएशन, लिंग्विस्टिक सोसायटी ऑफ इंडिया व बंगीय साहित्य परिषद या संस्थांचे हे ऑनररी सभासद होते. मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचें कँबेल गोल्ड मेडल व बंगाल रॉयल एशियाटिक सोसायटी सर वुइल्यम जोन्स गोल्डमेडल हीं यांना मिळालीं होतीं.

घ

घाटगे, श्रीमंत जयसिंगराव आबासाहेब— (जन्म स. १८५७ मार्च १२–मृत्यु स. १८८५) कोल्हापूर राज्याचे रीजंट स. १८८२–८५.

कोल्हापूर राज्यापैकीं कागलचे जहागीरदार व छत्रपति शाहूमहाराजांचे जनक. शिवाजीमहाराज स. १८७० सालीं गादीवर आले व त्यांना लवकरच वेड लागलें, तेव्हां यांना स. १८८२ पासून कोल्हापूर संस्थानचे रीजंट नेमण्यांत आलें. यांनीं तो कारभार उत्तम चालविला, तेव्हां ब्रिटिश सरकारकडून यांना नऊ तोफांची सलामी मिळाली.

यांची माता कोल्हापूरच्या छत्रपति घराण्यांतील छत्रपति शिवाजी तथा बाबासाहेब महाराज (स. १८६२–६६) यांच्या भगिनी अक्कासाहेब महाराज या होत. यांची पहिली पत्नी मुधोळच्या राजेसाहेबांची एकुलती एक कन्या होय. या उभयतांपासून झालेले यशवंतराव यांना दत्तक देण्यांत आलें (१८८४ मार्च १८) आणि शाहूमहाराज हें नांव धारण करून कोल्हापूरचे छत्रपति म्हणून ते प्रसिद्धीस आले.

घाटगे, विठ्ठलराव—(जन्म स. १९२०–मृत्यु स. १९४३) दुसऱ्या महायुद्धांत जर्मनीविरुद्ध लढतांना कामीं आलेले पण रणांगणावरील पराक्रमाबद्दल सर्वश्रेष्ठ 'व्हिक्टोरिया क्रॉस' मिळविणारे मराठा वीर. यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यांत झाला.

घाटे, दत्तात्रेय कोंडो—(जन्म स. १८७५–मृत्यु स. १८९९) सुप्रसिद्ध मराठी कवि. हे 'दत्त कवि' या नांवानें विशेषतः लोकांच्या परिचयाचे आहेत.

यांचा जन्म अहमदनगर येथ झाला. हे जातीनें मराठा असणारे गृहस्थ १८९० सालीं मॅट्रिक व १८९८ सालीं बी. ए. झाले. याच वर्षी हे नोकरीच्या हेतूनें बडोद्यास गेले. तेथें यांचा सुप्रसिद्ध राजकवि चंद्रशेखर यांच्याशीं स्नेह जमला. पण तेथें उद्भवलेल्या प्लेगला हे अकालीं बळी पडले.

यांनीं कवितालेखन आठ वर्षे केलें. त्यांपैकीं शेवटल्या साडेचार वर्षांत लिहिलेल्या कविता यांचे पुत्र विठ्ठलराव